अथर्ववेद-

गृहस्थाश्रम

(भाग ३)

लेखक

म. म. ब्रह्मर्षि पं. श्रीपाद दामोदर सातवलेकर
विद्या-मार्तण्ड, साहित्य-वाचस्पति, गीतालंकार

पारडी (जि. बलसाड)

■ **प्रकाशक :**
स्वाध्याय मंडळ
पं. सातवळेकरजी मार्ग
पोस्ट - ' स्वाध्याय मंडळ (पारडी) '
पारडी
जि. बलसाड, पिन :- ३९६ १२५ (गुजरात)

■ **अनुवादक :**
श्री. यशवंत कृष्ण पटवर्धन
एम. ए., एम. टी. सी., बी. टी.
काव्यतीर्थ

■ **मुद्रक :**
संवाद ट्रेडप्रिंटस् प्रा. लि.
१००५ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
(दूरध्वनी : ४८५६३२)

■ **द्वितीय आवृत्ती :**
नारळी पौर्णिमा, श्रावण शके १९२०
(७ ऑगस्ट १९९८)

■ **प्रमुख वितरक**
भारतीय विचार साधना
' मोतीबाग, ' ३०९ शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०.
(दूरध्वनी : ४९० ४५४)

■ **मूल्य :** रु 550.

प्रकाशकाचे मनोगत ...

संस्कृत, वेद आणि वैदिक साहित्याचे ज्ञाते, अभ्यासक आणि संशोधक वेदमूर्ती पं. श्रीपाद दा. सातवळेकर यांनी लिहिलेल्या 'अथर्ववेद-गृहस्थाश्रम' या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन करताना संस्थेला आनंद होत आहे.

पं. सातवळेकर यांनी लिहिलेल्या 'वैदिक राष्ट्रगीता' वर ब्रिटिश सरकारने १९०७ साली प्रतिबंध घातला. वेदांच्या एका छोट्या मंत्रात जर ब्रिटिश राजवटीला हादरवून टाकण्याचे सामर्थ्य असेल तर वेदांचा समग्र अभ्यासच का करू नये, अशा विचाराने त्यांनी वेदांचा प्रचार - प्रसार हेच पुढे आपल्या जीवनाचे ध्येय बनवले.

वेदवाङ्मय व अन्य संस्कृत साहित्याच्या आधारे पंडितजींनी ४०९ ग्रंथ - पुस्तके लिहिली. यातील अनेक ग्रंथ - पुस्तके सध्या उपलब्ध नसल्याने पंडितजींच्या साहित्याचे पुनर्प्रकाशन करण्याचे काम सुरू आहे.

विविध संस्था, व्यक्ती यांनी अर्थसाहाय्य केल्यामुळेच या दुर्मिळ ग्रंथांच्या पुनर्प्रकाशनाचे काम शक्य झाले. प्रस्तुत ग्रंथासाठी श्री. शिवजीभाई पटेल (गुरुदेव कॉर्पोरेशन, लातूर), श्री. उत्तमराव पाटील (वैशाली कन्स्ट्रक्शन, लातूर) चितळे परिवार - श्रेयस हॉटेल, पुणे, हिंदुस्थान जागरण, पुणे, श्री. भानुदास किराड, पुणे, भारतीय विचार साधना पुणे आणि अन्य संस्कृत प्रेमी मंडळींनी केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

वेदांच्या अभ्यासकांसाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रकाशक

ॐ

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

गृहस्थाश्रम

भूमिका

या पुस्तकांत अथर्ववेदांतील गृहस्थाश्रमविषयक ६५ सूक्तें व ११०० मंत्र दिले आहेत.

'**गृहस्थाश्रम**' हा चारी आश्रमांचा आधार आहे. ब्रह्मचर्याश्रमांत विद्या प्राप्त करावयाची असते, म्हणून त्यांत अर्थार्जन होऊं शकत नाहीं. आयुष्याचीं सुरवातीचीं सुमारें २५ वर्षे या आश्रमांत निघून जातात.

वानप्रस्थ आणि संन्यास या दोनहि आश्रमांत अर्थार्जन करतां येत नाहीं. याप्रकारें आपल्या वर्णाश्रम व्यवस्थेंतील वरील तीन आश्रम धन प्राप्त करूं शकत नाहींत. म्हणजेच हे तीनहि आश्रम उदरनिर्वाहासाठीं गृहस्थाश्रमावर अवलंबून आहेत. याविषयीं मनुस्मृतींत म्हटलें आहे कीं—

यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सर्वजन्तवः।
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्व आश्रमाः ॥ १४ ॥
यस्मात् त्रयोऽप्याश्रमिणो दानेनान्नेन चान्वहम्।
गृहस्थेनैव धार्यन्ते तस्माज्ज्येष्ठाश्रमो गृही ॥ १५ ॥
स संधार्यः प्रयत्नेन स्वर्गं अक्षय्यं इच्छता।
सुखं चेहेच्छता नित्यं योऽधार्यो दुर्बलेन्द्रियैः ॥१६॥
सर्वेषामपि चैतेषां वेदस्मृतिविधानतः।
गृहस्थ उच्यते श्रेष्ठः स त्रीनेतान् बिभर्ति हि ॥१७॥
यथा नदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम्।
तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥१८॥
सेनापत्यं च राज्यं च दण्डनेतृत्वमेव च।
सर्वलोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति ॥ १८ ॥

(मनुस्मृति)

*

'ज्याप्रमाणें वायूच्या आधारानें सर्व प्राणी जीवंत रहातात, अगदीं त्याचप्रमाणें गृहस्थाश्रमाच्या आधारानें बाकीचे तीनही आश्रम रहातात. म्हणजे ब्रह्मचारी, वानप्रस्थ आणि संन्यासी यांस दान तसेंच दररोज अन्न देऊन गृहस्थच सुखी ठेवतो; आणि म्हणूनच गृहस्थाश्रम श्रेष्ठ होय. ज्याला अक्षय्य स्वर्ग प्राप्त करण्याची इच्छा असेल, तसेंच जो कोणी या लोकीं सुख मिळवूं इच्छितो, त्यानें प्रयत्नपूर्वक गृहस्थाश्रम स्वीकारला पाहिजे. निर्बल मनुष्य गृहस्थाश्रम सफल करूं शकत नाहीं. वेद आणि स्मृतीचें म्हणणें असें आहे कीं चारही आश्रमांत गृहस्थाश्रमच श्रेष्ठ आहे; कारण कीं गृहस्थ हा बाकी तीन्ही आश्रमांचें भरण-पोषण आणि संरक्षण करूं शकतो. ज्याप्रमाणें नदी आणि नद समुद्रास मिळाल्यानें सुरक्षित होतात, त्याप्रमाणें गृहस्थाश्रमाच्या आधारानें बाकीचे तीन्ही आश्रम सुरक्षित होतात. सेनापतीचें कार्य, राज्यशासनाचें कार्य, आणि न्यायदानाचें कार्य आणि सर्व प्रजेवर अधिकार करण्याचें कार्य वेदरूपी शास्त्र जाणणारा गृहस्थच करूं शकतो.'

याप्रमाणें गृहस्थाश्रमाचें महत्त्व स्मृति-ग्रंथांमध्यें सांगितलें आहे खरोखर गृहस्थाश्रम सर्व राष्ट्रीय जीवनाचा आधार आहे. अशा सर्वश्रेष्ठ गृहस्थाश्रमाविषयीं, वेदमंत्रांत काय म्हटलें आहे तें अवश्य पाहिलें पाहिजे. तें पाहण्यासाठींच हा तिसरा खंड रचिला आहे. यांत अथर्ववेदांतील गृहस्थाश्रमाविषयक सर्व मंत्रांचा संग्रह केला आहे, आणि त्या मंत्रांतील गूढार्थाचें स्पष्टीकरणहि केलें आहे. वेदांत स्त्रियांस किती उच्च स्थितींत ठेवण्यास सांगितलें आहे, याविषयीं खालील मंत्र पहा—

सम्राज्ञी श्वशुरे भव सम्राज्ञी श्वश्र्वां भव ।
ननान्दरि सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधि देवृषु ॥
(ऋ. १०।८५।४६)

सम्राज्ञ्येधि श्वशुरेषु सम्राज्ञ्युत देवृषु
ननान्दुः सम्राज्ञ्येधि सम्राज्ञ्युत श्वश्र्वाः ॥
(अथर्व० १४।१।४४)

' हे स्त्रि ! तूं सासरा, सासु, नणंद, दीर इत्यादि सर्वांसह सासरीं सम्राज्ञी होऊन रहा; राणी ज्याप्रमाणें राजमहालांत आनंदांत रहाते, त्याप्रमाणें तूं राणीसारखा अधिकार चालवीत येथें सुखानें रहा. स्त्रिनें दासीभावानें हीन अवस्थेंत राहूं नये, परंतु उत्तम अधिकारानें तिनें सासरीं रहावें, असें या मंत्रांचें तात्पर्य आहे.

अघोरचक्षुरपतिघ्न्येधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्चाः । वीरसूर्देवृकामा स्योना शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥ (ऋ. १०।८५।४४)
अघोरचक्षुरपतिघ्नी स्योना शग्मा सुशेवा सुयमा गृहेभ्यः । वीरसूर्देवृकामा सं त्वयैधिषीमहि सुमनस्यमाना ॥ १७ ॥
अदेवृघ्न्यपतिघ्नीहैधि शिवा पशुभ्यः सुयमा सुवर्चाः । प्रजावती वीरसूर्देवृकामा स्योनेममग्निं गार्हपत्यं सपर्य ॥ १८ ॥ (अथर्व १४।२)

'हे स्त्री ! तूं (**अ-घोर-चक्षुः**) तुझी दृष्टि क्रूर नसो, (**अ-पतिघ्नी**) पतीला कष्ट देऊं नकोस, **(पशुभ्यः शिवा)** घरच्या जनावरांचें कल्याण करणारी, तसेंच (**सुमनाः सुवर्चाः**) उत्तम मनानें युक्त, तसेंच उत्तम तेजस्विनी होऊन रहा. (**वीर-सूः**) वीर पुत्रांना जन्म देणारी हो, (**देवृकामा**) पतीचा भाऊ घरांत असावा अशी इच्छा करणारी, (**स्योना**) सुख देणारी, (**नः द्विपदे चतुष्पदे शं भव**) आमच्या द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांना आनंद देणारी हो. (**शग्मा सुशेवा**) सुखदायी आणि पतीची उत्तम सेवा करणारी हो. (**गृहेभ्यः सुयमा**) घरच्या लोकांशीं उत्तम नियमांनीं वागणारी होऊन रहा. (**प्रजावती**) प्रजा उत्पन्न करणारी होऊन या गार्हपत्य अग्नीची उपासना कर. '

या प्रकारें वेदानें स्त्रिला घरची सम्राज्ञी म्हटलें आहे. आणखी पहा—

इह प्रियं प्रजया ते समृध्यतां अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि । एना पत्या तन्वं सं सृजस्वाऽधा जिव्री विदथमा वदाथः ॥ (ऋ. १०।८५।२७)
एना पत्या तन्वं सं स्पृशस्वाथ जिव्रिः० ।
(अथर्व. १४।१।२१)

' स्वतःच्या प्रजेमुळें तुझें येथें कल्याण होवो. या तुझ्या पतीच्या घरांत गृहस्थधर्माचें पालन करण्यासाठीं जागृत रहा. या पतीसह सुखानें रहा आणि यज्ञांत स्वतःच्या पतीसह भाग घे. ' तसेंच—

' मा विदन् परिपन्थिनो य आसीदन्ति दम्पती । सुगेन दुर्गमतीतां अप द्रान्त्वरातयः ॥
(अथर्व. १४।२।११; ऋ. १०।८५।३२)

' जे त्याच्याजवळ रहात असतील ते शत्रु या पति–पत्नीस न जाणोत. सुगम मार्गानें ते कठिण कार्यें करीत राहोत आणि शत्रु दूर पळून जावोत. ' तसेंच—

आ नः प्रजां जनयतु प्रजापतिराजरसाय समनक्त्वर्यमा । अदुर्मङ्गलीः पतिलोकमा विश शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥ ४३ ॥
इमां त्वमिन्द्र मीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु । दशास्यां पुत्राना धेहि पतिमेकादशं कृधि ॥ ४५ ॥
(ऋ. १०।८५)

' प्रजेचा पालक ईश्वर या स्त्रीमध्यें प्रजा उत्पन्न करो. अर्यमा वृद्धावस्थेपर्यंत त्या दोघांस घेऊन जावो; म्हणजे यांस दीर्घायु करो. पतीच्या घरीं जाऊन ती मंगल कार्यें करणारी होवो. द्विपाद आणि चतुष्पादांचें कल्याण करणारी ही स्त्री होवो. हे इंद्रा ! तूं या स्त्रिस उत्तम पुत्र होतील असें कर. ही स्त्री सौभाग्ययुक्त होवो . या स्त्रिला दहा पुत्र होवोत आणि मग पतीला ती अकरावा मानो. '

वेदांत दहा पुत्र उत्पन्न करण्याची मर्यादा सांगितली आहे. पण ब्राह्मण ग्रंथांत 'अष्टपुत्रा' आठ पुत्र व्हावे असें म्हटलें आहे. यावरून वेदकाल आणि ब्राह्मण ग्रंथकालांत संतति नियमनाविषयीं एवढें अंतर पडलें, असें दिसतें, आणि आजचें सरकार तर संततिनियमन करणारांस मदत करतें. इतकें कालपरिवर्तन झालें आहे. वैदिक कालीं दहा पुत्र होण्याची इच्छा पतिपत्नी करीत असत. ब्राह्मणकालांत आठ पुत्र पुरेत असें मानूं लागले ! आणि आज संतति न व्हावी असें मानण्यास लोक

तयार झाले आहेत. हें कालाचें अतर्क्य सामर्थ्य आहे, दुसरें काय ? पुढें पहा–

इहैव स्तं मा वि यौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतम् ।
क्रीळन्तौ पुत्रैर्नप्तृभिः मोदमानौ स्वे गृहे ॥
(ऋ. १०।८५।४२)

मोदमानौ स्वस्तकौ (अथर्व १४।१।२२)

' येथें रहा **(मा वि यौष्टं)** मजपासून वेगळी होऊं नकोस. दोघेहि एकत्र पूर्ण आयुष्य उपभोगूं, आपल्या घरीं पुत्र–पौत्रांसह आनंदानें हंसत खेळत कालक्रमण करीत रहा ! '

येथें **'मा वियौष्टं'** कधीं विभक्त न होण्याचा आदेश आहे. वेदानें अशाप्रकारें विवाहविच्छेदाचा निषेध केला आहे. शंभर सवाशें वर्षें पुत्र–पौत्रांसह आनंदानें एकमेकाचा वियोग न होतां घालवावीं. कधींहि विभक्त होऊं नये. विवाहविच्छेदास वेदाची मान्यता नाहीं. स्वतःच्या घरीं पुत्र–पौत्रांसह आनंदानें रहाण्याची वेदाची आज्ञा आहे.

स्त्रिया कशा असल्या पाहिजेत ?

स्त्रिया कशा असाव्यात याविषयीं वेद म्हणतो–

शुद्धाः पूता योषितो यज्ञिया इमाः
ब्रह्मणां हस्तेषु प्रपृथक् सादयामि ॥
(अथर्व. ६।१२२।५)

' शुद्ध, पवित्र, आणि पूजनीय अशा स्त्रिया असाव्यात. त्यांस ज्ञान्यांच्या हातीं वेगवेगळ्या सोंपून देतों. ' ज्यांना कन्यादान करावयाचें असेल त्यांनीं स्वतःची कन्या ज्ञान्यास द्यावी, अज्ञान्यांस देऊं नये. त्याचप्रमाणें स्त्रियांनीं सुद्धां विचार शुद्ध राखावेत, भाषा शिष्ट आणि मित बोलावी, आणि आचरण पवित्र ठेवावें; म्हणजे असें पवित्र भाषण करणारी स्त्री तिच्या सदाचारामुळें, पूजनीय व वंद्य होते. विचार, आचार आणि उच्चार तिन्ही शुद्ध, पवित्र व उच्च असावेत.

ब्रह्मचर्येण कन्या युवानं विदन्ते पतिम् ।
(अथर्व. ११।५।१८)

' कन्या कन्यागुरुकुलांत राहून विदुषी होत असे. इकडे पुत्र सुद्धां गुरुकुलांत राहून विद्वान् होत असे. अशा दोघांचा तारुण्यांत विवाह **(युवानं विदन्ते पतिं)** होत असे.' स्त्री आणि पुरुष दोघेहि तरुण आणि विद्वान् असत, त्यामुळें दोघांसहि विवाह–मंत्रांचा अर्थ सहज समजूं शके.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत . धर्माचरण ब्रह्मचर्याश्रमांत सुरू होतें. त्यानंतर विद्याप्राप्तीनंतर तिच्याच जोरावर **' अर्थ '** म्हणजे धन मिळवावयाचें असतें. धन मिळूं लागलें म्हणजे ' काम ' पुरुषार्थासाठीं लग्न करून गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा असतो; म्हणून चारी पुरुषार्थांत **' अर्थ '** प्रथम सांगून मग **' काम '** सांगितला आहे. धनहीन माणसास गृहस्थधर्माचें पालन चांगल्यारीतीनें करतां येणार नाहीं. म्हणून म्हटलें आहे कीं—

भगेन सह कुमारीं आगमेत् । (अथर्व. २।३६।१)

' पुरुषानें धन मिळवून कुमारी कन्येच्या घरीं जाऊन तिला पत्नीरूपानें प्राप्त करावीं. ' स्त्रिचें आणि संततीचें पोषण गृहस्थाला करावयाचें असतें. त्यासाठीं विद्याप्राप्तिनंतर पुरुषानें धन प्राप्त करावें आणि मग विवाह करावा. विवाहानंतर—

भगस्य जुष्टा इयं नारी । पत्या अविराधयन्ती
स प्रिया अस्तु (अथर्व. २।३६।४)

' ऐश्वर्य प्राप्त झालेली ही स्त्री पतिसह पतीला विरोध न करतां त्याच्या घरीं नांदून त्या पतीला प्रिय होवो. ' विवाहापूर्वींच, कन्या असतांना स्त्रिला विवाहानंतर पतिगृहीं कसें वागावें एतत्संबंधीं शिक्षण मिळालें पाहिजे, हल्लीं सर्वांस स्वतंत्रता पाहिजे असते. स्वतंत्र विचार अवश्य असावेत. पण त्या स्वतंत्र विचारांच्या आहारीं जाऊन त्यांचें दास होऊं नये. ज्यायोगें पति–पत्नीमध्यें विरोध निर्माण होईल अशी स्वतंत्रता काय कामाची ? म्हणूनच म्हटलें आहे कीं—

पतिं गत्वा सुभगा वि राजतु पुत्रान् सुवाना
महिषी भवाति । (अथर्व. २।३६।३)

' ही स्त्री पतीच्या घरीं जाऊन तेथील स्वामिनी होवो, ऐश्वर्ययुक्त होवो; आणि पुत्रांना जन्म देऊन त्या पतीच्या घराची महाराणी होऊन राहो. ' येथील **' महिषी भवाति '** हे शब्द मुख्य आणि महत्त्वाचे आहेत. सम्राज्ञी अथवा राणीप्रमाणें ती पतीच्या घरीं शोभो. स्त्रियांची अशी योग्यता असते. राष्ट्रसंवर्धन करण्याचें कार्य स्त्रियांचें आहे. स्त्रिया संतति निर्माण करतात त्यामुळें राष्ट्रांतील प्रजा वाढते, म्हणजे राष्ट्र वाढतें. केवळ पुरुषच असले तर राष्ट्र वाढणार नाहीं. प्रजेची अभिवृद्धि करण्याचें कार्य स्त्रियांचेंच आहे. म्हणून वेद म्हणतो कीं, स्त्रियांना राणीप्रमाणें घरीं ठेवावें. पतीच्या घरीं आलेल्या स्त्रिनें कशाची इच्छा करवी त्याविषयीं असें म्हटलें आहे—

आशासाना सौमनसं प्रजां सौभाग्यं रयिम् ।
(अथर्व. १४।१।४२)

' पतीच्या घरीं **(सौ–मनसं)** उत्तम मन आणि उत्तम

विचारांनी राहून (**प्रजां**) उत्तम संततीची इच्छा करावी.' माझी संतति उत्तम निर्माण व्हावी, असे विचार मनांत धारण करावेत. उत्तम भाग्य आणि ऐश्वर्य प्राप्त व्हावें, अशी इच्छा तिनें करावी. घरचे व्यवहार तिनें अशा प्रकारें करावेत कीं, घरची ती राणी आहे असें पहाणाऱ्यांस वाटावें.

पत्युः अनुव्रता भूत्वा सं नह्यस्व अमृताय कम् ।
(अथर्व. १४।१।४२)

' घरांत स्त्री पतीला अनुकूल होऊन वर्तो आणि अमरत्व आणि आनंद प्राप्त करण्याचा प्रयत्न करो.' अमृत आणि आनंद प्राप्त केला पाहिजे. अमृताचा अर्थ आहे दीर्घजीवन आणि आनंदाचा अर्थ आहे मनाला शांतिपूर्ण सुख लाभणें. हें सर्व घरांत जर पति-पत्नी एकमेकांस अनुकूल असतील तरच प्राप्त होतें. घरांत जर परस्परानुकूलत्व असेल तरच आनंद आणि शांति स्थापन होऊं शकते. मनुष्य स्वतंत्र आहे त्यामुळें मतभेद तर होतच रहातील, पण ते वाढूं नयेत याविषयीं दक्षता राखावी. या गोष्टी मर्यादेंत असल्या म्हणजे घरांत शांति आणि सुख वाढतें.

स्त्रियांनीं सूत काढावें

घरांत जेव्हां रिकामा वेळ असेल तेव्हां स्त्रियांनीं सूत काढावें, आणि कपडे तयार करावेत—

देवीः अकृन्तन् तत्निरे अभितः अन्तान् ददन्त अवयन् । सं व्ययन्तु आयुष्मतीं इदं वासः परिधत्स्व ॥ (अथर्व. १४।१।४५)

' देवींनीं घरांत सूत काढावें, ताणे तयार करावेत, कापडांच्या दशांना पीळ भरून गांठी द्याव्यात, विणण्याचें कार्य करावें. तें कार्य घरांतील सर्व स्त्रियांनीं एकत्र येऊन बसून करावें, चांगल्या प्रकारें हें कार्य करावें. दीर्घायुष्य प्राप्त करणाऱ्या स्त्रिनें हे कपडे परिधान करावेत.'

पत्नीनें तयार केलेले कपडे पतीनें वापरावेत. असे कपडे घालावयास मिळाल्यानें पत्नीचें स्मरण पतीला पावलोंपावलीं होत राहील. आणि त्यामुळें स्वतःच्या पत्नीचा अशा पुरुषाला केवढा अभिमान वाटेल! स्वपत्नीविषयीं त्याला केवढें प्रेम वाटेल! याचा विचार वाचकांनींच करावा. माझ्या पत्नीनें विणलेला कपडा मीं अंगांत घातला आहे ही कल्पनाच किती आनंद देणारी आहे. त्याचा विचार केला तर ध्यानीं येईल कीं गृहस्थाश्रमांत हेंच प्रेम मिळवावयाचें असतें. असा आनंद प्रत्येक गृहस्थाला प्राप्त होवो आणि त्यामुळें ते सुखी होवोत.

निष्कपटी व्यवहार

स्त्रीपुरुषांचें, पति-पत्नींचें परस्परांशीं वर्तन निष्कपटी असलें पाहिजे. त्याविषयीं वेद म्हणतात—

यत् अन्तरं तत् बाह्यम् । यत् बाह्यं तत् अन्तरम् ।
(अथर्व. २।३०।४)

' जसें मनांत असेल तसाच व्यवहार बाह्य जगांत ठेवावा. तसेंच बाह्य व्यवहाराप्रमाणेंच मनांत विचार असावेत.' कोणत्याहि प्रकारचें कपट अथवा एकदुसऱ्यास फसवण्याची वृत्ति दोघांपैकीं कोणाच्याहि मनांत नसावी. वेदांनीं किती सुंदर, सरस आणि उच्च आदर्श गृहस्थासमोर ठेवला आहे. अशा प्रकारें वागण्यानें संसार आणि जीवन अमृतरूप आणि आनंदमय होतें.

परस्पर प्रेम

दांपत्य जीवनांत पति-पत्नींचें परस्पर प्रेम असलें पाहिजे. त्यांचा एक दुसऱ्याकडे ओढा असावा; त्या दोघांत विरोध कधींहि नसावा. या विषयीं म्हटलें आहे—

यथा वृक्षं लिबुजा समन्तं परिषस्वजे ।
एवा परि ष्वजस्व मां यथा मां कामिनी असः ।
यथा मन्नापगा असः । (अथर्व. ६।८।१)

' ज्याप्रमाणें वृक्षाच्या आधारानें वेल वाढते व फुलते, तद्वत् हे स्त्रिये! तूं माझ्या आश्रयानें रहा, माझी इच्छा करणारी हो आणि मजपासून दूर जाणारी होऊं नकोस.'

असें दोघांचें आंतरिक प्रेम असलें पाहिजे. तसें जर असलें तर गृहस्थाश्रम स्वर्गधामच होईल. असें प्रेमसुख प्राप्त झालें, तर त्यायोगें दोघांचें जीवनहि वृद्धिंगत होतें, आयुष्य वाढतें. मनाचें सामर्थ्य वाढल्यानें रोग दूर होतात. जीवनांत नवा रस उत्पन्न होतो आणि सर्व प्रकारचा आनंद अनुभवावयास मिळतो. तसेंच—

अन्तः कृणुष्व मां हृदि मन इन्नौ सहासति ।
(अथर्व. ७।३६।१)

' हे स्त्रिये! तूं मला तुझ्या स्वतःच्या अंतःकरणांत ठेव; आपलीं मनें नेहमीं मिळालेलीं असोत.' दोघांचें एकामेकांविषयीं प्रेम असावें; विरोध कधीं नसावा. पत्नीच्या अंतःकरणांत पतीचें हित व पतीच्या हृदयांत पत्नीचें हित असावें; अशा प्रकारें मनानेंहि त्यांनीं एक होऊन रहावें.

केंस स्त्रियांचें सौंदर्य आहेत

स्त्रियांचें सौंदर्य केसांनीं वाढतें, म्हणून स्त्रियांनीं स्वतःच्या केसांची काळजीपूर्वक निगा राखावी; त्यांचें उत्तम प्रकारें रक्षण करावें.

केशा नडा इव वर्धन्तां शीर्ष्णः ते असिताः परि ।
(अथर्व. ६।१३७।२)

' तुझ्या डोक्याचे केंस ज्याप्रमाणें गवत वाढतें तसे वाढोत, ते पांढरे होऊं नयेत; काळे राहोत. ' स्त्रियांनीं केसांचें रक्षण करणें योग्य आहे. त्यासाठीं वनस्पतिसुद्धां आहेत. केशवर्धक औषधीचें वर्णन पहा—

देवी देव्यामधि जाता पृथिव्यामस्योषधे ।
तां त्वा नितत्नि केशेभ्यो दृंहणाय खनामसि ॥
(अथर्व. ६।१३६।१)

' हे औषधि ! तूं दिव्यगुणयुक्त आहेस. तूं पृथ्वीवर उगवतेस. हे खालीं जमिनीच्या आंत पसरणाऱ्या औषधी ! केसांना बलवान् आणि सुदृढ करण्यासाठीं मीं तुला खोदून काढीत आहे. '

या औषधिरसानें केंस वाढतात, मजबूत होतात; तुटत नाहींत. चांगल्या प्रकारें काळे रहातात आणि सुंदर दिसतात.

या औषधीचें नांव ' **नितत्नि** ' असें आहे. पण ती कोणती वनस्पति हें आज निश्चितपणें सांगतां येत नाहीं; तिच्याविषयीं जास्त संशोधन होण्याची जरुरी आहे. या वनस्पतीपासून जे फायदे होतात ते या सूक्तांत स्पष्ट सांगितले आहेत. हल्लीं केंसा-विषयीं पुष्कळांना काळजी वाटत असते. जर ही वनस्पति नक्की कोणती तिचा शोध लागला, तर पुष्कळांना तिचा फायदा घेतां येईल. कां. ६।५९ मध्यें ' **अरुन्धती, जीवला** ' या औषधींचीं नांवें सुद्धां याच कार्यासाठीं आलीं आहेत.

रश्मिस्नान

स्त्रियांनीं रश्मि-सूर्यकिरण-स्नान करावें असें वेद सांगतो. त्या स्नानानें अपूर्व आरोग्य प्राप्त होतें. रश्मि म्हणजे सूर्याचीं किरणें. रश्मि स्नान म्हणजे सूर्यकिरणांत हिंडणें फिरणें. पहा—

सूर्यस्य रश्मीन् अनु याः संचरन्ति ।
मरीचीर्वा या अनुसञ्चरन्ति ॥ (अथर्व. ४।३८।५)

' सूर्याच्या किरणांत अनुकूलतेप्रमाणें हिंडण्या-फिरण्याऱ्या अथवा सूर्यप्रकाशांत अनुकूलतेप्रमाणें फिरणाऱ्या. ' अशा स्त्रिया असाव्यात.

' **सूर्य आत्मा जगतः तस्थुषश्च ।**
(ऋ. १।११५।१; वा. य. ७।४२)

' सूर्य सर्व स्थावर जंगम वस्तूंचा आत्मा आहे. ' एवढें सामर्थ्य सूर्यांत आहे. सूर्यप्रकाशानें तें सामर्थ्य मनुष्यांस प्राप्त होतें. जी स्त्री अथवा जो पुरुष उन्हांत-सूर्यप्रकाशांत-हिंडतो, फिरतो त्यास असें सामर्थ्य प्राप्त होतें. दीर्घायु होण्यास या रश्मिस्नानाची चांगली मदत होते, म्हणून स्त्रियांनीं रश्मिस्नान अवश्य करावें असें सांगितलें आहे. स्त्रियांचें मुख्य कार्य संतानोत्पत्ति हें आहे. तें राष्ट्ररक्षणासाठीं फार अगत्याचें आहे, म्हणून स्त्रियांचें रक्षण अवश्य केलें पाहिजे. त्याविषयीं वेदाची आज्ञा अशी आहे—

कर्कीं वत्सां इह रक्ष वाजिन् । (अथर्व ४।३८।६)

' कर्तृत्वयुक्त कन्येचें या जगांत उत्तम रक्षण कर. ' कन्येची कर्तृत्वशक्ति वाढेल असें शिक्षण तिला दिलें पाहिजे, आणि उत्तम प्रकारें तिचें रक्षण केलें पाहिजे.

स्त्रिच्या पातिव्रत्याचें रक्षण

स्त्रियांच्या पातिव्रत्याचें उत्तम प्रकारें रक्षण व्हावयास हवें. राष्ट्रीय कार्यांत हें मुख्य आणि उल्लेखनीय कर्तव्य आहे. त्याविषयीं वेद म्हणतात—

देवा वा एतस्यां अवदन्त पूर्वे सप्त ऋषयस्तपसा
ये निषेदुः । भीमा जाया ब्राह्मणस्यापनीता दुर्धां
दधाति परमे व्योमन् ॥ ६ ॥
ये गर्भा अवपद्यन्ते जगद् यच्चापलुप्यते ।
वीरा ये तृह्यन्ते मिथो ब्रह्मजाया हिनस्ति तान्॥७॥
(अथर्व. ५।१७)

' याविषयीं देवांनीं पूर्वीच दौंडी पिटून जाहिर केलें आहे आणि तपासाठीं बसलेल्या सप्तऋषींनीं त्याप्रमाणेंच म्हटलें आहे कीं, ज्ञान्याची पळवून नेलेली स्त्री भयंकर होय. तिला परम श्रेष्ठ-स्थानीं ठेवणें सुद्धां कठीणच. जे गर्भ पाडण्यांत येतात, जेथें चालणाऱ्या प्राण्यांचा नाश होतो, जेथें वीर आपापसांत लढतात, पळविलेल्या स्त्रीमुळें त्या सर्वांचा नाश होतो. '

कोणा एखाद्याच्या पत्नीला पळवून नेण्यांत आलें आणि जर त्या स्त्रिच्या पातिव्रत्याचा नाश करण्यांत आला, तर तो पातिव्रत्य-नाश सर्व राष्ट्राचा घात करतो, असें देव आणि ऋषि सांगत आहेत. ज्या राष्ट्रांत स्त्रियांची अशी दशा आहे कीं सर्रास गर्भ-पात चालू आहेत, प्राण्यांची हत्या होते, वीर आपापसांत लढ-तात आणि स्वतःचा नाश करून घेतात, याप्रकारें स्त्रियांस झालेले कष्ट त्यांचा नाश करतात; म्हणून स्त्रियांचें पातिव्रत्य रक्षण केलें पाहिजे.

राष्ट्रांतील प्रजाजनांत सुरक्षितता वाटली पाहिजे. त्याचा नाश न व्हावा अशी इच्छा असेल तर त्या राष्ट्रानें स्त्रियांच्या शील रक्षणाचा व संवर्धनाचा कसून प्रयत्न केला पाहिजे. स्त्रियांचें

चारित्र्य जेथें सुरक्षित नाहीं ते राष्ट्र इतर बाबतींचें काय रक्षण करणार ?

कामविकारापासून आत्मरक्षण

या जगांत '**काम**' असा आहे कीं अनेक पापें तो आपणांकडून करवितो. त्या विकारामुळेंच जगांत स्त्रियांचें अपहरण होतें. म्हणून त्याविषयीं असें म्हटलें आहे कीं—

सपत्नहनं ऋषभं कामं हविषा शिक्षामि ।
(अथर्व. ९।२।१)

' शत्रूंचा नाश करणाऱ्या शक्तिमान् कामास मीं यज्ञमार्गानें शिक्षित करतों. ' म्हणजे यज्ञांतील त्याग करण्याच्या भावनेनें काम ताब्यांत ठेवणें शक्य आहे. हा काम फार मारक आहे. त्याच्यापासून वांचण्यासाठीं ज्ञानरूपी चिलखत आहे. त्याविषयीं म्हटलें आहे —

यत् ते काम शर्म त्रिवरूथं उद्भु ब्रह्म वर्म विततं अनतिव्याध्यं कृतम् । (अथर्व. ९।२।१६)

'कामाच्या तडाख्यांतून वांचण्यासाठीं एक चांगलें कवच -चिलखत आहे जें तीन्ही केंद्रांत उत्तम संरक्षण देतें. या कवचामुळें (**अन्–अति–व्याध्यं**) शत्रूचे प्रहार आपणांवर होत नाहींत. हें कवच (**ब्रह्म वर्म**) ज्ञानरूपी कवच आहे. ' तें ज्याला प्राप्त होतें तो ज्ञानी स्वतःच्या ज्ञानानें स्वतःचें रक्षण तर करतोच, पण दुसऱ्यांनेहि कामाच्या हल्ल्यापासून तो रक्षण करतो; म्हणजे ज्ञानानें सुरक्षित झालेला माणूस कामास स्वतःच्या ताब्यांत ठेवतो. त्यामुळें त्याचा स्वतःचा बचाव होतो. म्हणून स्त्री–पुरुषांना जीवनाच्या सुरवातींसच चांगलें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. म्हणजे उत्तम ज्ञानरूपी कवचानें ते कामापासून स्वतःचें रक्षण करूं शकतील. अशीं ज्ञानकवचें वापरणारीं मनुष्यें जेथें असतात, तेथें स्त्रियांच्या पातिव्रत्याचें उत्तम प्रकारें रक्षण होतें. आणि जेथें स्त्री चारित्र्यसंपन्न असते तें राष्ट्र उत्तम, श्रेष्ठ राष्ट्रांपैकीं एक मानलें जातें.

पत्नीचे गुण

पत्नीच्या ठिकाणीं जे गुण असल्यामुळें ती उत्तम, श्रेष्ठ पत्नी समजली जाते, ते उत्तम गुण असे—

१. **मृदुः**– स्त्री शांत स्वभावाची असली पाहिजे.
२. **निमन्युः**– क्रोधी, रागीट नसावी.
३. **प्रियवादिनी**– सर्वदा मधुर भाषण करणारी असावी.
४. **अनुव्रता**– पतीला अनुकूल होवून रहाणारी, पतीला अनुकूल अशीं कार्यें करणारी असावी.
५. **केवली**– नित्य स्वपतिमध्येंच रममाण होणारी असावी.

मृदुः निमन्युः केवली प्रियवादिनी अनुव्रता ।
(अथर्व. ३।२५।४)

६. **वशा**– पतीच्या ताब्यांत रहाणारी. (अथर्व. ३।२५।६)
७. **चित्तं उपायसि**– पतिच्या चित्ताप्रमाणें स्वतःचें चित्त ठेवणारी. (अथर्व. ३।२५।५)
८. **क्रतौ असः**– पतिच्या सर्व कार्यांत त्याला मदतरूप होऊन रहाणारी. (अथर्व. ३।२५।६)
९. **अक्रतुः**– पतिविरुद्ध कोणतेंहि कार्य करणारी स्त्री असूं नये.

धर्मपत्नी अशा शुभगुणांनीं युक्त असावी. गृहस्थाश्रम यशस्वी होण्यास स्त्रीच्या ठिकाणीं असे शुभ गुण असले पाहिजेत. स्त्री आणि पुरुष जर एक विचारें राहिले, तरच गृहस्थाश्रम सुखदायक होणें शक्य आहे. म्हणून वेदांनीं हा गृहस्थाश्रम सुखपूर्ण यशस्वी होण्यास किती उत्तम उपदेश केला आहे; त्याचा विचार ज्ञानी वाचकांनीं करावा आणि त्याप्रमाणें स्वतःचा संसार सुखपूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

वीर पुत्राचा जन्म

वेदांमध्यें पुत्राचें नांवच '**वीर**' असें आहे. आणि कन्येला '**वीरा**' अथवा '**सुवीरा**' म्हटलें आहे. पुत्र कसा असावा याविषयीं यजुर्वेदाचें पुढील वचन ध्यानांत ठेवण्यासारखें आहे—

जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवाऽस्य यजमानस्य वीरो जायताम् । (वा. यजु. २२।२२)

' विजय मिळवणारा, रथांत बसणारा, सभेंत सन्मान प्राप्त करण्यास योग्य, तरुण, कार्यकर्ता पुत्र या यजमानाला होवो. ' यामध्यें वीरपुत्र असावा ही इच्छा येथें स्पष्ट दिसते. ती इच्छा यापुढील मंत्रांत जास्त स्पष्टपणें प्रगट केली आहे—

आ ते योनिं गर्भ एतु पुमान् बाण इवेषुधिम् ।
आ वीरोऽत्र जायतां पुत्रस्ते दशमास्यः ॥ २ ॥
पुमांसं पुत्रं जनय तं पुमाननु जायताम् । भवासि
पुत्राणां माता जातानां जनयाश्च यान् ॥ ३ ॥
विन्दस्व त्वं पुत्रं नारि यः तुभ्यं शं असत् शं उ
तस्मै त्वं भव ॥ ५ ॥ (अथर्व. ३।२३)

' हे स्त्रिये! ज्याप्रमाणें भात्यांत बाण सुरक्षित रहातात, त्याप्रमाणें तुझा पुत्र गर्भांत येऊन सुरक्षित राहो. तुझा पुत्र वीर होवो व दहाव्या महिन्यांत जन्मो. म्हणजे त्याची पूर्ण वृद्धि होऊन तो जन्मो. हे स्त्रिये ! तूं पुत्रास जन्म दे आणि त्यानंतरहि तुला पुत्रच होवो. अशा प्रकारें तूं अनेक पुत्रांची माता हो. तुला पुत्र

होवो आणि भविष्यकाळीं जन्मणारा पुत्रच असो. हे स्त्रिये ! या प्रकारें तूं पुत्र प्राप्त कर. तो पुत्र तुला सुख देवो, आणि तूं पुत्राला सुख देणारी माता हो. '

अशा प्रकारें पुत्रप्राप्तीची इच्छा वेदांमध्यें सांगितली आहे. घरांत पुत्र असला पाहिजे, त्यामुळें वंश चालू राहून कुळाची अभिवृद्धि होत रहाते.

येथील '**बाण इव इषुधिं**' हे शब्द मननीय आहेत. बाण पिशवींत (भात्यांत) रहातात. ते बाण शत्रूला मारण्यासाठींच असतात. त्याचप्रमाणें जन्मणारा पुत्रसुद्धां शूर, वीर, शत्रुविनाशक व्हावा असें त्याचें तात्पर्य आहे. '**वीर**' शब्दाचा अर्थ सुद्धां असा शूरत्वद्योतक आहे. '**वीरयति अमित्रान्**' दुष्टांना जो दूर करतो, त्याला वीर म्हणतात. पुत्र असा प्रभावी, बलशाली असला पाहिजे अशी वेदांची आज्ञा आहे.

गर्भदोषांचें निवारण

स्त्रीच्या ठिकाणीं जेव्हां गर्भ रहातो तेव्हां नाना प्रकारचे दोष अथवा रोग त्या गर्भाशयांत होतात. ते सर्व दोष दूर केले पाहिजेत, आणि निर्दोष पुत्र उत्पन्न झाला पाहिजे. याविषयीं असें सांगितलें आहे—

यः स्त्रियं मृतवत्सां अवतोकां कृणोति अस्याः तं नाशय ॥ ९ ॥
ये अम्नः जातान् मारयन्ति सूतिका अनुशेरते ॥ १९ ॥
अप्रजास्त्वं मार्तवत्सं रोदं अघं आवयं प्रतिमुञ्च ॥ २६ ॥ (अथर्व. ८।६)

' जी स्त्री मेलेल्या बालकांना जन्म देते अथवा ज्या स्त्रीची बालकें जन्मतांच लागलींच मरण पावतात, असें घडविणारे रोग प्रसूतिगृहांत असतात. त्या रोगजंतूंस दूर करावें. संतति न होणें, गर्भाशयांतच संतति मरून जाणें, जन्मतांच मरून जाणें इत्यादि दोष ज्या कारणानें होतात, ते दोष अथवा रोगजंतु स्त्रियांच्या प्रसूतिगृहांतून दूर करण्यांत यावेत. म्हणजे असें कीं ते जंतू स्त्रीच्या गर्भाशयांत जाऊं नयेत, तसेंच प्रसूतिगृहांतहि राहूं नयेत. '

म्हणजे स्त्रिला या रोगकृमींची बाधा न व्हावी, आणि तिला चांगली संतति व्हावी, ती संतति बलशाली, धीर, शूर, वीर अशी असावी. यापेक्षांहि वेदानें अधिक सांगितलें आहे–

शमीं अश्वत्थ आरूढः तत्र पुंसवनं कृतं ।
तद्वै पुत्रस्य वेदनं तत् स्त्रीषु आभरामसि ॥१॥
पुंसि वै रेतो भवति तत् स्त्रियां अनु षिच्यते ।
तद् वै पुत्रस्य वेदनं तत् प्रजापतिः अब्रवीत् ॥२॥
स्त्रैषूयमन्यत्र दधत् पुमांसं उ दधत् इह ॥ ३ ॥
(अथर्व. ६।११)

' शमी वृक्षावर पिंपळ उगवला असेल तर तेथें पुत्र निर्माण करण्याची औषधि उत्पन्न होते. पुत्रप्राप्तीचें हें उत्तम साधन आहे. तें स्त्रियांना देण्यायोग्य आहे. पुरुषांत वीर्य असतें, तें स्त्रीमध्यें टाकण्यांत येतें, त्यामुळें पुत्राची उत्पत्ति होते, असें प्रजापतीनें सांगितलें आहे. येथें आमच्या घरीं पुत्र जन्मो, स्त्री जन्म दुसऱ्या घरीं होवो. '

शमी वृक्षावर अश्वत्थ म्हणजे पिंपळ उगवतो. त्या पिंपळाचें पंचांगें म्हणजे मूळ, साल, पान, फूल आणि फळ वगैरेचें चूर्ण जर स्त्रीला देण्यांत आलें तर संतति न होणाऱ्या स्त्रीलासुद्धां पुत्र होतो. वांझ स्त्रीवर हा प्रयोग करून पहाण्यासारखा आहे.

या मंत्राचा दुसराहि एक अर्थ आहे. (**शमी**) शांत आणि संयमसंपन्न स्त्रिया जर (**अश्व-स्थः**) घोड्याप्रमाणें वीर्यवान् पुरुषाशीं संयोग झाला तर त्या स्त्रीला पुरुषसंतति होईल. येथें स्त्री '**शमी**' म्हणजे संयमशील असली पाहिजे आणि पुरुष '**अश्व-स्थ**' म्हणजे घोड्याप्रमाणें वीर्यवान् असला पाहिजे, असें सांगितलें आहे. गृहस्थाश्रमीं स्त्री–पुरुषांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. व्यायामादिकांनीं पुरुष घोड्याप्रमाणें वीर्यशाली व्हावा तसेंच स्त्रीनें संयम पाळवा. असें झाल्यानें दोघांच्या संबंधानें फक्त पुत्रसंततिच होत राहील.

सूर्य–चंद्राप्रमाणें बालकें

घरांतील बालकें चंद्र सूर्यासारखीं असावीं. हें संपूर्ण विश्व अदिति मातेचें घर आहे. त्यांत सूर्यचंद्रासारखे पुत्र असावेत व ते घरांत खेळत राहोत अशी इच्छा वेदांनीं प्रगट केली आहे. पहा–

पूर्वापरं चरतो माययैतौ शिशू क्रीडन्तौ परि यातोऽर्णवम् । विश्वान्यो भुवना विचष्ट ऋतूँरन्यो विदधज्जायसे नवः ॥ (अथर्व. ७।८१।१)

' हीं दोन बालकें सूर्य आणि चंद्र खेळत आहेत आणि स्वतःच्या शक्तीनें मागें पुढें होत रहातात. तीं फिरत फिरत समुद्रापर्यंत जातात. त्यांतील एक सर्व भुवनांस प्रकाश देतो आणि दुसरा ऋतूंना जन्म देत रोज नव–नवा होतो. '

म्हणजे हीं दोन बालकें आहेत, त्यांतील एक संपूर्ण विश्वाला

प्रकाशित करतो आणि दुसरा ऋतु निर्माण करीत रहातो. असे सूर्यचंद्राप्रमाणे पुत्र घरोघर निर्माण व्हावयास हवेत, अशी इच्छा पति-पत्नी दोघांनीही बाळगावी असा येथें वेदांचा उपदेश आहे.

मेखला बन्धन

कंबर कसण्यासाठीं कंबरेस करगोटा-मेखला बांधण्यात येते. वाचकांनीं कंबर कसून आणि मोकळी ठेऊन दोन्ही प्रकारचा अनुभव पहावा. दोन्हींतील अंतर त्यांना लागलींच कळून येईल. कमरेस पट्टा बांधण्यानें शक्ति वाढते, आणि कंबर ढिली ठेवण्यानें निर्बलपणा निर्माण होतो; म्हणून वैदिक संस्कारात **' मेखला-बंधन '** ठेवलें आहे. कोणी मुलगा ढिल्या कमरेचा न व्हावा. सर्वांनीं कटिबद्ध रहावें आणि वीरता दाखविण्यास सिद्ध असावें; म्हणून म्हटलें आहे—

वीरघ्नी भव मेखले । (अथर्व. ६।१३३।२)

मेखला कंबरेवर बांधल्यानें शत्रूंच्या वीरांना मारण्याची शक्ति आपणांमध्यें येतें. आणखी पहा-

यां त्वा पूर्वे भूतकृतः ऋषयः परिबेधिरे ।
सा त्वं परि ष्वजस्व मां दीर्घायुत्वाय मेखले ॥

(अथर्व. ६।१३३।५)

' हे मेखले ! ज्या तुला भूतकाळीं पराक्रम करणाऱ्या ऋषींनीं बांधिली होती अशी तूं मला दीर्घायु करण्यासाठीं माझ्या शरीराला वेष्टून रहा. '

मीं मेखलेमुळें दीर्घजीवन प्राप्त करीन आणि प्राचीन विद्वान् ऋषींप्रमाणें उत्तम प्रभावयुक्त आचरण करीन.

मेखलाबंधन कंबर कसणें सूचवितें. प्रत्येक कार्य करण्यास कंबर कसली पाहिजे; त्यामुळें तें कार्य उत्साहपूर्वक होत रहातें. वीरता वाढवण्यासाठीं मेखलाबंधन फार आवश्यक आहे, म्हणून म्हटलें आहे—

ब्रह्मणा तपसा श्रमेण मेखलया सिनामि ।

(अथर्व. ६।१३३।३)

' ज्ञान, ऊन-थंडी सहन करण्याची शक्ति, परिश्रम करण्याचें सामर्थ्य आणि कटिबद्धतेनें मीं सिद्ध राहिलों आहे. ' इतके गुण युवकांमध्यें असले पाहिजेत. ज्ञान आणि विज्ञान मनुष्याला अत्यंत आवश्यक आहे. ज्ञान मनःशांतिसाठीं आणि विज्ञान ऐहिक सुखोप भोगांसाठीं, म्हणजे शरीरसुखासाठीं, शीत-उष्ण, हानि-लाभ, जय-पराजय, अशीं द्वंद्वें सहन करावयास उपयोगी आहे. द्वंद्वें सहन करीत आपलीं कर्तव्यें करावयाचीं असतात. श्रम करण्याची शक्ति असली पाहिजे, आणि कंबर कसलेली असावी. या सर्व तरुणास कार्यतत्पर होण्यासाठीं सूचना आहेत. वाटेल तें झालें तरी स्वतःचें कर्तव्य करण्यास नेहमीं तयार असलें पाहिजे हेंच या सर्वांचें तात्पर्य आहे.

आपलें घर

गृहस्थानें स्वतःचें घर बांधून त्यांत रहावें. घर कसें असावें या विषयींचा विचार अथर्ववेदाच्या ३ ऱ्या कांडांतील १२ व्या सूक्तांत केला आहे. या सूक्तांत घराचें यथायोग्य वर्णन करणारे असे कांहीं शब्द आहेत कीं त्यामुळें संपूर्ण घराचें शब्दचित्र आपल्या कल्पना चक्षुपुढें उभें रहातें. म्हणून त्या शब्दांचा येथें विचार करूं—

१. **अश्वावती (शाला)**- स्वतःच्या घरीं घोडे बाळगून बाहेर जाण्यायेण्यास घोड्यांचा उपयोग करावा. (मं. २) हल्लीं लोक घरीं मोटर बाळगण्याची इच्छा करतात.

२. **गोमती**- घरीं गाई असल्या पाहिजेत. गाईचें दूध फार पुष्टिकारक असतें. गाय आणि बैल हे दोन्ही पशु उपयुक्त आहेत. गाय दूध देते. बैल शेतीच्या कामीं शेत नांगरण्यास उपयोगी पडतो. (मं. २)

३. **पयस्वती**- घरांत भरपूर दूध असावें.

४. **घृतवती**- घरांत तूपसुद्धां पुष्कळ असावें.

५. **घृतं उक्षमाणा**- घर तूप देणारें असावें. (मं. १)

६. **ऊर्जस्वती**- घरांत भरपूर अन्न असावें. (मं. २)

७. **धरुणी**, ८. **पूतिधान्या**- घरीं धान्य भरपूर असावें.

९ **परिस्रुतः कुम्भः**- घरांत मधुर मध भरलेला घडा असावा. (मं. ७)

१० **दध्नः कलशैः**- दह्यानें भरलेलीं भांडीं घरांत असावींत. (मं. ७)

११. **घृतस्य कुम्भं**- तुपानें भरलेला घडा घरांत असावा. (मं. ८)

१२. **अयक्ष्मा यक्ष्मनाशिनीः आपः**- निरोगी आणि रोग दूर करणारें पाणी घरांत असावें. (मं. ९)

घरांत हे पदार्थ असावेत म्हणजे त्यामुळें घरांतील मनुष्यें हृष्ट-पुष्ट आणि रोगरहित, आरोग्यसंपन्न होतील. हल्लीं गाईचें तूप तर राहोच पण कोणतेंहि भेसळीशिवाय शुद्ध तूप मिळणें कठिण झालें आहे. त्यामुळें पोषक तत्वें, खाद्यवस्तू मिळत नाहींत. गाईच्या दह्यादुधानें, तसेंच ताक, लोणी, तूप इत्यादिकांनीं जेथें घरें भरपूर असत, तेथें आज पावशेर दूधहि

शद्ध निर्मळ मिळूं शकत नाही. या प्रकारच्या स्थितीला काय 'उन्नति-प्रगति म्हणावयाचें ? की अवनति ! वाचकांनीं याचा विचार करून स्वतःचें लक्ष्य गोरक्षणकार्याकडे वळवावें.

अतिथिसत्कार

अतिथिसत्कारासाठीं घडा भरून तूप आणलें पाहिजे, आणि त्यांतून जी धार पडते तिनें अतिथीचा सत्कार करावा. पहा—

पूर्णं नारि प्र भर कुम्भं एतं । घृतस्य धारां अमृतेन संभृताम् । इमां पातॄन् अमृतेना समङ्ग्धि । इष्टापूर्तं अभि रक्षात्येनाम् ॥
(अथर्व. ३।१२।८)

'हे गृहपत्नि ! अतिथींना वाढण्यास तुपाचा घडा घेऊन ये, मधुर रस भरलेला घडा आणून आतिथि खातील-पितील तितकें, कद्रूपणा न करतां, त्यांना वाढ. असें करून दोन्हीं कुळांची शोभा वाढव.' घराचें महत्त्व सुरक्षित राहिलें पाहिजे.

गाईचें संरक्षण

घरांत गाईचें संरक्षण व्हावयास पाहिजे. घरांत गाई असल्या तर घराची शोभा त्या वाढवितात, आणि त्यांचा उपयोग घरांत रहाणाऱ्यांना होतो—

गावः यूयं कृशं चित् मेदयथ ।
अश्रीरं चित् सुप्रतीकं कृणुथ ॥ (अथर्व. ४।२१।६)

'हे गाईनों ! तुम्हीं निर्बल मनुष्यास बळवान् आणि हृष्टपुष्ट करतां आणि निस्तेज झालेल्याला तेजस्वी करतां.' हे गाईचे गुण घरच्या मनुष्यांना मोठे सहाय्यक आहेत.

(गावः) सूयवसे रुशन्तीः सुप्रपाणे शुद्धा अपः पिबन्तीः । (अथर्व. ४।२१।७)

'गाईनीं उत्तम चारा खावा आणि चांगल्या जलाशयांतील निर्मळ, स्वच्छ पाणी प्यावें.' असें गो-पालन घरोघर व्हावयास हवें. आज गाईना मारण्यांत येतें. वेदांमध्यें गाय, बैल आणि पर्वत या तिघांस '**अघ्न्य**' म्हणजे अवध्य अथवा रक्षणीय असें म्हटलें आहे. ज्यांचा वध होतां कामा नये त्यांचाच वध बहुसंख्येनें होत आहे. त्यामुळें आमच्या आरोग्याची एवढी मोठी हानि होत आहे की ती कोणत्याहि प्रकारें बंद करतां येणें अशक्य आहे.

अन्न, गोपालन, गृहरक्षण, वगैरे पुष्कळ उपदेश यानंतर आहेत. ते सर्वच मननीय आहेत. नंतर ऋणरहित होण्याची गोष्ट सांगितली आहे, ती पहा—

ऋणरहित होणें

ऋणरहित होण्याविषयीं वेद फार चांगला उपदेश करीत आहे, तो आतां पहा—

अनृणा अस्मिन् अनृणाः परस्मिन् । तृतीये लोके अनृणाः स्याम । ये देवयानाः पितृयाणाश्च लोकाः सर्वान् पथो अनृणा आ क्षियेम ॥
(अथर्व. ६।११७।३)

'या लोकीं, परलोकीं आणि तिसऱ्या लोकांतहि आम्ही अनृणी होऊन राहूं; जे देवयान आणि पितृयान मार्ग आहेत त्यांत आम्हीं ऋणरहित होऊन रहावें.'

अशा प्रकारें कर्जमुक्त होण्याविषयीं म्हटलें आहे. हा विषय प्रत्येक गृहस्थाश्रमीयानें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. अनृणी होणें प्रत्येक गृहस्थाचें कर्तव्य आहे, कारण ऋणांत राहिल्यानें पुष्कळ आपत्तींस तोंड द्यावें लागतें; म्हणून सत्वर ऋणरहित होणेंच इष्ट व योग्य आहे.

विपत्तीस दूर करावें

ऋण हीहि एक विपत्तिच आहे. या प्रकारच्या इतरहि अनेक विपत्ति जगांत आहेत. त्या सर्व आपत्ति दूर करणें हें आपलें कर्तव्य आहे. त्या आपत्ति दूर करण्याविषयीं खालील मंत्र विचार करण्यासारखा आहे—

दौष्वप्न्यं दौर्जीवित्यं रक्षो अभ्वं अराय्यः ।
दुर्णाम्नीः सर्वा दुर्वाचः ता अस्मन्नाशयामसि ॥
(अथर्व. ४।१७।५)

'दुष्ट स्वप्न पडणें, जीवित दुःखमय आहे असें वाटणें, हिंसकांकडून उपद्रव होणें, विकास होण्यास प्रतिबंध होणें, विकास खुंटणें, निर्धनता, वाईट शब्द बोलण्याचा स्वभाव होणें, सर्व प्रकारचीं दुष्ट भाषणें करण्याचा अभ्यास, या सर्व आपत्ति आम्हांपासून दूर असोत.'

या सर्व विपत्ति आहेत. त्यांच्यापासून कष्ट होतात, म्हणून या विपत्ति दूर केल्या पाहिजेत, आणि भाग्य प्राप्त करून घेतलें पाहिजे.

तेन मा भगिनं कृणु अप द्रान्तु अरातयः ।
(अथर्व. ६।१२९।३)

'मला भाग्यशाली कर. सर्व आपत्ति माझ्यापासून दूर होवोत.' अशी इच्छा प्रत्येक गृहस्थाच्या मनांत असावी, आणि त्यासाठीं त्यानें प्रयत्न करावा. स्वतःचें उत्तम प्रकारें रक्षण करावें. त्यासाठीं गृहस्थानें असें म्हणावें—

यो नो द्वेष्टि अधरः सस्पदीष्ट यं उ द्विष्मः तं उ प्राणो जहातु ॥ (अथर्व. ७।३१।१)

' जो एकटा आम्हां सर्वांचा द्वेष करतो तो खालीं पडो, आणि ज्या एकट्याचा आम्हीं सर्व द्वेष करतों त्याचे प्राण त्याला सोडून जावोत. ' म्हणजे तो मरून जावो.

स्वतःचें रक्षण करण्याचे प्रयत्न करतांना चांगल्या आणि बुद्धिमान असणाऱ्यांचेंहि रक्षण व्हावें आणि दुष्टांची संख्या अल्प व्हावी, असे आपले प्रयत्न असावेत.

अतिथींचा सत्कार

आपल्या घरीं अतिथी आले तर त्या विद्वान् अतिथींचा सत्कार केला पाहिजे. तें गृहस्थाचें कर्तव्यच आहे. विद्वान् मनुष्यें परोपकारासाठीं, देशहितासाठीं, सत्कार्य करण्यासाठीं सदुपदेश व ज्ञान देण्यासाठीं आणि देशोद्धारासाठीं सर्वत्र फिरत असतात. त्यांचा आदर सत्कार भोजन वास्तव्य इत्यादींची व्यवस्था करणें गृहस्थाश्रमीयांचें कर्तव्य आहे. गृहस्थाश्रमीयांच्या आसऱ्यानें ते विद्वान्, साधु, धर्मोपदेशक, प्रचारक, कार्यकर्ते यांचा योगक्षेम चालतो आणि ते स्वतःचें राष्ट्रोद्धाराचें कार्य करूं शकतात. जर गृहस्थाश्रमी त्यांस जेवण आणि इतर जरूर ती मदत न देतील तर त्यांची उपजीविका चालणार नाहीं, आणि उपजीविका नीट न चालल्यानें ते स्वतःचें कार्य पुढें चालवूं शकणार नाहींत ! म्हणून त्यांचा भार गृहस्थाश्रमीयांनींच उचलला पाहिजे.

गृहस्थाश्रमीयांनीं राष्ट्रसेवकांचें पालन केलें पाहिजे. नाहीं तर त्या उपदेशकांनीं काय करावें ? अशा देश–समाज–ज्ञाति–कल्याणकारी कार्य करणाऱ्यांचा भार गृहस्थांनींच उचलला पाहिजे.

याप्रमाणें गृहस्थाश्रमाविषयीं उपदेश देणारे मंत्र या भागांत एकत्रित केले आहेत.वाचकांनीं त्यांचें मनन करून योग्य बोध प्राप्त करावा, आणि त्याप्रमाणें आचरण करून उत्तम गृहस्थाश्रमी व्हावें व अशा प्रकारें स्वतःच्या राष्ट्राचें वैभव वाढविण्यास मदत करावी.

श्रीपाद दामोदर सातवळेकर
अध्यक्ष– स्वाध्याय मंडळ

ॐ

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

भाग तिसरा

गृ ह स्था श्र म

पवित्र गृहस्थाश्रम

कांड ६, सूक्त १२२

(ऋषिः – भृगुः । देवता – विश्वकर्मा ।)

ॐ एतं भागं परि ददामि विद्वान्विश्वकर्मन्प्रथमजा ऋतस्य ।
अस्माभिर्दत्तं जरसः परस्तादच्छिन्नं तन्तुमनु सं तरेम ॥ १ ॥
ततं तन्तुमन्वेके तरन्ति येषां दत्तं पित्र्यमायनेन ।
अबन्ध्वेके ददतः प्रयच्छन्तो दातुं चेच्छिक्षान्त्स स्वर्ग एव ॥ २ ॥

अर्थ— हे (विश्वकर्मन्) सर्व जगाची रचना करणाऱ्या ! (ऋतस्य प्रथमजाः) तूं सत्य नियमाचा पहिला प्रवर्तक आहेस. ही गोष्ट (विद्वान्) जाणणारा मी (एतं भागं परि ददामि) हा माझा भाग तुला पूर्ण समर्पण करतों. (जरसः परस्तात् अस्माभिः दत्तं अच्छिन्नं तन्तुं) वृद्धापकाळानंतर सुद्धां आम्ही दिलेलें यज्ञाचें जें विच्छेदरहित सूत्र आहे, त्याच्या योगानें आम्हीं (अनु संतरेम) खात्रीनें आनुकूल्यानें पार होऊं. [१]

(एके ततं तन्तुं अनुतरन्ति) कित्येक मनुष्यें या पसरलेल्या यज्ञसूत्राच्या अनुकूलतेनें तरून जातात. (येषां आयनेन पित्र्यं दत्तं) ज्यांच्या येण्यामुळें पितरांनीं केलेल्या ऋणाचा भाग फेडला जातो, (एके अबन्धु ददतः) दुसरे कित्येक बंधु नसतांना सुद्धां (ददतः) दान देतात, ते (प्रयच्छन्तः च इत् दातुं शिक्षान्) दान देऊनसुद्धां अधिक दान देण्यास समर्थ झाले, तर (सः स्वर्गः एव) तो स्वर्गच होय. [२]

भावार्थ— हे जगताची रचना करणाऱ्या प्रभो ! तूंच सत्यधर्माचा प्रवर्तक आहेस, म्हणून मीं माझा भाग संपूर्णपणें तुला अर्पण करतों. या समर्पणानें जो अविच्छिन्न यज्ञ होईल, त्याच्या सहाय्यानें आम्हीं दुःखें पार करूं. [१]

या यज्ञाचा आश्रय करूनच कित्येक लोक पार झाले. ज्यांचें कांहीं पैतृक ऋण बाकी असेल, ते बंधनांमुळें कठीण प्रसंग प्राप्त झाले तरी ऋण परत करतात. असे लोक जेथें रहातात तें स्वर्गधामच होय. [२]

अन्वारभेथामनुसंरभेथामेतं लोकं श्रद्दधानाः सचन्ते ।
यद्वां पक्वं परिविष्टमग्नौ तस्य गुप्तये दंपती सं श्रयेथाम् ॥ ३ ॥
यज्ञं यन्तं मनसा बृहन्तमन्वारोहामि तपसा सयोनिः ।
उपहूता अग्ने जरसः परस्तात्तृतीये नाके सधमादं मदेम ॥ ४ ॥
शुद्धाः पूता योषितो यज्ञिया इमा ब्रह्मणां हस्तेषु प्रपृथक्सादयामि ।
यत्काम इदमभिषिञ्चामि वोऽहमिन्द्रो मरुत्वान्त्स ददातु तन्मे ॥ ५ ॥

अर्थ— हे (दम्पती) स्त्री-पुरुष हो ! (अनु आरभेथाम्) अनुकूलतेनें शुभ कार्याचा आरंभ करा. (अनुसंरभेथाम्) आनुकूल्यानें हालचाल करा. (एतं लोकं श्रद्दधानाः सचन्ते) हा गृहस्थाश्रमरूपी लोक श्रद्धा बाळगणाऱ्या लोकांनाच प्राप्त होतो. (यत् वां पक्वं) जे तुम्हां दोघांचें परिपक्व फळ असेल तें आणि (अग्नौ परिविष्टं) अग्नीच्या योगें सिद्ध झालेलें (तस्य गुप्तये संश्रयेथां) त्याच्या रक्षणासाठीं तुम्ही दोघेही प्रयत्न करा. [३]

(तपसा यन्तं बृहन्तं यज्ञं) तपानें होणाऱ्या महान् यज्ञावर (सयोनिः मनसा अनु आरोहामि) समान योनीमध्यें उत्पन्न झालेला मीं अनुकूल मनानें आरोहण करतों, गृहस्थ-यज्ञाला प्राप्त करतों. हे (अग्ने) अग्नि ! (जरसः परस्तात् उपहूताः) वृद्धत्व प्राप्त होण्यापूर्वी बोलविलेले आम्हीं (तृतीये नाके सधमादं मदेम) तृतीय स्वर्गधामांत बरोबर राहून सुख प्राप्त करूं. [४]

(इमाः यज्ञियाः शुद्धाः पूताः योषितः) या पूज्य, शुद्ध आणि पवित्र स्त्रिया आहेत, त्यांना (ब्रह्मणां हस्तेषु प्रपृथक् सादयामि) वेगवेगळया ज्ञान्यांच्या हातांत पृथक् पृथक् दान करतों. (अहं यत्कामः इदं वः अभिषिञ्चामि) मीं ज्या इच्छेनें तुम्हांला या प्रकारें अभिषेक करीत आहें, (सः मरुत्वान् इन्द्रः) तो महान् प्रभु (मे तत् ददातु) तें मला देवो. [५]

भावार्थ— हे स्त्री-पुरुष हो ! तुम्हीं दोघें गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर शुभ कार्यं करीत रहा आणि उन्नतीसाठीं प्रयत्न करा. या गृहस्थाश्रमांत श्रद्धावान् लोकच सुखानें राहूं शकतात. जे त्यांत पूर्ण अनुभवी अथवा परिपूर्ण झाले आहेत त्यांच्या रक्षणासाठीं तुम्हीं दोघे प्रयत्न करा. [३]

जो यज्ञ तपानें होतो, त्यासाठीं मनःपूर्वक प्रयत्न करून तो पूर्ण करणें हेंच योग्य होय. याप्रमाणें वृद्धापकालापर्यंत शुभ कर्मे करीत राहिल्यानेंच उच्च स्वर्गधाम प्राप्त होतें. [४]

या कन्या पवित्र आणि शुद्ध आहेत. त्यांना वेगवेगळया ज्ञान्यांना निरनिराळया अर्पण करतों. ज्या इच्छेनें मीं हा यज्ञ करीत आहें ती माझी इच्छा सफल होवो. [५]

पवित्र गृहस्थाश्रम

गृहस्थाश्रम अत्यंत पवित्र करून त्यांतून आनंद प्राप्त करण्याविषयीं बहुमूल्य उपदेश या सूक्तांत सांगितला आहे. हा उपदेश प्रत्येक गृहस्थाश्रमीयानें मनन करण्यासारखा आहे. (१) सर्व विश्व निर्माण करणारा प्रभु हाच सत्यनियमांचा प्रथम प्रवर्तक आहे, असें समजून त्याच्यासाठीं शुभ कर्मे करावींत, त्याच्यासाठीं यज्ञ करावा आणि जें कांहीं करणें तें मोठ्या प्रेमानें करावें. या प्रकारचीं शुभ कर्मे केल्यानें मनुष्य प्राणी दुःखमुक्त होतो. (२) अशा प्रकारच्या यज्ञानेंच मनुष्य संसारसागर तरून जातो. यासाठीं दुसरा मार्गच नाहीं. (३) ज्याप्रमाणें आपण केलेलें कर्ज फेडलें पाहिजे, त्याप्रमाणेंच पूर्वजांनीं केलेले ऋणहि फेडलेंच पाहिजे. जेथें विशेष दुस्तर परिस्थिति असूनहि असें ऋण परत केलें जातें, एक दुसऱ्यास फसवीत नाहींत, तो देश स्वर्गधामच समजला पाहिजे. (४) गृहस्थाश्रमांत स्त्रीपुरुषांनीं एकमनानें, एक विचारानें वागावें, नेहमीं शुभ कर्मे करावींत, कारण शुभ कर्मांनींच श्रेष्ठ लोक प्राप्त होतो. (५) जें परिपूर्ण आहे त्याचें रक्षण करा, आणि त्याकडे पाहून इतरांची परिपक्वता

संपादन करण्याचा प्रयत्न करा. (६) सर्व यज्ञ तपानेंच साध्य होतात. यासाठीं मनानें नेहमीं यज्ञ करण्याचाच विचार करावा. (७) जर वृद्धावस्थेपर्यंत शुभ कर्में केलीं, तरच उत्तम स्वर्गधामाचा आनंद प्राप्त होतो. (८) गृहस्थाश्रम चालविणें असेल तर तो पवित्र आणि शुद्ध स्त्रीसहच चालविला पाहिजे. (९) स्त्रियांना सुद्धां ज्ञान्यांच्या हातींच सोंपविणें योग्य आहे. याप्रमाणें पवित्र स्त्री आणि ज्ञानी पुरुष यांचा जो गृहस्थाश्रम होतो, तोच विशेष सुख देणारा होतो. (१०) अशा गृहस्थाश्रमांत रहाणारा मनुष्यच स्वतःची इच्छा परिपूर्ण झाल्याचा आनंद मिळवूं शकतो. परमेश्वर त्यालाच सिद्धि देतो. असा या सूक्ताचा आशय आहे. जे वाचक या सूक्तांतील मंत्रांचा अर्थ आणि भावार्थ विचारपूर्वक वाचतील त्यांना हा आशय सहज समजूं शकेल, कारण तो अगदीं स्पष्ट आहे.

कुलवधू-सूक्त

कां. १, सूक्त १४

(ऋषिः – भृगवङ्गिराः । देवता – वरुणो यमो वा ।)

भगमस्या वर्च आदिष्यधि वृक्षादिव स्रजम् । महाबुध्न इव पर्वतो ज्योक् पितृष्वास्ताम् ॥ १ ॥
एषा ते राजन्कन्या वधूर्नि धूयतां यम । सा मातुर्बध्यतां गृहेऽथो भ्रातुरथो पितुः ॥ २ ॥
एषा ते कुलपा राजन्तामु ते परि दद्मसि । ज्योक् पितृष्वासाता आ शीर्ष्णः समोप्यात् ॥ ३ ॥
असितस्य ते ब्रह्मणा कश्यपस्य गयस्य च । अन्तःकोशमिव जामयोऽपि नह्यामि ते भगम् ॥ ४ ॥

अर्थ— (**वृक्षात् अधि स्रजं इव**) वृक्षावरून ज्याप्रमाणें फुलांची माळा तयार करून घ्यावी, त्याप्रमाणें (**अस्याः भगं वर्चः आदिषि**) या कन्येचें ऐश्वर्य आणि तेज मीं स्वीकारतों. (**महाबुध्नः पर्वतः इव**) खोल मुळें गेलेल्या पर्वताप्रमाणें ही कन्या (**पितृषु ज्योक् आस्तां**) मातापित्यांच्या घरीं पुष्कळ काळपर्यंत राहो. [१] हे (**यम राजन्**) नियम पालन करणाऱ्या राजा ! (**एषा कन्या**) ही कन्या (**ते वधूः**) तुझी वधु होऊन (**निधूयतां**) व्यवहार करो. (**अथो**) अथवा (**सा**) ती आईच्या वा भावाच्या घरीं (**अथो**) अथवा पित्याच्या (**गृहे बध्यतां**) घरीं राहो. [२] हे (**राजन्**) राजा ! (**एषा**) ही कन्या (**ते कुल-पा**) तुझ्या कुलाचें पालन करणारी आहे. (**तां**) तिला (**उ ते परिदद्मसि**) तुझ्यासाठीं आम्हीं देत आहोंत. ही (**ज्योक्**) तावत्कालपर्यंत (**पितृषु आसातै**) मातापित्यांच्या घरीं राहो, (**आ शीर्ष्णः समोप्यात्**) जों पावेतों मस्तक शृंगारलें नाहीं. [३] (**असितस्य**) बंधन रहित (**कश्यपस्य**) द्रष्टा (**च**) आणि (**गयस्य**) प्राणाचें साधन करणाऱ्या (**ते**) तुझ्या (**ब्रह्मणा**) ज्ञानासह (**ते भगं अपि नह्यामि**) तुझ्या ऐश्वर्याला मीं बांधतों. (**जामयः अंतः कोशं इव**) स्त्रिया स्वतःची पेटी बांधतात त्याप्रमाणें. [४]

भावार्थ— वृक्षावरून पानें आणि फुलें काढून ज्याप्रमाणें त्यांची माळ करून लोक गळ्यांत घालतात, त्याप्रमाणें या कन्येचें सौंदर्य आणि तेज मीं स्वीकारतों आणि त्यांनीं मीं स्वतःस सजवूं इच्छितों. ज्याप्रमाणें खोल गेलेल्या मूळांवर पर्वत स्थिर रहातात त्याप्रमाणें कन्यासुद्धां स्वतःच्या मातापित्याच्या घरांत निर्भयपणें बहुत काळपर्यंत सुखानें सुरक्षित राहो. [१] हे नियमपालक पति ! ही आमची कन्या तुझी पत्नी होऊन नियमपूर्वक व्यवहार करो. जेव्हां ती तुझ्या घरीं न राहील तेव्हां तीं पिता, माता अथवा बंधूच्या घरीं राहो, परंतु दुसऱ्या कोणा परक्याच्या घरीं तिनें राहू नये. [२] हे पति ! ही आमची कन्या तुझ्या कुलाचें पालन करणारी होवो. तिला आम्हीं तुला समर्पण करीत आहोंत. जों पावेतों तिचें मस्तक शृंगारण्याची वेळ प्राप्त झाली नाहीं, तो पावेतों ती मातापित्यांच्या घरीं राहो. [३] बंधन रहित द्रष्टा आणि प्राणांचें साधन करून त्यांस स्वाधीन करणाऱ्या तुझ्यासारख्या ज्ञान्याशीं या कन्येचें भाग्य आम्हीं बांधतों. ज्याप्रमाणें स्त्रिया स्वतःचे मूल्यवान कपडे आणि अलंकार पेटींत बंद करून सुरक्षित ठेवतात त्याप्रमाणें तिचें भाग्य तुजजवळ तुझ्या संबंधामुळें सुरक्षित होवो. [४]

कुलवधू-सूक्त

प्रथम प्रस्ताव

या सूक्तांत चार मंत्र आहेत. पहिल्या मंत्रांत भावी पतीचें प्रस्तावरूप भाषण आहे. पति कन्येच्या रूपाला आणि तेजाला पसंत करतो, आणि त्या तेजाचा स्वीकार करूं इच्छितो. याविषयीं मंत्रांतील रूपक अगदीं स्पष्ट आहे—

' वृक्ष, वेली आणि वनस्पतीवरून पानें, फुलें आणि मंजिऱ्या काढून लोक त्याच्या माळा करतात आणि त्या माळा गळयांत धारण करतात. त्याप्रमाणें या कन्या सुगंधित पुष्पांच्या वेली आहेत. त्यांचीं फुलें आणि पानें (मुखकमल आणि हस्तपल्लव) अथवा त्यांचें सौंदर्य आणि तेज मीं धारण करतों आणि त्यानें मीं सुशोभित होऊं इच्छितों; म्हणजे मीं या कन्येसह गृहस्थाश्रम सुरू करूं इच्छितों. ज्याप्रमाणें पर्वत त्याच्या विशाल पायावर स्थिर असतो त्याप्रमाणें या कन्या मातापित्याच्या घरीं त्यांच्या सुदृढ आधारानें दीर्घ कालपर्यंत स्थिर राहोत; म्हणजेच माता-पित्याकडून योग्य सुशिक्षण मिळवून या कन्या सुयोग्य होवोत, आणि नंतर त्या पतिच्या घरीं जावोत. '

असा भाव प्रथम मंत्राचा आहे. त्यांत भावी पतीकडून प्रथम प्रस्ताव आहे. भावी पति कन्येचें सौंदर्य आणि तेज पसंत करतो आणि तिच्याशीं विवाह करण्याची इच्छा दर्शवितो. म्हणजेच भावी पति कन्येला तिच्या आईबापांपाशीं मागणी घालतो, आणि त्याचवेळीं हेंहि सांगतो कीं कन्या कांहीं कालपर्यंत मातापित्यांच्या घरींच राहो. त्यानंतर पतीच्या घरीं येवो. योग्य समयाची मर्यादा तिसऱ्या मंत्रांत सांगितली आहे.

या मंत्रांतील विचारांवरून असें दिसतें कीं पुरुष स्वतःच सहधर्मचारीणीची पसंदगी करीत असे. पुरुष स्वतःच्या आवडीप्रमाणें कन्या पसंत करून नंतर आपला विचार तिच्या मातापित्यांस कळवितो. कन्येची माता-पितरें त्याच्या मागणीचा विचार करतात आणि भावी पतीला योग्य उत्तर देतात.

कन्येला स्वपतीची निवड करण्याचा अथवा स्वतःची नियुक्त पतिविषयीं पसंती-नापसंती दर्शविण्याचा अधिकार होता किंवा नाहीं तें या सूक्तावरून स्पष्ट होत नाहीं. कन्येच्या मागणीनंतरहि तिचें पितृगृहीं दीर्घकाल वास्तव्य होत असे. यावरून (**पितृषु कन्या ज्योक् आस्तां**) सिद्ध होतें कीं ही मागणी कन्येला रजोदर्शन होण्यापूर्वीच येत असली पाहिजे, किंवा कन्या उपवर होण्याच्या पूर्वीं ही मागणी होत असावी. हल्लीं लग्न ठरवतांना प्राथमिक बोलणीं, याद्या करणें, अथवा ज्यास रूढार्थानें आपण वाङ्निश्चय म्हणतों तसाच कांहीं हा प्रकार असावा. या सूक्तांत कन्येचें एकहि वाक्य नाहीं; पण भावी पति आणि कन्येचे माता-पिता यांचीं बोलणीं आहेत. त्यावरून असें अनुमान काढतां येतें कीं वेदकालीं पति इतके अधिकार कन्येला नसत.

तिसऱ्या मंत्रांत कन्येचे पालक म्हणतात, आम्ही (**ते तां परिदद्मसि**) तुझ्यासाठीं या कन्येला समर्पण करतों. ' या मंत्रभागावरून हें स्पष्ट होतें कीं कन्या याबाबतींत परतंत्र असे. मंत्रांत दोन वेळां उल्लेख आला आहे कीं, ' कन्या पिता, माता अथवा भावाच्या घरीं राहो, ' अथवा जरा थोडें पुढें जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं विवाहानंतर तिनें पतिगृहीं रहावें, परंतु तिनें स्वतंत्र कधींहि राहूं नये.

ज्याप्रमाणें वृक्षास आधार त्याच्या मूळांचा असतो, अथवा पर्वतास आधार त्याच्या विशाल पायाचा असतो, त्याप्रमाणें कन्येला प्रथम आधार मातापित्यांचा अथवा बंधूचा आणि नंतर आधार पतीचा; त्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचा आधार तिनें घेणें योग्य नाहीं.

मागणी आणि संमति

प्रथम मंत्रांत सांगितल्याप्रमाणें भावी पतीकडून मागणी आल्यानंतर कन्येचे मातापिता विचार करून स्थळ योग्य वाटल्यास भावी पतीला म्हणतात—

' हे नियमानुसार चालणाऱ्या स्वामी ! ही कन्या तुझ्याबरोबर राहून नियमपूर्वक व्यवहार करील. तोपर्यंत ही माता पित्यांच्या घरीं अथवा भावाच्या घरीं राहो. हे स्वामी ! ही कन्या तुझ्या कुळाचें पालन करणारी आहे, म्हणून आम्हीं ती तुला अर्पण करीत आहोंत. तिचें मस्तक शृंगारण्याची वेळ येईपर्यंत ती मातापित्यांच्या घरीं राहो. तूं बंधनरहित, द्रष्टा आणि प्राणशक्तीनें युक्त आहेस. म्हणून तुझ्या ज्ञानाशीं आम्हीं या कन्येचें भाग्य जोडून देतों. ज्याप्रमाणें स्त्रिया स्वतःच्या पेटींत स्वतःचे दागदागिने, जवाहिर बंद करून ठेवतात, त्याप्रमाणें तुझ्या ज्ञानाशीं या कन्येचें भाग्य आम्हीं जोडून देत आहोंत. ' याप्रमाणें या तीन मंत्रांचें तात्पर्य आहे. तें नीट विचार करण्यासारखें आहे. वाचकांनीं त्यावर पुष्कळच विचार करावा. येथें त्याच्या सोयींसाठीं कांहीं विचार मांडले आहेत.

वर-परीक्षा

या सूक्तांत पतीचे गुणधर्म दर्शविण्यांत आले आहेत. ते प्रथम पहाण्यासारखे आहेत—

१ यमः— यम-नियमादिकांचें पालन करणारा, धर्म नियमांस अनुकूल असें स्वतःचें आचरण ठेवणारा.

२ राजन्— राजा (**रञ्जयति**) स्वतःच्या धर्मपत्नीचें रंजन करणारा. येथें पत्नीविषयक कर्तव्याची चर्चा चालू असल्यानें '**राजन्**' शब्दाचा असा अर्थ करणेंच योग्य आहे. राजा शब्दाचा अर्थ 'रंजन करणारा' गृहस्थधर्मात धर्मपत्नी पुरुषाची प्रकृति आहे. त्या धर्मपत्नीचा संतोष वाढविणारा.

३ असितः— (**अ-सितः अबद्धः**) बंधनरहित अर्थात् ज्याचें मन स्वतंत्रता इच्छितें. गुलामीची भावना ज्याच्या मनांत असत नाहीं.

४ कश्यपः— (**पश्यकः**) पहाणारा. स्वतःच्या परिस्थितीस उत्तम जाणणारा आणि स्वतःचें कर्तव्य नीट रीतीनें समजणारा.

५ गयः— (**प्राणबलयुक्तः**) प्राणायामादि योगसाधनांनीं ज्याचें स्वतःचें बळ वाढलें आहे.

६ ब्रह्मणा युक्तः— ज्ञानानें युक्त, ज्ञानी.

या सूक्तांतील हे सहा शब्द पतीचे गुणधर्म दर्शवित आहेत.

पतीचे गुणधर्म

धर्मनियमांप्रमाणें आचरण करावें, धर्मपत्नीस संतुष्ट राखावें, स्वाधीनतेसाठीं प्रयत्न करावे, स्वतःची परिस्थिति नीट प्रकारें जाणावी. योगादि साधनांनीं दीर्घायु, निरोगिता आणि सुदृढता संपादन करावी, तसेंच ज्ञान वाढवावें. या गोष्टी पतीची योग्यता दाखवितात.

येथें स्त्रिला संतुष्ट ठेवण्यासाठीं धर्मानुकूल शक्य तेवढा आचार ठेवण्यास सांगितलें आहे. कारण कीं '**यम राजन्**' हे दोन शब्द या मंत्रांत एकत्र योजिले आहेत.

स्वतःच्या कन्येसाठीं वर शोधावयाचा असला, तर वर सांगितलेल्या सहा गुणांनीं युक्त असाच पसंत करावा. ज्याचें आचरण धर्मानुकूल आहे, जो पत्नीशीं प्रेमपूर्ण वागणूक ठेवील, जो स्वतंत्र राहण्याचे प्रयत्न करीत असेल, तो स्वतःची परिस्थिति उत्तम जाणून आणि त्याप्रमाणें कार्यव्यवहार करील, जो बलवान् आणि आरोग्यसंपन्न आहे, जो स्वतःच्या स्वास्थ्याचें रक्षण करूं शकतो, तसेंच जो ज्ञानवान् आणि प्रबुद्ध आहे. अशा वराला स्वतःची कन्या अर्पण करणें योग्य होय.

त्याचप्रमाणें जो धर्मानुकूल आचरण करीत नाहीं, जो पत्नीशीं प्रेमभावनेनें वागणार नाहीं, जो पराधीनतेंत आहे, स्वतःच्या परिस्थितीशीं विरुद्ध आचरण करतो, तसेंच जो रोगी अथवा निर्बल आहे, तसेंच ज्याला ज्ञान नाहीं, त्याला कोणत्याहि परिस्थितींत स्वतःच्या कन्येसाठीं वर म्हणून पसंत करूं नये. वाचकांनीं वरील गोष्टी वरपरीक्षेच्या वेळीं नीट ध्यानीं आणाव्या. आतां वधुपरीक्षेचे नियम पाहूं—

वधु-परीक्षा

१. कन्या- (**कमनीया**) कन्या अशी असावी कीं तिला पहातांच मनांत प्रेम उत्पन्न व्हावें. रूप, तेज, अवयवांची सुंदरता, स्वच्छता, ज्ञान इत्यादि सर्व गोष्टी अशा असाव्या कीं, ज्याच्यांमुळें पहाणाराच्या मनांत तत्काल प्रेम उत्पन्न व्हावें. असे गुण कन्येच्या ठिकाणीं असावेत असा या शब्दांचा भावार्थ आहे.

२. वधू- (**उह्यते पतिगृहे**) जी पति घरीं जाऊन रहाण्याचें पसंत करते, जी पतिगृहासच स्वतःचें खरें घर समजते.

३. कुलपा- कुलाचें पालन करणारी. पित्याच्या आणि पतीच्या कुलमर्यादांचें पालन करणारी; जी स्वतःच्या सदाचारानें दोन्ही कुळांचें यश वाढविते.

४. ते (पत्युः) भगम्- धर्मपत्नी अशी असावी कीं जी पतीचें भाग्य वृद्धिंगत करील. जिच्यामुळें आपण धन्य झालों असें पतीस वाटावें.

५. पितृषु आस्ताम्- विवाहापूर्वी अथवा आपत्काळीं माता-पित्याच्या अथवा भावाच्या घरीं राहणारी; विवाहानंतर पतिगृहीं राहणारी. इतरां कोणाकडे जाऊन रहाण्याची इच्छा करणारी कन्या नसावी.

६. वृक्षात् स्रक्- वृक्षांवरील फुलांच्या माळेप्रमाणें कन्या असावी. पित्याच्या कुलवृक्षास कन्यारूपी पुष्पमाला सुगंधित करते.

हे सहा मंत्रभाग कन्येची परीक्षा करण्याचे नियम दर्शवितात. वाचकांनीं त्यांचा नीट विचार करावा आणि त्या उपदेशानुकूल कन्येची परीक्षा करावी.

कन्येचे गुणधर्म

कन्या सुस्वरूप तशीच तेजस्विनी असावी, पतीगृहीं प्रेमानें रहाणारी असावी, दोन्ही कुळांची कीर्ति स्वतःच्या सदाचरणानें वाढविणारी असावी, पतीचें भाग्य वाढविणारी, यौवन काळापूर्वी माता-पित्याच्या घरीं आणि तदनंतर पतिगृहीं राहणारी, तसेंच पुष्पमालेप्रमाणें स्वतःच्या कुळाची शोभा वाढविणारी असावी. अशी सुलक्षणी कन्या पसंत करणें योग्य होय.

परंतु जी दिसावयास फिक्की, निस्तेज, वाईट शब्द बोलणारी,

पति घरीं जाऊं न इच्छिणारी, दुराचारिणी, पतीच्या भाग्याचा नाश करणारी, तसेंच दोषयुक्त असेल ती कन्या विवाहास योग्य समजूं नये.

मागणी घालण्याचा योग्य समय

या सूक्तावरून विवाहाचा योग्य समय नक्की करतां येत नाहीं, कारण तो निश्चित करण्यासारखें कांहीं गमक या चार मंत्रांत नाहीं. ' कन्येचें मस्तक शृंगारण्यापूर्वी ती पुष्कळ काळपर्यंत मातापित्याघरीं राहो, ' हा तिसऱ्या मंत्रांत सांगितलेला काळ ऋतुप्राप्तीपूर्वी कित्येक वर्षे, किमानपक्षीं दोन वर्षे असण्याचा संभव आहे; पण वधूपरीक्षेची वर सांगितलेलीं सहा लक्षणें पहातां हें स्पष्ट दिसतें कीं वधू प्रौढ वयाची असावी. ' पतीच्या घरीं जाण्याची कल्पना ' ज्या वयांत कन्येच्या मनांत येईल, तोच समय मागणी घालण्याचा असावा. वरील सहा शब्द, उत्तम, प्रौढ, प्रबुद्ध, जवळ जवळ उपवर झालेल्या कन्येची स्थिति दर्शवितात. वाचकांनीं या सर्व शब्दांचा नीट विचार केला तर कन्येला मागणी तिच्या कोणत्या वयांत करावी याचा निर्णय ते स्वतः करूं शकतील.

भावी पतीनें मागणी घातल्यावर कन्येच्या माता-पित्यांनीं पूर्वोक्त लक्षणांचा खूप विचार करून भावी पतीच्या मागणीचा स्वीकार वा अस्वीकार करावा. या सूक्तांत वराच्या मातापित्यांना अथवा स्वतः कन्येला स्वमत प्रदर्शनाचा अधिकार होता असें कांहि प्रमाण मिळत नाहीं. जर या पुढील एखाद्या सूक्तांत तसा कोठें उल्लेख आला तर त्यावेळीं त्याविषयीं जास्त चर्चा करूं.

मस्तक शृंगारणें

तिसऱ्या मंत्रांत ' **ज्योक् पितृषु आसाता आ शीर्ष्णः समोप्यात्** । ' ' दीर्घ कालपर्यंत मातापित्यांच्या घरीं, मस्तक शृंगारण्याचा समय प्राप्त होईपर्यंत राहो, ' असें म्हटलें आहे. येथें एक गोष्ट सांगणें आवश्यक आहे कीं स्त्री ऋतुमति होते त्या समयास ' पुष्पवती ' समय म्हणतात. पुष्पवतीचा अर्थ फुलांनीं स्वतःस शृंगारण्याचा समय. प्रथम रजोदर्शन, प्रथम ऋतुप्राप्ति अथवा प्रथम पुष्पवती होतांच तिला फुलांनीं सजविण्याची प्रथा विशेषतः मस्तक फुलांनीं शृंगारण्याची प्रथा भारतांत आजहि प्रचलित आहे. म्हैसूर-मद्रासकडे त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील प्रभू आणि कुणबी जातींत प्रथम गर्भाधानप्रसंगीं शेकडों रुपायांच्या फुलांनीं ती पुष्पवती स्त्रीस सजविण्यांत येतें. मुंबईंत इतरहि अनेक जातींत हा रिवाज आहे. कित्येक ज्ञातींत जरा कमी प्रमाणात असेल, पण डोक्यांत फुलें घालण्याची प्रथा ऋतुप्राप्तिप्रसंगीं अशेष आहे. आतां दिवसानुदिवस हा रिवाज कमी होत आहे. याचीं कारणें दोन आहेत; एकतर धनाभाव आणि दुसरा उत्साहाचा अभाव. त्यामुळें आतां ही प्रथा कमी होत चालली आहे. श्रीमंत लोक याप्रसंगीं चांदी-सोन्याचीं, हिऱ्यामोत्यांचीं फुलें तयार करवितात आणि पुष्पवती स्त्रीला चौथ्या दिवशीं सजवितात. ज्या प्रांतांत पडदापद्धति आहे, तेथें हा रिवाज नाहीं असा आमचा अनुभव आहे. परंतु खरी गोष्ट काय आहे तें तद्देशीयच जाणूं शकतील. परंतु यावरून एक मात्र नक्की अनुमान करतां येतें कीं पडदा अथवा अवगुंठन पद्धति ही अवैदिक आहे आणि कांहीं अवैदिक कारणांमुळेंच ती आमच्या देशांतील कांहीं भागांत रूढ झाली आहे.

मागणीनंतर विवाह

या सूक्ताच्या अभ्यासानें असें वाटतें कीं वरानें मागणी घातल्यानंतर वधू-मातापित्यांची संमति असली, तर विवाह दीर्घकालपर्यंत लांबणीवर टाकीत नसत. प्रथम मंत्रांत वरानें मागणी घातली आहे आणि लागलीच दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्रांत कन्यासमर्पणाचा विषय आला आहे. पहा—

१. **एषा कन्या ते वधूः नियूयताम्**- ही आमची कन्या तुझी पत्नी होऊन उत्तम व्यवहार करो. तसेंच—

२. **एषा [कन्या] ते कुलपा तां उ ते परिदद्मसि**- ही आमची कन्या तुझ्या कुलाचें पालन करणारी आहे, म्हणून तुझ्यासाठीं आम्हीं तिचें दान करीत आहोंत.

३. **ते भगं अपिनह्यामि**- तुझें भाग्य (या कन्येशीं) निगडित करतों; म्हणजे तूं तिच्यापासून वेगळा होऊं नकोस.

हा मंत्रभाग स्पष्ट दर्शवितो कीं कन्येच्या मातापित्यांनीं भावी पतीची मागणी मान्य केल्यानंतर विवाहसमय फार दूरवर असूं नये, म्हणजे विवाह लौकर व्हावयास पाहिजे. जरी सूक्तांत नक्की वेळेचा उल्लेख नाहीं तरी (१) मागणी, (२) कन्यादानास संमति म्हणजे मागणीचा स्वीकार, (३) मस्तक शृंगारण्याच्या वेळेपर्यंत म्हणजे ऋतुमती होईपर्यंत कन्येचें पितृगृहीं वास्तव्य हें अगदीं स्पष्ट सांगितलें आहे, आणि त्यावरून विवाहाचा काळ नक्की करतां येतो. यावरून हें निश्चित करतां येतें कीं मागणी, त्यानंतर वाङ्निश्चय, त्यानंतर कन्येचें पुष्पवती होणें येथपर्यंत क्रम निश्चित आहे आणि त्यानंतर कन्येला पतिगृहीं निवास करण्याविषयीं उपदेश आला आहे. वाचकांनीं या विषयीं अधिक विचार करावा. हा विषय इतर सूक्तांशीं संबंधित आहे, म्हणून विवाहविषयक सूक्तें जेव्हां जेव्हां येतील तेव्हां त्यांच्या विवरणांत सर्व बाबी पाहून निर्णय करतां येईल. वाचकांनीं याचा योग्य तेवढा विचार करावा.

कन्येसाठीं वर

कांड ६, सूक्त ८२

(ऋषिः – भगः । देवता – इन्द्रः ।)

आगच्छंत आगंतस्य नामं गृह्णाम्यायतः । इन्द्रंस्य वृत्रघ्नो वंन्वे वासवस्यं शतक्रतोः ॥ १ ॥
येनं सूर्यां सांवित्रीमश्विनोहतुः पथा । तेन मामंब्रवीद्भगो जायामा वंहतादितिं ॥ २ ॥
यस्तेऽङ्कुशो वंसुदानों बृहन्निन्द्र हिरण्ययंः । तेनां जनीयते जायां मह्यं धेहि शचीपते ॥ ३ ॥

अर्थ— (आगच्छतः) येणाऱ्या, (आगतस्य) आलेल्या आणि (आयतः) लवकरच येऊं इच्छिणाऱ्या (वृत्रघ्नः वासवस्य शतक्रतोः इन्द्रस्य) शत्रूंचा नाश करणाऱ्या, धनाढ्य आणि शेंकडों कर्मे करणाऱ्या इन्द्राचें (नाम गृह्णामि) नांव मीं घेतों आणि तें (वन्वे) पसंत करतों. [१]

(येन पथा) ज्या मार्गानें, (अश्विना) अश्विदेवांनीं (सूर्यां सावित्रीं ऊहतुः) सूर्यप्रभा सावित्रीचा विवाह केला, (तेन) त्या मार्गानें (जायां आवहतात् इति) भार्या प्राप्त कर असें (भगः मां अब्रवीत्) भगानें मला सांगितलें. [२]

हे (इन्द्र) इन्द्रा ! (यः ते हिरण्ययः वसुदानः बृहन् अंकुशः) जो तुझा सुवर्णाचें धन देणारा मोठा अंकुश आहे, हे (शचीपते) इन्द्रा ! (तेन जनीयते मह्यं) त्यानें स्त्रीची इच्छा करणाऱ्या मला (जायां धेहि) पत्नी दे. [३]

भावार्थ— येण्यापूर्वीच इच्छा मनांत बाळगून मजपाशीं आलेल्या, जो शत्रूंवर विजय मिळविणारा, धनाढ्य, शेंकडों उत्तम कर्मे करणारा शूरवीर आहे, त्याला मीं माझ्या कन्येसाठीं वर म्हणून पसंत करतों. [१]

ज्याप्रमाणें अश्विदेवांनीं सूर्यप्रभेचा विवाह केला, त्या प्रकारें धनवान् वधूचा पिता ' कन्येचा स्वीकार करा ' असें म्हणत मला विवाहासाठीं प्रेरणा देत आहे. [२]

हे प्रभो ! तुझ्याजवळ धनाची प्राप्ति करणारें जें उत्तम शस्त्र आहे त्याच्या बलानें पत्नीची इच्छा करणाऱ्या मला भार्या प्राप्त होवो. [३]

कन्येसाठीं वर

कन्येसाठीं जो वर पसंत करावयाचा तो खालीं दिलेल्या गुणांचा विचार करून पसंत करावा—

१. **जनीयते-** वर असा असावा कीं ज्याच्या मनांत धर्मपत्नी प्राप्त करण्याची प्रबळ इच्छा जागृत झाली असेल. (मं. ३)

२. **आगच्छतः**- कन्येच्या पित्याजवळ मागणी घालण्यास जाण्याची इच्छा करणारा. (मं. १)

३. **आगतस्य-** कन्येच्या पित्याजवळ जाऊन पोहोंचणारा. (मं. २)

४. **आयतः**- कन्येच्या पित्याजवळ जाऊन पोहोंचलेला. (मं. ३)

हे चार शब्द वराची धर्मपत्नीरूपानें कन्या प्राप्त करण्याची उत्कट इच्छा दर्शवितात. हल्लीं कन्येचा पिता वर संशोधनार्थ ठिकठिकाणीं फिरत असतो. ती पद्धति अवैदिक आहे असें यावरून स्पष्ट होतें. वधूच्या पित्यानें अथवा वधूनें वर संशोधनासाठीं दारोदार फिरूं नये. या उलट वरानें स्वतःची योग्यता सिद्ध करून वधूला मागणी घालण्यास वधूच्या पित्याजवळ जावें. ही गोष्ट वरील चार शब्दांनीं सिद्ध होत आहे. आतां वराच्या ठिकाणीं कोणते गुण असावेत तें पाहूं. त्याविषयीं विचार असा आहे—

५. **वासवः**- वसु म्हणजे धन जवळ बाळगणारा. (मं. १)

६. **शतक्रतुः**- शेंकडों उत्तम पुरुषार्थ करणारा. (मं. १)

*

७. **वृत्रघ्नः**– शत्रूंचा नाश करणारा; विजय प्राप्त करण्यास समर्थ. (मं. १)

८. **इन्द्रः**– शत्रूंचा नाश करणारा, शूरवीर (मं. १)

या चार शब्दांनीं वराच्या गुणांचें वर्णन केलें आहे. विवाहापूर्वी वरानें धन मिळविलेलें असावें, आणि शौर्य प्रगट केलेलें असावें. वर अपरीक्षित नसावा.

वधू-पित्यानें अशा वराचें स्वागत करून त्यास म्हणावें कीं **(जायां आवहतात्)** या माझ्या कन्येचा स्वीकार करा. तुम्हीं जर स्वीकार केलात तर मीं स्वतःला धन्य समजेन, इत्यादि भाषणांनीं वराशीं गोष्टी करून स्वतःची कन्या देण्याचा विचार प्रगट करावा. ज्याप्रमाणें प्रभेचें दान सूर्य करतो त्याप्रमाणें कन्येचें दान पित्यानें करावें. अर्थात् कन्येसाठीं पैसा घेणें अथवा वर-दक्षिणा देणें अशा अटी नसाव्यात. मुख्यत्वें वराच्या गुणांचाच विचार व्हावा. (मं. २)

वरानेंहि मनांत खूणगांठ बांधावी कीं मीं शौर्य–वीर्य युक्त असल्यानें धन प्राप्त करीनच, आणि जेव्हां मीं धन मिळवीन आणि माझें शौर्य प्रकट होईल तेव्हां माझा विवाह सहज ठरला जाईल.

या सूक्तांत वराच्या पसंतीचे आणि विवाहाविषयीं जे इतर विचार आहेत ते फार उत्तम आहेत. वरपिता आणि वर या दोघांनींहि या सूक्ताचा पुष्कळ विचार करावा.

शौर्य–वीर्यावांचून वैदिक समयीं विवाह होणें असंभवनीय होतें, असें यावरून दिसतें. स्वतःच्या विवाहापूर्वी थोडें धन मिळविलेलें असावें हें वराच्या बाबतींत योग्यच होय. **' धीः श्रीः स्त्रीः '** हा नियम ध्यानीं ठेवावा. बुद्धीचा विकास करून धन प्राप्त करावें आणि त्यानंतरच स्त्रीप्राप्तीचा विचार करावा. अजूनहि ज्या लोकांत बालविवाहाची रूढि चालू आहे त्यांनीं या सूक्ताचा नीट विशेष मननपूर्वक विचार करावा.

विवाहाचें मंगल कार्य

कांड २, सूक्त ३६

(ऋषिः – पतिवेदनः । देवता – अग्नीषोमौ ।)

आ नो॑ अग्ने सुम॒तिं सं॑भ॒लो ग॑मेदि॒मां कु॑मा॒रीं स॒ह नो॒ भगे॑न ।
जु॒ष्टा व॒रेषु॒ सम॑नेषु व॒ल्गुरो॒षं पत्या॒ सौभ॑गमस्त्व॒स्यै ॥ १ ॥
सोम॑जुष्टं ब्र॒ह्मजु॑ष्टमर्य॒म्णा संभृ॑तं॒ भग॑म् । धा॒तुर्दे॒वस्य॑ स॒त्येन॑ कृणो॒मि प॑ति॒वेद॑नम् ॥ २ ॥

अर्थ — हे अग्ने ! (**भगेन सह**) धनानें युक्त असलेला (**सं-भलः**) उत्तम वक्ता पति (**इमां नः नः सुमतिं कुमारीं**) या आमच्या उत्तम बुद्धिशाली कन्येला (**आ गमेत्**) प्राप्त होवो. (**अस्यै पत्या सौभगं अस्तु**) तिला पतीसह सौभाग्य प्राप्त होवो. कारण कीं ही कन्या (**वरेषु जुष्टा, समनेषु वल्गु**) श्रेष्ठांमध्यें प्रिय आणि उत्तम मनानें युक्त असल्यानें मनोरम आहे. [१]

(**सोमजुष्टं**) सोमानें सेवित (**ब्रह्मजुष्टं**) ब्राह्मणांकडून सेवित (**अर्यम्णा संभृतं भगं**) श्रेष्ठ मनें असणाऱ्यांनीं एकत्रित केलेलें धन (**धातुः देवस्य सत्येन**) धारक देवाच्या सत्यनियमानें (**पतिवेदनं कृणोमि**) पतिप्राप्तीसाठीं योग्य करतों. [२]

भावार्थ— ज्यानें धन प्राप्त केलें आहे असा उत्तम विद्वान्, वक्ता पति या आमच्या बुद्धिमान् कुमारी कन्येला प्राप्त होवो. ही आमची कन्या वडिल मंडळींस प्रिय आणि उत्तम मनाची, सुंदर अशी आहे. म्हणून या कन्येला या पतीपासून उत्तम सुखें प्राप्त होवोत. [१]

सौम्यता, ज्ञान आणि श्रेष्ठ मनानें संगृहीत आणि सत्यमार्गानें प्राप्त केलेलें हें धन केवळ या पतीसाठीं आहे. [२]

इयमग्ने नारी पतिं विदेष्ट सोमो हि राजा सुभगां कृणोति ।
सुवाना पुत्रान्महिषी भवाति गत्वा पतिं सुभगा वि राजतु ॥ ३ ॥
यथाखरो मघवंश्चारुरेष प्रियो मृगाणां सुषदा बभूव ।
एवा भगस्य जुष्टेयमस्तु नारी संप्रिया पत्याविराधयन्ती ॥ ४ ॥
भगस्य नावमा रोह पूर्णामनुपदस्वतीम् । तयोपप्रतारय यो वरः प्रतिकाम्यः ॥ ५ ॥
आ क्रन्दय धनपते वरमामनसं कृणु । सर्वं प्रदक्षिणं कृणु यो वरः प्रतिकाम्यः ॥ ६ ॥
इदं हिरण्यं गुल्गुल्वयमौक्षो अथो भगः । एते पतिभ्यस्त्वामदुः प्रतिकामाय वेत्तवे ॥ ७ ॥
आ ते नयतु सविता नयतु पतिर्यः प्रतिकाम्यः । त्वमस्यै धेह्योषधे ॥ ८ ॥

अर्थ- हे अग्ने! (इयं नारी पतिं विदेष्ट) ही स्त्री पतीला प्राप्त करो. (हि सोमः राजा सुभगां कृणोति) कारण कीं सोमराजा तिला भाग्यशाली करतो. (पुत्रान् सुवाना महिषी भवाति) ही पुत्रांस जन्म देऊन घरची पट्टराणी होऊन राहो. (सुभगा पतिं गत्वा विराजतु) भाग्यशाली अशी ती पतीला प्राप्त करून गृहिणी होऊन शोभो. [३]

हे (मघवन्) इंद्रा ! (यथा एव आखरः) ज्याप्रमाणें हें गुहेचें स्थान (मृगाणां प्रियः सुषदाः बभूव) पशूंना प्रिय आणि बसण्यालायक आहे, (एवा) याचप्रमाणें (पत्या अ-विराधयन्ती) पतीला विरोध न करतां आणि (भगस्य जुष्टा इयं नारी) ऐश्वर्याचा उपभोग घेणारी ही स्त्री पतीला (सं प्रिया) पूर्णपणें प्रिय होऊन (अस्तु) राहो. [४]

हे स्त्रिये ! (पूर्णां अनुपदस्वतीं) पूर्ण आणि अविनाशी (भगस्य नावं आरोह) अशा या भाग्यनौकेवर चढ, आणि (तया उपप्रतारय) तिनें तरून त्याच्या (पति) जवळ जा, (यः वरः प्रतिकाम्यः) जो वर तुला इच्छिण्यास योग्य आहे. [५]

हे धनपते ! (वरं आक्रन्दय) तुझ्या वरास बोलाव आणि (आ-मनसं कृणु) आणि त्याच्याशीं तुझ्या मनास अनुकूल अशा गोष्टी कर. (सर्वं प्रदक्षिणं कृणु) व त्याच्या उजव्या बाजूस ठेव, जो (यः वरः प्रतिकाम्यः) वर तुझ्या पसंतीला उतरला आहे. [६]

(इदं गुल्गुलु हिरण्यं) हें उत्तम सुवर्ण आहे. (अयं औक्षः) हा बैल आणि (अथो भगः) हें धन आहे. (एते त्वां पतिकामाय वेत्तवे) ते तुला तुझ्या पतीच्या इच्छेसाठीं आणि तुझ्या लाभार्थ (पतिभ्यः अदुः) पतीसाठीं दिले आहेत. [७]

(सविता ते आ नयतु) सूर्य तुझा संसार चालवो. (यः प्रतिकाम्यः पतिः) जो इच्छनीय असा पति आहे तो (नयतु) तुला घेऊन जावो. हे औषधि (त्वं अस्यै धेहि) तूं त्याच्यासाठीं तिला धारण कर. [८]

भावार्थ— ही स्त्री पति प्राप्त करो. परमेश्वर तिला सुखी करो, ही स्त्री पुत्रांस जन्म देऊन घरच्या पट्टराणीसारखी शोभो. [३]

ही स्त्री पतीला कधींहि कोणत्याहि प्रकारें विरोध न करतां ऐश्वर्यानें शोभो आणि सर्वांस प्रिय होवो. [४]

स्त्री गृहस्थाश्रमरूपी सुदृढ नौकेवर चढून स्वतःच्या प्रिय पतिसह हा संसारसागर तरून जावो. [५]

जो वर तुला पसंत असेल त्याला बोलावून त्याच्याशीं सन्मानपूर्वक तुझ्या मनांतील गोष्ट अनुकूलतेप्रमाणें सांग आणि त्याच्याशीं सन्मानपूर्वक व्यवहार कर. [६]

हें उत्तम सुवर्ण, ही गाय, हा बैल आणि हें धन आहे. तें सर्व भावी पतीला आम्ही देत आहों, अशासाठीं कीं त्यामुळें हा वांछनीय पति तुला प्राप्त होवो व तुला सुख देवो. [७]

सूर्य तुला मार्गदर्शक होवो. तुझा (भावी) पति तुझीच इच्छा करणारा तुला अनुकूल होऊन राहो आणि तुला उत्तम मार्गानें नेवो. औषधि तुला पुष्टि देवोत. [८]

विवाहाचें मंगल कार्य

वराची योग्यता

विवाहाचें कार्य अत्यंत मंगल असतें, अतएव तद्विषयक जीं कांहीं कृत्यें करावयाचीं तींहि मंगलभावनेनें करणेंच उचित आहे. विवाहाच्या मंगल कार्यांत वधू-वरांचें स्थान मुख्य आहे, म्हणून त्यांच्याविषयीं या सूक्तांत काय म्हटलें आहे तें प्रथम पाहूं. वराविषयीं या सूक्तांत खालीं दिल्याप्रमाणें माहिती मिळते—

१. संभलः- (सं+भलः) उत्तम प्रकारें व्याख्यान देणारा. (मं. १) विशेष विद्वान्, कोणत्याहि विषयाचें उत्तम प्रतिपादन करणारा.

या शब्दानें वराची विद्वत्ता दर्शविली आहे. वर विद्वान् असावा, शास्त्रज्ञ असावा, चतुर, सन्माननीय विद्वान् असावा, परंतु फक्त विद्वत्ताच नसावी, तर कुटुंबपोषणास आवश्यक धन मिळविणारासुद्धां असला पाहिजे. त्याविषयीं म्हटलें आहे—

२. भगेन सह कुमारीं आगमेत्- धनासह येऊन कन्या प्राप्त करावी. (मं. १) म्हणजे प्रथम धन मिळवावें व तदनंतर कन्या प्राप्त करून विवाह करावा. धन प्राप्त होत नसलें, धन प्राप्त करूं शकत नसला तर त्यानें विवाह करूं नये, कारण विवाहानंतर परिवार वाढतो; म्हणून कुटुंब पोषणाची योग्यता त्याच्यांत असली पाहिजे.

३. पतिः नयतु- पति स्वतःच्या धर्मपत्नीस सन्मार्गानें नेवो. धर्म आणि नीतिच्या मार्गानें नेवो. पण त्याबरोबरच (**प्रतिकाम्यः**) पत्नीच्या इच्छांना अनुकूल वागणारा, तिच्या इच्छा पूर्ण करणारा असाहि तो असावा. याचें तात्पर्य असें कीं यःकश्चित् क्षुद्र कारणानें पति-पत्नींत भांडण-तंटा होऊं नये. धर्मपत्नीवर प्रेम असावें परंतु तिला धन्या धर्ममार्गानें नेण्याचाहि प्रयत्न पतीनें करावा. (मं. ८)

या सूक्तांत एवढ्या उत्तम सूचना पतिसाठीं आहेत. यापूर्वी विवाहविषयक सूक्तें आलीं आहेत, त्यांत पतीचे गुणधर्म आणि कर्मे सांगितलीं आहेत. त्याच्याबरोबर या सूक्तांतील उपदेशाचा विचार करावा.

वधूची योग्यता

वधूविषयींहि पुष्कळ उपदेश सूक्तांत दिला आहे. मोठ्या परिवारांत रहाणाऱ्या कुटुंबीजनांनीं त्याचा अवश्यमेव विचार करावा. पहा—

१. कुमारी- कुमार आणि कुमारी हे दोन्ही शब्द महत्त्वपूर्ण आहेत. पूर्ण ब्रह्मचर्य स्थापन करण्याचा भाव सूचित करणारे हे दोन शब्द आहेत. तरुण स्त्री-पुरुषांच्या मनांत जे भाव निर्माण होतात ते ज्यांच्या मनांत अजून उत्पन्न झाले नाहींत, त्यांना ' **कुमार** ' अथवा ' **कुमारी** ' म्हणतात. हा शब्द अखंड, स्थिर ब्रह्मचर्य धारण करणाऱ्याचा द्योतक आहे. जोंपावेतों मनांत कुमारभाव आहे तों पावेतों वीर्य-दोष होणारच नाहीं. या पहिल्या मंत्रांत कुमारी शब्द आला आहे, जो कन्यावाचक आहे. कन्या अशी असावी कीं जी कुमारी असेल, म्हणजे जिच्या मनांत पुरुषविषयक कामविकाराचा चंचलभाव जराहि उत्पन्न झालेला नाहीं. येथें विवाहासाठीं योग्य कुमारीचें वर्णन केलें आहे. त्यामुळें यौवनामुळें जे भाव, विकार अथवा दोष उत्पन्न होतात, ते या कन्येंत उत्पन्न झालेले नसावे असा बोध होतो. त्यावरून विवाह बाळपणीं होत असा तर्क करणें अयुक्त होय, कारण .' पतीची इच्छा करणाऱ्या कन्यकेचा विवाह आहे, ' (पहा कां. २, सू. ३०) हें प्रथमच सांगितलें आहे. म्हणून या सूक्तांत बालवयांतच विवाह व्हावेत असें सांगितलें, हें म्हणणें संभवनीय नाहीं. म्हणून येथें आलेल्या ' कुमारी ' शब्दाचा अर्थ ती ' प्रौढ, विवाहास योग्य, पतीची इच्छा करणारी परंतु मनानें चंचल विकारांपासून पूर्णपणें अलिप्त ' असा घेतला पाहिजे. यावरून कन्येचें शिक्षण वेदाच्या दृष्टीनें कशा प्रकारचें असावें हें वाचक समजूं शकतील. तसेंच यावरून विवाहापूर्वी त्यांचीं मनें कशी पवित्र असावींत त्याचाहि बोध होईल. (मं. १)

२ सुमतिः- कन्या उत्तम मतीची, उत्तम बुद्धियुक्त असावी. जिच्या मनावर सुसंस्कार झालेले आहेत, अशी पवित्र बुद्धि धारण करणारी कन्या असावी. (मं. १)

३ सुमनेषु वरेषु जुष्टा वल्गु- उत्तम मनाच्या श्रेष्ठांची सेवा करण्यास योग्य सुंदर कन्या असावी. ज्यांच्या मनांत समानतेचे विचार आहेत, विषमता ज्यांच्या मनास स्पर्शहि करीत नाहीं, असे जे श्रेष्ठ, वडिल त्यांच्यामध्यें जाऊन विद्येचें मनन करणारी, विद्या शिकणारी आणि स्वतःच्या स्त्रीत्वामुळें मनोहर अशा परिशुद्ध विचारांची कन्या असावी. ' श्रेष्ठ (वडिल) मंडळींत जाण्यास योग्य ' (**वरेषु जुष्टा**) या शब्दांनीं धार्मिक दृष्टीनें कन्येच्या पवित्रतेचा बोध होतो. काया, वाचा आणि मनानेंहि जिचें आचरण हीन, दुष्ट अथवा खराब झालेलें

नाहीं, अशी कन्या असावी. कन्या शुद्धशील आणि आचार-संपन्न तशीच मनोरम आणि दर्शनीय असावी. आपल्या कन्या अशा निपजाव्यात असें शिक्षण त्यांस आपण दिलें पाहिजे. (मं. १)

अशाप्रकारें कन्येच्या शुद्धाचरणाविषयीं वेदांचा आदेश आहे. ही बाबत प्रत्येक वैदिक धर्मीयानें नेहमीं मनांत धारण करण्या-योग्य आहे. कुमार-कुमारिकांची पवित्रता राखून त्यांना विवाह-संबंधानें एकत्र आणणें हें वेदाच्या दृष्टीनें अभीष्ट आहे. म्हणजेच अनीति मार्गाकडे नेणारा विवाहपूर्व त्यांचा परिचय वेदास मान्य नाहीं, तो भयजनक असण्याचा संभव आहे. वाचकांनीं या-विषयीं नीट विचार करावा.

विवाहानंतर

आतां विवाहानंतर स्त्री-पुरुषांचा परस्पर व्यवहार कसा असावा तें पाहूं. याविषयीं हें सूक्त अत्यंत उत्तम उपदेश देत आहे—

भगस्य जुष्टा इयं नारी, पत्या अविराधयन्ती, संप्रिया अस्तु ॥ (मं. ४)

' ऐश्वर्यासह प्राप्त झालेली ही स्त्री पतिविरोधी न होतां, त्याला अत्यंत प्रिय होवो. ' विवाहानंतर स्त्री अधिक ऐश्वर्यांत प्रवेश करते; म्हणून हा मंत्र सूचवित आहे कीं, विशेष भाग्य, ऐश्वर्य प्राप्त झाल्यानें तिनें उद्धत न व्हावें, परंतु पतिसह प्रेम-पूर्वक रहावें, आणि पतीला कधींहि विरोध करूं नये. गर्वानें फुगून जाऊन पतीचा कधींहि अपमान करूं नये, परंतु दिवसेंदिवस परस्पर प्रेम वाढत जाईल असें तिचें आचरण असावें. तसेंच—

सर्वं प्रदक्षिणं कृणु यो वरः प्रतिकाम्यः (मं. ६)

' जे कांहीं करावयाचें ते पतीला जो तुझ्या इच्छा परिपूर्ण करणारा आहे त्याला प्रदक्षिणा करून कर. ' प्रदक्षिणा करणें याचा अर्थ सन्मान करणें असा आहे. आदरभाव प्रदर्शित करावा, सत्कार करावा. पतीचा सत्कार करून त्याच्या संमतीनें जें कांहीं करणें तें करावें. पत्नीचा **' प्रति-काम '** पतीच असला पाहिजे. स्वतःच्या मनांत जी इच्छा आहे त्याचें जें बाह्य स्वरूप त्याला ' प्रतिकाम ' म्हणतात. आरशांत आपण जें स्वतःचें रूप पहातों त्याला ' प्रतिरूप ' अथवा ' प्रतिबिंब ' म्हणतात. लेखाच्या दुसऱ्या नकलेला ' प्रतिलेख ' म्हणतात. याप्रमाणें स्त्रीच्या मनांत असलेल्या कामनेचें प्रतिबिंबच पति असावा. पत्नीनें याप्रकारें पतीला स्वतःचा **' प्रतिकाम '** समजून त्याचा सत्कार करून स्वतःचीं कर्तव्यें पार पाडावीं. तसेंच—

पत्या अस्यै सौभाग्यं अस्तु । (मं. ३)

' तिच्यामुळें पतिला शोभा प्राप्त होवो. ' स्त्रीची शोभा पति आहे. पतिविरहित स्त्री शोभारहित होय, अशी भावना मनांत ठेऊन स्वतःची शोभा आपला पतीच आहे, म्हणून निरंतर त्याचा आदर, मानसन्मान राखून वागण्याचा धर्म पत्नीनें मनांत ठेवावा. तसेंच—

पतिं गत्वा सुभगा विराजतु ।
पुत्रान् सुवाना महिषी भवाति । (मं. ३)

' ही स्त्री पतिला प्राप्त करून ऐश्वर्यानें शोभो आणि उत्तम पुत्रांना जन्म देऊन घरची पट्टराणी होऊन राहो. येथें पति प्राप्त करून त्याच्यासह रहावें, पतीच्या ऐश्वर्यानें स्वतःला ऐश्वर्यवान् समजावें, पुत्रांस जन्म देऊन घरची स्वामिनी होऊन रहावें, अशीं स्त्रियांचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत. पुष्कळ सुशि-क्षित स्त्रिया संतानोत्पत्तीच्या स्वकर्तव्यापासून विन्मुख रहातात, पण तें योग्य नाहीं. स्त्रीशरीराची रचनाच तिच्या कर्तव्याची सूचना देत आहे, आणि हीच गोष्ट या मंत्रांत सांगितली आहे. चांगली संतति अथवा सुदृढ संतान निर्माण करणें हें विवाहित स्त्रीचें कर्तव्यच आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेऊन उत्तम संतति निर्माण करण्यालायक शरीरस्वास्थ्य मिळवणें आणि टिकवणें यासाठीं स्त्रियांनी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या स्त्रिया शरीरस्वास्थ्याकडे प्रथमपासूनच दुर्लक्ष करतात त्यांचीं शरीरें संतानोत्पत्तीला असमर्थ ठरतात. म्हणून शरीरस्वास्थ्याचा आणि सुदृढतेचा विचार स्त्रियांनीं प्रथमपासूनच करावयास पाहिजे.

ऐश्वर्याची नौका

पांचव्या मंत्रांत गृहस्थाश्रमांतील ऐश्वर्याला नौकेची उपमा दिली आहे. ही उपमा पुष्कळच बोधप्रद आहे. पहा—

पूर्णां अनुपदस्वतीं भगस्य नावं आरोह ।
यः प्रतिकाम्यः वरः तया उप प्रतारय ॥ (मं. ५)

' सर्व प्रकारच्या परिपूर्ण आणि कधीं न तुटणाऱ्या ऐश्व-र्याच्या नौकेवर आरूढ हो. आणि जो तुझा पति आहे त्याच्यासह या नौकेच्या आश्रयानें या संसारांत परतीराला जा. ' ही गृहस्थाश्रमरूपी नौका आहे, तिच्यांत पति-पत्नी वस्तुतः बरोबरच बसले आहेत, परंतु स्त्री ही गृहि-णी, घर चालवणारी असल्यानें ही नौका चालवणारी तीच आहे असें या मंत्रांत सांगि-तलें आहे. असें म्हणून वेदांनीं नारीजातीचा मोठा सन्मान केला आहे आणि त्याबरोबरच स्त्रियांवर मोठी जबाबदारीसुद्धां टाकली आहे. खरें पाहिलें असतां गृहिणी म्हणजेच घर. फक्त दगड, चुना, विटा, माती यांनीं बांधलेल्या वास्तूस घर म्हणतां येत नाहीं. म्हणजे स्त्री असली तरच गृहस्थाश्रमी म्हणतां येतें; स्त्री नसली

तर गृहस्थाश्रमही नाहीं. एवढें महत्त्व गृहस्थाश्रमांत स्त्रीचें आहे. त्या हेतूनें या मंत्रांत स्त्रीला उद्देशून म्हटलें आहे कीं गृहस्थाश्रमरूपी नौकेवर तिनें आरूढ होऊन ती नौका अशी कुशलतेनें चालवावी कीं संपूर्ण नौका इच्छित स्थळीं पोंचून आंत बसणाऱ्यास प्रवासांत कोणतेंहि कष्ट वा त्रास होणार नाहींत. याप्रमाणें स्त्रीच्या अधिकाराविषयीं खालील मंत्रभाग पहाण्यासारखा आहे–

धनपते! वरं आक्रन्दय आ मनसं कृणु । (मं. ६)

' हे गृहस्थाश्रमांतील संपूर्ण ऐश्वर्य–धनसंपत्तीच्या स्वामिनी ! तुझ्या पतीला बोलावून त्याचें मन अनुकूल करून घे.' गृहस्थाश्रमांत प्रवेश केलेल्या स्त्रियांचा हा अधिकार आहे. स्त्री ही गृहस्थाश्रमांतील संपूर्ण ऐश्वर्याची स्वामिनी आहे. आणि पति जर हीन मार्गानें जात असला तर त्याला सन्मार्गावर आणण्याचा तिचा अधिकार आहे. स्त्रियांनीं हा स्वतःचा अधिकार जाणून घ्यावा आणि तो चालविण्याइतपत स्वत: योग्यता प्राप्त करून घ्यावी.

पुरुषाचें स्थान

गृहस्थाश्रमांत स्त्रीचा जर एवढा अधिकार तर पुरुषाचें स्थान काय त्याचासुद्धां विचार करणें योग्य आहे. त्यासाठीं पहा—

यः प्रतिकाम्यः पतिः नयतु । (मं. ८)

' कामनेला अनुकूल पति आहे तो चालवो.' अर्थात् गृहस्थाश्रमाचा रथ चालवो. गृहस्थाश्रमांत जर कांहीं उणीवा असल्या तर त्या त्यानें पूर्ण कराव्यात. गृहव्यवस्था दोषयुक्त राहूं देऊं नये. हा पुरुष गृहस्थाश्रमांत राहूनहि—

सविता ते आ नयतु । (मं. ८)

' हा पति सूर्याप्रमाणें स्त्रीस घेऊन चालो. ' हा पति घरांत सूर्याप्रमाणें मुख्य आहे. ज्याप्रमाणें सूर्य ग्रहमालेचा मुख्य संचालक आहे त्याप्रमाणें गृहस्थाश्रमाचा सूर्य–पति संपूर्णपणें गृहस्थाश्रमाचा संचालक आहे. पत्नीस बरोबर घेऊन या गृहस्थाश्रमाचें त्यानें संपूर्णपणें योग्य संचालन करावें. वाचकांनीं येथें ही गोष्ट नीट ध्यानीं घ्यावी की गृहस्थाश्रमाचें उत्तम संचालन एकटी स्त्री अथवा एकटा पुरुष करूं शकत नाहीं. खरोखर ते दोघे मिळूनच गृहस्थाश्रम चालवित असतात; म्हणूनच या सूक्तांत ज्याप्रमाणें स्त्रीला गृहस्थाश्रम चालविण्याचें सूचन आहे त्याप्रमाणें पुरुषालाही तसेंच करण्याचा उपदेश आहे. त्याचा स्पष्ट अर्थ असा की दोघांनीं मिळून परस्पर विचारविनिमयानें हा संसार करावा. दोघांचे अधिकार समान असल्यानें दोघांना समान आज्ञा दिली आहे. ही आज्ञा जाणून गृहस्थाश्रमी स्त्री–पुरुषांनीं संसारांत समअधिकार आहेत हें समजून हसत खेळत समानरीतीनें स्वतःच्या कर्तव्याचा भार उचलावा आणि आनंदानें संसारयात्रा पूर्ण करावी. तसेंच—

सोमो हि राजा सुभगां कृणोति । (मं. ३)

' सोम राजा या स्त्रीला ऐश्वर्ययुक्त करीत आहे. ' हा पति घरांत राजासारखा आहे; पत्नीला महाराणी असें यापूर्वींच सांगितलें आहे. पत्नी जर राणी आहे तर पति हा राजा आहे यांत शंकाच नाहीं. या राजाराणींनीं एकमतानें गृहराज्य चालवावें. परस्परांत विरोध उत्पन्न होऊं देऊं नये; एक दुसऱ्यास सहाय्यक होऊन उन्नति साधावी.

याप्रमाणें वेदानें गृहस्थाश्रमांत पतीचें स्थान नक्की केलें आहे. दोघांनाहि उचित स्थान देण्यांत आलें आहे. याचा विचार करून दोघांनीं स्वतःच्या स्थानास योग्य व्यवहार करून आदर्श गृहस्थाश्रम करावा

पतीसाठीं धन

पत्नीकडून म्हणजे वधूच्या पित्याच्या घरून कांहीं धन वरास देण्यांत येतें. वरदक्षणारूपानें हें धन वधूच्या घरून वराकडे येतें. याविषयीं ७ वा मंत्र अगदीं स्पष्ट आहे–

इदं गुल्गुलु हिरण्यं, अयं औक्षः अथो भगः
एते त्वा पतिभ्यः अदुः ॥ (मं. ७)

' हें सुंदर सुवर्ण, ही गाय, हा बैल, हें धन, हें सर्व या पतीस देण्यांत येत आहे. ' येथें बहुमानार्थी पति शब्दाचें बहुवचन योजिलें आहे. विवाहाच्या मंगल कार्यांत पतीचा सन्मान होणें उचितच आहे. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं हुंडा अथवा वरदक्षणा म्हणून जें धन कन्येच्या पित्याकडून वरगृहीं यावयाचें तें कुमार्गानें, अन्याय्य मार्गानें मिळविलेलें नसावें. याविषयीं द्वितीय मंत्र पहा—

सोमजुष्टं, ब्रह्मजुष्टं, अर्यम्णा संभृतं भगम् ।
धातुर्देवस्य सत्येन पतिवेदनं कृणोतु ॥ (मं. २)

' सौम्यवृत्तीनें, ज्ञानानें अथवा श्रेष्ठ मनोवृत्तींनीं प्राप्त झालेलें अथवा एकत्रित केलेलें धन विधात्या ईश्वराच्या सत्यनिष्ठेनें पतीला प्राप्त होवो, हेंच मीं योग्य समजतों. '

' सोम, ब्रह्म आणि अर्यमा ' या तीन शब्दांनीं अनुक्रमें सौम्यवृत्ति, विद्या, ज्ञान आणि श्रेष्ठ मन सुचविलें आहे. **' अर्य+मन '** पासून अर्यमन् शब्द झाला, तो श्रेष्ठ मनाचा द्योतक आहे. ज्याचें मन उच्च कोटीचें आहे त्यालाच अर्यमा म्हणतात. ब्रह्म शब्द ज्ञानाचा वाचक आहे. सोम शब्द सौम्यतेचा, शांतीचा केंद्र आहे यांत शंकाच नाहीं; म्हणजे हे तीन शब्द शांति, श्रेष्ठ विद्या आणि सुसंस्कृत मनोवृत्तीचे द्योतक आहेत. अशा मनो-

वृत्तीनें कमाविलेलें, संग्रह केलेलें आणि वाढविलेलें धन परमेश्वर विषयक सत्यनिष्ठेसह कन्येच्या पतीस समर्पण करावें. हीनवृत्तीनें मिळविलेलें धन देऊं नये. कन्येनें असा विचार करावा की, जें धन माझ्या पतीला हुंडा म्हणून देण्यांत येत आहे तें कोणत्या मार्गानें मिळविलेलें आहे. जर तें कुमार्गानें अथवा हीनवृत्तीनें मिळविलेलें असेल तर तें पतिगृहीं हीनता निर्माण करील. म्हणून सावधानतेनें आणि विचारपूर्वक आपल्या आर्थिक शक्तीप्रमाणें वर दक्षिणेचें धन पतीला द्यावें. जें द्यावयाचें तें पवित्र विचारानें मिळवलेलें असावें आणि तशाच पवित्र विचारानें त्यागबुद्धीनें तें देण्यांत यावें.

याप्रमाणें विवाह मंगलकार्याचा विचार या सूक्तांत दर्शविण्यांत आला आहे. या सूक्ताचा विचार विवाहविषयक अन्य सूक्तांसह वाचकांनी केला तर त्यांना पुष्कळ बोध प्राप्त होईल, आणि अशा तुलनात्मक विचारांनीं वैदिक विवाहपद्धती समजूं शकेल.

विवाह

कांड ६, सूक्त ६०

(ऋषिः - अथर्वा । देवता - अर्यमा ।)

अयमा यात्यर्यमा पुरस्ताद्विषितस्तुपः । अस्या इच्छन्नग्रुवै पतिमुत जायामजानये ॥ १ ॥
अश्रमदियमर्यमन्नन्यासां समनं यती । अङ्गो न्वर्यमन्नस्या अन्याः समनमायति ॥ २ ॥
धाता दाधार पृथिवीं धाता द्यामुत सूर्यम् । धातास्या अग्रुवै पतिं दधातु प्रतिकाम्यम् ॥ ३ ॥

अर्थ— (**अयं विषितस्तुपः अर्यमा**) हा प्रशंसनीय सूर्य (**अस्मै अग्रुवै**) या कन्येसाठीं (**पतिं इच्छन्**) पतीची इच्छा करीत (**उत अजानये जायां**) आणि स्त्रीरहित पुरुषासाठीं स्त्रीची इच्छा करीत (**पुरस्तात् आयाति**) समोरून येत आहे. [१]

हे (**अर्यमन्**) सूर्या ! (**अन्यासां समनं यती**) अन्य कन्यांच्या सन्मानासाठीं म्हणजे त्यांच्या विवाहरूपी सन्मानांत उत्साहानें भाग घेणारी (**इयं अश्रमन्**) ही फार थकली आहे. (**अंगो अर्यमन्**) हे सूर्या ! त्यासाठीं (**अस्याः समनं अन्याः तु आयति**) तिच्या विवाह सन्मानांत इतर कन्यका येवोत. [२]

(**धाता पृथिवीं दाधार**) परमेश्वरानें पृथ्वी धारण केली. (**उत धाता सूर्यं द्यां**) आणि त्याच ईश्वरानें सूर्य आणि द्युलोक यांस धारण केलें आहे म्हणून तोच (**धाता**) देव (**अस्यै अग्रुवै**) या कन्येसाठीं (**प्रतिकाम्यं पतिं दधातु**) इच्छा करणाऱ्या पतीला धारण करो, म्हणजे तिला इच्छनीय असा पति देवो. [३]

भावार्थ— सूर्य उदय होऊन मग अस्तास जातो त्यामुळें कन्या-पुत्रांचें वय वाढतें आणि जसजसें वय वाढतें तसतशी स्त्री-पुरुषांत पति-पत्नी प्राप्त करण्याची इच्छासुद्धां वाढीस लागते. [१]

प्रौढ मुली जेव्हां त्यांच्या मैत्रीणींच्या वा इतर लग्न समारंभांत जातात तेव्हां त्यांच्या मनांत स्वतःच्या विवाहाविषयीं विचार येतो आणि त्यांना एक प्रकारें दुःख होतें. म्हणून असा विचार त्यांच्या मनांत उत्पन्न होतांच त्या कन्येचा विवाह करावा. [२]

ईश्वर पृथ्वी, सूर्य, द्युलोक या सर्वांस यथास्थानीं धारण करतो तर निःसंदेह तो या कन्येस अनुरूप पतिही देऊं शकतो. [३]

या सूक्तांत पुढें दिलेल्या गोष्टी सांगितल्या आहेत. [१] आयुष्यांत एका विशिष्ट समयीं पुरुषास स्त्रीची आणि स्त्रीला पुरुषाच्या सहवासाची इच्छा होते. त्यानंतरच विवाहसमय ठरवावा. [२] विवाहादि संस्कारांत जाण्यायेण्यानें कन्यांच्या मनांत स्वतःच्या विवाहाविषयीं विशेष आतुरता उत्पन्न होते. हा समय कन्येच्या विवाहाला योग्य होय. [३] स्त्री पतीची इच्छा करणारी आणि पुरुष (**अनुकामः**) पत्नी मिळवूं इच्छिणारा झाल्यावर त्यांनीं विवाह करावा. याविरुद्ध स्थिति लग्नसंबंधानें कधींहि नसावी. या विषयीं विशेष दक्षता ठेवली पाहिजे.

विवाह-प्रकरण

कांड १४, सूक्त १

(ऋषिः - सूर्या सावित्री । देवता - आत्मा ।)

सत्येनोत्तभिता भूमिः सूर्येणोत्तभिता द्यौः । ऋतेनादित्यास्तिष्ठन्ति दिवि सोमो अधि श्रितः ॥१॥
सोमेनादित्या बलिनः सोमेन पृथिवी मही । अथो नक्षत्राणामेषामुपस्थे सोम आहितः ॥ २ ॥
सोमं मन्यते पपिवान्यत्संपिंषन्त्योषधिम् । सोमं यं ब्रह्माणो विदुर्न तस्याश्नाति पार्थिवः ॥ ३ ॥
यत्त्वा सोम प्रपिबन्ति तत आ प्यायसे पुनः । वायुः सोमस्य रक्षिता समानां मास आकृतिः ॥४॥
आच्छद्विधानैर्गुपितो बार्हतैः सोम रक्षितः । ग्राव्णामिच्छृण्वन्तिष्ठसि न ते अश्नाति पार्थिवः ॥५॥

अर्थ— (**सत्येन भूमिः उत्तभिता**) सत्यानें भूमीला उचलून धरलें आहे, आणि (**सूर्येण द्यौः उत्तभिता**) सूर्यानें द्युलोक उचलून धरला आहे, (**ऋतेन आदित्याः तिष्ठन्ति**) ऋतानें आदित्य रहात आहेत आणि (**सोमः दिवि अधिश्रितः**) सोम द्युलोकांत राहिला आहे. [१]

(**सोमेन आदित्याः बलिनः**) सोमानें आदित्य बलवान् झाले आहेत. (**सोमेन पृथिवी मही**) सोमामुळेंच पृथ्वी मोठी झाली आहे. (**अथो एषां नक्षत्राणां उपस्थे**) आणि या नक्षत्रांजवळ (**सोमः आहितः**) सोमास ठेवलें आहे. [२]

(**यत् ओषधिं संपिंषन्ति**) जेव्हां सोम नांवाची औषधी वाटतात, तेव्हां (**पपिवान् सोमं मन्यते**) सोमपान करणारा सोमरस प्यालों असें समजतो. (**ब्रह्माणः यं सोमं विदुः**) ज्ञानी लोक ज्याला सोम असें मानतात (**तस्य पार्थिवः न अश्नाति**) त्याचें भक्षण पृथ्वीवर रहाणारा कोणीहि दुसरा करीत नाहीं. [३]

हे (**सोम**) सोमा! (**यत् त्वा प्रपिबन्ति**) जेव्हां तुला लोक पितात, (**ततः पुनः आप्यायसे**) त्यानंतर तू पुनः वृद्धि प्राप्त करतोस. (**वायुः सोमस्य रक्षिता**) वायु सोमाचा रक्षक आहे, आणि (**समानां आकृतिः मासः**) वर्षांची आकृति महिना ही आहे. [४]

हे (**सोम**) सोमा ! (**आच्छत् विधानैः गुपितः**) आच्छादनांनीं सुरक्षित (**बार्हतः रक्षितः**) मोठ्यांनीं रक्षिलेला तूं (**ग्राव्णां इत् शृण्वन् तिष्ठसि**) हा रस काढणाऱ्या दगडांचा आवाज तूं ऐकत रहातोस. (**पार्थिवः ते न अश्नाति**) कोणीहि साधारण मनुष्य तुझा रस भक्षण करीत नाहीं. [५]

भावार्थ— सत्यानें मातृभूमीचा उद्धार करणें शक्य आहे. सूर्याच्या प्रकाशानें आकाश तेजस्वी होतें. ऋजुतेमुळें आदित्य अंतरिक्षांत स्थिर आहे, आणि सोम द्युलोकाच्या प्रकाशांत आश्रय घेऊन राहिला आहे. (याप्रमाणें हे वरवधु सत्य आणि सूर्यप्रकाश, सरलता आणि द्युलोक म्हणजे स्वर्गाच्या आधारानें स्वतःचा जीवनक्रम चालवोत. [१]

सोमांतून आदित्याला बल प्राप्त झालें आणि पृथ्वीचा विस्तार झाला. नक्षत्रांतहि सोमच तेज धारण करून राहिला आहे; याप्रमाणें हे वधूवर सोम वगैरे वनस्पति भक्षण करोत आणि त्यापासून स्वतःचें बळ, महत्त्व आणि तेजाची वृद्धि करोत.) [२]

जेव्हां यज्ञांत सोमाचा रस काढतात, तेव्हां सोमरस पिण्याचा सर्वांचा निश्चय होतो; परंतु ज्ञानी लोक ज्याला सोमरस समजतात तो निराळाच आहे. कोणी साधारण मनुष्य तो पिऊं शकत नाहीं. (हे वधूवर तो सोमरस पिण्याचा पुरुषार्थ करोत.) [३]

हा सोमरस जेव्हां पिण्यांत येतो तेव्हां तो पुनः वाढतो. तो नाश-पावत नाहीं. कारण कीं प्राणच त्याचा रक्षक आहे. ज्याप्रमाणें क्रमानें येणाऱ्या महिन्यांनीं वर्ष पूर्ण होतें त्याप्रमाणें नवी पानें येण्यानें सोमवल्ली पुनः हिरवीगार होते; त्याचप्रमाणें संसारांत वधूवर सांसारिक आपत्ति आल्या असतां, हताश न होतां द्विगुणित उत्साहानें स्वतःचें जीवन व्यतीत करोत. [४]

सोम हा सर्व प्रकारें नेहमीं सुरक्षितच आहे. आंतरिक आणि बाह्य रक्षणाच्या साधनांनीं तो सुरक्षित झालेला आहे. या सुरक्षित झालेल्या सोमाचें रक्षण कोणी साधारण मनुष्य करूं शकत नाहीं. (हे वधूवर याप्रमाणें स्वतःच स्वतःला सुरक्षित राखोत आणि स्वतः इतर कोणाचें भक्ष्य न बनोत.) [५]

चित्तिरा उपबर्हणं चक्षुरा अभ्यञ्जनम् । द्यौर्भूमिः कोश आसीद्यदयात्सूर्या पतिम् ॥ ६ ॥
रैभ्यासीदनुदेयी नाराशंसी न्योचनी । सूर्याया भद्रमिद्वासो गाथयैति परिष्कृता ॥ ७ ॥
स्तोमा आसन्प्रतिधयः कुरीरं छन्द ओपशः । सूर्याया अश्विना वराग्निरासीत्पुरोगवः ॥ ८ ॥
सोमो वधूयुरभवदश्विनास्तामुभा वरा । सूर्यां यत्पत्ये शंसन्तीं मनसा सवितादात् ॥ ९ ॥
मनो अस्या अन आसीद् द्यौरासीदुत च्छदिः । शुक्रावनड्वाहावास्तां यदयात्सूर्या पतिम् ॥ १० ॥

अर्थ— (यत् सूर्या पतिं अयात्) जेव्हां उषा स्वपतिकडे गेली, तेव्हां (चित्तिः उपबर्हणं आ) संकल्प हा तिचा आधार होता व (चक्षुः अभि अञ्जनं आ) डोळेच अंजनरूप झाले, (द्यौः भूमिः कोशः आसीत्) द्यु आणि पृथ्वी खजिना झाले होते. [६]

(रैभी अनुदेयी आसीत्) रैभी ऋचा ही निरोपाची भाषा झाली, (नाराशंसी न्योचनी) नाराशंसी मंत्र स्वागताचें भाषण झाले, (सूर्यायाः वासः भद्रं इत्) सूर्याचें वस्त्र उत्तम कल्याणकारी आहे. ती सूर्या (गाथया परिष्कृता एति) गाथांनीं सुशोभित होऊन जाते. (७)

(स्तोमाः प्रतिधयः आसन्) स्तुतीचे मंत्र अर्थ बनले, (कुरीरं छन्दः ओपशः) कुरीर नामक छंद तिच्या मस्तकाचें आभूषण झाला. (अश्विनौ सूर्यायाः वरौ) दोघे अश्विनौ देव उषेचे साथीदार होते आणि (अग्निः पुरोगवः आसीत्) अग्निदेव अग्रेसर होता. [८]

(सोमः वधूयुः अभवत्) सोम वधूची इच्छा करणारा होता, (उभौ अश्विनौ वरौ आस्तां) दोघे अश्विनौ देव हे वर होते, (यत् सविता मनसा शंसन्तीं सूर्यां पत्ये अदात्) जेव्हां सूर्यानें मनानें स्तुति करणाऱ्या उषेचें पतीच्या हातीं दान केलें. [९]

(अस्या मनः अनः आसीत्) तिचें मन रथ झालें, (उत द्यौः छदिः आसीत्) आणि द्युलोक छत झाला. (शुक्रौ अनड्वाहौ आस्तां) शुक्ररूपी दोन बलवान् बैल जोडले होते (यत् सूर्या पतिं अयात्) जेव्हां उषा पतिगृहीं गेली. [१०]

भावार्थ— जेव्हां वधू वरगृहीं प्रथमच जाते तेव्हां तिचें मनच तिचा आधार असतें आणि तिची दृष्टी तिच्या डोळयांना अंजनरूप होते, म्हणजे बाह्य साधनें तिच्या सुखाचीं साधनें होत नाहींत, तर तिच्या मनाचे भावच तिला सुख देतात. थोडक्यांत असेंच समजा कीं हा सर्व आकाशाचा अवकाश तिला खजिन्यासारखा वाटतो, कारण पतिगृह हेंच तिच्या सर्व सुखाचें साधन असतें. [६]

वेदमंत्रोच्चारासह वधूची वरगृहीं रवानगी होते आणि त्याचप्रमाणें वेदमंत्रांनींच तिचें पतिगृहीं स्वागत होतें. मंत्रोच्चारांनीं पवित्र झालेलें पतीच्या घरचें वस्त्र वधूला कल्याणकारक होतें. [७]

पतीच्या घरीं होणारा यज्ञ स्त्रीसाठीं भोगासारखा आहे आणि वेदमंत्र तिला भूषणासारखे आहेत. कन्येला मागणी घालण्यास जाणारा अश्विदेवांसारखा असतो आणि जो सर्वप्रथम गोष्टी करण्यास जातो तो सर्वांस प्रकाश देणाऱ्या अग्निदेवासमान होय. [८]

वर हा सोमासारखा आहे; मागणी घालणारे अश्विनौ देवासारखे, आणि वराचे हातीं कन्यादान करणारा वधूपिता सूर्यासारखा आहे. वधूसुद्धां वराविषयीं स्वतःच्या मनांत आदरभाव ठेवणारी असावी. (वधू-वरांची परिस्थिति अशी असावी.) [९]

कन्येला जेव्हां वरगृहीं पाठविण्यांत येतें, तेव्हां तिला रथांत बसून पाठवावी. रथाला दोन बैल (अथवा दोन घोडे) जोडावे. शक्य तर ते पांढऱ्या वर्णाचे असावेत. (खरें म्हणाल तर वधूचें मन हाच खरा रथ आहे. बाह्यरथाच्या बाबतींत वधूच्या मनाची अशी तयारी असावी कीं, हे सर्व लौकिक थाटमाट तिनें कल्पनेनें पूर्ण झाले आहेत असें समजुन घ्यावें.) [१०]

*

ऋक्सामाभ्यामभिहितौ गावौ ते सामनावैताम् । श्रोत्रे ते चक्रे आस्तां दिवि पन्थाश्चराचरः ॥११॥
शुची ते चक्रे यात्या व्यानो अक्ष आहतः । अनो मनस्मयं सूर्यारोहत्प्रयती पतिम् ॥ १२ ॥
सूर्याया वहतुः प्रागात्सविता यमवासृजत् । मघासु हन्यन्ते गावः फल्गुनीषु व्युह्यते ॥ १३ ॥
यदश्विना पृच्छमानावयातं त्रिचक्रेण वहतुं सूर्यायाः । क्वैकं चक्रं वामासीत्क्व देष्ट्राय तस्थथुः ॥१४॥
यदयातं शुभस्पती वरेयं सूर्यामुप । विश्वे देवा अनु तद्वामजानन्पुत्रः पितरमवृणीत पूषा ॥१५॥

अर्थ— (ऋक्-सामाभ्यां अभिहितौ ते गावौ) ऋग्वेद आणि सामवेदाच्या मंत्रांनीं प्रेरित झालेले हे तुझे दोन बैल (सामनौ ऐतां) शांतिपूर्वक चालत होते. (श्रोते ते चक्रे आस्तां) दोन्ही कान हे तुझ्या रथाचीं चाकें होतीं. (दिवि पन्थाः चराऽचरः) द्युलोकांत तुझा मार्ग चर आणि अचर रूपानें हें समस्त विश्वच आहे. [११]

(ते यात्याः चक्रे शुची) तुला घेऊन जाणाऱ्या रथाचीं दोन्हीं चाकें शुद्ध–पवित्र आहेत. (अक्षे व्यानः आहतः) दोन्हीं चाकांच्या आंसावर व्यान वायु राहिला आहे. (पतिं प्रयती सूर्या) पतीकडे जाणारी उषा या (मनः–मयं आ रोहत्) मनरूपी रथावर चढली आहे. [१२]

(यं सविता अवासृजत्) जो सूर्यानें पाठविला होता तो (सूर्यायाः वहतुः प्रागात्) उषेसाठीं हुंडा तिच्यापूर्वीं जाऊन पोहोंचला आहे. (मघासु गावः हन्यन्ते) मघा नक्षत्रावर नियोजित वराकडे गाई पाठविण्यांत येतात आणि (फल्गुनीषु व्युह्यते) फाल्गुनी नक्षत्रावर विवाह केला जातो. [१३]

हे (अश्विनौ) अश्विनी देव हो ! (यत् सूर्यायाः वहतु) सूर्येचा हुंडा घेऊन जेव्हां (पृच्छमानौ त्रिचक्रेण अयातं) तुम्हीं दोघे तीन चाकाच्या रथांत बसून विचारण्यास गेलांत, तेव्हां (वां एकं चक्रं) तुमचें एक चाक (क्व आसीत्) कोठें होतें ? आणि तुम्हीं दोघे (देष्ट्राय क्व तस्थतुः) हुंड्यांतील धन आणि वस्तु पाहण्यास कोठें थांबला होतां ? [१४]

हे (शुभस्पती) चांगले करणारे अश्विदेव हो ! तुम्हीं दोघे (यत् वरेयं सूर्यां उप अयातं) जेव्हां वराकडून मागणी घालण्यायोग्य उषेच्या जवळ गेलांत, (वां तत् विश्वे देवाः अन्वजानन्) तुम्हां दोघांचें तें कार्य सर्व देवांना पसंत पडलें. (पूषा पुत्रः पितरं अवृणीत) पुत्रानें पित्याचा सत्कार–स्वीकार करावा, त्याप्रमाणें पूषानें तुमचा स्वीकार केला. [१५]

भावार्थ— या रथाला खेंचणारे (बैल अथवा घोडे) वेदमंत्रांनीं चालविण्यांत यावेत. त्याबरोबरच सामगायनहि करावें. स्वतःचा स्वर्गमार्ग सुलभ व्हावा या इच्छेनें वधू गृहस्थाश्रम स्वीकारण्यास पतिगृहीं जात आहे. म्हणजे पति–पत्नींनीं मिळून असें आचरण ठेवावें कीं त्यामुळें स्वर्गप्राप्ति सहज व्हावी. [११]

ती वधू पतिगृहीं जातांना मनरूपी रथावर बसून जात आहे. त्या रथाचीं चाकें शुद्ध असोत. (येथें दोन चाकें म्हणजे वधूची बाह्य आचारशुद्धता आणि मनांतील इच्छेची पवित्रता सूचित केली आहे.) [१२]

वधूच्या पित्यानें वरास देण्याचा हुंडारूपी गोधन वराच्या घरीं प्रथम पोहोंचवावें प्रथम गायी तेथें पोहोंचाव्यात आणि मग विवाह व्हावा. उदाहरणार्थ मघा नक्षत्रीं सूर्य असतां गायी पाठवून उत्तरा फाल्गुनी नक्षत्रावर (सूर्य असतां) विवाह व्हावा. [१३]

वधूकडून जो हुंडा वरास द्यावयाचा तो घेऊन जाण्यास दोन प्रौढ सज्जन मनुष्यांची (येथें दोन अश्विनौ देव आहेत) अशी योजना करावी. त्यांनीं त्या वस्तु गाडींत घालून आणि योग्य चौकशी अंतीं वराच्या घरीं पोहोंचवाव्यात. हेच लोक वधूच्या रथाचे (पतिगृहीं जातांना) मार्गदर्शक होतील. त्यासाठीं त्यांनीं एखाद्या चांगल्या स्थळीं थांबावें. [१४]

वराकडून मागणी घालण्यास (दोघे अश्विनीकुमार) दोन वैद्य कन्येच्या पित्याकडे जावेत; आणि बाकी सर्व लोकांनीं त्यांना आपली अनुमति द्यावी. ज्याप्रमाणें पुत्र पित्याचा सन्मान–आदर करतो, तसा आदरसत्कार वधूपित्यानें या आलेल्या दोघां स दूतांचा करावा. [१५]

द्वे ते चक्रे सूर्ये ब्रह्माण ऋतुथा विदुः । अथैकं चक्रं यद्गुहा तदद्धातय इद्विदुः ॥ १६ ॥
अर्यमणं यजामहे सुबन्धुं पतिवेदनम् । उर्वारुकमिव बन्धनात्प्रेतो मुञ्चामि नामुतः ॥ १७ ॥
प्रेतो मुञ्चामि नामुतः सुबद्धाममुतस्करम् । यथेयमिन्द्र मीढ्वः सुपुत्रा सुभगासति ॥ १८ ॥
प्र त्वा मुञ्चामि वरुणस्य पाशाद्येन त्वाबध्नात्सविता सुशेवाः ।
ऋतस्य योनौ सुकृतस्य लोके स्योनं ते अस्तु सहसंभलायै ॥ १९ ॥
भगस्त्वेतो नयतु हस्तगृह्याश्विना त्वा प्र वहतां रथेन ।
गृहान्गच्छ गृहपत्नी यथासो वशिनी त्वं विदथमा वदासि ॥ २० ॥

अर्थ— हे (सूर्ये) वधू ! (ते द्वे चक्रे ब्रह्माणः ऋतुथा विदुः) तुझ्या दोन्ही चक्रांस ज्ञानी लोक ऋतुपरत्वें जाणतात. (अथ यत् एकं चक्रं गुहा) आणि जें एक चक्र गुप्त आहे (तत् अद्धातय इत् विदुः) तें विशेष ज्ञानीच जाणतात. [१६]

(सुबन्धुं पतिवेदनं) उत्तम बांधवांनीं युक्त पतिविषयीं ज्ञान देणाऱ्या (अर्यमण यजामहे) श्रेष्ठ मन असणाऱ्याचा आम्हीं सत्कार करतों. (उर्वारुकं बन्धनात् इव) टरबुज ज्याप्रमाणें (परिपक्व झाल्यामुळें) वेलापासून तुटून दूर होतें, त्याप्रमाणें (इतः प्रमुञ्चामि) या पितृकुलापासून तुला मुक्त करीत आहे. (न अमुतः) पण पतीच्या कुलापासून नाहीं. म्हणजे पतिकुलाशीं तुला जोडीत आहें. [१७

(इतः प्रमुञ्चामि न अमुतः) येथून (पितृकुळापासून) तुला मुक्त करतों परंतु तेथून (पतिकुळापासून) नाहीं. (अमुतः सुबद्धां करं) परंतु तेथें तर पतिकुलाशीं मीं तुला बंधनयुक्त करीत आहें. हे (मीढ्वः इन्द्र) दाता इन्द्रा ! (यथा इयं) ज्यामुळें ही वधू (सुपुत्रा सुभगा असति) उत्तम पुत्रांनीं आणि उत्तम भाग्यानें युक्त होवो. [१८]

(त्वा वरुणस्य पाशात् प्रमुञ्चामि) मीं तुला वरुणाच्या पाशापासून मुक्त करतों. (येन त्वा सुशेवा सविता अबध्नात्) ज्या पाशानें सेवा करण्यायोग्य अशा सूर्यानें तुला बांधलें होतें, (ऋतस्य योनौ सुकृतस्य लोके) सदाचारी लोकांच्या घरांत आणि सत्कर्म करणाऱ्यांच्या लोकांत (सह-संभलायै ते) पतिसह तुला (स्योनं अस्तु) सुख प्राप्त होवो. [१९]

(भगः त्वा हस्त-गृह्य इतः नयतु) भग तुला हात धरून येथून घेऊन जावो, आणि पुढें (अश्विनौ त्वा रथेन प्र वहतां) अश्विनौ देव तुला रथांत बसवून पोहोंचवोत. तुझ्या पतीच्या (गृहान् गच्छ) घरीं जा. (यथा त्वं गृहपत्नी वशिनी असः) तेथें तूं घराची स्वामिनी आणि सर्वांना ताब्यांत ठेवणारी हो. तेथें (त्वं विदथं आवदासि) तूं विवेकयुक्त भाषण कर. [२०]

भावार्थ— सूर्या नांवाची सूर्य कन्या तीन चाकाच्या रथांत बसून स्वतःच्या पतिगृहीं गेली, त्याप्रमाणें वधू रथांत बसून पतिगृहीं जावो. या रथाचीं व्यक्त आणि गुप्तचक्रें ज्ञानी लोक नीटपणें जाणतात. [१६]

श्रेष्ठ मनाचा बंधुबांधवांनीं युक्त सज्जन सद्गृहस्थच वराचा पत्ता देवोत. कोणा हीन, नीच, दुष्ट मनुष्यामार्फत वराची ओळख करून घेऊं नये. ज्याप्रमाणें परिपक्व झालेलें फळ स्वतःच्या बंधनापासून-देंठापासून मोकळें होतें, त्याप्रमाणें वधूचा स्वतःच्या पितृकुळाशीं असलेला संबंध सुटतो आणि पतिकुळाशीं निगडित होतो, तो मात्र कधींहि सुटत नाहीं. [१७]

वधूचा संबंध पितृकुळापासून सुटो परंतु पतिकुळाशीं अगदीं निगडित होवो, तो कधींहि न सुटो. तो संबंध सुदृढ होवो. परमेश्वर या वधूला पतिकुलांत उत्तम पुत्र आणि उत्तम भाग्ययुक्त करो. [१८]

विवाह होतांच कन्या वरुणाच्या बंधनांतून मुक्त होते. सूर्यानें कन्येला वरुणाच्या धर्मपाशानें बांधून ठेवली होती. कन्येचा विवाह होतांच ती पतिगृहीं सदाचारी आणि सत्कर्में करणाऱ्यांच्या घरांत पोंचली. पतीचें घर वधूला धार्मिक शिक्षण देणारें होवो. [१९]

भाग्यदेवता वधूचा हात धरून तिला प्रथम चालवो. विवाहानंतर अश्विनौ देव तिला रथांत बसवून पतिगृहीं पोहोंचवोत. याप्रमाणें वधू पतिगृहीं पोहोंचल्यावर तेथील स्वामिनी होऊन सर्वांना वश करणारी होवो. अशी स्त्रीच योग्य प्रसंगीं उत्तम सल्ला देणारी होऊं शकते. [२०]

इह प्रियं प्रजायै ते समृध्यतामस्मिन्गृहे गार्हपत्याय जागृहि ।
एना पत्या तन्वं१ सं स्पृशस्वाथ जिर्विर्विदथमा वदासि ॥ २१ ॥
इहैव स्तं मा वि यौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतम् । क्रीडन्तौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानौ स्वस्तकौ ॥ २२ ॥
पूर्वापरं चरतो माययैतौ शिशू क्रीडन्तौ परि यातोऽर्णवम् ।
विश्वान्यो भुवना विचष्ट ऋतूँरन्यो विदधज्जायसे नवः ॥ २३ ॥
नवोनवो भवसि जायमानोऽह्नां केतुरुषसामेष्यग्रम् ।
भागं देवेभ्यो वि दधास्यायन्प्र चन्द्रमस्तिरसे दीर्घमायुः ॥ २४ ॥
परा देहि शामुल्यं ब्रह्मभ्यो वि भजा वसु । कृत्यैषा पद्वती भूत्वा जाया विशते पतिम् ॥ २५ ॥

अर्थ-(**इह ते प्रजायै प्रियं समृध्यतां**) येथें तुझ्या संततीचें कल्याण वृद्धीस पावो. (**अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि**) या घरांत गृहस्थधर्म पार पाडण्यासाठीं जागृत रहा. (**एना पत्या तन्वं संस्पृशस्व**) या पतीच्या शरीरास तुझ्या शरीराचा स्पर्श कर, (**अथ जिर्विः**) आणि तूं वृद्ध झाल्यानंतर (**विदथं आ वदासि**) उत्तम उपदेश कर. [२१]

(**इह एव स्तं**) तुम्हीं येथेंच रहा, (**मा वि यौष्टं**) तुमचा एकमेकांस कधीं वियोग न होवो. (**पुत्रैः नप्तृभिः क्रीडन्तौ**) पुत्रपौत्रांसह आनंदानें हंसतखेळत, (**मोदमानौ स्वस्तकौ**) आनंदित होऊन स्वतःच्या घरदारानें युक्त होऊन (**विश्वं आयुः व्यश्नुतं**) पूर्ण आयुष्याचा उपभोग घ्या. [२२]

(**एतौ शिशू क्रीडन्तौ**) हीं दोन बालकें खेळत खेळत (**मायया पूर्वापरं चरतः**) आपल्या शक्तीनें मागेंपुढें होत (**अर्णवं परियातः**) समुद्रापावेतों भ्रमण करीत पोहोंचतात. (**अन्यः विश्वा भुवना विचष्टे**) त्या दोघांपैकीं एक सर्व भुवनांना प्रकाशित करतो आणि (**अन्यः ऋतून् विदधत् नवः जायते**) आणि दुसरा ऋतूंना तयार करीत नवीन नवीन होतो. [२३]

(**जायमानः नवः नवः भवसि**) प्रगट होत असतांच तूं नवा नवा होतोस, (**अह्नां केतुः उषसां अग्रं एषि**) दिवसाला तयार करणारा उषांच्या अग्रभागीं तूं रहातोस. (**आयन् देवेभ्यः भागं विदधासि**) येऊन देवांना त्यांचा भाग समर्पण करतोस. तसेंच हे चंद्रा ! (**दीर्घं आयुः प्र तिरसे**) तूं दीर्घायुष्य देतोस. [२४]

(**शामुल्यं परा देहि**) या उत्तम वस्त्राचें दान कर, (**ब्रह्मभ्यः वसु विभज**) ब्राह्मणांना धन दे. जेव्हां (**एषा पद्वती कृत्या जाया भूत्वा**) पायाची कृत्या म्हणजे विनाशक स्वभावाची स्त्री होऊन (**पतिं विशते**) पतीजवळ येते. [२५]

भावार्थ— या धर्मपत्नीची संतति सुखी राहो. ही धर्मपत्नी स्वतःचा गृहस्थाश्रम उत्तम प्रकारें चालवो. ही धर्मपत्नी स्वपतीसह सुखानें राहो. जेव्हां याप्रमाणें योग्य मार्गानें संसार करून ती वृद्ध होईल तेव्हां स्वानुभवानें ती इतरांस योग्य सल्ला देणारी होईल. [२१]

स्त्री-पुरुष स्वतःच्या घरींच राहोत, त्यांचा कधींहि वियोग न होवो. स्वतःच्या बालकांसह आनंदानें खेळोत. स्वतःच्या घरांत आनंदाचा उपभोग घेवोत आणि धर्मानुसार गृहस्थाश्रम चालवून संपूर्ण दीर्घ आयुष्याचा उपभोग घेवोत. [२२]

या गृहस्थाश्रम्याचीं मुलें निरनिराळ्या वयाचीं हंसतखेळत मोठीं होऊन स्वशक्तीनें स्वतःचा पुरुषार्थ करीत समुद्रापर्यंत जावोत एकानें संपूर्ण विश्व प्रकाशित केलें तर दुसऱ्यानें ऋतुअनुसार नवीन नवीन होऊन उदय प्राप्त करावा; म्हणजे गृहस्थाश्रमीयांचे पुत्र स्वतःच्या पुरुषार्थानें जगताला प्रकाशित करोत. [२३]

गृहस्थ लोक नव्या उत्साहानें पुरुषार्थ करीत ज्याप्रमाणें सूर्य उषेला प्रकाशित करतो, त्याप्रमाणें सर्वांना मार्गदर्शक होवोत. यज्ञांत देवांचा भाग त्यांना समर्पण करोत, आणि यज्ञमय जीवन व्यतीत करतां करतां संपूर्ण दीर्घ आयुष्याचा उपभोग घेवोत. [२४]

विवाहाच्यावेळीं उत्तम नवीं नवीं वस्त्रें विद्वान् ब्राह्मणांना दान देण्यांत यावीत, आणि त्यांना धनही देण्यांत यावें. हा ब्राह्मण वधूला सुशिक्षण देवो. जर वधूला उत्तम शिक्षण न मिळालें तर त्या वधूच्या अधर्माचरणामुळें कुळाचा नाश होईल. [२५]

नीललोहितं भवति कृत्यासक्तिर्व्यज्यते । एधन्ते अस्या ज्ञातयः पतिर्बन्धेषु बध्यते ॥ २६ ॥
अश्लीला तनूर्भवति रुशती पापयामुया । पतिर्यद्वध्वो३ वाससः स्वमङ्गमभ्यूर्णुते ॥ २७ ॥
आशसनं विशसनमथो अधिविकर्तनम् । सूर्यायाः पश्य रूपाणि तानि ब्रह्मोत शुम्भति ॥ २८ ॥
तृष्टमेतत्कटुकमपाष्ठवद्विषवन्नैतदत्तवे । सूर्यां यो ब्रह्मा वेद स इद्वाधूयमर्हति ॥ २९ ॥
स इत्तत्स्योनं हरति ब्रह्मा वासः सुमङ्गलम् । प्रायश्चित्तिं यो अध्येति येन जाया न रिष्यति ॥ ३० ॥
युवं भगं सं भरतं समृद्धमृतं वदन्तावृतोद्येषु ।
ब्रह्मणस्पते पतिमस्यै रोचय चारु संभलो वदतु वाचमेताम् ॥ ३१ ॥

अर्थ—(**नीललोहितं भवति**) निळा आणि लाल होतो, म्हणजे क्रोधयुक्त होतो तेव्हां (**कृत्यासक्तिः व्यज्यते**) विनाशाची इच्छा वाढते. (**अस्याः ज्ञातयः एधन्ते**) त्याच्या जातीचीं मनुष्यें वाढतात, आणि (**पतिः बन्धेषु बध्यते**) पति बंधनांत पडतो. [२६]

(**यत् वध्वः वाससः**) जेव्हां स्त्रीच्या वस्त्रानें (**पतिः स्वं अंगं अभि ऊर्णुते**) पति स्वतःचें शरीर आच्छादित करतो तेव्हां (**अमुया पापया**) या पापी रीतिनें (**रुशती तनूः**) सुंदर शरीर असलें तरी सुद्धां (**अश्लीला भवति**) शोभारहीत होतें. [२७]

(**आशसनं विशसनं**) किनारी असलेलें वस्त्र, डोक्याचें वस्त्र, तसेंच (**अथो अधिविकर्तनं**) सर्वांगावर घ्यावयाचें वस्त्र, या सर्वांत (**सूर्यायाः रूपाणि पश्य**) सूर्याची रूपें पहा. (**उत तानि ब्रह्मा शुम्भति**) त्यांना ब्राह्मण तेजस्वी करतो. [२८]

(**एतत् तृष्टं**) हें तहान उत्पन्न करणारें आहे, (**कटुकं**) तें कडू आहे. (**अपाष्ठवत् विषवत्**) तें घृणा उत्पन्न करणारें आणि विषयुक्त अन्न आहे; म्हणून (**एतत् अत्तवे न**) तें खाण्यास योग्य नाहीं. (**यः ब्रह्मा सूर्यां वेद**) जो ब्राह्मण सूर्येला याप्रमाणें जाणतो, (**सः इत् वाधूयं अर्हति**) तोच खरोखर वधूकडून वस्त्र घेण्याचा अधिकारी होतो. [२९]

(**सः इत्**) तोच निश्चयेंकरून (**तत् सुमंगलं स्योनं वासः हरति**) त्या सुमंगल आणि सुखकारक वस्त्राचा स्वीकार करतो. (**यः प्रायश्चित्तिं अध्येति**) जो प्रायश्चित्तप्रकरण अर्थात चित्त शुद्ध करण्याचें ज्ञान मिळवतो. (**येन जाया न रिष्यति**) ज्यामुळें पत्नीचा नाश होत नाहीं. [३०]

(**युवं ऋत-उद्येषु ऋतं वदन्तौ**) तुम्ही दोघे सत्यव्यवहाराचें आचरण करून आणि सत्य बोलून (**समृद्धं भगं संभरतं**) समृद्धियुक्त भाग्य प्राप्त करा. हे ब्रह्मणस्पते ! (**पतिं अस्यै रोचय**) पतिविषयीं या स्त्रीच्या मनांत प्रेम उत्पन्न कर. (**संभलः एतां वाचं चारु वदतु**) पति तिच्याशीं सुंदर भाषण करो. [३१]

भावार्थ— पतिगृहीं जर वधूकडून अधर्माचरण होऊं लागलें तर फारच वाईट होईल. त्या दुराचरणी वधूची विनाशक बुद्धि वाढते. तिच्या पित्याचे संबंधी, नातेवाईक तिच्याभोंवतीं जमा होतात, आणि याप्रमाणें बिचारा पति बंधनांत सांपडतो; म्हणून कन्येला चांगलें शिक्षण दिलें पाहिजे. [२६]

स्त्रीचीं वस्त्रें पुरुषानें कधीं वापरूं नयेत. जर कदाचित् कोणी वापरील तर त्याचें सुदृढ तेजस्वी शरीर असलें तरी तें सुद्धां शोभारहित आणि निस्तेज होईल. [२७]

एक वस्त्र काठपदराचें असतें, दुसरें शालुप्रमाणें चमकणारें आणि तिसरें पांघरण्याचें असतें. या वस्त्रांनीं वधूच्या सौंदर्यांत भर घालण्यांत येते. या वस्त्राविषयीं योग्य ज्ञान ब्राह्मणांनीं गृहस्थांस करून द्यावें म्हणजे वस्त्रांतील दोष दूर होतील. [२८]

एक अन्न तहान वाढविणारें, दुसरें कडू, तिसरें सडलेलें आणि चौथें विषयुक्त असतें. अशा प्रकारचें अन्न गृहस्थानें खाणें योग्य नाहीं. अशाप्रकारचें (आहाराविषयीं) शिक्षण देणाऱ्या ब्राह्मणास वधूतर्फे वस्त्र देण्यांत यावें. [२९]

ज्या ब्राह्मणास चित्त शुद्ध करण्याचें ज्ञान आहे, जें ज्ञान प्राप्त झालें असतां स्त्रिया बिघडत नाहींत, अशाप्रकारचें उत्तम शिक्षण देणाऱ्या अध्यापक ब्राह्मणाला वस्त्राचें दान द्यावें. [३०]

गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांनीं सरळ व्यवहार करावेत, नेहमी सत्य बोलावें, धनसंपत्ति प्राप्त करावी. पत्नीच्या मनांत पतिविषयीं मोठें प्रेम-आदरभाव असावा आणि पतीनें सुद्धां पत्नीशीं मधुर सुंदर भाषण करावें. [३१]

इहेदसाथ न परो गमाथेमं गावः प्रजया वर्धयाथ ।
शुभं यतीरुस्रियाः सोमवर्चसो विश्वे देवाः क्रन्निह वो मनांसि ॥ ३२ ॥
इमं गावः प्रजया सं विशाथायं देवानां न मिनाति भागम् ।
अस्मै वः पूषा मरुतश्च सर्वे अस्मै वो धाता सविता सुवाति ॥ ३३ ॥
अनृक्षरा ऋजवः सन्तु पन्थानो येभिः सखायो यन्ति नो वरेयम् ।
सं भगेन समर्यम्णा सं धाता सृजतु वर्चसा ॥ ३४ ॥
यच्च वर्चो अक्षेषु सुरायां च यदाहितम् । यद्गोष्वश्विना वर्चस्तेनेमां वर्चसावतम् ॥ ३५ ॥
येन महानघ्न्या जघनमश्विना येन वा सुरा । येनाक्षा अभ्यषिच्यन्त तेनेमां वर्चसावतम् ॥ ३६ ॥

अर्थ- हे **(गावः)** गाई हो ! **(इह इत् असाथ)** तुम्हीं येथेंच रहा. **(न परः गमाथ)** येथून दूर जाऊं नका. **(इम प्रजया वर्धयाथ)** याला उत्तम संततीनें वृद्धिंगत करा. हे **(उस्त्रियाः)** गाई हो ! **(शुभं यतीः सोमवर्चसः)** तुम्हीं शुभ प्राप्त करणाऱ्या आणि चंद्राप्रमाणें तेजस्वितेनें युक्त व्हा. **(विश्वेदेवाः वः मनांसि इह क्रन्)** सर्व देव तुमच्या मनाला येथें स्थिर करोत. [३२]

हे **(गावः)** गाई हो ! **(इमं प्रजया सं विशाथ)** त्याच्या घरांत तुमच्या संततिसह प्रवेश करा. **(अयं देवानां भागं न मिनाति)** तो देवांच्या भागाचा लोप करीत नाहीं. **(पूषा सर्वे मरुतः)** पूषा आणि सर्व मरुत् **(धाता सविता)** विधाता आणि सविता **(अस्मै अस्मै वः वः सुवाति)** हेच तुम्हांला या मनुष्यासाठीं उत्पन्न करतात. [३३]

(पन्थानः अनृक्षराः ऋजवः सन्तु) सर्व मार्ग निष्कंटक, सरळ होवोत. **(येभिः नः सखायः वरेयं यन्ति)** ज्यामुळें आमचे सर्व मित्र कन्येच्या घरीं पोंचतात. **(धाता भगेन अर्यम्णा वर्चसा सं सं सं सृजतु)** विधाता, भग आणि अर्यमा यांच्याकडून तीं तेजानें संयुक्त होवोत. [३४]

हे **(अश्विनौ)** अश्विदेव हो ! **(यत् वर्चः अक्षेषु)** जें तेज नेत्रामध्यें असतें आणि **(यत् सु-रायां आहितं)** जें संपत्तीत ठेवलेलें आहे, **(यत् च वर्चः गोषु)** जें तेज गाईंमध्यें आहे, **(तेन वर्चसा इमां अवतं)** त्या तेजानें या वधूचें रक्षण करा. [३५]

हे **(अश्विनौ)** अश्वि देव हो ! **(येन महानघ्न्याः जघनं)** ज्यामुळें मोठ्या गाईंची कांस म्हणजे खालचा दुग्धाशयाचा भाग **(येन वा सुरा)** ज्यामुळें संपत्ति **(येन अक्षाः अभ्यषिच्यन्त)** जिच्यामुळें नेत्र उत्तम रहातात **(तेन वर्चसा इमां अवतं)** त्या तेजानें या वधूचें रक्षण करा. [३६]

भावार्थ— गृहस्थाच्या घरांत गायी असाव्यात. गायी पळून जाऊं नयेत. गायी वासरें निर्माण करोत, त्यांची संख्या नेहमीं वाढत राहो. गायी सुस्वभावी आणि तेजयुक्त असाव्यात. स्वतःच्या धन्यावर प्रेम करीत असाव्यात. [३२]

गायी स्वतःच्या वासरांसह घरांत प्रवेश करोत. गृहस्थानें प्रतिदिवशीं देवयज्ञ करावा, यज्ञाचा लोप कधीं होऊं नये. सर्व देव या गृहस्थाच्या घरांत गायींची संख्या नित्य वाढवोत. [३३]

वर वधूचा गमनमार्ग निष्कंटक आणि सरळ असो. परमेश्वर या गृहस्थाला तेजस्वी आणि समृद्ध करो. [३४]

जें तेज नेत्रांत, ऐश्वर्यांत आणि गाईंमध्यें आहे त्या तेजानें वधू युक्त होवो. ही स्त्री तेजस्विनी होवो. [३५]

ज्या तेजानें गाईंचा दुग्धाशय तेजस्वी झालेला आहे, जें तेज ऐश्वर्य आणि नेत्रांत आहे, त्या तेजानें ही स्त्री युक्त होवो आणि ही स्त्री धर्माचरणांत सुरक्षित राहो. [३६]

यो अनिध्मो दीदयदप्स्व१न्तर्यं विप्रास ईडते अध्वरेषु ।
अपां नपान्मधुमतीरपो दा याभिरिन्द्रो वावृधे वीर्यावान् ॥ ३७ ॥
इदमहं रुशन्तं ग्राभं तनूदूषिमपोहामि । यो भद्रो रोचनस्तमुदचामि ॥ ३८ ॥
आस्यै ब्राह्मणाः स्नपनीर्हरन्त्ववीरघ्नीरुदजन्त्वापः
अर्यम्णो अग्निं पर्येतु पूषन्प्रतीक्षन्ते श्वशुरो देवरश्च ॥ ३९ ॥
शं ते हिरण्यं शमु सन्त्वापः शं मेथिर्भवतु शं युगस्य तर्द्म ।
शं त आपः शतपवित्रा भवन्तु शमु पत्या तन्वं१ सं स्पृशस्व ॥ ४० ॥
खे रथस्य खेऽनसः खे युगस्य शतक्रतो । अपालामिन्द्र त्रिष्पूत्वाकृणोः सूर्यत्वचम् ॥ ४१ ॥

अर्थ– (यः अप्सु अन्तः अनिध्मः दीदयत्) जें पाण्यामध्यें इंधनाशिवाय चमकतें (यं विप्रासः अध्वरेषु ईडते) ज्याची ज्ञानी लोक यज्ञांत स्तुति करतात, हे (अपां॰ न-पात्! मधुमतीः अपः दाः) पाण्याला न पडूं देणाऱ्या देवा! तसें मधुर जल आम्हांला दे, (याभिः वीर्यवान् इन्द्रः वावृधे) ज्याच्यामुळें वीर्यवान् इंद्र वृद्धि पावतो. [३७]

(इदं अहं तनूदूषिं रुशन्तं ग्राभं आपोहामि) शरीरांत रोग उत्पन्न करणाऱ्या विनाशक रोगाला मी यानें दूर करतों. (यः भद्रः रोचनः तं उदचामि) आणि जो कल्याणकारक तेजस्वी आहे, त्याला मीं माझ्याजवळ आणतों. [३८]

(ब्राह्मणाः अस्यै स्नपनीः आपः आहरन्तु) ब्राह्मण तिच्यासाठीं स्नानाचें पाणी घेऊन येवोत. (अवीरघ्नीः आपः उदजन्तु) वीरांचा नाश न करणारें जल ते घेऊन येवोत. (अर्यम्णः अग्निं पर्येतु) तिनें अर्यमा आणि अग्नीला प्रदक्षिणा करावी. हे (पूषन्) पूषा! (श्वशुरः देवरः च प्रतीक्षन्ते) सासरा आणि दीर तिची वाट पाहोत. [३९]

(ते हिरण्यं शं) तुला सुवर्ण कल्याणकारक होवो, (उ आपः शं सन्तु) आणि पाणीसुद्धां सुखकारक होवो. (मेथिः शं भवतु) गाई ज्या खुराला बांधतात तो तिला कल्याणकारी होवो! (युगस्य तर्द्म शं) तसेंच युगाचें छिद्र सुखकारक होवो. (ते शतपवित्राः आपः शं भवन्तु) तुला, शंभर प्रकारचें पवित्र करणारें पाणी सुखदायी होवो. (पत्या तन्वं शं सं स्पृशस्व) पतीच्या शरीराला तुझ्या शरीराचा स्पर्श सुखकारक रीतीनें कर. [४०]

हे (शतक्रतो इन्द्र) शेंकडों कर्मे करणाऱ्या इंद्रा! (रथस्य खे) रथाच्या छिद्रांत (अनसः खे) गाड्याच्या छिद्रांत आणि (युगस्य खे) युगाच्या छिद्रांत (अपलां त्रिः पूत्वा) अयोग्य रीतीनें पोषण पावलेल्या आणि वाढलेल्या युवतीस तीन वेळां पवित्र करून (सूर्य-त्वचं अकृणोः) सूर्यासारख्या तेजस्वी त्वचेची कर. [४१]

भावार्थ— पाण्यामध्यें इंधनाशिवाय चमकणारे तेज आहे, यज्ञामध्यें ब्राह्मणाचें ज्ञानरूपी तेज आहे. पाण्यांत मधुरता आहे आणि वीर्यहि आहे. हें तेज, ज्ञान, माधुर्य आणि वीर्य यांनीं युक्त हा गृहस्थ होवो. [३७]

शरीरांत रोग उत्पन्न करणाऱ्या रोगबीजांस दूर केलें पाहिजे आणि ज्यानें शरीर निरोगी, आनंदमय आणि प्रसन्न राहील त्या गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे. [३८]

पाणी स्नानालायोग्य आहे कीं नाहीं, हें जल भित्रेपणाचा नाश करून बल वाढवितें कीं नाहीं, असें मार्गदर्शन ब्राह्मणांनीं केलें पाहिजे. वधूवरांनीं श्रेष्ठ मनानें अग्नि प्रदक्षिणा करावी. पतिगृहीं सासरा आणि दीर श्रेष्ठ गुणाच्या वधूची प्रतीक्षा करोत. [३९]

सोनें, पाणी, गायी बांधण्याचा खुंटा, युगाचे भाग इत्यादि सर्व कुटुंबाचें कल्याण करणारे होवोत. पाणी तर शंभर प्रकारांनीं पवित्र करणारें आहे. गृहस्थाश्रमांत धर्मपत्नी पतिसह एक मनाची होऊन राहो. [४०]

गृहस्थ आणि त्याची धर्मपत्नी हीं दोघें तीन प्रकारें प्रभूच्या कृपेनें पवित्रता साध्य करोत, आणि सूर्यासारखे तेजस्वी होऊन येथें विराजोत. [४१]

आशासाना सौमनसं प्रजां सौभाग्यं रयिम् । पत्युरनुव्रता भूत्वा सं नह्यस्वामृताय कम् ॥ ४२ ॥
यथा सिन्धुर्नदीनां साम्राज्यं सुषुवे वृषा । एवा त्वं सम्राज्ञ्येधि पत्युरस्तं परेत्य ॥ ४३ ॥
सम्राज्ञ्येधि श्वशुरेषु सम्राज्ञ्युत देवृषु । ननान्दुः सम्राज्ञ्येधि सम्राज्ञ्युत श्वश्र्वाः ॥ ४४ ॥
या अकृन्तन्नवयन्याश्च तत्निरे या देवीरन्ताँ अभितोऽददन्त ।
तास्त्वा जरसे सं व्ययन्त्वायुष्मतीदं परि धत्स्व वासः ॥ ४५ ॥
जीवं रुदन्ति वि नयन्त्यध्वरं दीर्घामनु प्रसितिं दीध्युर्नरः ।
वामं पितृभ्यो य इदं समीरिरे मयः पतिभ्यो जनये परिष्वजे ॥ ४६ ॥

अर्थ— (सौमनसं प्रजां सौभाग्यं रयिं आशासाना) उत्तम मन, संतति, सौभाग्य आणि धनाची आशा करणारी तूं (पत्युः अनुव्रता भूत्वा) पतीला अनुकूल असें आचरण करणारी होऊन (अमृताय कं सं नह्यस्व) अमरत्वासाठीं सुखपूर्ण रीतीनें तयार हो. [४२]

(यथा वृषा सिंधुः) ज्याप्रमाणें बलशाली समुद्र (नदीनां साम्राज्यं सुषुवे) नद्यांवर साम्राज्य चालवतो, (एव त्वं पत्युः अस्तं परेत्य) त्याप्रमाणें तूं पतीच्या घरीं पोंचून (सम्राज्ञी एधि) सम्राज्ञी होऊन रहा. [४३]

(श्वशुरेषु सम्राज्ञी एधि) सासऱ्यांमध्यें सम्राज्ञीप्रमाणें रहा. (उत देवृषु सम्राज्ञी) दीरामध्यें महाराज्ञी-प्रमाणें आदरानें रहा. (ननान्दुः सम्राज्ञी एधि) नणंदामध्येंहि सम्राज्ञीप्रमाणें रहा आणि (उत श्वश्र्वाः सम्राज्ञी) सासुकडूनही सम्राज्ञीप्रमाणें आदर प्राप्त कर. [४४]

(याः देवीः अकृन्तन्) ज्या देवींनी स्वतः कातलेलें सूत आहे, (याः च अवयन्) ज्यांनीं विणलें आहे, (याः च तत्निरे) ज्यांनीं ताणा भरला आहे, (याः च अभितः अन्तान् अददन्त) आणि ज्यांनीं चारी बाजूंनीं दशांना पीळ भरून गांठी देऊन पदर सारखे केले आहेत, (ताः त्वा जरसे सं व्ययन्तु) त्या तूं वृद्धावस्थेप्रत पोहों-चलीस तरी तुझ्यासाठीं कपडे विणोत. तूं (आयुष्मती इदं वासः परिधत्स्व) दीर्घायु होऊन तीं वस्त्रें धारण कर. [४५]

(जीवं रुदन्ति) जीवित मनुष्याला निरोप देतांना मनुष्यें रडतात, (अध्वरं विनयन्ति) यज्ञाला बरोबर घेऊन जातात, (नरः दीर्घां प्रसितिं अनु दीध्युः) मनुष्यें दीर्घ मार्गाचा विचार करतात. (यं पितृभ्यः इदं वामं समीरिरे) जे लोक स्वतःच्या मातापित्यासाठीं हें सुंदर कार्य करतात, (पतिभ्यः मयः जनये परिष्वजे) त्या स्त्रिचें आलिंगन पतीला सुखकारक होतें. [४६]

भावार्थ— गृहस्थाच्या घरांत उत्तम मनानें युक्त, संतान, सौभाग्य आणि धनाची इच्छा करणारी, पतीला अनुकूल कर्मे करणारी, गृहपत्नी अमरत्वप्राप्तीचा श्रेष्ठ, सुखदायक मार्ग आचरो. [४२]

ज्याप्रमाणें महासागर नद्यांचा सम्राट आहे, त्याप्रमाणें पतीच्या घरीं पोंचून ही वधू स्वतःच्या पतीची सम्राज्ञी होऊन सर्व व्यवहार करो. [४३]

सासरा, दीर, नणंदा आणि सासु या सर्वांची राणी होऊन वाग आणि सर्वांना सुख दे. [४४]

घरांत देवींनीं सूते काढावें, ताणे भरावे, कापड विणावें आणि कापडाच्या शेवटांना, दशांना पीळ भरून गांठी देऊन कांठ व पदर सारखे करावेत. वृद्धावस्थेपर्यंत कामीं येईल असें उत्तम कापड विणावें. स्त्री दीर्घायु होऊन हें कापड वापरो. [४५]

निरोपाचे वेळीं माणसें रडतात. परंतु कन्या जी पितृकुलाचा त्याग करून जाते ती पतिघरीं गृहयज्ञ करण्यासाठीं जाते; म्हणून गृहस्थाश्रमाच्या या दीर्घमार्गाचा विचार करून लोकांनीं शोक करूं नये. पितृगृहीं तर हा दिवस सुखाचा आणि आनंदाचा आहे, कारण कीं या प्रसंगीं वधू यज्ञाचा प्रारंभ करणार आहे. ही वधू पतीला सुख देवो आणि पतिसुद्धां तिला आलिंगन देऊन सुखी करो. परस्पर एक दुसऱ्यास सुखी करण्यासाठींच गृहस्थाश्रमाचा यज्ञ आहे. [४६]

स्योनं ध्रुवं प्रजायै धारयामि तेऽश्मानं देव्याः पृथिव्या उपस्थे ।
तमा तिष्ठानुमाद्या सुवर्चा दीर्घं त आयुः सविता कृणोतु ॥ ४७ ॥
येनाग्निरस्या भूम्या हस्तं जग्राह दक्षिणम् ।
तेन गृह्णामि ते हस्तं मा व्यथिष्ठा मया सह प्रजया च धनेन च ॥ ४८ ॥
देवस्ते सविता हस्तं गृह्णातु सोमो राजा सुप्रजसं कृणोतु ।
अग्निः सुभगां जातवेदाः पत्ये पत्नीं जरदष्टिं कृणोतु ॥ ४९ ॥
गृह्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथासः ।
भगो अर्यमा सविता पुरंधिर्मह्यं त्वादुर्गार्हपत्याय देवाः ॥ ५० ॥
भगस्ते हस्तमग्रहीत्सविता हस्तमग्रहीत् । पत्नी त्वमसि धर्मणाऽहं गृहपतिस्तव ॥ ५१ ॥

अर्थ— (देव्याः पृथिव्याः उपस्थे) पृथ्वी देवीजवळ (ते प्रजायै स्योनं ध्रुवं अश्मानं धारयामि) तुझ्या संततीसाठीं दगडाप्रमाणें स्थिर आणि सुखदायक आधार तयार करतों, (तं आतिष्ठ) त्याच्यावर उभी रहा, (अनुमाद्याः) आनंदित हो. (सुवर्चाः) उत्तम तेजानें युक्त हो, आणि (सविता ते आयुः दीर्घं कृणोतु) सूर्य तुला दीर्घायु करो [४७]

(येन अग्निः) ज्याप्रमाणें या अग्नीनें (अस्याः भूम्याः दक्षिणं हस्तं जग्राह) या भूमीचा उजवा हात धरला (तेन ते हस्तं गृह्णामि) त्या उद्देशानेंच तुझा हात मी धरतों. (मा व्यथिष्ठाः) जराहि दुःखी होऊं नकोस, (मया सह प्रजया च धनेन च) माझ्यासह प्रजा आणि धनासहित तूं रहा. [४८]

(सविता देवः ते हस्तं गृह्णातु) सवितादेव तुझा हात ग्रहण करो, (राजा सोमः सुप्रजसं कृणोतु) राजा सोम तुला उत्तम संततीनें युक्त करो, (जातवेदः अग्निः पत्ये सुभगां पत्नीं जरदष्टिं कृणोतु) जातवेद अग्नि या पतिसाठीं त्याची स्त्री वृद्धावस्थेपर्यंत जीवंत राहील असें करो. [४९]

(ते हस्तं सौभगत्वाय गृह्णामि) माझें आणि तुझें सौभाग्य वाढावें म्हणून मीं तुझा हस्त ग्रहण करतों. (यथा मया पत्या जरदष्टिः असः) तूं माझ्यासह वृद्धावस्थेपर्यंत जीवंत रहा. भग, अर्यमा, सविता, पुरंधि आणि सर्व देवांनीं (त्वा मह्यं गार्हपत्याय अदुः) तुला गृहस्थाश्रम चालविण्यासाठीं माझ्या हातीं दिली आहे. [५०]

(भगः ते हस्तं अग्रहीत्) भगानें तुझा हात धरला आहे, (सविता हस्तं अग्रहीत्) सूर्यानें हात स्वीकारला आहे. (त्वं धर्मणा पत्नी असि) तूं धर्मानें माझी पत्नी झाली आहेस (अहं तव गृहपतिः) मीं तुझा गृहपति आहे. [५१]

भावार्थ— या भूमीवर तुझी संतति सुखानें दीर्घकाल राहो. त्यासाठीं हा दगडाचा आधार केला आहे. त्यावर चढून उभी रहा आणि आनंदित आणि तेजस्वी हो. याप्रमाणें गृहस्थाश्रमांत सुदृढ राहिल्यानें तुझें जीवन दीर्घ होईल. [४७]

जसा भूमि आणि अग्नीचा संबंध आहे, तशा संबंधासाठीं मीं या वधूचें पाणिग्रहण करतों. वधूला कोणत्याहि प्रकारें दुःख न होवो. वधू मजबरोबर प्रजा, धन आणि ऐश्वर्य यांनीं युक्त होऊन राहो. [४८]

सूर्यासारखा तेजस्वी होऊन पति स्त्रीचें पाणिग्रहण करो. आणि चंद्राप्रमाणें कलायुक्त होऊन धर्मपत्नीचें ठायीं संतान उत्पन्न करो. पति-पत्नी आनंदानें परस्पर सहकार्यानें या संसारांत वृद्धावस्थेपर्यंत राहोत. [४९]

हे स्त्रिये ! मीं-पति सौभाग्यप्राप्तिसाठीं तुझें पाणिग्रहण करतों. माझ्यासह-जो मीं तुझा पति आहे- त्यासह वृद्धावस्थेपर्यंत रहा. सर्व देवांनीं गृहस्थाश्रम चालविण्यासाठीं तुला माझ्या हातांत दिली आहे. [५०]

भगाप्रमाणें धनवान् होऊन, सूर्याप्रमाणें समर्थ आणि तेजस्वी होऊन, मीं तुझें पाणिग्रहण करीत आहे. आतां धर्ममार्गानें तूं माझी धर्मपत्नी झाली आहेस आणि मीं तुझा गृहपति आहे. [५१]

*

ममेयमस्तु पोष्या मह्यं त्वादाद्बृहस्पतिः । मया पत्या प्रजावति सं जीव शरदः शतम् ॥ ५२ ॥
त्वष्टा वासो व्यदधाच्छुभे कं बृहस्पतेः प्रशिषा कवीनाम् ।
तेनेमां नारीं सविता भगश्च सूर्यामिव परि धत्तां प्रजया ॥ ५३ ॥
इन्द्राग्नी द्यावापृथिवी मातरिश्वा मित्रावरुणा भगो अश्विनोभा ।
बृहस्पतिर्मरुतो ब्रह्म सोम इमां नारीं प्रजया वर्धयन्तु ॥ ५४ ॥
बृहस्पतिः प्रथमः सूर्यायाः शीर्षे केशाँ अकल्पयत् ।
तेनेमामश्विना नारीं पत्ये सं शोभयामसि ॥ ५५ ॥
इदं तद्रूपं यदवस्त योषा जायां जिज्ञासे मनसा चरन्तीम् ।
तामन्वर्तिष्ये सखिभिर्नवग्वैः क इमान्विद्वान्वि चचर्त पाशान् ॥ ५६ ॥

अर्थ— (इयं मम पोष्या अस्तु) मीं या स्त्रिचा पोषणकर्ता व्हावें. (बृहस्पतिः त्वा मह्यं अदात्) बृहस्पतीनें तुला मला दिली आहे. हे (प्रजावति) संतानयुक्त स्त्रिये ! (मया पत्या शरदः शतं संजीव) मीं-जो तुझा पति आहें, त्यासह शंभर वर्षें सुखानें जिवंत रहा. [५२]

(त्वष्टा वासः) त्वष्ट्यानें वस्त्र (शुभे कं) कल्याण आणि सुखासाठीं (बृहस्पतेः कवीनां प्रशिषा) बृहस्पति आणि कवींच्या आशीर्वादासह (व्यदधात्) तयार केलें आहे. (तेन इमां नारीं) त्यानें या स्त्रिला (सविता भगः सूर्यां इव) सविता आणि भग यांनीं सूर्यकन्येला ज्याप्रमाणें नेसविलें त्याप्रमाणें (प्रजया परिधत्तां) संतानयुक्त करावें. [५३]

(इन्द्राग्नी) इंद्र आणि अग्नि, (द्यावापृथिवी) द्युलोक आणि भूमि, (मातरिश्वा) वायु, (मित्रावरुणौ भगः) मित्र, वरुण आणि भग (उभौ अश्विनौ) दोघे अश्विनकुमार, बृहस्पति, मरुत्, ब्रह्म, सोम, हे सर्व (इमां नारीं प्रजया वर्धयन्तु) या स्त्रिची प्रजेसह अभिवृद्धि करोत. [५४]

(बृहस्पतिः प्रथमः) बृहस्पतीनें सर्वांच्या आधीं (सूर्यायाः शीर्षे केशान् अकल्पयत्) उषेच्या मस्तकावर केंस वाढविले, (तेन) त्यांनीं (अश्विनौ) दोघे अश्विनीकुमार (इमां नारीं पत्ये सं शोभयामसि) या स्त्रिला पतीसाठीं सुशोभित करोत. [५५]

(यत् योषा अवस्त, तत् रूपं इदं) स्त्रिनें जें वस्त्र धारण केलें आहे तेंच तिचें रूप आहे. (मनसा चरन्तीं जायां जिज्ञासे) मनानें भ्रमण करणाऱ्या चंचल स्त्रीस मीं जाणतों. (नवग्वैः सखिभिः तां अन्वर्तिष्ये) यज्ञासाठीं मित्रांसह मीसुद्धां त्यांचें अनुकरण करतों (कः विद्वान् इमान् पाशान् वि चचर्त) कोणता ज्ञानी या पाशांस तोडूं शकला आहे ? [५६]

भावार्थ—ही धर्मपत्नी मज-पती-कडून पोषण मिळवण्यास योग्य आहे. परमेश्वरानें तिला माझ्या हातीं सोंपवली आहे. येथें ती संततीनें युक्त होऊन माझ्यासह शंभर वर्षें जीवंत राहो. [५२]

तिच्यासाठीं कारागीरानें हें वस्त्र तयार केलें आहे, ज्ञानी ब्राह्मणांनीं तिला आशीर्वाद दिला आहे. ही धर्मपत्नी तें वस्त्र नेसो, आणि ईश्वरी कृपेनें उत्तम संततीनें युक्त होवो. [५३]

इंद्र, अग्नि इत्यादि सर्व दैवीशक्ति या स्त्रिची संतानासह अभिवृद्धि करोत. [५४]

कन्येच्या मस्तकावर सुंदर केंस असावेत आणि ते पतिप्राप्तिसाठीं सुंदर प्रकारें सजवावेत. [५५]

उत्तम वस्त्रें परिधान केल्यानें स्त्रिचें जें शोभिवंतरूप दिसतें. तेंच पहाण्यासारखें असतें. मनाची चालचलणूक कशी आहे हें मुख्यत्वें स्त्रिच्या बाबतींत पाहिलें पाहिजे. पतीनें पत्नीला धर्मकार्यांत नेहमीं सहभागी करावें. विषयपाशांस कोण विद्वान् तोडूं शकतो बरें ? [५६]

अहं वि ष्यामि मयि रूपमस्या वेदुदित्पश्यन्मनसः कुलायम् ।
न स्तेयमद्मि मनसोदमुच्ये स्वयं श्रथ्नानो वरुणस्य पाशान् ॥ ५७ ॥
प्र त्वा मुञ्चामि वरुणस्य पाशाद्येन त्वाबध्नात्सविता सुशेवाः ।
उरुं लोकं सुगमत्र पन्थां कृणोमि तुभ्यं सहपत्न्यै वधु ॥ ५८ ॥
उद्यच्छध्वमप रक्षो हनाथेमां नारीं सुकृते दधात ।
धाता विपश्चित्पतिमस्यै विवेद भगो राजा पुर एतु प्रजानन् ॥ ५९ ॥
भगस्ततक्ष चतुरः पादान्भगस्ततक्ष चत्वार्युष्पलानि ।
त्वष्टा पिपेश मध्यतोऽनु वर्ध्रान्त्सा नो अस्तु सुमङ्गली ॥ ६० ॥

अर्थ— (**अहं वि ष्यामि**) मीं पाश मोकळे करतों. (**अस्याः मयि रूपं**) तिचें रूप माझ्या ठिकाणीं आहे. (**मनसः कुलायं पश्यन् इत् वेदत्**) मनाची तीव्र इच्छा पाहूनच ज्ञान होऊं शकतें. (**न स्तेयं अद्मि**) मीं चोरी करून अन्न खात नाहीं. (**वरुणस्य पाशान् श्रथ्नानः**) मीं स्वतः वरुणाचे पाश शिथिल करतों. (**मनसा उत् अमुच्ये**) आणि मनानें मुक्त होतों. [५७]

हे (**वधु**) स्त्रिये ! (**त्वा वरुणस्य पाशात् प्रमुञ्चामि**) तुला मीं वरुणाच्या पाशापासून मुक्त करतों. (**येन सुशेवाः सविता त्वा अबध्नात्**) ज्या पाशानें सवित्यानें तुला बांधून ठेविलें होतें. (**तुभ्यं सहपत्न्यै**) तुझ्या-पत्नी-साठीं (**अत्र उरुं लोकं सुगं पन्थां कृणोमि**) येथें विस्तृत स्थान आणि जाण्यायेण्यास सुगम असा योग्य मार्ग तयार करतों. [५८]

(**उत् यच्छध्वं**) तुमचीं शस्त्रें वर उचला, (**रक्षः अप हनाथ**) राक्षसांना मारा. (**इमां नारीं सुकृते दधात**) या स्त्रिला पुण्यकर्म करण्याची बुद्धि द्या. (**विपश्चित् धाता अस्यै पतिं विवेद**) ज्ञानी विधात्यानें तिच्या-साठीं पति प्राप्त करून दिला आहे. (**भगः राजा प्रजानन् पुरः एतु**) राजा भग हें जाणून पुढें होवो. [५९]

(**भगः चतुरः पादान् ततक्ष**) जिच्यासाठीं भगानें चार पाय तयार केले, त्यांवर (**भगः चत्वारि उष्पलानि ततक्ष**) भगानें चार कमळें रचिलीं. (**त्वष्टा मध्यतः वर्ध्रान् अनु पिपेश**) त्वष्ट्यानें मध्यें (कमरेभोवतीं) कमरपट्टे तयार केले. (**सा नः सुमंगली अस्तु**) ती स्त्री आम्हांसाठीं उत्तम मंगलकारक होवो. [६०]

भावार्थ— मीं सर्व बंधनें मोकळीं करतों. या माझ्या धर्मपत्नीचें रूप फक्त माझ्यासाठींच आहे. तिच्या मनाची परीक्षा-करूनच मीं हें जाणून घेतलें आहे. जे भोग मीं भोगतों ते स्वकष्टार्जित धनाच्या सहाय्यानें भोगतों. चोरीच्या धनाचा उपभोग मीं घेत नाहीं. वरुणाच्या पाशांना शिथिल करून मीं मानसिक बळानें मुक्त होतों. [५७]

सवित्यानें आता पावेतों ज्या पाशांनीं तुला बांधून ठेवली होती, ते पाश मीं मोकळे करतों. तुझ्यासारख्या सुयोग्य धर्मपत्नी साठीं येथें एक विस्तृत लोक प्राप्त झालेला आहे, आणि उन्नतीचा मार्ग सुगम झाला आहे. [५८]

या धर्मपत्नीस कष्ट देणाऱ्या राक्षसांचा नाश करण्यासाठीं तुम्हीं तुमचीं शस्त्रें नेहमीं सुसज्ज ठेवा. या स्त्रिला नेहमीं पुण्य कार्यां-तच गुंतवून ठेवा. ज्ञानी विधात्याच्या संमतीनें हा पति तिला प्राप्त झाला आहे. राजा भग सुद्धां ही गोष्ट जाणून या विवाहांत पुढें झाला होता. [५९]

भगानें पायांतील चार आभूषणें, शरीरावर धारण करण्याचीं चार फुलें आणि कमरेवर धारण करण्यास योग्य असा कमरपट्टा सुद्धां तयार केला. या सर्व वस्तु धारण करून ही स्त्री मंगलमय होवो. [६०]

सुकिंशुकं वहतुं विश्वरूपं हिरण्यवर्णं सुवृतं सुचक्रम् ।
आ रोह सूर्ये अमृतस्य लोकं स्योनं पतिभ्यो वहतुं कृणु त्वम् ॥ ६१ ॥
अभ्रातृघ्नीं वरुणापशुघ्नीं बृहस्पते । इन्द्रापतिघ्नीं पुत्रिणीमास्मभ्यं सवितर्वह ॥ ६२ ॥
मा हिंसिष्टं कुमार्यं स्थूणे देवकृते पथि। शालाया देव्या द्वारं स्योनं कृण्मो वधूपथम् ॥ ६३ ॥
ब्रह्मापरं युज्यतां ब्रह्म पूर्वं ब्रह्मान्ततो मध्यतो ब्रह्म सर्वतः ।
अनाव्याधां देवपुरां प्रपद्य शिवा स्योना पतिलोके वि राज ॥ ६४ ॥

[२]

तुभ्यमग्रे पर्यवहन्त्सूर्यां वहतुना सह । स नः पतिभ्यो जायां दा अग्ने प्रजया सह ॥ १ ॥

अर्थ— हे (सूर्ये) उषे ! (सुकिंशुकं विश्वरूपं हिरण्यवर्णं सुवृतं सुचक्रं वहतुं आरोह) उत्तम, पुष्पांनीं युक्त, अनेक रूपांचा, सोन्याप्रमाणें चमकणारा, उत्तम वेष्टनांनीं युक्त, उत्तम चक्रांनीं युक्त अशा या रथावर बैस (अमृतस्य लोकं आरोह) अमर लोकावर चढ. (त्वं वहतुं पतिभ्यः स्योनं कृणु) तूं हा लग्नासाठीं दिलेला हुंडा अथवा रथ पतिसाठीं सुखकारक कर. [६१]

हे (वरुण बृहस्पते इन्द्र सवितः) देव हो ! (अभ्रातृघ्नीं) ही वधू भावांचा वध न करणारी, (अपशुघ्नीं, अपतिघ्नीं, पुत्रिणीं अस्मभ्यं वह) पशूंचा वध न करणारी, पतीचा घात न करणारी आणि पुत्र उत्पन्न करणारी अशी आम्हांसाठीं प्राप्त होवो. [६२]

हे (स्थूणे) दोन्ही खांब हो ! (देवकृते पथि) देवांनीं तयार केलेल्या रस्त्यावर (कुमार्यं मा हिंसिष्टं) या कुमारीची हिंसा करूं नका. (देव्याः शालायाः द्वारं वधूपथं स्योनं कृण्मः) घररूपी देवतेच्या दारीं वधूचा येण्याचा मार्ग आम्हीं सुखमय करीत आहोंत. [६३]

(अपरं पूर्वं अन्ततः मध्यतः सर्वतः ब्रह्म युज्यतां) मागें पुढें, अंतीं, मध्यें म्हणजेच सर्वत्र ब्रह्म अर्थात् ईश्वर-प्रार्थनेच्या मंत्रांचा प्रयोग करत रहा. हे वधू ! तूं (अनाव्याधां देवपुरां प्रपद्य) व्याधिरहित देवनगरीस प्राप्त हो. (पति-लोके शिवा स्योना वि राज) तुझ्या पतीच्या घरीं कल्याणकारी आणि सुख देणारी होऊन प्रकाशित हो. [६४]

[१] हे अग्नि ! (अग्ने तुभ्यं) सुरवातीस तुझ्यासाठीं (वहतुना सह सूर्यां पर्यवहत्) हुंड्यासह उषेला घेऊन जात होते. (सः) असा तूं (नः पतिभ्यः) आम्हां सर्व पतींना (प्रजया सह जायां दाः) संतानसहीत पत्नीचें दान कर. [१]

भावार्थ— ही वधू उत्तम फुलांनीं युक्त, सुंदर, सोन्याच्या नक्षीकामानें युक्त, सुशोभित, उत्तम चाकें असलेल्या या रथावर आरूढ होऊन अमरपदाच्या मार्गाचें आक्रमण करो. या धर्मपत्नीचा विवाह पतीच्या घरच्या लोकांस मंगल सुखकारक होवो. [६१]

ही स्त्री पतीच्या घरीं पतीचे भाऊ, आप्तेष्ट, पशु वगैरेंना सुख देवो. पुत्रांस जन्म देवो आणि सर्वांचा आनंद वृद्धीस नेणारी होवो. [६२]

ही वधू देवांच्या मार्गानें जात आहे, म्हणून तिला कोणत्याहि प्रकारचे कष्ट न होवोत. तिच्या पतीच्या घराकडे जाणारा मार्ग आणि पतीच्या घराचें द्वार तिला सुखदायक होवो. [६३]

या वधूच्या सर्व बाजूंस ज्ञान आणि ईश्वरप्रार्थनेचें वायुमंडल असावें. जेथें व्याधि नाहींत अशा पतीच्या घररूपी देवनगरीला ही वधू प्राप्त होवो. पतीच्या घरीं सुखानें आणि कल्याणानें युक्त होऊन ती विराजो. [६४]

हुंड्याच्या वस्तु पतीच्या घरीं पाठवण्यापूर्वी कन्येनें अग्नि उपासना करावी, म्हणजे त्या कन्येला पतीच्या घरीं उत्तम सुख आणि संतान प्राप्त होतें. [१]

पुनः पत्नीमग्निरदादायुषा सह वर्चसा । दीर्घायुरस्या यः पतिर्जीवाति शरदः शतम् ॥ २ ॥
सोमस्य जाया प्रथमं गन्धर्वस्तेऽपरः पतिः । तृतीयो अग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः ॥ ३ ॥
सोमो ददद्गन्धर्वाय गन्धर्वो ददद्ग्नये । रयिं च पुत्रांश्चादादग्निर्मह्यमथो इमाम् ॥ ४ ॥
आ वामगन्त्सुमतिर्वाजिनीवसू न्यश्विना हृत्सु कामा अरंसत ।
अभूतं गोपा मिथुना शुभस्पती प्रिया अर्यम्णो दुर्यां अशीमहि ॥ ५ ॥
सा मन्दसाना मनसा शिवेन रयिं धेहि सर्ववीरं वचस्यम् ।
सुगं तीर्थं सुप्रपाणं शुभस्पती स्थाणुं पथिष्ठामप दुर्मतिं हतम् ॥ ६ ॥

अर्थ— (आयुषा वर्चसा सह) दीर्घायुष्य आणि तेजासह (अग्निः पत्नीं पुनः अदात्) अग्नीनें पत्नीचें पुनः दान केलें. (अस्याः यः पतिः) तिचा जो पति आहे तो (दीर्घायुः शरदः शतं जीवाति) दीर्घायु होऊन शंभर वर्षे जीवंत राहो. [२]

(प्रथमं सोमस्य जाया) सर्वांत प्रथम सोमाची पत्नी आहे. (ते अपरः पतिः गंधर्वः) तुझा दुसरा पति गंधर्व आहे. (तृतीयः पतिः अग्निः) तुझा तिसरा पति अग्नि आहे आणि (ते तुरीयः मनुष्यजाः) तुझा चवथा पति मानव होय. [३]

जिला (सोमः गंधर्वाय ददत्) सोमानें गंधर्वाला दिली, (गंधर्वः अग्नये ददत्) गन्धर्वानें अग्निला दिली, (अथो इमां) आणि ही कन्या (रयिं च पुत्रान् च अग्निः मह्यं अदात्) धन आणि पुत्रांसह अग्नीनें मला दिली. [४]

(वां सुमतिः आगन्) तुम्हां दोघांस चांगली बुद्धि प्राप्त झाली आहे. हे (वाजिनी-वसू अश्विनौ) बळ आणि धनयुक्त अश्विदेव हो ! (कामाः हृत्सु नि अरंसत) आमच्या शुभेच्छा हृदयांत स्थिर झाल्या आहेत. हे (शुभस्पती) शुभपालक हो ! (मिथुना गोपा अभूतं) तुम्हीं दोघे इंद्रियांचे पालक व्हा. (अर्यम्णः प्रियाः दुर्यान् अशीमहि) आर्य मनानें युक्त आम्हीं श्रेष्ठ देवांना प्रिय होऊन उत्तम घरांना प्राप्त करावें. [५]

(सा मन्दसाना) आनंदित राहणारी ही स्त्री (शिवेन मनसा) शुभ भावनायुक्त मनानें (सर्ववीरं वचस्यं रयिं धेहि) सर्व वीरांनीं युक्त प्रशंसनीय धन धारण करो. हे (शुभस्पती) शुभपालक हो ! आम्हांसाठीं (तीर्थं सुगं) तरण्याचें स्थान सुगम आणि सोपें होवो. (सुप्रपाणं) उत्तम पाणी पीण्याचें स्थान असावें आणि (पथिष्ठां स्थाणुं) रस्त्यांत अडचण करणाऱ्या खांबाप्रमाणें (दुर्मतिं) दुष्ट बुद्धीच्या शत्रूंना (हतं) मारून दूर करा. [६]

भावार्थ— अग्नीची उपासना केल्यानें म्हणजे यजन अथवा हवन केल्यानें दीर्घ आयुष्य आणि शारीरिक कान्ति प्राप्त होते. कन्येचा पति सुद्धां अशा हवनानें दीर्घजीवी म्हणजे शतायु होऊं शकतो. [२]

सोम, गंधर्व, अग्नि हे लहानपणीं कन्येचे तीन पति (रक्षण करणारे) समजले जातात; आणि त्यानंतर त्या कन्येचा विवाह मनुष्यपतीशीं होतो. [३]

सोम गंधर्वाला देतो, गंधर्व अग्नीच्या हातीं सोंपवतो, आणि अग्नि पुत्रोत्पादनाच्या शक्तिसह मनुष्याच्या स्वाधीन या कन्येला करतो. [४]

मंत्रोक्त देवांच्या आधिपत्याखालीं असतांना कन्येला उत्तम बुद्धि प्राप्त होते. त्यानंतर तिच्या हृदयांत कामाला स्थान मिळतें. त्यावेळीं अश्विनीकुमार या वधूवरांचे रक्षक असतात. अशावेळीं सुविचारानें युक्त मन करून स्वतःच्या घरांतच त्यांनीं वास्तव्य करावें हें योग्य होय. [५]

स्वतःच्या पतीच्या घरांत आनंदानें रहाणारी धर्मपत्नी स्वतःच्या मनांत शुभसंकल्प धारण करो आणि वीरभावयुक्त संतान आणि प्रशंसनीय धनाची स्वामिनी होवो. या दंपत्याचा मार्ग सरळ, सुगम होवो. त्यांना अन्नधान्यादि भरपूर मिळो आणि त्यांचा उन्नतीचा मार्ग निष्कंटक होवो. दुष्ट बुद्धि त्यांच्यापासून दूर जावो. [६]

या ओषधयो या नद्यो३ यानि क्षेत्राणि या वना । तास्त्वा वधु प्रजावतीं पत्ये रक्षन्तु रक्षसः ॥७॥
एमं पन्थामरुक्षाम सुगं स्वस्तिवाहनम् । यस्मिन्वीरो न रिष्यत्यन्येषां विन्दते वसु ॥ ८ ॥
इदं सु मे नरः शृणुत ययाशिषा दंपती वाममश्नुतः ।
ये गन्धर्वा अप्सरसश्च देवीरेषु वानस्पत्येषु येऽधि तस्थुः ।
स्योनास्ते अस्यै वध्वै भवन्तु मा हिंसिषुर्वहतुमुह्यमानम् ॥ ९ ॥
ये वध्वश्चन्द्रं वहतुं यक्ष्मा यन्ति जनाँ अनु । पुनस्तान्यज्ञिया देवा नयन्तु यत आगताः ॥ १० ॥
मा विदन्परिपन्थिनो य आसीदन्ति दंपती । सुगेन दुर्गमतीतामप द्रान्त्वरातयः ॥ ११ ॥

अर्थ— हे वधू ! (याः ओषधयः) ज्या औषधि, (याः नद्यः) ज्या नद्या, (यानि क्षेत्राणि) जीं जीं क्षेत्रें आणि (या वना) जीं जंगलें आहेत (ताः) ते सर्व पदार्थ (पत्ये प्रजावतीं त्वा) पतीसाठीं संतानयुक्त तुला (रक्षसः रक्षन्तु) राक्षसांपासून सुरक्षित ठेवोत. [७]

(इमं पन्थां आरुक्षाम) या मार्गानें जाऊं. हा (सुगं स्वस्तिवाहनं) सुगम आणि वाहनासाठीं सुद्धां सुखकारक आहे. (यस्मिन् वीरः न रिष्यति) ज्यांत वीरांचा नाश होत नाहीं आणि (अन्येषां वसु विन्दते) इतरांपेक्षां येथें धन अधिक मिळतें. [८]

हे (नरः) मनुष्य हो ! (मे इदं शुश्रृणुतं) माझें हें भाषण ऐका. (यया आशिषा) ज्या आशीर्वादानें (दम्पती वामं अश्नुतः) या वर आणि वधूस सुख प्राप्त होतें. (एषु वानस्पत्येषु) या वनांत (ये गंधर्वाः देवीः अप्सरसः अधितस्थुः) जे गंधर्व आणि अप्सरा राहिल्या आहेत, (ते अस्यै वध्वै स्योना भवन्तु) ते या वधूला सुखकारक होवोत आणि (उह्यमानं वहतुं मा हिंसिषुः) हुंडा घेऊन जाणाऱ्यांच्या या रथाचा नाश न करोत. [९]

(ये यक्ष्माः जनान् अनु) जे रोग मनुष्यांच्या संबंधामुळेंच (वध्वः चंद्रं वहतुं यन्ति) वधूच्या तेजस्वी हुंड्याच्या रथापाशीं पोहोंचतात, (तान् आगताः यज्ञियाः देवाः) त्यांना येथें आलेले यज्ञाचे देव (पुनः यतः आगताः नयन्तु) जेथून ते रोग आले तेथें पूर्व जागीं-त्यांस नेवोत. [१०]

(ये परिपन्थिनः आसीदन्ति) जे लुटारू, दरवडेखोर जवळ रहात असतील ते (दम्पती मा विदन्) या पति-पत्नींना न जाणोत. हीं वधूवरें (सुगेन दुर्गं अतीतां) सुगमतेनें कठीण प्रसंगांतून पार पडोत आणि (अरातयः अप द्रान्तु) शत्रु दूर जावोत. [११]

भावार्थ— औषधि, नद्या, शेतें, स्थानें, वनें वगैरे सर्व ठिकाणीं संतानयुक्त आणि पतीच्या घरीं जाणाऱ्या या स्त्रीचें रक्षण होवो; म्हणजे कोणी राक्षस तिला दुःख न देवो. [७]

जे मार्ग सुगम आणि निर्भय आहेत त्यांवरूनच तुम्हीं पुढें जावें. तुम्हीं ज्या मार्गावर उत्तम निवासस्थानें मिळतील त्याच मार्गानें जावें [८]

हे विवाहित स्त्री पुरुष या संसारांत सुखानें राहोत ही घोषणा सर्व लोक ऐकोत. जंगलांत रहाणारे अथवा शहरवासी कोणी त्यांना दुःख न देवोत. ते जर दुसऱ्या गांवास जावयास निघाले तरी सुद्धां त्यांना कोणतेंही दुःख न होवो. [९]

जनसमुदायांत जाण्यामुळें जे रोग संसर्गामुळें होतात, आणि वधूच्या मार्गांत जे रोग होण्याचा संभव आहे ते सर्व रोग दूर होवोत. [१०]

रस्त्यांत जे लुटारू असतील त्यांच्याकडून या दंपतीस जराहि त्रास न होवो. पतिपत्नी अवघड प्रसंगांतुन सहजपणें पार पडोत आणि त्यांचे सर्व शत्रु दूर होवोत. [११]

सं काशयामि वहतुं ब्रह्मणा गृहैरघोरेण चक्षुषा मित्रियेण ।
पर्याणद्धं विश्वरूपं यदस्ति स्योनं पतिभ्यः सविता तत्कृणोतु ॥ १२ ॥
शिवा नारीयमस्तमागन्निमं धाता लोकमस्यै दिदेश ।
तामर्यमा भगो अश्विनोभा प्रजापतिः प्रजया वर्धयन्तु ॥ १३ ॥
आत्मन्वत्युर्वरा नारीयमागन्तस्यां नरो वपत बीजमस्याम् ।
सा वः प्रजां जनयद्वक्षणाभ्यो बिभ्रती दुग्धमृषभस्य रेतः ॥ १४ ॥
प्रति तिष्ठ विराडसि विष्णुरिवेह सरस्वति । सिनीवालि प्र जायतां भगस्य सुमतावसत् ॥ १५ ॥
उद्व ऊर्मिः शम्या हन्त्वापो योक्त्राणि मुञ्चत । मादुष्कृतौ व्येनसावघ्न्यावशुनमारताम् ॥ १६ ॥

अर्थ— (वहतुं) वधूच्या हुंडयानें युक्त रथाला, (गृहैः ब्रह्मणा अघोरेण मित्रियेण चक्षुषा) सर्व बाजूचे लोक ज्ञानपूर्वक शांत आणि मित्रत्वाच्या नजरेनें पाहोत, अशा रीतीनें मीं (सं काशयामि) त्याला प्रकाशित करतों. यत् विश्वरूपं पर्यानद्धं अस्ति) जो विविध प्रकारें बांधला आहे त्याला (सविता पतिभ्यः स्योनं कृणोतु) ईश्वर पतींसाठीं सुखदायक करो. | १२ |

(इयं शिवा नारी अस्तं आगन) ही कल्याणकारक स्त्री पतीच्या घरीं आली आहे. (धाता अस्यै इमं लोकं दिदेश) ईश्वरानें हा पतिलोकाचा मार्ग तिला दाखविला आहे. (अर्यमा भगः उभा अश्विना प्रजापतिः) हे सर्व देव (तां प्रजया वर्धयन्तु) तिला प्रजेसह वृद्धिंगत करोत. [१३]

(आत्मन्वती ऊर्वरा इयं नारी आगन्) आत्मिक बळानें युक्त तसेंच सुपुत्र उत्पन्न करणारी ही स्त्री पतीच्या घरीं आली आहे. (नरः तस्यां अस्यां बीजं वपत) हे मनुष्य हो ! त्या स्त्रीमध्यें बीज ठेवा, वीर्य स्थापन करा. (सा वः) ती तुम्हांसाठीं (ऋषभस्य दुग्धं रेतः बिभ्रती) वीर्यवान् पुरुषाचें वीर्य धारण करून (वक्षणाभ्यः प्रजां जनयत) स्वतःच्या गर्भाशयांतून संतान उत्पन्न करो. [१४]

हे स्त्रिये ! तूं (प्रति तिष्ठ) येथें प्रतिष्ठा प्राप्त कर. तूं (विराट् असि) विशेष तेजस्वी आहेस, तुझा पति (विष्णुः इव इह) विष्णूप्रमाणें येथें आहे. हे (सरस्वति सिनीवालि) विद्यादेवी आणि अन्नवती देवी ! हिला (प्रजायतां) संतान होवो. आणि ती (भगस्य सुमतौ असत्) भाग्याच्या देवानें दिलेल्या सन्मतींत राहो. [१५]

(वः ऊर्मिः शम्याः उत् हन्तु) तुमची लहर शांतीचा-स्थिरतेचा भंग करो. हे (आपः) जला ! (योक्त्राणि मुञ्चत) युगांना सोड. (अदुष्कृतौ व्येनसौ अघ्न्यौ) दुष्ट कर्म न करणारे, गाड्यापासून मोकळे झालेले दोनहि बैल (अशुनं मा आरतां) अशुभास प्राप्त न होवोत. [१६]

भावार्थ— जेव्हां वरदक्षणा-असलेला, अथवा वधूस पतीचे घरीं नेण्यासाठीं सजविलेला रथ मार्गावरून जाईल तेव्हां दोन्ही बाजूंच्या घरांतील मनुष्यें त्या कन्येकडे प्रेमपूर्ण शुभ आणि मित्रत्वाच्या दृष्टीनें पाहोत. जे विविध रंगरूपाचे पदार्थ आहेत ते सर्व पदार्थ ईश्वरकृपेनें या पतिपत्नींना सुखदायक होवोत. [१२]

ही सुस्वभावी वधू पति घरीं जात आहे, कारण कीं विधात्यानें हें स्थान तिच्यासाठीं निश्चित केलें आहे. सर्व देव तिला उत्तम संतति देवोत. [१३]

ही स्त्री आत्मबलानें युक्त आहे, आणि संतान उत्पन्न करण्याच्या शक्तीनें युक्त आहे, म्हणजे ती वंध्या नाहीं. पति या स्त्रीमध्यें स्वतःचें वीर्य स्थापन करो आणि नंतर ती स्त्री वीर्य धारण करून स्वतःच्या गर्भाशयांतून संतान उत्पन्न करो. [१४]

स्त्री स्वतःच्या पतीच्या घरीं प्रतिष्ठा प्राप्त करो. ती घरची सम्राज्ञी आहे. तिचा पति देव आहे आणि ती देवी आहे. हे पति-पत्नी उत्तम संतति प्राप्त करोत, आणि दोघेहि उत्तम बुद्धिशाली होवोत. [१५]

प्रवासांत जेव्हां शांतीचा भंग होईल, म्हणजे मनाला दुःख होईल तेव्हां वाहनाचे बैल सोडावेत, आणि त्यांना उत्तम सुरक्षित थळी ठेवण्यांत यावें. [१६]

अघोरचक्षुरपतिघ्नी स्योना शग्मा सुशेवा सुयमा गृहेभ्यः।
वीरसूर्देवृकामा सं त्वयैधिषीमहि सुमनस्यमाना ॥ १७ ॥
अदेवृघ्न्यपतिघ्नीहैधि शिवा पशुभ्यः सुयमा सुवर्चाः।
प्रजावती वीरसूर्देवृकामा स्योनेममग्निं गार्हपत्यं सपर्य ॥ १८ ॥
उत्तिष्ठेतः किमिच्छन्तीदमागा अहं त्वेडे अभिभूः स्वाद्गृहात्।
शून्यैषी निर्ऋते याजगन्धोत्तिष्ठाराते प्र पत मेह रंस्थाः ॥ १९ ॥
यदा गार्हपत्यमसपर्यैत्पूर्वमग्निं वधूरियम्। अधा सरस्वत्यै नारि पितृभ्यश्च नमस्कुरु ॥ २० ॥
शर्म वर्मैतदा हरास्यै नार्या उपस्तरे। सिनीवालि प्र जायतां भगस्य सुमतावसत् ॥ २१ ॥

अर्थ— (**गृहेभ्यः**) स्वतःच्या घरासाठीं (**अघोरचक्षुः अपतिघ्नी स्योना**) क्रूर दृष्टि नसलेली, पति द्रोह न करणारी, सुख देणारी, (**शग्मा सुशेवा सुयमा**) कल्याणकारक, सेवा करण्यास योग्य, सुनियमांनीं चालणारी, (**वीरसूः देवृकामा**) वीर पुत्रांस जन्म देणारी, स्वतःचा दीर घरीं असावा अशी इच्छा करणारी, आणि (**सुमनस्यमाना**) उत्तम अंतःकरणानें युक्त (**त्वया एधिषीमहि**) अशा तुझ्यामुळें आम्हीं संपन्न व्हावें. [१७]

(**अदेवृघ्नी अपतिघ्नी**) दीराचा घात न करणारी, पतीचा द्रोह न करणारी, (**पशुभ्यः शिवा**) पशूंचें कल्याण करणारी, (**सुयमा सुवर्चाः**) उत्तम नियमांनीं चालणारी आणि उत्तम तेजानें युक्त, (**प्रजावती वीरसूः**) संतानयुक्त आणि वीरपुत्र प्रसवणारी, (**देवृकामा स्योना**) पतीच्या घरांत दीर राहो असें इच्छिणारी, सुख देणारी, (**इमं गार्हपत्यं अग्निं सपर्य**) तूं या गार्हपत्य अग्नीची पूजा कर. [१८]

हे (**निर्ऋते**) दारिद्र्या ! (**उत् तिष्ठ इतः**) येथून ऊठून जा आणि सांग कीं (**किं इच्छन्ती**) तूं काय इच्छित (**इदं आगाः**) येथें आलें आहेस ? (**अहं अभिभूः**) मीं तुझा पराभव करणारा (**स्वात् गृहात् त्वा ईडे**) स्वतःच्या घरांतून तुला पराजित करतों. (**या शून्य एषि**) ज्या घराला शून्य करण्याच्या इच्छेनें तूं (**आजगन्धा**) येथें आलें आहेस, हे (**अ राते**) शत्रुभूत दारिद्र्या ! (**उत्तिष्ठ**) येथून उठ आणि (**प्र पत**) दूर निघून जा. (**इह मा रंस्थाः**) येथें जराहि रममाण होण्याची इच्छा करूं नकोस. [१९]

(**यदा इयं वधूः**) जेव्हां ही स्त्री (**गार्हपत्यं अग्निं पूर्वं असपर्यैत**) गार्हपत्य अग्नीची प्रथम पूजा करील, (**अधा**) त्यानंतर हे (**नारि**) स्त्रिये ! तूं (**सरस्वत्यै पितृभ्यः च नमस्कुरु**) सरस्वतीला आणि पितरांना नमन कर. [२०]

(**अस्यै नार्यै**) या स्त्रीसाठीं (**उपस्तरे एतत् शर्म वर्म**) आंथरण्यासाठीं हें सुख आणि सरक्षण (**आहर**) घेऊन जा. हे (**सिनी-वाली**) अन्न देणाऱ्या देवि ! (**प्र-जायतां**) ही स्त्री उत्तम प्रकारें संतान उत्पन्न करो, आणि (**भगस्य सुमतौ असत्**) भगवंताच्या उत्तम प्रीतीला धारण करो. [२१]

भावार्थ— ही स्त्री पतीच्या घरीं येऊन आनंदानें राहो. दृष्टि रागानें लाल न करो. पतीचें कल्याण करणारी होवो. धर्म नियमांचें पालन करो. सर्वांस सुख देवो. स्वतःच्या संततीस वीरत्वाचें शिक्षण देवो. दीर वगैरे आप्तेष्टांना आनंदित करो. अंतःकरणांत शुभभाव धारण करो. अशा स्त्रीनें युक्त घर सुसंपन्न होतें. [१२]

स्त्री पतीच्या घरीं येऊन दीर आणि पती यांचें कल्याण करो. पशूंचें उत्तम पालन करो. धर्म नियमानुसार आचरण करो. तेजस्विनी होवो. स्वतःच्या संततीस वीरतेचें शिक्षण देवो, आणि अग्नीची हवनानें उपासना करो. [१८]

गृहस्थाच्या घरांत दारिद्र्य राहूं नये, म्हणजे गृहस्थानें स्वप्रयत्नानें दारिद्र्य दूर करावें. जें घर पुरुषार्थाशिवाय असतें, त्या घरांत दारिद्र्य रहातें, म्हणून दारिद्र्याला प्रयत्नपूर्वक दूर केलें पाहिजे. [१९]

स्त्रीनें घरांत सर्व प्रथम गार्हपत्याग्नीची उपासना हवनद्वारा करावी, त्यानंतर विद्यादेवीची आणि तदनंतर पितरांची पूजा करावी. [२०]

पतीनें स्वतःच्या पत्नीस सर्व प्रकारें सुख द्यावें. तिचें उत्तम रक्षण करावें. ही स्त्री उत्तम अन्न सेवन करून उत्तम संतान उत्पन्न करो; आणि त्या उभयतांनीं असें आचरण ठेवावें कीं, जेणेंकरून त्यांच्यावर नेहमीं ईश्वराचे आशीर्वाद येतील. [२१]

यं बल्वजं न्यस्यथ चर्म चोपस्तृणीथन । तदा रोहतु सुप्रजा या कन्या विन्दते पतिम् ॥ २२ ॥
उप स्तृणीहि बल्वजमधि चर्मणि रोहिते । तत्रोपविश्य सुप्रजा इममग्निं सपर्यतु ॥ २३ ॥
आ रोह चर्मोप सीदाग्निमेष देवो हन्ति रक्षांसि सर्वा ।
इह प्रजां जनय पत्ये अस्मै सुज्यैष्ठ्यो भवत्पुत्रस्त एषः ॥ २४ ॥
वि तिष्ठन्तां मातुरस्या उपस्थान्नानारूपाः पशवो जायमानाः ।
सुमङ्गल्युप सीदेममग्निं संपत्नी प्रति भूषेह देवान् ॥ २५ ॥
सुमङ्गली प्रतरणी गृहाणां सुशेवा पत्ये श्वशुराय शंभूः । स्योना श्वश्र्वै प्र गृहान्विशेमान् ॥ २६ ॥
स्योना भव श्वशुरेभ्यः स्योना पत्ये गृहेभ्यः । स्योनास्यै सर्वस्यै विशे स्योना पुष्टायैषां भव ॥ २७ ॥

अर्थ— (**यं बल्वजं न्यस्यथ**) जी चटई पसरली जाते, (**च चर्म उपस्तृणीथन**) आणि तीवर कातडें पसरलें जातें, (**या कन्या पतिं विन्दते**) जी कन्या पतीला प्राप्त करते, (**सुप्रजा तत् आरोहतु**) उत्तम संतति उत्पन्न करणारी स्त्री त्यावर चढून बसो. [२२]

(**बल्वजं उपस्तृणीहि**) प्रथम चटई हंतरा, नंतर (**अधि चर्मणि रोहिते**) मृगचर्मावर (**तत्र सुप्रजा उपविश्य**) तेथें सुसंततीस जन्म देणारी स्त्री बसो, (**इमं अग्निं सपर्यतु**) आणि या अग्नीची उपासना करो. [२३]

(**चर्म आरोह**) या चर्मावर चढ, (**अग्निं उप आसीद**) अग्नीच्या जवळ बैस, (**एषः देवः सर्वाः रक्षांसि हन्ति**) हा देव सर्व राक्षसांचा नाश करतो, (**इह अस्मै पत्ये प्रजां जनय**) येथें या पतीसाठीं संतान उत्पन्न कर, (**ते एषः पुत्रः सुज्यैष्ठ्यः भवतु**) तुझा हा पुत्र उत्तम श्रेष्ठ होवो. [२४]

(**अस्याः मातुः उपस्थात्**) या मातेजवळ (**जायमानाः नानारूपाः पशवः वि तिष्ठन्तां**) बछडे उत्पन्न होणारे अनेक पशु येथें राहोत. (**सुमंगली संपत्नी इमं अग्निं उपसीद**) उत्तम मंगल कामना करणारी आणि उत्तम पतीसह ही स्त्री या अग्नीची उपासना करो, आणि (**इह देवान् प्रतिभूष**) येथें देवांची सेवा करो. [२५]

(**सुमंगली**) उत्तम मंगल आभूषणें धारण करणारी, (**गृहाणां प्रतरणी**) घरांना दुःखापासून दूर करणारी, (**पत्ये सुशेवा**) पतीची उत्तम सेवा करणारी, (**श्वशुराय शंभूः**) सासऱ्याला आनंद देणारी, (**श्वश्र्वै स्योना**) सासूला सुखकारक तूं (**इमान् गृहान् प्रविश**) या घरांत प्रवेश कर. [२६]

(**श्वशुरेभ्यः स्योना भव**) सासऱ्यास सुख देणारी हो. (**पत्ये गृहेभ्यः स्योना**) पतीला आणि घराला हितकारिणी हो. (**अस्यै सर्वस्यै विशे स्योना**) या सर्व प्रजांना सुखकारक (**स्योना एषां पुष्टाय भव**) सुखदायक होऊन त्या सर्वांच्या पोषणास कारण हो. [२७]

भावार्थ— प्रथम गवताची चटई हंतरण्यांत यावी. त्यावर कृष्णाजिन पसरावें. जी स्त्री पति प्राप्त करते तिनें संतानोत्पत्तिसाठीं या शेजेवर आरूढ व्हावें. [२२]

प्रथम चटई पसरा त्यावर मृगचर्म हंतरा आणि त्यावर बसून संतानोत्पत्तिसाठीं अग्नीची आराधना करा. [२३]

त्या चर्मावर बस आणि अग्नीची पूजा कर. हा अग्निदेव सर्व दुष्ट राक्षसांचा नाश करतो. या संसारांत स्वतःच्या पतीसाठीं संतान उत्पन्न कर. हा तुझा प्रथम पुत्र उत्तम श्रेष्ठ होवो. [२४]

जेव्हां ही स्त्री माता होईल, तेव्हां तिच्याबरोबर विविध रंगारूपाचे पशु आणि गाई रहातील. ही स्त्री उत्तम मंगल कामना करून अग्नीची उपासना करो आणि देवांना सुंदर प्रकारें भूषित करो. [२५]

उत्तम मंगल कामना करणारी, घरांतील लोकांस दुःखापासून मुक्त करणारी, पतीची सेवा करणारी, श्वशुरास सुख देणारी, सासूचें हित पहाणारी स्त्री स्वतःच्या घरांत प्रवेश करो. [२६]

ही स्त्री सासऱ्याचें हित करो, पतीस सुख देवो, सर्व कुटुंबीयांचें कल्याण करून त्यांस पुष्ट करो. [२७]

*

सुमङ्गलीरियं वधूरिमां समेत पश्यत । सौभाग्यमस्यै दत्त्वा दौर्भाग्यैर्विपरेतन ॥ २८ ॥
या दुर्हार्दो युवतयो याश्चेह जरतीरपि । वर्चो न्वस्यै सं दत्ताथास्तं विपरेतन ॥ २९ ॥
रुक्मप्रस्तरणं वह्यं विश्वा रूपाणि बिभ्रतम् । आरोहत्सूर्या सावित्री बृहते सौभगाय कम् ॥ ३० ॥
आ रोह तल्पं सुमनस्यमानेह प्रजां जनय पत्ये अस्मै ।
इन्द्राणीव सुबुधा बुध्यमाना ज्योतिरग्रा उषसः प्रति जागरासि ॥ ३१ ॥
देवा अग्रे न्यपद्यन्त पत्नीः समस्पृशन्त तन्वस्तनूभिः ।
सूर्येव नारि विश्वरूपा महित्वा प्रजावती पत्या सं भवेह ॥ ३२ ॥

अर्थ— (इयं सुमंगली वधूः) ही सुमंगलयुक्त वधू आहे. (सं एत, इमां पश्यत) एकत्रित व्हा आणि तिला पहा. (अस्यै सौभाग्यं दत्वा) तिला सौभाग्याचा आशीर्वाद देऊन (दौर्भाग्यैः वि परेतन) दुर्भाग्यें दूर करीत परत जा. [२८]

(या दुर्हार्दः युवतयः) ज्या दुष्टहृदयी स्त्रिया आहेत. (याः च इह जरतीः अपि) ज्या येथें वृद्ध स्त्रिया आहेत, त्या (अस्यै नु वर्चः सं दत्त) तिला निश्चयपूर्वक तेज देवोत. (अथ अस्तं विपरेतन) आणि घरीं परत जावोत. [२९]

(रुक्मप्रस्तरणं) झोंपण्याच्या बिछान्यानें युक्त (विश्वा रूपाणि बिभ्रतं) अनेक सुंदर सजावटींनीं शोभिवंत (कं वह्यं) सुखदायक रथावर (सूर्या सावित्री बृहते सौभगाय आरोहत्) सूर्या सावित्री महान् सौभाग्य प्राप्त करण्यासाठीं चढली आहे. [३०]

(सुमनस्यमाना तल्पं आरोह) मनांत उत्तम भाव धारण करून ही स्त्री शय्येवर चढो. (इह अस्यै पत्यै प्रजां जनय) येथें या पतीसाठीं संतान उत्पन्न कर. (इन्द्राणी इव सुबुधा) इन्द्राणीप्रमाणें उत्तम ज्ञानयुक्त होऊन (ज्योतिः अग्राः उषसः बुध्यमाना) जीच्यानंतर सूर्यप्रकाश यावयाचा आहे अशा उषेच्यापूर्वीं जागृत होऊन (प्रति जागरासि) निद्रेचा त्याग करून उठ. [३१]

(अग्रे देवाः पत्नीः नि अपद्यन्त) पूर्वकालीं देव स्वतःच्या स्त्रीसह झोंपत असत. (तन्वः तनूभिः सं अस्पृशन्त) स्वतःच्या शरीरानें स्त्रीच्या शरीराला स्पर्श करीत असत. त्याप्रमाणें हे (नारि) स्त्रिये ! तूं (इह) या जीवनांत (सूर्या इव) सूर्यप्रभेप्रमाणें (महित्वा विश्वरूपा) महत्त्वानें अनेक रूपांनीं युक्त होऊन (प्रजावती पत्या सं भव) प्रजायुक्त होऊन पतीसह संतान उत्पन्न कर. [३२]

भावार्थ— सर्व आप्तेष्ट मित्र एकत्र होऊन येथें येवोत आणि या वधूचें दर्शन करोत. ही वधू पुष्कळ कल्याण करणारी आहे, म्हणून ते तिला आशीर्वाद देऊन तिचें जर कांहीं दुर्भाग्य असेल तर त्यास दूर करून स्वतःच्या घरीं परत जावोत. [२८]

ज्या दुष्टहृदयी म्हाताऱ्या स्त्रिया आहेत, त्यासुद्धां सर्वजणी या वधूला स्वतःचें तेज अर्पण करोत, आणि स्वतःच्या घरीं परत जावोत. [२९]

ज्यावर सोनेरी झीक आणि कसबी भरत काम केलेल्या गाद्या हंतरल्या आहेत, आणि ज्यांना विविध प्रकारें कलाकौशल्यानें सजविलें आहे अशा रथावर चढून ही वधू स्वतःच्या पतीच्या घरीं जावो, आणि महान् सौभाग्य प्राप्त करो. [३०]

ही स्त्री मनांत उत्तम भाव धारण करून शय्येवर चढो आणि पतीसाठीं उत्तम संतति निर्माण करो. उत्तम ज्ञान संपादन करून उषःकालापूर्वीं जागृत होऊन निद्रेचा त्याग करून उठो. [३१]

पूर्वकालीं देवसुद्धां स्वतःच्या पत्नींसह निजत असत. स्वतःच्या शरीरानें स्त्रियांच्या शरीराला आलिंगन देत असत. त्याचप्रमाणें ही स्त्री सुद्धां स्वतःचें शरीर अनेक प्रकारें शृंगारून, उत्तम प्रजा निर्माण करण्याच्या इच्छेनें पतिसह मिळून एकमतानें राहो. [३२]

उत्तिष्ठेतो विश्वावसो नमसेडामहे त्वा ।
जामिमिच्छ पितृषदं न्यक्तां स ते भागो जनुषा तस्य विद्धि ॥ ३३ ॥
अप्सरसः सधमादं मदन्ति हविर्धानमन्तरा सूर्यं च ।
तास्ते जनित्रमभि ताः परेहि नमस्ते गन्धर्वर्तुना कृणोमि ॥ ३४ ॥
नमो गन्धर्वस्य नमसे नमो भामाय चक्षुषे च कृण्मः ।
विश्वावसो ब्रह्मणा ते नमोऽभि जाया अप्सरसः परेहि ॥ ३५ ॥
राया वयं सुमनसः स्यामोदितो गन्धर्वमावीवृताम ।
अगन्त्स देवः परमं सधस्थमगन्म यत्र प्रतिरन्त आयुः ॥ ३६ ॥

अर्थ— हे (विश्वावसो) सर्व धनांनीं युक्त वरा ! (इतः उत्तिष्ठ) येथून ऊठ. (त्वा मनसा ईडामहे) तुझी नमस्कारानें पूजा करतो. (पितृषदं न्यक्तां जामिं इच्छ) पित्याच्या घरीं राहणाऱ्या सुशोभित वधूला प्राप्त करण्याची तूं इच्छा कर. (सः ते भागः) तो तुझा भाग आहे. (तस्य जनुषा विद्धि) तिचें जन्मापासून ज्ञान प्राप्त कर. [३३]

(हविर्धानं अन्तरा सूर्यं च) हविर्धानं आणि सूर्याच्यामध्यें (अप्सरसः सधमादं मदन्ति) अप्सरा सब एकत्र येऊन आनंद देणाऱ्या कार्यांत मग्न होतात. (ताः ते जनित्रं) त्या तुझें जन्मस्थान आहे. (ताः अभि परेहि) त्यांच्याजवळ जा. (गन्धर्वः ऋतुना ते नमः कृणोमि) गंधर्व आणि ऋतूंसह मीं तुला नमस्कार करतों. [३४]

(गंधर्वस्य नमसे नमः) गंधर्वाच्या नमस्काराला आम्हीं नमस्कार करतों. त्याच्या (भामाय चक्षुषे च नमः कृण्मः) तेजस्वी डोळ्यांना आम्हीं नमस्कार करतों. हे (विश्वावसो) सर्व धनानें युक्त ! (ते ब्रह्मणा नमः) तुला आम्हीं ज्ञानपूर्वक नमन करतों. (अप्सरसः जायाः अभि परेहि) अप्सरेसारख्या स्त्रीसह दूर जा. [३५]

(वयं राया सुमनसः स्याम) आम्हीं धनानें उत्तम मनयुक्त व्हावें. (इतः गंधर्वं उत् आवीवृताम्) येथें गंधर्वास घेरून टाक, स्वीकार कर, प्राप्त कर. (सः देवः परमं सधस्थं अगन्) तो देव परम श्रेष्ठ स्थानास प्राप्त झाला आहे. (यत्र आयुः प्रतिरन्तः अगन्म) येथें आयुष्य दीर्घ करून आम्हीं पोचतों. [३६]

भावार्थ— हे धनवान् पुरुषा ! तेथून उठून येथें ये. आम्हीं तुमचें स्वागत करीत आहोंत, ही वधू आतां पावेतों पित्याच्या घरीं रहात होती. तुम्हीं जर ही वधू प्राप्त करण्याची इच्छा करीत असाल, तर ती तुमची भागीदारीण होऊं शकेल. तो आपल्या भाग्याचा-या स्त्रीचा जन्मापासूनचा-सर्व वृत्तांत आपली जर इच्छा असेल तर आपण जाणूं शकतों. [३३]

हें यज्ञस्थान भूमि आणि सूर्य यांच्यामध्यें अंतरिक्षांत अप्सरा एका घरांत राहून पुष्कळ आनंद प्राप्त करितात. त्याप्रमाणें गृहस्थानें स्वतःच्या घरांत आनंदानें रहावें. स्त्री सर्वांचें उत्पत्तिस्थान आहे म्हणून पुरुषानें तिच्यासह रहावें. आणि ऋतुअनुसार ऋतुगामी व्हावें. [३४]

जर कोणीं आपणांस नमस्कार करील तर आपण त्याला उलट नमस्कार करणें योग्य आहे. त्याच्या तेजस्वी दृष्टीशीं दृष्टी भिडवून नमन करणें योग्य आहे. याप्रमाणें परस्परांस जाणून-ओळखून नमस्कार करावा, आणि पुरुषानें स्त्रीसह एकांतांत जाऊन रहावें. [३५]

मनुष्यास जसजसें धन प्राप्त होतें तसतसा तो मनांत शुभ संस्कारांनीं युक्त होतो. आणि तो ईश्वरावर दृढ श्रद्धा ठेवणारा होतो. तो ईश्वर परम उच्च स्थानी विराजमान झालेला आहे. जेथें आम्हीं आमचें आयुष्य दीर्घ करून पोहोंचूं शकतों. [३६]

सं पितरावृत्विये सृजेथां माता पिता च रेतसो भवाथः ।
मर्य इव योषामधिरोहयैनां प्रजां कृण्वाथामिह पुष्यतं रयिम् ॥ ३७ ॥
तां पूषं छिवतमामेरयस्व यस्यां बीजं मनुष्याः वपन्ति ।
या न ऊरू उशती विश्रयाति यस्यामुशन्तः प्रहरेम शेपः ॥ ३८ ॥
आ रोहोरुमुप धत्स्व हस्तं परि ष्वजस्व जायां सुमनस्यमानः ।
प्रजां कृण्वाथामिह मोदमानौ दीर्घं वामायुः सविता कृणोतु ॥ ३९ ॥
आ वां प्रजां जनयतु प्रजापतिरहोरात्राभ्यां समनक्त्वर्यमा ।
अदुर्मङ्गली पतिलोकमा विशेमं शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥ ४० ॥

अर्थ— हे (पितरौ) मातापितर हो ! (ऋत्विये संसृजेथां) ऋतुकाळीं संयुक्त व्हा. (रेतसः माता च पिता च भवाथः) वीर्याच्या योगानें तुम्हीं माता पिता होऊं शकतां. (मर्यः इव एनां योषां अधिरोहय) मर्दाप्रमाणें या स्त्रीसह शय्येवर चढ. (इह प्रजां कृण्वाथां) येथें संतान उत्पन्न करा आणि (रयिं पुष्यतं) धन वाढवा. [३७]

हे (पूषन्) पूषा ! (तां शिवतमां एरयस्व) त्या कल्याणमयी स्त्रिला प्राप्त कर. (यस्यां मनुष्याः बीजं वपन्ति) जिच्यांत मनुष्यें बीज पेरतात. (या उशती नः ऊरू विश्रयाति) जी इच्छा करून आम्हांसाठीं स्वतःचें शरीर अर्पण करते. (यस्यां उशन्तः शेपः प्रहरेम) जिची कामना करणारे आम्हीं विषय सेवन करतों. [३८]

(उरुं आरोह) वर चढ. (हस्तं उपधत्स्व) [तिचा] हात धर (सुमनस्यमानः जायां परि ष्वजस्व) उत्तम मनानें युक्त होऊन स्त्रिला आलिंगन दे. (इह मोदमानौ प्रजां कृण्वाथां) येथें आनंद उपभोगीत प्रजा उत्पन्न करा. (सविता वां दीर्घं आयुः कृणोतु) सूर्य तुम्हां दोघांस दीर्घायू करो. [३९]

(प्रजापतिः वां प्रजां जनयतु) प्रजापति ईश्वर तुमच्या संततीस उत्पन्न करो. (अर्यमा अहोरात्राभ्यां समनक्तु) अर्यमा रात्रंदिवस तुम्हां दोघांस संयुक्त करो. (अ-दुर्मंगली इमं पतिलोकं आविश) अशुभ भाव धारण न करणारी तूं या पतिच्या स्थानाला प्राप्त कर. (नः द्विपदे चतुष्पदे शं भव) तूं आमच्या द्विपाद आणि चतुष्पादांना सुखकारक हो. [४०]

भावार्थ-हे स्त्री-पुरुषहो ! तुम्हीं तुमच्या वीर्यबलानेंच मातापिता होऊं शकतां (म्हणजे संतान उत्पन्न करूं शकतां.) म्हणून ऋतुकाळीं संयुक्त व्हा. मर्दाप्रमाणें स्त्रीशीं युक्त व्हा, संतान उत्पन्न करा आणि धनसुद्धां प्राप्त करून त्याची वृद्धि करा. [३७]

शुभ संस्कारांनी युक्त वधू पुरुषानें प्राप्त करावी. मनुष्यानें उत्तम स्त्रीमध्यें बीजारोपण करावें. पुरुषप्राप्तीच्या इच्छेनें स्त्री स्वतःचें शरीर पुरुषाला समर्पण करते त्यामध्यें पुरुषानें वीर्य ठेवावें [३८]

पुरुषानें प्रेमानें स्त्रीला भेटावें, आलिंगन द्यावें, स्त्री पुरुष दोघानींहि आनंदानें रममाण व्हावें आणि संतान उत्पन्न करावें या स्त्री-पुरुषांचें आयुष्य सविता अति दीर्घ करो. [३९]

प्रजापालक ईश्वर या स्त्री-पुरुषांत संतान निर्माण करो. तेच त्यांना प्रेमानें रात्रंदिवस एकत्रित ठेवोत. वधूमध्यें कांहीं दुष्ट दुर्गुण नसावा. आणि उत्तम गुणांनीं युक्त स्त्रीच पतीला प्राप्त करो. या स्त्रीमुळें घरांतील सर्व द्विपाद आणि चतुष्पादांचें कल्याण होवो [४०]

देवैर्दत्तं मनुना साकमेतद्वाधूयं वासो वध्वश्च वस्त्रम् ।
यो ब्रह्मणे चिकितुषे ददाति स इद्रक्षांसि तल्पानि हन्ति ॥ ४१ ॥
यं मे दत्तो ब्रह्मभागं वधूयोर्वाधूयं वासो वध्वश्च वस्त्रम् ।
युवं ब्रह्मणेऽनुमन्यमानौ बृहस्पते साकमिन्द्रश्च दत्तम् । ॥ ४२ ॥
स्योनाद्योनेरधि बुध्यमानौ हसामुदौ महसा मोदमानौ ।
सुगू सुपुत्रौ सुगृहौ तराथो जीवावुषसो विभातीः ॥ ४३ ॥
नवं वसानः सुरभिः सुवासा उदागां जीव उषसो विभातीः ।
आण्डात्पतत्रीवामुक्षि विश्वस्मादेनसस्परि ॥ ४४ ॥
शुम्भनी द्यावापृथिवी अन्तिसुम्ने महिव्रते । आपः सप्त सुस्रुवुर्देवीस्ता नो मुञ्चन्त्वंहसः ॥ ४५ ॥

अर्थ— (दैवेः दत्तं) देवांकडून दिलें गेलेलें (मनुना साकं) मनुसह प्राप्त झालेलें, (एतत् वाधूयं वासः) हें विवाह समयींचें वस्त्र आणि (वध्वः च वस्त्रं) वधूचें जें वस्त्र आहे तें, (यः चिकितुषे ब्रह्मणे ददाति) जें ज्ञानी ब्राह्मणास दान देण्यात येतें तें (स इत् तल्पानि रक्षांसि हन्ति) निश्चयेंकरून हंतरूणावर असलेल्या राक्षसांचा नाश करतें. [४१]

हे (बृहस्पते) बृहस्पती ! आणि (साकं इन्द्रः च) त्याच्या बरोबर राहणारा इंद्र ! तुम्ही दोघे (वधूयोः वाधूयं वासः) वधूचें विवाहसमयींचें वस्त्र आणि (वध्वः च वस्त्रं) जें वधूचें वस्त्र आहे, (यं ब्रह्मभागं मे दत्तः) तो ब्राह्मणाचा भाग तुम्हीं मला देता. (युवं ब्रह्मणे अनुमन्यमानौ ब्रह्मणे दत्तं) तुम्ही दोघे ब्राह्मणास प्रदान करण्याची संमति देऊन ब्राह्मणास त्या उक्त वस्त्रांचें प्रदान करतां. [४२]

(हसामुदौ महसा मोदमानौ) हास्य विनोद करणारे, महत्त्वाच्या विचारानें आनंदित होणारे, (स्योनात् योनेः अधिबुध्यमानौ) सुखदायक शयन मंदिरांतून जागृत होऊन उत्साहानें उठणारे (सुगू सुपुत्रौ सुगृहौ) उत्तम इंद्रियांनीं आणि गायींनीं युक्त, उत्तम संतति आणि उत्तम घर असणारे (जीवौ) दोन जीव म्हणजे पति-पत्नी (विभातीः उषसः तराथः) प्रकाशमय उषःकाल युक्त दीर्घ आयुष्याचे दिवस सुखपूर्वक तरून जावोत. [४३]

मीं (नवं वसानः सुरभिः सुवासाः जीवः) नवें वस्त्र नेसून, सुगंधी वस्तु धारण करून उत्तम वस्त्र नेसणारा जीवंत मनुष्य (विभातीः उषसः उदागां) तेजस्वी उषःकालीं जागृत होतो. (आण्डात् पतत्री इव) अंड्यांतून बाहेर पडणाऱ्या पक्ष्याप्रमाणें मीं (विश्वस्मात् एनसः परि अमुक्षि) सर्व पापांतून मुक्त व्हावें. [४४]

(द्यावा पृथिवी अन्तिसुम्ने महिव्रते शुम्भनी) द्यावा आणि पृथ्वी हे दोन्ही लोक जवळून सुख देणारे, श्रेष्ठ नियमांचें पालन करणारे आणि शोभा वाढविणारे आहेत, (देवीः सप्तः आपः सुस्रुवुः) दिव्य सप्त जलप्रवाह वाहूं लागले आहेत. (ताः अंहसः नः मुञ्चन्तु) ते जलप्रवाह आम्हां सर्वांना पापांपासून वांचवोत. [४५] (अथर्व. ७।११२।१)

भावार्थ— वधूला नेसण्यासाठीं आणलेलीं वस्त्रें ब्राह्मणाला दान दिल्यानें शयनस्थानांत उत्पन्न होणारे कुसंस्कार दूर होऊं शकतात. [४१]

वधूला वापरण्यासाठीं आणलेली वस्त्रें हा ब्राह्मणाचा भाग आहे. तो अनुमतिपूर्वक ब्राह्मणास देण्यांत यावा. [४२]

स्त्री-पुरुष हास्य-विनोद करतां करतां सुखदायक शयनमंदीरांत निद्रा घेऊन, योग्य समयीं जागृत होऊन, उत्तम गाईंनी युक्त, उत्तम पुत्रांनीं युक्त, उत्तम घरानें युक्त होऊन स्वतःच्या दीर्घ आयुष्याचे सर्व दिवस आनंदानें व्यतीत करोत. [४३]

उत्तम वस्त्रें धारण करून, सुगंधीं द्रव्ये अंगाला लावून शरीर सुशोभित करून मी असा सदाचारानें वर्तन कीं ज्यामुळें माझीं सर्व प्रकारचीं पापें दूर होतील. [४४]

द्युलोक आणि पृथ्वी हे सर्वांना सुख देणारे आहेत. ते स्वतःच्या नियमांनीं चालतात. त्यांच्यामध्यें सात प्रवाह वहात आहेत. ते सर्व आम्हांस पापांपासून वांचवोत. [४५]

सूर्यायै देवेभ्यो मित्राय वरुणाय च । ये भूतस्य प्रचेतसस्तेभ्य इदमकरं नमः ॥ ४६ ॥
य ऋते चिदभिश्रिषः पुरा जत्रुभ्य आतृदः
संधाता संधिं मघवा पुरूवसुर्निष्कर्ता विहुतं पुनः ॥ ४७ ॥
अपास्मत्तम उच्छतु नीलं पिशङ्गमुत लोहितं यत् ।
निर्दहनी या पृषातक्य १ स्मिन्तां स्थाणावध्या सजामि ॥ ४८ ॥
यावतीः कृत्या उपवासने यावन्तो राज्ञो वरुणस्य पाशाः ।
व्यृद्धयो या असमृद्धयो या अस्मिन्ता स्थाणावधि सादयामि ॥ ४९ ॥
या मे प्रियतमा तनूः सा मे बिभाय वाससः ।
तस्याग्रे त्वं वनस्पते नीविं कृणुष्व मा वयं रिषाम ॥ ५० ॥

अर्थ-- (**सूर्यायै देवेभ्यः मित्राय वरुणाय च**) उषा, अग्नि इत्यादि देव, सूर्य, वरुण तसेंच (**ये भूतस्य प्रचेतसः**) ज्या प्राण्यांना ज्ञान देणाऱ्या देवता आहेत (**तेभ्यः इदं नमः अकरं**) त्यांना हा नमस्कार मीं करतों. [४६] (ऋ. १०।८५।१७)

(**यः ऋते अभिश्रिषः**) जो चिकटवल्याशिवाय, तसेंच (**चित् जत्रुभ्यः आतृदः**) गळ्याच्या हाडाला भोंक पाडल्याशिवाय (**संधिं संधाता**) सांधे जोडणारा आणि (**विहुतं पुनः निष्कर्ता**) फाटलेल्याला पुनः उत्तम जोडणारा (**पुरुवसुः मघवा**) उत्तम आणि पुष्कळ धन देणारा ईश्वर आहे. [४७] (ऋ. ८।१।१२)

(**यत् नीलं पिशंगं उत लोहितं तमः**) जी नीळी, पिवळी अथवा लाल रंगाची मलिनता आहे ती (**अस्मत् अप उच्छतु**) आम्हां सर्वांपासून दूर जावो. (**या निर्दहनी पृषातकी अस्मिन्**) जी दहन करणारी दोषस्थिति यांत आहे (**तां स्थाणौ अधि आ सजामि**) तिला या खांबांत बंद करतों. [४८]

(**यावतीः कृत्याः उपवासने**) जे हिंसक कृत्य उपवस्त्रांत आहे, (**यावन्तः राज्ञः वरुणस्य पाशाः**) जितके राजा वरुणाचे पाश आहेत, (**याः व्यृद्धयः याः असमृध्ययः**) जी दरिद्रता आणि वाईट स्थिति आहे. (**ताः अस्मिन् स्थाणौ अधि सादयामि**) त्या सर्वांना मीं या खांबांत स्थापन करतों. [४९]

(**या मे प्रियतमा तनूः**) जे माझें अत्यंत प्रिय शरीर आहे, (**सा मे वाससः बिभाय**) तें माझ्या वस्त्राला भीतें म्हणून हे (**वनस्पते**) वृक्षा ! **अग्रे त्वं तस्य नीविं कृणुष्व**) प्रथम तूं त्याच्या गांठी मार, म्हणजे (**वयं मा रिषाम**) आम्हीं दुःखी होणार नाहीं. [५०]

भावार्थ— सूर्य, अन्यदेव, मित्र, वरुण इत्यादि सर्वांना मीं नमस्कार करतों. [४६]

जो ईश्वर मानवी शरीरांत दोन हाडें चिकटवल्यावांचून अथवा छिद्रें पाडल्यावांचून जोडतो तोच सर्वांना जोडणारा आहे. तो सर्व तुटलेल्यांना पुनः चांगल्या प्रकारें नीट करतो. [४७]

आमचें जें सर्व प्रकारचें अज्ञान आहे तें सर्व आमच्यामधून पूर्णपणें दूर होवो. जी हृदयदाहक दोषस्थिति आहे, ती आम्हां सर्वांपासून दूर पळून जावो. [४८]

जो हिंसक हाणामारीचीं कृत्यें आहेत, जें दारिद्य आणि दुष्ट (वाईट) स्थिति आहे तीं सर्व आम्हांपासून दूर जावेत. [४९]

माझें शरीर सुडौल आणि हृष्टपुष्ट आहे, वस्त्र धारण न केल्यानें त्याची शोभा कमी होते. यासाठीं निरनिराळी वस्त्रें शिवून आम्ही धारण करतों, ज्यामुळें आम्हांस कांहीं कष्ट न व्हावेत. [५०]

ये अन्ता यावतीः सिचो य ओतवो ये च तन्तवः ।
वासो यत्पत्नीभिरुतं तन्नः स्योनमुप स्पृशात् ॥ ५१ ॥
उशतीः कन्यला इमाः पितृलोकात्पतिं यतीः । अव दीक्षामसृक्षत स्वाहा ॥ ५२ ॥
बृहस्पतिनावसृष्टां विश्वे देवा अधारयन् । वर्चो गोषु प्रविष्टं यत्तेनेमां सं सृजामसि ॥ ५३ ॥
बृहस्पतिनावसृष्टां विश्वे देवा अधारयन् । तेजो गोषु प्रविष्टं यत्तेनेमां सं सृजामसि ॥ ५४ ॥
बृहस्पतिनावसृष्टां विश्वे देवा अधारयन् । भगो गोषु प्रविष्टो यस्तेनेमां सं सृजामसि ॥ ५५ ॥
बृहस्पतिनावसृष्टां विश्वे देवा अधारयन् । यशो गोषु प्रविष्टं यत्तेनेमां सं सृजामसि ॥ ५६ ॥
बृहस्पतिनावसृष्टां विश्वे देवा अधारयन् । पयो गोषु प्रविष्टं यत्तेनेमां सं सृजामसि ॥ ५७ ॥
बृहस्पतिनावसृष्टां विश्वे देवा अधारयन् । रसो गोषु प्रविष्टो यस्तेनेमां सं सृजामसि ॥ ५८ ॥
यदीमे केशिनो जना गृहे ते समनर्तिषू रोदेन कृण्वन्तोऽघम् ।
अग्निष्ट्वा तस्मादेनसः सविता च प्र मुञ्चताम् ॥ ५९ ॥
यदीयं दुहिता तव विकेश्यरुदद् गृहे रोदेन कृण्वत्यघम् ।
अग्निष्ट्वा तस्मादेनसः सविता च प्र मुञ्चताम् ॥ ६० ॥
यज्जामयो यद्युवतयो गृहे ते समनर्तिषू रोदेन कृण्वतीरघम् ।
अग्निष्ट्वा तस्मादेनसः सविता च प्र मुञ्चताम् ॥ ६१ ॥

अर्थ— (ये अन्ताः यावतीः सिचः) ज्या झालरी आणि कांठ आहेत, (ये ओतवः ये च तन्तवः) जे ताणे आहेत, जें सूत आहे, (यत् वासः पत्नीभिः उतं) जें वस्त्र स्त्रियांनीं विणलें आहे, (तत् नः स्योनं उपस्पृशात्) तें आमच्या शरीरास सुखस्पर्श करणारें होवो. [५१]

(उशतीः इमाः कन्यलाः) पतीची इच्छा करणाऱ्या कन्या, (पितृलोकात् पतिं यतीः) पित्याच्या घरून पतीच्या घरीं जात असतां (दीक्षां अव सृक्षत सु-आहा) दीक्षा व्रत स्वीकारोत, हा उत्तम उपदेश आहे. [५२]

(बृहस्पतिना अवसृष्टां) बृहस्पतीनें रचलेली ही दीक्षा तर (विश्वे देवाः अधारयन्) सर्व देवांनीं धारण केली आहे (यत् वर्चः गोषु प्रविष्टं) जें बळ गायींमध्यें प्रविष्ट झालेलें आहे (तेन इमां सं सृजामसि) त्यानें तिला संयुक्त करतों. [५३]

बृहस्पतीनें रचलेल्या या दीक्षेला सर्व देवानीं धारण केली आहे. जें (तेजः...भगः...यशः...पयः...रसः) तेज, भाग्य, यश, पय आणि रस गायींमध्यें प्रवेश पावलेले आहेत त्यांनीं तिला संयुक्त करतों. [५४-५८]

(यदि इमे केशिनो जनाः) जे हे लांब केंसाचे लोक आहेत, (ते गृहे समनर्तिषुः) ते तुझ्या घरांत नाचत राहोत, आणि (रोदेन अघं कृण्वती) रडण्यानें पाप करीत राहील. (यदि इयं दुहिता) जर ही कन्या (विकेशी तव गृहे अरुदत्) केंस मोकळे सोडून तुझ्या घरांत रडत राहिली आणि रडून पाप करीत राहिली तर (यत् जामयः

भावार्थ— आमच्या स्त्री वर्गानें जें उत्तम वस्त्र विणलें आहे, ज्याला सुंदर काठ आणि झालरी लावल्या आहेत, तें वस्त्र आम्हांस सुखदायक होवो. [५१]

या कन्या उपवर झाल्यानें पतीची इच्छा करीत आहेत आणि पतिजवळ पोहोंचत आहेत म्हणजे गृहस्थाधर्माची दीक्षा स्वीकारीत आहेत. [५२]

या गृहस्थाश्रमाची दीक्षा बृहस्पतीनें सुरू केली, जें बल, तेज, भाग्य, यश, दूध, आणि रस गायींत आहेत ते सर्व या गृहस्थाश्रमांत रहाणाऱ्यांना प्राप्त होवोत. [५३-५८]

यत्ते प्रजायां पशुषु यद्वा गृहेषु निष्ठितमघकृद्भिरघं कृतम् ।
अग्निष्ट्वा तस्मादेनसः सविता च प्र मुञ्चताम् ॥ ६२ ॥
इयं नार्युप ब्रूते पूल्यान्यावपन्तिका । दीर्घायुरस्तु मे पतिर्जीवाति शरदः शतम् ॥ ६३ ॥
इहेमाविन्द्र सं नुद चक्रवाकेव दंपती । प्रजयैनौ स्वस्तकौ विश्वमायुर्व्यश्नुताम् ॥ ६४ ॥
यदासन्द्यामुपधाने यद्वोपवासने कृतम् । विवाहे कृत्यां यां चक्रुरास्नाने तां नि दध्मसि ॥ ६५ ॥
यद्दुष्कृतं यच्छमलं विवाहे वहतौ च यत् । तत्संभलस्य कम्बले मृज्महे दुरितं वयम् ॥ ६६ ॥
संभले मलं सादयित्वा कम्बले दुरितं वयम् । अभूम यज्ञियाः शुद्धाः प्र ण आयूंषि तारिषत् ॥ ६७ ॥

यत् युवतयः) ज्या बहिणी आणि स्त्रिया तुझ्या घरांत रडत रहातील आणि पाप करीत रहातील (यत् ते प्रजायां पशुषु यत् वा गृहेषु निष्ठितं) जें तुझ्या पशूंमध्यें, प्रजेमध्यें, तुझ्या घरांत, (अघकृद्भिः अघं कृतं) पाप्यांनीं पापें केलीं आहेत, (अग्निः सविता च) अग्नि आणि सविता (तस्मात् एनसः त्वा प्रमुञ्चतां) त्या पापांपासून तुला वांचवो. [५९-६२]

(इयं नारी पूल्यानि आवपन्तिका) ही स्त्री शिजविलेल्या अन्नाच्या आहुति देते. (उप ब्रूते) आणि म्हणते कीं, (मे पतिः दीर्घायुः अस्तु) माझा पति दीर्घायु होवो. तो (शरदः शतं जीवाति) शंभर वर्षें जीवंत राहतो. [६३]

हे इन्द्रा ! (चक्रवाका इव) चक्रवाक पक्ष्यांच्या जोडप्याप्रमाणें (इमौ दम्पती इह सं नुद) या पति-पत्नींना या संसारांत प्रेरित कर. (एनौ सु-अस्तकौ प्रजया) हे दोघे उत्तम घराचे मालक होऊन स्वतःच्या संततीसह (विश्वं आयुः व्यश्नुतां) सर्व आयुष्याचा उपभोग घेवोत. [६४]

(यत् आसंद्यां) जें बैठकीवर अथवा खुर्चीवर, (यत् उपधाने) जे शय्येवर अथवा उशीवर, (यत् वा उपवासने कृतं) जें उपवस्त्रावर करण्यांत आलें आहे, तसेंच (विवाहे यां कृत्यां चक्रुः) विवाहांत जो हिंसक प्रयोग करण्यांत आला होता (तां आस्नाने निदध्मसि) त्याला आम्ही स्नानानें धुवून टाकतों. [६५]

(यत् विवाहे यत् च वहतौ) जें विवाहांत अथवा वधूवरांच्या रथांत (दुष्कृतं यत् शमलं) जें दुष्कृत्य अथवा मलिन कार्य झालें होतें (तत् दुरितं संभलस्य कम्बले मृज्महे) तें पाप आम्हीं कांठ असलेल्या कांबळीनें धुवून टाकतो. [६६]

(संभले मलं सादयित्वा) कांठावर मळ टाकून आणि (दुरितं कम्बले) पापास कांबळ्यांत ठेवून (वयं यज्ञियाः शुद्धाः अभूम) आम्ही यज्ञ करण्यास योग्य शुद्ध होतों. तें (नः आयूंषि प्रतारिषत्) आमच्या आयुष्यास दीर्घ करो. [६७]

जे केसयुक्त लोक, ज्या कुमारिका, ज्या स्त्रिया रडून पाप करतात, ज्या स्वतःचे केस मोकळे सोडून शोक करतात, या प्रकारचीं पशु आणि संतति विषयक अनेक पापें जीं नित्य घरांत होत असतात, तीं सर्व आमच्यापासून दूर होवोत. [५९-६२]

ही स्त्री शिजवलेल्या अन्नानें हवन करून ईश्वराची प्रार्थना करो कीं, माझा पति दीर्घायु होऊन शंभर वर्षें वांचो. [६३]

हे प्रभो ! पति-पत्नी एकदुसऱ्याशीं खेळीमेळीनें, एक विचारानें राहोत, चक्रवाक् पक्षांच्या जोडप्याप्रमाणें एकत्र आनंदानें राहोत, उत्तम घरदार तयार करून आणि उत्तम प्रजा निर्माण करून संपूर्ण आयुष्य आनंदानें व्यतीत करोत. [६४]

बैठक, उशी, हंतरूण, वस्त्र तसेंच विवाह विषयक कृत्यांत जीं कांहीं पापें अथवा घातक दोष होतात ते सर्व आत्मशुद्धीनें दूर करण्यांत यावेत. [६५]

विवाहांत अथवा मिरवणूकींत जे कांहीं पाप अथवा दोष होत असतील ते सुद्धां विचारपूर्वक दूर करण्यांत यावेत. [६६]

आमचा सर्व मळ, पाप, दोष वगैरे दूर करून आम्हीं सर्व पवित्र होऊन तसेंच दोष रहित होऊन दीर्घायु होऊं. [६७]

कृत्रिमः कण्टकः शतदुन्य एषः । अपास्याः केश्यं मलमप शीर्षण्यं लिखात् ॥ ६८ ॥
अङ्गादङ्गाद्वयमस्या अप यक्ष्मं नि दध्मसि ।
तन्मा प्रापत्पृथिवीं मोत देवान्दिवं मा प्रापदुर्वन्तरिक्षम् ।
अपो मा प्रापन्मलमेतदग्ने यमं मा प्रापत्पितॄंश्च सर्वान् ॥ ६९ ॥
सं त्वा नह्यामि पयसा पृथिव्याः सं त्वा नह्यामि पयसौषधीनाम् ।
सं त्वा नह्यामि प्रजया धनेन सा संनद्धा सनुहि वाजमेमम् ॥ ७० ॥
अमोऽहमस्मि सा त्वं सामाहमस्म्यृक्त्वं द्यौरहं पृथिवी त्वम् ।
ताविह सं भवाव प्रजामा जनयावहै ॥ ७१ ॥
जनियन्ति नावग्रवः पुत्रियन्ति सुदानवः । अरिष्टासू सचेवहि बृहते वाजसातये ॥ ७२ ॥

अर्थ— (**यः एषः शतदन् कृत्रिमः कंटकः**) जो हा शेंकडो दांते असलेला कृत्रिम कंगवा आहे, तो (**अस्याः शीर्षण्यं केश्यं मलं अप अप लिखात्**) तिच्या डोक्यांतील मळ दूर करो. [६८]

(**वयं अस्याः अंगात् अंगात् यक्ष्मं**) आम्ही तिच्या प्रत्येक अवयवांतून रोगाला (**अप निदध्मसि**) दूर करतों. (**तत् पृथ्वीं मा प्रापत्**) ते रोग पृथ्वीला प्राप्त न होवोत. (**उत देवान् मा**) तसेंच देवांनाहि प्राप्त न होवोत. (**दिवं उरु अन्तरिक्षं मा प्रापत्**) द्युलोकास अथवा अंतरिक्षांससुद्धां प्राप्त न होवोत. हे अग्ने ! (**एतत् मलं अपः मा प्रापत्**) या पाण्यामध्यें सुद्धां प्राप्त न होवोत. (**यमं सर्वान् पितॄन् च मा प्रापत्**) यमाला आणि सर्व पितरांनाहि प्राप्त न होवोत. [६९]

(**त्वा पृथिव्याः पयसा संनह्यामि**) तुला पृथ्वीच्या पोषक पदार्थांनीं युक्त करतों. (**त्वा औषधीनां पयसा संनह्यामि**) मीं तुला औषधींच्या पौष्टिक सत्त्वानें युक्त करतों. (**त्वा प्रजया धनेन संनह्यामि**) तुला प्रजा आणि धनानें युक्त करतों. (**सा संनद्धा इमं वाजं सनुहि**) अशी तूं-स्त्री-उक्तगुणांनीं युक्त होऊन या बळास प्राप्त कर. [७०]

(**अहं अमः अस्मि**) मीं प्राण आहे, आणि (**सा त्वं**) तूं शक्ति आहेस. (**साम अहं ऋक् त्वं**) मी साम आहे आणि तूं ऋचा आहेस, (**द्यौः अहं पृथिवी त्वं**) मीं द्युलोक आणि तूं पृथ्वी आहेस, (**तौ इह संभवाव**) असे आपण दोघें येथें एकत्रित होऊं आणि (**प्रजां आ जनयावहै**) संतान उत्पन्न करूं. [७१]

(**अग्रवः नौ जनियन्ति**) अविवाहित मनुष्यें आम्हांप्रमाणें विवाहाची इच्छा करतात. (**सुदानवः पुत्रियन्ति**) दान देणारे पुत्राची इच्छा करतात. (**अरिष्टासू बृहते वाजसातये सचेवहि**) प्राण आहेत तो पावेतों आम्हीं दोघे बल प्राप्तीसाठीं खेळीमेळीनें एकत्र राहूं. [७२] (ऋ. ७।९६।१४)

भावार्थ— फणीनें स्त्रीच्या मस्तकांतील मळ दूर करण्यांत यावा आणि तें स्वच्छ करण्यांत यावें. [६८]

याप्रमाणें स्त्रियांच्या शरीराचा प्रत्येक भाग स्वच्छ करण्यांत यावा, परंतु हा मळ पृथ्वी, अंतरिक्ष आकाश, पाणी, वनस्पति वगैरे जवळ न जावा, परंतु तो अशा जागीं पुरून टाकण्यांत यावा कीं जेथून तो पुनः कोणास त्रास देणार नाहीं. [६९]

स्त्रिला पृथ्वी आणि औषधींच्या रसांनीं पुष्ट करण्यांत यावें. तिला धन देण्यांत यावें. आणि तिला उत्तम संतति होवो. स्त्री बलशालिनी होऊन घरांत विराजो. [७०]

पुरुष प्राण आहे आणि स्त्री चेतना आहे. पुरुष सामगायन आणि स्त्री मंत्र आहे. पुरुष सूर्य आहे आणि स्त्री पृथ्वी आहे. ते दोघे या संसारांत मिळून राहोत आणि संतान निर्माण करोत. [७१]

अविवाहित स्त्री पुरुष, स्वतःच्या सहधर्मचरणासाठीं योग्य पुरुष अथवा योग्य स्त्रीची अपेक्षा करतात. जे उदार दान देणारे आहेत त्यांनाच उत्तम संतति प्राप्त होते. त्यांनीं उत्तम बलाच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करावा. [७२]

*

ये पितरो वधूदर्शा इमं वहतुमागमन् । ते अस्यै वध्वै संपत्न्यै प्रजावच्छर्म यच्छन्तु ॥ ७३ ॥
येदं पूर्वागन्रशनायमाना प्रजामस्यै द्रविणं चेह दत्त्वा ।
तां वहन्त्वगतस्यानु पन्थां विराडियं सुप्रजा अत्यजैषीत् ॥ ७४ ॥
प्र बुध्यस्व सुबुधा बुध्यमाना दीर्घायुत्वाय शतशारदाय ।
गृहान्गच्छ गृहपत्नी यथासो दीर्घं त आयुः सविता कृणोतु ॥ ७५ ॥

अर्थ — (**ये वधूदर्शाः पितरः**) जी वधूला पहाण्याची इच्छा करणारी वडिल मनुष्यें (**इमं वहतुं आगमन्**) या वरातीला पहाण्यासाठीं आलीं आहेत (**ते अस्यै वध्वै संपत्न्यै**) ते या वधूसाठीं म्हणजे उत्तम पत्नीसाठीं (**प्रजावत् शर्म यच्छन्तु**) प्रजायुक्त सुख प्रदान करोत. [७३]

(**या रशनायमाना पूर्वा इदं आ अगन्**) जी करगोट्याप्रमाणें उत्तम संबंध असणारी प्रथम स्त्री या जागीं प्राप्त झाली आहे, (**अस्यै प्रजां द्रविणं च इह दत्त्वा**) तिच्यासाठीं येथें संतति आणि धन देऊन (**तां अगतस्य पन्थां अनु वहन्तु**) तिला भविष्यकाळीं सुरक्षित रस्त्यानें वेऊन जावो. (**इयं विराट् सुप्रजा अति अजैषीत्**) ही वधू तेजस्वी आणि उत्तम प्रजायुक्त होऊन विजयी होवो. [७४]

(**सुबुधा बुध्यमाना**) उत्तम ज्ञानयुक्त जागृत राहून (**शतशारदाय दीर्घायुत्वाय प्र बुध्यस्व**) शंभर वर्षांच्या दीर्घ जीवनापर्यंत जागृत रहा. (**गृहान् गच्छ**) तुझ्या पतीच्या घरीं जा. (**यथा गृहपत्नी असः**) गृहस्वामिनीप्रमाणें रहा. (**सविता ते आयुः दीर्घं कृणोतु**) सविता तुझें आयुष्य दीर्घ करो. [७५]

भावार्थ — वरात जाण्याचे वेळीं नव वधूला पहाण्यास अनेक स्त्री पुरुष एकत्रित होतात, त्यांनीं या नववधूला सुसंतान प्राप्त होण्याचा आशीर्वाद द्यावा. [७३]

ज्याप्रमाणें दोरींत अनेक सुतें एकत्र विणलेली असतात, त्याप्रमाणें हा गृहस्थाश्रम, एकत्र मिळून-मिसळून रहाण्याचा आश्रम आहे. गृहस्थाश्रमांत एकत्रित झालेले सर्व लोक स्त्रीला धन आणि सुसंतान प्राप्त होण्याचा आशीर्वाद देऊन तिला शुभमार्गानें चालवोत. याप्रमाणें ही स्त्री तेजस्विनी, यशस्विनी, आणि सुसंतानयुक्त होऊन विजयी होवे. [७४]

स्त्री विदुषी होवो. तिनें प्रातःकालीं उठावें. शंभर वर्षांच्या दीर्घायुष्यासाठीं ज्ञानप्राप्तिपूर्वक प्रयत्न करावेत. स्वतःच्या पतीच्या घरीं रहावें. स्वतःच्या घराची स्वामिनी होऊन रहावें. परमात्मा तिला दीर्घायुष्याचें प्रदान करो. [७५]

विवाह—प्रकरण

वैदिक विवाहाचें स्वरूप

प्रथम सूक्त

अथर्ववेदाच्या चौदाव्या कांडांत वैदिक विवाहाचें स्वरूप आणि वैदिक विवाह पद्धति वर्णिली आहे. जर वाचक आपल्या विवाहपद्धतीचा विचार करूं इच्छित असतील तर त्यांनीं या दोनही सूक्तांचें विशेष मनन केलें पाहिजे. प्रथम सूक्ताच्या प्रारंभीं पांच मंत्र केवळ सामान्य उपदेश देणारे आहेत. त्यांत सूर्य, चंद्र, नक्षत्र, पृथ्वी, आणि सोम इत्यादींचें वर्णन आहे. परंतु या मंत्रांत या देवतांचें वर्णन करतांना विवाहाचा तसेंच पति-पत्नीचा आदर्श दाखविला आहे. पहा—

द्यौः आणि भूमि

प्रथम मंत्रांत भूमीला पत्नीच्या स्थानीं आणि सूर्याला अथवा द्युलोकाला पतीच्या स्थानीं वर्णिलें आहे. समजा कीं सर्वांची माता पृथ्वी आहे. आणि सर्वांचा पिता सूर्य आहे. पृथ्वी आणि सूर्य या मातापित्यांचें संतानरूप हें समस्त जग आहे. आपण सर्व एकाच कुटुंबाचे घटक आहोंत. या विश्वांत जितकीं मनुष्यें आहेत तसेंच

जेवढे पशुपक्षी आहेत ते सर्व एकाच परिवारांतील सदस्य आहेत. सर्व मनुष्यांत तर भावाभावाचें नातें असावें. पतीचा आदर्श सूर्य अथवा द्युलोक आहे. द्युलोक म्हणजे खगोल, जो नेहमीं प्रकाशित असतो. तो सर्वांस प्रकाश देतो. त्याचप्रमाणें पतीनें स्वतःच्या परिवारास उत्तम ज्ञानरूपी प्रकाश द्यावा आणि सर्व संततीला ज्ञानवान् करावें. त्याचप्रमाणें भूमि सर्वांस आधार देणारी आहे. फळें आणि अन्न देऊन सर्वांस तृप्त करते. त्याचप्रमाणें माता स्वतःच्या संतानांस स्वतःच्या प्रेमाचा आधार देऊन खाण्या-पीण्याच्यायोगें सर्वांच्या पुष्टीची व्यवस्था करते. याप्रमाणें विचार केल्यानें तसेंच द्यावापृथ्वीच्या आदेशाचें मनन केल्यानें स्त्रीपुरुष अथवा पतिपत्नीला आदर्श ठरणारा उपदेश या मंत्रांत स्पष्ट-रीत्या दिसून येतो.

गृहस्थधर्माचा आधार ' सत्य ' आहे. ही गोष्ट या सूक्ताच्या प्रारंभींच 'सत्य' शब्द सांगून दर्शविली आहे. स्त्री पुरुषांचा व्यवहार सत्याच्या मर्यादेंत राहून व्हावयास हवा. त्यांत असत्य, कपट, लबाडी, फसवणूक इत्यादींचा प्रवेशसुद्धां होतां कामां नये. त्यामुळेंच आदर्श गृहस्थाश्रम टिकून राहील. दुसरें बळ 'ऋत' आहे. ऋताचा अर्थ सरळता असा आहे. सत्य आणि ऋत हे दोन्ही उन्नतीचे नियम आहेत. सर्व धर्मनियमांचें हें सार आहे. ऋत आणि सत्याचा त्याग करून कोणताहि धर्म स्वतःच्या स्थानीं स्थिर राहूं शकणार नाहीं.

सोम

दुसऱ्या मंत्रांत सोमाच्या महात्म्याचें वर्णन केलें आहे. हा सोम स्वर्गांत आहे. पृथ्वीवर आहे आणि नक्षत्रांतसुद्धां आहे. वाचकांच्या ध्यानीं आलें असेलच कीं नक्षत्रांत जो सोम आहे तोच चंद्र आहे. तो सर्व नक्षत्रांची शोभा वाढवितो. रात्रीचे वेळीं तर त्याची शोभा अवर्णनीय असते. तो शांतीचा आदर्श आहे. मनुष्यानें हा शांतीचा आदर्श नेहमीं मनांत धारण करावा, आणि शांत रहावें. क्रौर्य आणि अशांतिसारख्या दुर्गुणांस दूर ठेवावें. हा आदर्श सोमाच्या उदाहरणानें पतिसाठीं या मंत्रांत व्यक्त केला आहे.

पृथ्वीवर सुद्धां सोम आहे. येथें सोमाचा अर्थ ' वनस्पति आणि अन्न ' असा आहे. आकाशांतील सोमाचे हे पृथ्वीवरील प्रतिनिधि आहेत. ' हा पृथ्वीवर रहाणारीं मनुष्यें, पशुपक्षी वगैरेंना तृप्त करतो. ' वाचकांनीं येथें पृथ्वीवरील सोम आणि आकाशस्थ सोम यांना यथावत् समजून घ्यावें. दोघांचीहि नांवें सोम आहेत, परंतु दोघे एकच नाहींत. सोमाचे अनेक अर्थ आहेत आणि सोम शब्दानें अनेक पदार्थांचा उल्लेख वेदांत होतो. म्हणून सोम शब्दाचा एकच अर्थ सर्वत्र मानणें अयोग्य होय.

पुढें तिसऱ्या मंत्राच्या पूर्वार्धांत सोमरसाचें पान करण्याचें वर्णन आहे. हें सोमपान यज्ञांत होतें, ही गोष्ट सर्वांस नीट माहित आहे. परंतु या मंत्राच्या उत्तरार्धांत पुढें विशेष अर्थानें सोम-पानाचा उल्लेख केला आहे. तेथें म्हटलें आहे कीं, ' जें सोम-पान ब्रह्मज्ञानी करतो तें सोमपान दुसरा कोणी सामान्य मनुष्य करूं शकत नाहीं. ' येथें हें सोमपान ब्रह्मानंदाचें आहे, जें फक्त ब्रह्मज्ञानीच करूं शकतो. हा सुद्धां सोमच आहे. हा परमात्म्याच्या अखंड आनंदाचा रस आहे. परमात्म्याला एकरस म्हणून वर्णितातच. हें अंतिम आणि सर्वश्रेष्ठ सोमपान आहे. धर्म मनु-ष्याला या सोमपानासाठीं योग्य बनवितो. सामान्य मनुष्य हें सोमपान करूं शकत नाहीं. कारण विशेष उच्चस्थिति प्राप्त झाल्यानंतरच हें सोमपान होणें शक्य आहे.

परमात्म्याच्या अखंड आनंद रसरूप सोमाच्या कल्पनेसह वनस्पतीच्या सोमापर्यंत अनेक सोमविषयक कल्पना वेदांत आल्या आहेत हें येथें वाचकांच्या ध्यानीं यावें. या दोघांच्यामध्यें इतर सर्व प्रकारचे सोम येवून जातात. याप्रमाणें सोमपानाचें हें महात्म्य आहे. येथें हें वर्णन करण्याचा उद्देश इतकाच कीं गृह-स्थाश्रमी लोकांनीं स्वतःच्या घरांत सोमपान करावें. सर्व साधा-रणपणें सोमपानाचा अर्थ औषधीरसाचें सेवन असा आहे. हें सोमरसपान सर्व गृहस्थांनीं करावें. गृहस्थांचें तें अन्न आहे. वनस्पति, धान्य, फळें, भाज्या इत्यादींचे सेवन गृहस्थाच्या कुटुंबांत होत असतें. मांस, अंडी, रक्त, वगैरेंचें सेवन निषिद्ध आहे. पृथ्वीमाता ज्या सोमरसानें सर्वांची पुष्टि करते तो हाच वनस्पतीचा सोम होय. याप्रमाणें सर्व गृहस्थांच्या कुटुंबांत वनस्पतिरूपी अन्न असलें पाहिजे ही गोष्ट येथें स्पष्ट सांगितलें आहे.

यानंतर ऋषि-मुनि, साधु-संत वगैरे स्वतःची आध्यात्मिक उन्नति करतां परमात्म्याच्या आनंदाचें रसपान करतात. त्याचें वर्णन आहे. हें सुद्धां सोमपानच आहे. परंतु सर्व सामान्य गृहस्थांमध्यें हें सोमपान करण्याची योग्यता असत नाहीं. गृह-स्थाश्रमाचा धर्म ही योग्यता मनुष्यांत उत्पन्न करतो. म्हणजे गृहस्थाश्रमधर्माचें योग्य पालन केल्यानंतर मनुष्यामध्यें ही योग्यता उत्पन्न होते. गृहस्थाश्रमांत प्रगति केल्यानंतरची ही गोष्ट आहे. ही गोष्ट सूचित करण्यासाठीं आणि गृहस्थाश्रमीयांवर केवढी मोठी जबाबदारी आहे हें दर्शविण्याच्या उद्देशानें या सर्व प्रकारच्या सोमपानाचें वर्णन येथें करण्यांत आलें आहे.

वरातीचा रथ

पुढें ६ ते १२ मंत्रापर्यंत वरातीच्या रथाचें वर्णन आहे. हें सर्व वर्णन आलंकारिक भाषेत आहे. हा तर 'मनाचाच काल्पनिक ('**अनो मनस्मयं** । मं. १२ ' तसेंच ' **मनो अस्या अन आसीत्** । मं. १० ') रथ आहे. तरी सुद्धां काल्पनिक रथाचें वर्णन एवढ्यासाठीं दिलें आहे कीं, मनुष्यानें विवाहानंतर असा उत्तम रथ तयार करावा आणि वरात नेतानां वधूला मोठ्या थाटामाटानें पतीच्या घरीं घेऊन जावें. हा वरातीचा रथ कसा असावा याचें वर्णन पहाण्यासारखें आहे.

वरातीच्या रथाचा नमुना येथें वाचकांनीं पहावा. जेव्हां (**सूर्या पतिं अयात्**) सूर्याची कन्या स्वतःच्या पतीच्या घरीं जावयास निघाली तेव्हां ती अशा सुंदर रथांत बसून जात होती. हाच नमूना सर्व कन्यांच्या वरातीसाठीं नक्की करण्यांत यावा. अशावेळीं (**उपबर्हणं** । मं. ६) उत्तम तक्क्या रथांत ठेवण्यांत आला होता. स्त्रियांनीं डोळ्यांत काजळ घातलें होतें. पुरेसें धन (**कोशः**) बरोबर दिलें होतें. हें धन अलंकाराच्या अथवा धनाच्या रूपानें रोकड असो, ते यावेळीं रथांत असावें. जेव्हां रथ चालूं लागला तेव्हां सर्व लोकांनीं (**अनुदेयी** । मं. ७) अनुकूल आशीर्वाद दिले. सर्व लोकांनीं वधूची **नाराशंसी**) स्तुति केली. याप्रमाणें आजुबाजूचें सर्व वातावरण अगदीं अनुकूल होतें. त्यांत एकहि मनुष्य प्रतिकुल अथवा विरोध करणारा नव्हता. सर्वच प्रसन्न आणि वधूवरांचें हित चिंतणारे होते.

(**भद्रं वासः**) या समयीं उषेचें वस्त्र फारच उत्तम, फारच सुंदर होतें. अशीं सुंदर वस्त्रें नेसून नटून थटून स्त्रिया वधूजवळ आसपास उभ्या होत्या. या वरातींत पुढील भागीं गायक होते. ते सुंदर छंदांनीं आणि मधुर स्वरांनीं मंगल गीतें गातगात चालत होते. सर्वांपुढें दोन वैद्य चालत होते. त्यांच्या बरोबर मार्गदर्शक अग्नि होता. त्याच्या प्रकाशांत ही वरात जात होती.

ज्या रथांत वधू बसली होती त्या रथावर सुंदर छत होतें आणि त्याच्यावर मंदिरासारखा घुमट होता. आंतून सुंदर आकाशासारखें स्वच्छ वातावरण दिसत होतें. (**द्यौः छदिः** । मं. १०) दोन शुभ्र बैल (**शुक्रौ अनड्वाहौ**) या रथाला जोडले होते. ही वरात सोमाच्या घरीं जात होती. कारण कीं सोमच या उषेचा पति होता. सोमानेंच या उषेची मागणी केली होती. आणि या सोमाशींच उषेचा विवाह झाला होता.

जेव्हां सोमानें मागणी घातली तेव्हां देवांचे वैद्य दोन्ही अश्विनीकुमार हजर होते, म्हणजे वैद्यांसमक्ष ही मागणी करण्यांत आली होती. या मागणीचा स्वीकार उषेच्या पित्यानें केला होता.

सूर्यां यत् पत्ये शंसन्तीं मनसा सविता ददात् ॥
(मं. ९)

स्वतःच्या मनांत पतिविषयीं पूज्यभाव ठेवणाऱ्या उषेचें दान सूर्यानें पतीच्या हातीं केलें. ' यांत सविता स्वतःच्या पुत्रीचें दान पतीच्या हातीं करीत आहे असें वर्णन आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं कन्येवर प्रथम अधिकार पित्याचा असतो आणि विधियुक्त कन्यादान झाल्यावर पतीचा अधिकार असतो. वैदिक धर्माच्या दृष्टीनें स्त्री स्वतंत्र म्हणजे स्वेच्छाचारी होऊं नये. ती पित्याच्या अथवा पतीच्या आधीन असावी. या दोघांच्याहि गैरहजरींत तिनें सर्वांत मोठा पुत्र, भाऊ अथवा अन्य कोणी श्रेष्ठ पुरुष असेल त्याच्या आज्ञेंत रहावें. परंतु स्वतंत्रपणें तिनें राहूं नये. (**अदात्**) जे स्वतंत्र आहेत त्यांचे दान होऊं शकत नाहीं जे स्वतंत्र नाहींत म्हणजे ज्यांच्यावर दुसऱ्याचा अधिकार असतो तोच त्यांचें दान करूं शकतो. पुरुषाचें कधीं दान होत नाहीं. कारण तो सर्वस्वीं स्वतंत्र असतो. येथें कन्येचें दान सांगितलें आहे. पहा—

सूर्यां सविता पत्ये अदात् । (अथर्व० १४।१।९)
मह्यं त्वाऽदुर्गार्हपत्याय देवाः ।
(ऋ. १०।८५।३६; अथर्व १४।१।५०)

या दोन्हीं स्थळीं म्हणजे ऋग्वेद आणि अथर्ववेदांत (**अदात्, अदुः**) कन्यादानच सांगितलें आहे. त्यामुळें वैदिक काळीं स्त्रिया स्वतंत्र होत्या असें जें मानतात, ती त्यांची चूक आहे.

न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।

हें स्मृति वाक्य वेद संमतच आहे, असें यावरून वाटतें जे लोक या स्मृतिवचनाचा उपहास करतात त्यांनीं वरील वेदवचनांचें अधिक मनन करावें. स्त्रिया स्वतंत्र न रहाव्यात. बाल्यकाळीं मातापित्याच्या देखरेखींत शिक्षण घेत, विवाहानंतर पतिपासून शिक्षण घ्यावें. वरानें कन्येची मागणी वधूपित्याजवळ करावी आणि कन्येच्या पित्यानें (**मनसा अदात्**) स्वतःच्या मनानें संमति द्यावी. आणि त्यानंतर विवाह व्हावा. कन्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें पित्याच्या अनुमतिशिवाय स्वयंवर करूं शकत नसे. वेदांत स्वयंवरविषयक मंत्र कोठेंहि पहाण्यांत आले नाहींत. त्यावरून स्वयंवर पद्धति मागाहून सुरू झाली असें वाटतें. अस्तु.

या प्रकारें कन्यादानपूर्वक विवाह झाल्यानंतर वधू स्वतःच्या पतीच्या घरीं जाते. त्यावेळीं उत्तम सुंदर रथ तयार करण्यांत यावा. त्यांत गादी तक्कीये ठेवावेत. रथ सुंदर रीतीनें सजवावा.

मनोरम, सुंदर आरामदायक रथांत बसून वधू स्वतःच्या पतीच्या घरीं जावी.

हुंडा

विवाह होण्यापूर्वी वधूपित्यानें स्वतःच्या भावी जांवयास स्वशक्तिप्रमाणें (**वहतुः**) हुंडा (करणी-मानपान) पाठवून द्यावा. मंत्र १३ मध्यें (**गावः**) गायी हुंडा म्हणून देण्याचा उल्लेख आहे. गायीच खरोखर महान् धन आहे. दुसरें कोणतेंहि धन त्यापेक्षां कमी योग्यतेचेंच समजावें. गाईच्या दुधानें घरांतील सर्व आबालवृद्धांस पोषण मिळतें. म्हणूनच कन्येच्या पित्यानें भावी पतीला उत्तम गायी द्याव्यात आणि त्या विवाहापूर्वी त्याच्या घरीं पोहोंचवाव्यात. त्यानंतर विवाह व्हावा व नंतर वधू पतिगृहीं जावी. सूर्य मघा नक्षत्रांत असतां हुंडा पाठविला असला तर फाल्गुनी नक्षत्रावर विवाह व्हावा. म्हणजे कमींत कमी हें अंतर पंधरा दिवसांचें असतें. जास्तींत जास्त पंधराच्या गुणकांत जितके दिवस येतील तेवढें अंतर मानतां येईल. जांवयाच्या घरीं आधीं गायी पोहोंचल्यानें, त्या गाईंना जांवयाच्या घरांतील मनुष्यांची ओळख होते, माया लागते. तितका समय गेल्यानंतर विवाह व्हावा असें सांगण्याचें तात्पर्य आहे. जेव्हां ही वधू पतिगृहीं जाईल तेव्हां तिला आपल्या परिचित गाई भेटतील आणि गाईनांसुद्धां आपली परिचित स्वामिनी मिळाल्यानें, परस्पर प्रेम असल्यानें, वधूला नवीन घरीं बरेंच वाटेल. याप्रमाणें कन्यादानापूर्वी गाईचें दान हें वैदिक विवाहपद्धतीचें एक मुख्य अंग आहे.

मं. १४ आणि १५ मध्यें म्हटलें आहे कीं वधूपक्षाचीं दोन मनुष्यें घोड्यावर बसून वरगृहीं जावीत आणि त्यांनीं वरास हुंडा पोंचवावा. याप्रमाणें या मीलनास दुसऱ्या कुटुंबीजनांनीं संमति द्यावी. या प्रकारें हा विवाह होतो आणि सर्व नातेवाईक-आप्तेष्ट-सोयरेधायरे यांची त्यास संमति असते. मागणी घालण्याच्या वेळीं, विवाहप्रसंगीं आणि वरातीच्या वेळीं सर्व नातेवाईक मंडळी तसेंच कांहीं सज्जन, प्रतिष्ठित मंडळी हजर असावी, ही गोष्ट ' **देवाः** ' या पदानें दाखवली जात आहे. सूर्य आणि सोम यांच्या कुटुंबांतील मनुष्यें तसेंच त्यांच्या जातींतील सज्जन यांस (**देवाः**) देव म्हटलें आहे. याप्रमाणें मनुष्याच्या विवाहांत वर आणि वधू पक्षाच्या इष्ट मित्र, आप्त सोयरे आणि ज्ञातीचे प्रतिष्ठित लोक यांनीं हजर असलें पाहिजे. ही गोष्ट वरील वर्णनावरून आपोआप सिद्ध होत आहे. कारण की ज्याप्रमाणें सूर्यानें स्वतःच्या कन्येचा विवाह सोमाशीं केला, त्याप्रमाणें मनुष्यांनीं स्वतःच्या कन्यांचे विवाह केले पाहिजेत. वस्तुतः सूर्यानें स्वतःची कन्या उषा हीचा विवाह केल्याची हकीकत अलंकारिक आहे. असें वर्णन वेदांत एवढ्यासाठीं केलें आहे कीं तें पाहून लोकांनीं स्वतःच्या कन्यांचे विवाह या विधिप्रमाणें करावे. वेदांतील हें रूपक सूर्याची किरणें चंद्रास तेज-प्रकाश देतात या मूळ सिद्धांतावर रचलें आहे. आणि विवाहांतील आवश्यक सर्व बाबती या अलंकारिक वर्णनांत उत्तम प्रकारें संग्रहित करण्यांत आल्या आहेत.

जुना आणि नवा संबंध

मंत्र १७ आणि १८ यांत वधूचा संबंध पित्याच्या कुलापासून कसा सुटतो आणि तो पति कुळाशीं कसा निगडित होतो त्याचें उत्तम वर्णन आहे.

इतः बंधनात् प्रमुञ्चामि, न अमुतः । (मं. १७)
इतः प्रमुञ्चामि न अमुतः सुबद्धां करम् । (मं. १८)

या मंत्रांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, " या पुत्रीला आम्ही पितृकुलापासून सोडवतो आणि पतिकुळाशीं अशा मजबूत रीतीनें जोडतो कीं ती पतिकुळापासून कधींहि सुटूं नये ' कन्या पितृकुळापासून सुटणें तर आवश्यकच आहे परंतु येथें महान् प्रश्न असा उपस्थित होतो कीं ती पतिकुळापासून कोण्या प्रकारें सुटूं शकते काय ? या प्रश्नाच्या उत्तरांत वेदाचें असें म्हणणें आहे कीं पतीच्या कुळापासून ती कोणत्याहि प्रकारें संबंध सोडूं शकत नाहीं. कोणत्याहि परिस्थितींत तिचा पतिकुळापासून संबंध सुटणें वैदिक धर्म दृष्टीनें असंभवनीयच आहे. वरील मंत्रांत स्पष्ट रीतीनें सांगितलें आहे कीं, (**न अमुतः सुबद्धां करं**) तो संबंध सुटूं शकत नाहीं. पतिकुळाशीं तर तिचासंबंध अगदीं मजबूत जोडतों. मजबूत जोडण्याचा अर्थच असा कीं ती पतिकुळापासून कधीं विभक्त होऊं शकत नाहीं. नियोग पद्धतींत सुद्धां नियुक्त पुरुषाशीं संबंध झाल्यानें पतिकुळाचा संबंध सुदृढ रहातो. आणि संतति तर पूर्वपतीचीच समजली जाते. परंतु पुनर्विवाह तर अगदीं अशक्य. कारण कीं पुनर्विवाहानें पतीच्या कुळाचा संबंध सुटून जातो. म्हणून वैदिक धर्मांत स्त्रीच्या पुनर्विवाहाची संभावना जराहि नाहीं. वैदिक धर्मीय द्विजांमध्यें तर ती सर्वथा अशक्य, असंभवच आहे.

हल्लीचा पतित्याग (घटस्फोट = Divorce) अथवा पत्नीत्याग तर अगदींच अवैदिक आहे. हल्लीं युरोप-अमेरिकेच्या अंधानुकरणानें कांहीं थोडे लोक विवाहित संबंध न्यायालया मार्फत तोडावा या मताचे आहेत असें दिसतें. परंतु ही रीत वैदिकधर्मास अनुकूल नाहीं. स्वयंवरप्रथेस सुद्धां पत्नी अथवा पतीचा परि-

त्याग मान्य नाहीं, मग ब्राह्मविवाह पद्धतीला तर तो कसा मान्य होणार ? पूर्वमंत्रांत अशी उपमा योजिली आहे कीं, ज्याप्रमाणें एखादें फळ (**उर्वारुकं बंधनात्**) परिपक्व झाल्यामुळें वृक्षावरून अथवा वेलीवरून सुटें होतें, त्याप्रमाणें ही कन्या पितृकुळाच्या संबंधापासून विवाह समयीं मुक्त झाली आहे. तिचा संबंध पतिकुळाशीं झाला आहे आणि तो संबंध सुसंबद्ध म्हणजे दृढतर होऊन गेला आहे. त्यांतून सुटका होऊं शकत नाहीं. येथें वाचकांनीं वैदिक विवाहाची कल्पना उत्तम प्रकारें मनांत धारण करावी. हा स्थिर संबंध आहे. युरोपाप्रमाणें क्षण भंगूर नाहीं.

नंतर १९ व्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, ही कन्या वरुणाच्या पाशानें पितृकुळाशीं सुसंबंधित होती, विवाह समयीं ते पाश तोडून टाकण्यांत आले आहेत. वरुणाचे पाश दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें सुटूं शकत नाहींत. पितृकुळाशीं संबंध सुटून नवीन पतिकुळाशीं संबंध जोडण्यांत आला आहे. पतिकुळाशीं हा जो संबंध जोडला आहे, तो (**सह-संभलायै**) संभाळून ठेवण्यासाठीं आहे. पतिकुळांतील सबंधितांबरोबर या स्त्रियांचेंहि संरक्षण होत रहावें. म्हणजे ही कन्या बाळपणीं पितृकुळाशीं पाशानें बांधलेली होती, ती वरुण देवाच्या पाशानें बांधलेली होती आणि वरुणाचे पाश असे आहेत कीं ते तोडण्याची शक्ति कोणांत असत नाहीं. हे वरुणाचे पाश विवाहविधीनें तुटतात. परंतु ती वधू पतिकुळाशीं अशी बांधली जाते कीं ती त्यांतून आमरण स्वतःस सोडवून घेऊं शकत नाहीं. या पतिकुळांत रहाणारी ती–

ऋतस्य योनौ सुकृतस्य लोके स्योनम् ॥

(मं. १९)

' सत्याच्या स्थानांत आणि पुण्यवंताच्या स्थळांत जे सुख प्राप्त होऊं शकतें तें तिला पतीच्या घरीं प्राप्त होवो.' तिनें पतीच्या घरीं सत्यमार्गानें चालावें आणि पुण्यकर्म करतां करतां सुख प्राप्त करावें. हा स्त्रीचा धर्म आहे. पति जीवंत आहे तोपर्यंत अथवा त्याच्या मृत्युनंतर सुद्धां स्त्रीचा हाच धर्म आहे. या धर्मापासून तिनें च्युत न व्हावें. आणि या धर्माचें आचरण करतां करतां तिनें सुख प्राप्त करावें. स्त्रीचा स्वतंत्र आचार अथवा स्वेच्छाचार हा सर्वदा त्याज्यच मानला आहे. स्त्री पितृघरींहि स्वतंत्र नसते, अथवा पतिगृहीं सुद्धां स्वतंत्र नसते अथवा पतीच्या मृत्युनंतरहि ती स्वतंत्र होऊं शकत नाहीं.

कन्येच्या बाल्यकाळांत सविता देवानें वरुण-पाशांनीं तिला पितृकुळाशीं बांधून ठेवली होती. (मं. १९) विवाहानंतर ते पाश तर तुटून गेले, परंतु भग देवतेनें तिचा हात धरून तिला वरातीच्या रथापर्यंत चालविली. त्यानंतर जेव्हां ती पतिगृहीं जाण्यासाठीं रथांत बसली तेव्हां अश्विनौदेव तिचे रक्षक बनले. (मं. २०) जो पावेतों ती पतिगृहीं पोहोंचली नाहीं तोपर्यंत अश्विनीकुमार तिचे रक्षक असतात पण पतिगृहीं पोहोंचल्यानंतर—

गृहान् गच्छ, गृहपत्नी यथाऽसो वशिनी त्वम् ॥

(मं. २०)

पतिगृहीं ही नवी वधू पोहोंचल्यावर तेथें ती सर्वांना वश करून ठेवणारी होते. ती स्वतःचीं इंद्रियें ताब्यांत ठेवणारी होते. घरांतील कुटुंबीयांना वश करून घेते, आणि स्वतः वडिलांच्या आज्ञेत रहाते. पतिघरीं पोहोंचल्यावर असें तिचें वर्तन असतें. याप्रमाणें ती पितृगृहीं वरुणाच्या पाशांनीं बांधलेली रहाते. तेथें ती स्वतंत्र नाहीं, तिच्यावर मातापित्यांची देखरेख रहाते, देवतांची देखरेख असते आणि पतिगृहीं पतीच्या देखरेखीखालीं रहाते. हल्लीं युरोप, अमेरिकेंत अथवा रशियांत ज्या प्रकारचें स्वातंत्र्य स्त्रियांना देण्यांत येतें, त्याप्रकारचें स्वातंत्र्य वेदकाळीं स्त्रियांना दिलें गेलें नव्हतें. नियमांच्या मर्यादेंत राहून जेवढें स्वातंत्र्य मिळूं शकेल तेवढेंच त्यांना होतें. विद्या, कला, संस्कृति इत्यादींच्या प्राप्तिसाठीं जेवढी स्वतंत्रता आवश्यक असेल तेवढी त्यांना मिळत असे. परंतु हल्लीं कॉलेजांतील कुमार-कुमारी यांना जें सहशिक्षण देण्यांत येतें, ती पद्धति वेदकाळीं नव्हती. त्याकाळीं जरूर तें व तेवढेंच शिक्षण कन्येस मातापित्यांकडून घरींच मिळत असे, आणि नंतर पति जवळून मिळत असे, स्वतंत्रपणें कॉलेजहॉस्टेलांत राहून आणि मुलांत मिळून-मिसळून शिक्षण मिळवणें वेदकालीं असंभवनीयच होतें.

गृहस्थाश्रमाचा आदर्श

पुढें २१ ते २३ मंत्रापर्यंत गृहस्थाश्रमाचें सुंदर वर्णन आहे. प्रत्येक गृहस्थाश्रमीयास तें पाहण्याचा अधिकार आहे. जो धर्मानुकूल राहून गृहस्थधर्माचें पालन करतो त्याला तें प्राप्त होतें.

१. अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि । (मं. २१)

या पतीच्या घरांत जागृत राहून म्हणजे दक्षतेनें स्वतःचा गृहस्थ धर्म पाळ. ' तुझ्या गृहस्थ धर्मांत जराहि शिथिलता येऊं देऊं नको. दक्षतेनें स्वतःच्या पतीच्या घरीं रहा आणि तुझें कर्तव्य कर.

२. इह ते प्रजायै प्रियं समृद्ध्यताम् (मं. २१)

' या गृहस्थाश्रमांत राहून तुझ्या संततीचें प्रिय, शुभ आणि कल्याण करण्याचें तुझें मुख्य कर्तव्य आहे.' सुसंतान निर्माण करणें हा गृहस्थाचा धर्म आहे. गृहस्थ धर्मरूपी वृक्षाचीं हीं फुलें-फळें

आहेत. त्यांस उत्तम करण्यासाठीं जेवढे परिश्रम घ्यावेत तेवढे थोडेच आहेत. मातापित्यांचे सर्व संस्कार अंशरूपानें संततींत उतरतात; म्हणून कोणतेहि अशुभ संस्कार आपल्या संततिवर न होतील अशी काळजी घेणें हें मातापित्यांचें कर्तव्यच आहे. शरीरांतील रोग, वाईट संवयी आणि अन्य कुसंस्कार संततींत अंशरूपानें उतरतात, म्हणून मातापित्यांनीं स्वतःचें चारित्र्य शुद्ध, पवित्र, परिपूत होईल असें करावें आणि तशींच शुभ, संस्कारी संतति निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. याप्रमाणें प्रयत्न करतां करतां संततींत शुभ संस्कारच येतील, क्रमानें प्रजा सुधरेल आणि सुसंस्कार संपन्न होत जाईल.

३. एना पत्या तन्वं सं स्पृशस्व । (मं. २१)

' या पतिसह आनंदानें प्रसन्न मनानें रहा. ' सर्व प्रकारचे धर्मानुकूल उपभोग प्राप्त कर. नेहमीं प्रसन्न मनानें सर्व दिवसांतील कार्यें करीत समय व्यतीत कर. दुःखी, कष्टी राहिल्यानें चिडकेपणा मुलांबाळांत उतरतो; म्हणूनच जें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे त्याच्या उपभोगानें चित्त प्रसन्न ठेऊन, त्याचप्रमाणें इतर प्रसंगींहि अंतःकरण सदाशुभ वृत्तींनीं परिपूर्ण ठेवणें हेंच योग्य होय, कारण या संसाराचा मुख्य नियम हाच आहे.

४. अथ जिर्विः विदथं आ वदासि । (मं. २१)

' याप्रमाणें गृहस्थाश्रमांत राहून जेव्हां यौवन निघून जाईल, वृद्धावस्था प्राप्त होईल तेव्हां, म्हणजे पुष्कळ अनुभव प्राप्त झाल्यानंतर तुझ्या त्या अनुभवांचा उपदेश दुसऱ्यांना दे. ' याच्यापूर्वी अनुभव प्राप्त केल्यावांचून नव्हे. त्या पूर्वींचा काल ज्ञान प्राप्त करण्याचा आहे. उपदेश देण्याचा नव्हे. उपदेश करणें हें अनुभवी वृद्धांचेंच कार्य आहे. या संसारांत पूर्णपणें आनंद व अनुभव प्राप्त झाल्यानंतरच मनुष्यानें उपदेश करावा. त्यापूर्वीच जे उपदेश देत सुटतात त्यांत लाभ होण्याऐवजीं नुकसान जास्त होण्याचा संभव असतो. मनुष्याचा अनुभव जितका मोठा त्या मानानें तो उपदेश करण्यास अधिक योग्य ठरतो.

५. इहैव स्तं, मा वियोष्टं, विश्वमायुर्व्यश्नुतम् । (मं. २२)

' पतिपत्नींनीं या गृहस्थाश्रमांत स्थिर रहावें, त्यांचा वियोग न व्हावा. पूर्णायुष्याच्या अंतापर्यंत त्यांनीं एक विचारानें एकत्र रहावें. ' हा विवाहित कुटुंबाचा आदर्श आहे. विवाह होतांच वैवाहिक संबंधांचा परित्याग करण्याची वाईट प्रथा जी कित्येक पाश्चात्य देशांत आहे त्या प्रथेचें नांवनिशाण वैदिक विवाहांत पहावयास मिळणार नाहीं. वेदाची अशी इच्छा आहे कीं एकदां जो विवाह झाला तो जीवनाच्या अंतापर्यंत स्थिर रहावा. त्यांत कोणत्याही प्रकारें विरोध उत्पन्न न व्हावा. भांडणें होऊन विवाहित पतिपत्नीचा संबंध तुटूं नये.

६. स्वस्तकौ मोदमानौ पुत्रैः नप्तृभिः क्रीडन्तौ । (मं. २२)

' पतिपत्नी उत्तम घरांत राहोत, आनंदानें प्रसन्न राहून, पुत्रपौत्रांसह हंसून खेळून, सुखानें गृहस्थाश्रमाचें कर्तव्य करीत राहोत. ' गृहस्थाश्रमांत रहाणारे मनुष्य दुःखी चिडखोर स्वभावाचे न होतां आनंदानें मन प्रसन्न ठेऊन सुखानें स्वतःचीं कर्तव्यें करीत राहोत.

७. सूर्य चंद्राप्रमाणें तेजस्वी पुत्र असावेत. (मं. २३)

ज्याप्रमाणें सूर्यचंद्र सर्व जगास प्रकाश देणारे आहेत त्याचप्रमाणें गृहस्थाच्या घरांत उत्तम तेजस्वी संतति व्हावी. ती निरनिराळे खेळ खेळत (**क्रीडन्तौ**) राहोत. (**मायया चरतः**) आपल्या प्राविण्यानें सर्व जगांत भ्रमण करोत अर्थात् कुशलतेनें कार्य करोत. ते कलासंपन्न व्हावेत, आणि विश्व भ्रमण करणारे होवोत. कलेचा पुष्कळच विकास करोत. वरील उपमेंत चंद्रमा कलायुक्त असल्यानें त्याला कलानिधि म्हटलें जातें. त्याच्या सारखेच तेहि कलानिधि होवोत, आणि कलाकुशलतेनें स्वतःची आणि राष्ट्राची उन्नति करोत. स्वतःच्या संततीस कलाकौशल्याचें—कारागिरीचें शिक्षण दिलें पाहिजे, ही गोष्ट येथें स्पष्ट होते.

ब्राह्मणांस धन आणि वस्त्रदान

मं. २५ मध्यें (**ब्राह्मणेभ्यो वसु विभज, शामुल्यं च देहि**) ' ब्राह्मणांस धनदान आणि वस्त्रदान करावें. ' याप्रमाणें ब्राह्मणांस दान करण्याची आज्ञा येथें दिली आहे. विवाहाच्या वेळीं सुयोग्य, विद्वान् ब्राह्मणाला धन आणि वस्त्र यांचें दान करावें. गाय, जमीन इत्यादींचेंहि दान दिलें पाहिजे. हें दान वधूच्या समक्ष देण्यांत यावें म्हणजे त्याचा सात्त्विक परिणाम वधूवर होतो. असें दान द्यावयास हवें ही गोष्ट वधूच्या मनावर उत्तम प्रकारें ठसविली पाहिजे. जर दातृत्वाचा गुण वधूंत नसेल आणि निव्वळ भोगांतच त्या वधूचें मन रममाण होणार असेल तर त्या कुटुंबाचा नाश करणारी ती एक राक्षसीच तयार झाली असें म्हणावें लागेल. अशी भोगी स्त्री—

एषा पद्वती कृत्या जाया पतिं विशते ॥ (मं. २६)

' ही एक दोन पायांची राक्षसीच भार्यारूपानें पतीच्या घरांत प्रवेश करीत आहे. ' ज्या स्त्रीच्या मनावर दान देण्याचा परिणाम झालेला नाहीं ती एक राक्षसी स्त्री आहे असें समजलें पाहिजे. गृहस्थाचें भूषण उदार स्त्री होय. उदारतेचें शिक्षण त्या

स्त्रिला तिच्या पित्याच्या घरीं तसेंच पतीच्या घरीं मिळणें आवश्यक आहे. आणि म्हणूनच दान करण्याचें महत्त्व तिच्या मनावर ठसविलें पाहिजे. गृहशिक्षणाचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. जिच्यामध्यें दानाची वृत्ति जागृत झाली नाहीं तिच्यांत (**कृत्यासक्तिः**) मारफोड, तोडफोड अशा हिंसक वृत्ति प्रकट होतात. कोणत्याहि स्त्रीमध्यें अशी क्रूरबुद्धि उत्पन्न न व्हावी म्हणून दानबुद्धि वधूमध्यें असली पाहिजे. जर तसें न होतां पत्नी स्वैराचारिणी झाली, तर त्या कुळाचा अंतीं नाश ठेवलेलाच आहे असें समजावें.

एधन्ते अस्याः ज्ञातयः, पतिर्बन्धेषु बध्यते ॥
(मंत्र २६)

' त्याच्या ज्ञातींत कलह प्रबळ होतो आणि अंतीं बिचारा पति कलहाच्या बंधनांत बांधला जातो. ' यासाठींच कन्येमध्यें आणि वधूमध्यें प्रथमपासून दान देण्याची बुद्धि, परोपकार करण्याची बुद्धि स्थिर व्हावयास हवी. स्वसुखाचा त्याग करून सुद्धां सज्जनांची सेवा करण्याची बुद्धि स्थिर व्हावयास हवी. धर्मसेवा, रुग्णसेवा, इत्यादि सेवाभाव सर्वांत वृद्धि पावावा आणि या सेवेनेंच सर्व द्वेषभाव दूर होतील ही गोष्ट सर्व लोक जाणतातच.

पुरुषानें स्त्रिचीं वस्त्रें वापरूं नयेत

मं. २७ यांत म्हटलें आहे कीं, पुरुषानें कधींहि स्त्रिचीं वस्त्रें वापरूं नयेत. पुरुषाचें शरीर कितीहि सुंदर असलें तरी स्त्रिचीं वस्त्रें वापरण्यामुळें तें अश्लील, शोभारहित होतें.

हा निषेध स्त्रिनें एकदां वापरलेलीं वस्त्रें पुरुषानें वापरूं नयेत अशाविषयीं आहे कीं, नाटकांत पुरुष स्त्रीपात्रानें काम करतांना स्त्रिचा पोषाख करतो त्याविषयीं आहे, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. वाचकांनीं त्याचा अधिक विचार करावा. कुटुंबांत पतीनें स्त्रिचे कपडे कधीं वापरूं नयेत हा बोध येथें आहे, यांत शंका नाहीं. असा निषेध स्त्रिनें पुरुषाचे कपडे वापरूं नयेत याविषयीं नाहीं, ही गोष्ट विशेष मनन करण्यासारखी आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं स्त्रियांनीं एकदां वापरलेले कपडे आरोग्यदृष्ट्या पुनः वापरण्यालायक नसतात. येथें एका स्त्रिचे वापरलेले कपडे दुसऱ्या स्त्रिनें वापरूं नयेत असाहि निषेध नाहीं. येथें फक्त स्त्रिचे कपडे पुरुषानें वापरूं नयेत एवढी गोष्ट असंदिग्ध आहे. वाचकांनीं या गोष्टीचा अधिक विचार करून निश्चय ठरवावा.

विविध प्रकारचीं वस्त्रें वापरल्यानें स्त्रिच्या रूपांत विशेष शोभा उत्पन्न होते, असें मंत्र २८ यांत म्हटलें आहे. (**आशसनं**) काठाचें वस्त्र, (**विशसनं**) डोक्यावरून पदर घेण्याचें वस्त्र, आणि (**अधिविकर्तनं**) सर्वांग लपेटून घेण्याचें वस्त्र आहे. स्त्रियांनीं वापरण्याचीं हीं तीन वस्त्रें आहेत. या वस्त्रांच्या विविध रंगरूपानें स्त्रियांच्या रंगरूपांची सुंदरता वृद्धिंगत होते.

कन्येचे गुरु

कन्येला कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळावें हाहि एक मोठा बिकट प्रश्न आहे. हल्लीं कन्या आणि कुमार एकाच पाठशाळेंत शिक्षण घेतात, आणि त्यांचा अभ्यासक्रमसुद्धां एकसारखाच असतो. खरें पहातां स्त्रीपुरुषांचीं कार्यक्षेत्रें विभिन्न असल्यानें एकाच प्रकारचा शिक्षणक्रम उभयतांस सारखाच लाभदायी होणें शक्य नाहीं. परंतु हल्लीं स्त्रियांचें पुरुषीकरण आणि पुरुषांचें स्त्रीकरण होत आहे. मिश्र अभ्यासक्रम आणि सहशिक्षणाचा हा दोष आहे. वेदाच्या उपदेशाप्रमाणें स्त्रीपुरुषांचा अभ्यासक्रम विभिन्न असावयास हवा. स्त्रियांना मुख्यतः सूपशास्त्र म्हणजे स्वयंपाकाविषयीं जास्त ज्ञान असावयास हवें. (**एतत् तृष्टं**) हा पदार्थ तृषा उत्पन्न करणारा आहे, अर्थात् पित्तकारक आहे, (**एतत् कटुकं**) हा कडू आहे, (**एतत् अपाष्ठवत् विषवत्**) हा पदार्थ स्वास्थ्य बिघडविणारा आहे, हा पदार्थ विषाप्रमाणें मृत्यु उत्पन्न करणारा आहे, (**एतत् अत्तवे न**) हा पदार्थ खाण्यास योग्य नाहीं, अशा प्रकारचें निषिद्ध पदार्थांचें ज्ञान कन्यांच्या अभ्यासक्रमांत असावें. तसेंच खाण्यास योग्य पुष्टिकारक अशा सात्त्विक पदार्थांचेंहि ज्ञान स्त्रियांना शिकविलें पाहिजे. स्त्रियांवर स्वतःच्या मुलांच्या लालनपालनाची जबाबदारी असते, म्हणून त्यांना भक्ष्य, भोज्य, लेह्य, पेय, चोष्य इत्यादि खाद्य पदार्थांविषयीं उत्तम ज्ञान असणें आवश्यक आहे. या प्रकारचा अभ्यासक्रम स्त्रियांसाठीं असावा; आणि त्यांच्यावर भावी जीवनांत जी जबाबदारी पडावयाची आहे, ती पार पाडण्याची पूर्ण योग्यता त्यांच्यांत उत्पन्न व्हावयास हवी.

जो गुरु अशा प्रकारचें शिक्षण कन्येस देतो त्याला कन्येच्या विवाहप्रसंगीं वस्त्राचें दान करणें योग्य आहे.

याप्रमाणें ३० व्या मंत्रांत म्हटलें आहे कीं जो गुरु (**प्रायश्चित्तिं अध्येति**) चित्त शुद्ध करण्याचा उपदेश देतो, चित्त वाईट मार्गानें जाऊं इच्छित असतां त्यास धर्ममार्गावर पुनः ठिकाणीं आणण्याइतका विवेक ज्या सद्गुरूच्या कृपेनें मनांत उत्पन्न होतो, त्या सद्गुरूचा सन्मान अवश्य केला पाहिजे. त्या कन्येच्या विवाहप्रसंगीं ज्यानें त्या कन्येला पूर्वोक्त ज्ञान दिलें आहे आणि उत्तम प्रकारें शिक्षण दिलें आहे, त्या ब्राह्मणाला (**सुमं-**

गलं स्योनं वासः) उत्तम, मंगल आणि शुभ वस्त्र अवश्य दिलें पाहिजे. कारण की या ज्ञानानें (येन जाया न रिष्याति) त्या स्त्रिचें पतन होत नाहीं. ती स्त्री स्वतःच्या धर्ममार्गात राहून सर्वांस आनंद देते असा हा शिक्षणाचा प्रभाव आहे. असें शिक्षण कन्यांस द्यावयास हवें.

स्त्रियांस जर योग्य शिक्षण न देण्यांत आलें तर त्याच्या अभावीं त्या पतिकुळाचा नाश कशा प्रकारें करूं शकतात त्याचें वर्णन मं. २५।२६ च्या पूर्वभागांमध्यें आहे. यावरून स्पष्ट होतें की स्त्रियांना सुशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षण न मिळाल्यानें फारच भयंकर आणि अनिष्ट परिणाम होतात.

सद्व्यवहारानें धन मिळवा

गृहस्थाश्रमांत धनाची आवश्यकता नेहमींच असते. कोणतेंहि कार्य धनाशिवाय होऊं शकत नाहीं, म्हणून गृहस्थानें धन मिळविणें हें अत्यंत आवश्यक आहे. हें धन कशा रीतीनें मिळवावयाचें ही एक महान् समस्या गृहस्थासमोर नित्य उभी असते. त्याचें उत्तर ३० व्या मंत्रांत दिलें आहे.

(**ऋत-उद्येषु ऋतं वदन्तौ**) सरळ व्यवहारांत सरळ भाषण करा. त्यांत छळ, कपट असूं नये. प्रथमपासूनच वेड्यावाकड्या व्यवहारांत पडूं नये. जो कांहीं व्यवहार करणें तो सरलतेनें करावा, आणि तो व्यवहार करतांनाहि सरळ भाषण करावें. याप्रमाणें धर्मानुकूळ सरळ व्यवहार करून (**समृद्धं भगं संभरन्तं**) पुष्कळ धन प्राप्त करा. तुम्हांस जेवढ्या धनाची आवश्यकता असेल तितकें धन मिळवा. धर्मानुकूल व्यवहारानें निःसंदेह यश प्राप्त होईल आणि समृद्धिसुद्धां प्राप्त होईल.

पतिपत्नींनीं स्वतःच्या घरांत प्रेमपूर्वक रहावें. (**संभलः चारु वाचं वदतु**) पतीनें स्वतःच्या धर्मपत्नीशीं मधुर भाषण करावें. मंगल, सुविचाराचे शब्द बोलावेत, आणि सुंदर वाणीनें सत्कार करावा. तसेंच (**अस्यै पतिं रोचय**) या स्त्रिला पतिविषयक चांगली अभिरुचि होवो. परस्परांमध्यें पुष्कळ प्रेम असो. याप्रमाणें दोघे प्रेमानें एकत्र राहोत, व्यवहार करोत आणि स्वतःची उन्नति करून घेवोत.

गोरक्षण

मंत्र ३२ आणि ३३ मध्यें गृहस्थांनीं गोरक्षण करावें असा फार उपयोगी उपदेश आहे. गाय ही गृहाची शोभा आहे. बालकांची उन्नति त्यांच्यामुळें होते. गाईमुळेंच सर्व प्रकारचा उत्कर्ष होतो, यासाठीं गोपालन हा गृहस्थाचा धर्म आहे.

सरळ मार्ग

सर्वांना अनुसरण्याचा मार्ग सरळ आणि निष्कंटक असावा, याविषयीं ३४ व्या मंत्रांतील आदेश ध्यानांत ठेवण्यासारखा आहे–

पन्थानः अनृक्षरा ऋजवः सन्तु ॥ (मं. ३४)

' मार्ग कंटकरहित आणि सरळ असावा. ' घरीं पोंहोचण्याचा मार्ग, घराच्या आसपासचे मार्ग, राष्ट्रांत दळणवळणाचे मार्ग, सर्व निष्कंटक आणि सरळ असावेत. शक्य तो त्यांत वळणें, वांकडेपणा नसावा, मनुष्याच्या व्यवहाराचे मार्गसुद्धां सरळ असावेत. येथें फक्त जाण्यायेण्याचेच मार्ग सरळ असावेत हें सांगण्याचा उद्देश नाहीं, कारण की ते मार्ग तर ज्या प्रकारची जमीन असेल तसे होतील. परंतु मनुष्याच्या जीवनांतील वागण्याचे मार्ग सरळ असले पाहिजेत, ही गोष्ट वैशिष्ट्यानें येथें सांगितली आहे. मार्गांमध्यें कांटे पसरण्यांत न यावेत. हल्लीं राष्ट्राच्या आणि समाजाच्या व्यवहारांत असें दिसतें की मनुष्य स्वतःच स्वतःच्या मतिहीनतेनें आपल्या मार्गांत कांटे पसरतो, आणि जेथें सरळ आणि सोपा व्यहार करण्याची शक्यता असते तेथें वांकडा व्यवहार करून सुखप्राप्तीच्या ऐवजीं, दुःख ओढवून घेतो. तर अशा प्रकारें या गृहस्थानें स्वतःच्या मार्गांत कांटे पसरूं नयेत असा उपदेश वेद येथें गृहस्थाश्रमाच्या आरंभीं देत आहे. सर्व गृहस्थाश्रमी ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवोत. या प्रकारें सरळ रस्त्यानें जाण्यामुळें (**धाता भगेन वर्चसा सं सृजतु**) परमेश्वर धन आणि तेज देवो. तो परमेश्वर सरळ व्यवहार करणाऱ्यास तें फळ अवश्य देतोच. त्यामध्यें कोणीं कांहीं शंका घेण्याचें कारणच नाहीं. परमेश्वराचें सहाय्य मिळविण्याचा मार्गसुद्धां सरळ आणि निष्कंटक आहे. तोच धर्ममार्ग आहे. या मार्गानें जाण्यानें सुखधामाला पोहोंचतां येतें. या प्रकारें या मंत्रांतील उपदेश पुष्कळच मनन करण्यासारखा आहे, आणि प्रत्येक गृहस्थानें तो ध्यानांत धरावा. कारण प्रत्येकाची उन्नति सरळ आणि निष्कंटक मार्गानेंच होण्याचा संभव आहे. उन्नतीचा दुसरा कोणता मार्गच नाहीं.

तेजस्वी व्हा

गृहस्थानें तेजस्वी, उत्साही व्हावें, कधींहि निरुत्साही होऊं नये. गृहस्थाचा धर्म उत्साहाचा आहे. हा तेजस्वी मनुष्यांचा धर्म आहे, म्हणून वेद उपदेश करतो कीं मनुष्यानें तेजस्वी व्हावें. येथें प्रश्न असा उत्पन्न होतो कीं गृहस्थानें तेजस्वी कसें व्हावें ? त्याचें उत्तर वेद असें देत आहे—

यत् वर्चः अक्षेषु सुरायाम् । (मं. ३५)

' जें तेज डोळ्यांत अथवा जुगाराच्या फाशांत आणि मद्यांत

*

राहिलें आहे. ' तें तेज या गृहस्थामध्यें येवो. हें वाचून वाचक म्हणतील हा काय अनर्थ आहे ? वेद असा उपदेश कां करीत आहे ? अशा उपदेशानें वेद गृहस्थाला मद्यपी आणि जुगारी करूं इच्छितो काय ? परंतु येथें तेजस्वी उत्साहाचें वर्णन आहे. कोणत्या मनुष्यांत उत्साह अत्यधिक दिसतो ? उत्तरांत हें कबूलच करावें लागेल कीं जुगारी आणि मद्यपि लोकांत उत्साह उत्कटतेनें दिसतो. कारण कीं जुगार खेळण्यास सरकारी प्रतिबंध आहे, जुगाऱ्यांस सरकारी अधिकारी पकडतात, न्यायालयांत त्यांस दंड होतो आणि अंतीं त्यांस शिक्षाहि होते. घरचीं माणसें त्याचीं विरोधी होतात, इष्टमित्र आणि नातेवाईक त्यानें जुगार खेळूं नये. इच्छितात परंतु अट्टल जुगारी रात्रीच्या वेळीं अंधारांत लपतछपत, तहानेलेला-भूकेलेला, वाटेल ते कष्ट सहन करील पण जुगारखान्यांत गेल्यावांचून रहात नाहीं. त्यास कोणाचें भय नसतें, तो स्वतःच्या निश्चयापासून चळत नाहीं. हा त्याचा निश्चय, प्रयत्न, उत्साह तसेंच मनाची एकाग्रता हे गुण अनुकरणीय नाहींत काय ? जे तेजस्वी गुण तो त्या जुगारखान्यांत फांशामागें निष्फळ उधळतो तेच जर तो श्रेष्ठ पुरुषार्थाच्या कार्याकडे लावील तर त्याची उन्नति होईल, त्यास सर्व कांहीं साध्य होईल. तो कृतकृत्य होईल यांत काय शंका. म्हणून वेदानें म्हटलें आहे कीं जें तेज आणि उत्साह जुगारी मनुष्य जुगाराच्या खेळाकडे खर्च करतो तें तेज आणि उत्साह गृहस्थानें गृहस्थधर्मपालनांत दर्शवावा. तितका मनोनिग्रह, तितका निश्चय, तितका उत्साह, तितका प्रयत्न गृहस्थानें स्वतःच्या धर्मपालनांत दाखवावा असा उपदेश वेद येथें करीत आहे. मद्यपि सुद्धां दारू पिण्याची वेळ होतांच दारूच्या पिठ्यांत नेमका जाऊन पोहोंचतो, आणि दारू पितो. त्याची वेळ चुकत नाहीं. स्वतःच्या इष्टमित्रांसही स्वखर्चानें दारू पाजतो. अशी उदारतासुद्धां मद्यप्यांत असते. या मद्यप्यांमध्यें दारू पिण्याचें कार्य करण्याची वेळ चुकूं न देण्याचा जो नियमितपणा असतो, तसेंच आपल्या मित्रांस आपणाप्रमाणेंच दारू पाजून मद्यपी बनविण्याची जी विलक्षण ओढ असते तसा नियमितपणा, ओढ, उदारता, गृहस्थामध्यें असावयास हवी. स्वतःचीं कार्यें करण्यांत गृहस्थानें पुष्कळच उत्साह दाखवावा, आणि उदारतेनें दानें द्यावींत. असा उपदेश या मंत्रांतून गृहस्थ मिळवूं शकतो.

हाच दारू आणि फाशांचा दृष्टांत ३६ व्या मंत्रांत निराळ्या प्रकारें पुनः आला आहे. त्याचा भाव हाच आहे. त्यांतून घेण्या-सारखा तो उपदेश घ्यावा. महान् थोर पुरुष कुत्रा आणि किडा-मुंगी-जीवजंतूंपासूनहि बोध घेतात. सावध झोंप आणि स्वामी-निष्ठेचा उपदेश कुत्र्यापासून घेतला पाहिजे, आणि प्रयत्नशील तेचा, सतत उद्योगाचा उपदेश मुंग्या-मद्यप्यांपासून घ्यावयास हवा. त्यांच्या इतर दुर्गुणांकडे महात्मे लक्ष देत नाहींत. फक्त त्यांचे सद्‌गुण तेवढे स्वीकारतात. याप्रमाणेंच जुगारी आणि मद्यप्यांविषयीं सुद्धां समजावें. असा उपदेश गृहस्थानें प्राप्त करावा आणि स्वतःच्या गृहस्थधर्माचें पालन उत्तम रीतीनें करून कृतकृत्य व्हावें.

वाचक म्हणतील अशीं उदाहरणें येथें दिलींच कशाला ? चांगलीं दुसरीं उदाहरणें जगांत नाहींत काय ? त्याचें उत्तर इतकेंच कीं मनुष्याला व्यसनाविषयीं जेवढी ओढ असते तेवढी सदाचारा-विषयीं असत नाहीं. बहुधा हाच नियम सर्वत्र आहे. संसारांत राहून परमार्थ साधन मनुष्य कशाप्रकारें करूं शकेल ? त्यावर शास्त्रकार उत्तर देतात व्यभिचारिणीप्रमाणें. ज्याप्रमाणें व्यभि-चारिणी स्त्री स्वतःच्या विवाहित पतिसह स्वतःच्या संसारांतील कार्यें करीत असतांना सुद्धां मनांत परपुरुषाचें ध्यान नेहमींच करीत असते आणि संधि मिळतांच त्याच्याजवळ जाते, त्याप्रमाणें संसारी जीवांनीं संसारांतील कर्तव्यें पार पाडीत असतांनाच सर्व ध्यान परपुरुष अथवा परमपुरुष परमात्म्याकडे लावावें आणि संधि मिळेल तेव्हां त्याची उपासना करावी. ही उपमा जरी हीन आहे तरी अर्थपरिपूर्ण आहे. त्याचप्रमाणें जुगारी आणि मद्यपि यांच्या उपमासुद्धां हीन असल्या तरी अर्थपूर्ण आहेत. त्यांची कार्यतत्परता एवढाच गुण मनुष्यानें आपणांत आणावा आणि कृतकृत्य व्हावें हेंच योग्य आहे.

मंत्र ३५ आणि ३६ मध्यें गाईच्या स्तनांत तेजस्विता दुधरूपानें भरलेली आहे, सर्व गृहस्थाश्रमीयांनीं या तेजस्वितेनें युक्त व्हावें, असें सांगितलें आहे. ' **गोषु वर्चः। महानघ्न्याः जघनं ।** ' या शब्दांनीं गाईचें दुग्धस्थान सूचविलें आहे. खरोखर गाईचें दूध अत्यंत तेजस्वी आहे. म्हशीचें दूध जड आणि सुस्तीकारक आहे. परंतु गाईचें दूध सुस्ती दूर करणारें आहे. म्हणून गृहस्थाच्या घरांतील सर्व मनुष्यें मुलें-लेंकरांनीं गाईचें दूध पिऊन, तेजस्वी, ओजस्वी, वर्चस्वी, दीर्घायु आणि पुरुषार्थी व्हावें.

पाण्यांत एक प्रकारचें तेज आहे. यामुळें तेजस्विता, माधुर्य, वीर्य, आणि सामर्थ्याची वृद्धि होते. गृहस्थानें जलापासून हे गुण प्राप्त करावेत. वेदांत अन्यत्र जलास जीवनाचें एकमेव साधन म्हटलें आहे, रोगनाशक, आरोग्यवर्धक मानलें आहे, तोच सर्व आशय सारांशरूपानें या ३७ व्या मंत्रांत सांगितला आहे. गृहस्थांनीं या मंत्राचें पुष्कळ मनन करावें.

मं. ३८ वा तर सर्वांनीं सर्व काळ मनन करण्यालायक आहे. सर्वांनीं तो तोंडपाठ करून त्याचा नित्य पाठ करावा—

१. रुशन्तं तनूदूर्षि ग्रामं अपोहामि ॥

२. भद्रः रोचनः तं उद्चामि ॥ (मं. ३८)

(१) जो शरीरास क्षीण करणारा, शरीरांत विष उत्पन्न करणारा, आणि शरीरांत प्रवेश करून स्थिर होणारा दोष अथवा रोग बीजें आहेत, त्यांस मी दूर करतों. आणि (२) जे शरीराचे तेज वाढविणारे आणि स्वतःचें सर्वदा कल्याण करणारे आहेत, त्यांना मी माझ्याजवळ ठेवतों.' हा नियम तर सर्वच मनुष्यांनीं सदा सर्वदा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे आणि त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे. प्रत्येक ठिकाणीं दोष दूर करून गुण स्वतःमध्यें वाढविणें हें योग्य आहे. हा उन्नतीचा एकमात्र उपाय आहे. वधूवरांनीं तर स्वतःच्या घरांत याच नियमाचें पालन करावें.

मं. ३९ मध्यें म्हटलें आहे (**श्वशुरः देवरः च प्रतीक्षन्ते**) कीं पतीच्या घरांत सासरा आणि दीर वधू येण्याची मार्गप्रतीक्षा करीत असतात. वधूचें स्वागत करण्यासाठीं सर्वजण उत्सुकतेनें बसलेले असतात. ही मंगलकारक वधू स्वतःच्या पतीच्या घरांत प्रवेश करो. तेथें पोहोंचतांच अग्नीला प्रदक्षिणा करो, अग्नीला नमन करो आणि नंतर श्वशुर वगैरे वडिल मंडळींचें दर्शन घेवो. तेथें ब्राह्मणांनीं मंत्रोच्चारानें पवित्र केलेल्या जलानें वधूला अभिषेक करावा. हें जळ वधूमध्यें जो थोडासा भित्रेपणा असेल (**अवीरघ्नी आपः**) तर तो दूर करील. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. आर्यांत भीरूता असतां कामां नये. आर्य नेहमीं नीडर, धैर्याच्या मेरुपर्वताप्रमाणें अचल असले पाहिजेत. म्हणून वधू गृहस्थाश्रमांत प्रवेश करून पतीच्या घरीं जें प्रथम स्नान करणार तें स्नान ब्राह्मणद्वारां वेदमंत्रांनीं पवित्र आणि निर्दोष झालेल्या पाण्यानें केल्यानें या वधूमध्यें भीरूता वगैरे जे दोष राहिले असतील ते दूर होऊन, ती पवित्र, मंगल, व धैर्यशाली होईल. स्वतःच्या संततीस सुयोग्य उपदेशानें उत्तम आर्यवीर बनवील अशी सुयोग्य गृहस्वामिनी ही वधू व्हावी.

पतीच्या घरचें सुवर्ण, रत्नादि आभूषणें या नववधूला कल्याणकारी होवोत. तिचें पतन करणारीं तीं न होवोत. कारण सहसा धनानें मनुष्याचें पतन होतें. धनानें उत्पन्न झालेला अहंकार मनुष्यास अधोगतीस पोंहोचवितो; म्हणून सावधानतेची सूचना देण्यासाठीं येथें म्हटलें आहे कीं, धन, भूषणें इत्यादि या वधूच्या अवनतीस कारण न होवोत. दुसऱ्यांच्या घरच्या स्त्रियांचे उत्तमोत्तम डागदागिने पाहून तसे आपणांस असावेत असा हट्ट पुष्कळ स्त्रिया करतात आणि स्वतःच्या पतीस फार त्रास देतात, कष्ट देतात. असें कोणी स्त्रिनें करूं नये. तर आपणांस सुवर्ण अथवा दागिने जे प्राप्त झाले आहेत तेवढ्यानें संतुष्ट रहावें. सुवर्ण, आभूषणें, गाडी घोडा वगैरे सुखसाधनें सर्व भोगांमध्यें येतात. भोगेच्छेमुळें घरांत नित्य कलह माजतो. म्हणून म्हटलें आहे कीं या भोगसाधनांनीं कोणताहि कलह न होतां पतीच्या घरांत (**शं भवतु**) शांति राहो. कलह होऊन अशांति न माजो. (**पत्या तन्वं सं स्पृशस्व**) स्वतःच्या पतीसह सुखपूर्वक आनंदानें प्रसन्न चित्तानें रहा. पतिपत्नी अशा एक विचारानें होऊन रहावेत कीं त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारचा वादविवाद होऊं नये, कारण विवादांतून वैमनस्य निर्माण होतें, आणि त्यामुळें घरांत अशांति वाढते. एक दुसऱ्याचीं मनें एकमेकांपासून दुखवतात. तसें न होतां दोघांनीं सुखसमाधानानें शांतीपूर्वक रहावें, आणि कौटुंबिक सुख यथायोग्यरीतिनें प्राप्त करावें.

स्त्रीची इच्छा

आशासाना सौमनसं प्रजां सौभाग्यं रयिम् ॥

(मं. ४२)

पतिघरीं आलेली नववधू म्हणजे गृहिणी-या घराची नवी स्वामिनी कशाचीं इच्छा करते ? तिच्या काय आशा असतात ? असा प्रश्न कोणीं विचारला तर त्याला असें उत्तर देतां येईल कीं (**सौ-मनसं**) स्वतःच्या घरांतील सर्व मनुष्यें चांगल्या मनानें आनंदांत आणि प्रसन्नचित्तांनीं राहोत, भांडणतंटे होऊं नयेत, परस्परांचे व्यवहार प्रेमपूर्वक व्हावेत, घरांत उत्तम शांति, आनंद आणि प्रसन्नतेचें वातावरण पसरावें, अशीच इच्छा प्रत्येक कुलस्त्रीची असते. दुसरी इच्छा अशी कीं (**प्रजां**) उत्तम संतति आपणांस व्हावी, ती सुयोग्य व्हावी, स्वतःच्या संततीनें कुलवृक्ष फुलावा, मोहरावा. तिसरी इच्छा, (**सौभाग्यं**) उत्तम भाग्य प्राप्त व्हावें. स्वतःच्या पतीच्या घरांत उत्तम भाग्य वृद्धिंगत होत रहावें सौभाग्यांत मुख्यत्वें असें भाग्य असावें कीं जगेंकरून पतीपासून पत्नीला आणि पत्नीपासून पतीला तें सुख देत राहील. या सुखप्राप्तीसाठींच विवाह करीत असतात. असें सौभाग्य स्वतःच्या घरांत वृद्धिंगत होत राहो हीच इच्छा धर्मपत्नीची असते. चौथी इच्छा त्यानंतर (**रयिं**) धनप्राप्तीची येते. स्वतःच्या पतीच्या घरांत कोणत्याहि प्रकारचें दारिद्र्य न यावें. ऐश्वर्य, धन, सुवर्ण, आभूषणें वगैरे सर्व विपुल प्रमाणांत रहावींत, त्यांनीं सर्वांस सुख लागावें. पतीच्या घरांत धर्मपत्नीच्या या चार इच्छा मुख्यत्वें असतात. येथें वाचकांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवावी कीं सर्वांत प्रथम इच्छा उत्तम मनाची केली आहे. त्यानंतर पतिपत्नीच्या उत्तम सुखाची इच्छा दर्शविली आहे. आणि अंतीं धनाची इच्छा आहे. कारण धन हें सुखाचें साधन तर खरेंच परंतु सु-मन-चांगलें मन नसलें, घरांत संतान नसलें, न झालें तर, पतिपत्नीचे संबंध विपरित झाले तर, त्यानें कोणालाच सुख होणार नाहीं; परंतु तशा स्थितींत तें दुःखदायकच होईल. म्हणून प्रथम कोणती आशा करावी आणि कोणती नंतर करावी याचा विचार

गृहस्थाश्रमीयांनीं या मंत्राच्या मननानें करावा.

स्त्री कशी असावी ?

(**पत्युः अनुव्रता**) पतीला अनुकूल होऊन नियमाचें पालन करणारी स्त्री असावी. स्त्रिनें पतीला प्रतिकूल असें आचरण कधींहि करूं नये. या नियमांत पत्नीनें पतीला अनुकूल होवून रहावें अशी आज्ञा तर आहेच परंतु त्या बरोबरच पतीनेंसुद्धां स्त्रिशीं अनुकूल होऊन रहावें असा भावार्थ त्यांतून निघतोच. पतीनें मात्र आपल्या मर्जीनुरूप स्वेच्छेनें वागावें आणि पत्नीनें पतीच्या आधीन रहावें असा भावार्थ या मंत्राचा नाहीं. धर्मोपदेश दोहींपक्षीं समानच असला पाहिजे. तो जर एकास लागू पडत असला तर दुसऱ्यास लागू पडलाच पाहिजे. तात्पर्य असें कीं ज्याप्रमाणें धर्मपत्नीनें पतीला अनुकूल व्हावयाचें तद्वत् पतीनेंहि पत्नीला अनुकूल होऊन रहावें. दोघांनीं परस्परांच्य आनुकूल्यानें वागून एकदुसऱ्याचें सुख वाढवावें व संसार स्वर्गधाम करून सोडावा. (**अमृताय कं संनह्यस्व**) अमृताच्या प्राप्तीसाठीं सुखपूर्वक सिद्ध व्हा. धर्मपत्नी आणि पति ह्या दोघांचें साध्य अमृतत्व आहे; म्हणजे मोक्ष आहे हें त्यांनीं नित्य ध्यानीं ठेवावें. त्या अमृतमय मोक्षधामास पोहोंचण्यासाठीं जे मार्ग आहेत त्या मार्गानीं सुखानें जाण्यासाठीं हा गृहस्थाश्रमाचा योग आहे, ही गोष्ट गृहस्थाश्रम्यानें कधींहि विसरूं नये. यासाठीं सर्व गृहस्थांनीं तयार राहिलें पाहिजे. स्वतःचे सर्व व्यवहार या उद्देश्यसिद्धीसाठींच करावयास हवेत. म्हणजे धर्मानुकूल व्यवहार करीत करीत मोक्षाची सिद्धि प्राप्त करावी. गृहस्थाचें तें कर्तव्य आहे. यासाठीं प्रत्येक गृहस्थानें प्रत्येक काम करतांना हें ध्यानीं ठेवावें कीं माझें हें कर्म मोक्षाचें साधन आहे, आणि तें कधींहि मोक्षास बाधक न व्हावें. प्रत्येक कार्य योग्यप्रकारें करण्यामुळें मोक्षासाठीं साधक होतें. जर प्रत्येक कार्य त्यागपूर्वक करण्यांत आलें, लोभाचा त्याग करण्यांत आला, तर सर्व कार्यें त्या मोक्षधामास प्राप्त करण्यास सहायक होतील. फलाची इच्छा करून स्वार्थाच्या इच्छेनेंच मनुष्याचें पतन होतें. म्हणून म्हटलें आहे कीं (**मा गृधः** । यजु. ४०।१) लोभ करूं नकोस. सर्व प्रकारचे लोभ सोडून दे आणि कर्म कर. याप्रमाणें निर्लोभवृत्तीनें केलेलें कर्म मोक्षमार्गांत सुखदायक होतें. गृहस्थाश्रमांतील सर्वच कर्में सुख देतां देतां मोक्षमार्गाचीं साधनें होऊं शकतात.

गृहस्थाचें साम्राज्य

गृहस्थाचें घर एक मोठें साम्राज्य आहे. तें कांहीं साधारण राज्य नाहीं. एक मोठें साम्राज्य आहे. ज्याचा गृहस्थी हा सम्राट् आणि गृहपत्नी ही सम्राज्ञी आहे. ती गृहस्थाची सहधर्मचारिणी आहे. ती त्याला साह्य देणारी आहे. त्यांचा जो परिवार आहे ते त्यांचे प्रजाजन आहेत. मात्र त्यांतील माणसेंच प्रजाजन आहेत असें नाहीं तर, पाळलेले पशु-पक्षी, गायी, घोडे, वगैरे सुद्धां या साम्राज्यांतील प्रजा आहेत. आणि या प्रजेचें यथायोग्य पालन करणें हें या गृहस्थाचें-सम्राटाचें कर्तव्य आहे. (**साम्राज्यं सुषुवे वृषा** । म. ४३) जो बलवान् असेल तोच या साम्राज्याचें पालन आणि संवर्धन करूं शकेल. अशक्त, निर्बलाचें तें काम नाहीं. (**वृषा**) जो बलशाली असेल तोच या गृहस्थाश्रमांत यशस्वी होऊं शकेल. जे अशक्त असतील त्यांचें साम्राज्य असलें तरी तें नष्ट पावेल. हा नियम वाचकांनीं बरोबर ध्यानीं बाळगावा.

पति सम्राट् आणि पत्नीनें सम्राज्ञी व्हावयाचें याचा अर्थ पूर्वानुसंधानाप्रमाणें असा होतो कीं पतीनें बलवान् व्हावें आणि पत्नीनें सुद्धां बलशालिनी व्हावें. आणि दोघांनीं मिळून या गृहस्थाश्रमाचें साम्राज्य योग्य प्रकारें चालवावें. मंत्र ४४ त नववधूला म्हटलें आहे कीं सासरा, दीर, नणंद तसेच सासू वगैरे कुटुंबीजनांची तूं सम्राज्ञी हो. त्याचा अर्थ असा होतो कीं साम्राज्यांत सम्राज्ञीचा जो दर्जा असतो तसा घरांत स्त्रिचा असावा. वैदिककालीं वैदिक धर्माप्रमाणें स्त्रियांची योग्यता किती होती याचा जे लोक विचार करतात त्यांनीं या सम्राज्ञी शब्दाचा नीट विचार करावा. वैदिकधर्मानुसार धर्मपत्नी ' सम्राज्ञी ' आहे आणि तिचा पति सम्राट् आहे. म्हणजेच स्त्रियांचे अधिकार असाधारण होते. यापूर्वी असें सांगण्यांत आलें आहे कीं स्त्री स्वतंत्र नाहीं. तिनें मातापित्यांच्या अथवा पतीच्या आधीन रहावें. या विधानाशीं वरील विधान विरोधी नाहीं. कारण कीं कोणीहि सम्राट् अथवा सम्राज्ञीसुद्धां पूर्णपणें स्वतंत्र असतच नाहींत. साम्राज्याच्या नियमांनीं ते बांधलेले आहेत. सम्राज्ञी इतर सामान्य स्त्रीप्रमाणें इकडे तिकडे भटकूं शकत नाहीं. तिच्याबरोबर नेहमीं तिचे अंगरक्षक असतातच. याप्रमाणें सम्राज्ञी परतंत्र असूनहि विशेष सन्मानीत होते. तीच गोष्ट गृहपत्नीची आहे. धर्मनियमांनीं बांधलेली धर्मपत्नी परतंत्र असूनहि पूर्णपणें सम्राज्ञी असते. धार्मिक उन्नति करण्यास ती स्वतंत्र आहे. विचार केला असतां वाचकांच्या ध्यानीं येईल कीं अन्य देशीय अथवा आधुनिक काळांतील स्वतंत्रतेपेक्षां वैदिककालीन परतंत्रता अधिक प्रशंसनीय आहे. मनुष्यानें मोक्षमार्गाची वाटचाल स्वतः करावयाची आहे. तेंच त्याचें ध्येय आहे. या ध्येयाच्या सिद्धिसाठीं जेवढी स्वतंत्रता पाहिजे तितकी दिलेली आहे. त्यापेक्षां जास्त स्वातंत्र्य देण्यांत आलें तर तें पतनाला कारणीभूत होतें.

स्त्रियांनीं सूत काढावें

वैदिकधर्मानुसार सर्व साधारणपणें स्त्री-पुरुषांचा विशेषतः स्त्रियांचा गृहव्यवसाय सूत काढण्याचा आणि त्याचें कापड विणण्याचा होता. प्रत्येक गृहस्थाच्या घरांत याप्रमाणें सर्व स्त्रियांनीं सूत काढण्याचें काम अवश्य करावें. (**देवीः अकृन्तन्** । मं. ४६।) घरच्या देवींनीं सूत काढावें, ज्या सूत काढतात त्याच देवी या संज्ञेला पात्र होत. त्यांनांच आपण खऱ्या अर्थानें देवी म्हणूं शकतों. या देवीनींच (**तत्निरे**) ताणे करावेत. सूत ठीकठाक करून ताणे तयार करावेत, तसेंच (**अभितः अन्तान् ददन्त**) चारी बाजूचे शेवट सारखे करावेत. दोन्ही बाजूचे कांठ आणि दोन्ही बाजूच्या दशांना पीळ भरून कापड विणतांना त्या सारख्या कराव्यात. यांत कांहीं जर उणीव राहिली तर कापड बिघडून जाईल. याप्रमाणें सर्व नीट झाल्यावर (**अवयवन्, संव्ययन्तु**) वर सांगितलेल्या देवींनीं उत्तम रीतीनें कापड विणावें. तरुण अवस्थेंत कापड विशेष श्रमानें विणलें, तर (**जरसे**) वृद्धावस्थेंत, जेव्हां विशेष श्रम होणें असंभवनीय होतें, तेव्हां तें कामीं येईल. (**आयुष्मती इदं वासः परिधत्स्व**) दीर्घ जीवन प्राप्त करीत ही स्त्री स्वतःच्या प्रयत्नानें उत्पन्न केलेलें वस्त्र परिधान करो. अशीं वस्त्रेंच स्त्री-पुरुषांना भूषणास्पद आहेत. प्रत्येक कुटुंबानें याप्रमाणें वस्त्राच्या बाबतींत स्वावलंबी बनावें. स्वतःच्या वस्त्रासाठीं दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागावें हें सर्वथा अयोग्य आहे, असा उपदेश वेद येथें करीत आहे. वेदाच्या उपदेशाप्रमाणें प्रत्येक कुटुंब जर वस्त्र निर्माण करण्याच्या गृहोद्योगाचा स्वीकार करील तर केवढें कल्याण होईल याचा विचार वाचकांनीं करावा. वैदिकधर्मीयांनीं स्वतःच्या घरांत चरखा ठेवून सूत कांतावें आणि कापड विणावें.

४६ व्या मंत्रांत म्हटलें आहे कीं स्त्री-पुरुषांनीं स्वतःच्या दीर्घजीवनाचा मार्ग (**दीर्घां प्रसितिं अनुदीध्युः**) ध्यानीं घेऊन स्वतःच्या (**पितृभ्यः वामं**) मातापितरांना सुख द्यावें आणि स्त्रीपुरुषांनीं परस्पर सुखदायी होऊन आनंदानें स्वतःचें कर्तव्य करावें. गृहस्थाश्रमाचा मार्ग दीर्घ आहे. कमींतकमी १०० वर्षें त्या मार्गानें जावयाचें आहे. शंभर वर्षें चालूनहि त्या धर्ममार्गाची समाप्ति होत नाहीं. इतका दीर्घ मार्ग असा गृहस्थासमोर पडलेला आहे. इतक्या लांब मार्गावर सुखानें प्रवास करावयाचा आहे, म्हणून स्वतःच्या मातापित्यांस सुख दिलें पाहिजे. मातापित्यांचा आदर करणें, सत्कार करणें हें सुद्धां एक आवश्यक कर्तव्य आहे. जर कोणी गृहस्थ स्वतःच्या मातापित्यांचा सांभाळ करणार नाहीं, तर त्याचे पुत्र त्याचाहि सांभाळ करणार नाहींत. स्वतःच्या मातापितरांचा आदरसन्मान करण्यानें, त्यांची काळजी घेण्यानें, त्यांचा योग्य सांभाळ करण्यामुळें आपल्या मुलांबाळांवर तसे संस्कार घडतात. त्यांना तसें शिक्षण मिळतें. आपलीं बालकेंसुद्धां माता-पितरांचा, वडिलांचा योग्य मान राखण्यास शिकतात. समस्त गृहस्थाश्रम जर सुखी आणि आनंदी करावयाचा असेल तर त्यामध्यें वृद्ध आणि बाल यांचा सांभाळ, भरणपोषण उत्तम प्रकारें व्हावयास हवें. गृहस्थाश्रमाचें सुख वाढविण्याचें हें महान् तत्त्व आहे.

गृहस्थाश्रमीयांवर सुप्रजा निर्माण करण्याची महान् जबाबदारी आहे; म्हणून स्वतःच्या संततिसाठीं सुख आणि स्थैर्याचा सुप्रबंध प्रत्येक गृहस्थानें करावा हें त्यास उचित होय. स्वतःचीं सर्व बालकें सुखी, सुदृढ, सुप्रसन्न, आनंदी, हृष्टपुष्ट आणि दीर्घायु व्हावीं. संतति दीर्घायु कशी होईल ? त्याचें उत्तरीं वेद म्हणतो कीं (**सविता आयुः दीर्घं कृणोति** । मं. ४७) सूर्यच मनुष्याला दीर्घायु करतो. सूर्यप्रकाशानें मनुष्याचें आयुष्य दीर्घ होतें. मनुष्यानें सूर्यकिरणांत हिंडावें-फिरावें, सूर्याच्या उन्हांत उघड्या अंगानें बसावें म्हणजे सूर्यस्नान होतें. सूर्याची नमस्कारद्वारां उपासना करावी म्हणजे स्वतःचें आयुष्य दीर्घ होतें.

पाणिग्रहण

पुरुषानें स्त्रिचें पाणिग्रहण करावें. हें पाणिग्रहण होतांच स्त्री-पुरुषांचा पति-पत्नीसंबंध सुरू होतो. यावेळीं पतीनें पत्नीशीं प्रेमानें बोलावें आणि म्हणावें कीं—

१. ते हस्तं गृह्णामि, मा व्यथिष्ठाः
२. मया प्रजया धनेन सह ॥ (मं. ४८)

' हे पत्नी ! मीं तुझा हात धरीत आहें. जराहि दुःखी होऊं नकोस. मजबरोबर धन, संतानासह सुखानें रहा. ' याप्रमाणें पतीनें स्वतःच्या पत्नीशीं प्रेमानें बोलावें. नववधू ही दुसऱ्या कुळांतून येत आहे. पतिगृहीं तिच्या परिचयाचें कोणीं नाहीं. म्हणून नववधूशीं सर्व कुटुंबीजनांनीं प्रेमानें वागावें. पतीनें पत्नीला म्हणावें कीं, ' हे पत्नी ! मीं तुझा हात धरला आहे. याचा अर्थ यापुढें आपल्या दोघांच्या संयुक्त जीवनांत सर्व परिस्थितींत मीं तुला आधार देत आहे. हात धरण्याचा अर्थ आधार देणें असा आहे. म्हणून जोंपर्यंत मीं जिवंत आहें तोंपर्यंत कोणत्याहि बाबतींत तुला भिण्याचें कारण नाहीं. येथें तूं सर्व प्रकारें सुरक्षित आहेस, जें माझें धन आहे तें सर्व तुझेंच आहे. त्यापासून मला जसें सुख होतें तसेंच तुलाहि होवो. आपणा दोघांपासून जी संतति होईल तिचें पालन करणें हें आपलें दोघांचें

कर्तव्य आहे. जर हें कार्य आपण दोघांनीं सहकार्यानें केलें तर आपली संततिसुद्धां आपणांला सुख देणारी होईल. याप्रमाणें हे पत्नी ! माझ्यासह तूं या संसारांत सुखानें रहा. आपण दोघे गृहस्थाश्रमाचें पालन करीत मोक्ष मार्गाचें आक्रमण करूं. ' अशा प्रकारें पतीनें आणि त्या कुटुंबांतील इतर मनुष्यांनीं नववधूशीं मधुर, प्रिय आणि सुखदायक भाषण करावें, आणि तिच्या मनांत पतिगृहाविषयीं प्रेम उत्पन्न होईल असें वर्तन ठेवावें.

वेदांमध्यें जेथें जेथें पाणिग्रहणाचा विषय आला आहे तेथें तेथें पति पत्नीचें पाणिग्रहण करतो अशा अर्थाचेच शब्दप्रयोग आहेत. पहा—

१. ते हस्तं गृह्णामि। (अथर्व. १४।१।४८;५०)
२. ते हस्तं गृह्णातु । (अथर्व. १४।१।४९)
३. ते हस्तं गृभ्णामि। (ऋग्वेद १०।८५।३६)
४. ते हस्तं अग्रहीत् । (अथर्व १४।१।५१)

या ठिकाणीं हात धरणारा पुरुष आहे आणि जिचा हात धरावयाचा ती स्त्री आहे. यावरून गृहस्थाश्रमांतील पुरुषाची विशिष्टता स्पष्ट होते. वेदांमध्यें कोठेंहि स्त्री पुरुषाचा हात धरते असा उल्लेख नाहीं. परंतु सर्वत्र पुरुषच स्त्रिचा हात धरीत आहे. पाणिग्रहण करण्याचा अधिकार पुरुषाचा आहे ही गोष्ट या मंत्रांनीं सिद्ध होते. त्यासाठीं तर ४३ व्या मंत्रांत (**सिन्धुः नदीनां साम्राज्यं सुषुवे**) असें म्हटलें आहे. एकच समुद्र अनेक त्यांचा सम्राट् होतो. म्हणजेच एक पति अनेक स्त्रियांचें पाणिग्रहण करून गृहस्थाश्रमरूपी साम्राज्याचा सम्राट् होतो. या मंत्रांत पुरुषाला अनेक पत्नी असूं शकतील असें सूचविलें आहे. उपमेमध्यें असा भावार्थ आहे कीं ज्याप्रमाणें एकाच सागराला अनेक नद्या जाऊन मिळतात त्याप्रमाणें एकच पुरुष अनेक स्त्रियांना प्राप्त करूं शकतो. जर पूर्वोक्त उपमेमध्यें असा भावार्थ नसला तर त्याचा दुसरा काय अर्थ होऊं शकेल त्याचा वाचकांनीं विचार करावा. पाणिग्रहण करणारा पति आहे हें सांगण्यांत संसारांत मुख्य पुरुषच आहे हें सिद्ध होतें. स्त्रीचें दान पतीला करण्यांत येतें तेंहि आपण पूर्वी पाहिलें आहे. या सर्व बाबतींवरून गृहस्थाश्रमांत पुरुषाचें स्थान प्रमुख आहे असें दर्शविण्यांत आलें आहे.

या पुढील तीन मंत्रांत पाणिग्रहणाचाच विषय आहे, आणि त्या मंत्रांतसुद्धां स्त्रिचा हात पुरुषानें धरावा असाच भावार्थ आहे. तसेंच पुढें आणखीहि स्पष्टीकरण केलें आहे—

त्वं धर्मणा पत्नी असि, अहं तव गृहपतिः ॥
(मं. ५१)

इयं मम पोष्या, मह्यं त्वा प्रजापतिः अदात् ॥
(मं. ५२)

' पुरुषाचा धर्माप्रमाणें स्त्री पत्नी आहे, आणि पति स्त्रीचा गृहपालक आहे. ही स्त्री पतिकडून पोषण मिळविण्यास योग्य आहे. कारण कीं या पतीच्या अधिकारांत या स्त्रिला प्रजापतीनें सोंपून दिलें आहे. '

स्त्रिच्या पोषणाचा भार पतिवर आहे, ही गोष्ट या मंत्रानीं स्पष्ट होत आहे. पतीनें पत्नीचें पालनपोषण करावें, पालनपोषणाची चिंता स्त्रिनें करूं नये. पोषणसामग्री घरांत आल्यावर त्याची योग्य विल्हेवाट लावून, योग्य विनियोग करून, घरांतील सर्वांस योग्य अन्न देण्याचें कार्य पत्नीचें आहे.

सुपुत्र निर्माण करण्यास देवतांचें सहाय्य व्हावयास हवें, तें सहाय्य या स्त्रिस प्राप्त होवो, अशा प्रकारचा आशीर्वाद मंत्र ५३ आणि ५४ यांत आहे. इंद्र, अग्नि वगैरे सर्व देवता या स्त्रिला स्वतःचें तेज अर्पण करोत, आणि या स्त्रीकडून उत्तम संतति निर्माण होवो. अशा सुसंततीनेंच तिची उन्नति होते.

केसांचें सौंदर्य

(**शीर्षे केशान् अकल्पयत्**) डोक्यावर परमेश्वरानें लांब केंस निर्माण केले आहेत. विशेषतः स्त्रिचें सौंदर्य केंसाच्या सुंदर रचनेनें वाढतें. (**तेन इमां नारीं पत्ये संशोभयामसि**) पतीस सुंदर दिसावी म्हणून स्त्रिच्या मस्तकावरील केंसांची सजावट निरनिराळ्या प्रकारें करण्यांत येते. स्त्रियांच्या डोक्याचे केंस सुंदर रीतीनें सजवून सुशोभित करण्यासाठीं त्यांची निगा राखून त्यांना सुव्यवस्थित ठेवलें पाहिजे.

(**मनसा चरन्तीं जायां जिज्ञासे**) स्त्रिची मानसिक चालचलणूक कशी आहे ती जाणणें जरुरी आहे. नुसत्या बाह्य देखाव्यावरूनच कोणाची परीक्षा करणें योग्य नाहीं. मन कसें आहे, विचार कसे आहेत, मनांत कोणत्या गोष्टींचे विचार येतात, मनांत कोणाचें मनन करते, या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. जी मनानें शुद्ध आहे, तीच खरी शुद्ध आहे असें समजलें पाहिजे. म्हणून मन शुद्ध करण्यास जें शिक्षण आवश्यक तसें शिक्षण दिलें पाहिजे. पुरुष असो अथवा स्त्री असो, त्यांचें मन शुद्ध राहील, असा शिक्षणक्रम असला पाहिजे. प्रचलित अभ्यासक्रम त्या दृष्टीनें कितपत उपयुक्त आहे याचा विचार वाचकांनीं करावा. आणि आपल्या संततीला सुसंतति होण्यास आवश्यक असेल तें त्यांनीं करावें.

(**योषा यत् अवस्त तत् रूपं**) स्त्री जें वस्त्र परिधान करते त्यानें तिची शोभा वाढते; म्हणजे स्त्रिनें अशीं वस्त्रें वापरावीत कीं ज्यामुळें तिचें सौंदर्य वाढेल. येथें सूर्यासावित्रीच्या उदाहरणाचा वाचकांनीं विचार करावा. संध्याकाळीं ही सूर्यपुत्री

संध्या किती विविध रंगांचीं वस्त्रें नेसून स्वतःचें सौंदर्य वाढविते. दररोज ही सूर्यपुत्री कशी सजते याचा विचार वाचकांनीं करावा. आणि स्वशक्तिनुरूप आपल्या स्त्रिस उत्तम वस्त्रांनीं शृंगारावीं. याचा अर्थ असा नाहीं कीं स्त्रियांनीं रोज नवीं नवीं वस्त्रेंच वापरावींत. परंतु जीं वापरावयाची तींच सुव्यवस्थित, स्वच्छ अशीं असावींत आणि तीं अशा प्रकारें वापरावींत कीं त्यानें मूळच्या शोभेची अभिवृद्धि होईल. स्त्री ही घरची देवी आहे, म्हणून घरोंघरीं या गृहस्वामिनीची मंगल वस्त्राभूषणांनीं पूजा होत राहो, पण ती पूजा घरच्या स्वामीच्या आर्थिक अनुकूलतेप्रमाणें असावी.

(**नवग्वैः सखिभिः तां अन्वर्तिष्ये**) ज्यांत नऊ गायींचें म्हणजे इंद्रियांचें समर्पण करण्यांत येतें त्या यज्ञांत, ज्यांत आमचे इष्टमित्रही सहभागी होतात त्यांच्या सह यज्ञमय जीवन मीं या स्त्रीसह व्यतीत करीत सर्व व्यवहार करीत राहीन. म्हणजे मीं स्वतः आणि माझी धर्मपत्नी मिळून आमचें सर्व जीवन यज्ञमय करीत आहों, जें जें कर्म आम्हीं करीत आहों तें तें यज्ञरूपच आहे. त्यामुळें आम्ही दोघे यज्ञरूप होऊं आणि अंतीं आमच्या यज्ञानें यज्ञस्वरूप परमेश्वर प्रसन्न होऊन आम्हांस कृतकृत्य करील.

(**विद्वान् पाशान् विचचर्त**) स्त्री-पुरुष ज्ञानी होऊन स्वतःचे पाश कापून टाकोत आणि बंधमुक्त होवोत. सर्व प्रयत्न बंधनांतून मुक्ति मिळवण्यासाठीं व्हावयास हवेत. मनुष्य अनेक प्रकारच्या प्रलोभनांत फसतो, आणि स्वतःच स्वतःसाठीं बंधनें निर्माण करतो आणि त्यांत बांधला जातो. हीं सर्व बंधनें कापून टाकलीं पाहिजेत आणि मुक्त झालें पाहिजे. असें मुक्त होण्याचें ज्ञान ज्याला असतें त्याला ज्ञानी अथवा विद्वान् म्हणतात. मनुष्यानें-मग तीं स्त्री असो किंवा पुरुष-ही मुक्तीची विद्या प्राप्त करावी आणि तिच्या सहाय्यानें मुक्त व्हावें.

प्रत्येक मनुष्य म्हणतो कीं (**अहं विष्यामि**) मीं हीं सर्व बंधनें तोडतों, मीं बंधनांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करतों. कारण मनुष्य जन्माची सार्थकता बंधनांतून मुक्त होण्यांत आहे. मनुष्य जन्मच त्यासाठीं आहे. हीं सर्व बंधनें मनानें केलेलीं असतात. म्हणून म्हटलें आहे (**मनसः कुलायं पश्यन् वेदत्**) मनरूपीं घरटें आहे हें मनुष्यानें पहावें आणि त्या मनाच्या द्वारेंच उत्पन्न झालेलीं हीं सर्व बंधनें आहेत हें त्यानें समजून घ्यावें. जर मनुष्यास (**मन एव मनुष्याणाम् कारणं बंधमोक्षयोः**) या गोष्टीची जाणीव झाली कीं, मनच मनुष्याच्या बंधनाचें अथवा मुक्तीचें कारण आहे, तर तो मुक्तच होईल. साधारणतः मनुष्य असें मानीत असतो कीं त्याचीं बंधनें बाह्य कारणामुळें आहेत, परंतु ती गोष्ट खोटी आहे. बाह्य कारणें मनुष्यांस बंधनांत फसविण्यास असमर्थ आहेत. मनुष्याचें मनच त्याचीं बंधनें तयार करतें. त्यांत तो स्वतः फसतो आणि इतरांस फसवितो; म्हणून मनुष्यास योग्य मार्ग म्हणजे त्यानें स्वतःचें मन ज्ञानानें शुद्ध करावें आणि त्या शुद्ध मनानें स्वतःचे पाश कापून मुक्त व्हावें. स्वतःच्या मनानेंच मनुष्य उन्नत होऊन मुक्त होतो हीच गोष्ट खरी. मनुष्य स्वतःच्या मनानेंच बंधनांत बांधला जातो अथवा स्वतःच्या मनानेंच त्यांतून मुक्त होतो. याप्रमाणें मनुष्याच्या मनांत केवढी शक्ति आहे तें वाचकांनीं पहावें. इतकी महान् शक्ति मनाची असतांना मनुष्य स्वतःस असमर्थ समजतो आणि इतरांकडे मदतीची याचना करतो. परंतु तो जर स्वतःच्या शक्तीनें बंधनांत पडला आहे तर स्वतःच्या शक्तीनेंच त्यांतून मुक्तहि होऊं शकतो, म्हणजे मुक्त होण्याची शक्ति त्याच्यांतच आहे. म्हणून म्हटलें आहे- (**स्वयं श्रथनानः**) मीं स्वतःच स्वतःचे पाश शिथिल करतों. तुमचे पाश अन्य कोणी शिथिल करूं शकणार नाहीं. जर तुम्हीं तुमचीं बंधनें तोडूं इच्छितां तर तीं तुम्हींच तोडावयास हवींत. जर तुम्हीं बंधनांत राहूं इच्छित असला तर बंधनांत राहूं शकता. तुमच्या मनांत असेल तसें होईल. तुम्हींच तुमचे घातक अथवा उद्धारक होऊं शकाल. दुसरे तुम्हांस त्रास देतात असें समजणें हा भ्रम आहे. ही गोष्ट वैयक्तिक बाबतींत जितकी सत्य आहे तितकीच सामाजिक आणि राष्ट्रीय मुक्तीच्या बाबतींतही सत्य आहे, म्हणून सर्व स्त्रीपुरुषांनीं स्वतःचीं बंधनें शिथिल करण्याचा यत्न करावा आणि स्वतःच मुक्त होण्याचा प्रयत्न करावा हें त्यांस योग्य होय. जर असे प्रयत्न केले तरच तें सिद्ध होणें शक्य आहे.

चोरीचें अन्न खाऊं नये

अशी योग्यता प्राप्त करावयाची असेल तर असा निश्चय केला पाहिजे कीं मीं (**न स्तेयं अद्मि**) चोरीचें अन्न खाणार नाहीं. वाचकांनीं विचार करावा कीं आपण जें अन्न खातों तें चोरीचें आहे काय ? येथें वाचकांनीं विचार केला तर त्यांच्या ध्यानीं येईल कीं आपण जें अन्न खातों तें आपण मेहनत करून मिळविलेलें नसतें. ज्याच्यावर दुसऱ्याचा अधिकार असतो तें चोरीचें अन्न होय. जर आपण तें भक्षण केलें तर तें चोरीचेंच होय. ही चोरी घरांतहि होऊं शकते आणि समाजांतहि होऊं शकते. जर कोणी मनुष्य कांहीं वस्तु घरांत आणून, घरांतील इतरांस न देतां एकटाच खाईल, तर तें खाणें चोरीचेंच होईल. स्वतःच्या गांवांत उत्पन्न होणारें सर्व धान्य त्या ग्रामवासीयांचेंच आहे. जर गांवांतील कोणी लोक त्या धान्याचा संग्रह करतील आणि त्यामुळें जर इतरांवर भुकेनें मरण्याची पाळी येत असेल, तर संग्रह करणारा जें अन्न खातो तें चोरीचेंच होय. या प्रमाणें विचार केला असतां चोरीची व्यापकता किती आहे हें वाचकांच्या ध्यानीं येईल.

या सर्व गोष्टींचा विचार करून कुटुंबांतील मनुष्यांनीं विचार करावा कीं, आपण चोरीचें अन्न खात आहोंत कीं यज्ञाचें अन्न खात आहोंत. मनुष्यानें यज्ञशेष अन्न खावें आणि पवित्र व्हावें हें योग्य होय. मनुष्य जर यज्ञ केल्यावांचून स्वतः पुरतांच स्वयंपाक शिजवील तर तो चोरीचें अन्न जेवत आहे असें समजावें. तो चोर आहे. सर्व मनुष्यांस जें शिक्षण मिळावयास पाहिजे तें हें आहे.

येन त्वा अबध्नात्, पाशात् त्वा प्रमुञ्चामि ॥

(मं. ५८)

' ज्या बंधनांनीं तुला बांधून ठेविली होती, त्या बंधनांतून मीं तुला मुक्त करतों. ' हें वाक्य पति स्वतःच्या धर्मपत्नीला सांगत आहे; आणि तिच्यांत श्रद्धा निर्माण करतो कीं माझ्या सहाय्यानें तूं आतां (**उरुं लोकं**) विस्तृत लोकास प्राप्त झाली आहेस. आणि (**अत्र तुभ्यं सुगं पंथां कृणोमि**) येथें तुझ्यासाठीं मीं मार्ग सुगम करून देतों. जर तूं या मार्गानें जाशील तर तुझें कल्याण होईल. हा गृहस्थाश्रम हें एक महा विशाल, विस्तृत असें कार्यक्षेत्र आहे. पुरुषार्थी मनुष्यें येथें पुरुषार्थ करून स्वतःची उन्नति करून घेतात. येथें अनेक मार्ग असले तरी हा सरळ मार्गच मनुष्यानें आक्रमण करण्यास योग्य आहे. पतीनें पत्नीला सुशिक्षण द्यावें, तिला सरळ मार्गानें चालवावें, आणि तिला बंधनांतून मुक्त होण्यास जे जे पुरुषार्थ करण्याची जरूरी आहे, ते ते तिला योग्य सहाय्य देऊन तिजकडून करून घ्यावेत. वाचकांनीं विचार करावा कीं गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या पुरुषावर केवढी जबाबदारी टाकलेली आहे. पुरुषानें स्वतः तर मुक्त व्हावयाचें आहेच, परंतु स्त्रिला मुक्तीच्या मार्गानें न्यावयाचें आहे. स्त्रिच्या योग्यायोग्य आचरणाची जबाबदारी पुरुषाची आहे. स्त्री-शिक्षणाचा सर्व भार पुरुषावर आहे. स्त्री जर विद्याहीन राहिली तर तो दोष पुरुषाचा आहे. वाचकांनीं या विषयीं नीट विचार करावा आणि याविषयीं स्वतःचें कर्तव्य जाणून तें पूर्ण करावें. हीच गोष्ट पुढें ५९ व्या मंत्रांत सुद्धां सांगितली आहे—

(**इमां नारीं सुकृते दधात** । मं. ५९) ' या स्त्रिला पुण्यमार्गानें चालवा. ' पुण्यकर्में होतील अशी व्यवस्था केली पाहिजे. जर स्त्री वाईटमार्गानें जात असेल तर पुरुषानें तिला योग्य शिक्षण दिलें नाहीं असें ठरेल. म्हणून स्वतःच्या कर्माची जाणीव स्त्रिला करून देणें आणि तिला धर्मशील करणें हें पुरुषाचें कर्तव्यच ठरतें. (**धाता अस्यै पतिं विवेद**) परमेश्वरानें या स्त्रीस पति प्राप्त करून दिला आहे. त्या नंतर त्या स्त्रिच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी पतिवर आहे. त्या पतीनें (**रक्षः अप हनाथ**) राक्षसी भावनांचा नाश करावा. या स्त्रीमध्यें ज्या आसुरी वृत्ति आहेत त्यांचा नाश करणें हें पतीचें कर्तव्य आहे. पतीनें स्त्रिला असें शिक्षण द्यावें कीं तिच्या सर्व आसुरीवृत्तींचा नाश व्हावा. आणि दैवी वृत्ति तिच्यांतून नाहींशा होऊं नयेत. ती खरोखर ' **देवी** ' व्हावी. या स्त्रीनें (**उत् यच्छध्वं**) उच्च होण्यासाठीं तुम्हीं स्वतः तयार रहा. तुमचीं शस्त्रास्त्रें वर उचलून तिचें उत्तम रक्षण करा. तिला उत्तम धर्मनियमांत ठेवा. ज्या प्रयत्नांनीं स्त्रीची खरी उन्नति होईल असे सर्व प्रयत्न करा. स्त्रिच्या उन्नतीचा भार बाल्यकालांत पितृकुळावर आणि विवाहानंतर पतिकुळावर असतो. तिची उन्नति करण्यासाठींच (**धाता पतिं विवेद**) ईश्वरानें तिला पति प्रदान केला आहे. म्हणून स्वतःच्या पत्नीचा सर्वांगीण विकास आणि उन्नति साधण्यासाठीं पतीनें प्रयत्न करणें हें त्याचें कर्तव्यच आहे.

(**सा सुमंगली अस्तु** । मं. ६०) ती स्त्री उत्तम मंगल करणारी होवो. मंगलमय मूर्ति होवो. या स्त्रीमुळें घराचें आणि कुलाचें मंगल होवो. या स्त्रीच्या मंगल मूर्तीस पाहून सर्व लोक आनंदित होवोत. तिच्या उन्नतिसाठीं सर्व देवता-भग, धाता, त्वष्टा वगैरे- सहाय्यभूत होवोत.

वरातीचा रथ

वरातीच्या रथाचें वर्णन पुनः ६१ व्या मंत्रांत आलें आहे. हा रथ उत्तम (**सु-किंशुकं**) पानाफुलांनीं सुशोभित करावा; विशेषतः त्यांत लाल फुलें सजावटीसाठीं वापरावींत. (**विश्व-रूपं**). त्याच्यावर अनेक प्रकारची शोभा करण्यांत यावी. (**हिरण्यवर्णं**) सोनेरी रंगाचा तो रथ असावा. त्यावर उत्तम चमकणारे इतर रंगहि लावण्यांत यावेत. (**सुवृतं सुचक्रं**) वर उत्तम छत त्यास झालरी लावलेल्या असाव्यात, चाकें सुदृढ आणि सुंदर सजवलेलीं असावींत. याप्रमाणें सुंदर सजविलेला रथ (**वहतुं**) वरात घेऊन जाण्यासाठीं असावा. ही वरात पतिगृहीं पोहोंचो आणि तेथील स्थानाला (**अमृतस्य लोकं कृणु**) अमर लोक, सुखपूर्ण स्थान करो. धर्मपत्नी स्वतःच्या पतीच्या घरीं पोहोंचून तेथील सुख वाढवो. पतीच्या घरांत धर्मपत्नी (**अ-भ्रातृ-घ्नी**) पतीच्या भावांचा नाश न करणारी, भावांचें पालन करणारी (**अ-पशु-घ्नी**) पशुपालन करणारी, गाई, घोडे इत्यादि पशूंचें योग्य पालन करणारी, (**अ-पति-घ्नी**) पतीचें पालन-पोषण करणारी, पतिला सुख देणारी त्याला कष्ट न देणारी त्याचा घातपात न इच्छिणारी, (**पुत्रिणी**) पुत्रांनीं युक्त होऊं इच्छिणारी, संतान वृद्धि करणारी अशी स्त्री या वरातीनें पतिच्या घरीं पोहोंचो. ही स्त्री (**देव-कृते पथि**) देवांनीं तयार केलेल्या मार्गानें जाऊं इच्छिते, म्हणून तिचा विवाह झाला आहे.

(कुमार्यं मा हिंसिष्टं) आतां पावेतों ही नववधू कुमारी राहिलेली आहे. तिला येथें पतिगृहीं कोणत्याहि प्रकारचा त्रास होऊं नये. **(वधूपथं स्योनं कृण्मः)** या वधूचा मार्ग आम्हीं सुखदायक करतो. तिला चालण्याचा जो देवमार्ग आहे तो तिच्यासाठीं सुखदायक होवो अशी व्यवस्था आम्हीं करतों. **(शालायाः द्वारं स्योनं कृण्मः)** या स्त्रीसाठीं गृहप्रवेशाच्या वेळीं पतीच्या गृहाचें द्वार आम्हीं सुखमय करतों. या स्त्रीला तिच्या पतिगृहांत उत्तम सुख प्राप्त होवो, आणि ती स्वतःची उन्नति यथायोग्यप्रकारे प्राप्त करो. निर्विघ्नतेनें ही देवी उत्कर्षाप्रत जावो.

या स्त्रीला **अपर-पूर्व-मध्यतः ब्रह्म युज्यतां** (मं. ६४) मागें, पुढें, मध्यें, सर्व बाजूंनीं ज्ञान प्राप्त होवो. ज्ञानानें सर्वांची उन्नति होते. येथें 'ब्रह्म' शब्दाचा अर्थ ' ईश्वर, मंत्र वेदज्ञान, शक्ति, तप, धर्म, पवित्रता, ब्रह्मचर्य, धन, शब्द ' असे होतात. स्त्री पतिगृहीं जेथें जाईल तेथें तिला हे गुण प्राप्त व्हावेत. त्यांपासून ती कधीं विन्मुख राहूं नये. ही धर्मपत्नी **(अनाव्याधां देवपुरां प्रपद्य)** व्याधिरहित दिव्यनगरीला म्हणजे पतीच्या स्थानाला प्राप्त होऊन, पतिगृहीं रोगरहित होऊन, आरोग्य युक्त स्वतःचे सर्व व्यवहार करून **(शिवा स्योना पतिलोके विराज)** शुभमंगलमयी गृहदेवता होऊन पतीच्या स्थानांत विराजो. ही स्त्री पतीच्या घराची शोभा वाढवो, सुखसमृद्धि वृद्धिंगत करो आणि तेथील मंगल करण्यास कारणीभूत होवो.

येथपर्यंत प्रथम सूक्ताचा विचार झाला. आतां आपण दुसऱ्या सूक्ताचा विचार करूं—

द्वितीय सूक्ताचा विचार

द्वितीय सूक्तांत सुद्धां विवाहाचाच विषय आहे. पहिल्या चार मंत्रांत कुमारिकेचे चार पति असल्याचा उल्लेख आहे. याविषयीं याप्रमाणें स्पष्ट म्हटलें आहे—

सोमस्य जाया प्रथमं गंधर्वस्तेऽपरः पतिः ।
तृतीयो अग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः ॥
(मं. ३)

' कुमारिकेचा पहिला पति सोम, दुसरा पति गंधर्व, तिसरा पति अग्नि, आणि चौथा पति मनुष्ययोनींत उत्पन्न झालेला म्हणजे मनुष्य आहे. ' हे चार पति कौमार्यांतील आहेत असा उल्लेख आहे. हा मंत्र ऋग्वेदांत असा आहे—

सोमः प्रथमो विविदे गन्धर्वो विविद उत्तरः ।
तृतीयो अग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः ॥ ४० ॥
(ऋग्वेद १०।८५)

या मंत्राचा अर्थ वर दिलेल्या मंत्रासारखाच आहे. या कन्येला प्रथम सोम देवतेनें प्राप्त केली, त्यानंतर गंधर्वानें, तिसरा पति अग्नि आहे आणि चौथा पति मानव आहे. या मंत्रांत चौथ्या पतीला ' मनुष्यज ' असें म्हटलें आहे. त्यावरून पूर्वीचे पति मनुष्य योनींतील नाहींत ही गोष्ट सिद्ध होते. म्हणून जरी या मंत्रांत चार पतींचा उल्लेख आहे तरी तो नियोग अथवा बहुपतित्वाचा उपदेश करीत आहे असें मानणें योग्य नाहीं. कारण तसें मानण्यास पहिले तीनहि पति मनुष्यज असले पाहिजेत. येथें तर मंत्रांत स्पष्ट म्हटलें आहे कीं पहिले तीन पति मनुष्यज नाहींत. मात्र चौथा पतीच मनुष्य योनीचा आहे; म्हणून त्या मंत्रामुळें नियोग किंवा पुनर्विवाह अथवा बहुपतित्व सिद्ध होणें सुतराम् असंभवनीय आहे.

चौथ्या मंत्रांत स्पष्टच सांगितलें आहे कीं सोमानें या कन्येला गंधर्वाच्या हातीं दिली, गंधर्वानें तिला अग्नीच्या स्वाधीन केलें, आणि अग्नीनें मानव पतीच्या हातीं दिली. यावरून पहिले तीन पति दैवी शक्तीचे केंद्र आहेत ही गोष्ट सिद्ध होते. मातापित्याच्या घरांत रहाणारी ही कन्या बाल्यकाळांत या दैवतांच्या आधीन असते, अथवा त्यांचा प्रभाव तिच्यावर पडलेला असतो. जेव्हां विवाहहोम होतो तेव्हां हवनाग्नि तिला मानव पतीच्या हातांत सोंपवितो.

कित्येक अविचारी लेखकांनीं या मंत्राच्या आधारें अशी विचित्र कल्पना केली आहे आणि तसे लेखहि लिहिले आहेत कीं विवाहापूर्वी कन्येला सोम, गंधर्व आणि अग्नि या नांवाच्या तीन जातींच्या पुरुषापाशीं ठेवण्यांत येत असे; आणि त्यानंतर ती कन्या त्यांच्या अनुमतीनें मानवास प्राप्त होत असे. खरोखर ही कल्पना अत्यंत विचित्र आणि तितकीच हास्यास्पद आहे. याचा अर्थ तर असा होईल कीं व्यभिचार हाच धर्म समजला जाई. परंतु आम्हीं जें संशोधन केलें त्यांत कोठेंहि आम्हांस सोम अथवा अग्नि नांवाची मानव जात होती असें एकहि प्रमाण उपलब्ध झालें नाहीं. गंधर्व जाति होती, परंतु त्या एकानेंच येथें काम भागण्यासारखें नाहीं, म्हणून वरील कल्पना अगदीं तिरस्कारार्ह आहे.

याशिवाय संपूर्ण वेदवाङ्मयांत स्त्रियांना एवढें स्वातंत्र्य दिल्याचें कोठेंही दिसत नाहीं. त्या पतीच्या आधीन सदैव रहाव्यात असें आहे. अन्य पुरुषापाशीं जाऊन रहाण्यास त्यांना समयच मिळणें शक्य नाहीं. वेदांमध्यें इतरत्र कोठेंहि याप्रकारें विवाहपूर्व तीन पति असल्याचा उल्लेख नाहीं, म्हणून वरील भयानक कल्पना असत्यच आहे. जे लोक अशी कल्पना

करूं शकतात त्यांच्या मेंदूंत कांहीं दोष असावा असें आम्हांस वाटतें. कारण मंत्रांत स्पष्ट आहे कीं विवाहापूर्वीचे, मनुष्य-पतीच्या आधींचे पति अमानुष आहेत म्हणजे दैवी आहेत, देवता आहेत; देवतांचें सामर्थ्य कोणत्याहि प्रकारें दोषास्पद असत नाहीं. ज्याप्रमाणें एखादा भक्त प्रथम देवास नैवेद्य समर्पण करून मग भोजन करतो व त्यांत ज्याप्रमाणें उच्छिष्ट भक्षणाचा दोष नसतो, कारण तें अन्नसमर्पण हें एक भावनेचें कार्य आहे; त्याप्रमाणें कन्येच्या बालपणीं मातापिता असें समजतात कीं हल्लीं कन्या सोमाच्या अधिकारांत आहे, त्यानंतर गंधर्वाच्या अधिकारांत आहे, आणि त्यानंतर अग्निदेवतेच्या अधिकारांत, आणि नंतर मानवी पतीच्या अधिकारांत येईल. कुमारिकांचें जीवन याप्रमाणें देवतामय असावें. देवतांच्या समीप असण्याचा अर्थ कुमारिकांचें आचरण पवित्र असलें पाहिजे. जर कोणी मनुष्य राजाच्या सांनिध्यांत थोडा वेळ राहिला तर तेवढा वेळ तो पवित्र असतो, तद्वत् कन्या यावत्काल देवतांपाशीं राहील तोपर्यंत तिची पवित्रता अधिक होईल यांत कांहीं शंका नाहीं. देवता सर्वज्ञ असतात, म्हणून आमचीं पापें त्यांच्यापासून अज्ञात रहाणें अशक्यच आहे. या सर्व कथनाचें तात्पर्य एवढेंच कीं हे तीन दैवी पति केवळ कन्येचें मनोबळ वाढवण्यासाठीं आहेत. चौथा मानवी पतिच खरा पति आहे. याप्रमाणें या मंत्राधारें जी अनेक पतींची कल्पना करण्यांत येते ती निराधार आहे असें ठरतें.

विवाहाचा समय

यापुढील दोन मंत्रांवरून वर आणि वधूचें विवाहसमयीं वय काय असावें हें नक्की करतां येतें. (**सुमतिः आगन् ।** मं. ५) उत्तम बुद्धि प्राप्त झाली आहे, म्हणजे बुद्धि योग्य प्रकारें काम देत आहे, विकसित झाली आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं विद्येचे संस्कार त्यांच्या बुद्धीवर उत्तम ठसले आहेत. उत्तम विद्या प्राप्त केल्यानंतरच विवाहाचा विचार होऊं शकेल. बुद्धि सुसंस्कृत झाल्यानंतर विवाह (**हृत्सु कामाः अरंसत ।** मं. ५) हृदयांत कामानें स्वतःचें स्थान नीट जमविलें आहे. जेव्हां एवढी प्रौढावस्था प्राप्त होईल तेव्हांच विवाह करावा. हृदयांत कामाचें बीज उत्पन्न व्हावयास हवें. (**वाजिनी-वसू**) अन्न आणि धनानें युक्त व्हावयास हवें. त्यानंतर विवाह व्हावा. विद्या प्राप्त केल्यानंतर तिच्या सहाय्यानें धन मिळवून त्यानंतर प्रौढ वयांत विवाहाचा विचार व्हावयास हवा, हेंच योग्य होय (**मिथुना शुभस्पती गोपा अभूतं**) बरोबर रहाण्याची इच्छा करणारा, उत्तम पालक आणि संरक्षक जेव्हां होईल तेव्हां विवाहाचा विचार करावा. (**अर्य-म्णः-अर्य-मनः**) आर्य म्हणजेच श्रेष्ठ मनाचे वधूवर विवाहसमयीं असावेत, अथवा श्रेष्ठ मनाचे झाले म्हणजे विवाहास योग्य झाले असें समजावें. वाचकांनी या शब्दांच्या अर्थाचें योग्य मनन करावें आणि विवाह-समय नक्की करावा.

विवाह समयीं स्त्री सुद्धां (**मन्दसाना ।** मं. ६) आनंद-युक्त, प्रसन्नचित्त, प्रफुल्ल मनानें युक्त (**शिवेन मनसा**) शुभ-मन असणारी कल्याणकारक शुभ विचारांनीं युक्त, अशी असावी. (**सर्ववीरं वचस्य रयिं**) सर्व प्रकारचे वीरतेचे भाव. उत्तम बोलणें जिचें आहे, या प्रकारची शोभा धारण करणारी. आणि (**दुर्मतिं हतं**) दुष्ट बुद्धीचा नाश करणारी. याप्रमाणें स्त्रीच्यायोग्यते विषयीं आपणांस निर्देश मिळतात.

अर्थात् विवाहसमयीं स्त्री आणि पुरुष, विद्या, धन, बल, सुविचार इत्यादि गुणांनीं युक्त असले पाहिजेत. कुटुंबाचा भार उचलण्याची ज्यांच्यांत शक्ति आहे असे असावेत. या सर्व गोष्टींचा विचार करतां असें वाटतें कीं वधूवर प्रौढ वयाचे होतील तेव्हांच त्यांचा विवाह व्हावा, म्हणजे बाल्यकाळीं विवाह होऊं नये. वेदादि मंत्रांचा अर्थ आणि वेदोक्त प्रतिज्ञेचा भावार्थ सम-जण्याइतकी योग्य बुद्धि वधूवरांची असावी. वैदिकमंत्रांत कुमारकुमारिकेवर मातापित्यांचा अधिकार सांगितला आहे, तसेंच कन्यादानहि वेदांत सांगितलें आहे. येथें कुमारकुमा-रिकांचें स्वयंवर वेदास मान्य नाहीं ही गोष्ट सिद्ध होते. स्वयं-वराचा स्पष्ट उल्लेख वेदांमध्यें स्पष्टपणें कोठें मिळत नाहीं आणि कन्यादान पद्धतींत तर स्वयंवराला स्थान मिळणें शक्यच नाहीं. जेथें स्वयंवर आहे तेथें कन्यादानाचा प्रश्न येतोच कुठें ? कन्या-दान पद्धति वैदिक असल्यानें मातापित्यांच्या अनुमतीनेंच विवाह होऊं शके. म्हणून जे असें मानतात कीं वेदांमध्यें युरोपीयना-प्रमाणें स्वयंवर पद्धति आहे अथवा जे स्वयंवरास वैदिकविवाह म्हणतात आणि जे ' प्रथम दर्शनी प्रेम ' झाल्याची संभावना वैदिक विवाहांत करतात ते सर्व वैदिकधर्माचे उच्छेदक आहेत. याप्रमाणें वैदिक विवाहांत वधू-वर प्रौढ आणि सुमनस्क असावेत, हें सिद्ध होतें. तरीसुद्धां मातापित्यांची संमति तितकीच आव-श्यक आहे ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

पुढें मंत्र ७ ते ९ पर्यंत नवविवाहित वधूवरांना अभीष्ट चिंतनपूर्वक आशीर्वाद आहेत. राक्षस, दुष्ट, दुराचारी यांच्या-पासून वधूचें रक्षण करण्याची प्रार्थना सातव्या मंत्रांत केली आहे. वधूसाठीं सर्व मार्ग सुरक्षित होवोत असा आशीर्वाद आठव्या मंत्रांत आहे आणि नवव्या मंत्रांत वधूवरांना गंधर्व, अप्सरा,

देवी वगैरे सुखदायक होवोत आणि या वधूवरांची कोणी हिंसा, द्रोह न करो अशी इच्छा आहे.

यज्ञानें यक्ष्मनाश

दहाव्या मंत्रांत यज्ञानें यक्ष्म रोगाचा नाश होण्याचा संदेश उत्कृष्ट काव्यमय भाषेंत देण्यांत आला आहे. त्याचें सहजच विशेष विचारपूर्वक अवलोकन करणें योग्य होईल—

ये वध्वश्चन्द्रं वहतुं यक्ष्मा यन्ति जनाँ अनु ।
पुनस्तान् यज्ञिया देवा नयन्तु यत आगताः ॥

(मं. १०)

' जे (**यक्ष्मा**) दम, श्वासासारखे रोग (**जनान् अनु· यन्ति**) मनुष्याबरोबर जातात ते (**वध्वः चन्द्रं वहतुं**) वधूच्या तेजस्वी वरातीच्या रथाबरोबर आले असतील तर (**तान्**) त्या यक्ष्मरोगांना (**यज्ञियाः देवाः नयन्तु**) यज्ञांतील देव दूर घेऊन जावोत. म्हणजे वधू अथवा वराच्या बरोबर ते रोग येवूं देऊं नयेत. ' यज्ञांतील देव अग्नि, वनस्पति वगैरे आहेत, त्यांच्यामुळें यज्ञ होतो आणि यज्ञांत त्यांचा वारंवार निर्देश होतो. हे सर्व देव मनुष्यांबरोबर आलेल्या यक्ष्माला दूर घेऊन जावोत. या मंत्राच्या मननानें सिद्ध होते कीं जेथें मनुष्यांची पुष्कळ गर्दी होते तेथें त्यांच्याबरोबर यक्ष्मादि रोगांचीं बीजें येण्याचा पुष्कळ संभव खरा. वरातीच्या वेळीं अथवा विवाहांत पुष्कळ माणसें एकत्र येतात त्यांत कोणांस कोणता रोग आहे हें समजण्यास काय मार्ग आहे ? त्यामुळें अशा गर्दीच्या प्रसंगीं स्पर्शजन्य रोगांचा फैलाव होण्याची शक्यता फार असते. म्हणून अशा प्रसंगीं बृहत् यज्ञ करून अशा यक्ष्म रोगांचा नाश करणें हें जास्त चांगलें. जेव्हां जेव्हां वरातीसाठीं अथवा इतर प्रसंगानुरूप पुष्कळ मनुष्यें एकत्रित येतात तेथें तेथें हा नियम ध्यानांत ठेवणें योग्य होईल.

शत्रु दूर होवोत

अकराव्या मंत्रांत शत्रूंना दूर करण्याचा उपदेश केला आहे. या पूर्वीच्या मंत्रांत व्याधीरूप शत्रूंस दूर करण्याचा उपदेश होता.आतां या मंत्रांत मानवी शत्रूंना दूर करण्याचा मार्ग सांगितला आहे. (**परिपंथिनः मा विदन्**) दुष्ट मार्गानें चालणारे दुराचारी या दंपतीला न जाणोत. दुराचारी मनुष्यें अनेक प्रलोभनें दाखवून मनुष्यांस बनवितात, फसवितात, लुटतात आणि स्वतःचा स्वार्थ साधतात; म्हणून अशा दुष्टांच्या सहवासापासून नवविवाहित वधूवरांनीं दूर रहावें, हा सर्वसामान्य उपदेश आहे. (**अरातयः अप द्रान्तु**) शत्रु दूर पळून जावोत. या नववधूवरांस फसवूं इच्छिणारी अनुदार मनुष्यें त्यांच्यापासून दूर राहोत. त्यांच्यापासून ही दंपती सुरक्षित राहो. तसेंच हे स्त्री पुरुष (**सुगेन दुर्गं अतीतां** । मं. ११) सुखपूर्वक सर्व कठीण प्रसंगांतून मुक्त होवोत.

बाराव्या मंत्रांत प्रार्थना आहे कीं, ' सर्वांचा उत्पत्ति करता सवितादेव या सर्व विश्वाच्या रूपाला या पतिपत्नीसाठीं सुखदायक करो.' म्हणजे हें सर्व विश्व या दंपतीला सुख देवो, त्यामुळें दुःख होऊं नये. येथें वाचकांनीं हें ध्यानीं ठेवावें कीं, जगांतील सर्व पदार्थ सुखदायक तसेच दुःखदायकही होऊं शकतात. स्वतःच्या व्यवहारावर सुखदुःखाचा आधार आहे. म्हणून वधूवरांनीं अशा धार्मिक सुनियमांनीं व्यवहार करावेत कीं ज्यामुळें त्यांना नेहमीं सुखच मिळत राहील, आणि दुःख त्यांच्या वांट्यास कधीं येणार नाहीं.

विवाहांत ईश्वराचा हात

१३ व्या मंत्रांत (**धाता इमं लोकं अस्यै दिदेश** । मं. १३) विधात्यानें या वधूसाठीं हें पतीचें स्थान निर्दिष्ट करून ठेवलें आहे, असें सांगितलें आहे. याचा सरळ अर्थ इतकाच कीं स्त्री अथवा पुरुष उत्पन्न होतांच त्याच्या विवाहाची योजना विधात्याकडून निश्चित करण्यांत येते. विधात्याचा संदेश ग्रहण करून जे लोक वागतात त्यांना यथायोग्य धर्मपत्नी मिळते. जे स्वतःच हट्ट मध्यें आणतात त्यांना त्यापासून कष्ट भोगावे लागतात. जे आजच ब्रह्मचर्य आचरण करतात, ब्रह्मचारी राहूं इच्छितात त्यांची ती इच्छा सुद्धां ईश्वर कृपेनेंच सिद्ध होते. विवाहाची इच्छा करणाऱ्यांनीं आपलें स्वतःचें वर्तन धर्मानुसार राखावें हें योग्य होय. उत्तम सुनियमांचें पालन करावें आणि योग्य समयाची वाट पहावी. विधात्याच्या नियमानुसार अनुरूप सुयोग्य वधूशीं त्याचा विवाह निश्चित होईलच. वाचकांनीं ही उपहासास्पद गोष्ट समजूं नये. धर्मानुकूल संयमपूर्वक आचरण करणाऱ्या व्रतस्थ मनुष्याचा सर्व प्रकारचा योगक्षेम ईश्वरी नियमानुसार चालतच रहातो. ज्याचा परमपिता एकमात्र सहायक आहे त्याला कोणत्याहि गोष्टीची न्यूनता कधींच भासत नाहीं.

(**इयं शिवा नारी अस्तं आगन्**) ही शुभाचारी स्त्री पतीच्या घरीं आली आहे. अशी शुभाचरणी स्त्री तशाच धर्मात्मा पुरुषाला प्राप्त होते आणि त्याचा गृहस्थाश्रम सुखपूर्वक चालविण्यास सहाय्य करते. धर्मपत्नी शुभाचरिणी मिळाली पाहिजे. तें सुद्धां एक भाग्याचें लक्षण आहे, आणि तें धर्माचरणानें प्राप्त होतें.

(**देवाः प्रजया वर्धयन्तु** । मं. १३) सर्व देव या

दंपतीला उत्तम संतान देऊन त्यांची वृद्धि करोत. सुसंतति देवोत आणि अन्य सर्व प्रकारचें भाग्यसुद्धां अर्पण करोत. सर्व प्रकारचें सुख या दंपतीस प्राप्त होवो. विधात्याच्या कृपेनेंच हें सर्व होतें.

गर्भाधान

विवाहानंतर गर्भाधान प्रकरण यावें हें स्वाभाविक आणि क्रमप्राप्तच आहे. त्या विषयीं निर्देश १४ व्या मंत्रांत आहे. **(आत्मन्वती उर्वरा नारी)** आत्मिक बलानें सुपुत्र अथवा सुसंतान उत्पन्न करणारी असल्यानें कठीण प्रसंगीं सुद्धां जिचें धैर्य नष्ट होत नाहीं अशी स्त्री असली पाहिजे. **' उर्वरा '** शब्द येथें सुपीक या अर्थी वापरलेला आहे. ज्याप्रमाणें भूमि उत्तम सुपीक असते, त्यामुळें वनस्पति रसयुक्त निर्माण होतात, त्याचप्रमाणें स्त्रीसुद्धां उत्तम, हृष्टपुष्ट, सुमतीनें युक्त असली तर तशीच संतति उत्पन्न होईल. रोगी संतति निर्माण न व्हावी. हें सर्व स्त्रियांच्या धर्मानुकूल आचरणावर अवलंबून आहे. आयुर्वेदांत सांगितल्याप्रमाणें जर स्त्री-पुरुष आचरण ठेवतील तर उत्तम संतति उत्पन्न होईलच.

(तस्यां नरो बीजं वपत) अशी गुणवती, कुलवती, आत्मबलशक्तीची उत्तम संतान उत्पन्न करण्यास समर्थ अशाच स्त्रीमध्यें पुरुषानें गर्भाधान करावें, अन्य स्थळीं वीर्याचा निक्षेप करूं नये. धर्मपत्नीशिवाय कोणत्याहि अन्य स्थळीं वीर्यपात करणें हें सर्वस्वी अयोग्य, अधार्मिक आणि अवनतिकारक आहे. पुरुष **(वृषभः)** बैलासारखा वीर्यवान् असावा. वृषभ, वृषण हे शब्द वीर्यदर्शक आहेत. वीर्यवान् सद्गुणी पुरुषानेंच गर्भाधान करावें. रोगी, दुर्गुणी, निर्वीर्य पुरुष गर्भाधान करील तर संतान त्याच्या प्रमाणेंच क्षीण, निस्तेज आणि दीन निपजतील म्हणून सावधानता राखणें जरूरीचें आहे.

स्त्रीनें स्वतःच्या पतीच्या घरीं **(विराड्)** विशेष तेजस्विनी होऊन स्वतःचे सर्व व्यवहार करावेत. **(सरस्वती)** विद्यादेवीची मूर्ति होऊन रहावें म्हणजे विदुषी म्हणवण्यायोग्य ज्ञानयुक्त व्हावें. **(सिनीवाली)** विविध अन्नरस तयार करणारी गृहस्वामिनी असावी. स्वतःचा पति **(विष्णुः इव)** साक्षात् विष्णु भगवान् आहे आणि मी त्याची धर्मपत्नी आहे असा भाव मनांत ठेवावा. ज्याप्रमाणें भगवान् विष्णु सर्व जगाचें पालन-पोषण करतो त्याप्रमाणें माझा पतिसुद्धां सर्व कुटुंबाचें पालन-पोषण करणारा आहे. असा विचार मनांत ठेऊन पतिविषयीं अत्यंत आदरभाव स्वतःच्या मनांत धारण करावा आणि **(भगस्य सुमतौ असत् ।** मं. १५) स्वतःच्या पतीच्या बुद्धिमध्यें स्वतःच्या बुद्धीचा समावेश करावा, म्हणजे त्याच्याविषयीं मनांत उत्तम आदरभाव, विचार, प्रेम वाढेल असें आचरण ठेवावें. पतीनें सुद्धां स्त्रीविषयीं अत्यंत आदरभाव ठेवून प्रेम वाढवावें. याप्रमाणें पतिपत्नी परस्परांवर प्रेम करीत, एकमेकांचा आदर करीत, स्वतःच्या गृहस्थधर्माचें पालन करोत.

पति-पत्नीचे अंतर्गत व्यवहार असे सरळ आणि सुंदर असावेत कीं आपापसांत कधींहि कलह अथवा मनें बिघडण्याचा प्रसंग येऊं नये. घराच्या शांतीचा भंग होण्याचा प्रसंग येऊं नये. दोघांनीं प्रेमानें मिळून-मिसळून रहावें. **(अदुष्कृतौ)** पति-पत्नी दोघांनींहि वाईट कृत्यें अथवा दुराचार करूं नयेत. नेहमीं चांगलीं कर्में करीत रहावें. **(वि एनसौ)** त्या दोघांनीं निष्पाप रहावें. चुकूनसुद्धां पापमार्गाकडे प्रवृत्त होऊं नये. **(अशुभं मा आरतां ।** मं. १५) अशुभ व्यवहार कधींहि करूं नयेत. दोघांनीं परस्पर सहकार्यानें एक दुसऱ्याच्या विचारानें धर्मकार्यांत परस्परांस सहाय्यभूत होऊन रहावें, आणि स्वतःच्या उन्नतीचा मार्ग आक्रमण करावा.

पतीच्या घरांत पत्नीचा व्यवहार

पतीच्या घरांत स्त्रीचा निवास स्थिर झाला. गर्भधारणेनंतर पत्नीचें चित्त पतिगृहांत स्वत्वाच्या भावनेनें जास्त स्थिर होतें. तोंपावेतों तिला माहेराचें स्मरण असतें. पित्याच्या घरच्या मधुर स्मृति तिला स्मरत असतात. गर्भधारणा झाल्यानंतर पतिगृहाचें प्रेम वाढीस लागतें. अशावेळीं स्त्रीचा पतिगृहीं व्यवहार कसा असतो त्याचें उपदेशपर वर्णन **(मं. १७)** पासून सुरू होतें. प्रत्येक स्त्रीनें हे मंत्र मुखोद्गत करावेत.

(अ-घोर-चक्षु) स्त्री क्रूर दृष्टि करणारी असूं नये. तिनें नेहमीं आनंदी आणि प्रसन्न दृष्टीनें घरांत कार्य करीत रहावें. कोणावर क्रोधदृष्टि असूं नये. वक्रदृष्टीनें कोणाकडे पाहूं नये. **(अपति-घ्नी)** तिनें पतिला घातक, अपमानकारक अथवा विरोधी अशीं कृत्यें करूं नयेत. नेहमीं पतीच्या हित करण्यांत दक्ष रहावें. **(स्योना शिवा)** स्त्रिनें सर्वांस सुख द्यावें, सर्वांचें हित करावें, सर्वांच्या कल्याणाकडे नेहमीं लक्ष पुरवावें. **(शग्मा)** नेहमीं शुभ कार्य करावें. सर्व हितकर कार्यांत स्वतःचें चित्त गुंतवलेलें असावें. **(सु-यमा)** स्त्रिनें स्वतःच्या घरीं उत्तम धर्मनियमानुकूल आचरण ठेवावें. कधीं नियमबाह्य आचरण करूं नये. **(सु-सेवा)** गुरुजनांची सेवा उत्तम प्रकारें करावी, सेवा करणाऱ्यांवर क्रोध करूं नये. सेवकांशीं

प्रसन्नतापूर्वक वागावें. (**वीरसूः प्रजावती**) स्वतःची संतति वीर व्हावी म्हणून जे जे पथ्यकर व्यवहार जरूर करावयास हवे ते ते करावे. स्वतःच्या वीर भावनेनेंच संतति वीरश्रीयुक्त होईल, असें समजून स्वतःच्या मनांत वीरश्रीचे विचार वाढवावेत, आणि स्वतःच्या संततीस बालपणींच वीरतेचें शिक्षण देत रहावें. याप्रमाणें स्वतःची संतति सुवीर होण्यासाठीं जे जे उपाय करणें आवश्यक असतील ते करावेत. (**देवृ-कामा, अ-देवृ-घ्नी**) स्वतःच्या दीराचें हित, कल्याण करणारी, द्वेष न करणारी, त्याचा घातपात न करणारी, (**सुमनस्यमाना**) जिच्या अंतःकरणांत चांगल्या भावना आहेत, जिची मनोवृत्ति उत्तम आहे अशी स्त्री असावी; म्हणजे विद्या आणि विनय तसेंच सुनियमांनीं स्त्रिनें स्वतःचें मन उत्तम, शांत, गंभीर आणि विनययुक्त ठेवावें, आणि घरांतील सर्वांचीं मनें स्वतःकडे आकर्षित करावीं. (**सुवर्चाः**) स्त्री उत्तम तेजस्विनी व्हावी; तिनें पतिगृहीं घराची शोभा होऊन रहावें. (**पशुभ्यः शिवा**) पाळलेल्या पशुपक्षांचें हितसुद्धा गृहिणीनें पहावयास हवें, त्यांना योग्य वेळीं घासचारा, दाणापाणी बरोबर मिळालें कीं नाहीं, त्यांचें आरोग्य कसें आहे, वगैरे गोष्टींचा विचार करून त्या बाबतींत आवश्यक असतील तीं कर्तव्यें करावींत. (**गार्हपत्यं सपर्य**) गार्हपत्य अग्नींत प्रति दिवशीं हवन करावें. पुढें २६ आणि २७ व्या मंत्रांत हाच विषय पुनः आला आहे. त्यांत गृहपत्नीचीं कर्तव्यें अशा शब्दांनीं वर्णिलीं आहेत- (**सुमङ्गली**) उत्तम मंगल करणारी, शुभमंगल कामना करणारी, (**प्रतरणी**) दुःखांतून पार करणारी, (**सुसेवा**) उत्तम सेवा करणारी, (**पत्ये श्वशुराय-शंभूः**) पतीचें, सासऱ्याचें हित पहाणारी, (**श्वश्वे स्योना**) सासूचें सुख वाढविणारी, (**श्वशुरेभ्यः, गृहेभ्यः, पत्ये, अस्यै सर्वस्यै विशे स्योना**) सासरा, पति, घरांतील सर्व मुलें माणसें आणि कुटुंबांतील सर्व मनुष्यें यांना गृहिणीनें सुख द्यावें.

हा उपदेश ध्यानांत ठेऊन स्त्री जर पतीच्या म्हणजे स्वतःच्या घरांत सर्व व्यवहार करील तर ती सर्वांच्या आदरास पात्र होईल, हें नक्कीच. यांत कांहीं शंका नाहीं, असा येथें गृहिणींचा उत्तम आदर्श दाखविला आहे. नवविवाहित वधूनें प्रथम पतिगृहीं आल्यानंतर ते स्वतःचें समजून कसें वागावें, याविषयीं या कांडाच्या प्रथम सूक्तांतील ४२ ते ४७ पर्यंतच्या मंत्रांत सुद्धां सांगितलें आहे, तें स्पष्टीकरण वाचकांनीं येथें आठवून पहावें, आणि प्रौढ कन्यांना या मंत्रांतील भावार्थ बरोबर समजावून द्यावा.

दारिद्र्य दूर करा

पतीच्या घरांत धर्मपत्नीचा प्रवेश झाल्यानंतर वधू आणि वर दोघांनीं मिळून स्वतःच्या घरांतें दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न करावा; दारिद्र्य घरांत राहूं नये. याविषयीं १९ व्या मंत्रांत उपदेश केला आहे—

हे निर्ऋते ! प्रपत मा रंस्थाः । अभिभूः स्वात् गृहात् । त्वा ईडे । (मं. १९)

वधू आणि वरानें म्हणावें कीं, ' हे दारिद्र्या ! येथून दूर जा. येथें आमच्या घरांत राहूं नको. आम्हीं तुझा पराभव करूं आणि आमच्या घरांतून तुला बाहेर काढून लावूं. ही सत्य गोष्ट निश्चयपूर्वक सांगतों. ' याप्रमाणें निश्चयाचीं वाक्यें दरिद्रतेस सांगण्यांत यावींत. त्याचें तात्पर्य असें कीं पति आणि पत्नीनें स्वतःच्या घरांतून दारिद्र्याचें निर्मूलन करण्याचा निश्चय करावा आणि तदनुसार प्रयत्न करावा.

वडिलांना नमस्कार

विसाव्या मंत्रांत सांगितलें आहे कीं वधूनें अग्निपूजा केल्यानंतर आणि स्वतःची ईश्वरोपासना- देवपूजा, ध्यान, जप, पोथी वांचणें, तुळशीस पाणी घालणें, वगैरे संपल्यानंतर (**पितृभ्यः नमस्कुरु** मं. २०) स्वतःच्या घरांतील वडिल मंडळींस नमस्कार करावा आणि नंतर स्वतःच्या कार्यास लागावें. यानें एक महान् वैदिक आदर्श दाखविला आहे. स्त्रिनें प्रातःकाळीं लवकर उठावें, शरीर-शुद्धि, स्नान, वगैरे आटोपून ईश्वर उपासना, हवन वगैरे झाल्यावर स्वतःच्या घरांतील वडिल मंडळींस- पति, सासु, सासरा, वडिल दीर, तसेंच इतर वडिल मनुष्यें घरांत कोणी असल्यास त्यांना यथायोग्य नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घ्यावेत आणि मग स्वतःचें कार्य सुरू करावें. हा नियम कांहीं नववधू पुरताच आहे, तिलाच उत्तम आहे असें नाहीं; परंतु घरांतील सर्वच मंडळी, विशेषतः कुमार-कुमारी यांच्यासाठींहि उत्तम आहे. आम्हांस आशा आहे कीं प्रत्येक आर्यांच्या घरांत ही प्रणाली चालू रहावी आणि गुरुजनांना नमस्कार करणें हा एक रोजचा आवश्यक कार्यक्रम समजण्यांत यावा.

याप्रमाणें गुरुजनांना सकाळीं नमस्कार करणें हें एक प्रकारचें (**शर्म वर्म एतत्** । मं. २१) सुखदायक आणि संरक्षक कवच आहे, याप्रकारें कुमार-कुमारिकांचें पुष्कळ आपत्तींतून संरक्षण होतें. म्हणून या पद्धतीचा प्रचार सर्व घरांतून होणें योग्य आहे.

(सूचना :- मंत्र १५ चा उत्तरार्ध येथें २२ व्या मंत्रांत पुनः आलेला आहे.)

नववधूनें ईश्वर उपासना करतांना आणि अग्निमध्यें हवन करतांना कातड्यावर विशेषतः मृगाजिनावर बसावें, आणि स्वतःची उपासना करावी. (पहा मं. २२-२४)

रोहिते चर्मणि उपविश्य सुप्रजा अग्निं सपर्यतु । (मं. २३)

' कृष्णाजिनावर बसून उत्तम प्रजा उत्पन्न करणाऱ्या स्त्रिनें अग्नीची उपासना करावी ! अग्नीची उपासना करण्याचें कारण वेदमंत्रांत असें दिलें आहे—

एष देवः सर्वा रक्षांसि हन्ति ॥ (मं. २४)

' हा अग्निदेव सर्व रोगबीजरूप राक्षसांचा नाश करतो. ' आणि कुटुंबीजनांस रोगमुक्त करतो. असें अग्निउपासनेचें महत्त्व आहे, म्हणून प्रत्येक घरांत हवन व्हावयास हवें. याप्रमाणें जी स्त्री करते तिला (**सुज्येष्ठः पुत्रः** । मं. २४) उत्तम श्रेष्ठ पुत्र होतो. सुप्रजानिर्मितीसाठीं ईश्वरआराधनेची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळें मातापिता आणि कुटुंबांतील इतर माणसांचीं मनें सुसंस्कारसंपन्न होतात, आणि त्याचा परिणाम सुप्रजा निर्माण होण्यांत होतो. २५ व्या मंत्रांत पुनः तेंच कारण दिलें आहे—

प्रति भूष देवान् । (मं. २५)

' देवांना सुशोभित करा ' अशी आज्ञा दिली आहे. ईश्वरोपासना करण्यासच ही आज्ञा प्रेरित करते. देवतांना अलंकारांनीं सुशोभित करा, अशी येथें आज्ञा आहे. मातृदेव, पितृदेव, अतिथिदेव, पतिदेव आदि अनेक देव घरांत आहेत. त्यांस सुशोभित करण्याविषयीं ही आज्ञा असणें सुद्धां संभवनीय आहे. घरांत ज्या ज्या देवता असतील त्या सर्वांची शोभा वाढविणें हें गृहस्थाचें परम कर्तव्यच आहे.

कित्येक लोक ' देवतांच्या मूर्तींना ' शृंगारणें असा या मंत्राचा अर्थ समजतात आणि या त्यांच्या मताला आधार म्हणून वेदांत इंद्रादि देवतांच्या मूर्तींचें वर्णन आहे. असें सांगतात. या विषयीं त्यांचीं प्रमाणें अशीं आहेत—

क इमं दशभिर्ममेन्द्रं क्रीणाति धेनुभिः । (ऋ. ४।२४।१०)

महे चन त्वामद्रिवः परा शुल्काय देयाम् ।
न सहस्राय नायुताय वज्रिवो न शताय शतामघ ॥ (ऋ. ८।१।५)

' (**इमं इन्द्रं**) या इंद्राला (**दशभिः धेनुभिः**) दहा गाई देऊन (**क्रीणाति**) खरेदी करतो. शेंकडो अथवा हजारों गाई मिळून सुद्धां (**शुल्काय न परा देयां**) वाटेल तितकी किंमत मिळाली तरी या इंद्राला विकणार नाहीं. ' हे लोक म्हणतात कीं या मंत्रांत इंद्राची मूर्ति खरिदण्याचा आणि विकण्याचा उल्लेख आहे. श्री बाबु अविनाश चंद्र दास एम्. ए., पी. एच्. डी. यांनीं आपल्या ' वैदिक कल्चर ' नांवाच्या पुस्तकांत पान १४५ ते १४८ वर या मंत्राचा विचार केला आहे. अंतीं इतके मंत्र देऊनहि वेदांत निःसंशय मूर्तिपूजा आहे असें स्वतःचें मत जाहीर केलें नाहीं. म्हणजे त्यांच्या मतें सुद्धां वेदांत मूर्तिपूजेचें अस्तित्व सिद्ध होत नाहीं. म्हणून ज्याविषयीं पुरावा पुढें आणणाऱ्याला, आधार दाखवणाऱ्यालाच निश्चितता नाहीं, स्वतःचा पुरावा डळमळीत वाटतो, त्या विषयाचें खंडनमंडन करण्याची आम्हांला कांहींच जरुरी नाहीं. आम्हीं हें मत फक्त एवढ्याकरतांच मांडलें कीं वरील मंत्रांवर बाबू महाशय कशी कल्पना करतात हें वाचकांना कळावें. जे वाचक शोधाच्या दृष्टीनें विशेष अध्ययन करीत असतील त्यांनीं या मंत्रांचा अधिक विचार करावा. वरील बाबू-महाशयांचें दुसरेंहि मत (ऋ. ८।६९।१५–१६) या मंत्रांत जेथें इंद्रास रथांत बसविण्याचा उल्लेख आहे तेथें इंद्राची मूर्ति बनवून रथांत बसवावी असा अर्थ समजला पाहिजे, असें आहे. जर अशा प्रकारें अर्थ —कल्पना— करावयाचा असेल तर प्रायः सर्व देवतांच्या मूर्तींचें वर्णन वेदांत आहे, असें ते म्हणू शकतील. कारण वेदांत अनेक देवतांच्या वर्णनांत रथांत बसण्याचें वर्णन आहे. देवतांचें रथांत बसणें याचा आध्यात्मिक अर्थ काय त्याची चर्चा आम्हीं ' वैदिक अग्निविद्या ' या पुस्तकांत अग्निदेवतेविषयीं केली आहे. येथें संक्षेपतः सांगण्यानें कांहीं इष्टहेतु साध्य होईल असें नाहीं, म्हणून तो विषय आम्हीं येथें घेत नाहीं. आमच्या विचाराप्रमाणें येथें ' **देवान् प्रति भूष** ' याचा अर्थ स्वतःच्या कुटुंबांत जे गुरुजन आहेत त्यांना सुभूषित करावें असा आहे. यापुढें विशेष शोधाअंतीं जें नक्की ठरेल तें नंतर प्रकाशित करूं. अस्तु.

२८ मंत्रांत या सुमंगल वधूला सज्जन स्त्रीपुरुषांनीं पहावी आणि आशीर्वाद द्यावेत, तिचें कल्याण चिंतावें आणि तिला सहाय्य करावें असा भाव आहे. ज्या दुष्ट हृदयी (**दुर्हार्दः युवतयः**) स्त्रिया तरुण स्त्रियांना फसवून कुमार्गास नेतात, अशा दुष्ट स्त्रिया या नववधूवरांच्या जवळपास न येवोत, म्हणजे अशा दुष्ट स्त्रिया आणि दुष्ट पुरुषांच्या प्रभावापासून ही नवदंपती सुरक्षित राहोत.

गुप्त गोष्ट

यानंतर मंत्र ३० ते ४० पर्यंत स्त्री पुरुषासंबंधीं म्हणजे गर्भाधानाविषयीं वर्णन आहे. त्यांत मनन करण्यायोग्य अनेक गोष्टी असल्या तरी तो विषय फक्त गृहस्थांच्याच (विवाहित स्त्री-पुरुषांच्याच) उपयोगाचा आहे. ब्रह्मचाऱ्यांनीं तो वाचणें योग्य नव्हे असा तो गुप्त विषय आहे, म्हणून त्याचें विवरण येथें केलें नाहीं. ज्या वाचकांस तें जाणण्याची इच्छा असेल त्यांनीं त्या मंत्रांचा विचार केला असतां त्यांना तें समजेल.

वधूचें वस्त्र

वधूचें विवाहसमयींचें वस्त्र ब्राह्मणास दान करण्याचा आदेश मं. ४१।४२ यांत आहे. हें वस्त्र देणें अगदीं जरुरी आहे कारण तें (**ब्रह्मभागः**) ब्राह्मणाचा भाग आहे. हें दान (**देवैः दत्तं**) देवांमार्फत दिलें गेलें आहे. (**मनुना साकं**) मनुसह तें आलेलें आहे म्हणजे तें देण्याची प्रथा मनूनें पाडली आहे. हें (**ब्रह्मणे**) ब्राह्मणाला दान देण्याला योग्य आहे. हें (**चिकितुषे ब्रह्मणे यः ददाति**) जो ज्ञानी ब्राह्मणाला वस्त्राचें दान देतो, त्याला लाभ होतो. याप्रमाणें वस्त्रदानाचा महिमा या मंत्रांत वर्णिला आहे. ब्राह्मणास याप्रमाणें वस्त्रदान करण्यांत यावें हा त्याचा तात्पर्यार्थ आहे. विद्वान् ब्राह्मणांस याप्रमाणें वस्त्रदान देऊन त्यांचा योगक्षेम चालवावा असा उपदेश या मंत्रांतून मिळतो. गृहस्थांवर ही एक प्रकारची धार्मिक जबाबदारीच आहे. गृहस्थ जर अशीं दानें देत रहातील तर त्यांच्या अशा सहाय्यावर मोठमोठीं गुरुकुलें चालू शकतील, आणि विद्येचा प्रसारसुद्धां पुष्कळ होईल.

गृहस्थांचें घर

४३ व्या मंत्रावरून गृहस्थाचें घर कसें असावें तें समजतें. (**सुगृहौ**) स्त्रीपुरुषांनीं उत्तम घरांत रहावें. घर आंतून तसेंच बाहेरून उत्तम सुव्यवस्थित असावें. कसलें तरी नसावें. प्रत्येक खोली आणि घराच्या बाहेरील भाग सर्व यथायोग्य, स्वच्छ, सुंदर आणि डौलदार असावा. (**स्योनात् योनेः अधि बुध्यमानौ**) स्त्रीपुरुषाची झोंपण्याची खोली अत्यंत सुंदर, सुखदायक अशी असावी. उन्हाळयांत शांत, थंड आणि हिंवाळयांत उबदार व पावसाळयांत त्यांत रहाणाऱ्यास जराहि कष्ट पडूं नयेत. अशा सुखदायक खोलींत स्त्रीपुरुषांनीं झोंपावें. खोली अशा प्रकारें सुखकारक, आरामदायक असल्यानें त्यांत झोंपणाऱ्यांना रात्रीं उत्तम निद्रा येईल. ते ब्राह्म मुहूर्तीं (**अधि बुध्यमानौ**) स्वतःच्या शयनमंदिरांत जागे येऊन उठतील आणि स्वतःच्या धर्मकार्यास सुरवात करतील. त्या स्त्रीपुरुषांनीं आपल्या सुंदर मंदिरांत रहावें आणि (**हसा मुदौ**) हास्यविनोद करतां करतां स्वतःचे दैनिक व्यवहार करावे. कधीं कोणाशीं क्रोध, द्वेष इत्यादि विकारयुक्त आचरण करूं नये. आनंदानें रहावें. (**महसा मोदमानौ**) महत्त्वाच्या ज्ञानाच्या आनंदानें प्रसन्न व्हावें. त्या स्त्रीपुरुषांच्या परस्पर वागणुकीनें असें दिसावें कीं पुष्कळ आनंदानें ते स्वतःचे व्यवहार करीत जीवन व्यतीत करीत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरूनच त्यांचा आनंद दिसला पाहिजे.

(**सु-गू**) उत्तम गाई पालन करणारा हा गृहस्थ असावा. घरांत दूध देणाऱ्या उत्तम गाई असाव्यात, त्यांचें दूध, दहीं, ताक, लोणी, तूप वगैरे कुटुंबीजनांस दररोज मिळत रहावें, आणि ते त्यांचें सेवन करून हृष्टपुष्ट आणि आनंदित व्हावेत. ‘ **सु-गू** ’ शब्दाचा दुसरा अर्थ उत्तम इन्द्रिययुक्त असा सुद्धां होतो. या स्त्री-पुरुषांनीं स्वतःच्या उत्तम घरांत राहून ब्रह्मचर्यादि सुनियमांचें पालन करून स्वतःचीं इंद्रियें उत्तम स्थितींत ठेवावींत. (**सु-पुत्रौ**) ज्यांना उत्तम मुलें झालीं आहेत आणि त्यांना उत्तम शिक्षण संपन्न करीत आहेत अशीं मातापितरें असावीं. सुसंततीस जन्म देऊन तिला संस्कारसंपन्न करावयाची, उत्कृष्ट शिक्षण द्यावयाचें हें प्रत्येक गृहस्थाचें कर्तव्य आहे, धर्म आहे. नियमबद्ध व्यवस्थित राहिल्यानें उत्कृष्ट संतति होते. याप्रमाणें सर्व गृहस्थांनीं स्वतःच्या घरांत प्रसन्नचित्तानें रहावें आणि स्वतः दीर्घायु होण्याचें साधन करावें. येथें उत्तम घराचा आदर्श सांगितला आहे. वाचकांनीं तो स्मरणांत ठेऊन स्वतःचें घर तसें करण्याचा प्रयत्न करावा.

(**आण्डात् पतत्री एव**) ज्याप्रमाणें अंड्यांतून पक्षी मुक्त होतो आणि स्वेच्छेनें आकाशांत संचार करण्याचा आनंद प्राप्त करतो त्याप्रमाणें प्रत्येक गृहस्थानें प्रयत्न करून (**विश्वस्मात् एनसः परि अमुक्षि** । मं. ४३) सर्व पापांपासून मुक्त होऊन, निष्पाप होऊन विचरावें. हा प्रत्येक गृहस्थाचा आदर्श होय. मीं निष्पाप होईन असा निश्चय प्रत्येक गृहस्थानें करावा आणि त्याच्या सिद्धिसाठीं स्वतःच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. दररोज (**नवं वसानः**) नवें म्हणजे स्वच्छ धुतलेलें वस्त्र धारण करून सुशोभित रहावें. स्वतःचे शरीर सुंदर प्रकारें सुशोभित करावें. शरीराची सुंदरता वाढविण्याकडे लक्ष द्यावें, याविषयीं कधीं उदासीनता बाळगू नये. स्त्रीपुरुषांनीं सुंदर वस्त्र आणि अलंकार यांनीं स्वतःचीं शरीरें सुंदर आणि रमणीय, तसेंच दर्शनीय, आकर्षक करावीं. (**सुरभिः**) सुगंधित चंदन, अत्तर वगैरेचा उपयोग करावा. आनंदानें प्रसन्नमनानें रहावें. शरीरावर दुर्गंधीयुक्त कोणताहि पदार्थ नसावा. शरीर दररोज स्नानानें दुर्गंधापासून मुक्त करावें. नित्य धूत वस्त्रें धारण करावींत. चंदन वगैरेचा लेप करावा. याप्रमाणें सुंदर बनून स्त्रीपुरुषांनीं स्वतःच्या घरांतून (**विभातीः उषसः उदागां**) प्रकाशित उषःकालीं घराबाहेर पडावें. प्रातःकालीं स्नानादि तसेंच उपासनादि कर्में उरकून या शुभसमयीं फिरावयास जावें. उषःकालीं स्त्री अथवा पुरुष, कोणीहि पथारीवर झोंपून राहूं नये. याप्रमाणें कोणाहि गृहस्थानें आळशी राहूं नये. नेहमीं उद्योगी, प्रयत्नशील, सुसंस्कार संपन्न अशा गृहस्थांनीं प्रशंसित प्रकारें स्वतःच्या उद्योगांत मग्न असावें.

प्रत्येक गृहस्थाची इच्छा असते कीं (**नः अंहसः मुंचन्तु** । मं. ४५) आम्हीं सर्व पापांपासून मुक्त व्हावें. गृहस्थानें नेहमीं स्वतःच्या आचारशुद्धतेचाच विचार करावा. कारण

गृहस्थाश्रमांत नेहमीं धनाची जरुरी असते आणि त्यामुळें मनुष्य वांकड्या व्यवहारांत फसण्याची जास्त शक्यता असते. म्हणून श्रम करणाऱ्या गृहस्थाच्या मनांत पापांपासून मुक्त रहाण्याचा विचार नेहमीं असावा. जर असा विचार त्याच्या मनांत स्थिर राहिला तर अत्यंत कठीण प्रसंगींसुद्धां तो दक्षतापूर्वक वागेल आणि पापापासून स्वतःचें संरक्षण करील.

द्यावा आणि पृथ्वी हे लोक कसे नियमपूर्वक वागत आहेत हें गृहस्थानें पहावें. सूर्य, चंद्र, पृथ्वी, तारे इत्यादि सर्व स्वतःच्या कक्षेत भ्रमण करीत आहेत. ते कधीं दुसऱ्याच्या कार्यांत लुडबड किंवा ढवळाढवळ करीत नाहींत. स्वतः कधीं आळस करीत नाहींत, आणि कधींहि स्वतःचें कार्य सोडीत नाहींत. सर्व ऋतु आणि सर्व काळ यथायोग्यपणें योग्य समयीं होत आहेत. कोणीहि कोणत्याहि प्रकारें शैथिल्य दाखवित नाहीं. हें सृष्टिचक्र पाहून गृहस्थानें स्वतःच्या मनाशीं विचार करावा, आणि निश्चय करावा कीं, 'आम्ही सुद्धां आमचें आचरण असेंच ठेऊं आणि या सृष्टींत रहाण्यास योग्य होऊं. (**महिव्रते**) महान् नियमांचें पालन करण्यानेंच मनुष्य सुयोग्य होऊं शकतो. मनुष्याची विशेष योग्यता असल्यामुळेंच त्यानें सुयोग्य नियमांचें पालन करावें आणि सृष्टि नियमांना अनुकूल राहून विशेष प्रभावी व्हावें.

(**ये प्रचेतसः तेभ्यः नमः** । मं. ४६) जे विशेष ज्ञानी आहेत त्यांना नमन केलें पाहिजे. कारण नम्रतापूर्वक त्यांच्या जवळ गेल्यानें ते ज्ञानोपदेश देतात आणि त्या ज्ञानानें मनुष्य कृतार्थ होऊं शकतो. म्हणून गृहस्थानें ज्ञानी गुरुजनांस नमस्कार करण्यास जराहि संकोच करूं नये, अथवा माघार घेऊं नये.

ईश्वराच्या अद्भुत कार्याचें वर्णन मं. ४७ मध्यें केलें आहे. ईश्वर चिकटवल्याशिवाय आणि भोंकें पाडल्याशिवाय सांधे जोडतो. आपल्या शरीरांतील सर्व हाडें याप्रमाणें एक दुसऱ्याशीं जोडलेलीं आहेत. त्यांत एकही भोंक नाहीं कीं कोठें चिकटवण्याची जरुरी भासलेली नाहीं. हें अद्भुत रचनाकौशल्य परमेश्वराचें आहे. वाचकांनी स्वतःच्या शरीरांत असेंच जाऊन त्याचा पडताळा पहावा आणि परमेश्वराच्या अद्भुत शक्तीचा अनुभव घ्यावा. (**वि-हुतं पुनः निष्करत्**) आमच्या फाटलेल्या शरीरास सांधून पुनः पूर्ववत करतो. म्हणून त्याला नमस्कार करून त्याची शक्ति आपणांस अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उपासनेनेंच हें सर्व साध्य होऊं शकतें.

४८ व्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, (**तमः अस्मत् अप उच्छतु** । मं. ४८) ' अंधःकार आमच्यापासून दूर राहो. ' अंधःकार सात्विक, राजस, तामस असे अनेक प्रकारचे आहेत. याशिवाय आत्मिक, बौद्धिक, मानसिक आणि इंद्रिय-विषयक अंधःकार निराळेच. हे अंधःकार अथवा अज्ञानरूपी विष आमच्या पैकीं कोणाजवळहि न येवो. कारण सर्व प्रकारचे दोष, पापें, अधोगति या अज्ञानामुळेंच होतात, आणि अज्ञान दूर होई पावेतों त्याच्या दोषांपासून सुरक्षित रहाणें असंभवनीयच आहे. म्हणून सर्व प्रकारचें अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे. याप्रमाणें ज्या (**यावतीः कृत्याः**) जे घातपाताचे विचार आहेत (**यावन्तः पाशाः**) जीं अनेक प्रकारचीं बंधनें आहेत, (**याः व्यृद्धयः याः असमृद्धयः**) जें दारिद्र्य आणि असमृद्धि आहे त्या सर्व दूर केल्या पाहिजेत. गृहस्थाचें कर्तव्य ४९ व्या मंत्रांत याप्रमाणें सांगितलें आहे. घातपाताचे आण दरिद्री विचार आणि आचार सर्व दूर केले पाहिजेत आणि अहिंसेचे, स्वातंत्र्याचे, संपन्नतेचे आचार स्वतःमध्यें आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनुष्याचे जसे विचार असतात तसें त्याचें आचरण होतें. या दृष्टीनें हा मंत्र पुष्कळ बोधप्रद आहे.

स्त्रियांनीं तयार केलेलीं वस्त्रें

कापड विणण्याचा व्यवसाय गृह उद्योग म्हणून विकास पावावा. दुसरें कोणतेंहि वस्त्र कोणीं वापरूं नये. मंत्र ५० आणि ५१ यांत स्त्रियांनीं तयार केलेलीं वस्त्रें वापरावींत असें सांगण्यांत आलें आहे.

यत् पत्नीभिः उतं वासः तत् नः स्योनं उपस्पृशात् ।
(मं. ५१)

' जें कापड आमच्या स्त्रियांनीं विणलें आहे तेंच आम्हांस सुखस्पर्श देणारें प्रतीत होवो. ' ज्याचे (**अन्ताः सिचः**) कांठ पदर, ज्याचे (**ओतवः तन्तवः**) उभे आडवे दोरे, ताणे, आम्हांस सुख देणारे होवोत; म्हणजे स्वतःच्या घरच्याच स्त्रियांनीं स्वतःच्या घरीं वस्त्रें तयार करावींत, घरांत सूत काढावें, ताणे पण घरांतच केले जावेत, कांठ आणि पदर सुद्धां सुंदर प्रकारें विणून सर्व घरांतच सुंदर तयार करण्यांत यावेत, आणि असें घरीं विणलेलें कापड च स्त्री-पुरुषांनीं वापरावें. पुरुषांस स्वतःच्या घरीं स्वतःच्या पत्नीनें तयार केलेलें वस्त्र आपण वापरतों यामुळें सुख, आनंद आणि अभिमान वाटावा. स्वतःच्या घरबनावटीचें वस्त्र त्यागून आणि परकीय बनावटीचें वस्त्र वापरून, (**वयं मा रिषाम** । मं. ५०) आमच्यापैकीं कोणीहि नाश पावूं नये. कारण स्वतः तयार केलेलें वस्त्र न वापरल्यानें आणि इतर बनावटीचें वस्त्र वापरल्यानें निःसंदेह नाश होईलच. या नाशांतून गृहोद्योगास वांचविण्याचा मात्र एकच रस्ता आहे. तो असा कीं

घरांतील प्रत्येकानें आणि प्रत्येक घरीं सर्वांनींच सूत काढावें आणि त्याचीं वस्त्रें तयार करून ती उपयोगांत घ्यावीत. आपत्तींतून वांचण्याचा आणि संपत्तिमान होण्याचा हा एकमात्र उपाय आहे. प्रत्येक घरीं याप्रमाणें वैदिक धर्माच्या आदेशाचें पालन व्हावें, स्वतः तयार केलेल्या वस्त्राचा कोणीं तिरस्कार करूं नये, आणि परकीय बनावटी वस्त्रांवर प्रेम करूं नये. हेंच उद्धाराचें एकमात्र साधन आहे.

५२ व्या मंत्रांत सांगितलें आहे कीं पतीची इच्छा करून पतीच्या घरीं आलेल्या नववधूनें या दीक्षाव्रताचें पालन करावें. हें दीक्षाव्रत म्हणजे स्वतः सूत काढणें आणि कुटुंबीजनासाठीं त्याचीं वस्त्रें विणणें, हेंच होय जी स्त्री या व्रताचें पालन करील तीच दीक्षा धारण करणारी होऊं शकेल आणि कुळाचा उद्धार करूं शकेल. परंतु जी स्त्री स्वतः सूत काढणार नाहीं आणि परक्यांनीं विणलेलीं वस्त्रें वापरील, अथवा वापरण्याचा आग्रह ठेवील ती स्वतःच स्वतःच्या घरांत दारिद्र्यास निमंत्रण करील; म्हणून घरांतील सर्व कुटुंबीजनांनीं हें दीक्षाव्रत धारण करावें आणि या व्रताचें पालन करून उन्नति प्राप्त करावी हें त्यांस उचित होय. वेदाचा हा आदेश सर्व गृहस्थाश्रम्यांसाठीं आहे. जे त्याचें पालन करतील ते अभ्युदयास प्राप्त होतील आणि जे त्यास विमुख होतील त्यांचें जीवन असफल होईल.

गाईचें यश

मंत्र ५३ ते ५८ पर्यंत गाईचें यश वर्णिलें आहे. सर्व गृहस्थाश्रमवासी यांनीं घरांत गाय पाळावी आणि तिचेंच दूध, दहीं, ताक, लोणी, तूप वगैरे सेवन करावें. गाईंत (**वर्चः**) तेज, (**तेजः**) स्फूर्ति, (**भगः**) ऐश्वर्य, (**यशः**) यश, (**पयः**) दूध आणि (**रसः**) अजरस राहिला आहे. गाईच्या दुधांतून या सर्वांची प्राप्ति मनुष्याला होते. त्या उपरांत शुद्ध गोमय गोमूत्र इत्यादि सुद्धां औषधि गुणांनीं भरपूर आहेत. या सर्व पदार्थद्वारा गाय मनुष्याला सुख देते. हे सर्व लाभ घरांत गाय पाळल्याशिवाय मिळणार नाहीत. म्हणून गृहस्थांनीं स्वतः गोपालन करून वर्चस्वी, तेजस्वी, भगवान् आणि यशस्वी झालें पाहिजे.

पुढें ५९ ते ६२ या मंत्रांत पापांपासून वांचण्याचा, दूर रहाण्याचा, स्वतःनें रक्षण करण्याचा उपदेश केला आहे. जे स्वतःचे (**केशिनः**) केंस वाढवितात, (**अघं कृण्वन्तः**) पाप करतात, (**रोदेन समनर्तिषुः**) रडतात आणि नाचतात-कुदतात, स्त्रिया (**विकेशी**) केस खेचून अस्ताव्यस्त मोकळे टाकून घरांत रडण्याचा धुमाकुळ घालतात, आक्रोश करतात, नाना प्रकारचीं पातकें करतात, ते सर्वच पापी लोक आहेत; म्हणून त्यांना समाजांतून दूर करणें योग्य आहे. जे पापी भाव आहेत ते मनांतून दूर व्हावेत, आणि जे पापी लोक आहेत ते समाजांतून दूर व्हावेत. याप्रमाणें पापी विचाररहित होऊन मन शुद्ध व्हावें, आणि मनांतून आणि समाजांतून गर्व आणि नाशाचें मूळ कारण दूर व्हावें, आणि संपूर्ण समाजांत आनंद आणि प्रसन्नता निवास करो. हेंच गृहस्थाश्रमाचें ध्येय आहे.

मंत्र ६३ आणि ६४ यामध्यें म्हटलें आहे कीं, (**मे पतिः दीर्घायुः अस्तु**) माझा पति दीर्घायु व्हावा अशी स्त्रीची इच्छा असावी. स्त्रीनें पतीचें कधींहि अहित करूं नये, मनानें सुद्धां अहित चिंतूं नये. पतीचें हित करण्यांत नेहमीं दक्ष राहून त्याच्या दीर्घायुष्यासाठीं प्रार्थना करावी. (**चक्रवाका इव दम्पती**) ज्याप्रमाणें चक्रवाक पक्षी नेहमीं जोडीनें रहातात आणि परस्पर प्रेमानें बरोबरीनें हिंडतात-फिरतात त्याप्रमाणें या नूतन वधूवरांनीं गृहस्थाश्रमांत प्रेमानें राहून एकदुसऱ्यासह विहार करावा, पत्नीला एकमात्र पति आणि पतीला एकमात्र पत्नी अशी भावना चक्रवाक पक्ष्यांच्या जातींत असते, तशीच स्थिति गृहस्थाश्रम्यांची असावी. धर्मपत्नीचें प्रेम एकमात्र पतिस्थानीं आणि पतीचा ओढा एकमेव धर्मपत्नीकडे असावा. त्याच्यांत कांहीं व्यभिचार दोष न व्हावा. त्यांनीं एक मनानें आणि एकविषयीं होऊन गृहस्थाश्रमांत रहावें. याप्रमाणें (**सु-अस्तकौ**) स्वतःचें उत्तम घरदार करून आणि (**विश्वं आयुः व्यश्नुतां**) सत्यपूर्ण संपूर्ण आयुष्य व्यतीत करावें. याप्रमाणें गृहस्थाश्रमांत पति-पत्नींनीं सुखानें, आनंदानें, प्रसन्नचित्तानें रहावें आणि गृहस्थधर्माचें कार्य करावें.

पुढें ६५ ते ६७ या तीन मंत्रांत विशेष प्रकारें सांगितलें आहे कीं, विवाहादि समयीं (**कृत्यां**) जे घातपाती विचार केले असतील, जें (**दुष्कृतं दुरितं**) दुष्कर्म अथवा पापाचार घडले असतील, जे (**मलं**) मळीन आचार तसेंच (**दुरितं**) वाईट व्यवहार होऊन गेले असतील, ते सर्व आम्हांपासून दूर जावोत, आणि आम्हीं (**शुद्धाः यज्ञियाः अभूम**) शुद्ध, पवित्र आणि पूज्य व्हावें. तसेंच (**नः आयूंषि प्रतारिषत्**) आम्हांस दीर्घ आयुष्य प्राप्त व्हावें. साधारणतः असा नियम आहे कीं मोठमोठ्या उत्सव-विवाहादिक कार्यांत, ज्यांत अनेक बरे वाईट पुष्कळ मनुष्यें एकत्रित होतात तेथें कोणी ना कोणीं कांहीं तरी हीन आचार करतोच, कांहीं तरी दोष घडतातच. असे दोष मोठा समाज एकत्रित होण्यामुळें घडतात. असें समजून त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेंच शुद्ध, पवित्र आणि यज्ञास योग्य होण्याचा प्रयत्न प्रत्येक गृहस्थानें केला पाहिजे.

कदाचित् पूर्वी कांहीं दोष घडले असतील त्या विषयीं जास्त विचार करण्यांत अथवा त्यांत जास्त वेळ न घालवितां, त्यापुढें आत्मशुद्धि करण्याकडे मन लावावें. याप्रमाणें शुद्ध आणि पवित्र होऊन गृहस्थानें आदर्श जीवन व्यतीत करावें.

केसांची पवित्रता

स्त्रियांचे केंस स्वच्छ आणि पवित्र ठेवण्याचा उपदेश पुढें मंत्र ६८ आणि ६९ यांत दिला आहे. (**कंटकः अस्याः केश्यं मलं अप लिखात्** । मं. ६८) कंगवा अथवा फणी या स्त्रिच्या केसांत राहिलेल्या मळास दूर करो. हें दररोजचें कार्य आहे. स्त्रियांनीं दररोज सर्व केंस मोकळे करून व त्यास चांगलें सुगंधी तेल लावून फणीनें केंस विंचरून त्याची उत्तम प्रकारें वेणी गुंफावी. चार अथवा आठ दिवसांत एक दिवस, अथवा दोनदां सवडीनुसार स्वतःचे केंस कांहीं मलनिवारक वस्तूनें-शिकेकाई, आंवळकांठी—शुद्ध पाण्यानें धुवून टाकावेत. आणि स्वच्छ कपड्यांनीं पुसून सुकवून मग त्यांत तेल घालून विंचरावें आणि वेणी घालावी. केंसांची निगा राखून ते स्वच्छ आणि भरपूर राखणें हें एक स्त्रियांचें आवश्यक कार्य आहे.

स्त्रिच्या (**अंगात् अंगात् यक्ष्मं अपनिदध्मसि** । मं. ६९) प्रत्येक अवयवांतून मळास अथवा रोग बीजांस दूर केलें पाहिजे. कारण कीं स्त्री राष्ट्रीय संतानांची जननी आहे. ती जर मलीन, अपवित्र किंवा रोगयुक्त राहिली तर राष्ट्राची भावी प्रजा सुद्धां तिच्यासारखीच होईल. म्हणून स्त्रियांचीं शरीरें सबल, सुदृढ, निरोगी आणि पवित्र असावयास हवींत. त्यामुळें भावी प्रजा निरोगी, सुदृढ, बलिष्ठ निर्माण होत राहील. सर्व प्रकारचा मळ पाण्यानें दूर करतां येतो ही गोष्ट सत्य आहे. तेवढ्यासाठीं जलस्थानें सुद्धां पवित्र, शुद्ध, स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न व्हावयास हवा. पिण्याच्या पाण्याच्या स्थानांत लोक जर स्नान करतील तर त्यांच्या शरीराचा मळ त्या पाण्यांत जाऊन, पिण्याच्या पाण्यानें पवित्रता आणि शुद्धता व्हावयास हवी, त्याऐवजीं अशा पाण्यानें अपवित्रता आणि रोग वाढतील. म्हणून म्हटलें आहे कीं (**अपः मलं मा प्रापत्** । मं. ६९) मळ जलस्थानांत पडूं नये. म्हणजे संपूर्ण जलस्थान शुद्ध, स्वच्छ, पवित्र आणि निर्मल रहावयास हवें. हल्लीं लोक तलावांत, विहिरीवर, नदींत आणि अन्य जलाशयांत स्नान करतात, कपडे धुतात, भांडीं घासतात आणि इतर अनेक प्रकारें घाण करतात, आणि नंतर तेथीलच पाणी पिण्यासाठीं भरून आणतात. त्यामुळें अनेक रोग होतात. म्हणून वेदाचा हा आदेश गृहस्थांनीं नीट ध्यानांत ठेवला पाहिजे. कोणत्याहि जलाशयांत कोणीहि मनुष्यानें अस्वच्छता करूं नये. जलस्थान, शुद्ध, स्वच्छ, पवित्र आणि निरोगी स्थितींत राखावें. अशा शुद्ध जलाचा उपयोग करून स्वतःच्या शरीराचें आरोग्य साध्य करावें. जलाच्या स्वच्छतेवर मनुष्यांचें आणि पशुपक्षांचें आरोग्य अवलंबून आहे. या ज्ञानानें सर्व लोकांनीं वैदिक आदेशाचें विशेष स्मरण ठेवावें.

पुष्टीचें साधन

या दुसऱ्या सूक्ताच्या ७० व्या मंत्रांत गृहस्थाच्या पुष्टीचें साधन सांगितलें आहे. त्यावरून कोणतें अन्न सेवन केलें पाहिजे याचें ज्ञान आपणांस मिळतें. (**पृथिव्याः पयसा**) पृथ्वींतून उत्पन्न होणाऱ्या दुधाचें सेवन केलें पाहिजे. येथें वनस्पतींचा रस आणि भूमीचा रस असे दोन प्रकारचेच रस मनुष्याच्या आहारासाठीं सांगितले आहेत. औषधींचे रस तर सर्व जाणतातच. वनस्पतींचीं फळें, फुलें, पानें, मुळें इत्यादि तर मनुष्य भक्षण करतोच. पुष्टिकारक औषधि वाढवून त्यांच्या सेवनानें हृष्टपुष्ट होणें हें गृहस्थाचें कर्तव्यच आहे. या मंत्रांत भूमीच्या दुधाचें सेवन सांगितलें आहे. भूमीचा रस म्हणजे शुद्ध आणि पवित्र वहात्या झऱ्याचें पाणी, दुसरा रस धान्य वगैरे. याप्रमाणें शुद्ध जल, शुद्ध अन्न आणि शुद्ध फलादिकांचें सेवन केलें पाहिजे. येथें वाचकांनीं ध्यानीं घ्यावें कीं कोठेंहि पशुच्या मांसाचें सेवन सांगितलेलें नाहीं, म्हणजे मांसभोजन मनुष्याला वैदिक मर्यादानुकूल नाहीं. आम्हीं वेदांत जेथें भोजनविषयक मंत्र पाहिले तेथें तेथें कोणत्याहि स्थानीं मांसभोजनाचें नांवनिशाणहि नाहीं. परंतु सर्वत्र, धान्य, वनस्पति, औषधि फळ-मूळ इत्यादींचे उल्लेख आहेत. त्यावरून आम्हीं म्हणूं शकतों कीं वैदिक भोजन शुद्ध निर्मांस भोजन म्हणजे शाकाहारी भोजन आहे. या शाकाहारानेंच (**वाजं सनुहि**) बळ प्राप्त करावें असा वेदाचा आदेश आहे.

पुढें ७१ व्या मंत्रांत स्त्री आणि पुरुष यांनीं कशा प्रकारें व्यवहार करावा याविषयीं उत्तम उपदेश आहे. तो कोष्टकरूपानें पहा —

पुरुष	स्त्री
अमः	सा
साम	ऋक् (ऋचा)
द्यौः	पृथिवी

येथें स्त्री पुरुषांनीं एक मतानें रहावें असा उत्तम उपदेश आहे. ऋग्वेद मंत्रांस तान-आलापासह गाईलें असतां ते साम मंत्र होतात. वस्तुतः ऋक् मंत्र आणि साममंत्र एकच आहेत. त्याप्रमाणें स्त्री आणि पुरुष एकच स्वरूप, मात्र एक स्थळीं सौम्य

गुणांचा विकास आणि दुसऱ्या स्थळीं उग्र गुणांचा विकास आहे. हाच भाव स्त्रिला पृथ्वी आणि पुरुषाला द्युलोक कल्पून दर्शविला आहे. स्त्री पुरुषांनीं याप्रमाणें एकमतानें-साहचार्यानें रहावें; आपापसांत कांहीं मतभेद-धुसफूस असूं नये. आनंदानें आणि प्रसन्नतेनें सर्वांनीं गृहस्थ धर्माचा आचार-व्यवहार करावा. या दोघांनीं (**इह संभवाव प्रजां आजनयावहै** । मं. ७१) संतति निर्माण करावी, सुप्रजा निर्माण करावी. स्वतःच्या कन्यापुत्रांस सुसंस्कार संपन्न करावें आणि सर्व प्रकारची उन्नति साधावी. दोघांनीं असे प्रयत्न केले पाहिजेत, कीं ज्यायोगें सर्व प्रकारचा अभ्युदय आणि निःश्रेयस उत्तम रीतीनें साध्य होईल.

(**अग्रवः जनियन्ति**) उन्नति साधणारे लोकच स्त्री प्राप्तीची इच्छा करतात. मागें रहाणारे, प्रगति न साधूं शकणाऱ्यांस, प्रयत्न न करणारांस विवाहित होण्याची इच्छा होणार नाहीं, त्यांनीं इच्छा करूं नये. कारण अशा आळशी लोकांची संतति त्यांच्यासारखीच अप्रबुद्ध होईल आणि शेवटीं त्यांच्यामुळें कुलाला-जातीला कलंक लागेल. (**सुदानवः पुत्रीयन्ति**) उत्तम दान देणारे, परोपकार करणारे, मानवसमाजाचें भलें करणारे, इच्छिणारे, त्यांच्यासाठीं आत्मसमर्पण करणारे जे असतील त्यांनींच पुत्रप्राप्तीची इच्छा ठेवावी. कारण अशा मनुष्यांचे शुभ संस्कार त्यांच्या पुत्रांत उतरतात. आणि अशा शुभ संतानांनींच राष्ट्राचें आणि मानव समाजाचें कल्याण होऊं शकते. म्हणून उत्तम दान देणाऱ्यांनींच विवाहित व्हावें. आजि जे दान करीत नाहींत, अविवाहित आहेत त्यांनीं अविवाहित रहावें. (**अ-स्रिध्र-असू वाजसातये सचवहि** । मं. ७२) स्वतःच्या प्राणास सुरक्षित ठेऊन महान् शक्ति प्राप्त करण्यासाठीं स्त्री पुरुषांनीं प्रयत्न करावा. प्रत्येक स्त्री-पुरुषानें महान् बळ प्राप्त करावें हें योग्यच आहे. कोणीहि अशक्त अथवा निर्बळ राहूं नये. बळ प्राप्त करून जगाच्या व्यवहारांत पुढें सरसावून विजय प्राप्त करावा. कोणीहि अपुरुषार्थ वृत्ति बाळगूं नये. सर्वांनीं स्वतःचीं कर्तव्यें करीत असतां पुरुषार्थी बनावें.

आशीर्वाद

शेवटच्या तीन मंत्रांत नववधूवरांना शुभाशीर्वाद दिले आहेत. मं. ७३ त म्हटलें आहे कीं जे आप्त-सोयरे, नातेवाईक इष्टमित्र वरातीसह एकत्रित होऊन आले आहेत त्यांनीं स्वतःच्या घरीं परतण्यापूर्वीं (**ते अस्यै संपत्न्यै प्रजावत् शर्म यच्छन्तु** । मं. ७३) या शुभ पत्नीला प्रजायुक्त सुख म्हणजे सुप्रजा होवो आणि तिला उत्तम गृहसौख्य प्राप्त होवो असे शुभाशीर्वाद द्यावे आणि मगच स्वतःच्या घरोघरीं परत जावें.

ज्या स्त्रिया या वरातसह आल्या असतील त्यांनीं स्वतःच्या घरीं जाण्यापूर्वीं नववधूला प्रजा आणि धन प्राप्त होण्याचा शुभाशीर्वाद देऊन जावें. (**अगतस्य पन्थां अनुगहन्तु**) भविष्यांतील जीवन उत्तम जावें असा आचार तिचा व्हावा असा निर्देश त्यांनीं जातांना करून जावें. तसेंच ही (**विराट् सुप्रजा**) विशिष्ट प्रकारची सम्राज्ञी होऊन राहो. उत्तम प्रजायुक्त होवो असा सुंदर आशीर्वाद द्यावा आणि मगच स्वतःच्या घरीं परत जावें. वरातींत आलेल्या कोणींहि आशीर्वाद दिल्यावांचून परतूं नये.

विवाहित स्त्री म्हणजे धर्मपत्नी (**दीर्घायुत्वाय शतशारदाय**) दीर्घायु आणि शतायु होण्याचा प्रयत्न करो. सर्वांनीं असा आहारविहार राखवा कीं ज्यामुळें घरांतील सर्वच दीर्घायु होतील. (**सुबुधा बुध्यमाना प्र बुध्यस्व**) उत्तम ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक प्रकारची सुविद्या प्राप्त करून उत्तम, शुभ, मंगल संस्कारयुक्त व्हावें. स्वतःच्या पतीच्या घरीं जाऊन (**गृहपत्नी**) त्या घराची स्वामिनी होऊन तेथें रहावें. स्वामिनी, घरची देवी होण्याचा तिचा अधिकार आहे. (**सविता दीर्घं आयुः कृणोतु** । मं. ७५) सविता तिचें आयुष्य दीर्घ करो. याप्रमाणें दीर्घायु होऊन तिनें स्वगृहीं रहावें, शोभावें.

अथर्व वेदाच्या चौदाव्या कांडांत विवाहविषयक दोन सूक्तें आहेत त्या सूक्तांच्या सर्व मंत्रांचा आशय हा असा आहे. जे वाचक या मंत्रांचें जास्त मनन करतील त्यांस अधिक बोध प्राप्त होईल. आमचें वाचकांस सांगणें आहे कीं त्यांनीं वेदानें या मंत्रांत जो उपदेश दिला आहे त्याचें मननपूर्वक स्मरण करावें, आणि प्रयत्नपूर्वक तो आचरणांत आणण्याचा प्रयत्न करावा. कारण वेदांतील धर्म केवळ शब्दज्ञानानें सिद्ध होत नाहीं.

सर्व लोकांस गृहस्थाश्रम धर्मानुकूल होवो आणि तो सर्वांस सुख देऊन जगास उपकारक होवो !

पति-पत्नीचें ऐक्य

कांड २, सूक्त ३०

(ऋषिः - प्रजापतिः । देवता - अश्विनौ ।)

यथेदं भूम्या अधि तृणं वातो मथायति ।
एवा मंथ्नामि ते मनो यथा मां कामिन्यसो यथा मन्नापगा असः ॥ १ ॥
सं चेन्नयाथो अश्विना कामिना सं च वक्षथः । सं वां भगासो अग्मत सं चित्तानि समु व्रता ॥२॥
यत्सुपर्णा विवक्षवो अनमीवा विवक्षवः । तत्र मे गच्छताद्धवं शल्य इव कुल्मलं यथा ॥ ३ ॥
यदन्तरं तद्बाह्यं यद्बाह्यं तदन्तरम् । कन्यानां विश्वरूपाणां मनो गृभायौषधे ॥ ४ ॥
एयमगन्पतिकामा जनिकामोऽहमागमम् । अश्वः कनिक्रदद्यथा भगेनाहं सहागमम् ॥ ५ ॥

अर्थ— (**यथा वातः**) ज्याप्रमाणें वायु (**भूम्याः अधि**) पृथ्वीवर (**इदं तृणं मथायति**) या गवतास हलवतो, (**एव ते मनः मथ्नामि**) त्याप्रमाणें मीं तुझें मन हलवून सोडतों. ज्यामुळें तूं (**मां कामिनी असः**) माझी इच्छा करणारी व्हावेंस आणि (**यथा मत् अप-गाः न असः**) माझ्यापासून दूर जाणारी होऊं नयेस. [१]

हे (**कामिनौ अश्विनौ**) परस्पर कामना करणारे दोघे शक्तिशाली हो ! (**च इत् सं नयाथः**) मिळून सहकार्यानें चाला. (**च सं वक्षथः**) आणि परस्पर सहकार्यानें पुढें होऊन प्रगति साधा. (**वां भगासः सं अग्मत**) तुम्हां दोघांस एकत्र ऐश्वर्य प्राप्त होवो. (**चित्तानि सं**) तुमचीं दोघांचीं मनें एक दुसऱ्यांशीं मिळालेलीं असोत, आणि (**व्रतानि सं**) तुमचीं कार्यें सुद्धां एक विचारें होवोत. [२]

(**यत्**) जेथें (**विवक्षवः सुपर्णाः**) बोलणारे पक्षी जातात, आणि (**विवक्षवः अनमीवाः**) बोलकीं निरोगीं मनुष्यें जातात (**तत्र**) तेथें (**मे हवं गच्छतात्**) माझ्या सांगण्यावरून जा. (**यथा शल्यः कुल्मलं इव**) ज्या प्रमाणें बाणाचें टोंक लक्ष्य साधतें (त्याप्रमाणें). [३]

(**यत् अन्तरं तत् बाह्यं**) जें आंत तेंच बाहेर आणि (**यत् बाह्यं तत् अन्तरं**) जें बाहेर तेंच आंत आहे. हे औषधि ! (**विश्वरूपाणां कन्यानां**) विविधरूपें असलेल्या कन्यांचीं (**मनः गृभाय**) मनें ग्रहण कर. [४]

(**इयं पति-कामा आ अगन्**) ही कन्या पतीची इच्छा करीत आली आहे. आणि (**जनि-कामः अहं आ अगमं**) स्त्रीची इच्छा करणारा मींहि आलों आहे. (**अहं भगेन सह आ अगमं**) मीं धनासह येथें आलों आहे. (**यथा कनिक्रदत् अश्वः**) ज्याप्रकारें खिंकाळणारा घोडा यावा त्याप्रमाणें. [५]

भावार्थ— ज्याप्रमाणें वारा गवताला हलवितो तद्वत् हे वधू मीं तुझें मन हलवून सोडतों; म्हणजे तूं मजवर प्रेम करणारी आणि सदैव मजबरोबर रहाणारी आणि माझ्यापासून विभक्त न होणारी तूं होशील. [१]

हे परस्पर प्रेम करणाऱ्या पतिपत्नींनों ! तुम्हीं दोघें एकविचारानें वागा. एकविचारानें उन्नति साधा, मिळून ऐश्वर्य मिळवून त्याचा दोघेहि उपभोग घ्या. तुमच्या दोघांचीं मनें मिळून जावोत. तसेंच तुमचीं कार्यें सुद्धां एकदुसऱ्याच्या विचारानें होवोत. [२]

जेथें सुंदर पंखाचे पक्षी किलबिल करीत आहेत, जेथें आरोग्यसंपन्न मनुष्यें फिरावयास जातात अशा सुंदरस्थानीं तूं (वधू) माझ्या प्रेरणेनें चल. [३]

जें आंत तेंच बाहेर आणि जें बाहेर तेंच आंत अशा निष्कपट भावानें मीं वर्तन करतों आणि निष्कपटी आचरणानें विविध रंगा-रूपांच्या कन्यांचीं मनें आकृष्ट करतों. [४]

पतीची इच्छा करणारी ही कन्या येथें आली आहे आणि स्त्रीची इच्छा करणारा मीं खिंकाळणाऱ्या घोड्याप्रमाणें, धनासह आलों आहे. आमचा दोघांचा याप्रमाणें विवाह झाला आहे. [५]

पति-पत्नीचें ऐक्य

अश्विनौ देव

हें सूक्त विवाहविषयक पुष्कळच महत्त्वपूर्ण उपदेश देत आहे. या सूक्ताची देवता ' अश्विनौ ' आहे. हे देव नेहमीं जोडीनें रहातात, कधींहि एक दुसऱ्यापासून वेगळे होत नाहींत. विवाहानें स्त्रीपुरुष एकत्र आल्यावर त्यांनींहि कधीं विभक्त न व्हावें. आमरण विवाहबंधनानें बांधून रहावें. या उद्देशानें या सूक्ताची देवता ठेवण्यांत आली आहे. ज्याप्रमाणें अश्विनौ देव नेहमीं एकत्र राहतात, कधीं विभक्त होत नाहींत त्याप्रमाणें विवाहित स्त्री-पुरुषांनीं गृहस्थाश्रमांत एकत्र रहावें, परस्परांपासून कधींहि विभक्त होऊं नये. म्हणजे विवाहबंधन उल्लंघून स्वैर वर्तन करणारे होऊं नये.

दुसऱ्या मंत्रांत ' **कामिनौ अश्विनौ** ' म्हटलें आहे, म्हणजे परस्परांची कामना करणारे अश्विनौ देव ज्याप्रमाणें प्रत्येक कार्यांत एकत्र रहातात, त्याप्रमाणें विवाहित स्त्री-पुरुषांनीं खेळीमेळीनें संसार करावा आणि एकमेकांपासून विभक्त होऊं नये. येथें (**अश्विनी**) शब्द, ' अश्वशक्तीनें युक्त ' असल्याचा भाव दाखवित आहे. पुरुष गर्भाधान करण्यास समर्थ व्हावा म्हणून वैद्यशास्त्रांत ' वाजीकरण ' नांवाचा प्रयोग सांगितला आहे. वाजीकरण, अश्वीकरण हे शब्द समानार्थकच आहेत. स्त्री-पुरुष अश्विनी असले, याचा अर्थ वाजीकरणानें प्राप्त होणाऱ्या शक्तीनें युक्त असले म्हणजे गर्भाधान करण्याची शक्ति पुरुषांत असावी आणि गर्भधारण करण्याची शक्ति स्त्रीची असावी. (**अश्वि**) शब्दाचा हा श्लेषार्थ येथें आहे. स्त्रिनें पुरुषप्राप्तीची इच्छा करावी आणि पुरुषानें स्त्री प्राप्तीची इच्छा करावी. या शब्दानें विवाहाचा समय सुद्धां निश्चित होऊं शकतो. पहा—

विवाहाचा समय

५ व्या मंत्रांत खालीं दिलेला मंत्रभाग आलेला आहे. त्यावरून विवाहवेळ नक्की करतां येते—

इयं पतिकामा आ अगन् ।
अहं जानिकामः आ अगमम् ॥ (मं. ५)

' ही स्त्री पतीची इच्छा करीत आली आहे आणि मीं स्त्रीची इच्छा करीत आलों आहे. ' हा समय विवाहास योग्य होय. स्त्रीमध्यें पतिप्राप्तीची इच्छा आणि पतिमध्यें स्त्री-प्राप्तीची इच्छा प्रबळ व्हावयास पाहिजे. त्यावेळीं विवाह करावयास हवा. परंतु येथें ही वेळ गर्भाधानाची सुद्धां मानतां येते. मस्तक शृंगारण्यापूर्वी विवाह करण्याची गोष्ट प्रथम कांडाच्या १४ व्या सूक्तांत सांगितली आहे. यावरून जर विवाह पूर्वी होऊन गेला असला तर ही वेळ गर्भाधानाची समजली पाहिजे. तरी सुद्धां ब्रह्मचर्य संपल्यानंतर, प्रौढ आणि गृहस्थाश्रम करण्यास लायक स्त्रीपुरुष झाल्यानंतरच विवाह व्हावा ही गोष्ट निःसंदेह आहे. या विषयीं याच मंत्रांत पुढें पहा—

यथा कनिक्रदत् अश्वः ।
अहं भगेन सह आगमम् ॥ (मं. ५)

' ज्याप्रमाणें खिंकाळणारा घोडा येतो तसा मीं धनासह आलों आहे. ' येथें उत्तम तारुण्य आणि गर्भाधानाची अत्युत्तम शक्ति ज्याच्या शरीरांत आहे असा तारुण्याचें वर्णन आहे. हेंच विवाहासाठीं योग्य होय. विवाहासाठीं तारुण्य आणि वीर्य एवढेंच हवें असें नाहीं, परंतु धनसुद्धां (भग) तितकेंच आवश्यक आहे. कुटुंबाचें पालनपोषण योग्यप्रकारें करण्यासाठीं आवश्यक धन प्राप्त करण्याची योग्यता पुरुषानें प्राप्त करावी. धन मिळवूं लागावें आणि त्यानंतर विवाह करावा असा बोध येथें मिळतो. प्रथम ब्रह्मचर्य पालन करावें, तरुण व्हावें, वीर्यवान् आणि शक्तिसंपन्न व्हावें, धन मिळवूं लागावें आणि मग सुयोग्य स्त्रीशीं विवाह करावा. असा पांचव्या मंत्राचा आशय नेहमीं ध्यानांत ठेवावा.

दुसऱ्या मंत्रांत ' **कामिनौ अश्विनौ** ' शब्द आहेत त्यांचा आशय पूर्वीच सांगितला आहे. ' **कामिनौ** ' शब्दाचें विशेष स्पष्टीकरण पांचव्या मंत्रांत तिसऱ्या चरणांत वर्णिलें आहे. ही गोष्ट वाचकांनीं मनांत नीट बाळगावी, म्हणजे त्यांच्या ध्यानीं येईल कीं ' **अश्विनौ** ' शब्द येथें उत्तम तारुण्ययुक्त पति-पत्नींचा वाचक आहे. आणि ' **अश्व** ' शब्द वाजीकरण सिद्ध वीर्यवान् पुरुषाचा विशेषणा वाचक आहे. ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते.

पांचव्या मंत्रांत धन मिळवल्यानंतर विवाह करण्याचा उपदेश आहे तो विशेष मनन करण्यासारखा आहे. ' **धीः, श्रीः, स्त्रीः** ' हा वैदिक क्रम प्रसिद्ध आहे.

निष्कपट वर्तन

स्त्रीपुरुषांचें परस्पर वागणें, पतिपत्नींचा परस्पर व्यवहार, निष्कपट भावनेनें आणि हृदयाच्या ऐक्यानें व्हावयास हवा. तरच

गृहस्थाश्रमीं पुरुषाला सुख प्राप्त होतें. याविषयीं ४ थ्या मंत्राचा उपदेश विशेष महत्त्वपूर्ण आहे—

यदन्तरं तद्बाह्यं यद्बाह्यं तदन्तरम् । (मं. ४)

' जें आंत तेंच बाहेर आणि जें बाहेर तेंच आंत आहे. ' हा निष्कपटी व्यवहाराचा परम उच्च आदर्श आहे. पतीनें पत्नी-विषयीं आणि पत्नीनें पतिविषयीं अंतर्बाह्य एकसारखा व्यवहार ठेवावयास हवा. अंतरांत एक आणि बाहेर दाखवावयाचें दुसरेंच असें करूं नये. गृहस्थाश्रमीयांसाठीं वेदानें उत्तम आदर्श अगदीं सुबोध शब्दांनीं सांगितला आहे. वैदिक धर्म पाळणाऱ्या गृहस्थांनीं याचें अवश्य आचरण करावें, आणि स्वतःच्या गृहस्था-श्रमाचें सौख्य वाढवावें.

विश्वरूपाणां कन्यानां मनः गृभाय । (मं. ४)

' विविध रंगारूपांच्या कन्यांचें मन याप्रमाणें आकर्षित कर-ण्यांत यावें. ' कोणीहि तरुणानें कोणत्याहि कन्येशीं बोलतांना अथवा अन्य व्यवहार करतांना स्वतःचें आंतील आणि बाहेरील वर्तन सरळ, साधें आणि कपटरहित ठेवावें. कपटभावानें कन्येला लोभावून तिला फसविण्याचा प्रयत्न कोणी करूं नये. सरळ निष्कपट भावानेंच स्वतःची धर्मपत्नी होण्यासाठीं कोणाहि कन्येचें मन आकर्षित करण्यांत यावें. कधींहि कांहीं लबाडी-फसवणूक असूं नये. स्त्री पुरुषांच्या व्यवहाराच्या बाबतींत या मंत्राचा हा उपदेश अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. गृहस्थाश्रमांत प्रवेश करणारे अथवा प्रवेश केलेल्या वाचकांनीं या मंत्राचें वारंवार मनन करावें.

आदर्श पति-पत्नी

४ थ्या मंत्रांत एकदुसऱ्याशीं निष्कपट व्यवहार करण्याचा उपदेश केला आहे. त्या उपदेशाचें पालन केल्यानें आदर्श कुटुंब होऊं शकतें, यांत शंकेला स्थानच नाहीं. त्याचा थोडा नमूना २ ऱ्या मंत्रांत सांगितला आहे. त्यांत पांच प्रकारचे उपदेश आहेत, पहा—

१. **संनयथः**- सन्मार्गानें चालावें आणि चालवावें. एक-मतानें वागावें आणि एकमतानेंच संसार करावा. स्त्री-पुरुषांनीं एक मनानेंच होऊन वागावें आणि कुटुंब चालवावें.

२. **संवक्षथः**- मिळून प्रगति साधावी. स्त्री आणि पुरुषानें एका विचारानें प्रगत होऊन उन्नतिसाठीं प्रयत्न करावेत आणि ती संपादन करावी.

३. **भगासः सं अग्मत**- सर्वांनीं मिळून ऐश्वर्य प्राप्त करावें. सहकार्यानें असा प्रयत्न करावा कीं विपुल प्रमाणांत धन मिळेल.

४. **चित्तानि सं**- तुमचीं मनें, हृदयें मिळालेलीं असोत.

५. **व्रतानि सं**- तुमचीं सर्व कार्यें सुद्धां एकत्र एकमेकां-च्या सहकार्यानें करा.

पति-पत्नींमध्यें वैरभाव, द्वेषभाव अथवा कठोर भाव नसावा. दोघांमध्यें असें ऐक्य निर्माण व्हावें कीं जणूं काय दोघे एकाच शरीराचे अवयव आहेत. येथें मंत्रांतील वरील शब्द सामान्यतः पतिपत्नींचीं कर्तव्यें दर्शविण्यासाठीं योजिले आहेत, परंतु ऐक्य प्रतिपादनाचा भावसुद्धां या मंत्रांतून मिळूं शकतो. आणि त्या दृष्टीनेंच हा मंत्र सामाजिक ऐक्य भावनेचा उत्तम उपदेश देत आहे. वाचकांनीं या दृष्टीनें सुद्धां या मंत्राचा विचार करावा आणि आदर्श पतिपत्नीविषयीं या उज्ज्वल उपदेशाचें स्मरण ठेवावें.

फिरण्याचें स्थान

पतिपत्नींनीं एकत्र फिरावयास जावयाचें असेल तर कशा प्रकारच्या स्थानीं फिरावयास जावें, याविषयीं उपदेश तिसऱ्या मंत्रांत दिला आहे. तो सुद्धां पहा—

यत्र सुपर्णा विवक्षवः ।
अनमीवा विवक्षवः ॥
तत्र मे हवं गच्छतात् ॥ (मं. ३)

' जेथें सुंदर पंखांचे पक्षी मधुर कलरव करतात, तसेंच जेथें निरोगी स्त्रीपुरुष गोष्टी बोलत हिंडतात, तेथें प्रेरणेनुरूप जावें. ' अशा स्थळीं पतिपत्नींनीं स्वतःच्या आवडीप्रमाणें, इच्छेनुरूप परस्परांच्या अनुकूल रुचीप्रमाणें फिरण्यास जावें. जेथें सुंदर पक्षी मंजुळ कलरव करीत असतात, जेथें सुदृढ, आरोग्यसंपन्न मनुष्यें जाण्याची इच्छा करितात, तेथें जावें. या स्थळाचें वर्णन किती मनोरम आहे ! वाचकांनीं स्वतःच्या मनांत त्याचा अनुभव घ्यावा. उत्तम भाग्यानेंच अशीं वनें, उपवनें स्त्रीपुरुषांना फिरण्यासाठीं प्राप्त होतात. येथें वेदानें फिरण्यासाठीं आदर्श स्थान सुद्धां सांगि-तलें आहे. जर असें स्थळ सर्व कुटुंबांस न मिळूं शकलें तर त्याच्यासारखेंच दुसरें एखादें स्थळ फिरावयास जाण्यास पसंत करावें आणि निष्कपटभावानें उत्तम गोष्टी करीत करीत त्यांनीं फिरावयास जावें.

स्त्रीशीं वागणूक

पुरुषानें स्त्रीशीं आणि स्त्रिनें पुरुषाशीं कशा प्रकारें वागावें याविषयीं एक उत्तम उपमा प्रथम मंत्रांत घेतली आहे, आणि त्याविषयीं उपदेश केला आहे. ज्याप्रमाणें वाऱ्यानें गवत हलतें त्याप्रकारें स्त्रीचें मन हलवितों. ' (मं. १) हें कथन पुष्कळच

बोधप्रद आहे. वायूमध्यें प्रचंडशक्ति आहे. जर वारा जोरानें वाहूं लागला तर मोठमोठे वृक्ष तोडून पाडतो; परंतु तोच तुफानी वारा कोमल गवतास पाडूं शकत नाहीं, परंतु हलवितो. याप्रमाणें वीरपुरुषाचा क्रोध सुद्धां प्रबल शत्रूला छिन्नभिन्न करूं शकतो, परंतु त्याच वीरपुरुषानें स्त्रियांशीं तसें क्रूरतेचें वर्तन करूं नये. ज्याप्रमाणें मोठ्या वृक्षांस तोडून टाकणारा वारा गवतास हलवून सोडतो, त्याप्रमाणें शत्रूला नष्टभ्रष्ट करणाऱ्या पुरुषानें स्त्रीशीं कोमल, नाजूक असें वर्तन ठेवावें. कठोर व्यवहार कधीं करूं नये.

स्त्रियांनीं सुद्धां स्वतः गवताची कोमलता आणि नम्रवृत्ति धारण करावी. प्रचंड वाऱ्यानेंहि ज्याप्रमाणें गवत तुटत नाहीं त्याप्रमाणें वाटेल तसें संकट आलें तरी स्वतःचें कुटुंबांतील स्थानापासून विचलित होऊं नये.

येथें या उपमेनें दोघांचीं कर्तव्यें उत्तम रीतीनें दाखविलीं आहेत. त्या उपमेचा जितका अधिक विचार करण्यांत येईल तितका अधिक बोध मिळेल. ही पूर्ण उपमा आहे. अशी इतकी सुंदर उपमा अन्यत्र कोठेंहि नाहीं. वाचकांनीं तिचा विचार करावा आणि बोध ग्रहण करावा. आणि तो बोध स्वतःच्या कुटुंबांत उत्तरविण्याचा प्रयत्न करावा.

हें सूक्त पतिपत्नींच्या गृहस्थधर्माचा आदर्श दाखवीत आहे. जर वाचक अधिक विचार करील तर त्याला उत्तम उपदेश मिळूं शकेल. विवाहविषयक अन्य सूक्तांसह वाचकांनीं या सूक्ताचा सुद्धां विचार करावा.

दंपतीचें परस्पर प्रेम

कांड ६, सूक्त ८९

(ऋषिः – जमदग्निः । देवता – कामात्मा ।)

यथा वृक्षं लिबुजा समन्तं परिषस्वजे ।
एवा परि ष्वजस्व मां यथा मां कामिन्यसो यथा मन्नापगा असः ॥ १ ॥
यथा सुपर्णः प्रपतन्पक्षौ निहन्ति भूम्याम् ।
एवा नि हन्मि ते मनो यथा मां कामिन्यसो यथा मन्नापगा असः ॥ २ ॥
यथेमे द्यावापृथिवी सद्यः पर्येति सूर्यः ।
एवा पर्येमि ते मनो यथा मां कामिन्यसो यथा मन्नापगा असः ॥ ३ ॥

अर्थ— (यथा लिबुजा वृक्षं समन्तं परिषस्वजे) ज्याप्रमाणें वेली वृक्षांच्या चारी बाजूनें त्याला वेष्टून रहातात, (एव मां परिष्वजस्व) त्याप्रकारें तूं मला आलिंगन दे. (यथा मां कामिनी असः) ज्यामुळें तूं माझीच इच्छा करणारी होशील आणि (यथा मत् अपगा न असः) ज्यामुळें तूं माझ्यापासून दूर जाणारी होणार नाहींस. [१]

(यथा प्रपतन् सुपर्णः) ज्याप्रमाणें उडणारे पक्षी (भूम्यां पक्षौ निहन्ति) पृथ्वीकडे स्वतःच्या दोन्ही पंखांनी हवा दाबतात, (एव ते मनः निहन्मि) त्याप्रमाणें मीं तुझें मन आकर्षून घेतों. (यथा०) ज्यामुळें तूं माझी इच्छा करणारी होऊन माझ्यापासून दूर जाणारी होऊं नकोस. [२]

(यथा इमे द्यावापृथिवी) ज्याप्रमाणें या द्युलोक आणि पृथ्वीच्यामध्यें (सूर्यः सद्यः पर्येति) सूर्याचा प्रकाश तत्काळ पसरतो (एव ते मनः पर्येमि) त्याप्रमाणें मीं तुझें मन व्यापून रहातों. (यथा०) म्हणजे तूं माझी कामना करणारी आणि माझ्यापासून दूर न जाणारी हो. [३]

[९]

वाञ्छ मे तन्वं१ पादौ वाञ्छाक्ष्यौ३ वाञ्छ सक्थ्यौ३ ।
अक्ष्यौ३ वृषण्यन्त्याः केशा मां ते कामेन शुष्यन्तु ॥ १ ॥
मम त्वा दोषणिश्रिषं कृणोमि हृदयश्रिषम् । यथा मम क्रतावसो मम चित्तमुपायसि ॥ २ ॥
यासां नाभिरारेहणं हृदि संवननं कृतम् । गावो घृतस्य मातरोऽमूं सं वानयन्तु मे ॥ ३ ॥

अर्थ—(मे तन्वं पादौ वाञ्छ) माझ्या शरीराची तसेंच दोन्ही पायांची इच्छा कर, (अक्ष्यौ वाञ्छ) माझ्या दोन्हीं डोळयांची इच्छा कर. (सक्थ्यौ वाञ्छ) दोन्हीं जांघांची इच्छा कर (वृषण्यन्त्याः ते अक्ष्यौ केशाः) बळाची इच्छा करणारे तुझे डोळे आणि केस (कामेन माम् शुष्यन्तु) कामानें मला शोषून घेवोत. [१]

(त्वा मम दोषणिश्रिषं) तुला माझ्या बाहूंत सामावून आणि (हृदयश्रिषं कृणोमि) हृदयांत आश्रय करणारी करतों. (यथा मम क्रतौ असः) ज्यामुळें तूं मजविषयींच्या कार्यांत दक्ष रहाशील, आणि (मम चित्तं उपायसि) माझ्या चित्तास अनुकूल होऊन तूं वागशील. [२]

(यासां) ज्यामुळें (नाभिः) मिळणें, भेटणें (आरेहणं) आनंददायक आहे आणि (हृदि संवननं कृतं) हृदयांत प्रेमाची सेवा आहे. (घृतस्य मातरः गावः) तूप उत्पन्न करणाऱ्या या गाई (अमूं मे संवानयन्तु) या स्त्रिका माझ्याशीं मिळवून टाकोत. [३]

स्त्री–पुरुषांचें प्रेम

गृहस्थधर्मीय स्त्री–पुरुषांनीं परस्पर प्रेम करावें आणि सुखानें गृहस्थाश्रमाचे व्यवहार करावेत, हा उपदेश या दोन्हीं सूक्तांत सांगितला आहे.

आठव्या सूक्तांत सांगितलें आहे कीं स्त्रीपुरुषांनीं एक दुसऱ्याशीं मिळून रहावें, एक दुसऱ्यावर प्रेम करावें आणि कधींहि एकमेकांपासून दूर होण्याचा प्रयत्न करूं नये. पुरुषानें प्रयत्नपूर्वक स्त्रीचें मन आपणांकडे आकर्षित करावें, आणि तिला स्वतःजवळ संतुष्ट ठेवावें कीं ज्यामुळें ती पतिगृह सोडून वारंवार इतरत्र पळून न जावी. ज्याप्रमाणें सूर्य स्वप्रकाशानें सर्व जग भरून टाकतो त्याप्रमाणें पतीनें स्वतःच्या आचरणानें स्त्रिचें मन असें भरून टाकावें कीं पत्नीच्या मनांत स्वपतिविषयीं आदर, मान व प्रेमच भरून राहील. त्याचप्रमाणें स्त्रीचा व्यवहारसुद्धां असा असावा कीं ज्यामुळें पतीच्या मनांत स्वस्त्रीविषयीं आदर–प्रेमभाव वाढावा. याप्रमाणें दोघांनीं अरसपरस एकदुसऱ्याविषयीं आदरभाव ठेऊन सुखानें गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें पार पाडावींत.

नवव्या सूक्तांत सांगितलें आहे कीं पतीनें धर्मपत्नीला आणि पत्नीनें स्वपतीला आपलें सर्वस्व अर्पण करावें. एक दुसऱ्याच्या वियोगानें ते दुःखी व्हावेत, वाळून जावेत आणि एक दोघांच्या सांनिध्यांत दोघेहि सुखी–आनंदी व्हावेत. स्त्रीनें आणि पुरुषानें परस्पराच्या कार्यांत एकदुसऱ्याला साहाय्य करावें आणि परस्परांस अनुकूलतेनें वागावें, असा सर्व व्यवहार करावा. स्त्रियांना धर्ममार्गानें भेटणें सुखदायी आहे, कारण उत्तम स्त्रीच्या हृदयांत प्रेम भरलेलें असतें. पतीच्या घरच्या गाईसुद्धां स्त्रियांना आकर्षित करतात.

याप्रमाणें व्यवहार करून स्त्री–पुरुषांनीं सुखानें गृहस्थाश्रमांतील कार्यें करावीं आणि परस्परांच्या सहकार्यानें सुखी व्हावें.

आठव्या सूक्तांतील मंत्रांशीं अथर्व. १।३४।५ आणि २।३०।१ या मंत्रांची तुलना करून पहा. कित्येक भावसारखेच आहेत.

पतिपत्नींचें परस्पर प्रेम

कांड ७, सूक्त ३६

(ऋषिः – अथर्वा । देवता – अक्षि ।)

अक्ष्यौ॑ नौ॒ मधु॑संकाशे॒ अनी॑कं नौ स॒मञ्ज॑नम् । अ॒न्तः कृ॑णुष्व॒ मां हृ॒दि मन॒ इन्नौ॑ स॒हास॑ति ॥ १ ॥

अर्थ— (**नौ अक्ष्यौ मधुसंकाशे**) आमचे दोघांचे डोळे मधाप्रमाणें मधुर असोत. (**नौ अनीकं समञ्जनं**) आमच्या दोघांच्या डोळ्यांचे अग्रभाग अंजनानें युक्त असोत. (**हृदि मां अन्तः कृणुष्व**) तुझ्या हृदयांत मला अगदीं खोलवर ठेव. (**नौ मनः इत् सह असति**) आमचीं दोघांचीं मनें परस्पर नेहमीं मिळालेलीं राहोत. [१]

पतिपत्नी परस्परांचें अवलोकन प्रेमयुक्त दृष्टीनें करोत. एकास पाहून दुसऱ्यास आनंद व्हावा. पतिपत्नींच्या मनांत, एकदुसऱ्यास पहातांच, नजरेस पडतांच द्वेषभाव किंवा क्रोध उत्पन्न व्हावा अशा भावना कधींहि असूं नयेत. दोघांची दृष्टि अंजनानें शुद्ध, पवित्र आणि निर्दोष असावी. कोणाच्याहि दृष्टींत अपवित्रता नसावी. सामान्य काजळानें सुद्धां डोळे पवित्र, शुद्ध होतात. त्याचप्रमाणें ज्ञानानें सुद्धां दृष्टींत पवित्रता येते.

पतीनें स्वतःच्या हृदयांत पत्नीला उत्तमस्थान द्यावें. तेथें धर्मपत्नीशिवाय दुसऱ्या कोणास स्थान असूं नये. त्याचप्रमाणें पत्नीनें सुद्धां पतीला स्वतःच्या हृदयांत स्थान द्यावें आणि धर्मपतिशिवाय अन्य कोणा परपुरुषाचें स्थान तेथें नसावें. (**हृदि मां अंतःकृणुष्व**) पतिपत्नींनीं एक दुसऱ्याला आपल्या हृदयांत स्थान द्यावें.

(**मनः सह असति**) पतिपत्नींचीं मनें एक दुसऱ्याशीं मिळालेलीं असावींत; तीं कधीं विभक्त होऊं नयेत. त्यांतील कोणी एक व्यक्ति दुसऱ्याशीं भांडणतंटा न करो, आणि स्वतःचें मन अन्य कोणांकडे जाऊं देऊं नये.

याप्रमाणें पतिपत्नी एक दुसऱ्यासह आनंदानें राहून गृहस्थाश्रमाचीं कार्यें करोत. या मंत्रांत पतिपत्नींचा गृहस्थाश्रमांतील सर्वोत्तम आदर्श दाखविला आहे. वाचकांनीं या सूक्ताचा उपदेश स्वतःच्या आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न करावा आणि गृहस्थाश्रमाचा पूर्ण आनंद प्राप्त करावा.

पतिपत्नींचें एकमत

कांड ७, सूक्त ३८

(ऋषिः – अथर्वा । देवता – वनस्पतिः ।)

इ॒दं ख॑नामि भेष॒जं मां॑प॒श्यम॑भिरोरु॒दम् । प॒रा॒यतो॒ नि॒वर्त॑नमा॒यतः॑ प्र॒ति॒नन्द॑नम् ॥ १ ॥
येना॑ निच॒क्र आ॑सुरीन्द्रं॑ दे॒वेभ्य॒स्परि॑ । तेना॒ नि कु॑र्वे॒ त्वाम॒हं यथा॒ तेऽसा॑नि सु॒प्रिया॑ ॥ २ ॥

अर्थ— (**इदं भेषजं खनामि**) मीं या औषधि वनस्पतीला खोदून काढते. (**मां-पश्यं**) (तें औषध) माझ्याकडे खेंचणारें आणि (**अभि रोरुदं**) सर्व प्रकारें दुर्वर्तनास अटकाव करणारें (**परायतः निवर्तनं**) दुमार्गानें दूर गेलेल्याला सुद्धां पुनः परत आणणारें आणि (**आयतः प्रतिनन्दनं**) संयमांत रहाणाऱ्याचा आनंद वाढविणारें आहे. [१]

भावार्थ— मी ही औषधि जमिनींतून खोदून काढते. माझ्या पतीचें नेत्र मजकडेच लागलेले असावेत म्हणजे दुसऱ्या कोणा अन्य स्त्रीकडे लागूं नयेत. हिच्यामुळें सर्व प्रकारच्या दुर्वर्तनापासून रक्षण होतें. कुमार्गांत पाऊल टाकलेला परत येतो, आणि तो संयमानें राहून आनंद प्राप्त करतो. [१]

*

प्रतीची सोमंमसि प्रतीच्युत सूर्यम् । प्रतीची विश्वान्देवान्तां त्वाच्छावंदामसि ॥ ३ ॥
अहं वंदामि नेत्त्वं सभायामह त्वं वदं । ममेदसस्त्वं केवंलो नान्यासां कीर्तयांश्चन ॥ ४ ॥
यदि वासि तिरोजनं यदिं वा नद्यस्तिरः । इयं ह मह्यं त्वामोषंधिर्बद्ध्वेव न्यानयत् ॥ ५ ॥

अर्थ— (आसुरी) आसुरी नांवाच्या औषधीनें **(येन देवेभ्यः परि इन्द्रं निचक्रे)** ज्या गुणांच्या योगें देवापेक्षां इन्द्राला जास्त प्रभावशाली केला **(तेन अहं त्वां निकुर्वे)** तिनें मीं तुला प्रभावशाली करते. **(यथा ते सुप्रिया असानि)** ज्यामुळें मी तुझी प्रिय धर्मपत्नी होऊन राहीन. [२]

(सोमं प्रतीची असि) तूं चंद्रासमोर रहातेस, **(उत सूर्यं प्रतीची)** आणि सूर्यासमोरसुद्धां रहातेस. **(विश्वान् देवान् प्रतीची)** सर्व देवांच्या सन्मुख होतेस. **(तां त्वा अच्छा वदामसि)** असें मीं तुझें उत्तम वर्णन करतें. [३]

(अहं वदामि) मी म्हणते, **(न इत् त्वं)** तूं बोलूं नकोस, **(त्वं सभायां अह वद)** तूं सभेंत निश्चय-पूर्वक बोल. **(त्वं केवलः मम इत् असः)** तूं केवळ माझाच होऊन रहा. **(अन्यासां न चन कीर्तयाः)** दुसऱ्या कोणाचें नांवसुद्धां घेऊं नकोस. [४]

(यदि वा तिरोजनं असि) जर तूं लोकांपासून दूर अरण्यांत जाऊन राहिलास **(यदि वा नद्यः तिरः)** जर तूं नदीच्या पैलथडी गेला असलास तरी सुद्धां **(इयं ओषधिः)** ही औषधी **(त्वां बध्वा)** तुला बांधून **(मह्यं नि आनयत् ह)** माझ्याजवळ घेऊन येईल. [५]

भावार्थ— हिचें नांव आसुरी वनस्पति आहे. हिच्या प्रभावानें इन्द्र सर्व देवांमध्यें विशेष प्रभावशाली होऊन श्रेष्ठ झाला. या वनस्पतीनें मी माझ्या पतीला प्रभावित करतें म्हणजे त्यामुळें मी माझ्या पतीची प्रिय धर्मपत्नी होऊन राहीन. [२]

ही वनस्पति चन्द्रासमोर रहाण्यानें शांतगुण प्राप्त करते, तसेंच सूर्यासन्मुख रहाण्यानें तेजस्विता प्राप्त करते, आणि इतर देवांपासून अन्य पुष्कळ गुण मिळविते. म्हणून तिची प्रशंसा करण्यांत येते. [३]

हे पति ! घरांत मी बोलेन आणि माझ्या म्हणण्यास तूं अनुमोदन दे. घरांत तूं बोलूं नको, बाहेर सभेंत तूं पुष्कळ भाषण कर, पण घरांत येऊन तूं केवळ माझा प्रिय पति होऊन रहा. असें करण्यानें तुला दुसऱ्या कोणा स्त्रीचें नांवसुद्धां घेण्याची जरुरी रहाणार नाहीं. [४]

जर तूं गांवांत रहाशील अथवा अरण्यांत जाशील, नदीच्या पलीकडे जा अथवा अलिकडे रहा, तरीसुद्धां ही औषधी अशी आहे की तिच्या प्रभावानें तूं माझ्याशीं बांधल्यासारखा रहाशील, माझ्याकडेच परत येशील, आणि इतर कोठें अन्य स्थळीं जाणार नाहींत. [५]

हें सूक्त स्पष्ट आहे, म्हणून याचें जास्त विवरण करण्याची जरुर नाहीं. पतीला एकच स्त्री धर्मपत्नी म्हणून असावी आणि पत्नीला एकच पुरुष धर्मपति असावा. हा विवाहाचा उच्चतम आदर्श या सूक्तानें वाचकांसमोर ठेवला आहे. कोणाहि पुरुषानें आपल्या विवाहित धर्मपत्नीला सोडून कोण्या दुसऱ्या स्त्रीची अपेक्षा करूं नये आणि कोण्या स्त्रीनें सुद्धां स्वतःच्या विवाहित धर्म-पतीला सोडून कोणा दुसऱ्या परपुरुषाची कधीं अपेक्षा करूं नये.

दोघांनीं एक दुसऱ्याच्या प्रेमानें वश होऊन अत्यन्त प्रेमपूर्वक सर्व व्यवहार करावे. आणि स्वतःच्या गृहस्थाश्रमाचे व्यवहार सुखानें करावेत. या सूक्तांत ' आसुरी ' वनस्पतीचा उपयोग सांगितला आहे. तिचें सेवन केल्यानें मनुष्य पराक्रमी आणि उत्साही होतो. मनुष्याची प्रवृत्ति पापाचरणाकडे वळूं नये असें तिच्या फळांचें वर्णन आहे. ही औषधि कोणती तें अजून नक्की झालें नाहीं. सुविद्य वैद्यांनीं त्याचें संशोधन करून आणि जनतेच्या कल्याणासाठीं तिचे प्रयोग प्रकाशित करावे.

एकविचारें रहावें

कांड ६, सूक्त ७३

(ऋषिः - अथर्वा । देवता - सांमनस्यं, नाना देवताः ।)

एह यातु वरुणः सोमो अग्निर्बृहस्पतिर्वसुभिरेह यातु ।
अस्य श्रियमुपसंयात सर्व उग्रस्य चेत्तुः संमनसः सजाताः ॥ १ ॥
यो वः शुष्मो हृदयेष्वन्तराकूतिर्या वो मनसि प्रविष्टा ।
तान्त्सीवयामि हविषा घृतेन मयि सजाता रमतिर्वो अस्तु ॥ २ ॥
इहैव स्त मापं याताध्यस्मत्पूषा परस्तादपथं वः कृणोतु ।
वास्तोष्पतिरनु वो जोहवीतु मयि सजाता रमतिर्वो अस्तु ॥ ३ ॥

अर्थ— वरुण, सोम, अग्नि, बृहस्पति (**इह आ यातु**) येथें येवोत आणि वसूंसह येथें येवोत. हे (**सजाता**) उत्तम कुळांत उत्पन्न झालेले पुरुष हो ! (**सर्वे संमनसः**) तुम्हीं सर्व एक मनाचे होऊन (**अस्य उग्रस्य चेत्तुः श्रियं उपसंयात**) या शूर चेतना देणाऱ्याची शोभा वाढवा. [१]

(**यः शुष्मः वः हृदयेषु अन्तः**) जें बल तुमच्या हृदयांत आहे, (**या आकूतिः वः मनसि प्रविष्टा**) जे संकल्प तुमच्या मनांत प्रविष्ट झाले आहेत, (**तान् हविषा घृतेन सीवयामि**) त्यांना अन्न आणि तुपानें मीं जोडतों. हे (**सजाताः**) उत्तम कुळांत उत्पन्न झालेल्या पुरुष हो ! (**वः रमतिः मयि अस्तु**) तुमची प्रसन्नता मजवर जो मीं नेता आहें त्याच्यावर राहो. [२]

(**इह एव स्त**) येथेंच रहा. (**अस्मत् अधि मा अप यात**) आमच्यापासून दूर जाऊं नका. (**पूषा वः परस्तात् अपथं कृणोतु**) पूषा तुमचा पुढें जाण्याचा मार्ग बंद करो. (**वास्तोष्पतिः वः अनु जोहवीतु**) वास्तोष्पति तुम्हांला अनुकूलतेप्रमाणें बोलावो. हे (**सजाताः**) उत्तम कुळांत जन्मलेल्या मनुष्य हो ! (**वः रमतिः मयि अस्तु**) तुमचें प्रेम माझ्यावर राहो. [३]

भावार्थ—सर्व ज्ञान्यांनीं एकाच वेळीं एकाच ठायीं एकत्र व्हावें. सर्व मनुष्यांनीं एक विचाराचें होऊन स्वतःच्या नायकाचें बळ वाढवावें. [१]

ज्या लोकांत बळ आणि विचार आहे त्यांचें पोषण योग्य उपायांनीं करावयास हवें. सर्व लोकांनीं आपल्या नायकावर प्रसन्न असावें. [२]

सर्व लोकांनीं एका जागीं स्थिर रहावें. पळून जाण्याचा मार्ग त्यांस खुला नसावा. ईश्वर त्यांना अनुकूलतेनें एकाच कार्यांत व्यग्र राखो. याप्रमाणें सर्व लोकांनीं प्रेमानें नायकाच्या हाताखालीं काम करावें. [३]

संघटना

एकच नेता, प्रमुख, पुढारी अथवा नायक असावा व त्याच्या आधीन सर्व लोकांनीं रहावें, म्हणजे त्यांचें संघबळ वाढेल. जर ते लोक विखुरलेले-विभक्त रहातील तर त्यांचें संघबळ कमी होईल; म्हणून जे स्वतःचें संघबळ वाढवूं इच्छितात त्यांनीं स्वतःच्या एका नेत्याच्या आधीन प्रेमानें रहावें. सर्वांचा संकल्प एकच ठेवावा, आणि स्वतःचीं मनें, हृदयें एकाच विचारानें भरून टाकावीं. कोणत्याहि कारणानें आपसांत भांडणतंटे नसावेत. याप्रमाणें वागल्यानें त्यांचें संघबळ वाढूं शकेल.

परस्पर प्रेम

कांड ६, सूक्त ८९

(ऋषिः - अथर्वा । देवता - रुद्रः, मन्त्रोक्ताः ।)

इदं यत्प्रेण्यः शिरो दुत्तं सोमेन वृष्ण्यम् । ततः परि प्रजातेन हार्दिं ते शोचयामसि ॥ १ ॥
शोचयामसि ते हार्दिं शोचयामसि ते मनः । वातं धूम इव सध्र्यङ् मामेवान्वेतु ते मनः ॥ २ ॥
मह्यं त्वा मित्रावरुणौ मह्यं देवी सरस्वती । मह्यं त्वा मध्यं भूम्या उभावन्तौ समस्यताम् ॥ ३ ॥

अर्थ –(प्रेण्यः इदं यत् वृष्ण्यं शिरः) प्रेम करणारें जें बलवान् मस्तक आहे, जें (सोमेन दत्तं) सोमानें दिलें आहे, (ततः प्रजातेन) त्यानें उत्पन्न झालेल्या बळानें (ते हार्दिं परि शोचयामसि) तुझ्या हृदय भावनेस उद्दीपित करतात. [१]

(ते हार्दिं शोचयामसि) तुझ्या हृदय भावनांना उद्दीपित करतात. (ते मनः शोचयामसि) तुझें मन उत्तेजित करतात. (वातं धूम इव) वाऱ्याच्या मागें ज्याप्रमाणें धूर जातो, त्या प्रकारें (ते सध्र्यङ् मनः मां एव अन्वेतु) तुझें अनुकूल मन माझ्यापाशीं येवो. [२]

(मित्रावरुणौ त्वा मह्यं) मित्र आणि वरुण तुला मला देवोत. (देवी सरस्वती मह्यं) सरस्वती देवी मला देवो. (भूम्या मध्यं) भूमीमध्यें तसेंच (उभौ अन्तौ) दोन्ही अंतभाग (त्वा मह्यं समस्यतां) तुला मला देवोत. [३]

भावार्थ— प्रेम करणाऱ्याचें हृदय आणि मस्तक एकाच वेळीं प्रेमानें उद्दीपित होवो. [१]
हृदय आणि मनाला उत्तेजित करतात. ज्याप्रमाणें धूर वायूच्या मागें जातो त्याप्रमाणें मन हृदयाला अनुकूल होवो. [२]
मित्र, वरुण, सरस्वती, भूमीचा मध्यभाग आणि अंतिमभाग हे सर्व आम्हां सर्वांस एकत्रित राखोत. [३]

एकतेचा मंत्र

मनुष्याचें मस्तक आणि हृदय प्रेमानें उत्तेजित होतें. याप्रमाणें उत्तेजित झालेला आणि प्रेमानें भरपूर असा मनुष्य या जगात विशेष कांहीं कार्य करण्यास समर्थ होवो.

मन हृदयाला असें अनुकूल व्हावें कीं ज्याप्रमाणें वायूच्या गतीला अनुकूल धूर असतो. सरस्वती म्हणजे विद्येची देवी आणि भूमि म्हणजे मातृभूमीची भक्ति या दोन्ही मनाला अशा अनुकूल करोत कीं त्यानें कधींहि हृदयाला सोडून म्हणजे नेत्याच्या हृदयापासून दूर जाऊं नये. याप्रमाणें मनांत सुविचार आणि हृदयांत भक्ति ठेवल्यानें मनुष्य उन्नत होऊं शकतो.

परस्पर प्रेम

कांड ६, सूक्त १०२

(ऋषिः - जमदग्निः । देवता - अश्विनौ ।)

यथायं वाहो अश्विना समैति सं च वर्तते । एवा मामभि ते मनः समैतु सं च वर्तताम् ॥ १ ॥

अर्थ—हे (अश्विनौ) अश्विदेव हो (यथा अयं वाहः सं एति) ज्याप्रमाणें हे घोडे बरोबर चालतात आणि (सं वर्तते च) मिळून बरोबरीनें राहतात. (एवा ते मनः मां अभि) या प्रकारें तुमचीं मनें माझ्याकडे (सं आ एतु) येवो आणि (सं वर्ततां च) बरोबर राहो. [१]

भावार्थ— ज्याप्रमाणें गाडीला जोडलेले दोन घोडे नेहमीं बरोबर रहातात, आणि बरोबर चालतात, त्याप्रकारें परस्परांचीं मनें एकदुसऱ्यांशीं मिळून राहोंत. परस्परांचा विरोध न करोत. [१]

आहं खिदामि ते मनो राजाश्वः पृष्ट्यामिव । रेष्मच्छिन्नं यथा तृणं मयि ते वेष्टतां मनः ॥ २ ॥
आञ्जनस्य मदुघस्य कुष्ठस्य नलदस्य च । तुरो भगस्य हस्ताभ्यामनुरोधनमुद्भरे ॥ ३ ॥

अर्थ—(अहं ते मनः आ खिदामि) मीं तुझ्या मनास आकर्षितों, (पृष्ट्यां राजाश्वः इव) ज्याप्रमाणें पाठीशीं बांधलेल्या गाडीला घोडा खेंचतो; (यथा रेष्मछिन्नं तृणं) ज्याप्रमाणें वायूनें छिन्नभिन्न झालेलें गवत एक दुसऱ्याला चिकटून रहातें, त्याप्रमाणें (ते मनः मयि वेष्टतां) तुझें मन मला चिकटून राहो. [२]

(तुरः भगस्य) त्वरेनें प्राप्त होणारे भाग्ययुक्त, (आञ्जनस्य मदुघस्य) अंजनाप्रमाणें हर्षित करणारे (कुष्ठस्य नलदस्य हस्ताभ्यां) कूठ आणि पोकळ नळयासारख्या हातांनीं (अनुरोधनं उद्भरे) अनुकूलतेस प्राप्त करतों. [३]

भावार्थ—ज्याप्रमाणें घोडा गाडीला स्वतःकडे खेंचतो, त्याप्रकारें एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याचें मन खेंचतो. आणि या प्रकारच्या प्रेमाच्या वागणुकीनें मनुष्यें परस्पर संगठित होतात. [२]

त्वरेनें कोणतेंहि कार्य करणें, भाग्य प्राप्त होणें, अंजन, भोग, विलास इत्यादि अनुभवणें, सर्व प्रकारचा आनंद मिळविणें इत्यादि अनेक कार्यें परस्परांच्या अनुकूलतेनें परस्परांनीं केलीं पाहिजेत. [३]

प्रेमाचें आकर्षण

एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास प्रेमानें आकर्षित करो. याप्रकारें सर्व मनुष्यें संगठित होऊन राहोत. स्त्री-पुरुष, पिता-पुत्र, भाऊ-भाऊ तसेंच अन्य मनुष्यें एक दुसऱ्याकडे प्रेमानें आकर्षित होवोत. आणि सर्व संगठित होऊन एकविचारें स्वतःच्या उन्नतीचें साधन करोत.

सपत्ननाशक वरणमणि

कांड १०, सूक्त ३

(ऋषिः – अथर्वा । देवता – वरणमणिः, वनस्पतिः, चन्द्रमाः ।)

अयं मे वरणो मणिः सपत्नक्षयणो वृषा । तेना रभस्व त्वं शत्रून्प्र मृणीहि दुरस्यतः ॥ १ ॥
प्रैणाञ्छृणीहि प्र मृणा रभस्व मणिस्ते अस्तु पुरएता पुरस्तात् ।
अवारयन्त वरणेन देवा अभ्याचारमसुराणां श्वःश्वः ॥ २ ॥
अयं मणिर्वरणो विश्वभेषजः सहस्राक्षो हरितो हिरण्ययः ।
स ते शत्रूनधरान्पादयाति पूर्वस्तान्दभ्नुहि ये त्वा द्विषन्ति ॥ ३ ॥

अर्थ—(मे अयं वरणः मणिः) माझा हा वरणमणि (वृषा सपत्नक्षयणः) बलवान् आहे आणि शत्रूंचा नाश करणारा आहे. (तेन) त्याच्या सहाय्यानें (त्वं शत्रून् आ रभस्व) तूं शत्रूंचा नाश कर, आणि (दुरस्यतः प्र मृणीहि) दुष्ट इच्छा करणाऱ्यांचा नाश कर. [१]

(एनान् प्र शृणीहि) त्यांना मार, (प्रमृण) नाश कर, (आ रभस्व) नष्ट कर. हा (मणिः) मणि (ते पुरस्तात् पुरएता अस्तु) तुझ्या अग्रभागीं जाणारा अग्रेसर होवो. (देवाः वरणेन) देवांनीं या वरणमण्यानेंच (असुराणां श्वःश्वः अभ्याचारं) असुरांकडून नित्य होणारे अत्याचार (अवारयन्त) निवारण केले. [२]

(अयं वरणो मणिः विश्वभेषजः) हा वरण मणि सर्व औषधींचें सार आहे. (सहस्राक्षः हरितः) हजार डोळयांचा, सर्व दुःखांचें हरण करणारा आणि हा (हिरण्ययः) सुवर्णानें युक्त आहे. (सः ते शत्रून् अधरान् पादयाति) तो तुझ्या सर्व शत्रूंना खालीं पाडून टाकतो. (ये त्वा द्विषन्ति) जे तुझा द्वेष करतात, (तान् पूर्वः दभ्नुहि) त्यांस प्रथमच दाबून खालीं घाल. [३]

अयं ते कृत्यां विततां पौरुषेयादयं भयात् । अयं त्वा सर्वस्मात्पापाद्वरणो वारयिष्यते ॥ ४ ॥
वरणो वारयाता अयं देवो वनस्पतिः । यक्ष्मो यो अस्मिन्नाविष्टस्तमु देवा अवीवरन् ॥ ५ ॥
स्वप्नं सुप्त्वा यदि पश्यासि पापं मृगः सृतिं यति धावादजुष्टाम् ।
परिक्षवाच्छकुनेः पापवादादयं मणिर्वरणो वारयिष्यते ॥ ६ ॥
अरात्यास्त्वा निर्ऋत्या अभिचारादथो भयात् । मृत्योरोजीयसो वधाद्वरणो वारयिष्यते ॥ ७ ॥
यन्मे माता यन्मे पिता भ्रातरो यच्च मे स्वा यदेनश्चकृमा वयम् ।
ततो नो वारयिष्यतेऽयं देवो वनस्पतिः ॥ ८ ॥
वरणेन प्रव्यथिता भ्रातृव्या मे सबन्धवः । असूर्तं रजो अप्यगुस्ते यन्त्वधमं तमः ॥ ९ ॥
अरिष्टोऽहमरिष्टगुरायुष्मान्त्सर्वपूरुषः । तं मायं वरणो मणिः परि पातु दिशोदिशः ॥ १० ॥
अयं मे वरण उरसि राजा देवो वनस्पतिः । स मे शत्रून्वि बाधतामिन्द्रो दस्यूनिवासुरान् ॥ ११ ॥

अर्थ—(अयं वरणः) हा वरण मणि (ते विततां कृत्यां) तुझ्या चारी दिशांस पसरलेल्या कृत्याप्रयोगाला (पौरुषेयात् भयात्) मनुष्यकृत भयानें (अयं त्वा सर्वस्मात् पापात्) हा तुझें सर्व प्रकारच्या पापांपासून (वारयिष्यते) निवारण करील. [४]

(अयं वरणः) हा वरण मणि (देवो वनस्पतिः) वनस्पति देव (वारयातै) दुःखनिवारक आहे. (यः यक्ष्मः अस्मिन् आविष्टः) जो क्षयरोग त्यांत प्रविष्ट झाला आहे (तं उ देवा अवीवरन्) त्याचें देव निवारण करतात. [५]

(स्वप्नं सुप्त्वा) स्वप्नांत झोंपेच्या वेळीं (यदि पापं पश्यासि) जर तुला पापी दृश्यें दिसत असतील (यति अजुष्टां सृतिं धावात्) जर कोणी अयोग्य वेगानें धांवताना दिसेल, (शकुनेः परिक्षवात्) शकुनीच्या (पक्षाच्या) अत्यंत दुष्ट शब्दांना आणि (पापवादात्) निन्देच्या शब्दांना (अयं वरणो मणिः वारयिष्यते) हा वरण मणि निवारण करील. [६]

(अरात्याः निर्ऋत्याः) शत्रुभयापासून आणि विनाशापासून (अभिचारात् अथो भयात्) विनाशक प्रयोगापासून किंवा अन्य कारणापासून (मृत्योः ओजीयसो वधात्) मृत्यूच्या भयानक वधापासून (त्वा वरणः वारयिष्यते) हा वरण मणि तुझें निवारण करील. [७]

(यत् मे माता) जी माझी आई, (यत् मे पिता) जो माझा पिता, (यत् च मे भ्रातरः) जे माझे बंधु तसेंच (स्वाः) जे माझे आप्तजन तसेंच (वयं यत् एनः चकृम) आम्हीं सर्व जीं पापें करीत राहिलों आहोंत (ततः) त्या पापांपासून (अयं वनस्पतिः देवः) हा वनस्पति देव (नः वारयिष्यते) आमचें निवारण करील. [८]

(मे सबन्धवः भ्रातृव्याः) माझ्या बंधुवर्गासह शत्रुगण (वरणेन प्रव्यथिताः) वरण मण्यामुळें पीडित होऊन (असूर्तं रजः अपि अगुः) अंधःकारमय, धूळीनें युक्त स्थानाला प्राप्त होवो. (ते अधमं तमः यन्तु) ते अगदीं धिक्कारण्यालायक अंधारास प्राप्त होवोत. [९]

(अहं अरिष्टः) मी अविनाशी, (अरिष्टगुः) अविनाशी वस्तूंना प्राप्त करणारा (आयुष्मान् सर्वपूरुषः) दीर्घायु आणि सर्व पुरुषार्थी जनांनीं युक्त आहें. (अयं वरणः मणिः) हा वरण मणि (दिशोदिशः मा परि पातु) सर्व दिशांस माझें रक्षण करो. [१०]

(अयं वरणः राजा वनस्पतिः देवः) हा वरण मणि राजा वनस्पति देव (मे उरसि) माझ्या छातीवर शोभून (सः मे शत्रून् वि बाधतां) माझ्या शत्रूंना पीडा करो. (इन्द्रः दस्यून् असुरान् इव) ज्याप्रमाणें इन्द्रानें असुरांना आणि शत्रूंना तापविलें त्याप्रमाणें. [११]

इमं बिभर्मि वरणमायुष्माञ्छतशारदः । स मे राष्ट्रं च क्षत्रं च पशूनोजश्च मे दधत् ॥ १२ ॥
यथा वातो वनस्पतीन्वृक्षान्भनक्त्योजसा ।
एवा सपत्नान्मे भङ्ग्धि पूर्वाञ्जाताँ उतापरान्वरणस्त्वाभि रक्षतु ॥ १३ ॥
यथा वातश्चाग्निश्च वृक्षान्प्सातो वनस्पतीन् ।
एवा सपत्नान्मे प्साहि पूर्वाञ्जाताँ उतापरान्वरणस्त्वाभि रक्षतु ॥ १४ ॥
यथा वातेन प्रक्षीणा वृक्षाः शेरे न्यर्पिताः ।
एवा सपत्नांस्त्वं मम प्र क्षिणीहि न्यर्पय पूर्वान्जाताँ उतापरान्वरणस्त्वाभि रक्षतु ॥ १५ ॥
तांस्त्वं प्र च्छिन्द्धि वरण पुरा दिष्टात्पुरायुषः ।
य एनं पशुषु दिप्सन्ति ये चास्य राष्ट्रदिप्सवः ॥ १६ ॥
यथा सूर्यो अतिभाति यथास्मिन्तेज आहितम् ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ १७ ॥
यथा यशश्चन्द्रमस्यादित्ये च नृचक्षसि ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ १८ ॥

अर्थ— (इमं वरणं बिभर्मि) या वरण मण्याला मीं धारण करतों. ज्याच्यामुळें मीं (आयुष्मान् शत शारदः) दीर्घायु आणि शतायु होईन. (सः मे राष्ट्रं च क्षत्रं च) तो माझ्यासाठीं राष्ट्र आणि क्षत्रिय सैन्याला तसेंच (पशून् ओजः च मे दधत्) माझ्यासाठीं पशु आणि ओज धारण करो. [१२]

(यथा वातः) ज्याप्रमाणें वायु (ओजसा) वेगानें (वृक्षान् वनस्पतीन्) वृक्ष आणि वनस्पतींना (भनक्ति) तोडून टाकतो, (एवा) त्याचप्रमाणें (मे पूर्वान् जातान्) माझ्या पूर्वी होऊन गेलेल्या (उत अपरान् सपत्नान्) आणि दुसऱ्या शत्रूंना (भङ्ग्धि) तोडून टाकतो, (वरणः त्वा अभिरक्षतु) वरण मणि तुझें रक्षण करो. [१३]

(यथा वातः अग्निः च) ज्याप्रमाणें वायु आणि अग्नि मिळून (वनस्पतीन् वृक्षान्) वृक्ष आणि वनस्पतींचा (प्सातः) नाश करतात, (एवा सपत्नान् मे प्साहि) त्याप्रमाणें माझ्या शत्रूंना हे वरण मणे ! (न्यर्पय) खालीं पाडून टाक. [१४]

(यथा वातेन प्रक्षीणाः वृक्षाः) ज्याप्रमाणें वाऱ्यानें क्षीण झालेले वृक्ष (न्यर्पिताः शेरे) पडून जाऊन क्षीण होत जातात, (एवा त्वं मम सपत्नान्) त्याप्रमाणें तूं माझ्या शत्रूंना, हे वरण मणे! (न्यर्पय) खालीं पाडून टाक. [१५]

हे (वरण) वरण मणे! (ये एनं पशुषु दिप्सन्ति) जे त्याच्या पशूमध्यें घातक आहेत तसेंच (ये अस्य राष्ट्र-दिप्सवः) जे त्याचे राष्ट्रविघातक शत्रु आहेत, हे वरणमणे ! तूं (पुरा आयुषः) आयुष्य पूर्ण होण्यापूर्वींच (त्वं तान् प्रच्छिन्द्धि) तूं त्यांस छिन्नभिन्न कर. [१६]

(यथा सूर्यः अतिभाति) ज्याप्रमाणें सूर्य प्रकाशित होतो, (यथा अस्मिन् तेजः आहितं) ज्याप्रमाणें याच्यांत तेज ठेवलें आहे, (एवा वरणः मणिः) त्याप्रमाणें हा वरण मणि (मे कीर्तिं भूतिं नि यच्छतु) मला कीर्ति आणि ऐश्वर्य देवो. (मा तेजसा समुक्षतु) मला तेजानें संयुक्त करो. (मा यशसा समनक्तु) मला यशानें यशस्वी करो. [१७]

यथा यशः पृथिव्यां यथास्मिञ्जातवेदसि ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ १९ ॥
यथा यशः कन्यायां यथास्मिन्त्संभृते रथे ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ २० ॥
यथा यशः सोमपीथे मधुपर्के यथा यशः ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ २१ ॥
यथा यशोऽग्निहोत्रे वषट्कारे यथा यशः ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ २२ ॥
यथा यशो यजमाने यथास्मिन्यज्ञ आहितम् ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ २३ ॥
यथा यशः प्रजापतौ यथास्मिन्परमेष्ठिनि
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ २४ ॥
यथा देवेष्वमृतं यथैषु सत्यमाहितम् ।
एवा मे वरणो मणिः कीर्तिं भूतिं नि यच्छतु तेजसा मा समुक्षतु यशसा समनक्तु मा ॥ २५ ॥

अर्थ— (यथा यशः चन्द्रमसि नृचक्षसि आदिये) जसें यश चन्द्रांत आणि डोळ्यांस दिसणाऱ्या सूर्यांत, (यथा यशः पृथिव्यां अस्मिन् जातवेदसि०) जसें यश पृथ्वी आणि जातवेद अग्नीमध्यें आहे, (कन्यायां संभृते रथे०) जसें यश कन्यांच्या ठिकाणीं आणि युद्धासाठीं सिद्ध झालेल्या रथांत आहे, (सोमपीथे मधुपर्के०) जसें यश सोमपीथ आणि मधुपर्कांत आहे, (अग्निहोत्रे वषट्कारे०) जसें यश अग्निहोत्र आणि वषट्कारांत आहे, (यजमाने यशो०) जसें यश यजमानांत आणि यज्ञांत आहे, (प्रजापतौ परमेष्ठिनि०) जसें यश प्रजापति आणि परमेष्ठीमध्यें आहे, तसेंच यश हा वरणमणि मला देवो आणि यशानें युक्त करो. [१८-२४]

(यथा देवेषु अमृतं) ज्याप्रमाणें देवांत अमृत आहे, (यथा एषु सत्यं आहितं) ज्याप्रमाणें देवांचे ठिकाणीं सत्य ठेवलेलें आहे, (एवा मे वरणो मणिः) त्याप्रमाणें माझ्यासाठीं हा वरणमणि कीर्ति आणि ऐश्वर्य (नि यच्छतु) देवो आणि मला (तेजसा समुक्षतु) तेजानें युक्त करो आणि (यशसा मा समनक्तु) यशानें संयुक्त करो. [२५]

या सूक्तांत शत्रुनाश आणि स्वतःच्या यशाच्या अभिवृद्धीसाठीं प्रार्थना आहे. हें सूक्त सरळ अर्थाचें असल्यानें अधिक स्पष्टीकरणाची कांहीं खास आवश्यकता नाहीं.

पत्नीनें पतीसाठीं वस्त्र विणावें

कांड ७, सूक्त ३७

(ऋषिः - अथर्वा । देवता - लिंगोक्ता ।)

अभि त्वा मनुजातेन दधामि मम वाससा । यथासो मम केवलो नान्यासां कीर्तयाश्चन ॥ १ ॥

अर्थ— (मम मनुजातेन वाससा) मीं विचारपूर्वक विणलेल्या वस्त्रानें (त्वा अभि दधामि) तुला मीं बांधून ठेवते. (यथा केवलः मम असः) ज्यामुळें तूं केवळ माझाच होऊन रहा, आणि (अन्यासां न चन कीर्तयाः) अन्य कोणा स्त्रीचें नांव सुद्धां घेणारा होऊं नकोस. [१]

स्त्रीनें स्वतःच्या हातानें सूत काढावें, चरखा चालवावा, सूत तयार करून स्वतःच्या कुशलतेनें वीणलेल्या कापडाचे पतीला वापरण्यासाठीं कपडे तयार करावे. पत्नीनें निर्माण केलेल्या सुतानें विणलेले कपडेच पतीनें वापरावे. सूत काढतांना पत्नीनें आपल्या अंतःकरणांतील प्रेमानें तें काढावें आणि पतीनें सुद्धां आपण असे कपडे वापरण्यांत स्वतःचें केवढें भाग्य आहे असें समजावें. याप्रमाणें परस्पर प्रेमानें व्यवहार केल्यानें धर्मपति दुसऱ्या स्त्रीचें नांवहि घेणार नाहीं आणि धर्मपत्नी सुद्धां दुसऱ्या परपुरुषाचें नांव घेणार नाहीं. याप्रमाणें दोघांनीं गृहस्थाश्रमाचा आनंद घेत सुखी व्हावें.

हें सूक्त सुद्धां गृहस्थाश्रमीयांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा योग्य उपदेश देत आहे.

उन्नतीची दिशा

कांड ३, सूक्त २६

(ऋषिः - अथर्वा । देवता - अग्न्यादयः ।)

येऽ३स्यां स्थ प्राच्यां दिशि हेतयो नाम देवास्तेषां वो अग्निरिषवः ।
ते नो मृडत ते नोऽधि ब्रूत तेभ्यो वो नमस्तेभ्यो वः स्वाहा ॥ १ ॥
येऽ३स्यां स्थ दक्षिणायां दिश्यविष्यवो नाम देवास्तेषां वः काम इषवः ।
ते नो मृडत ते नोऽधि ब्रूत तेभ्यो वो नमस्तेभ्यो वः स्वाहा ॥ २ ॥
येऽ३स्यां स्थ प्रतीच्यां दिशि वैराजा नाम देवास्तेषां व आप इषवः ।
ते नो मृडत ते नोऽधि ब्रूत तेभ्यो वो नमस्तेभ्यो वः स्वाहा ॥ ३ ॥
येऽ३स्यां स्थोदीच्यां दिशि प्रविध्यन्तो नाम देवास्तेषां वो वात इषवः ।
ते नो मृडत ते नोऽधि ब्रूत तेभ्यो वो नमस्तेभ्यो वः स्वाहा ॥ ४ ॥

अर्थ— (**ये अस्यां प्राच्यां दिशि**) जे तुम्हीं या पूर्वदिशेस (**हेतयः नाम देवाः**) वज्र नांवाचे देव आहांत (**तेषां वः**) त्या तुमचे (**अग्निः इषवः**) अग्नि बाण आहेत, (**ते नः मृडत**) ते तुम्हीं आम्हांस सुखी करा. (**ते नः अधिब्रूत**) ते तुम्हीं आम्हांस उपदेश करा. (**तेभ्यः वः नमः**) त्या तुम्हांला आमचा नमस्कार असो. (**तेभ्यः स्वाहा**) त्या तुमच्यासाठीं आम्हीं आमचें समर्पण करीत आहोंत. [१]

जे तुम्हीं (**दक्षिणायां दिशि**) दक्षिण दिशेला (**अविष्यवो नाम देवाः**) रक्षण करण्याची इच्छा करणारे या नांवाचे देव आहांत (**तेषां वः कामः इषवः**) त्या तुमचे काम बाण आहेत. असे तुम्हीं आम्हांस सुखी करा. उपदेश करा. त्या तुम्हांला आमचा नमस्कार असो. तुमच्यासाठीं आम्हीं आमचें (सर्वस्व) अर्पण करीत आहोंत. [२]

जे तुम्हीं (**प्रतीच्यां दिशि**) पश्चिम दिशेला (**वैराजा नाम देवाः**) विराज नांवाचे देव आहांत, त्या तुमचे (**आपः इषवः**) पाणी हेच बाण आहेत. तुम्हीं आम्हांस सुखी करा. उपदेश करा तुमच्यासाठीं आमचें नमन आणि समर्पण असो. [३]

जे तुम्ही (**उदीच्यां दिशि**) उत्तरदिशेला (**प्रविध्यन्तः नाम देवाः**) वेध करणारे अशा नांवाचे देव आहांत त्या तुमचे (**वातः इषवः**) वायु हेच बाण आहेत. तुम्हीं आम्हांस सुखी करा, उपदेश करा. आमचें तुम्हांस नमन आणि समर्पण असो. [४]

*

ये॒३॑स्यां स्थ ध्रु॒वायां॑ दि॒शि नि॑लि॒म्पा नाम॑ दे॒वास्तेषां॑ व॒ ओष॑धी॒रिष॑वः ।
ते नो॑ मृडत॒ ते नोऽधि॑ ब्रूत॒ तेभ्यो॑ वो॒ नम॒स्तेभ्यो॑ व॒ः स्वाहा॑ ॥ ५ ॥
ये॒३॑स्यां स्थोर्ध्वायां॑ दि॒श्यव॑स्वन्तो॒ नाम॑ दे॒वास्तेषां॑ वो॒ बृह॒स्पति॒रिष॑वः ।
ते नो॑ मृडत॒ ते नोऽधि॑ ब्रूत॒ तेभ्यो॑ वो॒ नम॒स्तेभ्यो॑ व॒ः स्वाहा॑ ॥ ६ ॥

अर्थ — जे तुम्हीं (ध्रुवायां दिशि) ध्रुवदिशेला (निलिम्पा नाम देवाः) निर्लेप नांवाचे देव आहांत त्या तुमचे (ओषधीः इषवः) औषधी बाण आहेत. तुम्हीं आम्हांस सुखी करा आणि उपदेश करा. आमचें तुम्हांस नमन आणि समर्पण असो. [५]

जे तुम्ही (ऊर्ध्वायां दिशि) ऊर्ध्व दिशेला (अवस्वन्तः नाम देवाः) रक्षक नांवाचे देव आहांत त्या तुमचे (बृहस्पतिः इषवः) ज्ञानी बाण आहेत. तुम्ही आम्हांस सुखी करा आणि उपदेश करा. त्या तुम्हांसाठीं आमचें नमन आणि समर्पण असो. [६]

भावार्थ — पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर, ध्रुव (पृथ्वी) आणि ऊर्ध्व (आकाश) या सहा दिशा आहेत, या सहा दिशांचे क्रमानें (हेति, शस्त्रास्त्र) वज्र, रक्षणाची इच्छा करणारे स्वयंसेवक, (वि-राज) राजारहित स्थिति म्हणजे प्रजासत्ताक, वेधकता, लेप करणारे वैद्य आणि उपदेशक यांचें मुख्यत्व आहे. त्यांनीं जनतेस उपदेश करावा आणि तिचें रक्षण करावें, त्यामुळें जनतासुद्धां त्यांचा सत्कार करील आणि त्यांना आत्मसमर्पण करील. [१-६]

याच प्रकारचें परंतु किंचित् निराळें अर्थ प्रतिपादणारें सूक्त या पुढचें आहे. दोन्हींचा घनिष्ठ संबंध आहे, म्हणून त्याचा अर्थ प्रथम पाहूं आणि नंतर दोन्हींचा एकत्रच विचार करूं.

सांमनस्य

कांड ६, सूक्त ७४

(ऋषिः – अथर्वा । देवता – सांमनस्यम्; नाना देवताः, त्रिणामा ।)

सं वः॑ पृच्यन्तां त॒न्व१ः॒ सं मनां॑सि॒ समु॑ व्र॒ता । सं वो॒ऽयं ब्रह्म॑ण॒स्पति॒र्भगः॒ सं वो॑ अजीगमत् ॥ १ ॥
सं॒ज्ञप॑नं वो॒ मन॒सोऽथो॑ सं॒ज्ञप॑नं हृ॒दः । अथो॒ भग॑स्य॒ यच्छ्रा॒न्तं तेन॒ संज्ञ॑पयामि वः ॥ २ ॥

अर्थ — (वः तन्वः सं पृच्यन्तां) तुमचीं शरीरें मिळोत, (मनांसि सं) तुमचीं मनें एक दुसऱ्याशीं मिळोत. (उ व्रता सं) तुमचीं कार्यें सुद्धां सहकार्यानें होवोत. (अयं ब्रह्मणस्पतिः वः सं) हा ज्ञानाचा अधिपति तुम्हांस एकत्र ठेवो. (भगः वः सं अजीगमत्) भाग्य देणारा सुद्धां तुम्हांस एकत्र ठेवो. [१]

(वः मनसः संज्ञपनं) तुमचीं मनें मिळून रहाण्याची संवय व्हावी म्हणून (अथो हृदः संज्ञपनं) आणि हृदयें सुद्धां मिळण्याच्या संवयीचीं व्हावीत म्हणून (अथो भगस्य यत् श्रान्तं) आणि भाग्यवंताचे जे परिश्रम आहेत (तेन वः संज्ञपयामि) त्यांनीं तुम्हांस एकत्र मिळून रहाण्याचा अभ्यास होवो. [२]

भावार्थ — तुमचीं शरीरें, मनें आणि कर्में सर्व एकतेनें म्हणजे समतेनें युक्त होवोत. तुम्हांस ज्ञान देणारा एकतेचें ज्ञान तुम्हांस देवो. तसेंच आमचें भाग्य वाढविणाऱ्या तुम्हांला एकत्र करून ठेवो. [१]

तुमचीं मनें आणि हृदय एक होवोत. भाग्य प्राप्त करण्यासाठीं परिश्रम करावे लागतात. तसे परिश्रम करतांना तुम्हीं एक दुसऱ्याशीं मिळून रहा. [२]

यथादित्या वसुभिः संबभूवुर्मरुद्भिरुग्रा अहृणीयमानाः।
एवा त्रिणामन्नहृणीयमान इमान्जनान्त्संमनसस्कृधीह ॥ ३ ॥

अर्थ— (**यथा अहृणीयमानाः उग्राः आदित्याः**) ज्याप्रमाणें कोणाकडून न दबून जाणारे आदित्य (**वसुभिः मरुद्भिः संबभूवुः**) वसु आणि मरुतांशीं मिळून रहातात (**एवा**) त्याप्रमाणें (**त्रिणामन्**) तीन नांवाच्या ! तूं (**अहृणीयमानः**) दबून न जातां (**इह इमान् जनान् संमनसः कृधि**) येथें या लोकांस एक विचारानें युक्त कर. [३]

भावार्थ— ज्याप्रमाणें शूर आदित्य, वसु आणि रुद्र एकत्र मिळून रहातात, त्याप्रमाणें तुम्हीं सुद्धां मिळून रहा. आणि हीं सर्व मनुष्यें सुद्धां मिळून मिसळून सहकार्यानें राहोत. [३]

ऐक्याचें बळ

या सूक्तांत मिळून मिसळून एकत्र रहाण्याचा आणि त्या ऐक्यानें स्वतःची उन्नति साध्य करण्याचा उपदेश आहे. हृदय, मन, विचार, संकल्प आणि कर्म या सर्वांत समानता आणि एकता राहिली पाहिजे. कोणांत विपरित भाव निर्माण झाला तर त्यापासून भिन्नता वाढेल आणि संघभावना नष्ट होईल. पहा या जगांत आदित्य, वसु, रुद्र, वस्तुतः भिन्न असून सुद्धां जगताच्या कार्यांत मिळून मिसळून रहात आहेत. त्याचप्रमाणें मनुष्यांनीं रंग, रूप अथवा जाति भिन्नत्व असलें तरी सुद्धां राष्ट्रकार्य करण्यासाठीं त्यांनीं सर्वांनीं एकत्र यावें आणि ऐक्यानें राष्ट्रकार्य करावें.

सौभाग्य-वर्धन

कांड १, सूक्त १८

(ऋषिः – द्रविणोदाः । देवता – वैनायकं सौभगम् ।)

निर्लक्ष्म्यं ललाम्यं निररातिं सुवामसि।
अथ या भद्रा तानि नः प्रजाया अरातिं नयामसि ॥ १ ॥
निररणिं सविता साविषक् पदोर्निर्हस्तयोर्वरुणो मित्रो अर्यमा ।
निरस्मभ्यमनुमती रराणा प्रेमां देवा असाविषुः सौभगाय ॥ २ ॥

अर्थ— (**ललाम्यं**) डोक्यावर होणाऱ्या (**लक्ष्म्यं**) वाईट चिन्हाला (**निः**) निःशेष दूर करतों, तसेंच (**अरातिं**) कंजुसपणा वगैरे (**निः सुवामसि**) निःशेष दूर करतों. (**अथ या भद्रा**) आणि जीं कल्याणकारक चिन्हें आहेत, (**तानि नः प्रजायै**) तीं सर्व आम्हीं आमच्या संतानासाठीं प्राप्त करतों. आणि (**अरातिं**) कंजुसपणा वगैरे (**नयामसि**) दूर पळवून लावतों. [१]

सविता, वरुण, मित्र आणि अर्यमा (**पदोः हस्तयोः**) पाय आणि हातांची (**अरणिं**) पीडा (**निः निः साविषत्**) दूर करो. (**रराणा अनुमतिः**) दानशील अनुमतीनें, (**अस्मभ्यं निः**) आमच्यासाठीं निःशेष प्रेरणा करो. तसेंच (**देवाः**) देवांनीं (**इमां**) या स्त्रीला (**सौभगाय**) सौभाग्यासाठीं (**प्र असाविषुः**) प्रेरित केलें आहे. [२]

भावार्थ— मस्तकावर आणि शरीरावर जीं कुलक्षणें आहेत तीं दूर करण्यांत यावीत, त्याचप्रमाणें अंतःकरणांत लोभवृत्ति वगैरे जे दुर्गुण असतील त्यांना सुद्धां दूर केले पाहिजे. तसेंच जीं सुलक्षणें आहेत त्यांना स्वतःमध्यें आणि आपल्या संततिमध्यें स्थिर केलीं पाहिजेत आणि वाढविलीं पाहिजेत. तसेंच कंजुसपणा वगैरे मनाचे वाईट भाव दूर केले पाहिजेत. [१]

सविता, वरुण, मित्र, अर्यमा, अनुमति इत्यादि सर्व देव आणि देवता हात, पाय वगैरेंच्या पीडा दूर करोत. याविषयीं ते आम्हांस उपदेश करोत, कारण देवानें स्त्री आणि पुरुष हे उत्तम भाग्यासाठींच केले आहेत. [२]

यत्त आत्मनि तन्वां घोरमस्ति यद्वा केशेषु प्रतिचक्षणे वा ।
सर्वं तद्वाचाप हन्मो वयं देवस्त्वा सविता सूदयतु ॥ ३ ॥
रिश्यपदीं वृषदतीं गोषेधां विधमामुत । विलीढ्यं ललाम्यं१ ता अस्मन्नाशयामसि ॥ ४ ॥

अर्थ — (यत् ते आत्मनि) जें तुझ्या आत्म्यांत तसेंच (तन्वां) शरिरांत (वा यत् केशेषु) अथवा जें केंसांत (वा प्रति चक्षणे , अथवा जें दृष्टींत (घोरं अस्ति) भयानक चिन्ह आहे (तत् सर्वं) तें सर्व (वयं वाचा हन्मः) आम्हीं वाणीनें दूर करतों. (सविता देवः) सविता देव (त्वा सूदयतु) तुला सिद्ध करो म्हणजे परिपक्व करो. [३]

(रिश्यपदीं) हरणासारख्या पायाची (वृषदतीं) बैलासारख्या दांताची (गोषेधां) गाईसारखी चालणारी, (विधमां) विरुद्ध शब्द बोलणारी, जिचा अवाज कर्कश्य आहे अशी स्त्री (उत ललाम्यं विलीढ्यं) आणि मस्तकावरचें कुलक्षण हें सर्व आम्हीं (अस्मत् नाशयामसि) आमच्यांतून नाश करतों. [४]

भावार्थ — तुमच्या आत्म्यांत, मनांत, शरीरांत, केसांत तसेंच दृष्टींत जर कांहीं कुलक्षणें असलीं, जर कांहीं दुर्गुण असले तर ते आम्हीं वचनांनीं दूर करतों, परमेश्वर तुम्हांस उत्तम सुलक्षणी करो. [३]

हरणासारखे पाय, बैलासारखे दांत, गाईसारखे चालण्याची संवय, कठोर कर्कश्य अवाज, तसेंच मस्तकावरील अन्य कुलक्षणें हीं सर्व आमच्यापासून दूर होवोत. [४]

सौभाग्य-वर्धन-सूक्त

कुलक्षणें आणि सुलक्षणें

या सूक्तांत शरिराच्या, मनाच्या, बुद्धि, आत्मा वगैरेंच्या कुलक्षणांना दूर करण्याविषयीं, तसेंच स्वतःच स्वतःला पूर्ण लक्षण-युक्त करण्याविषयीं उपदेश आहे. या सूक्तांत वर्णिलेलीं कुलक्षणें अशीं आहेत.

(१) **ललाम्यं लक्ष्म्यं**- मस्तकावरील लक्षणें, कपाळ अरुंद असणें, कपाळावर केंस असणें, बुद्धिहीन चेहरा, वगैरे कुलक्षणें होत. (मं. १)

(२) **ललाम्यं विलीढ्यं**- डोक्यावर केंसाचे झुपके असणें, आणि त्यामुळें मस्तकाची शोभा बिघडणें वगैरे कुलक्षणें. (मं. ४)

(३) **रिश्यपदी**- हरणासारखे बारीक पाय असणारी (मं. ४)

(४) **वृषदती**- बैलासारखे दांत असणारी. (मं. ४)

(५) **गोषेधा**- गायीसारखी चालणारी (मं. ४)

(६) **वि-धमा**- कानास कटू लागेल, त्रास होईल असा आवाज, जो आवाज मधुर, मंगल, मृदु नाहीं असा (मं. ४)

ही शेवटचीं (३ ते ६) चार कुलक्षणें स्त्रीलिंगी सांगितलीं आहेत म्हणजे तीं स्त्रियांच्या ठिकाणीं असणें त्यांना अत्यंत वाईट आहे. ती स्त्रियांमध्यें असूं नयेत. वधू पसंत करतांनाच यांचा विचार करणें योग्य आहे.

(७) **केशेषु घोरं**- केंसांमध्यें क्रूरता अथवा भयानकता दिसून येणें म्हणजे केंसामुळें चेहरा क्रूर दिसणें.

(८) **प्रति चक्षणे क्रूरं**- नेत्रांत क्रूरता, भयानक नेत्र, भयानक दृष्टि. (मं. ३)

(९) **तन्वा क्रूरं**- शरीरांत भयानकपणा, म्हणजे सर्व शरीराचे अवयव वेडेवांकडे असल्यानें उत्पन्न होणारा भयानकपणा (मं. ३)

(१०) **आत्मनि क्रूरं**- मन, बुद्धि, चित्त, आत्मा या सर्वांमध्यें क्रूरभाव असणें. (मं. ३)

(११) **अ-राति**- लोभीपणा, उदार भावाचा अभाव. (मं. १)

(१२) **पदोः हस्तयोः अ-रणिः**- पाय आणि हाताला कांहीं पीडा अथवा कोणत्या तरी प्रकारचा विकार असणें. (मं. ३)

हीं बारा कुलक्षणें या सूक्तांत सांगितलीं आहेत. या सूक्ताचा विचार करतांना यापूर्वी येऊन केलेल्या ' कुलवधू-सूक्त ' (अथर्व १।१४) याचा विचार करावा. या दोन्हींचा विचार करण्यानें वधूवर परीक्षेचें आपणांस ज्ञान होईल. म्हणून वाचकांनीं या

दोन्ही सूक्तांचा एकत्र विचार करावा. या कुलक्षणांतील कित्येक केवळ स्त्रियांत आणि कित्येक पुरुषांत तसेंच कित्येक दोघांत असूं शकतात. म्हणजे सर्वच लक्षणें न्यूनाधिक भेदानें स्त्रीपुरुष, उभयतांत पहावयास मिळण्याचा संभव खरा.

हीं कुलक्षणें दूर करणें आणि त्यांच्या विरुद्ध सुलक्षणें स्वतः-मध्यें वाढविणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. या कुलक्षणांचा विचार करण्यानें सुलक्षणांचेंहि ज्ञान होतें. ज्यानें शरीर सुडौल आणि सुंदर दिसेल तीं शरीराचीं सुलक्षणें समजावींत. याचप्रमाणें इंद्रियें, मन, बुद्धि, चित्त, वाचा इत्यादींचीं सुलक्षणें आहेत. या सर्वांचें निश्चित ज्ञान प्राप्त करून स्वतःमध्यें असलेलीं कुलक्षणें दूर करावींत आणि सुलक्षणें स्वतःमध्यें वाढवावींत. हें प्रत्येकाचें आवश्यक कर्तव्य आहे.

वाणीनें कुलक्षणें दूर करणें

मंत्र ३ यांत '**सर्वं तद्राचाप हन्मो वयं**' म्हणजे हीं सर्व कुलक्षणें आम्हीं वाणीनें दूर करतों, अथवा वाणीनें या कुलक्षणांचा नाश करीत आहोंत असें म्हटलें आहे. तसेंच त्याबरोबर '**देवस्त्वा सविता सूदयतु**' म्हणजे सवितादेव तुला पूर्ण सुलक्षणी करो असें म्हटलें आहे. परमेश्वराच्या कृपेनें मनुष्य सुलक्षणी होऊं शकतो, यांत कांहीं शंका नाहीं. परंतु वाणीनें कुलक्षणें दूर करण्याविषयीं पुष्कळ लोकांना शंका येण्याचा संभव आहे, म्हणून त्याविषयीं थोडेसें स्पष्टीकरण आवश्यक आहे. वेदांत या विषयीं कित्येक सूक्तें आहेत, म्हणून वाचकांनीं त्यांचा जरूर विचार करावा.

वाणीनें प्रेरणा

वाणीनें स्वतःच स्वतःला अथवा दुसऱ्यांना सुद्धां प्रेरणा अथवा सूचना देऊन रोग दूर करणें, तसेंच मन वगैरेंचीं कुलक्षणें दूर करणें संभवनीय आहे. ही गोष्ट वेदांत अनेक स्थळीं प्रकाशित झालेली आहे. ही सूचना याप्रमाणें देण्यांत येते– 'माझ्यांत हें कुलक्षण आहे. तें फक्त थोडें दिवस टिकणार आहे. तें दीर्घकाळ रहाणार नाहीं. तें कमी होत आहे. फार त्वरेनें कमी होत आहे. माझ्यांत सुलक्षणें वाढत आहेत. मीं सुलक्षणांनीं युक्त होईन. मीं निर्दोष होत आहे. मीं दोषांना हटवीत आहे, आणि माझ्यांत उत्तम गुणांना विकसित करीत आहे.'

याप्रकारें अनुभवून अनेक सूचना मनाला देऊन आणि त्यांचें प्रतिबिंब मनांत स्थिर करीत गेल्यानें इष्टसिद्धि होते. वेदांतील हा मानसशास्त्रीय सिद्धांत प्रत्येकानें विचार करण्यासारखा आहे. 'मीं दीन आहे' असा विचार जे लोक हल्लीं उच्चारतात, असे विचार मनांत प्रतिबिंबित होण्यानें मनावर कुसंस्कार होतात व ते आमच्या पतनास कारणीभूत होतात. म्हणून नेहमीं शुद्ध वाणीच उच्चारावी. कधींहि अशुद्ध आणि पातकी भावांनीं भरलेले शब्द उच्चारूं नयेत. वाणीच्या शुद्ध प्रेरणेविषयीं प्रत्यक्ष उपदेश देणारीं कित्येक सूक्तें यापुढें येणार आहेत, म्हणून त्या बाबतींत एवढेंच लिहिणें पुरें होईल. याप्रमाणें शुद्ध वाणीनें आणि परमेश्वराच्या भक्तीनें स्वतःचीं कुलक्षणें दूर करावीं आणि स्वतःमध्यें सुलक्षणें वाढवावीं हें प्रत्येक मनुष्यास उचित आहे.

हातापायाचे रोग

दुसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं सविता (सूर्य), वरुण (पाणी), मित्र (प्राणवायु), अर्यमा (अग्नि) हे हात आणि पायाचे रोग तसेंच शरीराचे अन्य रोग सुद्धां दूर करोत. सूर्यप्रकाश, समुद्राचें पाणी, शुद्ध वायु, रुईच्या पानांचा शेक इत्यादींनीं पुष्कळ रोग दूर होतात. या विषयीं यापूर्वीं पुष्कळ सांगण्यांत आलें आहे, आणि यानंतरहि हा विषय वारंवार येणार आहे. आरोग्य त्यानेंच प्राप्त होतें.

सौभाग्यासाठीं

'**इमां देवाः असाविषु सौभगाय**' तिला देवांनीं सौभाग्यासाठींच निर्माण केलें आहे. विशेषतः स्त्रियांना उद्देशून हा मंत्र भाग आहे. परंतु सर्वांसमुद्धां ही गोष्ट लागूं करतां येते. म्हणजे मनुष्यमात्र मग तो स्त्री असो कीं पुरुष, तो स्वतःचें कल्याण करण्यासाठींच निर्माण झालेला आहे, आणि जर तो परमेश्वराची भक्ति करील आणि शुद्धवाणीच्या सूचनांनीं स्वतःच्या मनाला प्रभावित करील तर अवश्यमेव तो सौभाग्याचा भोक्ता होऊं शकेल. प्रत्येक मनुष्यानें हा वैदिक धर्माचा सिद्धांत मनांत स्थिर करावा. स्वतःची उन्नति करणें हें स्वतःच्या पुरुषार्थावर अवलंबून आहे. जर अवनति होऊं लागली तर समजावें कीं स्वतःच्या पुरुषार्थांत कांहीं त्रुटी नक्की राहिली आहे.

संततीचें कल्याण

कदाचित् कांहीं कुलक्षणें स्वतःमध्यें राहिलीं तरी आपली संतति सर्व सुलक्षणांनीं युक्त व्हावी (**या भद्रा तानि नः प्रजायै**) हा प्रथम मंत्राचा उपदेश प्रत्येक गृहस्थानें ध्यानांत ठेवावा. स्वतःची संतति निर्दोष, सुलक्षणांनीं आणि सद्गुणांनीं युक्त व्हावी हा भाव जर प्रत्येक गृहस्थांत असेल तर पुष्कळ टक्के मनुष्यें सुधारतील आणि राष्ट्र उन्नतीच्या सोपानावर चढेल. हा उपदेश सर्व प्रकारें कल्याण करणारा आहे, म्हणून तो कोणींहि विसरूं नये.

याप्रकारें वाचकांनीं या सूक्ताचा विचार करावा आणि स्वतःचीं कुलक्षणें दूर करून स्वतःमध्यें सुलक्षणें वाढविण्याचा प्रयत्न करावा.

सौभाग्य-वर्धन

कांड ६, सूक्त १३९

(ऋषिः – अथर्वा । देवता – वनस्पतिः ।)

न्यस्तिका रुरोहिथ सुभगंकरणी मम ।
शतं तव प्रतानास्त्रयस्त्रिंशन्नितानाः । तया सहस्रपर्ण्या हृदयं शोषयामि ते ॥ १ ॥
शुष्यतु मयि ते हृदयमथो शुष्यत्वास्यम् । अथो नि शुष्य मां कामेनाथो शुष्कास्या चर ॥ २ ॥
संवननी समुष्पला बभ्रु कल्याणि सं नुद । अमूं च मां च सं नुद समानं हृदयं कृधि ॥ ३ ॥
यथोदकमपपुषोऽपशुष्यत्यास्यम् । एवा नि शुष्य मां कामेनाथो शुष्कास्या चर ॥ ४ ॥
यथा नकुलो विच्छिद्य संदधात्यहिं पुनः । एवा कामस्य विच्छिन्नं सं धेहि वीर्यावति ॥ ५ ॥

अर्थ— (**मम सुभगंकरणी न्यस्तिका रुरोहिथ**) माझें सौभाग्य वाढवणारी आणि दोष दूर करणारी ही औषधि उत्पन्न झाली आहे. (**तव शतं प्रतानाः**) तुझ्या शंभर प्रकारच्या शाखा आहेत, आणि (**त्रयस्त्रिंशत् नितानाः**) तेहतीस प्रकारच्या उपशाखा आहेत. (**तया सहस्रपर्ण्या**) त्या सहस्रपर्णी औषधीनें (**ते हृदयं शोषयामि**) तुझें हृदय शुष्क करतों. [१]

(**ते हृदयं मयि शुष्यतु**) तुझें हृदय माझ्या विचारानें शुष्क होवो. (**अथो आस्यं शुष्यतु**) आणि तोंडसुद्धा सुकून जावो. (**अथो मां कामेन नि शुष्य**) आणि मला कामानें शुष्क करून (**अथो शुष्कास्या चर**) तूं शुष्कमुखी होऊन रहा. [२]

हे (**बभ्रु कल्याणि**) पोषण करणारी अथवा पिंवळ्या रंगाची आणि कल्याण करणारी ! तूं (**संवननी समुष्पला**) सेवन करण्यायोग्य आणि उत्साह वाढवणारी आहेस. (**अमूं संनुद**) तूं त्याला प्रेरित कर. (**मा च संनुद**) मला प्रेरित कर. आमचीं (**हृदयं समानं कृधि**) हृदयें समभाव कर. [३]

(**यथा उदकं अपपुषः**) ज्याप्रमाणें पाणी न पिणाऱ्याचें (**आस्यं शुष्यति**) तोंड तहानेनें कोरडें पडतें, (**एवा मां कामेन निशुष्य**) त्याप्रमाणें मजविषयींच्या कामानें तूं शुष्क होऊन (**अथो शुष्कास्या चर**) तूं शुष्कमुखी होऊन रहा. [४]

(**यथा नकुलः अहिं विच्छिद्य**) ज्याप्रमाणें मुंगुस सांपाला तोडून टाकून (**पुनः संदधाति**) पुनः त्याला जोडतें, (**एवा वीर्यावति**) त्याप्रमाणें हे वीर्यवति औषधि ! (**कामस्य विच्छिन्नं**) कामाच्या तुटलेल्या संबंधाला (**सं धेहि**) तूं पुनः जोड. [५]

भावार्थ— सहस्रपर्णी औषधि सौभाग्य वाढविणारी आणि दोष दूर करणारी आहे. तिच्या शेंकडों शाखा असतात. तिच्या सेवनामुळें स्त्री पुरुष वीर्यवान् होतात, आणि परस्पराचा वियोग सहन करूं शकत नाहींत; म्हणजे वियोग झाला तर ते एकमेकांची इच्छा करण्यानें वाळून जातात. [१–२]

ही वनस्पति पुष्टि देणारी, सर्व प्रकारचा आनंद देणारी आहे. ती उत्साह सुद्धां वाढवते; म्हणून गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांनीं सेवन करण्यास ती योग्य आहे. तिच्या सेवनानें स्त्रीपुरुषांस परस्पराविषयीं सहवासाची इच्छा होते. आणि दोघांचीं हृदयें समान प्रकारें परस्परांच्या प्रीतीनें परस्पर आकर्षित होतात. [३]

ज्याप्रमाणें पाणी न मिळाल्यानें मनुष्य तहानेनें सुकून जातो त्याप्रमाणें कामानें स्त्रीपुरुष परस्परांच्या प्राप्तीच्या इच्छेनें सुकून जातात. [४]

ज्याप्रमाणें मुंगुस सांपाला तोडून टाकून पुनः त्याला सांधतें त्याप्रमाणें वियोगी स्त्रीपुरुषांना पुनः एकत्र आणणें हें योग्य आहे. [५]

सहस्रपर्णी औषधि

या सूक्तांत सहस्रपर्णी औषधीचें वर्णन आहे. ही औषधि स्त्रीपुरुषास परस्पर संबंध करण्यास योग्य, पुष्ट आणि वीर्यवान् करते. तिचें सेवन केल्यानंतर स्त्रीपुरुषांस परस्परांचा वियोग सहन करणें अशक्य होतें. निवीर्य पुरुषसुद्धां तिच्या सेवनानें पुष्कळच उत्साहसंपन्न होतो. या प्रकारची सहस्रपर्णी औषधि कोणती, तीची माहिती आजपावेतों मिळालेली नाहीं. वैद्यकग्रंथांत ती मिळत नाहीं. वैद्यांनीं याविषयीं शोध करणें जरुरीचें आहे.

मुंगुसानें सापाला तोडणें आणि जोडणें

या सूक्ताच्या ५ व्या मंत्रांत ' मुंगुस सापाला तोडतें आणि पुनः जोडतें, (**नकुलः अहिं विच्छिद्य पुनः संदधाति**) असें म्हटलें आहे. सर्व भारतवर्षांत ही गोष्ट विश्वासपात्र समजली जाते. अथर्ववेदांत तीच गोष्ट येथें सांगितली आहे; म्हणून या विषयीं जास्त शोध व्हावयास हवा. जर अशा प्रकारची कांहीं वनस्पति सांपडली तर सर्वांसच तिचा फार लाभ होईल.

सौभाग्य वृद्धि

कांड ७, सूक्त १६

(ऋषिः - भृगुः । देवता - सविता ।)

बृहस्पते सवितर्वर्धयैनं ज्योतयैनं महते सौभगाय ।
संशितं चित्संतरं सं शिशाधि विश्वं एनमनु मदन्तु देवाः ॥ १ ॥

अर्थ— हे (**बृहस्पते सवितः**) ज्ञानपते ! हे उत्पादक देवा ! (**एनं वर्धय**) त्याला वाढवा. (**एनं महते सौभगाय ज्योतय**) त्याला महान् सौभाग्यासाठीं प्रकाशित कर. (**संशितं सं-तरं चित् संशिशाधि**) प्रथमपासून तीक्ष्ण बुद्धि असणाऱ्यांना उत्तम करण्यासाठीं शिक्षणानें युक्त कर. (**विश्वे देवाः एनं अनु मदन्तु**) सर्व देवता त्याला अनुमोदन देवोत. [१]

भावार्थ— हे ज्ञानी देवा ! आम्हां सर्व मनुष्यांची वृद्धि करा. आम्हांस प्रगत करा. आम्हांस महान् ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठीं तुमचा प्रकाश द्या. आम्हांमध्यें जे तेजस्वी लोक आहेत ते जास्त तेजस्वी व्हावे म्हणून त्यांना उत्तम शिक्षण प्राप्त व्हावें आणि दैवी सहाय्य सर्वांना प्राप्त व्हावें. [१]

पृथ्वी, आप, तेज, वायु, सूर्य, वनस्पति इत्यादि देवतांचें सहाय्य आम्हांस उत्तमप्रकारें प्राप्त होवो. आणि त्यांची शक्ति प्राप्त करून आम्हीं आमच्या उन्नतीचें साधन प्राप्त करूं आणि ऐश्वर्याचे भागीदार होऊं. ईश्वर आम्हांस अशा परिस्थितींत ठेवो कीं जेथें आमची उन्नति करण्याच्या कार्यांत आमचा कोणी विरोधी नसावा आणि आम्हीं अखंड उन्नतीचें साधन साध्य करावें.

दांतांची पीडा

कांड ६, सूक्त १४०

(ऋषिः - अथर्वा । देवता - ब्रह्मणस्पतिः ।)

यौ व्याघ्राववरूढौ जिघत्सतः पितरं मातरं च । यौ दन्तौ ब्रह्मणस्पते शिवौ कृणु जातवेदः ॥ १ ॥

अर्थ— (**यौ व्याघ्रौ अवरूढौ**) वाघाप्रमाणें वाढलेले जे दोन दांत (**मातरं पितरं च जिघत्सतः**) माता पित्यांना दुःख देतात, हे ब्रह्मणस्पते ! हे (**जातवेदः**) ज्ञानी ! (**तौ दन्तौ शिवौ कृणु**) ते दोन्ही दांत कल्याण करणारे कर. [१]

व्रीहिमत्तं यवमत्तमथो माषमथो तिलम् ।
एष वां भागो निहितो रत्नधेयाय दन्तौ मा हिंसिष्टं पितरं मातरं च ॥ २ ॥
उपहूतौ सयुजौ स्योनौ दन्तौ सुमङ्गलौ ।
अन्यत्र वां घोरं तन्वः परैतु दन्तौ मा हिंसिष्टं पितरं मातरं च ॥ ३ ॥

अर्थ — (**व्रीहिं अत्तं यवं अत्तं**) भात खा, सातु खा, (**अथो माषं अथो तिलं**) उडीद आणि तीळ खा. (**एष वां भागः रत्नधेयाय निहितः**) हा तुमचा भाग रत्नधारण करण्यासाठीं निश्चित झाला आहे. हे दांतानो ! (**पितरं मातरं च मा हिंसिष्टं**) मातापित्यांना कष्ट देऊं नका [२]

(**सयुजौ स्योनौ सुमंगलौ दन्तौ उपहूतौ**) बरोबर जोडलेले, सुखदायक, मंगलकारक दोन्ही दांत प्रशंसनीय आहेत. (**वां तन्वः घोरं अन्यत्र परैतु**) तुमच्या शरीराचें कठोर दुःख दूर होवो ! हे (**दन्तौ**) दांत हो ! (**पितरं मातरं मा हिंसिष्टं**) मातापित्यांना कष्ट देऊं नका. [३]

मुलांना जेव्हां दांत येतात तेव्हां त्यांना फार दुःख होतें. त्यांत दोन दांत असे आहेत की ज्यामुळें बालकांना फार कष्ट होतात. बालकाचें दुःख पाहून मातापितरें सुद्धां फारच दुःखी कष्टी होतात.

दांत येतात त्यावेळीं मुलांना भात, जव, उडीद आणि तीळ असें मृदु, नरम अन्न खाण्यास द्यावें. ज्याप्रकारें अन्न पचन होईल अशा रीतीनें उत्तम सरस अन्न खाऊं घालावें. तशा अन्नानें दांत सुदृढ आणि रत्नासारखे सुंदर होतात.

मुलांकडून हें पथ्य कसें पाळवावें याविषयीं वैद्यांनीं विचार करावा. प्रत्येक मुलास दांत येतेवेळीं दुःख तर होतेंच. जर वरील पथ्य हितकारक सिद्ध झालें तर प्रत्येक गृहस्थाचें घर त्याचा लाभ घेऊं शकेल.

केसवर्धक औषधि

कां ६, सूक्त १३६

(ऋषिः – वीतहव्यः । देवता – वनस्पतिः ।)

देवी देव्यामधि जाता पृथिव्यामस्योषधे । तां त्वा नितत्नि केशेभ्यो दृंहणाय खनामसि ॥ १ ॥
दृंह प्रत्नाञ्जनयाजाताञ्जातानु वर्षीयसस्कृधि ॥ २ ॥
यस्ते केशोऽवपद्यते समूलो यश्च वृश्चते । इदं तं विश्वभेषज्याभि षिञ्चामि वीरुधा ॥ ३ ॥

अर्थ — हे औषधे ! तूं (**देवी देव्यां पृथिव्यां अधि जाता**) दिव्य औषधि पृथ्वी देवीमध्यें उत्पन्न झाली आहे हे (**नितत्नि**) खालीं पसरणाऱ्या औषधे ! (**तां त्वा केशेभ्यः दृंहणाय खनामसि**) त्या तुला-औषधीला केसांना सुदृढ करण्यासाठीं मीं खणून काढतों. [१]

(**प्रत्नान् दृंह**) जुन्या केसांना सुदृढ कर. (**अजातान् जनय**) जेथें (केस) उत्पन्न झाले नाहींत तेथें उत्पन्न कर. (**जातान् उ वर्षीयसः कृधि**) आणि जे उत्पन्न झाले आहेत त्यांना चांगले लांब सडक मरा. [२]

(**यः ते केशः अवपद्यते**) जे तुझे केस गळून पडतात (**यः समूलो वृश्चते**) आणि मुळांसह तुटून पडतात (**इदं तं विश्वभेषज्या वीरुधा अभिषिञ्चामि**) त्या केसांना, केसांचे दोष दूर करणाऱ्या औषधि वेलीच्या रसानें भिजवितों. [३]

भावार्थ — नितत्नी नांवाची औषधि पृथ्वीवर उगवते. तिच्या प्रयोगानें केस सुदृढ होतात. जे केस जुने झाले, जे तुटून पडतात, जे गळून जातात, ते सर्व दोष या औषधीचा रस लावल्यानें दूर होतात, आणि केस मजबूत होतात. जेथें केस वाढत नसतील तेथें या औषधींचा रस लावल्यानें नवे केस येतात; आणि जेथें केस असतात ते जास्त लांब होतात. [१-३]

ही नितत्नी नांवाची औषधि केशवर्धक म्हटली आहे. परंतु ही औषधि कोणती तें माहित नाहीं. वैद्यांनीं या औषधिविषयीं शोध करून ती सर्वांच्या उपयोगासाठीं प्रगट करावी.

केशवर्धक औषधि

कांड ६, सूक्त १३७

(ऋषिः – वीतहव्यः । देवता – वनस्पतिः ।)

यां जमदग्निरखनद्दुहित्रे केशवर्धनीम् । तां वीतहव्य आभरदसितस्य गृहेभ्यः ॥ १ ॥
अभीशुना मेया आसन्व्यामेनानुमेयाः । केशा नडा इव वर्धन्तां शीर्ष्णस्ते असिताः परि ॥ २ ॥
दृंह मूलमाग्रं यच्छ वि मध्यं यामयौषधे । केशा नडा इव वर्धन्तां शीर्ष्णस्ते असिताः परि ॥ ३ ॥

अर्थ— (जमदग्निः यां केशवर्धनीं दुहित्रे अखनत्) जमदग्नीनें जी केशवर्धक औषधी स्वतःच्या कन्येसाठीं खोदली, (तां वीतहव्यः असितस्य गृहेभ्यः आभरत्) तिला वीतहव्यानें असिताच्या घरासाठीं भरून ठेवली. [१]

जे (अभीशुना मेया आसन्) ज्या केंसांची लांबी बोटांनीं मापली जात होती ते (व्यामेन अनुमेयाः) हाताच्या लांबीनें मापण्यायोग्य झाले आहेत. (ते शीर्ष्णः परि) तुझ्या मस्तकावर (असिताः केशाः) काळे केंस (नडाः इव वर्धन्तां) एक प्रकारच्या गवताप्रमाणें वाढोत. [२]

हे औषधे ! (मूलं दृंह) केंसांचीं मुळें मजबूत कर, (अग्रं वि यच्छ) अग्रभाग सारखे कर आणि (मध्यं यामय) मधल्या भागाचें नियमन कर. (ते शीर्ष्णः परि) तुझ्या मस्तकावर (असिताः केशाः नडाः इव वर्धताम्) काळे केंस एक प्रकारच्या गवताप्रमाणें पुष्कळ वाढोत. [३]

वरील केशवर्धक औषधींच्या रसाच्या उपयोगानें केंस पुष्कळच वाढतात. पाण्याच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें गवत पुष्कळ वाढतें त्याप्रमाणें केंस वाढतात. आणि केंसांचीं मुळें सुदृढ होतात. त्यामुळें ते तुटत नाहींत. अथवा गळून पडत नाहींत. ही तीच केशवर्धक औषधि आहे जिचें वर्णन या पूर्वींच्या सूक्तांत आलें आहे. या औषधीचा शोध व्हावयास हवा, कारण ती अद्याप अज्ञात आहे.

केशवर्धक औषधि

कांड ६, सूक्त २१

(ऋषिः – शन्तातिः । देवता – चन्द्रमाः ।)

इमा यास्तिस्रः पृथिवीस्तासां ह भूमिरुत्तमा । तासामधि त्वचो अहं भेषजं समु जग्रभम् ॥ १ ॥
श्रेष्ठमसि भेषजानां वसिष्ठं वीरुधानाम् । सोमो भग इव यामेषु देवेषु वरुणो यथा ॥ २ ॥

अर्थ— (इमाः याः तिस्रः पृथिवीः) हे जे तीन लोक आहेत, (तासां भूमिः उत्तमा) त्यांत ही भूमि उत्तम आहे. (तासां त्वचः अधि) त्यांत कातडीविषयीं म्हणाल तर (भेषजं अहं उ सं जग्रभं) ही औषधि मीं प्राप्त केली आहे. [१]

(भेषजानां श्रेष्ठं असि) औषधींत ही श्रेष्ठ आहे. (वीरुधानां वसिष्ठं) वनस्पतींना ती वसविणारी म्हणजेच श्रेष्ठ आहे. (यथा यामेषु देवेषु) ज्याप्रमाणें चालणाऱ्या देवांत (सोमः भगः वरुणः) सोम, भग आणि वरुण श्रेष्ठ आहेत. [२]

*

रेवतीरनाधृषः सिषासवः सिषासथ । उत केशदृंहणीरथो ह केशवर्धनीः ॥ ३ ॥

अर्थ— हे (रेवतीः अनाधृषः सिषासवः) सामर्थ्ययुक्त, हिंसाविरहित आणि आरोग्य देणाऱ्या रेवती औषधे ! (सिषासथ) आरोग्य देण्याची इच्छा कर. (उत केशदृंहणीः स्थ) आणि केसांना सुदृढ करणारी हो. (अथो ह केशवर्धिनीः) आणि केस वाढवणारी हो ! [३]

' रेवती ' औषधि केंस वाढवणारी आणि केसांना सुदृढ करणारी आहे. ती कातडीच्या रोगांना सुद्धां उत्तम आहे, म्हणून तिचा शोध व्हावयास हवा.

अरुंधती औषधि

कांड ६, सूक्त ५९

(ऋषिः - अथर्वा । देवता - रुद्रः, मन्त्रोक्ताः ।)

अनडुद्भ्यस्त्वं प्रथमं धेनुभ्यस्त्वमरुन्धति । अधेनवे वयसे शर्म यच्छ चतुष्पदे ॥ १ ॥

शर्म यच्छत्वोषधिः सह देवीररुन्धती । करत्पयस्वन्तं गोष्ठमयक्ष्माँ उत पूरुषान् ॥ २ ॥

विश्वरूपां सुभगामच्छावदामि जीवलाम् । सा नो रुद्रस्यास्तां हेतिं दूरं नयतु गोभ्यः ॥ ३ ॥

अर्थ— हे (अरुंधति) अरुंधति औषधि ! (त्वं अनडुद्भ्यः) तू बैलांना (त्वं धेनुभ्यः) तूं गाईचें तसेंच तूं (चतुष्पदे अधेनवे वयसे) चार पायांच्या गायी व्यतिरिक्त इतर पशूंना आणि पक्षांना (प्रथमं शर्म यच्छ) प्रथम सुख दे. [१]

(अरुंधती ओषधिः देवीः सह) अरुंधती नांवाची औषधि सर्व अन्य दिव्य औषधींसह (शर्म यच्छतु) सुख देवो. तसेंच (गोष्ठं पयस्वन्तं) गोशालेला पुष्कळ दूध देणारी आणि (उत पुरुषान् अयक्ष्मान् करत्) मनुष्यांना रोगरहित करो. [२]

(विश्वरूपां सुभगां जीवलां अच्छ आवदामि) नानारूपी भाग्यशालिनी जीवला औषधींविषयीं उत्तम वचन सांगतों, स्तुति करतों. (रुद्रस्य अस्तां हेतिं) रुद्रानें फेंकलेल्या रोगादि शस्त्रांना (नः गोभ्यः दूरं नयतु) आमच्या पशूंपासून दूर घेऊन जा. त्यांना निरोगी करा. [३]

भावार्थ— अरुंधती नांवाची औषधि गाय बैल इत्यादि चतुष्पाद आणि पक्षी वगैरे द्विपाद जनावरांना निरोगी करते आणि सुख देते. [१]

अरुंधती तसेंच अन्य औषधि सुख देणारी आहे. तिच्यामुळें गायी जास्त दूध देणाऱ्या होतात, आणि सर्व प्राणी निरोगी होतात. [२]

अनेक रंगारूपाच्या या जीवन देणाऱ्या जीवला औषधीची मीं स्तुति करतों. पशुपक्षी तसेंच मनुष्य यांना होणारे रोग तिच्यामुळें बरे होवोत. [३]

अरुंधती

' अरु ' चा अर्थ संधिस्थान म्हणजे शरीरांतले सांधे, जोडणें, असा आहे. या स्थानांच्या रोगांना बरी करणारी ती ' अरुंधती ' होय. हल्लीं तिचें काय नांव आहे माहित नाहीं. तें शोध करून नक्की केलें पाहिजे. ही औषधि गाईंना चारली असतां त्या जास्त दूध देतात. तिचें सेवन जो मनुष्य करतो त्यास यक्ष्मा (क्षय) सारखे रोग होत नाहींत. ' जीवला ' औषधि तशीच उपयोगी आहे. कदाचित् जीवला आणि अरुंधती हीं नांवें एकाच वनस्पतीचीं असतील. हा संशोधनाचा विषय आहे.

वाजीकरण

कांड ६, सूक्त ७२

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – शेपोऽर्कः ।)

यथासितः प्रथयते वशाँ अनु वपूंषि कृण्वन्नसुरस्य मायया ।
एवा ते शेपः सहसायमर्कोऽङ्गेनाङ्गं संसमकं कृणोतु ॥ १ ॥

यथा पसस्तायादरं वातेन स्थूलभं कृतम् । यावत्परस्वतः पसस्तावत्ते वर्धतां पसः ॥ २ ॥

यावदङ्गीनं पारस्वतं हास्तिनं गार्दभं च यत् । यावदश्वस्य वाजिनस्तावत्ते वर्धतां पसः ॥ ३ ॥

अर्थ—(यथा असितः) ज्याप्रमाणें बंधनरहित मनुष्य **(असुरस्य मायया वपूंषि कृण्वन्)** आसुरी मायेनें भिन्न देह करीत **(वशान् अनु प्रथयते)** स्वतःच्या पार्श्व बाजू ताब्यांत ठेऊन पसरतो, **(एवा ते अयं शेपः)** त्याप्रमाणें तुझ्या शरीरांगाला **(सहसा अंगेन अङ्गं सं समकं अर्कः कृणोतु)** बलासह एका अवयवानें दुसऱ्या अवयवासारखा असल्यानें हा अर्चनीय आत्मा पुष्ट करतो. [१]

(यथा पसः वातेन तायादरं स्थूलभं कृतं) ज्याप्रमाणें शरीराचें अंग वातानें संतानोत्पत्तीला योग्य पुष्ट करण्यांत येतें आणि **(यावत् परस्वतः पसः)** ज्या प्रकारचें पूर्ण पुरुषाचें शरीरांग असतें **(तावत् ते पसः वर्धतां)** तसें तुझें शरीरांग वाढो. [२]

(यावत् अंगीनं पारस्वतं) ज्याप्रमाणें सुदृढ शरीराच्या पूर्ण पुरुषाचें आणि जसें **(यावत् हास्तिनं गार्दभं अश्वस्य वाजिनः)** हत्ती, घोडा आणि गाढवाचें शरीरांग असतें **(तावत् ते पसः वर्धतां)** तसें तुझें शरीरांग वाढो. [३]

शरीरांग सुदृढ आणि संतानोत्पत्ति कार्यासाठीं योग्य व्हावें. पुरुष हीनांग असूं नये, परंतु दृढांग असावा. या सूक्ताचें अधिक स्पष्टीकरण करण्याची जरूरी नाहीं.

स्त्री-पुरुषांची वृद्धि

कांड ६, सूक्त ७८

(ऋषिः – अथर्वा । देवता – १-२ चन्द्रमा, ३ त्वष्टा ।)

तेन भूतेन हविषायमा प्यायतां पुनः । जायां यामस्मा आवाक्षुस्तां रसेनाभि वर्धताम् ॥ १ ॥
अभि वर्धतां पयसाभि राष्ट्रेण वर्धताम् । रय्या सहस्रवर्चसेमौ स्तामनुपक्षितौ ॥ २ ॥

अर्थ— (तेन भूतेन हविषा) त्या केलेल्या हवीनें **(अयं पुनः आप्यायतां)** हा वारंवार पुष्ट होवो. **(यां जायां अस्मै अवाक्षुः)** ज्या स्त्रीनें त्याच्याशीं विवाह केला आहे **(तां रसेन अभिवर्धतां)** तिला सुद्धां रसानें पुष्ट करो. [१]

(पयसा अभिवर्धतां) दूध पिऊन पुष्ट व्हावें. **(राष्ट्रेण अभिवर्धतां)** राष्ट्रासह प्रगति करावी. **(सहस्र-वर्चसा रय्या)** सहस्र तेजयुक्त धनानें **(इमौ अनुपक्षितौ स्तां)** हे दोन्ही पतिपत्नी सदा भरपूर होवोत. [२]

भावार्थ— या वैवाहिक यज्ञानें हा पति वृद्धि पावो आणि ज्या कारणानें ही स्त्री विवाहांत त्याला देण्यांत आली आहे त्या कारणासाठीं विविध रसांनीं हा पति तिला पुष्ट करो. [१]

दोघां पतिपत्नींनीं दूध पिऊन पुष्ट व्हावें. स्वतःच्या राष्ट्राच्या उन्नतिसह त्यांनी सुद्धां उन्नत व्हावें, आणि त्यांच्याजवळ नेहमीं हजार तेजानें युक्त धन भरपूर असावें. [२]

त्वष्टा जायामजनयत्त्वष्टास्यै त्वां पतिम् । त्वष्टा सहस्रमायूंषि दीर्घमायुः कृणोतु वाम् ॥ ३ ॥

अर्थ — (त्वष्टा जायां अजनयत्) जगद्रचित्या देवानें स्त्रीला उत्पन्न केलें आहे, आणि (त्वष्टा अस्यै त्वां पतिं) त्याच ईश्वरानें तिच्यासाठीं तुला पति म्हणून निर्माण केलें आहे. (त्वष्टा वां सहस्रं आयूंषि) रचयिता ईश्वर तुम्हां दोघांस हजारों वर्षांचें आयुष्य देऊन (दीर्घ आयुः कृणोतु) दीर्घायु करो. [३]

भावार्थ— ईश्वरानें ज्याप्रमाणें स्त्रीची उत्पत्ति केली आहे त्याचप्रमाणें त्या स्त्रीसाठीं पतीची उत्पत्तिसुद्धां केली आहे. तो ईश्वर त्यांना दीर्घायु करो. [३]

गृहस्थाची पुष्टि

पति आणि पत्नी यांनीं घरांत बरोबर राहून एकमेकांच्या पुष्टीचा आणि उन्नतीचा विचार करावा. परस्परांच्या नाशाचा विचार करूं नये. विशिष्ट गुणधर्मांनीं परमेश्वरानें स्त्री त्याचप्रमाणें पुरुष उत्पन्न केला आहे. म्हणून दोघांनीं परस्परांच्या सहकार्यानें एकदुसऱ्यास साहाय्य करून परस्परांची उन्नति करण्यास प्रवृत्त व्हावें.

चहा, कॉफी, तंबाखु, मद्य वगैरे त्यांनीं पिऊं नये, परंतु गाईचें दूध आवश्यकतेप्रमाणें प्यावें. दूध पिऊन पुष्ट व्हावें, म्हणजे त्यांच्या शरीराची पुष्टि दुधानेंच व्हावी. याप्रमाणें स्त्री पुरुष दोघांनीं धनादि पदार्थ मिळवावेत, आणि सुखा-समाधानानें भरपूर रहावें. स्त्रीपुरुष दोघांनीं परस्परांची पूर्णता करीत दीर्घायु प्राप्त करावें आणि सुखी व्हावें.

स्त्री-चिकित्सा

कांड ७, सूक्त ३५

(ऋषिः – अथर्वा । देवता – जातवेदाः ।)

प्रान्यान्त्सपत्नान्त्सहसा सहस्व प्रत्यजातान् जातवेदो नुदस्व ।
इदं राष्ट्रं पिपृहि सौभगाय विश्वे एनमनु मदन्तु देवाः ॥ १ ॥
इमा यास्ते शतं हिराः सहस्रं धमनीरुत । तासां ते सर्वासामहमश्मना बिलमप्यधाम् ॥ २ ॥
परं योनेरवरं ते कृणोमि मा त्वा प्रजाभि भून्मोत सूनुः ।
अस्वं१ त्वाप्रजसं कृणोम्यश्मानं ते अपिधानं कृणोमि ॥ ३ ॥

अर्थ— (अन्यान् सपत्नान् सहसा प्रसहस्व) दुसऱ्या शत्रूंना बळानें दाबून टाक. हे (जातवेदाः) ज्ञान प्रकाशका ! (अजातान् प्रति नुदस्व) अजून झाले नाहींत परंतु भविष्यकाळीं होतील अशा शत्रूंना दूर कर (इदं राष्ट्रं सौभगाय पिपृहि) या राष्ट्रास उत्तम समृद्धिसाठीं परिपूर्ण कर. (विश्वे देवाः एनं अनु मदन्तु) सर्व देव त्याला अनुमोदन देवोत. [१]

(याः ते इमाः शतं हिराः) ज्या या तुझ्या शंभर नाड्या आहेत, (उत सहस्रं धमनीः) आणि हजारों धमन्या आहेत, (ते तासां सर्वासां बिलं) त्या सर्वांचीं छिद्रें (अहं अश्मना अपि अधां) मीं दगडानें बंद करतों. [२]

(ते योनेः परं) तुझ्या गर्भस्थानापासून ज्या दूर आहेत त्यांना (अवरं कृणोमि) मीं जवळ आणतों, (प्रजा उत सूनुः) संतति अथवा पुत्र (त्वा मा अभिभूत) तुझा तिरस्कार न करो. (त्वा अस्वं प्रजसं कृणोमि) तुला असुयुक्त म्हणजे प्राणांसहित जीवंत पुत्र देतो आणि मी (अश्मानं ते अपिधानं कृणोमि) दगडानें तुझें आवरण करतों. [३]

या सूक्तांत स्त्रीचिकित्सेचा विषय सांगितला आहे. विशेषतः योनिचिकित्सेचा महत्त्वपूर्ण विषय आहे. हें सूक्त फार अस्पष्ट आणि अर्थ लावण्यास कठिण आहे. त्यामुळें त्याचें योग्य स्पष्टीकरण आम्ही करूं शकत नाहीं. योनिस्थानांतील शेंकडों नाड्यांचीं छिद्रें

बंद करण्याचें विधान दुसऱ्या मंत्रांत आहे. त्यावरून स्त्रियांच्या प्रमेह वगैरे सारख्या रोगांना दूर करण्याचें तात्पर्य येथें आहे असें वाटतें. रक्तस्राव दूर करण्याचें साधन (अश्मा) दगड सांगितला आहे. हा कोणत्या जातीचा दगड असावा त्याचा शोध वैद्यांनी केला पाहिजे. हा अशा प्रकारचा दगड असावा की जो घावावर लावला असता रक्तप्रवाह बंद करतो, आणि रोग्यास तात्काळ आरोग्य देतो. तिसऱ्या मंत्रांतहि या दगडाचा उल्लेख आहे. घावावर हा दगड झांकणासारखा ठेवावयाचा आहे. हें एवढ्यासाठीं सांगितलें कीं एखादे वेळीं घावावर दगड ठेवून रक्तस्राव बंद न झाला तर तो औषधि दगड त्या घावावर झांकणासारखा पुष्कळ वेळपर्यंत बांधून ठेवावयाचा असेल.

तुरटीचा दगड लहानसहान जखमांवर लावण्यानें रक्तस्राव बंद होतो, असा अनुभव आहे. त्या जातीचाच हा दगड असावा. तो स्त्रियांच्या योनिस्थानांतील रक्तप्रवाह बंद करणारा आहे असें येथें सांगितलें आहे.

तिसऱ्या मंत्रांत अपत्य न होणाऱ्या स्त्रीच्या योनिस्थान आणि गर्भाशयाच्या नाड्या आणि धमन्यांचें स्थान बदलून टाकण्याचा उल्लेख आहे. याप्रमाणें स्थान बदलण्यानें स्त्रीला संतति होते. स्त्री आणि पुरुष संतति होते. याप्रमाणें त्या धमन्यांचें स्थान बदलण्यानें त्या स्त्रीची संतति मातेचा तिरस्कार करीत नाहीं. (प्रजा मा अभि भूत) असें मंत्राचें वाक्य आहे. प्रजा अथवा संततिकडून तिरस्कार होण्याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, त्या स्त्रिला संतति होत नाहीं. जो ज्याचा तिरस्कार करतो तो त्याचेजवळ जात नाहीं. येथें संतान तिचा तिरस्कार करतें असें सांगितलें आहे यावरून त्या स्त्रीला संतति होत नाहीं ही गोष्ट सिद्ध होते. अशा वांझोट्या स्त्रीला (अस्-वं प्रजसं कृणोमि) प्राणयुक्त प्रजा मीं करतों. प्रथम सांगितल्याप्रमाणें धमन्यांचा प्रवाह बदलल्यामुळें वंध्येला सुद्धां प्रजा होते. 'अस्व' शब्द 'अस-वन् = असु-वान्' प्राणयुक्त या अर्थानें येथें वापरला आहे. येथें 'अश्व' असाहि पाठ आहे. तो पाठ घेतला असतां बलवान् असा अर्थ होईल

वंध्या दोन प्रकारच्या असतात. एकीस संतान होत नाहीं आणि दुसरीस संतति होऊन मरून जाते. या दोन्ही प्रकारच्या वंध्या स्त्रियांच्या योनींतील नाड्यांचा प्रवाह बदलण्यामुळें त्या संतानोत्पत्ति करण्यास समर्थ होऊं शकतील असा संभव येथें सांगितला आहे. शस्त्रवैद्यांनीं याचा विचार करावा. हा विषय शस्त्रक्रिया करणाऱ्या कुशल डॉक्टरांचा आहे, म्हणून या विषयीं विचार करणें त्यांचें काम आहे.

उत्तम गृहिणी स्त्री

कांड ४, सूक्त ३८

(ऋषिः - बादरायणिः । देवता - अप्सराः, ऋषभः ।)

उ॒द्भि॒न्द॒तीं सं॒जय॑न्तीमप्स॒रां सा॑धुदे॒विनी॑म् । ग्लहे॑ कृ॒तानि॑ कृ॒ण्वा॒नाम॑प्स॒रां ता॒मि॒ह हु॑वे ॥ १ ॥
वि॒चि॒न्व॒तीमा॒कि॒रन्ती॑मप्स॒रां सा॑धुदे॒विनी॑म् । ग्लहे॑ कृ॒तानि॑ गृह्णा॒नाम॑प्स॒रां ता॒मि॒ह हु॑वे ॥ २ ॥

अर्थ— (उद्भिन्दतीं साधुदेविनीं) शत्रूंना उखडून टाकणारी, उत्तम व्यवहार करणारी आणि (संजयन्तीं अप्सरां) उत्तम विजय प्राप्त करणाऱ्या रूपवती स्त्रीला तसेंच (ग्लहे कृतानि कृण्वानां तां अप्सरां) स्पर्धेच्या प्रसंगीं उत्कृष्ट कर्में करणाऱ्या त्या स्त्रीला (इह हुए) मीं येथें बोलावितों. [१]

(विचिन्वतीं आकिरन्तीम्) संग्रह करणारी आणि वांटून टाकणारी (साधु-देविनीं अप्सरां) उत्तम व्यवहार करणाऱ्या स्त्रिला तसेंच (ग्लहे कृतानि गृह्णानां तां अप्सरां) स्पर्धेच्या समयीं उत्कृष्ट कार्य करणाऱ्या त्या स्त्रीला मीं येथें बोलावितों. [२]

भावार्थ— शत्रूंना एका बाजूस सारून प्रगति साधणारी म्हणजे स्वतःची उन्नति करून घेणारी, उत्तम व्यवहार दक्ष, विजयी आणि स्पर्धेच्या प्रसंगीं स्वतःचें कर्तव्य उत्तम रीतीनें पार पाडणारी अशा स्त्रीला आम्हीं येथें बोलावितों. [१]

योग्यसमयीं संग्रह करणारी आणि योग्यसमयीं सत्पात्र पाहून दान करणारी, योग्यप्रसंगीं व्यय करणारी, उत्तम, व्यवहारदक्ष, तसेंच स्पर्धेच्या वेळीं स्वतःचें कर्तव्य उत्तम रीतीनें साध्य करणाऱ्या स्त्रीला आम्हीं येथें बोलावितों. [२]

यार्यैः परिनृत्यंत्यादुदाना कृतं ग्लहात् । सा नंः कृतानि सीषती प्रहामांप्नोतु मायया ।
सा नः पर्यस्वत्यैतु मा नो जैषुरिदं धनंम् ॥ ३ ॥
या अक्षेषुं प्रमोदंन्ते शुचं क्रोधं च बिभ्रंती । आनन्दिनीं प्रमोदिनींमप्सरां तामिह हुवे ॥ ४ ॥
सूर्यस्य रश्मीननु याः संचरंन्ति मरीचीर्वा या अनुसंचरंन्ति ।
यासांमृषभो दूरतो वाजिनीवान्त्सद्यः सर्वांन् लोकान्पर्यैति रक्षंन् ।
स न ऐतु होममिमं जुषाणोऽन्तरिक्षेण सह वाजिनीवान् ॥ ५ ॥
अन्तरिक्षेण सह वाजिनीवन्कर्कीं वत्सामिह रक्ष वाजिन् ।
इमे ते स्तोका बहुला एह्यर्वाङियं ते कर्कीह ते मनोऽस्तु ॥ ६ ॥

अर्थ—(या अर्यैः ग्लहात् कृतं आददाना) जी शुभ धर्मकृत्यामधून स्पर्धेनें चांगलीं कृत्यें स्वीकारते, (सा नः कृतानि सीषति) ती आमच्या कृत्यांस नियमबद्ध करून (मायया प्रहां आप्नोतु) स्वतःच्या कुशल बुद्धीनें प्रगति प्राप्त करो. (सा पयस्वती नः आ एतु) ती अन्नयुक्त उत्तम स्त्री आमच्याजवळ येवो. (नः इदं धनं मा जैषुः) आमचें हें धन दुसरा कोणी घेऊन न जावो. [३]

(शुचं क्रोधं च बिभ्रती) शोक आणि क्रोध धारण करणारी, (या अक्षेषु प्रमोदन्ते) आणि असें असूनहि जी नजरेंत आनंदाची वृत्ति धारण करते, (तां आनन्दिनीं प्रमोदिनीं अप्सरां) आनंद आणि उत्साह देणाऱ्या त्या रूपवती स्त्रीला (इह हुए) मीं येथें बोलावितों. [४]

(याः सूर्यस्य रश्मीन् अनुसंचरन्ति) जी सूर्य किरणांत सहजतेनें हिंडते, फिरते, (वा याः मरीचीः अनुसंचरन्ति) अथवा जी सूर्य प्रकाशांत हिंडते फिरते; (वाजिनीवान् ऋषभः) बळवान् श्रेष्ठ पुरुष (दूरतः सद्यः यासां सर्वान् लोकान् रक्षन् पर्येति) दूरुनच त्वरीत सर्व लोकांचें रक्षण करीत चारी बाजूंनीं घेरून येतो. (सः वाजिनीवान्) तो बलशाली पुरुष (इमं होमं जुषाणः) या यज्ञाचा स्वीकार करीत, (अन्तरिक्षेण सह नः आ एतु) आंतरिक विचारांसह आमच्यापाशीं येवो. [५]

हे (वाजिनीवन् वाजिन्) बलवान्! (अन्तरिक्षेण सह कर्कीं वत्सां) अंतःकरणपूर्वक स्वतःच्या कर्तृत्वशाली कन्येचें (इह रक्ष) येथें रक्षण कर. (इमे ते बहुलाः स्तोकाः) हा तुझा मोठा आनंद आहे. (अर्वाङ् एहि) येथें असा ये. (इह ते कर्कीं) ही तुझी कर्तृत्वशक्ति आहे. (इह ते मनः अस्तु) येथें तुझें मन स्थिर होवो. [६]

भावार्थ— जी स्पर्धेच्या वेळीं शुभ धर्मविधिप्रमाणें उत्तम कार्य करते, तसेंच कुशल बुद्धीनें जी आमच्या सर्व शुभ कर्मांची उत्तम व्यवस्था करते, ती स्वतःच्या कुशलतेनें या स्थानीं प्रगति करो. ती अन्नयुक्त स्त्री येथें राहो आणि तिच्या व्यवस्थेनें आमचें येथीलधन सुखरूप राहो. [३]

शोक अथवा क्रोध मनांत असून सुद्धां दृष्टींत आनंदाचे भाव दाखविते, ती आमचा आनंद आणि संतोष वाढवणारी स्त्री येथें येवो. [४]

जी सूर्य किरणांत व्यवहार करते अथवा सूर्यप्रकाश स्वतःच्या कार्यांस अनुकूल करून घेते, अशा स्त्रीचें रक्षण दुरून म्हणजे योग्य मर्यादा राखून सर्व पुरुषांनीं करावें. तशा बळवान् पुरुषानें स्वतःच्या जीवनाचा यज्ञ करीत स्वतःच्या हार्दिक विचारांनीं स्त्रियांचा आदर करीत येथें रहावें. [५]

हे बलवान् मनुष्य हो ! स्वतःच्या आंतरिक प्रेमानें कन्यांचें रक्षण करा. संततीचें रक्षण करणें हें आनंददायक कर्म आहे. पुढें होऊन हें कार्य करा. या कामीं तुमचें मन स्थिर होवो. [६]

अन्तरिक्षेण सह वाजिनीवन्कर्की वत्सामिह रक्ष वाजिन् ।
अयं घासो अयं व्रज इह वत्सां नि बध्नीमः । यथानाम व ईश्महे स्वाहा ॥ ७ ॥

अर्थ— हे (वाजिनीवन् वाजिन्) बलशाली ! (अन्तरिक्षेण सह कर्की वत्सां) स्वतःच्या आंतरिक विचारांसह कर्तृत्वशक्तिशाली कन्येचें (इह रक्ष) येथें रक्षण कर. तिच्यासाठीं (अयं घासः) हें गवत आहे. (अयं व्रजः) हें गाईचें स्थान आहे, (इह वत्सां नि बध्नीमः) येथें वासरांस बांधतात. (यथानाम वः ईश्महे) नांवाप्रमाणें तुमचें आधिपत्य आम्हीं करतों. (स्व-आहा) आमचें समर्पण तुम्हांसाठीं असो. [७]

भावार्थ— हे बलशाली मनुष्य हो ! स्वतःच्या आंतरिक प्रेमानें गाईच्या वासरांचें रक्षण करा. हें गवत गाई आणि त्यांचीं वासरें यांच्यासाठीं आहे. हें स्थान त्यांच्यासाठीं आहे. वासरांस येथें बांधण्यांत येतें आणि नामानुक्रमानें त्यांची उत्तम व्यवस्था ठेवण्यांत येते. त्यांच्यासाठीं आम्हीं आत्मसमर्पण करतों. [७]

उत्तम गृहिणी स्त्री

दक्ष स्त्रीचा आदर

या सूक्तांत दक्ष स्त्रीचा फार आदर केला आहे. स्त्री गृहिणी म्हटली जाते म्हणून घरची व्यवस्था उत्तम ठेवणें हें तिचें मुख्य कामच आहे. त्यांत तिनें कुशलता दाखवावी हें तिचें परम कर्तव्यच आहे. त्याविषयीं या सूक्तांत पुष्कळ उल्लेख आहेत, ते आतां आपण पाहूं—

स्त्री कशी असावी ?

(१) **संजयन्ती**- उत्तम विजय प्राप्त करणारी म्हणजे स्वतःच्या कुटुंबाच्या विजयासाठीं योग्य उपाय आचरणांत आणणारी असली पाहिजे. (मं. १)

(२) **साधुदेविनी**- ' **दिव्** ' धातुपासून ' **देविनी** ' शब्द झाला आहे. ' **दिव्** ' धातूचा अर्थ क्रीडा, विजयेच्छा, व्यवहार, प्रकाश, आनंद, गति वगैरे आहेत. म्हणजे ' **साधुदेविनी** ' शब्दाचे अर्थ क्रीडा म्हणजे खेळांत कुशल, स्वतःच्या कुटुंबाच्या विजयाची इच्छा करणारी, घरांत प्रकाशाप्रमाणें तेजस्वी होऊन रहाणारी, स्वतः आनंदी होऊन त्यामुळें कुटुंबांतील इतरांस आनंदित करणारी, आनंद देणारी, सर्वांची प्रगति साधणारी, इतक्या प्रकारें होऊं शकतो. या अर्थांचा संबंध, ' **संजयन्ती** ' शब्दाच्या अर्थाशीं आहे. ही गोष्ट वाचकांनीं पहावी. (मं. १।२।४)

(३) **उद्भिन्दती**- स्वतःच्या शत्रूंना मूळांतून उखडून टाकणारी. (मं. १) याचा अर्थ सुद्धां, ' **संजयन्ती** ' सारखाच आहे. विजयेच्छु आणि व्यवहार दक्ष असल्याकारणानें शत्रूला उखडून टाकून विजय मिळवणें या गोष्टी सहजपणें होतात. (मं. १)

(४) **ग्लहे कृतानि कृण्वाना**- ' **ग्लह** ' शब्दाचा अर्थ ' **स्पर्धा** ' आहे. आपलें संपूर्ण जीवन एक प्रकारची स्पर्धा आहे. या स्पर्धेत ' **कृत** ' म्हणजे उत्तम कृत्य अथवा उत्तम प्रयत्न करणारी. ' **कृत** ' शब्दाचा अर्थ हा आहे—

कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् । चरैव चरैव ।
(ए. ब्रा. ७।१५)

' झोंपून राहण्याचें नांव कलि, झोंप अथवा आळस सुद्धां सोडून देणें याचें नांव द्वापर, प्रयत्न करण्याच्या बुद्धीनें उठणें त्याचें नांव त्रेता आणि कृत तर त्याला म्हणतात कीं ज्या अवस्थेंत मनुष्य पुरुषार्थ करतो. ' या वचनांत ' **कृत** ' चा अर्थ दिला आहे. उन्नति साधण्यासाठीं प्रबल पुरुषार्थ करणें याचें नांव कृत आहे. समजा कीं मनुष्यजीवन एक प्रकारचा जुगार आहे. त्यांत झोंपून रहाणारा लाभ मिळवूं शकणार नाहीं, पण सर्वांत उत्तम लाभ जुगाराचें दान घेणारा मिळवूं शकतो. या जीवनरूप जुगाराचीं ' कलि, द्वापर, त्रेता आणि कृत ' अशीं चार दानें आहेत. जो भांडणतंटा करणारा अथवा झोंपून रहाणारा, आळशी आहे त्याला जीवनरूपीं जुगारांत ' कलि ' संज्ञक दान मिळेल, त्यामुळें फार मोठें नुकसान म्हणजे नाशच होईल. जे साधारण पुरुषार्थ प्रयत्न करतात त्यांना मधलीं दोन दानें मिळतात. परंतु जे प्रबळ पुरुषार्थी आहेत त्यांनाच ' **कृत** ' संज्ञक दान प्राप्त होतें. हेंच सर्व श्रेष्ठ दान आहे.

बुद्धिबळें किंवा सोंगट्या खेळणारे स्वतःच्या फाशांनीं जीं चार प्रकारचीं दानें मिळवितात त्या चार दानांचे वाचक,' कृत, त्रेता, द्वापर आणि कलि,' हे चार शब्द क्रमशः उत्तम, मध्यम, कनिष्ठ आणि हानिकारक दानाचे सूचक शब्द आहेत. वस्तुतः वेदांत, ' **अक्षैर्मा दिव्यः** । (ऋ. १०।३४।७३) जुगार खेळूं नये' या वाक्यानें जुगाराचा निषेध केलेला आहे. म्हणजे वैदिक धर्मांत जुगाराचा संभवच नाहीं. तरीहि येथें सर्व मनुष्यें स्वतःच्या जीवनाचा जुगार खेळत आहेत, त्यांत कित्येकांस तो खेळ लाभदायक ठरतो, तर कोणास तो हानिकारक होतो; म्हणून या जीवनरूपी खेळांत उत्तम प्रकारें खेळून मनुष्यानें यश मिळविलें पाहिजे. असा उपदेश करण्यासाठीं या मंत्रांत रूपक अलंकाराच्या उपयोगानें ' **ग्लह, कृत, देविनी** ' हे शब्द द्व्यर्थी योजिले आहेत. हे शब्द जुगाऱ्याचा खेळहि दर्शवितात, आणि उत्तम विजयी व्यवहारसुद्धां दाखवितात. या रूपकाचा अर्थ वर दर्शविल्याप्रमाणें आहे. त्याचा वाचकांनीं विचार करावा आणि बोध प्राप्त करावा. असो. ' **ग्लहे कृतानि कुर्वाणा** ' चा येथें अर्थ असा आहे– ' या जीवनरूपीं स्पर्धेच्या खेळांत जी स्त्री उत्तम पुरुषार्थरूपीं दान प्राप्त करते, ' म्हणजे या संसारांत परम पुरुषार्थ करणाऱ्या स्त्रीस उत्तम स्त्री म्हणावें. (मं. १२) मं. ३ मध्यें, ' **कृतं ग्लहात् आददाना** ' असा पाठ आहे. त्याचा अर्थ सुद्धां वरप्रमाणेंच होतो.

(५) **विचिन्वन्ती, आकिरन्ती**– संग्रह करणारी, दान करणारी. संग्रह करण्याच्या वेळीं योग्यप्रकारें दक्षतेनें कुशलतापूर्वक संग्रह करणारी आणि दान करण्याच्या वेळीं उदारतेनें दान करणारी. स्त्री अशी असावी कीं तिनें घरांत कुशलतापूर्वक आणि व्यवस्थित, योग्य प्रकारें वस्तूंचा संग्रह करावा आणि दान करण्याच्या प्रसंगीं घराची कीर्ति वाढेल अशा उदारतेनें दान करावें. ' **विचिन्वन्ती** ' याचा मूळ अर्थ वेंचून संग्रह करणारी आणि ' **विकिरन्ती** ' चा अर्थ विखरून टाकणारी असा आहे. हा संग्रह आणि दान करण्याचा गुण स्त्रियांमध्यें इतका असावा कीं त्यामुळें कुळाचें यश वाढावें, कधीं कमी होऊं नये. (मं. २)

(६) **या अयैः परिनृत्यति**– जी शुभ धर्मकर्मांनीं आनंदानें नाचूं लागते, म्हणजे जिचे प्रयत्न नेहमीं धार्मिक शुभ विधि करण्यासाठीं असतात. ' **अयः** ' चा अर्थ शुभ विधि असा आहे. (**अयः शुभावहो विधिः** । अमरकोश १।३।७) जिचें पूर्व कर्म आणि चालू क्रिया पण उत्तम आहेत. (मं. ३)

(७) **कृतानि सीषति**– जी उत्तम कार्यांची व्यवस्था नियमपूर्वक ठेवते. जी स्वतःच्या घरचीं कामें व्यवस्थित प्रकारें करते.

(८) **पयस्वती**– दुधानें युक्त, जिच्याजवळ बालकांना देण्यास पुष्कळ दूध आहे. (मं. ३)

(९) **या शुचं क्रोधंच बिभ्रती अक्षेषु प्रमोदन्ते**– जी शोक झाला अथवा राग आला तरीसुद्धां डोळ्यांत प्रसन्नतेचें तेज धारण करते. ' **अक्ष** ' शब्दाचा अर्थ डोळा आणि इंद्रिय असा आहे. येथें इंद्रिय अर्थ घेण्यासारखा आहे. जी स्त्री अंतरांत शोक झाला अथवा क्रोध आला तरी रडत नाहीं, बालकांना मारीत नाहीं, अथवा मोठ्यानें ओरडून बोलत नाहीं, परंतु स्वतःच्या व्यवहारांत, इंद्रियव्यापारांत प्रसन्नता दाखवते आणि हृदयाचें दुःख व्यक्त करीत नाहीं अशी स्त्री असावी. (मं. ४)

(१०) **आनन्दिनी, प्रमोदिनी**– आनंद आणि हर्षयुक्त. म्हणजे नेहमीं आनंदांत रहाणारी आणि दुसऱ्यांस प्रसन्न करण्याचा प्रयत्न करणारी. (मं. ४)

(११) **सूर्यस्य रश्मीन् अनुसंचरन्ती**– जी सूर्य किरणांत हिंडते फिरते. ' **मरीचीः अनुसंचरन्ती** ' सूर्य प्रकाशांत हिंडते फिरते, अथवा जी सूर्य प्रकाशाला स्वतःच्या कार्यास अनुकूल करून घेते आणि त्यामुळें आपलें आरोग्य वाढविते. स्त्रियांनीं सूर्य प्रकाशांत जास्त हिंडलें फिरलें पाहिजे. (यावरून पडदापद्धति अगदीं अवैदिक आहे हें सिद्ध होतें.) (मं. ५)

हीं अकरा लक्षणें उत्तम कुलवंत गृहिणीचीं सांगितली आहेत. स्त्री, धर्मपत्नी, गृहिणी, यांनीं घरांत कशा प्रकारें व्यवहार केला पाहिजे याविषयीं हें सूक्त उत्तम प्रकाश पाडित आहे. स्त्री पुरुषांनीं या लक्षणांचा विचार करून ती अंगीं बाणवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या लक्षणांत शत्रूला उखडून टाकणें, यशस्वी आणि विजयी होणें, या लक्षणांचाहि समावेश केला आहे. त्यावरून हें सिद्ध होतें कीं त्याकाळीं स्त्रियांमध्यें स्वतःचें संरक्षण करण्याची शक्ति होती. यासाठीं आताहि स्त्रियांनीं तशी शक्ति मिळविली पाहिजे, म्हणजे त्या आत्मरक्षण करूं शकतील. आत्मरक्षणासाठीं स्त्रियांनीं दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये. घरांतील कामाकाजांत कुशल, शहाण्या, निर्भय आणि स्वतःच्या कुळाचें यश वृद्धिंगत करणाऱ्या स्त्रिया असल्या पाहिजेत. हीं लक्षणें पहातां स्त्रियांस कशा प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे तें नक्की करता येईल. स्त्रियांत वर सांगितलेले गुण जेणेंकरून निर्माण होतील असें शिक्षण त्यांस द्यावें. अथवा असें म्हणा पाहिजे तर कीं, स्त्रियांत शिक्षणामुळें वरील गुणांचा विकास व्हावा. स्त्रीशिक्षणाच्या कार्यक्षेत्रांत कार्य करणाऱ्यांनीं याचा अवश्य विचार करावा.

अप्सरा

वरील गुणांनीं युक्त स्त्रीस अप्सरा म्हटलें आहे. सुंदर स्त्रीस अप्सरा म्हणतात. अप्सरा शब्दाचे पुष्कळ अर्थ आहेत, त्यांत हा सुद्धां एक अर्थ आहे. स्त्रीची सुंदरता त्यानें व्यक्त होते. गुणांच्या सुंदरतेइतकी शरीराची सुंदरता कायम सुख देऊं शकत नाहीं; म्हणून वरील गुणांनीं युक्त अशा स्त्रीस गृहिणी म्हणून आणण्याची सूचना येथें केली आहे. स्वतःसाठीं पत्नीची पसंति करणाऱ्यांनीं याचा विचार करावा आणि मनन करावें. त्यामुळें त्यांना स्वतःची गृहस्वामिनी पसंत करण्यास मदत होईल.

यापूर्वीच्या सूक्तांत '**अप्सरा**' शब्दाचा अर्थ रोग निर्माण करणारे जंतु असा केला होता, परंतु प्रस्तुत सूक्तांत तो 'सुंदर गुणवती सुशील स्त्री' असा होतो, असें पाहून वाचकांना मोठें आश्चर्य वाटेल. परंतु एकाच शब्दाचे याप्रमाणें अनेक अर्थ होऊं शकतात. याप्रकारें '**असुर**' शब्दाचा अर्थ परमेश्वरवाचक आणि राक्षसवाचक सुद्धां होतो. अशी वेदाची रीत आहे.

या सूक्ताच्या पहिल्या पांच मंत्रांत कार्यकुशल धर्मपत्नीच्या शुभ गुणांचें वर्णन आहे. तें जितकें स्त्रियांस तितकेंच पुरुषांसहि उपयुक्त आहे. त्यापासून सर्वांनींच बोध घ्यावा.

रश्मिस्नान

पांचव्या मंत्रांत, '**सूर्यरश्मीन् अनुसंचरन्ती,**' (मं. ५) सूर्याच्या किरणांत अनुकूलतेप्रमाणें हिंडण्या-फिरण्याची सूचना दोन वेळां दिली आहे. एकच विषय दोन वेळां सांगण्याचें कारण तो भारपूर्वक जास्त महत्त्वाचा असतो, हें होय. म्हणजे सूर्य किरणांत स्त्रियांनीं हिंडणें, फिरणें वेदाला संमत आहे. पुरुषांना त्यांच्या कामधंद्याच्या निमित्तानें बाहेर हिंडावें फिरावें लागतें म्हणजे त्यांना सूर्यकिरणाचें स्नान घडतें. पण स्त्रियांचा सर्व व्यवहार जास्तींत जास्त घरांतल्या घरांत होतो त्यामुळें त्या सूर्यकिरणाच्या अमृतरसापासून वंचित रहातात. म्हणून त्यांच्या आरोग्याखातर या मंत्रांत सूर्य किरणाचा उपदेश दोनदां दिला आहे.

अजून कांहीं प्रांतांत स्त्रिया पडदा पाळतात. म्हणजे वरील उपदेश त्यांना जास्त उपयुक्त आहे. गोषा अथवा पडदा पद्धति अवैदिक आहे. कारण त्यामुळें स्त्रियांना सूर्यप्रकाश मिळत नाहीं. हा दोष दूर करण्यासाठीं वेदाचा वरील उपदेश उपयुक्त आहे. त्याचा सर्व स्त्री-पुरुषांनीं विचार करावा.

स्त्रीचें रक्षण

स्त्रियांचें रक्षण व्हावयास हवें. ते दोन प्रकारें होऊं शकते. एकतर प्रथम सांगितलेले सर्व गुण जर शिक्षणद्वारां त्यांच्यांत उतरविले तर, त्या स्वतःच स्वतःचें रक्षण करण्यास समर्थ होतील, आणि स्वसंरक्षणासाठीं त्यांना परक्यावर अवलंबून रहावें लागणार नाहीं. तरीसुद्धां कित्येक असेहि प्रसंग असतात कीं ज्यावेळीं पुरुषांना त्यांचें संरक्षण करावें लागतें. अशा प्रसंगीं–

यासां सर्वान् लोकान् दूरतः रक्षन् वाजिनीवान् पर्येति । (मं. ५)

'जो स्त्रियांचें दुरूनच रक्षण करीत बलशाली पुरुष फिरत असतो.' याचें सार असें कीं पुरुषांनीं स्त्रियांचें रक्षण करण्याच्या वेळीं शिष्टाचारपूर्वक उचितपणें दूर रहावें, आणि त्यांचें रक्षण करण्याचा प्रयत्न करावा. स्त्रियांच्या समुदायांत शिरून अथवा कोणत्याहि प्रकारें त्यांचा विनयभंग होईल असें अनादरपूर्वक वर्तन करून त्यांचें रक्षण करण्याचा प्रयत्न करूं नये. ज्याप्रमाणें मोठा प्रतिष्ठित पुढारी, राजा अथवा राष्ट्रपति अथवा अन्य थोर पुरुषांचे रक्षक योग्य अंतर राखून, दूर राहून, परंतु सर्व लक्ष त्यांच्यावर ठेऊन त्यांचें रक्षण करीत असतात, त्याचप्रमाणें स्त्रियांचें रक्षणहि सुयोग्य आणि प्रतिष्ठितपणें करावें.

या आणि या नंतरच्या ६ व्या मंत्रांत '**अन्तरिक्ष**' शब्द आंतरिक भाव या अर्थी आला आहे. अंतरिक्ष लोक अंशरूपानें आपल्या शरीरांत आहे. त्यालाच अंतर, अंतरंग, अंतःकरण असें म्हणतात. येथें त्याप्रमाणें तो अंतःकरणवाचक आहे. तात्पर्य जे कांहीं काम करावयाचें तें पूर्ण मनानें, अंतःकरणपूर्वक करावें. वरवर केलेलें कार्य निष्फळ होतें, आणि मनःपूर्वक केलेलें कार्य सफल होतें. या सूचनेचा विचार वाचकांनीं अवश्य करावा. मनुष्याची उन्नति त्यानें अंतःकरणपूर्वक सद्भावनेनें केलेल्या कामानेंच होते, त्यासाठीं दुसरा मार्ग नाहीं.

वत्सां इह रक्ष । (मं. ६)

'येथें कन्येचें रक्षण कर.' पुत्रीच्या रक्षणाची व्यवस्था उत्तम व्हावयास हवी. कन्येचें रक्षण होण्यानें ती पुढें योग्य, उत्तम, सुशील धर्मपत्नी, स्त्री आणि माता होऊं शकते. हल्लीं कन्येच्या जन्मानें घरचे सर्व लोक दुःखी होतात आणि बहुंशीं कन्येच्या सुशिक्षणाचा, उन्नतीचा विचार करीत नाहींत. अशा लोकांनीं वेदाचा हा उपदेश ध्यानीं आणावा. या जगाचें अस्तित्व आणि प्रजेची उत्पत्ति स्त्रियांमुळें होत असते. स्त्रियांच्या उन्नतिमुळें संपूर्ण जगाची उन्नति होण्याचा संभव आहे. माता स्वर्गाहून श्रेष्ठ आहे. मग मातेची तिच्या बाल्यकाळांत रक्षणाची सारी व्यवस्था असली पाहिजे यांत काय शंका ?

'**वत्स**' शब्द जसा जनावरांच्या बच्चांसाठीं वापरतात तसा तो मनुष्यांच्या बालकांचा सुद्धां बोधक आहे. पुत्राला

*

वत्स आणि पुत्रीला वत्सा पुष्कळ वेळां मोठ्या प्रेमानें म्हणण्यांत येतें. म्हणून ६ व्या मंत्रांतील ' वत्सा ' शब्द मानव कन्येसाठीं आणि सातव्या मंत्रांतील ' वत्सा ' शब्द गाईच्या वांसरीस उद्देशून आहे असें मानणें योग्य होईल. सातव्या मंत्रांत वांसरांस बांधण्याची जागा, गवत, घांसचारा, इत्यादिंचें वर्णन आहे, म्हणून ' वत्सा ' शब्द गाईच्या वांसरीचा द्योतक आहे, यांत कांहीं शंका नाहीं; पण ६ व्या मंत्रांतील ' वत्सा ' शब्द मनुष्य कन्येविषयीं आहे. त्याचें सार असें की ज्याप्रमाणें मानवकन्येच्या संरक्षणाची आणि उन्नतीची व्यवस्था असली पाहिजे त्याप्रमाणें गाय, घोडा इत्यादि पाळलेल्या प्राण्यांच्या संतानाची देखरेखसुद्धां प्रयत्नपूर्वक मनानें व्हावयास हवी. ज्याप्रमाणें आपण घरच्या बालकांचें संगोपन करतों त्याप्रमाणें पशूंच्या संतानांचें पालन–पोषण करावें. त्यांच्यासाठीं उत्तम गवत असावें, पाणी पिण्यास चांगलें असावें, रहाण्याची आणि त्यांना बांधण्याची जागा स्वच्छ केलेली असावी. त्यांच्या आरोग्याकडे सुद्धां लक्ष द्यावें. थोडक्यांत पाळलेल्या जनावरांचें, त्यांच्या बच्चांचेंसुद्धां स्वतःच्या मुलांबाळां-प्रमाणें प्रेमानें संगोपन करावें.

हें सूक्त मनुष्याचें प्रेम पशुपर्यंत पोहोंचविण्याचा उपदेश देत आहे. प्रेम याप्रमाणें जितकें विस्तृत होईल तितकें अहिंसेचें क्षेत्र वाढेल. वैदिक धर्माचें अंतिम साध्य पूर्ण अहिंसक भाव मनांत स्थिर करण्याचें आहे. तें या प्रकारें सिद्ध होतें.

स्त्रियांविषयीं आदर, स्त्रियांमध्यें शुभ गुणांचा विकास करण्याची रीत, स्त्रियांचें रक्षण, कन्यांचें रक्षण आणि जनावरां-च्या बच्चांचें रक्षण, इत्यादि अनेक उपयोगी विषय या सूक्तांत दिले आहेत. वाचकांनीं या सर्व मंत्रांचें अधिक मनन करून योग्य बोध घ्यावा आणि तो स्वतःच्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न करावा.

स्त्रीच्या पातिव्रत्याचें रक्षण

कांड ५, सूक्त १७

(ऋषिः – मयोभूः । देवता – ब्रह्मजाया ।)

तेऽवदन्प्रथमा ब्रह्मकिल्बिषेऽकूपारः सलिलो मातरिश्वा ।
वीडुहरास्तप उग्रं मयोभूरापो देवीः प्रथमजा ऋतस्य ॥ १ ॥
सोमो राजा प्रथमो ब्रह्मजायां पुनः प्रायच्छदहृणीयमानः ।
अन्वर्तिता वरुणो मित्र आसीदग्निर्होता हस्तगृह्या निनाय ॥ २ ॥

अर्थ— (**अ-कू-पारः सलिलः**) खोल समुद्र, (**मातरिश्वा**) वारा (**वीडुहरा**) बलवान् तेजस्वी अग्नि (**उग्रं तपः**) कडक ताप देणारा सूर्य, (**मयो-भूः**) सुख देणारा चंद्रमा, (**देवीः आपः**) दिव्य जल, (**ऋतस्य प्रथमजाः**) सत्याचा पहिला प्रवर्तक देव (**ते प्रथमाः**) आणि पहिला देवसुद्धां (**ब्रह्म किल्बिषे अवदन्**) ब्राह्मणां-च्यासंबंधीं पाप करणाऱ्याविषयीं शपथ घालीत आहेत. [१]

(**अहृणीयमानः प्रथमः सोमो राजा**) क्रोध केल्याशिवाय पहिला सोम राजा (**ब्रह्मजायां पुनः प्रायच्छत्**) ब्राह्मणाच्या स्त्रीस पुनः परत देऊं लागला. त्यावेळीं (**वरुणः मित्रः अन्वर्तिता आसीत्**) वरुण आणि मित्र बरोबर जाणारे होते. आणि (**होता अग्निः हस्तगृह्य निनाय**) होता अग्नीला हात धरून चालवीत होता. [२]

भावार्थ— अग्नि, पाण्याचा सांठा समुद्र, वायु, तेजयुक्त सूर्य, सुख देणारा चंद्र तसेंच अन्य सर्व देव ब्राह्मणाविषयीं पाप करणाऱ्या पाप्याच्या पापाचरणाच्याविषयीं सत्य गोष्ट स्पष्ट सांगतात. [१]

सोमानें शांतिसह ब्राह्मणाची स्त्री परत दिली, त्यावेळीं वरुण आणि मित्र हजर होते आणि अग्निसुद्धां पाणिग्रहणाच्यावेळीं होता झाला होता. [२]

हस्तेनैव ग्राह्य आधिरस्या ब्रह्मजायेति चेदवोचत ।
न दूताय प्रहेया तस्थ एषा तथा राष्ट्रं गुपितं क्षत्रियस्य ॥ ३ ॥
यामाहुस्तारकैषा विकेशीति दुच्छुनां ग्राममवपद्यमानाम् ।
सा ब्रह्मजाया वि दुनोति राष्ट्रं यत्र प्रापादि शश उल्कुषीमान् ॥ ४ ॥
ब्रह्मचारी चरति वेविषद्विषः स देवानां भवत्येकमङ्गम् ।
तेन जायामन्वविन्दद्बृहस्पतिः सोमेन नीतां जुह्वं न देवाः ॥ ५ ॥
देवा वा एतस्यामवदन्त पूर्वे सप्तऋषयस्तपसा ये निषेदुः ।
भीमा जाया ब्राह्मणस्यापनीता दुर्धां दधाति परमे व्योमन् ॥ ६ ॥
ये गर्भा अवपद्यन्ते जगद्यच्चापलुप्यते । वीरा ये तृह्यन्ते मिथो ब्रह्मजाया हिनस्ति तान् ॥ ७ ॥

अर्थ—(**हस्तेन एव ग्राह्यः अस्याः आधिः**) हातानें ग्रहण करावें अशी त्याची आज्ञा आहे, (**ब्रह्मजाया इति चेत् अवोचत्**) जर ही ब्राह्मण पत्नी आहे असें सांगण्यांत आलें. (**एषा दूताय प्रहेया न तस्थे**) ही दूताकडून घेऊन जाण्यास योग्य गणली जाणार नाहीं, (**तथा क्षत्रियस्य गुपितं राष्ट्रं**) तसेंच क्षत्रियाचें राष्ट्र सुरक्षित असतें. [३]

(**विकेशी एषा तारका इति**) बंधनाशिवायची ही तारका आहे असें जिला (**ग्रामं अवपद्यमानां दुच्छुनां यां आहुः**) गांवावर कोसळणारी आपत्ति म्हणतात, त्याप्रमाणेंच (**सा ब्रह्मजाया राष्ट्रं विदुनोति**) ती ब्राह्मण स्त्री राष्ट्रांत खळबळ उडविते. (**यत्र उल्कुषीमान् शशः प्र अपादि**) जेथें उल्केसह ससा पडतो. [४]

(**ब्रह्मचारी विषः वेविषत् चरति**) ब्रह्मचारी जनतेची सेवा करीत जगांत फिरतो, (**स देवानां एकं अंगं भवति**) तो देवांचें एक अंग होतो. (**तेन बृहस्पतिः जायां अन्व विन्दत्**) त्याच्यामार्फत बृहस्पतीला स्वतःची पत्नी परत मिळाली. (**सोमेन नीतां जुह्वां न देवाः**) ज्याप्रमाणें सोमानें आणलेल्या चमसानें दिलेली आहुति देव प्राप्त करतात. [५]

(**एतस्यां पूर्वे देवाः वै अवदन्त**) याविषयीं पूर्वी देवांनीं म्हटलें आहे, आणि (**ये तपसा निषेदुः सप्त ऋषयः**) तप करण्यास बसलेल्या सातहि ऋषींनीं तसेंच म्हटलें. (**ब्राह्मणस्य अपनीता जाया भीमा**) ब्राह्मणाची पळवून नेलेली स्त्री भयंकर असते, म्हणून (**परमे व्योमन दुर्धां दधाति**) परमधामांत सुद्धां ती दुःख देणारी होते. [६]

(**ये गर्भाः अवपद्यन्ते**) जे गर्भपात होतात, (**जगत यत् च अप लुप्यते**) हिंडणाऱ्या प्राण्यांचा जो नाश होतो, (**ये वीराः मिथः तृह्यन्ते**) जे वीर परस्पर लढतात, (**तान् ब्रह्मजाया हिनस्ति**) त्यांना ब्राह्मणपत्नी मारून टाकते. [७]

भावार्थ— जी ब्राह्मणपत्नी म्हटली जाते ती पाणीग्रहणविधीनें विवाह झालेली असते. ती कोणाच्या दूतानें पळवून नेणें योग्य नाहीं. तिच्या संरक्षणामुळें राष्ट्राचें संरक्षण होतें. [३]

ज्याप्रमाणें आकाशांतील तारका अथवा उल्का एखाद्या गांवावर पडतात आणि त्यास दुश्चिन्ह अथवा अपशकुन म्हणतात, त्याचप्रमाणें ब्राह्मणस्त्रीला पळवून नेल्यानें राष्ट्राचा नाश होईल. [४]

ब्रह्मचारी विद्या पुरी करून जनतेची सेवा करीत जगांत फिरत असतो, त्याला देवाचा अंश म्हणतात. तो वर सांगितलेल्या अत्याचाराचा शोध करतो आणि ज्याची स्त्री त्याला परत करतो. [५]

तप करणारे ऋषि आणि देवता याविषयीं वारंवार सांगत आल्या आहेत कीं याप्रकारें गुरुपत्नीला पळवून नेण्यानें भयंकर नाश होतो, आणि दुसऱ्या श्रेष्ठ लोकांत सुद्धां हानी होते. [६]

राष्ट्रांत जेव्हां बालकें अकालीं मरण पावतात, आणि प्राण्यांचा मोठ्या प्रमाणांत संहार होतो, वीर आपापसांत लढतात, आणि एक दुसऱ्याचीं डोकीं फोडतात, तेव्हां समजावें कीं हा परिणाम गुरुपत्नीच्या पूर्वोक्त कष्टाच्या कारणेंच होत आहे. [७]

उत यत्पतयो दश स्त्रियाः पूर्वे अब्राह्मणाः । ब्रह्मा चेद्धस्तमग्रहीत्स एव पतिरेकधा ॥ ८ ॥
ब्राह्मण एव पतिर्न राजन्यो३ न वैश्यः । तत्सूर्यः प्रब्रुवन्नेति पञ्चभ्यो मानवेभ्यः ॥ ९ ॥
पुनर्वै देवा अददुः पुनर्मनुष्या अददुः । राजानः सत्यं गृह्णाना ब्रह्मजायां पुनर्ददुः ॥ १० ॥
पुनर्दाय ब्रह्मजायां कृत्वा देवैर्निकिल्बिषम् । ऊर्जं पृथिव्या भक्त्वोरुगायमुपासते ॥ ११ ॥
नास्य जाया शतवाही कल्याणी तल्पमा शये । यस्मिन्राष्ट्रे निरुध्यते ब्रह्मजायाचित्त्या ॥ १२ ॥
न विकर्णः पृथुशिरास्तस्मिन्वेश्मनि जायते । यस्मिन्राष्ट्रे निरुध्यते ब्रह्मजायाचित्त्या ॥ १३ ॥
नास्य क्षत्ता निष्कग्रीवः सूनानामेत्यग्रतः । यस्मिन्राष्ट्रे निरुध्यते ब्रह्मजायाचित्त्या ॥ १४ ॥
नास्य श्वेतः कृष्णकर्णो धुरि युक्तो महीयते । यस्मिन्राष्ट्रे निरुध्यते ब्रह्मजायाचित्त्या ॥ १५ ॥

अर्थ— (उत् यत् पूर्वे अब्राह्मणाः स्त्रियाः दशपतयः) ब्राह्मणापूर्वी जे निरनिराळे दहा पति स्त्रीचे असतात, (ब्रह्मा चेत् हस्तं अग्रहीत्) ब्राह्मणानें जर तिचें पाणीग्रहण केलें तर तो (स एव एकधा पतिः) एकच तिचा पति होतो. [८]

(ब्राह्मणः एव पतिः न राजन्यः न वैश्यः) ब्राह्मण एकटाच पति आहे क्षत्रिय अथवा वैश्य नव्हे. (सूर्यः पञ्चभ्यः मानवेभ्यः तत् प्रब्रुवन् एति) सूर्य पांचहि प्रकारच्या मनुष्यांना तसें सांगत चालत असतो. [९]

(देवाः वै पुनः अददुः) देवानीं पुनः दिलें. (मनुष्याः पुनः अददुः) मनुष्यांनीं पुनः दिलें, (सत्यं गृह्णानाः राजानः) सत्याचें पालन करणारे राजेसुद्धां (ब्रह्मजायां पुनः ददुः) ब्राह्मणाची स्त्री पुनः देतात. [१०]

(देवैः निकिल्बिषं कृत्वा ब्रह्मजायां पुनर्दाय) देवांनीं ब्राह्मण स्त्रीला पापरहित करून पुनः दिली (पृथिव्याः ऊर्जं भक्त्वा) पृथ्वीच्या शक्तीचे विभाग करून (उरुगायं उपासते) पुष्कळ प्रशंसा करण्यायोग्य देवतेची उपासना करतात. [११]

(यस्मिन् राष्ट्रे अचित्या ब्रह्मजाया निरुध्यते) ज्या राष्ट्रांत अज्ञानतेच्या कारणानें ब्राह्मणस्त्रीस बंधनांत ठेवतात, (अस्य शतवाही कल्याणी जाया तल्पं न आशये) त्याची शंभर संतानास जन्म देणारी कल्याण करणारी स्त्री अंथरुणावर झोंपणार नाहीं. [१२]

ज्या राष्ट्रांत अज्ञानानें ब्राह्मण स्त्री बंधनांत ठेवली जाते (तस्मिन् वेश्मनि विकर्णः पृथुशिराः न जायते) त्याच्या घरांत चांगली श्रवणशक्ति असलेला अथवा मोठ्या मस्तकांचा पुत्र होत नाहीं. [१३]

ज्या राष्ट्रांत अज्ञानानें ब्राह्मण स्त्री बंधनांत ठेवली जाते त्या राष्ट्रांत (अस्य क्षत्ता निष्कग्रीवः सूनानां अग्रतः न एति) त्या राष्ट्राचे वीर गळ्यांत सोन्याचे अलंकार धारण करून कन्यांच्या समोर जाऊं शकत नाहींत. [१४]

ज्या राष्ट्रांत अज्ञानानें ब्राह्मण स्त्री प्रतिबंधनांत पडते, त्यांत (अस्य श्वेतः कृष्णकर्णः धुरि युक्तः न महीयते) काळ्या कानाचा आणि श्वेत रंगाचा घोडा जुंवाला जोडून महत्त्व पावत नाहीं. [१५]

भावार्थ— ब्राह्मणाशिवाय भिन्न दहा पति (रक्षक) स्त्रीचे असतात, पण जेव्हां ब्राह्मण कोण्या स्त्रीचें पाणिग्रहण करतो त्यावेळीं तो एकच त्या स्त्रीचा पति होतो. त्या स्त्रीचा दुसरा पति कदापि कोणी होऊं शकत नाहीं. [८]

ब्राह्मणच फक्त एक पति आहे, क्षत्रिय अथवा वैश्य नाहीं, ही गोष्ट स्वतः सूर्यानें पंचजनांना सांगितली. [९]

देव, मनुष्य आणि राजा गुरुपत्नीला गुरुपाशीं सुरक्षित पोहोंचवितात. [१०]

ज्या राष्ट्रांत गुरुपत्नीला निष्पापपणें गुरुघरीं पोहोंचविण्यांत येतें त्या भूमीचें सत्त्व वाढतें आणि यश पसरतें. [११]

पण ज्या राज्यांत गुरुपत्नीवर प्रतिबंध असतो, त्या राज्यांत, कोणी सुवासिनी अंथरुणावर सुखानें झोंपू शकत नाहीं. [१२]

नास्य॑ क्षेत्रे॑ पु॒ष्क॒रि॒णी ना॒ण्डीकं॑ जायते॒ बिस॑म् । यस्मि॑न्रा॒ष्ट्रे नि॑रु॒ध्यते॑ ब्रह्मजा॒याचि॑त्त्या ॥ १६ ॥
नास्मै॑ पृ॒श्निं वि दु॑हन्ति॒ ये॒॑ऽस्या॒ दोह॑मु॒पास॑ते । यस्मि॑न्रा॒ष्ट्रे नि॑रु॒ध्यते॑ ब्रह्मजा॒याचि॑त्त्या ॥ १७ ॥
नास्य॑ धे॒नुः क॒ल्याणी॒ नान॒ड्वान्त्स॑हते॒ धुर॑म् । विजा॑नि॒र्यत्र॑ ब्राह्म॒णो रात्रिं॒ वस॑ति पा॒पया॑ ॥ १८ ॥

अर्थ— ज्या राष्ट्रांत ब्राह्मण स्त्री अज्ञानांच्या कारणानें बंधनांत पडते त्या राष्ट्रांत (**अस्य क्षेत्रे पुष्करिणी**) कमळानें प्रफुल्लित तलाव असत नाहींत, आणि (**बिसं आण्डिकं न जायते**) कमळाला बीजहि असत नाहीं. [१६]

ज्या राष्ट्रांत अज्ञानानें ब्राह्मण स्त्रीला प्रतिबंधनांत ठेवण्यांत येते, (**ये अस्याः दोहं उपासते**) जे गाईची धार काढण्यास बसतात त्यांना (**अस्मै पृश्निं न दुहन्ति**) गाई दूध देत नाहींत. [१७]

(**विजानिः ब्राह्मणः**) स्त्रीशिवायचा होऊन ब्राह्मण (**यत्र रात्रिं पापया वसति**) जेथें पापी बुद्धीनें रात्रीं रहातो, (**अस्य**) त्याच्या राष्ट्रांत (**न कल्याणी धेनुः**) कल्याण करणारी गाय असत नाहीं आणि (**न अनड्वान् धुरं सहते**) बैल जोंकड सहन करूं शकत नाहींत. [१८]

भावार्थ— ज्या राज्यांत गुरुपत्नीचा अपमान होतो त्या राष्ट्रांत उत्तम पुत्र होत नाहींत, सुवर्णाचे अलंकार घालून कोणी वीर कन्यांशीं खेळूं शकत नाहीं, श्याम कर्ण घोडे रथाला जोडूं शकत नाहीं, तलाव कमळांनीं प्रफुल्ल होत नाहीं, गाई दूत देत नाहींत. [१३–१७]

ज्या राष्ट्रांत गुरुपत्नीची मानहानी होते, त्याप्रमाणें धर्मपत्नी नसल्यानें त्रस्त झालेला एकटा गुरु मनांत क्रोधाचा भाव ठेवून झोंपतो, त्या राष्ट्रांत गाई कल्याण करीत नाहींत आणि बैलसुद्धां कार्यकर होत नाहींत. [१८]

स्त्रीच्या पातिव्रत्याचें रक्षण

स्त्री-चारित्र्याचें रक्षण

स्त्रीचारित्र्याचें रक्षण केलें पाहिजे असा उपदेश देणारें हें सूक्त आहे. ज्या राष्ट्रांत स्त्रीच्या चारित्र्याचें रक्षण होतें, आणि सर्व पुरुष स्त्रीच्या चारित्र्यरक्षणासाठीं तत्पर असतात त्या राष्ट्राची उन्नति होते. परंतु ज्या राष्ट्रांत स्त्रीचारित्र्याचें रक्षण होत नाहीं, तें राष्ट्र पतित होतें असा या सूक्ताचा थोडक्यांत सारांश आहे.

या सूक्तांत ब्राह्मणस्त्रीला क्षत्रियानें पळवून नेलें तर काय अनर्थ होतात त्याचें वर्णन आहे. '**वर्णानां ब्राह्मणो गुरुः**' म्हणजे सर्व वर्णांना विद्यादान देणारा तसेंच अध्यापक अथवा 'गुरु' ब्राह्मण आहे. त्यामुळें ब्राह्मणाची पत्नी सर्वांची **गुरुपत्नी** होते. ज्याप्रमाणें ब्राह्मण सर्वांस ज्ञानोपदेश देत सर्वत्र फिरतो, त्याप्रमाणें ब्राह्मणीसुद्धां सर्व स्त्रियांना स्त्रीधर्माचा उपदेश देत फिरते. गुरुपत्नीचें तें कर्तव्यच आहे. हें कर्तव्य करण्यास गुरुपत्नी जेव्हां बाहेर फिरत असेल, तेव्हां तिच्या चारित्र्याचें रक्षण सर्व लोकांनीं केलें पाहिजे. कोणी तिला प्रतिबंध करूं नये, अथवा तिचा अपमान करूं नये.

जो गुरुपत्नीचा अपमान करील तो इतर सामान्य स्त्रियांचा अपमान करण्यांत माघार घेणार नाहीं असा भाव येथें आहे. वास्तविकपणें सर्वच स्त्रियांच्या चारित्र्याचें रक्षण व्हावयास हवें, कारण त्यावरच राष्ट्राचा गौरव अवलंबून आहे. ज्या राष्ट्रांत गुरुपत्नीचें चारित्र्य अथवा पातिव्रत्य गुंडांच्या अत्याचारापासून सुरक्षित नाहीं तेथील इतर स्त्रियांच्या चारित्र्याची काय दुर्दशा असेल त्याचें वर्णनसुद्धां करणें शक्य नाहीं. म्हणून सर्व स्त्रियांच्या चारित्र्याच्या उत्कर्षाच्या दृष्टीनेंच या सूक्तांत जनतेनें गुरुपत्नीचा अपमान न करावा असें सांगितलें आहे. हें सूक्त आकाशांतील ताऱ्यांच्या गतीवर रचलेलें एक आलंकारिक वर्णन आहे. त्याचें स्पष्टीकरण आतां पहा—

बृहस्पति आणि तारा

आकाशांत बृहस्पति नांवाचा ग्रह आहे. त्याला 'गुरु' सुद्धां म्हणतात. हा फार प्रख्यात तारा आहे. वाचकांना तो रात्रीं आकाशांत दिसूं शकेल. आकाशस्थ इतर ताऱ्यांत एक 'तारा' अथवा तारका नांवाचें नक्षत्र आहे. रूपकांत त्याला गुरुची धर्मपत्नी कल्पिली आहे. तसें मानण्याचें कारण हा बृहस्पतीचा तारा या तारका नक्षत्रताऱ्याजवळ पुष्कळ काळपर्यंत रहातो, त्यामुळें त्यांना पतिपत्नी कल्पिलें आहे. बृहस्पतीचें दुसरें नांव ब्रह्मणस्पति, हें सुद्धां वेदांत येतें. त्याचा अर्थ ज्ञानी गुरु असा

असल्यानें त्याचा वर्ण ब्राह्मण मानला आहे. म्हणून त्याची धर्मपत्नी असल्याकारणानें तारा अथवा तारकेलासुद्धां ' ब्राह्मणी, गुरुपत्नी अथवा ब्रह्मजाया' असें म्हटलें आहे. अशा प्रकारें येथें एक ब्राह्मण कुटुंबाची कल्पना झाली. हा बृहस्पति देवांचा गुरु आहे, आणि जेव्हां आकाशांत रात्रीच्या वेळीं देवांची सभा भरते तेव्हां हा त्यांत विराजमान् होतो, आणि जणूं काय सर्व देवांना सल्ला देतो.

त्याचप्रकारें राजा सोमसुद्धां देवांच्या सभेंत हजर असतो. त्यावेळीं त्यास एक क्षत्रिय राजा मानलें आहे. हा क्षत्रिय राजा स्वतःच्या अधिकाराच्या धुंदींत अनेक तारागणांशीं संबंधित आहे म्हणजे अनेक स्त्रियांशीं तो संबंध ठेवतो. त्या अत्याचारामुळें त्याला क्षयरोग होतो. त्या रोगानें बिचारे राजेसाहेब क्षीण होत जातात आणि आमावस्येच्या दिवशीं तर त्यांची परिस्थिति अत्यंत वाईट असते. परंतु नंतर कांहीं उपचार केल्यावर शुक्लपक्षांत तो हळूं हळूं पुष्ट होत जातो. अशा परिस्थितींत तारेचें दर्शन होतें आणि राजाचें मन चंचल होतें. राजा स्वतःच्या शासनाधिकारानें उन्मत्त होऊन गुरुपत्नीचा गौरव अथवा आदर करण्याऐवजीं तिच्यावर अत्याचार करतो. याप्रकारें स्त्रीच्या पातिव्रत्याचा नाश केल्यानें जें पाप होतें, त्या पापाच्या कारणानें राष्ट्रांत मोठा क्षोभ निर्माण होतो. सर्व प्रजा त्रस्त होते. जेथें गुरुपत्नीचा असा अपमान, अनादर होतो, तेथें अन्य सामान्य स्त्रियांच्या पातिव्रत्याचें काय होत असेल? असा विचार करून अत्याचारी राजाचा निषेध उपस्थित ऋषिगण आणि दुसरे सदस्य देव करूं लागतात. राजा स्वतःच्या घमेंडींत विरोधक ऋषि आणि इतर देवांस दाबून टाकावयाचा प्रयत्न करतो. त्यामुळें प्रजेचा क्षोभ वाढतो. मग राजा सोमाला भान येतें कीं प्रजा आपल्यावर उलटली आहे, आणि आपणांस राज्यावरून पदच्युत करण्याचा विचार करीत आहे. म्हणून प्रजेला दाबून टाकण्यासाठीं राजा सोम असुर सेनेचें सहाय्य घेतो आणि विदेशी असुरसेनेच्या मदतीनें प्रजेला दाबून टाकण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळें प्रजेंत फार मोठा क्षोभ निर्माण होऊन मोठें युद्ध होतें. उभयपक्षीं पुष्कळ हानी झाल्यावर दोन्ही पक्षांचा आपसांत तह होतो. या तहाप्रमाणें राजा सोम गुरुपत्नीला परत करतो. त्यावेळीं वरुण आणि मित्र हे बरोबर असतात आणि अग्नि मार्गदर्शक होतो. याप्रमाणें चंद्रमाला कलंक लागून त्याच्या दुष्कृत्याचें त्याला फळ मिळतें.

सोम आणि तारेच्या संयोगानें बुधाची उत्पत्ति होते. तारा अग्नीच्या तापानें शुद्ध होऊन पुनः स्वतःच्या घरीं जाते. ही कथा बऱ्याच पुराणांतून आहे. या विस्तृत कथेचें अल्प बीज या सूक्तांत दिसतें. ज्याप्रमाणें वृत्राची कथा सूर्य आणि मेघ यांवर रचलेलें रूपक आहे, तसेंच चंद्र, तारका आणि गुरु इत्यादींवर रूपक अलंकाराच्या मदतीनें ही बोधप्रद कथा रचिली आहे. वेदांत अलंकाराचा उपयोग करून रचलेल्या अशा अनेक कथा आहेत. आणि त्यांपासून अनेक बोध प्राप्त होतात. येथें सुद्धां असा बोध मिळतो कीं, कोणी राजानें स्वतःच्या सत्तेच्या मदानें स्त्रियांवर अत्याचार करूं नये. जर करील तर परमेश्वराच्या राज्यांत राजा सोमाला ज्याप्रमाणें कायम कलंकित व्हावें लागलें त्याप्रमाणें दंड शिक्षा मिळेल. राजा सोमाचा अपमान झाला, कलंक लागला, क्षय झाला, रोगी व्हावें लागलें, राज्यांत विद्रोह झाला, बंड झालें आणि आणखी किती निरनिराळ्या आपत्ति आल्या तें सांगतां येणार नाहीं. जर एवढ्या समर्थशाली राजा सोमाची अशी दशा झाली तर लहान पार्थिव राजांची काय दशा होईल? आणि जर राजाची अशी दुर्दशा तर जर प्रजाजनांपैकीं कोणीं असें दुष्कर्म करील तर त्याची केवढी दुर्गति होईल, किती वाईट स्थिति होईल? असा विचार मनांत करून प्रत्येक मनुष्यानें स्त्रीच्या पातिव्रत्याचें रक्षण करणें योग्य आहे. फक्त गुरुपत्नीच्याच पातिव्रत्याची ही गोष्ट नव्हे पण संपूर्ण स्त्री जातीच्या पातिव्रत्यरक्षणाचा येथें उपदेश आहे. गुरुपत्नी येथें केवळ उपलक्षण आहे.

ज्या राष्ट्रांत स्त्रियांच्या पातिव्रत्याचें उत्तम रक्षण होतें आणि त्यांना वाटेल तिकडे सुखानें हिंडतां फिरतां येतें, कोणत्याहि प्रकारचा अपमान अथवा अत्याचाराचा संभव असत नाहीं तें राष्ट्र उन्नति प्राप्त करतें, तें राष्ट्र अत्यंत सुरक्षित म्हटलें पाहिजे.

न दूताय प्रहया तस्थ एषा
राष्ट्रं गुपितं क्षत्रियस्य ॥ (मं. ३)

ही स्त्री दूतानें नेण्यास योग्य नाहीं म्हणजे कोणाचा दूत असें भयानक कर्म करण्याचें साहस या राष्ट्रांत न करो. असेंच राष्ट्र सुरक्षित असतें. म्हणजे ज्या राष्ट्रांत स्त्रियांवर अत्याचार होतात तें राष्ट्र सज्जनांना रहाण्यास लायक नाहीं.

' ज्या राष्ट्रांत स्त्रियांवर अत्याचार होतात, त्यामुळें गर्भपात होतात, प्राणि अकालीं मरतात आणि वीरपुरुष आपसांत लढतात.' (मं. ७) यासाठीं स्त्रियांची सुरक्षितता आवश्यक आहे.

क्षत्रिय आणि वैश्यांत नियोग पद्धतीच्या कारणें आणि शूद्रामध्यें पुनर्विवाह पद्धतीमुळें एकानंतर दुसरा अशी दहापर्यंत पतींची संख्या होऊं शकते. परंतु ब्राह्मणांसाठीं नियोग-पुनर्विवाह पद्धति उचित गणलेली नाहीं. त्यामुळें ब्राह्मणस्त्रीशीं ब्राह्मणपतीचा एकदां विवाह झाल्यावर दुसरा पति असूं अथवा होऊं शकत नाहीं. कारण कीं ब्राह्मणांनीं भोगांत फसूं नये, वगैरे विषय आठव्या मंत्रांत पहाण्यासारखे आहेत. बाकी मंत्रांत स्त्रीवर

अत्याचार केल्यानें राष्ट्राची जी दुर्दशा होते तिचें वर्णन आहे. त्यामुळें त्याचा अधिक विचार करण्याची जरुरी नाहीं.

या सूक्तांत इतरहि कित्येक बोध प्राप्त होण्यासारख्या गोष्टी आहेत. सर्वांत प्रथम घेण्यासारखा बोध हा कीं राजानें स्वतःचें आचरण अत्यंत निर्दोष ठेवलें पाहिजे. पुष्कळ स्त्रियांशीं विवाह करणें अथवा परस्त्रीशीं कुकर्म करणें हें तर अगदींच वाईट. पुष्कळ पत्न्यांशीं विवाह केल्यानें प्रथमच जें संकट येतें तें ब्रह्मचर्य नाश आणि वीर्यनाशाच्या कारणानें क्षयरोग होण्याचा संभव आहे. शरीरांत जोपर्यंत भरपूर वीर्य आहे तों पावेतों क्षयरोग होऊं शकत नाहीं, वीर्यदोष उत्पन्न झाल्यानें क्षयरोग होतो, आणि अंतीं मृत्यु निश्चित आहे. राजाचे आचारविचार पाहून त्याची प्रजा त्याप्रमाणें वर्तते. ही तर राजावर फार मोठी जबाबदारी आहे. जर राजाच बिघडला तर तें सर्व राष्ट्र बिघडून जाऊन त्याचा नाश ठरलेलाच. म्हणून थोर लोकांनीं स्वतःचे आचार-विचार धर्मानुकूल ठेवले पाहिजेत. राजाजवळ सत्ता आहे म्हणून अधिकारमदानें तिचा दुरुपयोग करूं नये. राजाला प्रजेचें कल्याण करण्यासाठीं अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराचा उपयोग स्वार्थी बुद्धीनें स्वतः भोग भोगण्यासाठीं राजा जर करील तर तो दोषी ठरेल. यासाठीं राजानें समजावें कीं, माझ्यावर निरीक्षण करणारा परमेश्वर बसलेला आहे. म्हणून मीं कोणतेंहि अकार्य न करावें. याप्रकारें विचारी राजानें स्वतःचा आचार व्यवहार सुधारावा आणि योग्य व्यवस्थेनें संपूर्ण राष्ट्राचा उद्धार करावा.

काम

कांड ९, सूक्त २

(ऋषिः - अथर्वा । देवता - कामः ।)

सपत्नहनमृषभं घृतेन कामं शिक्षामि हविषाज्येन ।
नीचैः सपत्नान्मम पादय त्वमभिष्टुतो महता वीर्येण ॥ १ ॥
यन्मे मनसो न प्रियं न चक्षुषो यन्मे बभस्ति नाभिनन्दति ।
तद्दुष्वप्न्यं प्रति मुञ्चामि सपत्ने कामं स्तुत्वोदहं भिदेयम् ॥ २ ॥

अर्थ—(सपत्नहनं ऋषभं कामं) शत्रूंचा नाश करणाऱ्या बलवान् कामाला मीं (हविषा आज्येन घृतेन शिक्षामि) हवि-तुपानें शिक्षित करतो. (महता वीर्येण अभिष्टुतः) मोठ्या पराक्रमानें प्रशंसित होऊन (त्वं) तूं (मम सपत्नान् नीचैः पादय) माझ्या शत्रूंना खालीं पाडून टाक. [१]

(यत् मे मनसः न प्रियं) जें माझ्या मनाला प्रिय नाहीं, (यत् मे चक्षुषः न प्रियं) जें माझ्या डोळ्यांना प्रिय नाहीं, (यत् मे बभस्ति) जें माझा तिरस्कार करतें आणि (न अभिनन्दति) मला आनंद देत नाहीं (तत् दुष्वप्न्यं) तें वाईट दुष्ट स्वप्न (सपत्ने प्रति मुञ्चामि) शत्रूंवर सोडतों. (अहं कामं स्तुत्वा) मीं कामाची स्तुति करून (उत् भिदेयं) वर उठतों. [२]

भावार्थ— काम (इच्छा, संकल्प) हा फार शक्तिशाली आहे आणि शत्रूंचा नाश करणारा आहे. त्याला यज्ञानें शिक्षित केला पाहिजे. तो जर मोठ्या शौर्यानें संतोषित झाला तर शत्रूंना खालीं पाडून टाकतो. [१]

जें माझ्या मनाला आणि इतर इंद्रियांना अप्रिय आहे, जें मला आनंद देत नाहीं, जें माझा तिरस्कार करतें तें दुष्ट स्वप्न माझ्या शत्रूंकडे जावो. मीं या संकल्पशक्तीनें उन्नत होईन. [२]

दुष्वप्न्यं काम दुरितं च कामाप्रजस्तामस्वगतामवर्तिम् ।
उग्र ईशानः प्रति मुञ्च तस्मिन्यो अस्मभ्यमंहूरणा चिकित्सात् ॥ ३ ॥
नुदस्व काम प्र णुदस्व कामावर्तिं यन्तु मम ये सपत्नाः
तेषां नुत्तानामधमा तमांस्यग्ने वास्तूनि निर्दह त्वम् ॥ ४ ॥
सा ते काम दुहिता धेनुरुच्यते यामाहुर्वाचं कवयो विराजम् ।
तया सपत्नान्परि वृङ्ग्धि ये मम पर्येनान्प्राणः पशवो जीवनं वृणक्तु ॥ ५ ॥
कामस्येन्द्रस्य वरुणस्य राज्ञो विष्णोर्बलेन सवितुः सवेन ।
अग्नेर्होत्रेण प्र णुदे सपत्नांछम्बीव नावमुदकेषु धीरः ॥ ६ ॥
अध्यक्षो वाजी मम काम उग्रः कृणोतु मह्यमसपत्नमेव ।
विश्वे देवा मम नाथं भवन्तु सर्वे देवा हवमा यन्तु म इमम् ॥ ७ ॥

अर्थ—हे कामा ! (दुष्वप्न्यं) दुष्ट स्वप्न, (दुरितं च) पाप आणि (अप्रजस्तां) संतान न होणें, (अ-स्वगतां) निर्धन अवस्था, (अवर्तिं) अडचणी या सर्वांना (उग्र काम) हे बलवान् कामा ! तूं (ईशानः तस्मिन् प्रतिमुञ्च) सर्वांचा स्वामी आहेस तर या सर्वांना त्यांच्यावर म्हणून सोड कीं (यः अस्माकं अंहूरणा चिकित्सात्) जे आम्हांला पापमय विपत्तींत पाडण्याचा विचार करतात. [३]

हे कामा ! (नुदस्व) त्यांना दूर कर. हे कामा ! त्यांना (प्रणुदस्व) दूर कर. (ये मम सपत्नाः) जे माझे शत्रु आहेत, (अवर्तिं यन्तु) त्यांना आपत्ति प्राप्त होवो. हे अग्ने ! (अधमा तमांसि नुत्तानां) गाढ अंधारांत पाठविलेल्या त्या शत्रूंचीं (त्वं वास्तूनि निर्दह) घरें तूं जाळून टाक. [४]

हे कामा ! (सा धेनुः ते दुहिता उच्यते) ती गाय तुझी कन्या म्हटली जाते, (यां कवयः विराजं वाचं आहुः) जिला कवि विशेष तेजस्वी वाणी म्हणतात. (ये मम) जे माझे (सपत्नान् तया परिवृङ्ग्धि) शत्रु आहेत त्यांना तिच्यापासून दूर कर. (एनान्) ते शत्रु (प्राणः पशवः जीवनं परि वृणक्तु) प्राण, पशु आणि स्वतः जीवन सोडून देवोत. [५]

(कामस्य इंद्रस्य वरुणस्य राज्ञः) काम, इंद्र, वरुणराजा यांच्या आणि (विष्णोः बलेन सवितुः सवेन) विष्णूच्या बळानें आणि सूर्याच्या प्रेरणेनें तसेंच (अग्नेः होत्रेण) अग्नीच्या हवनानें (सपत्नान् प्रणुदे) शत्रूंना दूर करतों. (इव) ज्याप्रमाणें (उदकेषु शंबी धीराः नावं) पाण्यांत धैर्यशाली नावाडी होडी चालवितो. [६]

(उग्रः वाजी कामः) पराक्रमी बलशाली काम (मम अध्यक्षः) माझा अधिष्ठाता आहे. (मह्यं असपत्नं एव कृणोतु) मला शत्रुरहित करो. (विश्वेदेवाः मम नाथं भवन्तु) सर्व देव माझे नाथ होवोत. (सर्वे देवाः मे इमं हवं आयन्तु) सर्व देव माझ्या या हवनस्थानीं येवोत. [७]

भावार्थ— दुष्ट स्वप्न, पाप, संतति न होणें, दारिद्य, संकटें इत्यादि आपत्तींत आम्हांस पाडण्याचा जे विचार करतात त्या सर्व आपत्ति आमच्या शत्रूंस प्राप्त होवोत. [३]

काम आमच्या शत्रूंस दूर करो. तो शत्रूंना घेरून टाको आणि जेव्हां शत्रु गहन अंधःकारांत पडतील तेव्हां अग्नि त्यांचीं घरें जाळून टाको. [४]

सर्व कवि म्हणतात कीं वाणी कामाची पुत्री आहे. त्या वाणीद्वारां आमचे सर्व शत्रू दूर होवोत; आणि प्राणि, पशु आणि आयुष्य (जीवन) त्यांस सोडून जावो. [५]

ज्याप्रमाणें नावाडी अगाध दर्यांत होडी चालवितो, त्याप्रमाणें देवांच्या शक्तीनें मीं शत्रूंना या भवसागरांत प्रेरित करतों. [६]

बलवान् प्रतापी काम माझा अधिष्ठाता आहे. तो मला शत्रुरहित करो. देव माझे स्वामी होवोत. सर्व देव माझ्या यज्ञांत येवोत. [७]

इदमाज्यं घृतवज्जुषाणाः कामज्येष्ठा इह मादयध्वम् । कृण्वन्तो मह्यमसपत्नमेव ॥ ८ ॥
इन्द्राग्नी काम सरथं हि भूत्वा नीचैः सपत्नान्मम पादयाथः ।
तेषां पन्नानामधमा तमांस्यग्ने वास्तून्यनुनिर्दह त्वम् ॥ ९ ॥
जहि त्वं काम मम ये सपत्ना अन्धा तमांस्यव पादयैनान् ।
निरिन्द्रिया अरसाः सन्तु सर्वे मा ते जीविषुः कतमच्चनाहः ॥ १० ॥
अवधीत्कामो मम ये सपत्ना उरुं लोकमकरन्मह्यमेधतुम् ।
मह्यं नमन्तां प्रदिशश्चतस्रो मह्यं षडुर्वीर्घृतमा वहन्तु ॥ ११ ॥
तेऽधराञ्चः प्र प्लवन्तां छिन्ना नौरिव बन्धनात् । न सायकप्रणुत्तानां पुनरस्ति निवर्तनम् ॥ १२ ॥
अग्निर्यव इन्द्रो यवः सोमो यवः । यवयावानो देवा यावयन्त्वेनम् ॥ १३ ॥

अर्थ—हे (कामज्येष्ठाः) कामाला श्रेष्ठ मानणाऱ्या देव हो ! (इदं घृतवत् आज्यं जुषाणाः) या तुपाच्या हवनाचें सेवन करणारे तुम्ही (इह मादयध्वं) येथें हर्षित व्हा आणि (मह्यं असपत्नं एव कृण्वन्तः) मला शत्रुरहित करा. [८]

हे (इन्द्राग्नी) इंद्र आणि अग्ने ! हे कामा ! तुम्ही सर्व (सरथं हि भूत्वा) समान रथावर बसणारे होऊन (मम सपत्नान् नीचैः पादयाथः) माझ्या शत्रूंना खालीं पाडून टाका. (तेषां अधमाः तमांसि पन्नानां) ते शत्रु घोर अंधारांत पडल्यानंतर हे अग्ने ! (त्वं वास्तुहि अनुनिर्दह) तूं त्यांचीं घरें जाळून टाक. [९]

(ये मम सपत्नाः) जे माझे शत्रु आहेत त्यांचा (त्वं जहि) तूं नाश कर. तसेंच (एनान् अन्धा तमांसि अवपादय) त्यांना घोर अंधारांत खालीं पाडून टाक. (सर्वे निरिन्द्रियाः अरसाः सन्तु) ते सर्व इन्द्रियरहित आणि रसहीन होवोत. (ते कतमच्चन अहः मा जीविषुः) ते एक दिवससुद्धां जिवंत न राहोत. [१०]

(मम ये सपत्नाः) माझे जे शत्रु आहेत त्यांचा (कामः अवधीत्) कामानें वध केला. तसेंच त्यानें (मह्यं एधतुं उरुं लोकं अकरत्) मला वृद्धि पावण्यास मोठें स्थान दिलें आहे. (चतस्रः प्रदिशः मह्यं नमन्तां) चारी दिशा माझ्यासमोर नम्र होवोत. (षड् उर्वीः मह्यं घृतं आवहन्तु) भूमीचे सहा भाग मजजवळ तूप घेऊन येवोत. [११]

(बन्धनात् छिन्ना नौः इव) बंधनापासून तुटलेल्या होडीप्रमाणें (ते अधराञ्चः प्र प्लवन्ताम्) ते खालीं खेचके जावोत, (सायकप्रणुत्तानां पुनः निवर्तनं न अस्ति) बाणांनीं पळविलेल्या शत्रूंचें परत येणें होऊं शकत नाहीं. [१२]

(अग्निः यवः) अग्नि हटविणारा आहे, (इंद्रः यवः) इंद्र हटविणारा आहे आणि (सोमः यवः) सोमसुद्धां हटविणारा आहे. (यवयावानः देवाः) हटविणाऱ्यांना हटविणारे देव (एनं यावयन्तु) या शत्रूला दूर करोत. [१३]

भावार्थ— काम ज्यामध्यें श्रेष्ठ आहे असे इतर देव या यज्ञांत येऊन या हवनानें आनंदित होवोत आणि मला शत्रुरहित करोत. [८]

हे इन्द्र, अग्नि आणि काम ! तुम्ही सर्व माझ्या शत्रूंचा अधःपात करा. ते अंधारांत पळून जावोत, आणि अग्नि त्यांना घेऊन जाळून टाको. [९]

माझ्या शत्रूचा तूं नाश कर. ते घोर अंधारांत पडोत. ते सर्व इंद्रियरहित आणि सत्त्वहीन होवोत, आणि एक दिवससुद्धां जीवंत न राहोत. [१०]

या कामामुळें माझे शत्रु दूर झाले आणि मला विशाल कार्यक्षेत्र प्राप्त झालें. चारी दिशांना रहाणारे लोक मजसमोर नम्र झाले आहेत आणि सर्व पृथ्वी माझ्या अधिकाराखालीं आली आहे. [११]

बंधनापासून सुटलेली होडी ज्याप्रमाणें खोल समुद्रांत वाटेल तशी भटकते, त्याप्रमाणें माझ्या शत्रूंची अवस्था भ्रांत झाली आहे. आतां ते केव्हांहि पूर्वस्थितिवर येणार नाहींत. [१२]

सर्व देव मला मदत करोत आणि माझ्या शत्रूंना पळवून लावोत. [१३]

असर्ववीरश्चरतु प्रणुत्तो द्वेष्यो मित्राणां परिवर्ग्यः स्वानाम् ।
उत पृथिव्यामव स्यन्ति विद्युत उग्रो वो देवः प्र मृणत्सपत्नान् ॥ १४ ॥
च्युता चेयं बृहत्यच्युता च विद्युद्बिभर्ति स्तनयित्नूंश्च सर्वान् ।
उद्यन्नादित्यो द्रविणेन तेजसा नीचैः सपत्नान्नुदतां मे सहस्वान् ॥ १५ ॥
यत्ते काम शर्म त्रिवरूथमुद्भु ब्रह्म वर्म विततमनतिव्याध्यं कृतम् ।
तेन सपत्नान्परि वृङ्ग्धि ये मम पर्येनान्प्राणः पशवो जीवनं वृणक्तु ॥ १६ ॥
येन देवा असुरान्प्राणुदन्त येनेन्द्रो दस्यूनधमं तमो निनाय ।
तेन त्वं काम मम ये सपत्नास्तानस्माल्लोकात्प्र णुदस्व दूरम् ॥ १७ ॥
यथा देवा असुरान्प्राणुदन्त यथेन्द्रो दस्यूनधमं तमो बबाधे ।
तथा त्वं काम मम ये सपत्नास्तानस्माल्लोकात्प्र णुदस्व दूरम् ॥ १८ ॥

अर्थ—(प्रणुत्तः द्वेष्यः) पळविलेला शत्रु (असर्ववीरः) सर्व वीरांपासून निराळा होऊन (स्वानां मित्राणां परिवर्ग्यः) स्वतःच्या मित्रांनीं सुद्धां सोडलेला, (चरतु) हिंडो. (उत पृथिव्यां विद्युतः अवस्यन्ति) आणि प्रकाश देणारी वीज पृथ्वीवर येवो. (वः उग्रः देवः) तुमचा तो प्रतापी देव (सपत्नान् प्रमृणतु) शत्रूंचा नाश करो. [१४]

(च्युता च अच्युता च इयं बृहती विद्युत्) विचलित आणि अविचलित होणारी ही वीज (सर्वान् स्तनयित्नून् च बिभर्ति) सर्व गर्जना करणाऱ्यांना धारण करते. (द्रविणेन तेजसा उद्यन् सहस्वान् आदित्यः) धन आणि तेजासह उदय पावणारा बलवान् सूर्य (मे सपत्नान् नीचैः नुदतां) माझ्या शत्रूंना नम्र करो. [१५]

हे कामा ! (यत् ते त्रिवरूथं उद्भु) जें तुझें तिन्ही बाजूंनीं रक्षण करणारें उत्कृष्ट शक्तिशाली (विततं ब्रह्म वर्म) पसरलेलें ज्ञानाचें कवच, (अनतिव्याध्यं कृतं) शस्त्रांनीं सुद्धां वेधलें जाणार नाहीं असें जें बनविलें आहे, आणि तें (शर्म) सुखदायक आहे, (तेन) त्यानें (ये मम) जे माझे शत्रु आहेत (सपत्नान् परिवृङ्ग्धि) त्या शत्रूंना दूर कर. (एनान् प्राणः पशवः जीवनं परिवृणक्तु) प्राण, पशु आणि जीवनसुद्धां त्यांना त्यजोत. [१६]

(येन देवाः असुरान् प्राणुदन्त) ज्याच्या सहाय्यानें देवांनीं असुरांचा नाश केला, (येन दस्यून् इंद्रः अधमं तमः निनाय) ज्याच्यामुळें इंद्रानें शत्रूंना हीन अंधःकारांत पाडलें, हे काम ! (तेन) त्याच्या सहाय्यानें (मम ये सपत्नाः) माझे जे शत्रु आहेत, (तान् सपत्नान्) त्या शत्रूंना (त्वं अस्मात् लोकात्) तूं या लोकांतून (दूरं प्रणुदस्व) दूर पळवून लाव. [१७]

(यथा देवाः असुरान् प्राणुदन्त) ज्या प्रकारें देवांनीं राक्षसांना हरविलें, (यथा इन्द्रः दस्यून् अधमं तमः बबाधे) आणि इंद्रानें शत्रूंना हीन अंधःकारांत पाडलें, (तथा त्वं कामः) त्याचप्रमाणें हे कामा ! तूं (मम ये सपत्नाः) माझे जे शत्रु आहेत त्यांना (अस्मात् लोकात्) या लोकांतून (दूरं प्रणुदस्व) दूर पळवून लाव. [१८]

भावार्थ—आमच्या पराक्रमानें पळवून लावलेले शत्रू आतां रानोमाळ भटकत आहेत. त्यांच्याजवळ कोणी वीर नाहींत, मित्र नाहींत, कोणी परिवार राहिला नाहीं. सर्व देव मला मदत करोत आणि माझे शत्रु नष्ट होवोत. [१४]

ही वीज आणि हा सूर्य म्हणजे त्यांच्यामध्यें ज्या देवता आहेत त्या माझ्या शत्रूस दूर पळवून लावोत. [१५]

या कामाचें संरक्षक कवच महान् ज्ञान आहे, तें सर्व सुख देणारें आहे. तें मी पांघरतों. त्यामुळें शत्रूंचीं शस्त्रें मला लागणार नाहींत, आणि सर्व शत्रू प्राण आणि जीवन रहित होवोत. [१६]

ज्या शक्तीनें देवांनीं राक्षसांचा आणि इंद्रानें दस्यूंचा पराभव केला, त्या शक्तीनें मी माझ्या शत्रूंना या स्थानावरून पळवून लावतों. [१७-१८]

कामो जज्ञे प्रथमो नैनं देवा आपुः पितरो न मर्त्याः ।
ततस्त्वमसि ज्यायान्विश्वहा महांस्तस्मै ते काम नम इत्कृणोमि ॥ १९ ॥
यावती द्यावापृथिवी वरिम्णा यावदापः सिष्यदुर्यावदग्निः ।
ततस्त्वमसि ज्यायान्विश्वहा महांस्तस्मै ते काम नम इत्कृणोमि ॥ २० ॥
यावतीर्दिशः प्रदिशो विषूचीर्यावतीराशा अभिचक्षणा दिवः ।
ततस्त्वमसि ज्यायान्विश्वहा महांस्तस्मै ते काम नम इत्कृणोमि ॥ २१ ॥
यावतीर्भृङ्गा जत्वः कुरूरवो यावतीर्वघा वृक्षसर्प्यो बभूवुः ।
ततस्त्वमसि ज्यायान्विश्वहा महांस्तस्मै ते काम नम इत्कृणोमि ॥ २२ ॥
ज्यायान्निमिषतोऽसि तिष्ठतो ज्यायान्त्समुद्रादसि काम मन्यो ।
ततस्त्वमसि ज्यायान्विश्वहा महांस्तस्मै ते काम नम इत्कृणोमि ॥ २३ ॥

अर्थ—(कामः प्रथमः जज्ञे) काम सर्व प्रथम उत्पन्न झाला. (देवा एनं न आपुः) देवांनीं त्याला प्राप्त केला नाहीं आणि (पितरः मर्त्याः न) पितर आणि मर्त्यांना सुद्धां तो प्राप्त झाला नाहीं. (ततः त्वं ज्यायान् असि) त्यामुळें तूं श्रेष्ठ आहेस. (विश्वहा महान्) नेहमींच महान् आहेस. हे कामा ! (तस्मै ते इत् नमः कृणोमि) अशा तुला मीं नमस्कार करतों. [१९]

(यावती वरिम्णा द्यावापृथिवी) विस्तारानें द्यु आणि पृथ्वी जितकी मोठी आहे, (यावत् आपः सिष्यदुः) जेथपावेतों पाणी पसरतें, (यावत् अग्निः) जेथपावेतों अग्नि पसरतो, (ततः त्वं ज्यायान् असि) त्यापेक्षांहि तूं मोठा आहेस, (विश्वहा महान्) नेहमींच श्रेष्ठ आहेस, (तस्मै ते०) अशा तुला मीं नमस्कार करतों. [२०]

(यावतीः दिशः प्रदिशः विषूचीः) जेथपावेतों दिशा आणि उपदिशा पसरलेल्या आहेत, आणि (यावतीः दिवः अभिचक्षणाः आशाः) जेथ पावेतों द्युलोकाचा प्रकाश पसरवणाऱ्या दिशा आहेत (तत् त्वं०) त्यांच्यापेक्षां तूं मोठा आहेस आणि नेहमींच मोठा आहेस. अशा तुला मीं नमस्कार करतों. [२१]

(यावतीः भृंगाः जत्वः) जेथपावेतों माशा, भुंगे, (यावतीः कुरूरवः वघाः) जेथपर्यंत निळश रंगाच्या चावणाऱ्या माशा आहेत (वृक्षसर्प्यः बभूव) झाडावर चढणारे सांप आहेत (ततः त्वं०) त्या सर्वांपेक्षां तूं श्रेष्ठ आहेस, नेहमींच महान् आहेस अशा तुला मीं नमस्कार करतों. [२२]

हे कामा ! हे (मन्यो) उत्साहा ! तूं (निमिषतः ज्यायान्) डोळ्याच्या उघडझांपीपेक्षां मोठा (तिष्ठतः ज्यायान्) स्थिर उभारणाऱ्यापेक्षां मोठा (समुद्रात् असि) समुद्रापेक्षांहि तूं मोठा आहेस. (तत त्वं०) त्या सर्वांपेक्षां तूं महान्, नेहमींच श्रेष्ठ अशा तुला मीं नमस्कार करतों. [२३]

भावार्थ— काम सर्वांत प्रथम निर्माण झाला. देव, पितर आणि मर्त्य त्यानंतर प्रकट झाले. म्हणून काम सर्व श्रेष्ठ आहे. त्याला मीं नमस्कार करतों. [१९]

जेवढा पृथ्वीचा विस्तार आहे, जेथपर्यंत प्राणी पसरलें आहेत, जेथपर्यंत प्रकाश व्यापून आहे, जेथपावेतों दिशा पसरल्या आहेत, पशुपक्षी जेथपर्यंत जाऊं शकतात, त्या सर्वांच्या व्यापकतेपेक्षां कामाची व्यापकता फार मोठी आहे. [२०–२२]

न वै वातश्चन काममाप्नोति नाग्निः सूर्यो नोत चन्द्रमाः ।
ततस्त्वमसि ज्यायान्विश्वहा महांस्तस्मै ते काम नम इत्कृणोमि ॥ २४ ॥
यास्ते शिवास्तन्वः काम भद्रा याभिः सत्यं भवति यद्वृणीषे ।
ताभिष्ट्वमस्माँ अभिसंविशस्वान्यत्र पापीरप वेशया धियः ॥ २५ ॥

अर्थ—(वातः चन कामं न आप्नोति) वायु कामास प्राप्त करीत नाहीं. (न अग्निः न सूर्यः न उत चंद्रमा) अग्नि, सूर्य, फार काय चंद्रमा सुद्धां त्याला प्राप्त करूं शकत नाहींत. (ततः त्वं०) या सर्वांपेक्षां तूं महान् सर्वदा श्रेष्ठ आहेस. अशा तुला मीं नमस्कार करतों. [२४]

हे काम ! (याः ते शिवाः भद्राः तन्वः) जीं तुझी कल्याणकारक आणि हितकारक शरीरें आहेत, (याभिः) ज्यांनीं तूं (यत् सत्यं भवति) जो सत्य आहे त्याला (वृणीषे) स्वीकार करतोस. (ताभिः त्वं अस्मान् अभि सं विशस्व) त्यांच्या द्वारां तूं आम्हां सर्वांत प्रवेश कर आणि (पापीः धियः) पापी बुद्धींना (अन्यत्र अपवेशय) येथून दूर कर. [२५]

भावार्थ—डोळे बंद ठेवणाऱ्या प्राण्यांपेक्षां कामाची शक्ति जास्त आहे. स्थिर पदार्थांपेक्षांहि जास्त आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाशापेक्षांहि मोठी आहे. सूर्य चंद्रापेक्षांसुद्धां महान् आहे. म्हणजे काम सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे. [२३-२४]

म्हणून हे कामा ! शुभ, कल्याणकारक आणि सत्य जें आहे तें मला प्राप्त होवो आणि पापबुद्धि माझ्यापासून दूर जावो. [२५]

काम

संकल्पशक्ति

या सूक्तांतील काम शब्द स्त्रीविषयक नाहीं. परंतु संकल्पशक्तीचा वाचक आहे. हा काम सर्वांत प्रथम जन्माला आला असें या सूक्तांतील खालीं दिलेल्या मंत्रांत म्हटलें आहे—

कामो जज्ञे प्रथमः । (मं. १९)

' काम सर्व प्रथम जन्मला. ' ही गोष्ट वेदांत इतरत्र सुद्धां सांगितली आहे.

कामस्तदग्रे समवर्तताधि मनसो रेतः प्रथमं यदासीत् (ऋ. १०।१२९।४)

'सुरवातीस मनाचें वीर्य वाढविणारा काम सर्व प्रथम निर्माण झाला. ' अशा प्रकारें कामाची उत्पत्ति सर्वांत प्रथम सांगितली आहे. उपनिषदांत सुद्धां पहा—

कामः संकल्पो विचिकित्सा श्रद्धाऽश्रद्धा धृतिरधृति र्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एव ॥ (बृ. उ. १।५।३)

काम एव यस्यायतनं हृदयं लोको मनो ज्योतिः य एवायं काममयः पुरुषः । (बृ. उ. ३।९।११)

कामोऽकार्षीन्नाहं करोमि कामः करोति कामः कर्ता कामः कारयिता । (महा. नारा. उ. १८।२)

' काम, विचिकित्सा, श्रद्धा, अश्रद्धा, धृति (धैर्य), अधृति, ह्रीः (लज्जा), धीः (बुद्धि), भीः (भीति) हे सर्व मनांत रहातात. या सर्वांत जी पहिली लहर आहे ती कामाची आहे. काम सर्वांचें आधारस्थान आहे. त्याचें तेज हें मन आहे आणि हृदय हा लोक आहे. हा मनुष्य काममय आहे म्हणजे जितक्या प्रकारच्या त्याच्या इच्छा अथवा कामना तितक्या प्रकारचा तो होतो. काम सर्वांचा कर्ता आहे. मीं कर्ता नाहीं, कामाकडून सर्व करविण्यांत येतें. ' या प्रकारें उपनिषदांत कामाच्या बाबतींत म्हटलें आहे. येथें कामाचा अर्थ संकल्प होतो ही गोष्ट स्पष्ट झाली. हा संकल्प जर चांगला असला तर मनुष्याचें भलें होतें. जर संकल्प वाईट असला तर वाईट होईल. संकल्प चांगला अथवा वाईट असला तरीहि त्यांत महान् शक्ति असते. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं सर्व माणसें त्याच्या प्रेरणेनें प्रेरित होऊन चांगली अथवा वाईट कामें करीत आहेत. मानवांचे व्यवहार पहातां असें म्हणावें लागतें कीं या काम-संकल्पाची शक्ति फार मोठी आहे. त्या कामशक्तीचें वर्णन या सूक्तांत केलें आहे.

जगताच्या आरंभीं आरम्भामध्यें ' काम ' म्हणजे संकल्प उत्पन्न झाला. त्याचें दर्शक उपनिषद वचन (सोऽकामयत।

बृ. उ. १।२।४; तैत्तिरीय उ. २।६।१) असें आहे. त्या आत्म्यानें इच्छा केली आणि ती इच्छा पूर्ण झाली, ज्यामुळें हें सर्व जग निर्माण झालें आहे. परमात्म्याचा संकल्प शुद्ध होता म्हणून तो सिद्ध झाला. ज्यांचे संकल्प शुद्ध असतात, ते सर्वच सिद्धीस जातात. म्हणून म्हटलें आहे कीं—

यं यं कामं कामयते, सोऽस्य संकल्पादेव समुत्तिष्ठति । (छां. उ. ८।२।१०)

' जी इच्छा करतो ती संकल्प करतांच सिद्ध होते. ' अशी संकल्पाची शक्ति आहे. या संपूर्ण सृष्टीची उत्पत्ति सुद्धां अशीच झाली आहे. मनुष्याच्या कामनेंत सुद्धां ती शक्ति अंशरूपानें असते. त्याचें वर्णन या सूक्तांत केलें आहे. कामांत जर एवढी शक्ति आहे तर तिला चांगलें वळण शिक्षणानें लावलें पाहिजे. म्हणून म्हटलें आहे—

सपत्नहनं ऋषभं कामं हविषा शिक्षामि (मं. १)

' शत्रूंचा नाश करणारा बलवान् काम आहे. त्याला यज्ञानें शिक्षित करतों.' या कामांत म्हणजे संकल्पांत महान् शक्ति आहे. पण जर तो अशिक्षित राहिला तर नुकसान करील; म्हणून त्याला उत्तम शिक्षण देऊन चांगल्या नियमांनीं चालण्यास शिकविलें पाहिजे. अर्थात् शिक्षणाची जरुरी आहे. शिक्षण यज्ञद्वारां म्हणजे हवीनें, आत्मार्पणानें मिळतें. हवि ज्याप्रमाणें दुनियेच्या भल्यासाठीं स्वतः जळून जातो, पूर्ण समर्पित होतो, त्याप्रमाणें मनुष्यानें आत्मसमर्पण केलें पाहिजे. आत्मसमर्पणाच्या शिकवणीनें स्वतःच्या संकल्पाला शिक्षित करावें. अशा प्रकारें नीट वळण लावलेला काम, (**महता वीर्येण**) मोठ्या पराक्रमानें युक्त बनतो. आणि त्याच्या प्रभावानें मनुष्य स्वतःच्या शत्रूंना दूर करूं शकतो.

यन्मे मनसो न प्रियं न चक्षुषः यन्मे नाभिनन्दति । (मं. २)

' जें मनाला आणि डोळ्यांना आवडत नाहीं, जें अन्य इंद्रियांना सुद्धां अप्रिय आहे, जें आपल्या आत्म्याला संतोष देत नाहीं, ' त्यास दूर करावें. हें सुशिक्षित कामच करूं शकतो. म्हणून (**अहं तत् भिदेयं**) स्वतःवरील त्यांचें वजन दूर करून, त्यांचें भेदन करून स्वतःची उच्च अवस्था प्राप्त करतां येतें. परंतु हें सर्व, मनुष्याच्या कामना सुशिक्षित झाल्या तरच होईल. नाहून ही प्रचंड शक्ति त्याचा नाश करील.

(**कामः उग्रः ईशानः**) काम फार उग्र म्हणजे पराक्रमी आहे, आणि तोच ईश्वर आहे म्हणजे मनुष्याच्या भविष्याचा तो स्वामी आहे. कारण; मनुष्याचें भूत, भविष्य, वर्तमान या तीन्हींना तो आकार देतो. तो जशी घडवील तशी मनुष्याची स्थिति होते, म्हणून त्याचें महत्त्व मोठें आहे. त्याच्या अशा विलक्षण प्रभावामुळें मनुष्य त्याच्या मदतीनें स्वतःची उन्नति साधूं शकतो.

दुरितं अ प्रजस्तां अ-स्व-गतां अवर्तिं मुञ्च । (मं. ३)

' पाप, संतान न होणें, दारिद्र्य आणि संकटांना दूर करूं शकतो. ' हीच तर मनुष्याची इच्छा असते. कोणी मनुष्य असें थोडेंच इच्छिल कीं मला पाप लागावें, संतान होऊं नये, दारिद्र्य यावें अथवा स्वतः संकटांत पडावें. असें कोणींच इच्छिणार नाहीं. तरी सुद्धां अशीं सर्व संकटें मनुष्यास भोगावीं लागतात. त्याचें कारण मनुष्याच्या कामना अशिक्षित असतात. तो विपरित संकल्प करतो, आणि त्याचें फळ विपत्तीरूपानें त्यास भोगावें लागतें. या कामाची कन्या वाणीरूपी गाय आहे. तिचें वर्णन असें आहे—

ते दुहिता धेनुः यां कवयो वाचं आहुः । (मं. ५)

' कामाची एक कन्या गाय आहे जिला कवि वाणी असें म्हणतात. ' ही वाणीसुद्धां कामाप्रमाणेंच मोठी प्रभावशाली आहे. जर या वाणीचा प्रयोग उत्तम रीतीनें करण्यांत आला तर शत्रु आहेत ते मित्र होतात आणि जर ती वाईट प्रकारें वापरली तर मित्र असलेले कायमचे शत्रु होतात. म्हणून कामाला शिक्षित करतांना वाणीला सुद्धां चांगलें वळण लावलें पाहिजे. ही तर मोठी आवश्यक अनुभव सिद्ध गोष्ट आहे.

उग्रः वाजी कामः मम अध्यक्षः मह्यं असपत्नं कृणोतु । (मं. ७)

' प्रतापी बलशाली काम माझा अधिष्ठाता आहे, तो मला शत्रुरहित करो.' म्हणजे हा काम अथवा संकल्प प्रत्येक मनुष्याचा अधिष्ठाता आहे. जो नेहमीं बरोबर राहून निरीक्षण करतो त्याला अधिष्ठाता म्हणतात. जर अधिष्ठाता सुशिक्षित असला तर उत्तम सहाय्य मिळतें. जर तो स्वतः वाईट अथवा हीन प्रवृत्तीचा असला तर हीन प्रवृत्ति निर्माण करील, वाईट मार्गास घेऊन जाईल, आणि त्याचा परिणामहि वाईट होईल. म्हणून प्रार्थना केली आहे कीं,

विश्वेदेवा मम नाथं भवन्तु ।
सर्वे देवा मम हवमायन्तु ॥ (मं. ७)

' सर्व देव माझे रक्षक होवोत. देव माझ्या यज्ञाचा स्वीकार करोत. ' याप्रकारें देवांकडून मला जर मदत मिळत राहील, तर निःसंदेह माझी कामना शुद्ध होईल आणि माझी उन्नति होईल; म्हणून देवांनीं माझी ही प्रार्थना ऐकावी आणि कृपाकरून माझें रक्षण करावें. जे देव ' **काम-ज्येष्ठाः** ' म्हणजे त्यांच्यांत काम श्रेष्ठ आहे; सर्व देवांत कामदेव श्रेष्ठ आहे. कारण जगाच्या रचनेंत सर्व देव मदत करतात. परंतु जोपर्यंत परमात्म्याचा कामसंकल्प जागृत होणार नाहीं तो पावेतों कोणीहि देव स्वतःस रचनेच्या कार्यास जोडून घेऊं शकत नाहीं. ही कामाची महत्ता आहे. मनुष्याच्या व्यवहारांतहि पहा. सर्वांत प्रथम संकल्प असतो.

त्यानंतर इंद्रियांकडून कार्यें होतात. म्हणून सर्वत्र काम-संकल्पाचें महत्त्व वर्णिलें आहे. जीवात्म्याचा जसा परमात्म्याशीं तसा कामाचा इतर देवांशीं संबंध असतो. हें पाहिलें असतां सर्व देवांत काम कसा श्रेष्ठ आहे तें कळून येईल—

परमात्मा	जीवात्मा
काम, संकल्प (अधिष्ठाता)	काम, संकल्प
महत्त्व	बुद्धि
चंद्रमा	मन
इंद्र	चित्त
सूर्य	नेत्र
वायु	प्राण
अग्नि	वाणी
जल	वीर्य

या प्रकारें सर्व देवांचा अधिष्ठाता काम आहे. शरीरांत जे देव आहेत ते विश्वांतील देवांचे सूक्ष्म अंश आहेत. त्यामुळें दोन्ही ठिकाणीं देवांचा संबंध सारखाच असतो. जसा संकल्प असेल त्याप्रमाणें अनुकूलतेनें देव शरीरांत आणि जगांत कार्य करतात. आपले शत्रु नाश पावावे आणि स्वतःचा विजय व्हावा ही भावना सर्वांची असते; म्हणून म्हटलें आहे की—

अवधीत्कामो मम ये सपत्नाः उरुं लोकमकरन्मह्य-मेधतुम् । मह्यं नमन्तां प्रदिशश्चतस्रो मह्यं षडुर्वीः घृतमावहन्तु ॥ (मं ११)

' संकल्पच शत्रूंचा नाश करतो, संकल्प वृद्धिसाठीं विस्तृत कार्यक्षेत्र देतो, संकल्पामुळें चारी दिशा मनुष्यापुढें नम्र होतात, आणि सर्व भूप्रदेशांतून (त्याला) घृतादि अन्न भोग प्राप्त होतात.' जर कोणीं अशा प्रकारें संकल्प केला नाहीं तर त्याचें काय होईल ? विचारपूर्वक पाहिलें असतां ध्यानीं येईल कीं या जगाच्या व्यवहारांत सर्व प्रकारची प्रेरणा आहे. प्रत्येक कर्माच्या मागें संकल्प बळ असतें. जर कार्यांत काम नसला तर कार्यच होणार नाहीं. म्हणून या मंत्रांत म्हटलें आहे की जें कांहीं या जगांत घडतें तें कामाच्या प्रेरणेनें होतें.

वरील कोष्टकांत दाखविलें आहे की अग्नि, इंद्र, सोम अथवा इतर देव हे सर्व कामाच्या प्रेरणेनें कार्य करीत आहेत. त्यांचे प्रतिनिधि वाणी, मन, बुद्धि आणि चित्त हे सुद्धां संकल्पानेंच कार्यांस प्रेरित होतात. त्याप्रमाणेंच (**अग्निः यवः**) अग्नि शत्रूंना दूर करतो. इतर सर्व देवहि शत्रूंना दूर करतात.

कामाचें कवच

हा काम असें एक कवच अंगांत घालतो कीं त्यामुळें शत्रूला त्याच्यावर आघातच करतां येत नाहींत. पहा—

यत्ते काम शर्म त्रिवरूथमुद्भु ब्रह्म वर्म विततमनतिव्याध्यं कृतम् । (मं. १६)

' या कामाचें एक विलक्षण कवच आहे जें तीनहि केंद्रांत उत्तम रक्षण करतें, म्हणून (**अन् अति-व्याध्य**) शत्रूचे घाव त्यापणांवर होत नाहींत. ' हें (**ब्रह्म वर्म**) ज्ञान कवच आहे. या ब्रह्म कवचाचें वर्णन यापूर्वी याच कांडाच्या दुसऱ्या सूक्ताच्या १० व्या मंत्रांत आलें आहे तें तेथें वाचकांनीं पहावें.

हा काम (**प्रथमः जज्ञे**) सर्वांपूर्वी उत्पन्न झाला. त्यानंतर इतर देव उत्पन्न झाले. परंतु इतर देव त्याला प्राप्त करूं शकत नाहींत. जे आमच्या पूर्वी दोन हजार वर्षांवर होऊन गेले त्यांना आम्हीं कसें प्राप्त करूं ? त्याचप्रमाणें कामाची उत्पत्ति प्रथम आणि देवांची तत्पश्चात् झाली आहे. त्यामुळें इतर देव कामास प्राप्त करूं शकत नाहींत असें म्हटलें आहे, तें बरोबर आहे; म्हणून म्हटलें आहे कीं—

कामो जज्ञे प्रथमः न एनं देवा आपुः पितरो न मर्त्याः । ततस्त्वमसि ज्यायान् विश्वहा महान्० । (मं. १९)

' काम सर्वांपूर्वी निर्माण झाला त्यामुळें देव त्याला प्राप्त करूं शकत नाहींत आणि पितर अथवा मर्त्य सुद्धां प्राप्त करूं शकत नाहींत. ' कारण पितर आणि मर्त्य तर देवानंतर निर्माण झाले. यामुळें तो काम सर्वांहून श्रेष्ठ, उच्च आणि समर्थ आहे. त्याची श्रेष्ठता सर्वदा कायम रहाणारी आहे. त्याचें सामर्थ्य सर्वतोपरि आहे.

यानंतर मंत्र २१ ते २४ पर्यंतच्या चार मंत्रांत काम सर्वांहून श्रेष्ठ आहे ही गोष्ट सांगितली आहे. संपूर्ण पदार्थांपेक्षां सर्व स्थिर चरांपेक्षां तो श्रेष्ठ आहे. पंच महाभूतें, सर्व प्राणीमात्र, सूर्य, तसेंच चंद्रमाहून तसेंच इतरांहून काम हा श्रेष्ठ आणि समर्थ आहे. म्हणून शेवटच्या मंत्रांत प्रार्थना केली आहे—

यास्ते शिवास्तन्वः काम भद्रा याभिः सत्यं भवति यद् वृणीषे । ताभिष्ट्वमस्माँ अभिसंविशस्वान्यत्र पापीरप वेशया धियः ॥ (मं. २५)

' कामामध्यें जो शुभ आणि कल्याणकारक भाग आहे, ज्यामुळें सर्व सत्यांची सिद्धि होते, ते शुभ भाग माझ्यांत प्रवेश करोत, आणि पापाचे भाग दूर होवोत. ' संकल्प एक मोठी शक्ति आहे. त्यामुळें पापहि होतें आणि पुण्यहि होतें; म्हणून मनुष्यानें नेहमीं शुभ संकल्प करावें, आणि पापांपासून दूर रहावें, हें त्यास उचित आहे. याप्रमाणें मनुष्यानें स्वतःमध्यें शुभ कामना बाणवाव्या आणि स्वतःची उन्नति साधावी.

कामाग्नीचें शमन

कांड ३, सूक्त २१

(ऋषिः - वसिष्ठः । देवता - अग्निः ।)

ये अग्नयो अप्स्वं१न्तर्ये वृत्रे ये पुरुषे ये अश्मसु ।
य आविवेशौषधीर्यो वनस्पतींस्तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ १ ॥
यः सोमे अन्तर्यो गोष्वन्तर्य आविष्टो वयःसु यो मृगेषु ।
य आविवेश द्विपदो यश्चतुष्पदस्तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ २ ॥
य इन्द्रेण सरथं याति देवो वैश्वानर उत विश्वदाव्यः ।
यं जोहवीमि पृतनासु सासहिं तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ ३ ॥
यो देवो विश्वाद्यमु काममाहुर्यं दातारं प्रतिगृह्णन्तमाहुः ।
यो धीरः शक्रः परिभूरदाभ्यस्तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ ४ ॥

अर्थ— (ये अग्नयः अप्सु अन्तः) जे अग्नि पाण्यांत आहेत, (ये वृत्रे) जे वादळांत आहेत, आणि (ये पुरुषे) जे पुरुषांत आहेत, तसेंच (ये अश्मसु) जे दगडांत आहेत, (यः औषधीः यः च वनस्पतीन् आविवेश) जे औषधि आणि वनस्पतींत पसरलेले आहेत. (तेभ्यः अग्निभ्यः एतत् हुतं अस्तु) त्या अग्नींसाठीं हें हवन असो. [१]

(यः सोमे अन्तः, यः गोषु अन्तः) जो सोमामध्यें आहे, जो गाईंत आहे (यः वयःसु यः मृगेषु आविष्टः) जो पक्ष्यांत तसेंच जो जनावरांत प्रविष्ट झालेला आहे, (यः द्विपदः यः चतुष्पदः आविवेश) जो द्विपाद आणि चतुष्पादांत पसरलेला आहे. (तेभ्यः अस्तु०) त्या अग्नींसाठीं हें हवन असो. [२]

(विश्वदाव्यः उत वैश्वानरः) सर्वांस जाळणारा आणि असें असूनहि सर्वांचा चालक आणि हितकर्ता, (यः देवः इन्द्रेण सरथं याति) जो देव इंद्रासह एकाच रथांत बसून जातो, (यं पृतनासु सासहिं जोहवीमि) जो युद्धांत विजय देणारा आहे म्हणून ज्याची मी प्रार्थना करतों, (तेभ्यः०) त्या अग्नीसाठीं हें हवन असो. [३]

(यः विश्वाद् देवः) जो विश्वभक्षक देव आहे, (यं उ कामं आहुः) ज्याला 'काम' नांवानें बोलावण्यांत येतें, (यं दातारं प्रतिगृह्णन्तं आहुः) ज्याला देणारा आणि घेणारा असें दोन्ही म्हटलें जातें, (यः धीरः शक्रः परिभूः अदाभ्यः) ज्याला बुद्धिशाली, शक्तिशाली, भ्रमण करणारा आणि न दबणारा असें म्हणतात, (तेभ्यः०) त्या अग्नींसाठीं हें हवन असो. [४]

भावार्थ— जो अग्नि जल, मेघ, प्राणी आणि मनुष्यें, डोंगर आणि औषधी-वनस्पतीमध्यें आहे, त्याच्या प्रसन्नतेसाठीं हें हवन आहे. [१]

जो अग्नि सोम, गाय, पक्षी, हरणें वगैरे जनावरें तसेंच द्विपाद आणि चतुष्पादांमध्यें प्रविष्ट झालेला आहे त्याच्यासाठीं हें हवन आहे. [२]

सर्वांस जाळून टाकणारा आणि तरीहि सर्वांचा संचालक असा हा जो देव आहे तो इंद्रासह रथावर बसून फिरतो. जो युद्धांत विजय मिळवून देतो, त्या अग्नीसाठीं हें हवन आहे. [३]

जो अग्नि विश्वभक्षक आहे आणि ज्याला काम म्हणतात, जो देणारा आणि स्वीकारणारा आहे. जो बुद्धिशाली, समर्थ, सर्वत्र जाणारा आणि कोणाकडूनहि न दबणारा आहे त्या अग्नीसाठीं हें हवन आहे. [४]

यं त्वा होतारं मनसाभि संविदुस्त्रयोदश भौवनाः पञ्च मानवाः ।
वर्चोधसे यशसे सूनृतावते तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ ५ ॥
उक्षान्नाय वशान्नाय सोमपृष्ठाय वेधसे । वैश्वानरज्येष्ठेभ्यस्तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ ६ ॥
दिवं पृथिवीमन्वन्तरिक्षं ये विद्युतमनुसंचरन्ति ।
ये दिक्ष्व१न्तर्ये वाते अन्तस्तेभ्यो अग्निभ्यो हुतमस्त्वेतत् ॥ ७ ॥
हिरण्यपाणिं सवितारमिन्द्रं बृहस्पतिं वरुणं मित्रमग्निम् ।
विश्वान्देवानङ्गिरसो हवामह इमं क्रव्यादं शमयन्त्वग्निम् ॥ ८ ॥
शान्तो अग्निः क्रव्याच्छान्तः पुरुषरेषणः । अथो यो विश्वदाव्य१स्तं क्रव्यादमशीशमम् ॥ ९ ॥
ये पर्वताः सोमपृष्ठा आप उत्तानशीवरीः । वातः पर्जन्य आदग्निस्ते क्रव्यादमशीशमन् ॥ १० ॥

अर्थ— (त्रयोदशः भौवनाः पञ्च मानवाः) तेरा भुवनें आणि मानवांच्या पांच जाती, (यं त्वा मनसा होतारं अभि सं विदुः) ज्या तुला मनानें होता म्हणजे दाता मानतात, (वर्चोधसे) तेजस्वी (सूनृतावते) सत्यभाषी आणि (यशसे) यशस्वी अशा तुला आणि (तेभ्य०) त्या अग्नीसाठीं हें हवन असो. [५]

(उक्षान्नाय वशान्नाय) जो बैल आणि गाईसाठीं खुराक असतो आणि (सोमपृष्ठाय) औषधी पाठीवर डवलतो त्यांच्यासाठीं, (वेधसे) ज्ञान्यासाठीं, आणि (वैश्वानरज्येष्ठेभ्यः तेभ्यः०) सर्व मनुष्यांचा हितकर्ता अशा त्या अग्नीसाठीं हें हवन असो. [६]

(ये दिवं अन्तरिक्षं अनु, विद्युतं अनुसंचरन्ति) जे द्युलोकांत आणि अन्तरिक्षांत, तसेंच विजेमध्यें अनुकूलतेनें संचार करतात, (ये दिक्षु अन्तः ये वाते अन्तः) जे दिशामध्यें तसेंच जे वाऱ्यामध्यें सुद्धां आहेत, (तभ्य०) त्या अग्नीसाठीं हें हवन असो. [७]

(हिरण्यपाणिं सवितारं) सुवर्णाचे अलंकार हातांत धारण करणारा सविता, इंद्र, बृहस्पति, वरुण, मित्र, अग्नि, विश्वेदेव, आणि आंगिरसांची (हवामहे) मीं अशी प्रार्थना करतों कीं, ते (इमं क्रव्यादं अग्निं शमयन्तु) या मांसभोजी अग्नीला शांत करोत. [८]

(क्रव्याद् अग्निः शान्तः) मांसभक्षक अग्नि शांत झाला, (पुरुषरेषणः शान्तः) मनुष्यहिंसक अग्नि शांत झाला, (अथ यः विश्वदाव्यः) आणि जो सर्वांना जाळणारा अग्नि आहे, (तं क्रव्यादं अशीशमम्) त्या मांसभक्षक अग्नीला सुद्धां मीं शांत केला आहे. [९]

(ये सोमपृष्ठाः पर्वताः) जे वनस्पतींना पाठीवर धारण करणारे पर्वत आहेत, (उत्तानशीवरीः आपः) वर जाणारें पाणी आहे, (वातः पर्जन्यः) वायु आणि पाऊस, (आत् अग्निः) तसेंच जो अग्नि आहे, (ते) ते सर्व (क्रव्यादं अशीशमन्) मांस भक्षक अग्नीला शांत करतात. [१०]

भावार्थ— तेरा भुवनांचा प्रदेश आणि मनुष्याच्या ब्राह्मण क्षत्रियादि पांच जाती, या अग्नीला मनानें दाता समजतात. तेजस्वी, सत्य वाणीचा प्रेरक, यशस्वी अशा अग्नीला हा हवि अर्पण असो. [५]

जो गाईबैलांना अन्न देतो, पाठीवर औषधि वहातो, सर्वांना धारण करतो अथवा उत्पादक आहे, त्या सर्व मानवांत श्रेष्ठ अग्नीला हें आमचें हवन समर्पण असो. [६]

द्युलोक, अंतरिक्ष, विद्युत्, दिशा, वायु वगैरे मध्यें राहिलेल्या अग्नीसाठीं हें आमचें हवन समर्पण असो. [७]

सविता, इंद्र, बृहस्पति, वरुण, मित्र, अग्नि आणि आंगिरस वगैरे सर्व देवांची आम्हीं अशी प्रार्थना करतों, कीं ते सर्व मांसभक्षक अग्नीला शांत करोत. [८]

हा मांसभक्षक, पुरुष नाशक आणि सर्व जगाला जाळणारा अग्नि शांत झाला आहे, मीं त्याला शांत केलें. [९]

जेथें सोमासारखी वनस्पती आहे असे पर्वत, ज्यांची वीरगति आहे असे जलप्रवाह, वायु, पर्जन्य तसेंच अग्नि हे सर्व देव या मांसभक्षक अग्नीला शांत करण्यास मदत करोत. [१०]

कामाग्नीचें शमन

कामाग्नीचें स्वरूप

या सूक्तांत कामाग्नीस शांत करण्याचें वर्णन आहे. कामाला अग्नीची उपमा दिली आहे, अथवा अग्नीच्या वर्णनरूपें कामाला शांत करण्याचें वर्णन या सूक्तांत फार मनोरंजन करणारें आहे. हें सूक्त '**बृहत् शान्तिगणां**'त मोजलें जातें. खरोखर कामाची शांति हें बृहच्छांतिस्थापनेचेंच कार्य आहे हें सर्वांत कठिण पण कष्टसाध्य कार्य आहे. या सूक्तांत जो अग्नि सांगितला आहे, तो कच्चें मांस खाणारा आहे. सामान्य लोक असे समजतील कीं यांत मृत देह जाळणाऱ्या अग्नीचें वर्णन आहे, तर तसें नाहीं. कामरूप अग्नीचें वर्णन या सूक्तांत आहे. आणि हाच कामाग्नि मोठ्यांतमोठा मनुष्यभक्षक आहे. अग्नि जितकें जाळतो त्यापेक्षां हजार पट हा काम जाळतो. ही गोष्ट वाचकांनीं विचार करण्यासारखी आहे, म्हणूनच या सूक्तांत वर्णिलेल्या अग्नीचें स्वरूप नक्की करूं. त्याचें स्वरूप दाखविणारे जवळे शब्द या सूक्तांत आहेत त्यांचा विचार करूं—

१. **यो देवो विश्वाद् यं उ कामं आहुः** (मं. ४)– जो अग्निदेव सर्व जगाला जाळणारा आहे आणि ज्याला काम म्हणतात.

या मंत्रांत स्पष्ट म्हटलें आहे कीं या सूक्तांत जो अग्नि आहे तो '**काम**'च आहे. स्पष्ट नामनिर्देशानंतर कांहीं शंकेचें कारणच राहिलें नाहीं. तरीसुद्धां अजून खातरी करावयाची असल्यास या सूक्ताचे इतर मंत्र पाहूं—

२. **क्रव्याद् अग्निः** (मं. ९)– मांस भक्षक अग्नि.

३. **पुरुषरेषणः अग्निः** (मं. ९)– पुरुषाचा नाश करणारा कामाग्नि.

कामाच्या प्रबलतेनें मनुष्याचें शरीर वाळून जातें. आणि या काम प्रकोपानें कित्येक मनुष्यें सहपरिवार नष्ट, भ्रष्ट होतात. ही गोष्ट वाचकांनीं ध्यानांत ठेवावी, म्हणजे या मंत्रभागाचा गंभीर अर्थ ध्यानीं येईल. त्या दृष्टीनें—

४. **विश्वाद् अग्निः** । (मं. ४, ९)– विश्वाचें भक्षण करणारा (काम) अग्नि.

ही गोष्ट सत्य आहे. भगवद्गीतेंत कामाला '**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम्** ॥ (भ. गी. अ. ३।३७) हा काम महान् (**महाशनः**) खादाड आहे. **महाशन (महा-अशनः)** आणि **विश्वाद् (विश्व-अद)** या दोन्ही शब्दांचा भाव एकच आहे. खरोखरच काम मोठा खादाड आहे. त्याची तृप्ति कधींच होत नाहीं. कितीहि खाल्लें तरी तो अतृप्तच रहातो. सर्व जगास खाऊनहि त्याचें पोट भरत नाहीं. असा अर्थ दर्शविणारा हा शब्द आहे.

५. **विश्वदाव्यः** (मं. ३, ९)–सर्वांस जाळणारा (काम, अग्नि)

हा काम खरोखर सर्वांस जाळणारा आहे. जेव्हां तो मनांत प्रबळ होतो तेव्हां तो आंतून जाळण्यास सुरवात करतो. ब्रह्मचर्य पाळणारा मनुष्य आंतून वाढतो, आणि कामाग्नीस स्वतः मध्यें वाढूं देणारा आतून जळत रहातो ! ज्याचें अंतःकरण जळत असेल त्याला बिचाऱ्याला जणूं काय सर्व विश्व जळत आहे, असें होतें. ज्याच्या अंतःकरणांत कामाग्नीच्या ज्वाला भडकून उठतात त्याला पाणी शांत करूं शकत नाहीं. चंद्राची अमृतमय किरणें त्यांला शांत करूं शकत नाहींत. तो स्वतः नेहमीं अशांत आणि क्रोधी होत जातो. अशी कामाग्नीची दाहक शक्ति आहे. त्यासमोर हा अग्नि काय जाळणार ! कामाग्नीची दाहकता इतकी तीव्र असते कीं, तिच्यासमोर भौतिक अग्नि थंड, शीतल भासतो. म्हणून आठव्या मंत्रांत ' या (भौतिक) अग्नीला कामाग्नीला शांत करण्यास सांगितलें आहे. ' जर भौतिक अग्नि कामाग्नीपेक्षां थंड नसता तर त्यास कामाग्नीस शांत करण्यास कसें सांगितलें असतें ?

या प्रकारें कामाग्नीचे गुण वर्णन करणारे जे शब्द या सूक्तांत आले आहेत ते त्याचें स्वरूप नक्की करण्यास मदतरूप होतील. त्यांचें मनन केल्यानें, या सूक्तांत वर्णिलेला अग्नि सामान्य भौतिक अग्नि नसून तो कामाग्नि आहे. भौतिक अग्निवाचक अग्नि शब्द स्वतंत्र रीतीनें आठव्या मंत्रांत आला आहे. त्याचा विचार केला असतांहि या सूक्तांत वर्णिलेल्या अग्नीचें स्वरूप निश्चित होतें.

काम आणि इच्छा

'**काम**' शब्द जसा कामविकाराचा वाचक आहे तसा त्याचा अर्थ '**इच्छा** अथवा **कामना**' वाचक सुद्धां आहे. खरें पाहिलें तर काम, कामना, इच्छा हे सर्व शब्द मूलतः एकाच शक्तीचे वाचक आहेत. भिन्न भिन्न इंद्रियांशीं त्यांचा संबंध आल्यानें एकाच इच्छाशक्तीचें रूप ज्याप्रमाणें कामविकारांत प्रकट होतें, त्याप्रमाणें अन्य इंद्रियांशीं संबंध असल्यानें कामनारूपें पूर्ण प्रगट होतात. पण त्यांच्या आंत उतरून तपास केला तर,

*

' मला पाहिजे ' याशिवाय दुसरें त्यांत कांहीं नाहीं. स्वतःमध्यें कांहीं उणेपणा आहे तो पूर्ण करण्याची इच्छा उद्भवल्यानें बाहेरून कांहीं पदार्थ प्राप्त करण्याची कामना, तो बाह्य पदार्थ मिळाल्यानें मी पूर्ण होईन इत्यादि प्रकारची इच्छा, ' काम अथवा कामना ' शब्दानें सूचित होते. अशी इच्छा सर्वांत असते, म्हणून तर तिला विश्वाची चालकशक्ति म्हटलें आहे. पहा—

वैश्वानरः (विश्व-नेता) । (मं. ६)

' हा (**विश्व-नर**) विश्वाचा नेता म्हणजे विश्वाचा चालक (काम) आहे. विश्वास चालविणारी ती इच्छाशक्ति आहे. ही काम शक्ति नसली तर जग चालणें अशक्य आहे. पदार्थमात्रांत —कमींतकमी चेतन आणि अर्धचेतन जगांत-ही गोष्ट स्पष्ट दिसते. या विषयांत पहिल्या दुसऱ्या मंत्रांचें सांगणें स्पष्ट आहे.

' या कामरूप अग्नीचीं अनेक रूपें आहेत, आणि तीं जल, मेघ, दगड, औषधि, वनस्पति, सोम, गाय, पक्षी, पशु द्विपाद आणि चतुष्पाद, मनुष्य वगैरे सर्वांत आहेत. ' (मं. १-२) तसेंच ' पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक, विद्युत्, दिशा, वायु वगैरे मध्यें सुद्धां आहे. ' (मं. ७)

या मंत्रांनीं हें स्पष्ट होतें कीं, हा कामाग्नि दगड, पाणी, औषधिपासून मनुष्यापर्यंत सृष्टींत सर्वत्र भरला आहे. औषधि वाढण्याची इच्छा करतात, वृक्ष फळांची इच्छा करतात, पक्षी उडण्याची इच्छा करतात, मनुष्य जग जिंकण्याची इच्छा करतो, याप्रमाणें प्रत्येक पदार्थ स्वतःची शक्ति आणि अधिकाराचें क्षेत्र पसरविण्याची इच्छा करतो. हाच काम होय अथवा हीच कामना होय. ही इच्छा जेव्हां जननेंद्रियाविषयीं होते तेव्हां तिला काम विकार म्हणतात. हीच स्वार्थी इच्छा ' गाईबैलांना पाळण्यास आणि त्यांना खाऊं घालून पुष्ट करण्यास प्रवृत्त करते, औषधींचें पालन करते. ' (मं. ६)

कामाची दाहकता

वस्तुतः भौतिक अग्नि जाळतो, असा अनुभव प्रत्येकाचा आहे; आणि काम अथवा इच्छेची दाहकता तितकी नाहीं असें सर्व मानतात, पण सामान्य इच्छा, कामना अथवा कामविकार हे इतके दाहक आहेत कीं त्यापुढें भौतिक अग्नीचें दाहकत्व कांहींच नाहीं.

राज्य वाढविण्याची इच्छा कित्येक राज्यकर्त्यांमध्यें वाढते, त्यामुळें इतर बारीक, लहानसहान राष्ट्रांना पारतंत्र्यरूप अग्नींत जळावें लागतें. या स्वार्थामुळें इतकी महा भयंकर युद्धें झालीं आहेत आणि त्यांत इतकी भयंकर प्राणहानी झाली आहे कीं इतर कोणत्याहि आपत्तीनें तितकी झाली नसेल. अग्नीची दाहकता नक्कीच तितकी भयंकर नाहीं, आणि त्या दाहकतेनें एवढा मानवी-संहार होत नाहीं. तिसऱ्या मंत्रांत कामाला (**पृतनासु सासहिं**) युद्धांत विजयी असें म्हटलें आहे. विजय कोणत्याहि पक्षाला मिळो पण तो जय हा कामाचाच समजला जातो.

एक समाज स्वार्थाखातर दुसऱ्या समाजास दाबून टाकीत आहे, पुढें जाऊं देत नाहीं. दाबलेल्या जातीपासून स्वतःचा स्वार्थ मन मानेल तसा साधून घेण्यांत येत आहे. हा एक स्वार्थी कामनेचा परिणाम आहे. धनवान् मनुष्यें निर्धनांस नाडतात. अधिकारी वर्ग प्रजेस छळतो. एक समर्थ राष्ट्र दुसऱ्या निर्बल राष्ट्राला दाबून टाकण्याचा प्रयत्न करतें. त्या प्रकारें एक भाऊ दुसऱ्या भावाच्या वस्तु लुटून घेतो. हीं सर्व कामाचीं रूपें आहेत. तीं सर्व मनुष्यास आंतल्या आंत जाळतात.

डोळे सुंदर रूपाची इच्छा करतात. कान मधुर स्वराची इच्छा करतात, अभिलाषा करतात. जीह्वेला मधुर रसाची इच्छा होते. या प्रकारें इतर इंद्रियें निरनिराळ्या इच्छा करतात. त्यामुळें जगांत जे विध्वंस आणि नाश होत आहेत ते कोणापासून गुप्त नाहींत. इतकी विनाशक शक्ति भौतिक अग्नीची आहे काय ?

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा मनुष्याचे शत्रु सांगितले आहेत. या शत्रूंमध्यें मुख्य काम आहे. सर्वांपेक्षां जास्त दाहकता त्याच्यामध्यें आहे तो प्रेमानें जवळ येतो, सुख देण्याच्या लोभांत पाडतो, आणि थोडेसें सुख प्राप्त झाल्यासारखें वाटतेंहि, परंतु आंतल्या आंत इतका जाळतो कीं प्रत्यक्ष जळणाऱ्याच्या तें ध्यानांतहि येत नाहीं. या कामविकाररूपी शत्रूच्या विनाशक शक्तीचें वर्णन सर्व शास्त्रांत प्रतिपादन केलें आहे. प्रत्येक धर्म-पुस्तक त्यांपासून संभाळून रहावें अशी धोक्याची सूचना देत आहे.

जेव्हां कामविकाराच्या ज्वाला मनांत भडकून उठतात, तेव्हां असें होतें कीं शरीरांतील रक्त उकळत आहे. रक्त उकळण्याचा अनुभव स्पष्ट येतो. शरीर तापतें, मस्तक गरम होतें. इंद्रियें ढिलीं पडतात. विचार करण्याची शक्ति नष्ट होते, आणि एकाच कामवासनेचें राज्य मनांत चालतें. रक्त जळतें, शक्ति नष्ट होते, वीर्याचा नाश होतो आणि आयुष्याचा क्षय हा कामविकार करतो. हीं सर्व त्या कामाच्या दाहकतेचीं लक्षणें आहेत. आतां वाचकांनींच विचार करावा कीं या कामाच्या दाहकतेची तुलना भौतिक अग्नीच्या दाहकतेशी होऊं शकेल काय ? म्हणून मंत्रांत योजलेलें विशेषण (**विश्वदाव्यः**) जगास जाळणारा हें सार्थ आहे.

या सर्व वर्णनावरून वाचकांनीं कामाच्या दाहकतेची कल्पना करावी, आणि त्यापासून संभाळून रहाण्याचा प्रयत्न करावा.

न दबणारा

चौथ्या मंत्रांत त्याचीं विशेषणें '**विश्वाद्, दाता, प्रतिगृह्णन्, धीरः, शक्रः, परिभूः, अदाभ्यः**' अशीं आलीं आहेत. त्यांतच त्याचें नांव (**यं कामं आहुः**) 'काम' स्पष्ट आलें आहे. म्हणजे हीं सर्व कामाचीं गुणविशेषणें आहेत. म्हणून त्यांचा अर्थ पहा—

'हा काम (**विश्वाद्**) जगास खाणारा, (**दाता**) दान देणारा, (**प्रतिगृह्णन्**) बदल्यांत आपलें आयुष्य घेणारा, (**धीरः**) धैर्य देणारा, (**शक्रः**) शक्तिशाली, (**परिभूः**) सर्वांत श्रेष्ठ होणारा, (**अदाभ्यः**) न दबणारा आहे.' (मं. ४)

विचार करण्यानें हें ध्यानीं येईल कीं हीं सर्व लक्षणें कामाच्या बाबतींत सार्थ आहेत, अन्वर्थक म्हणजे योग्य अर्थाचीं आहेत. जेव्हां काम मनांत उत्पन्न होतो त्यावेळीं बुद्धीला मलीन करतो. स्वतःची इच्छा तृप्त करण्यासाठीं जरूर तें धैर्य आणि साहस निर्माण करतो. इतर वेळीं भिऊन वागणारा मनुष्य कामाच्यावेळीं महान् साहस करतो. जेव्हां तो मनांत वाढतो तेव्हां इतर सर्व भावनांना दाबून टाकतो. स्वतःचा अधिकार चालवितो. दाबून टाकण्याचा कितीहि प्रयास केला तरी उसळून स्वतःचा प्रभाव दाखवितो.' अशा रीतीनें पूर्वोक्त विशेषणांचा आशय विचार केला असतां ध्यानीं येईल. त्याचे दाता आणि प्रतिग्रहीता (अथर्व. ३।२९।७ मध्यें सुद्धां, '**कामो दाता कामः प्रतिग्रहीता**' असें म्हटलें आहे.) हीं दोन विशेषणें विशेष मनन करण्यासारखीं आहेत. तो थोडेसें सुख देतो आणि पुष्कळ वीर्यहरण करतो. असा अर्थ पूर्वापर संबंधानें अन्वर्थक वाटतो. साधारण कामनेच्या अर्थानें देणारा आणि घेणारा कामनेनें प्रेरित होतात. म्हणजे हा कामच देणाऱ्यास देण्यासाठीं आणि घेणाऱ्यास घेण्यासाठीं प्रवृत्त करतो असा या मंत्राचा आदेश आहे.

पांचव्या मंत्रांत 'त्रयोदश भुवनामध्यें रहाणारे पंचजन त्याला मानतात, दाता म्हणून पूजितात,' असें म्हटलें आहे. संपूर्ण जनता कामाची उपासना करते, ही गोष्ट येथें या मंत्रांत सांगितली आहे. कित्येक वैराग्यशाली संतमहंत या कामाला स्वतःच्या काबूंत ठेऊन परमेश्वराचे उपासक होतात, इतर संसारी मनुष्यें तर काम हा आपणास सर्वस्व देणारा आहे, असें समजतात. याप्रकारें काम सर्व जगावर आपला अधिकार चालवीत आहे. प्रजा असें समजते की (**वर्चः**) तेज, (**यशः**) यश आणि (**सूनृतं**) सत्य वगैरे सर्व कामाच्या प्रभावानें सफल होतें. सर्व लोक जे संसारांत गुंतले आहेत ते त्याच्या प्रेरणेनें चालत आहेत आणि अत्यंत वेगानें फिरत आहेत. जे सत्पुरुष त्याच्या वेगांतून सुटून जाऊन त्यास जिंकितात तेच मुक्तीचे अधिकारी होतात. त्याच्या पंजांतून सुटणें हीच मुक्ति होय. पण त्याच्या वेगांतून स्वतःस मुक्त करून घेणारे आहेत किती? हीच गोष्ट या सूक्ताच्या मननसमयीं विचार करण्यासारखी आहे.

इंद्राचा रथ

तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे 'हा काम इन्द्राच्या रथावर बसून (**इंद्रेण सरथं याति**) जात आहे.' (मं. ३) म्हणजे इंद्राचा रथ कोणता तें नक्की केलें पाहिजे. '**इन्द्र**' नांव जीवात्म्याचें आहे. आणि त्याचा रथ म्हणजे हें शरीर आहे. त्याविषयीं उपनिषदाचें वचन पहा—

आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु।
इन्द्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान्॥

(कठ. उ. ३।४)

'आत्मा रथांत बसणारा आहे, त्याचा रथ हे शरीर, इंद्रियें हे घोडे आहेत– जे विषयांत फिरतात.' या वर्णनावरून इंद्राचा रथ कोणता तें कळतें. या उपनिषद् वचनांतील 'इंद्रिय' पदाचा अर्थ 'इंद्रियशक्ति' असा आहे. आमचीं इंद्रियें इंद्राच्या शक्ति आहेत. असा विचार केला म्हणजे आत्माच इंद्र आहे याविषयीं खात्री होते.

हा काम, इंद्र म्हणजे आत्म्याच्या शरीररूपी रथांत बसतो असें विधान तिसऱ्या मंत्रांत आहे—

य इन्द्रेण सरथं याति। (मं. ३)

'जो कामरूपी अग्नि इन्द्राच्या रथावर बसून जातो.' या वाक्याचा अर्थ आतां स्पष्ट होत आहे. या शरीरांत ज्याप्रमाणें जीवात्मा अथवा इंद्र आहे तद्वत् कामहि आहे. दोघेहि शरीराला चालवितात. स्थूल दृष्टीनें पाहिलें तर काम म्हणजे इच्छाशक्ति त्याला चालवीत आहे. याप्रकारें शरीरांत कामाची स्थिति आहे.

हा कामरूपी अग्नि प्राण्यांच्या शरीरांत जळत आहे. त्याला जास्त प्रज्वलित करणें योग्य नाहीं, उलट शक्य त्या प्रयत्नांनीं त्यास शांत पाडण्याचा प्रयास केला पाहिजे. त्याला शांत करण्याचे उपाय आतां पहा—

कामशान्तीचे उपाय

नवव्या मंत्रांत हा कामाग्नि शांत झाल्याचें विधान आहे. तो मंत्र पहा—

शान्तो अग्निः क्रव्याच्छान्तः पुरुषरेषणः ।
अथो यो विश्वदाव्यस्तं क्रव्यादमशीशमम् ॥

' हा मांसभक्षक कामरूपी अग्नि शांत झाला. हा मनुष्याचा नाश करणारा कामरूपी अग्नि शांत झाला. हा जो सर्वांस जाळणारा अग्नि आहे त्यास मीं शांत केलें आहे.' या मंत्रांत कामाग्नीस शांत केल्याचें म्हटलें आहे. त्यावरून त्याला शांत करण्याचा कांहीं रस्ता आहे असें नक्की वाटतें. जर एक मनुष्य त्याला शांत करूं शकतो तर इतर मनुष्यें त्याच्याच रस्त्यानें जाऊन, तेच उपाय करून स्वतःनें शरीर जाळणाऱ्या कामाग्नीस शांत करूं शकतील. प्रत्येकाच्या शरीरांत तो रहातो, जाळतो, म्हणून प्रत्येकानें त्याला शांत करण्याचा पुरुषार्थ करावा, आणि आत्मशांति प्राप्त करावी. त्याला शांत करण्याचा उपाय आठव्या मंत्रातील बाकीच्या भागांत आणि १० व्या मंत्रांत याप्रमाणें सांगितला आहे—

' हिरण्यपाणी सविता, इंद्र, बृहस्पति, वरुण, मित्र, अग्नि, विश्वेदेव, आंगिरस यांचें आम्हीं यजन करतों. ते या मांसभक्षक कामाग्नीला शांत करोत. ' (मं. ८)

' ज्यांच्यावर सोमवल्ली वाढते असे पर्वत, वर चढणारें पाणी, वायु, पर्जन्य आणि अग्नि हे सर्व मांसभक्षक कामाग्नीस शांत करोत. ' (१०)

या दोन्ही मंत्रांत जे मार्ग सांगितले आहेत, ते कामाग्नि शांत करणारे आहेत. या मंत्रांत उपाय सांगितले असल्यानें ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यासाठीं त्यांचें मनन करणें जरूर आहे. या दोन मंत्रांत जे उपाय सांगितले त्यांचें अनुक्रमानें विवरण आतां देतों—

१. सोमपृष्ठाः पर्वताः— ज्यांच्यावर सोम वनस्पति आणि दुसऱ्या औषधि वनस्पति वाढतात ते पर्वत कामाग्नि शांत करण्यास मदतरूप होतात. त्यांत पहिली गोष्ट त्या पर्वतावरील शीतल वारा कामाला भडकूं देत नाहीं. शीत प्रदेशापेक्षां उष्ण प्रदेशांत कामाग्नीच्या ज्वाला लवकर भडकतात. उष्ण प्रदेशांतील मनुष्यें अल्पवयांतच कामाग्नीनें भडकून उठतात—उद्दीपित होतात. दुसरी गोष्ट पर्वतावरील सोमवल्ली सारख्या वनस्पतींच्या थंड शीतल रसानें सुद्धां कामाग्नि शांत होतो. सोमवल्ली उगवणारी शिखरांची रांग हिमालयांत आहे. तेथें ही दिव्य औषधि उगवते. तिच्या सेवनानें मनुष्य स्थिरवीर्य आणि दीर्घायु होतो. तिसरी गोष्ट अशा पहाडांत प्रलोभनें—मोहांत पडण्याचे प्रसंग अल्प असतात. शहरासारखे अनेक असत नाहींत. त्यामुळें कामास शहराप्रमाणें येथें पर्वतावर उत्तेजन मिळत नाहीं. असे अनेक उपाय या पर्वताशीं संबंधित आहेत. (मं. १०)

२. उत्तानशीवरीः आपः— पाणीसुद्धां कामाग्नीचें शमन करणारें आहे. थंड पाण्याचें स्थान अथवा तलावाच्या पाण्यांत पोहोण्यानें शरीराचें उष्णतामान समशीतोष्ण रहातें. त्यामुळें कामाग्नीची उष्णता कमी होते. थंड पाण्यानें शरीराचा मध्यभाग धुवावा. त्याला कटिस्नान म्हणतात. ते ब्रह्मचर्यास मोठें लाभदायक आहे. गुप्तइंद्रियाच्या आसपासचा भाग, रात्रीं निजण्यापूर्वी अथवा जेव्हां कामाग्नीचा उद्रेक होईल तेव्हां थंड पाण्यानें धुण्यानें ब्रह्मचर्य साधनांत मोठी मदत होते. याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारच्या पाण्याच्या मदतीनें कामाग्नीस शांत करण्याचें कार्य करतां येते. (मं. १०)

३. पर्जन्यः— पावसाचें पाणीसुद्धां मोठें लाभदायक असतें. पाऊस पडत असतां त्यामध्यें उभें राहून आकाशगंगेच्या पाण्याचें स्नान करावें. त्यानें शरीरांतील उष्णता कमी होते. त्याशिवाय पावसाचें पाणी प्याल्यानें सुद्धां शरीराचे दोष दूर होतात. कामाग्नीच्या शांतीसहि त्याची मदत होते. (मं. १०)

४. अग्निः— आग अथवा अग्नि हा खरें पहातां शरीरास जास्त उष्ण करतो. जीं नाजुक प्रकृतीचीं मनुष्यें आहेत, त्यांना जर अग्नीच्या सांनिध्यांत काम करण्याचा प्रसंग आला तर त्यांच्या शरीराची उष्णता वाढते. त्यांचें शरीर उष्ण होतें. त्यामुळें त्यांना वीर्यदोषाची बाधा होते. म्हणून ही अशा प्रकारची देहाची फाजील नाजुकता दूर केली पाहिजे. अग्निप्रयोगानें ती दूर करतां येते. होमहवन प्रसंगीं शरीरास अग्नीचा ताप लागतो. अन्य प्रकारें सुद्धां, शरीरास उष्णतेची संवय असावी. कारण कोण्यावेळीं आगीशीं काम करण्याचा प्रसंग आला तर शरीरास तितकी उष्णता सहन करतां आली पाहिजे. अग्नीच्या उष्णतेचा हानिकारक परिणाम शरीरावर न व्हावा यासाठीं याप्रकारें शरीराला सहनशक्ति युक्त करणें जरूरीचें आहे. (मं. १०)

५. वातः— वायु म्हणजे वारा सुद्धां कामाग्नीला शांत करण्यास उपयोगी आहे. शुद्ध वायूचें सेवन आणि शुद्ध हवेंत फिरावयास जाण्यानें पुष्कळ लाभ होतो. प्राणायाम करणें तो सुद्धां वायुसेवनाचाच एक लाभप्रद प्रकार आहे. प्राणायामानें वीर्यदोष दूर होतात. प्राणायामाच्या संवयीनें मनुष्य स्थिरवीर्य होतो; म्हणून वायूला कामाग्नीला शांत करणारा म्हटला आहे. जगांत जो वायु आहे तोच शरीरांत प्राणरूपानें आहे. (मं. १०)

६. सविता— सूर्य सुद्धां या बाबतींत फार सहाय्यरूप होतो. जी गोष्ट अग्निविषयीं सांगितली तीच सूर्याविषयींहि सत्य

आहे. कोमल आणि नाजुक प्रकृतीच्या मनुष्यांना सूर्याच्या तापांत फिरल्यानें वीर्यदोष होतो. त्याचें कारण हेंच कीं त्यांच्यांत सूर्यप्रकाश सहन करण्याची शक्ति नसते. वस्तुतः सूर्याचा प्रकाश शरीराला फार फायदेकारक आहे. सूर्यप्रकाशानें जीवनशक्ति मिळते. थोड्या सूर्य प्रकाशानें शरीर तापविल्यानें आपल्या शरीराची सहनशक्ति वाढते, आणि शरीरांत अद्भुत जीवनरसाचा संचार होत आहे असें वाटते. आरोग्य वाढतें आणि थोड्याशा उष्णतेनें शरीरांत कामाग्नी उत्तेजित होण्याचें कमी होतें.. या प्रकारें शक्ति वाढवावयाची असली तर सकाळच्या कोमल सूर्यकिरणांत फिरावयास जावें. त्यानंतर कठोर सूर्य प्रकाशांत उभे रहावें. हें सूर्याच्या उन्हाचें स्नान फारच लाभदायक आहे. मंत्रांत **हिरण्य पाणिः सविता'** हे शब्द सकाळच्या नऊ वाजेपर्यंतच्या सूर्याच्या तापाला उद्देशून आहेत. सूर्याचीं सोन्यासारखीं किरणें नऊ वाजेपर्यंत असतात आणि सायंकाळीं असतात. (मं. ८)

७. **वरुणः**—वरुणस्थान समुद्रांत आहे. म्हणजे समुद्राच्या पाण्याचें स्नान लाभदायक होतें, असें आपण समजलें पाहिजे. त्यांत जलप्रयोग सुद्धां येऊं शकतो.

८. **मित्रः**—सूर्याच्या बाबतींत वर सांगण्यांत आलें आहे. **'हिरण्यपाणिः सविता'** हें सकाळच्या सूर्याचें उद्बोधक जर मानलें तर त्यानंतरचा सूर्य मित्र शब्दानें सांगितला आहे. पहिल्या प्रमाणें हा सुद्धां लाभकारक आहे. मित्राचा प्रेमदृष्टीनें उदय होण्यामुळें म्हणजे जगाकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पहाण्यामुळें सुद्धां महान् लाभ होण्याचा संभव आहे. (८)

९. **विश्वेदेवाः**—सर्व देवांपासून लाभ मिळविला पाहिजे. त्याविषयीं विचार करणें योग्य आहे. (मं. ८)

१०. **बृहस्पतिः**—ही ज्ञानाची देवता आहे. ज्ञानानें सुद्धां कामाग्नीस शांत करण्याची साधना करणें शक्य आहे. बृहस्पति नांव गुरूचें आहे. गुरूपासून ज्ञान मिळवून त्या ज्ञानाच्या शक्तीनें स्वतःस वांचविणें, म्हणजे कामाग्नीचा संयम करणें. येथें जें ज्ञान आवश्यक आहे तें शरीरशास्त्र, मानसशास्त्र, अध्यात्मशास्त्र वगैरेचें ज्ञान आहे. त्यासह भक्तिमार्ग-ज्ञानमार्गाचें सुद्धां ज्ञान असलें पाहिजे. (मं. ८)

११. **आङ्गिरसः**-अंगरसाची विद्या जाणणारे ऋषि. शरीरांत सर्वत्र फिरणारा एक रस आहे. त्याला जीवनरस म्हणतात. त्या विषयींची विद्या जाणणारा जो आहे त्याच्या जवळून ती विद्या मिळवून त्या विद्याद्वारां-त्या विद्येनें कामाग्नी ताब्यांत ठेवून त्याचें शमन केलें पाहिजे. योगसाधनांमध्यें याविषयीं अनेक मार्ग सांगितले आहेत, ते सुद्धां या अनुसंधानांत पाहिले पाहिजेत. (मं.८)

१२. **इंद्रः**—इन्द्र नांव जीवात्म्याचें, राजाचें आणि परमात्म्याचें आहे. या तिघांचाहि संबंध कामाग्निशांतीशीं येतो. जीवात्म्याचें आत्मिक बल वाढवून, शुभसंकल्पद्वारा स्वतःमध्यें कामाग्नीचा संयम केला पाहिजे. राजानें स्वतःच्या राज्यांत ब्रह्मचर्य आणि संयमाचें वायुमंडल वाढवून कामाग्नीच्या शांतिसाठीं सर्वांस सुगमता करून दिली पाहिजे. राष्ट्रांत अध्यापकगण आणि संरक्षक अधिकारी वर्गांत ब्रह्मचाऱ्यांस नेमून राज्य चालविण्याचा उपदेश अथर्व वेदांत ब्रह्मचर्य सूक्तांत (अथर्व. १०।५।१६) सांगितला आहे. तो येथें अवश्य तुलना करून पहावा. त्यामुळें राजाचीं कर्तव्यें काय आहेत याची जाणीव होईल. जर राज्यांतील अधिकारी वर्ग व अध्यापक वर्ग पूर्ण ब्रह्मचर्ययुक्त असेल तर त्या राज्याचें वायुमंडल ब्रह्मचर्याला अनुकूल राहील, आणि अशा राज्यांत रहाणारे लोक ब्रह्मचर्य पालन करतील. संयम राखणें आणि कामाग्नि शांत करणें सहजतेनें होईल. जेथें सर्व अधिकारी आणि अध्यापक ब्रह्मचारी असतील त्या वैदिक राज्याची धन्य असो. वैदिक धर्मीयांनीं असा प्रयत्न केला पाहिजे कीं असें राज्य या पृथ्वीवर स्थापित व्हावें, जेथें जावें तेथें सर्वत्र ब्रह्मचर्याचें वायुमंडल पसरलें आहे. इन्द्र शब्दाचा तिसरा अर्थ परमात्मा आहे. हा परमात्मा तर पूर्ण ब्रह्मचर्याचा परमश्रेष्ठ आदर्श आहे. त्याची भक्ति आणि उपासनाद्वारा कामशांति होऊं शकते. सर्व ऋषि, मुनि आणि योगी, या परमात्म्याच्या भक्तीच्या साधनेनें मनःसंयमद्वारा कामाग्नीला शांत करून अमर होऊन गेले.

या प्रकारच्या उपायांचें वर्णन या सूक्तांत केलें आहे. हें सूक्त अत्यंत महत्वाचें आहे. याचा पाठ बृहच्छांतिगणामध्यें सांगितला आहे. बरोबर हें सूक्त बृहती म्हणजे मोठी शांति करणारें आहे. जे वाचक त्याच्या अनुष्ठानानें शांति प्राप्त करतील ते धन्य होत.

कामाचा बाण

कांड ३, सूक्त २५

(ऋषिः – भृगुः । देवता – मित्रावरुणौ, कामेषुः ।)

उत्तुदस्त्वोत्तुदतु मा धृथाः शयने स्वे । इषुः कामस्य या भीमा तया विध्यामि त्वा हृदि ॥ १ ॥
आधीपर्णां कामशल्यामिषुं संकल्पकुलमलाम् । तां सुसंनतां कृत्वा कामो विध्यतु त्वा हृदि ॥ २ ॥
या प्लीहानं शोषयति कामस्येषुः सुसंनता । प्राचीनपक्षा व्योषा तया विध्यामि त्वा हृदि ॥ ३ ॥
शुचा विद्धा व्योषया शुष्कास्याभि सर्प मा । मृदुर्निमन्युः केवली प्रियवादिन्यनुव्रता ॥ ४ ॥

अर्थ— (**उत्तुदः त्वा उत्तुदतु**) हृदय खळबळून टाकणारा काम तुला हलवून सोडो, (**स्वे शयने मा धृथाः**) स्वतःच्या अंथरुणावर राहूं नकोस. (**कामस्य या भीमा इषुः**) कामाचा जो भयंकर बाण आहे (**तया त्वा हृदि विध्यामि**) त्यानें मीं तुझ्या हृदयांत वेधतों. [१]

(**आधी-पर्णां**) ज्यावर मानसिक पीडारूपीं पिसें लावलीं आहेत, (**कामशल्यां**) कामेच्छारूपी बाणाचा अग्र भाग जेथें लावला आहे, (**संकल्पकुलमलां**) संकल्परूपी दांडी ज्याला बसविली आहे, (**तां**) त्या (**इषु**) बाणाला (**सुसन्नतां कृत्वा**) लक्ष्यावर उत्तम प्रकारें योजून (**कामः हृदि त्वा विध्यतु**) काम तुला हृदयांत वेधो. [२]

(**कामस्य सुसन्नता**) कामाचा सरळ हृदयावर योजलेला बाण, (**प्राचीन-पक्षा वि-ओषा**) सरळ पिसांचा आणि विशेष जाळणारा (**या इषु प्लीहानं शोषयति**) जो बाण प्लीहेला सुकवून टाकतो (**तया त्वा हृदि विध्यामि**) त्या बाणानें मीं तुला हृदयांत वेधतों. [३]

(**व्योषया**) विशेष दाह करणाऱ्या (**शुचा**) शोक वाढविणाऱ्या बाणानें (**विद्धा**) वेधलेली तूं (**शुष्कास्या**) तोंड वाळून गेलेली (**मा अभिसर्प**) माझ्या जवळ ये; आणि (**मृदुः**) कोमल (**निमन्युः**) क्रोधरहित, (**प्रियवादिनी**) मधुर भाषण करणारी, (**अनुव्रता**) अनुकूल कर्म करणारी (**केवली**) फक्त माझीच इच्छा करणारी हो. [४]

भावार्थ— हे स्त्रिये ! सर्वांना क्षुब्ध करणारा काम तुला सुद्धां हलवून सोडो. कामाचा बाण तुझ्या हृदयाला वेधो आणि तूं सुखानें झोंपण्यास असमर्थ हो. [१]

या कामाच्या बाणाला मानसिक पीडारूपीं पिसें लावलीं आहेत. पुढील भागास कामविकाराचें तीक्ष्ण शल्य बसविलें आहे, त्याच्या मागें मनाची संकल्पशक्तिरूपी दांडी आहे. या प्रकारचा बाण तयार करून त्यानें मीं तुझ्या हृदयास वेधतों. [२]

हा कामाचा बाण चुकत नाहीं. अचूक लागतो; कारण त्यावर मानसिक व्यथा लावलेली आहे. शिवाय ती विशेष प्रकारें जाळणारी सुद्धा आहे, आणि प्लीहेला वाळवून टाकणारी आहे. त्या बाणानें मीं तुला छातींत वेधतों. [३]

हा कामाचा बाण विशेष रीतीनें जाळणारा, शोक वाढविणारा, तोंड सुकविणारा आहे. हे स्त्रिये ! त्यानें वेधलेली तूं माझ्याजवळ ये आणि कोमळ, क्रोधरहित,, मधुरभाषिणी अनुकूल आचरण करणारी आणि केवळ मजवर अनुरक्त होऊन रहाणारी होऊन मजबरोबर रहा. [४]

आजांमि त्वाजन्या परिं मातुरथों पितुः । यथा मम क्रतावसो ममं चित्तमुपायंसि ॥ ५ ॥
व्यस्यै मित्रावरुणौ हृदश्चित्तान्यस्यतम् । अथैनामक्रतुं कृत्वा ममैव कृणुतं वशें ॥ ६ ॥

अर्थ-(त्वा आ-अजन्या) तुला वेगानें (परि मातुः अथो पितुः) तुझ्या मातापित्यांपासून (आ-अजामि) मी घेऊन येतों. (यथा मम क्रतौ असः) ज्यामुळें तूं माझ्या कर्मांना अनुकूल होऊन रहा. (मम चित्तं उपायसि) माझ्या चित्तास अनुकूल होऊन वाग. [५]

हे (मित्रावरुणौ) मित्र आणि वरुण हो ! (अस्यै) हिला (हृदः चित्तानि न्यस्यतं) हृदयाच्या विशेष प्रकारांनीं प्रेरित करा. (अथ एनां अक्रतुं कृत्वा) आणि तिला कर्महीन करून (मम एव वशे कृणुतं) माझ्या ताब्यांत राहील असें करा. [६]

भावार्थ— हे स्त्रिये ! मातापित्यापासून विभक्त करून मीं तुला येथें घेऊन आलों, म्हणून तूं मला अनुकूल कर्म करणारी, माझ्या विचारांना अनुकूल होऊन रहा. [५]

हे मित्र आणि वरुण हो ! या स्त्रीच्या अंतर विचारांना प्रेरित करा, म्हणजे ती मला अनुकूल अशा कर्माशिवाय इतर कामांत रस न घेवो आणि ही धर्मपत्नी मला वश होऊन राहो. [६]

कामाचा बाण

विरुद्ध परिमाणालंकार

विरुद्ध परिणामालंकाराचें हें सूक्त उत्तम उदाहरण आहे. जें आपण म्हणतों त्याच्या उलट घडतें त्यास ' विरुद्ध परिणामालंकार ' म्हणतात. बोललेल्या शब्दांचा जो स्पष्ट अर्थ आहे त्याहून अगदीं विरुद्ध आशय, अर्थ अथवा भावना ज्यांत असतात त्याला विरुद्ध परिणामालंकार म्हणतात. त्याचीं एक दोन उदाहरणें पहा—

(१) ' हृदयास जाळणारी, धनाचा नाश करणारी, कुटुंबांत कलह उत्पन्न करणारी आणि शरीरास शुष्क करणारी दारु प्या. ' या वाक्यांत दारु पिण्याचा उपदेश आहे, तरी दारूच्या दुष्ट परिणामाचें इतकें स्पष्ट वर्णन केलें आहे की त्यामुळें ऐकणाराची प्रवृत्ति दारु न पिण्याची होते.

(२)' ज्यामुळें शरीर पुष्ट होतें आणि ब्रह्मचर्य पालन होण्याच्या कारणानें आरोग्य, बल आणि दीर्घ जीवन निःसंदेह प्राप्त होतें. या रीतिची आसन प्राणायामादि योगसाधनें चुकूनहि करूं नका. ' या वाक्यांत योगसाधनांचा निषेध आहे, पण ऐकणाराचें मनावर योगसाधन अवश्य केलें पाहिजे हीच भावना स्थिर होते.

हा भाषेचा काव्यालंकार आहे. योग्य ठिकाणीं असे अलंकार वापरल्यानें त्यांचा चांगला परिणाम होतो. आतां या सूक्ताचें काय म्हणणें आहे तें पाहूं—

' हे स्त्रिये ! कामाच्या बाणानें मीं तुला विंधतों. त्या कामाच्या बाणाला ' मानसिक व्यथा ' रूपीं सुंदर पिसें लावलीं आहेत, त्याच्या लोखंडी अग्रभागाच्या जागीं मानसिक विकाररूपीं शल्य योजलें आहे. मनाच्या ' कुसंकल्पाची दांडी मध्यें आहे. असा हा कामाचा बाण तयार केलेला आहे. तो बाण फार जाळणारा आहे. तो लागल्यानें मुख आणि प्लीहा वाळून जातात, हृदय जळतें. या प्रकारें कामाच्या विध्वंसक बाणानें मीं तुझा वेध करतों. त्यानें तूं वेधून जा. '

यांत कामाच्या बाणानें तूं वेधून जा असें म्हटलें असलें तरी कामाच्या बाणाचें असें भयानक वर्णन केलें आहे कीं त्याचा परिणाम ऐकणारावर, या कामाच्या बाणापासून स्वतःचें रक्षण केलें पाहिजे असाच होतो. या सूक्तांत कामाच्या बाणाच्या वर्णनाचे जे शब्द आहेत ते आतां पहा—

कामाचा बाण

१. **उत्तुदः**— दुःख देणारा, शरीरास क्षीण करीत पीडा देणारा. (मं. १)

२. **भीमा इषुः**— ज्याचा परिणाम भयंकर आहे असा भयानक बाण. (मं. १)

३. **आधीपर्णा**— या बाणास मानसिक व्यथेचीं पिसें लावलीं आहेत. (मं. २)

४. कामशल्या- स्वार्थाचें प्रबळ इच्छारूपीं अथवा कामविकाररूपीं शल्य ज्याला बसविलें आहे. बाणाचा जो अग्र भाग असतो, तो लोखंडाचा तीक्ष्ण धार चढवलेला असा असतो. तो येथें कामविकार आहे. (मं. २)

५. संकल्प-कुल्मला- मनाच्या कामविषयक संकल्परूपी दांडीनें हा बाण तयार केला आहे. (मं. २)

६. प्राचीन-पक्षा- त्याला मानसिक पीडारूपीं जीं पिसें जडविलीं आहेत तीं एवढ्यासाठीं कीं त्यामुळें हा बाण सरळ आणि फार त्वरेनें जाऊन लक्ष्य साधतो. (मं. ३)

७. शुचा (शुक्)- शोक उत्पन्न करणारा. (मं. ४)

८. व्योषा (वि-ओषा)- विशेष रीतीनें जाळणारा. (मं. ३, ४)

९. शुष्कास्या (शुष्क-आस्या)- तोंडास सुकविणारा, तोंडास म्लान करणारा. (मं. ४)

१०. प्लीहानं शोषयति- प्लीहेला सुकविणारा. शरीरांत प्लीहा रक्त वाढवून तद्द्वारा शरीर आरोग्यसंपन्न ठेवते. अशा महत्त्वपूर्ण अवयवाचा नाश कामाग्नीनें होतो. एवढी मारकता-दाहकता या मदन-बाणांत आहे.

११. हृदि विध्यति- त्याचें वेधणें हृदयाला असतें. त्यामुळें हृदय विदारण होतें. हृद्रोगाची उत्पत्ति कामाच्या वृद्धीमुळें होते. (मं. १-३)

कामाच्या बाणाचें असें भयंकर वर्णन या शब्दांनीं प्रस्तुत सूक्तांत केलें आहे. ' हे स्त्रिये ! अशा भयंकर बाणानें मीं तुला वेधतों,' असें एक मनुष्य आपल्या धर्मपत्नीला सांगत आहे. पति स्वतः जाणतो कीं तो ज्या बाणानें तिला वेधणार आहे तो भयंकर विघातक आहे. या बाणानें फक्त वेधलेलेच दुःखी होतील, अथवा जखमी होतील असें नाहीं पण वेध करणारे म्हणजे बाण मारणारे स्वतः सुद्धां वेधले जातात. म्हणजे जर पतीनें हा कामबाण आपल्या धर्मपत्नीवर फेंकला तर धर्मपत्नीलाच तो वेधतो असें नव्हे तर पतीलाहि जखमी करतो, आणि वर सांगितलेले अकरा दुष्परिणाम घडवितो. ही गोष्ट स्वतः पति जाणतो तरी पति म्हणतो कीं, ' हे स्त्रिये ! अशा बाणानें मीं तुला वेधतों. '

हें पतीचें भाषण धर्मपत्नी ऐकते, म्हणजे कामाच्या बाणाच्या भयंकर विध्वंसक शक्तीशीं ती परिचित होते, आणि कदाचित् कोणी स्त्री न समजूं शकली तर या शब्दांनीं कामव्यवहार किती घातक आहे हें ती जाणूं शकेल. इतकें झाल्यानंतर ती धर्मपत्नी स्वतःच्या पतीला म्हणेल कीं, ' हे प्राणनाथा ! असल्या भयंकर घातक कार्यांत तुम्ही पडूं नका. ' जें कर्म करावयाचें त्याच्या भयानक घातक परिणामाची जाणीव झाल्यावर तें कर्म होऊं शकणार नाहीं. जेवढें आवश्यक तेवढेंच केलें जाईल. कमी जास्त होणार नाहीं.

पति-पत्नीचें एकमत

या सूक्तांत सांगितलेली हकीकत पति स्वतःच्या धर्मपत्नीला सांगतो. ' ही धर्मपत्नी स्वतःच्या आईबापांचें घर सोडून पतिच्या घरीं त्याच्यासह रहावयास आली आहे. ' (पहा मं. ७) धर्मपत्नी तरुण आहे. अशा वयांत मनाचा संयम करणें कठीण. तरुण मनें भोग भोगण्याची इच्छा करणारी असतात. परंतु हा काम असा असतो कीं—

समुद्र इव हि कामः । नैव हि कामस्यान्तोऽस्ति न समुद्रस्य ॥ (तै. ब्रा. २।२।५।६)
कामः पशुः ॥ (प्राणाग्नि उ. ३-४)

' काम समुद्रासारखा आहे, कारण ज्याप्रमाणें समुद्राचा अंत लागत नाहीं त्याप्रमाणें कामाचा सुद्धां अंत असत नाहीं. ' तसेंच ' काम पशु आहे. '

हा कामभोग भोगल्यानें कमी होत नाहीं परंतु वाढतो. तो स्वतः पशु असल्यानें त्याचे उपासक पशुरूप बनतात. जो अशा पशुरूप कामास स्वतःमध्यें वाढूं देतो, ज्याच्यांत असा पशुभाव वाढला असेल त्याला मनुष्य समजणें कठीण आहे, असेंच समजावें. कारण मनन करणाऱ्याला मनुष्य म्हणतात, आणि काम मनन करण्याची शक्ति नष्ट करतो. काम मनांत निर्माण होतो आणि तेथें वाढतो. यामुळें जर तारुण्यांत कामास मनांत वाढूं दिलें तर तो मनुष्याच्या मनास विवेकभ्रष्ट करतो.

आतां आपण चालू विषयाकडे वळूं. धर्मपत्नी दुसरीकडून आपल्या घरीं आलेली असते. स्वतःचे मातापिता, भाऊ बहिण, इतर आप्तसोयरे सर्वांस सोडून ती या घरीं आली आहे आणि पतीला स्वतःच्या तन-मनाचा स्वामी मानते. याप्रकारें स्त्री पतिजवळ येऊन राहिल्यामुळें त्याची जबाबदारी वाढते. ही जबाबदारी पतीनें समजावयास हवी.

आतां असें पहा कीं मातापित्याच्या घरून या घरीं सुख मिळविण्याच्या इच्छेनें आलेल्या स्त्रीला तिच्या तारुण्यधर्माप्रमाणें योग्य सुख न मिळालें तर काय होईल ? तिचें मन भडकून उठेल. पति जर यमनियमांत शमदमानें संयम आणि ब्रह्मचर्य पालन करूं लागला तर तो स्वतःच्या गृहस्थधर्माप्रमाणें स्त्रीविषयक कर्तव्यें करूं शकणार नाहीं. पण त्यामुळें परिणाम किती भयंकर होईल ?

त्या स्त्रीच्या मनाची किती अधोगति होण्याचा संभव आहे, याचा विचार वाचकवर्गानें करून पतीची जबाबदारी काय आहे तें समजावें.

शमदम, ब्रह्मचर्य वगैरे सर्व उत्तम आहे. त्यामुळें मनुष्यत्वाचा विकास होतो. हें सगळें जरी खरें असलें तरी लग्न करून गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर त्यांतील जबाबदारी पार पाडलीच पाहिजे. स्वतःस सर्वस्व देणाऱ्या पत्नीच्या मनाचा विचार करावयास हवा. तेंच गृहस्थाचें कर्तव्य आहे. या कर्तव्यपालनांत थोडें वीर्यपतन होत असलें तरी तें करणें जरूरच आहे. स्त्रीनें मातापित्यांचा त्याग करून एक महान् यज्ञ केला आहे तर पतीनें सुद्धां अचल ब्रह्मचर्याचा त्याग करून चल ब्रह्मचर्य स्वीकारून स्वतः थोडा त्याग तिच्यासाठीं करावयास हवाच. तो त्याचा यज्ञ आहे. असें जर तो पति करणार नाहीं तर ती स्त्री असन्मार्गगामी होईल आणि तिच्या पापांत त्यालाहि भागीदार व्हावें लागेल.

या सूक्तांत पति स्वतःच्या स्त्रीचें हृदय कामाच्या बाणानें वेधूं पहातो त्याचा अर्थ हा आहे; म्हणजे पति त्या भयानक बाणाचें वर्णन करून स्त्रीला समजावितो कीं, काम हा भयंकर बाण असून तो मीं तुजवर फेंकतो कारण तसें करणें माझें कर्तव्य आहे. कर्तव्यबुद्धीनें मीं तसें करीत आहें. अर्थात् स्त्री सुद्धां तें ऐकून समजेल कीं कामोपभोगादि विकार जे मनांत उत्पन्न होतात ते किती भयंकर आहेत. त्यांना जर आपण मोकळीक दिली, संयम न पाळला तर आपली काय भयंकर स्थिति होईल ?

अशा विचारामुळें त्या स्त्रीच्या मनांत जेव्हां कामविकार उद्भवेल तेव्हां ती पतीनें या सूक्तांत सांगितलेल्या मार्गानें जाईल, आणि पतिसुद्धां स्त्रीच्या मनाचा संयम वाढविण्यास मदत करील तर अंतीं दोघांचें कल्याण होईल.

पण जर पति स्त्रीच्या कामविकारास जबरदस्तीनें अडवून ठेवील, तर त्या स्त्रीमध्यें वासना फार वाढेल आणि अंतीं तिचा अधःपात होईल यांत कांहींच शंका नाहीं; म्हणून तिचा अधःपात न व्हावा या हेतूनें, स्त्री ऋतुमती झाल्यानंतर गृहस्थधर्माचें पालन करण्याविषयींचे नियम अस्तित्वांत आले. याच्याबरोबरच कामाच्या भयंकरतेचा विचारसुद्धां जर करण्यांत येईल तर त्यांतून सुटण्यासाठीं स्त्री-पुरुषांची प्रवृत्ति आपोआप होत राहील. यासाठीं जरूर तेवढा संयम पुरुषानें पाळावा आणि स्त्रीनेंसुद्धां पतीला अनुकूल धर्माचरण करणारी होण्याचा प्रयत्न करावा. हें सर्व होण्यासाठीं पति स्वतः विचारी, सुविचार जागृत ठेवणारा असला पाहिजे आणि त्यानें प्रार्थनेनें देवांची मदत मिळविली पाहिजे. म्हणूनच ६ व्या मंत्रांत मित्रावरुणांची प्रार्थना केली आहे— ' हे देव हो ! या धर्मपत्नीस मला अनुकूल करा, आणि तिला मला अनुकूल होऊन धर्माचरण करण्याची बुद्धि द्या. या धर्मपत्नीच्या मनांत अशा विचारांचें प्रवर्तन करा कीं ती इतर कांहीं दुसरे विचार मनांत न आणतां मला अनुकूल होऊन धर्माचरण करीत राहील आणि इतर दुसऱ्या कोणत्या कर्मांकडे तिचें मन धावणार नाहीं. ' (मं. ६)

पतीनें पत्नीविषयीं अशी दक्षता राखलीच पाहिजे. पतीनें पत्नीला संतुष्ट ठेवावें, आणि तिला संयमाच्या मार्गानें चालवावें. धर्मपत्नीचे गुण या सूक्तांत असे सांगितले आहेत—

१. **मृदुः**– कोमल, नाजुक, शांतस्वभावाची. (मं. ४)

२. **निमन्युः**– क्रोध न करणारी, शांतीनें धैर्य धरून कार्य करणारी. (मं. ४)

३. **प्रियवादिनी**– मधुर भाषण करणारी. (मं. ४)

४. **अनुव्रता**– पतीला अनुकूल होऊन कार्य करणारी. (मं. ४)

५. **(मम) वशा**– पतीला वश रहाणारी, पतीच्या आज्ञेंत वर्तणारी. (मं. ७)

६. **केवली**– एकट्या पतीचीच होऊन रहाणारी. (मं. ४)

७ **(मम) चित्तं उपायसि**– पतीच्या चित्ताप्रमाणें स्वतःचें चित्त करणारी. (मं. ५)

८. **अक्रतुः**– पतिविरुद्ध कोणतेंहि कार्य न करणारी. (मं. ६)

९. **(मम) क्रतौ असः**– पतीच्या उद्योगांत सहाय्य करणारी. (मं. ५)

हे सर्व शब्द धर्मपत्नीचें कर्तव्य दाखवितात. वाचकांनीं त्याचा विचार करावा आणि आर्य स्त्रीसाठीं हा अमूल्य उपदेश अंगीं बाणविण्याचा प्रयत्न करावा.

गृहस्थधर्म

याप्रमाणें अनुकूल कर्म करणाऱ्या धर्मपत्नीला पति म्हणतो कीं, ' हे स्त्रिये ! मीं तुला अशा भयंकर कामाच्या बाणानें वेधतों. ' पतीला माहित आहे कीं हा कामाचा बाण भयंकर आहे, ब्रह्मचर्यांत विघ्न करणारा असल्यानें पुष्कळ नुकसान करणारा आहे. धर्मपत्नी पतीला अनुकूल होऊन वागणारी असली तर पतीच्या सांगण्यानें ती सुद्धां समजते कीं हा कामाचा बाण तपश्चर्येंत बाध करणारा आहे. पण दोघांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला असल्यामुळें संतानोत्पत्तिसाठीं तें त्यांचें कर्तव्य झालें आहे म्हणून गृहस्थ धर्माप्रमाणें वागलेंच पाहिजे. धर्मनियमानुसार ऋतुगामी होऊन घरांत वंश पुढें चालविण्यास बीजरूप बालक उत्पन्न करून तपश्चर्येस लागावें.

या सूक्ताचा महत्त्वपूर्ण उपदेश या दृष्टीनें पाहिला पाहिजे.

*

वीर पुत्राची उत्पत्ति

कांड ३, सूक्त २३

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- चन्द्रमाः, योनिः, द्यावापृथिवी ।)

येन वेहद्बभूविथ नाशयामसि तत्त्वत् । इदं तदन्यत्र त्वदप दूरे नि दध्मसि ॥ १ ॥
आ ते योनिं गर्भ एतु पुमान्बाण इवेषुधिम् । आ वीरोऽत्र जायतां पुत्रस्ते दशमास्यः ॥ २ ॥
पुमांसं पुत्रं जनय तं पुमाननु जायताम् । भवासि पुत्राणां माता जातानां जनयाश्च यान् ॥ ३ ॥
यानि भद्राणि बीजान्यृषभा जनयन्ति च । तैस्त्वं पुत्रं विन्दस्व सा प्रसूर्धेनुका भव ॥ ४ ॥
कृणोमि ते प्राजापत्यमा योनिं गर्भ एतु ते ।
विन्दस्व त्वं पुत्रं नारि यस्तुभ्यं शमसच्छमु तस्मै त्वं भव ॥ ५ ॥

अर्थ— (**येन वेहत् बभूविथ**) ज्या कारणानें तूं वांझ राहिली आहेस, (**तत् त्वत् नाशयामसि**) तें कारण आम्हीं तुझ्यांतून दूर करतो, (**तत् इदं**) तें हें वंध्यत्व (**अन्यत्र त्वत् दूरे**) दुसऱ्या जागीं तुझ्यापासून दूर (**अप नि दध्मसि**) आम्हीं घेऊन जातो. [१]

(**पुमान् गर्भः ते योनिं आ एतु**) पुरुष गर्भ तुझ्या गर्भाशयांत येवो. (**बाणः इषुधिं इव**) ज्याप्रमाणें बाण त्याच्या भात्यांत असतो. (**अत्र ते**) येथें तुझा (**दशमास्यः वीरः पुत्रः आ जायतां**) दहा महिने गर्भांत राहून वीर पुत्र उत्पन्न होवो. [२]

(**पुमांसं पुत्रं जनय**) पुरुष संतान उत्पन्न कर (**तं अनु पुमान् जायतां**) त्यानंतरहि पुत्रच होवो. या प्रकारें तूं (**पुत्राणां माता भवासि**) पुत्रांची माता हो. (**जातानां यान् च जनयाः**) जे पुत्र जन्मले आहेत आणि यानंतर ज्यांना तूं जन्म देशील. [३]

(**यानि च भद्राणि बीजानि**) जीं कल्याण कारक बीजें आहेत आणि ज्यांना (**ऋषभाः जनयन्ति**) ऋषभ नांवाच्या वनस्पती उत्पन्न करतात. (**तैः त्वं पुत्रं विन्दस्व**) त्यांचपासून तूं पुत्र उत्पन्न कर, (**सा प्रसूः**) तशी प्रसवणारी तूं (**धेनुका भव**) गाईप्रमाणें उत्तम माता हो. [४]

(**ते प्राजापत्यं कृणोमि**) तुझ्यासाठीं प्रजा होण्याचा संस्कार मीं करतो. (**गर्भः ते योनिं एतु**) गर्भ तुझ्या योनींत येऊन राहो. हे (**नारि**) स्त्रिये ! (**त्वं पुत्रं विंदस्व**) तूं पुत्र प्राप्त कर. (**यः तुभ्यं शं असत्**) जो तुला कल्याणकर होवो. आणि (**च त्वं उ तस्मै शं भव**) तूं खात्रीनें त्याचें कल्याण करणारी हो. [५]

भावार्थ— हे स्त्रिये ! ज्या दोषांच्या कारणामुळें तुझ्या गर्भाशयांत गर्भधारणा होत नाहीं आणि तूं वंध्या झाली आहेस तो दोष मीं तुझ्या गर्भाशयापासून दूर करतों, आणि पूर्णपणें तो दोष तुझ्यापासून दूर करतों. [१]

तुझ्या गर्भाशयांत पुरुषगर्भ उत्पन्न होवो. तो गर्भ तेथें दहाव्या महिन्यापर्यंत राहो आणि उत्तम प्रकारें पुष्ट होऊन तुला उत्तम वीरपुत्र होवो. [२]

पुरुषसंतान उत्पन्न कर आणि त्यानंतर दुसराहि मुलगाच होवो.. या प्रकारें तूं अनेक पुत्रांची माता हो. [३]

ऋषभ वगैरे वनस्पतींच्या उत्तम बीजांचें तूं पुत्रप्राप्तीसाठीं सेवन कर आणि उत्तम वीरपुत्रांना जन्म दे. [४]

प्रजा उत्पन्न होण्याचा प्राजापत्य संस्कार तुझ्यासाठीं मीं करतों. त्यामुळें तुझ्या गर्भाशयांत पुरुषगर्भ उत्पन्न होईल, आणि तूं पुत्रसंतति उत्पन्न कर. तो पुत्र तुझें कल्याण करो, आणि तूं त्याचें कल्याण कर. [५]

यासां द्यौः पिता पृथिवी माता समुद्रो मूलं वीरुधां बभूव ।
तास्त्वा पुत्रविद्याय दैवीः प्रावन्त्वोषधयः ॥ ६ ॥

अर्थ— (यासां वीरुधां) ज्या औषधींचा (द्यौः पिता) द्युलोक पिता आहे, (पृथिवी माता) भूमि माता आहे (समुद्रः मूलं) समुद्र मूळ (बभूव) झाला आहे. (ताः दैवीः ओषधयः) त्या दिव्य औषधि (त्वा पुत्रविद्याय) तुझें पुत्रप्राप्तिसाठीं (प्र अवन्तु) विशेष रक्षण करोत. [६]

भावार्थ— ज्या औषधी पृथ्वीवर होतात, ज्यांचें पालन दिव्य शक्तींकडून होतें, जी समुद्रांत निर्माण होतें, त्या दिव्य वनस्पतींचें सेवन पुत्रप्राप्तिसाठीं तूं कर. त्यानें तुझ्या गर्भाशयाचे दोष दूर होऊन तुला उत्तम संतति होईल. [६]

वीरपुत्राचा जन्म

वंध्या स्त्रीचें वंध्यत्व दूर करून तिला उत्तम वीरपुत्र होण्यालायक ' माता ' करणें हा या सूक्ताचा साध्य विषय आहे. पहिल्या तीन मंत्रांत मंगल विचारांनीं आंतरिक परिवर्तन सुचविलें आहे. जर कोणा स्त्रीस यौवनांत मनाचा निश्चय होऊन वाटलें कीं स्वतःचें वंध्यत्व दूर झालें आहे तर त्याप्रमाणें शरीराच्या आंत सुद्धां अनुकूल परिवर्तन होण्याचा संभव आहे. जर इंद्रियविषयक कांहीं मोठी उणीव नसेल तर या मानसिक विचारपरिवर्तनानें अवश्य सिद्धि मिळते.

या कार्यासाठीं ' प्राजापत्य इष्टि ' चा प्रयोग ५ व्या मंत्रांत सांगितला आहे. ऋषभक वगैरे दिव्य औषधींचें हवन, त्याच्या बीजांचें विधिपूर्वक सेवन करण्याचें विधान ४ थ्या मंत्रांत सांगितलें आहे. ऋषभक औषधींचा एक गण आहे. या औषधि वीर्य वाढवणाऱ्या, शरीर पुष्ट करणाऱ्या आणि गर्भाशयाचे दोष दूर करणाऱ्या आणि तेथील आरोग्य वाढविणाऱ्या आहेत. या वनस्पतींचें हवन करावें, त्यांचें सेवन करावें आणि आरोग्यपूर्ण विचार मनांत धारण करावा. या तीन उपायांनीं वंध्यत्व दूर करण्याचें या सूक्तांत सांगितलें आहे.

यजमानानें धर्मभावनेनें हा प्राजापत्य यज्ञ करावा. यज्ञशेष आहुतिरस पत्नीला प्यावयास द्यावा आणि प्रथम तीन मंत्रांत सांगितलेले आरोग्यदायक विचार आशीर्वाद रूपानें सांगावें— ' हे स्त्रिये ! तुझ्यामध्यें जे वांझपणाचे दोष होते ते या प्राजापत्य इष्टीनें दूर झाले आहेत. आतां तुझ्या गर्भाशयांत पुरुषगर्भ उत्पन्न होईल. तेथें तो वीर बालक दहा महिनेपर्यंत पुष्ट होत राहील आणि नंतर योग्य समयीं उत्पन्न होईल. आतां तूं अनेक पुत्रांची माता होशील. ' (मं. १-३)

या प्रकारें मनःपूर्वक दिलेल्या आशीर्वादांनीं आणि त्या आशीर्वादाचा अचल निश्चयानें स्वीकार केल्यानें आंतरिक जरूर ते आवश्यक फेरफार होतात. ' शिवसंकल्पद्वारा चिकित्सा ' करण्याची ही पद्धति आहे. याविषयीं पुष्कळ सूक्तें अथर्ववेदांत आहेत.

या सूक्तांत ' ओषधयः ' शब्द बहुवचनांत आहे त्यावरून अनुमान करतां येतें कीं या सेवनविधींत अनेक औषधि असतील. उत्तम वैद्यांनीं त्याविषयीं संशोधन करावयास हवें.

गर्भधारणा

कांड ५, सूक्त २५

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - योनिगर्भः, पृथिव्यादयो देवताः ।)

पर्वताद्दिवो योनेरङ्गादङ्गात्समाभृतम् । शेपो गर्भस्य रेतोधाः सरौ पर्णमिवा दधत् ॥ १ ॥

अर्थ— (पर्वतात् दिवः) पर्वतापासून द्युलोकापर्यंत जे पदार्थ आहेत त्यांच्या (अंगात् अंगात् सं आभृतं) अंगप्रत्यंगांतून एकत्र केलेलें (योनेः) योनिस्थानांत (रेतोधाः शेपः) वीर्याची स्थापना करणारें पुरुषेंद्रिय (सरौ पर्णं इव) पाण्याच्या प्रवाहांत पडलेल्या पानाप्रमाणें (गर्भस्य आदधत्) गर्भाच्या बीजाचें आधान करतें. [१]

यथेयं पृथिवी मही भूतानां गर्भमादुधे । एवा दधामि ते गर्भं तस्मै त्वामवसे हुवे ॥ २ ॥
गर्भं धेहि सिनीवालि गर्भं धेहि सरस्वति । गर्भं ते अश्विनोभा धत्तां पुष्करस्रजा ॥ ३ ॥
गर्भं ते मित्रावरुणौ गर्भं देवो बृहस्पतिः । गर्भं त इन्द्रश्चाग्निश्च गर्भं धाता दधातु ते ॥ ४ ॥
विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु । आ सिञ्चतु प्रजापतिर्धाता गर्भं दधातु ते ॥ ५ ॥
यद्वेद राजा वरुणो यद्वा देवी सरस्वती । यदिन्द्रो वृत्रहा वेद तद्गर्भकरणं पिब ॥ ६ ॥
गर्भो अस्योषधीनां गर्भो वनस्पतीनाम् । गर्भो विश्वस्य भूतस्य सो अग्ने गर्भमेह धाः ॥ ७ ॥
अधि स्कन्द वीरयस्व गर्भमा धेहि योन्याम् । वृषासि वृष्ण्यावन्प्रजायै त्वा नयामसि ॥ ८ ॥
वि जिहीष्व बार्हत्सामे गर्भस्ते योनिमा शयाम् । अदुष्टे देवाः पुत्रं सोमपा उभयाविनम् ॥ ९ ॥
धातः श्रेष्ठेन रूपेणास्या नार्या गवीन्योः । पुमांसं पुत्रमा धेहि दशमे मासि सूतवे ॥ १० ॥
त्वष्टः श्रेष्ठेन रूपेणास्या नार्या गवीन्योः । पुमांसं पुत्रमा धेहि दशमे मासि सूतवे ॥ ११ ॥

अर्थ— (यथा इयं मही पृथिवी) ज्याप्रमाणें ही मोठी पृथ्वी (भूतानां गर्भं आदधे) समस्त भूतांचा गर्भ धारण करते (एवा ते गर्भं दधामि) त्याप्रकारें तुझा गर्भ धारण करते. (तस्मै अवसे त्वां हुवे) त्याच्या रक्षणासाठीं तुला बोलविते. [२]

हे (सिनीवालि) अल्पचंद्र असणाऱ्या रात्री देवि ! (गर्भं धेहि) गर्भ धारण कर. हे (सरस्वति) ज्ञानदेवि ! (गर्भं धेहि) गर्भ धारण कर. (उभौ पुष्करस्रजौ अश्विनौ) कमलमाला धारण करणारे दोघे अश्विनी देव (ते गर्भं आधत्तां) तुझ्या गर्भास धारण करोत. [३]

(मित्रा-वरुणौ ते गर्भं) मित्र आणि वरुण तुझ्या गर्भास पुष्ट करोत. (देवः बृहस्पतिः गर्भं) देव बृहस्पति तुझ्या गर्भास धारण करो. (इंद्रः च अग्निः च ते गर्भं) इंद्र आणि अग्नि तुझ्या गर्भास धारण करोत. (धाता ते गर्भं दधातु) धाता तुझ्या गर्भास धारण करो. [४]

(विष्णुः योनिं कल्पयतु) विष्णु योनीला समर्थ करो. (त्वष्टा रूपाणि पिंशतु) त्वष्टा रूपाला अवयव युक्त करो. (प्रजापतिः आसिंचतु) प्रजापति गर्भाला सिंचन करो, (धाता ते गर्भं दधातु) धाता तुझ्या गर्भास धारण करो. [५]

(यत् राजा वरुणः वेद) जें वरुण राजा जाणतो, (वा यत् देवी सरस्वती) अथवा जे देवी सरस्वती जाणते, (यत् वृत्रहा इन्द्रः वेद) जें वृत्राचा नाश करणारा इंद्र जाणतो, (तत् गर्भकरणं पिब) त्या गर्भास स्थिर करणाऱ्या रसाचें पान कर. [६]

(ओषधीनां गर्भः असि) तूं औषधींचा गर्भ आहेस, आणि (वनस्पतीनां गर्भः असि) तूं वनस्पतींचा गर्भ आहेस. तू (विश्वस्य भूतस्य गर्भः) सर्व भूतमात्रांचा गर्भ आहेस, हे अग्ने ! (सः इह गर्भं आधाः) तो तूं येथें गर्भास धारण कर. [७]

(अधिस्कंध) उठून उभा रहा, (वीरयस्व) वीरता धारण कर, (योन्यां गर्भं आधेहि) योनींत गर्भाची स्थापना कर. हे (वृष्ण्यावन् ! वृषा असि) वीर्यवान् ! तूं बलवान् आहेस. (त्वा प्रजायै नयामसि) तुला केवळ प्रजेसाठींच आम्हीं नेत आहोंत. [८]

हे (बार्हत्सामे) बृहत्साम गाणाऱ्या स्त्रिये ! तूं (विजिहीष्व) विशेष प्रकारें तयार हो ! (ते योनिं गर्भः आशयां) तुझ्या योनींत गर्भ स्थिर होवो. (सोमपाः देवाः उभयाविनं पुत्रं ते अदुः) सोमपान करणाऱ्या देवांनीं तुमचें दोघांचें रक्षण करील असा पुत्र तुला दिला आहे. [९]

सवितः श्रेष्ठेन रूपेणास्या नार्या गवीन्योः । पुमांसं पुत्रमा धेहि दशमे मासि सूतवे ॥ १२ ॥
प्रजापते श्रेष्ठेन रूपेणास्या नार्या गवीन्योः । पुमांसं पुत्रमा धेहि दशमे मासि सूतवे ॥ १३ ॥

अर्थ— हे (**धातः**) धाता ! आणि हे (**त्वष्टः**) रूप बनवणाऱ्या देवा ! हे (**सवितः**) उत्पादक देवा ! हे (**प्रजापते**) प्रजापालक देवा ! (**अस्याः नार्याः गवीन्योः**) या स्त्रीच्या दोन्ही गर्भधारक नाड्यांच्या मध्यें (**श्रेष्ठेन रूपेण पुमांसं पुत्रं आ धेहि**) उत्तम सुंदर रूपानें युक्त पुरुषसंतति स्थापन करा. (**दशमे मासि सूतवे**) दहाव्या महिन्यांत उत्पन्न होण्यालायक त्यास करा. [१०-१३]

गर्भाची सुरक्षितता

गर्भाच्या संरक्षणासाठीं परमेश्वराची तशीच इतर देवतांची प्रार्थना या सूक्तांत करण्यांत आली आहे. अशा प्रकारच्या प्रार्थने-मुळें मानसशक्तिच्या जागृतिद्वारा पुष्कळ फायदा होतो. त्याशिवाय या सूक्तांत गर्भविषयक दुसरी पुष्कळ उपयुक्त माहिती सुद्धां सांगितली आहे, त्याचा थोडा विचार येथें करणें जरुरीचें आहे.

पृथ्वीवरील पर्वतापासून द्युलोकापर्यंत या द्यावापृथिवीमध्यें जेवढे पदार्थ आहेत त्या सर्वांच्या अंगप्रत्यंगांतून अंश घेऊन हे सर्व अंश विशिष्ट प्रकारें एकत्र केल्यानें गर्भ तयार करण्यांत येतो, हें प्रथम मंत्रांत सांगितलें आहे. म्हणजे या गर्भात ज्याप्रमाणें सूर्य चंद्राचे अंश आहेत त्याप्रमाणें वायु आणि जल यांचेंहि आहेत; तसेंच औषधि-वनस्पतींचे अंशसुद्धां आहेत. जें ब्रह्मांडांत आहे तें पिंडांत आहे, म्हणजेच पिंड हा ब्रह्मांडाचा अंश आहे. त्याचप्रमाणें पतीच्या अंगप्रत्यंगाचें सत्त्व वीर्यांत येतें, आणि त्या वीर्य-बिन्दूनें गर्भ होतो; म्हणजे गर्भात पित्याच्या अंगप्रत्यंग-गुणदोषाचें सत्त्व आलेलें असतें. या प्रकारें हा गर्भ एक दृष्टीनें ब्रह्मांडाचा सत्त्वांश आहे, आणि दुसऱ्या दृष्टीनें हा गर्भ पित्याचा सत्त्वांश सुद्धां आहे. गर्भात एवढ्या प्रचंड शक्ति असतात म्हणून त्याचें रक्षण उत्तम प्रकारें व्हावयास हवें. त्याची जेवढी उन्नति होईल तेवढे प्रयत्न करावयास हवेत.

मंत्र २ ते ५ पर्यंत देवतांची प्रार्थना आहे कीं सर्व देवांनीं या गर्भाचें रक्षण करावें, त्यासाठीं सहाय्य द्यावें. आणि ज्या देवतांचे अंश येथें सांगितले आहेत त्यांनीं स्वतःच्या शक्तीनें त्याला सुरक्षित ठेवला पाहिजे आणि वाढविला पाहिजे. रक्षण तर देवच करतात एवढी गोष्ट ध्यानांत ठेवावयास हवी. मनुष्यानें त्यांत अडथळा करूं नये. ज्याप्रमाणें बंद खोलींत मनुष्य सूर्यप्रकाशापासून वंचित राहील त्याप्रमाणें इतर देवांच्या रक्षणांपासून अज्ञानामुळें मनुष्य दूर रहातो, म्हणून मनुष्यानें स्वतःच स्वतःला देवतांच्या हातीं सोंपवणें हेंच योग्य होय. असें केल्यानेंच त्याचें उत्तम रक्षण होईल. गर्भाच्या रक्षणासाठीं सुद्धां गर्भिणी स्त्रीनें वाऱ्यांत तसेंच उन्हांत, इत्यादिमध्यें स्वतः हिंडून फिरून सूर्यादि देवांपासून मिळणारें रक्षण स्वतःला तसेंच गर्भालाहि मिळविलें पाहिजे.

गर्भ उत्तम प्रकारें पुष्ट होऊन दहा महिन्यांत मातेच्या पोटांतून बाहेर आला पाहिजे. ही त्याची पूर्ण वृद्धीची मर्यादा आहे. ती १० व्या मंत्रांत सांगितली आहे.

अन्य मंत्र गर्भाधानविषयक आहेत. ते वाचक सहज समजूं शकतील.

गर्भधारणा

कांड ६, सूक्त १७

(ऋषिः - अथर्वा । देवता - गर्भदृंहणम्, पृथिवी ।)

यथेयं पृथिवी मही भूतानां गर्भमादधे । एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥ १ ॥

अर्थ— (**यथा इयं मही पृथिवी**) ज्याप्रमाणें ही मोठी पृथ्वी (**भूतानां गर्भ आदधे**) प्राणिमात्रांचा गर्भ धारण करते (**एव ते गर्भः**) त्याप्रकारें तुझा गर्भ (**सूतुं अनु सवितवे ध्रियतां**) संतानास अनुकूलतेनें उत्पन्न करण्यासाठीं स्थिर होवो. [१]

यथेयं पृथिवी मही दाधारेमान्वनस्पतीन्। एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥ २ ॥
यथेयं पृथिवी मही दाधार पर्वतान्गिरीन्। एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥ ३ ॥
यथेयं पृथिवी मही दाधार विष्ठितं जगत्। एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥ ४ ॥

अर्थ— (यथा इयं मही पृथिवी) ज्याप्रमाणें ही मोठी पृथ्वी (इमान् वनस्पतीन् दाधार) या वनस्पतींना धारण करते, त्याप्रकारें संतान उत्पन्न करण्यासाठीं गर्भ तुझ्यामध्यें स्थिर होवो. [२]

ज्याप्रकारें ही मोठी पृथ्वी (पर्वतान् गिरीन् दाधार) पर्वत आणि डोंगर यांना धारण करते, त्याप्रमाणें गर्भ तुझ्यामध्यें सुखप्रसूतिसाठीं स्थिर होवो. [३]

ज्याप्रकारें या मोठ्या पृथ्वीनें (विष्ठितं जगत्) विविध प्रकारच्या जगताला धारण केलें आहे, त्याप्रमाणें सुखप्रसूतिसाठीं तूं या गर्भाला धारण कर. [४]

स्त्रीला स्वतःच्या गर्भाशयांत गर्भ स्थिर होण्याची इच्छा होते, ती सफल होण्यास हें सूक्त आशीर्वाद देत आहे.

गर्भदोष-निवारण

कांड ८, सूक्त ६

(ऋषिः – मातृनामा । देवता – मन्त्रोक्ताः ।)

यौ ते मातोन्ममार्ज जातायाः पतिवेदनौ। दुर्णामा तत्र मा गृधदलिंश उत वत्सपः ॥ १ ॥
पलालानुपलालौ शर्कुं कोकं मलिम्लुचं पलीजकम्। आश्रेषं वव्रिवाससमृक्षग्रीवं प्रमीलिनम् ॥२॥
मा सं वृतो मोप सृप ऊरू माव सृपोऽन्तरा। कृणोम्यस्यै भेषजं बजं दुर्णामचातनम् ॥ ३ ॥

अर्थ— (जातायाः ते) उत्पन्न होतांच तुला (यौ पतिवेदनौ) जे पतीला प्राप्त होणारे दोन भाग तुझ्या (माता उन्ममार्ज) मातेनें स्वच्छ केले, (तत्र) त्यांच्यांत (दुर्णामा, अलिंशः उत वत्सपः) दुर्णामा, अलिंश आणि वत्सप हे रोग जंतू (मा गृधत्) न पोहोंचोत. [१]

(पलालानुपलालौ) मांस आणि मांससंबंधीं, (शर्कुं) हिंसक, (कोकं) काम अथवा वीर्यासंबंधीं (मलिम्लुचं पलीजकं) मलीन, पलित रोग, (आश्रेषं) चिकटून रहाणारे, (वव्रिवाससं) रूपाची हीनता करणारे (ऋक्षग्रीवं) अस्वलासारखी मान करणारे (प्रमीलिनं) डोळे बंद करणारे रोग मीं दूर करतों. [२]

(मा सं वृतः) राहूं नकोस, (मा उप सृप) जवळ येऊं नकोस, (ऊरू अंतरा मा अवसृप) दोन्ही मांड्या मध्यें राहूं नकोस, (अस्यै भेषजं कृणोमि) त्याच्यासाठीं औषध करतों. तें औषध (बजं दुर्णामचातनं) बज नावांचें आहे, त्यामुळें दुर्नाम जंतू दूर होतात. [३]

भावार्थ— मूल जन्मतांच स्तनांत आणि अन्यत्र रोग उत्पन्न करणारे जंतु तेथें न पोहोंचोत. [१]

मांसांत उत्पन्न होणारे, हिंसक, वीर्य दोष उत्पन्न करणारे, केस पांढरे करणारे, कुरूपता वाढविणारे, मानेंत रोग उत्पन्न करणारे, डोळ्यांत सुस्ती आणणाऱ्या रोगांना मीं दूर करतों. [२]

रोगजंतू जवळ न राहोत, प्रसवस्थानांत, मांड्यांत न जावोत, तसेंच त्यांना दूर करण्यासाठीं मीं औषध तयार करतों. हें बज नावाचें औषध त्या दुष्ट जंतूंचा नाश करतें. [३]

दुर्णामा च सुनामा चोभा संवृतमिच्छतः । अरायानप हन्मः सुनामा स्त्रैणमिच्छताम् ॥ ४ ॥
यः कृष्णः केश्यसुर स्तम्बज उत तुण्डिकः । अरायानस्या मुष्काभ्यां भंससोप हन्मसि ॥ ५ ॥
अनुजिघ्रं प्रमृशन्तं क्रव्यादमुत रेरिहम् । अरायांछ्वकिष्किणो बजः पिङ्गो अनीनशत् ॥ ६ ॥
यस्त्वा स्वप्ने निपद्यते भ्राता भूत्वा पितेव च । बजस्तान्त्सहतामितः क्लीबरूपांस्तिरीटिनः ॥ ७ ॥
यस्त्वां स्वपन्तीं त्सरति यस्त्वा दिप्सति जाग्रतीम् । छायामिव प्र तान्त्सूर्यः परिक्रामन्ननीनशत् ॥ ८ ॥
यः कृणोति मृतवत्सामवतोकामिमां स्त्रियम् । तमोषधे त्वं नाशयास्याः कमलमञ्जिवम् ॥ ९ ॥

अर्थ— (दुर्णामा च सुनामा च उभौ) दुष्ट नांवाचे आणि चांगल्या नांवाचे दोघेहि (सं वृतं इच्छतः) सोबत करूं इच्छितात, त्यांतून (अ-रायान् अप हन्मः) निकृष्टांचा आम्हीं नाश करतों आणि जे (सुनामा) उत्तम नांवाचे आहेत ते (स्त्रैणं इच्छतां) स्त्रीजातीची इच्छा करोत. [४]

(यः कृष्णः) जो काळा (केशी असुरः) केंसयुक्त असुर आहे (स्तंबजः उत तुण्डिकः) जो शरीररूपीं खांबांत अथवा तोंडांत राहतो, त्या (अरायान्) दुष्टांना (अस्याः मुष्काभ्यां) या स्त्रीच्या दोन्ही प्रदेशांतून तसेंच (भंससः) कटी प्रदेशांतून (अपहन्मि) दूर करतों. [५]

(अनुजिघ्रं प्रमृशन्तं) वासानें नाश करणाऱ्या आणि स्पर्श केला असतां नाश करणाऱ्या (क्रव्यादं उत रेरिहं) मांस खाणारे आणि हिंसक, (श्वकिष्किणः अरायान्) कुत्र्याप्रमाणें कष्ट देणारीं आणि निःसत्व करणारीं रोगबीजें यांचा (पिंग बजः अनीनशत्) पिंवळ्या रंगाचें बज नांवाचें औषध नाश करतें. [६]

(भ्राता भूत्वा) भाऊ होऊन, (पिता इव च) अथवा पिता होऊन (त्वा यः स्वप्ने निपद्यते) तुझ्याजवळ जो स्वप्नांत येतो, (क्लीबरूपान् तान् तिरीटिनः) क्लीबरूप अशा त्या गुप्त रोगबीजांना (इतः बजः सहतां) बज औषध येथून दूर करो. [७]

(स्वपन्तीं त्वा यः त्सरति) झोंपलेली असतां जे तुझ्या जवळ येतात, (यः जाग्रतीं त्वा दिप्सति) जे तूं जागी असतां तुजजवळ येऊन कष्ट देतात, (सूर्यः छायां इव) सूर्य ज्याप्रमाणें अंधाराचा नाश करतो, त्याप्रमाणें (परि क्रामन् प्र अनीनशत्) भटकणारे त्यांचा नाश करो. [८]

(यः इमां स्त्रियं) जो या स्त्रीला, (मृतवत्सां अवतोकां कृणोति) मेलेल्या बाळकांना जन्म देणारी अथवा कुप्रसूति होणारी करतो, हे औषधि ! (त्वं अस्याः तं नाशय) तूं तिच्या त्या रोगबीजांचा नाश कर. (कमलं अंजिवं) गर्भद्वाररूपी कमलाला रोगमुक्त कर. [९]

भावार्थ— रोगजंतू दोन प्रकारचे असतात, एक दुष्ट आणि एक हितकारक. दोन्ही जवळ येतात. त्यांतून दुष्ट जंतूस दूर करून चांगलें आहेत त्यांस स्त्रीजाति जवळ राहूं द्यावे. [४]

काळे, केंस असलेले, प्राणघातक तोंड असलेले, शरीर रूपी स्तंभांत रहाणारे, घातकी, क्षीणता वाढविणारे जे जंतू आहेत त्यांना स्त्रियांच्या अवयवांपासून दूर करतों. [५]

कित्येक जंतु वास घेण्यामुळें प्राणघात करतात. कित्येक स्पर्शानें नाश करतात, कित्येक मांसाला क्षीण करतात, कित्येक इतर रीतीनें घातक आहेत, कित्येक पीडा करतात, या सर्व रोगबीजांना पिंवळें औषध दूर करतें. [६]

भाऊ अथवा पित्याच्या रूपानें जे स्वप्नांत येतात, ते निर्बल परंतु घातक असतात. त्यांना या बज औषधीनें दूर करतां येतें. [७]

झोंपेंत अथवा जागृतींत जीं रोगबीजें जवळ येतात त्यांचा, ज्याप्रमाणें सूर्य अंधाराचा नाश करतो त्याप्रमाणें नाश करतो. [८]

जीं रोगबीजें स्त्रीला मृतवत्सा अथवा गर्भपात करणारी करतात त्या रोगबीजांचा नाश कर, आणि त्या स्त्रीचें गर्भस्थान निरोगी कर. [९]

ये शालाः परिनृत्यन्ति सायं गर्दभनादिनः । कुसूला ये च कुक्षिलाः ककुभाः करुमाः स्रिमाः
तानोषधे त्वं गन्धेन विषूचीनान्वि नाशय ॥ १० ॥
ये कुकुन्धाः कुकूरभाः कृत्तीर्दूर्शानि बिभ्रति ।
क्लीबा इव प्रनृत्यन्तो वने कुर्वते घोषं तानितो नाशयामसि ॥ ११ ॥
ये सूर्यं न तितिक्षन्त आतपन्तममुं दिवः ।
अरायान्बस्तवासिनो दुर्गन्धींल्लोहितास्यान्मककान्नाशयामसि ॥ १२ ॥
य आत्मानमतिमात्रमंस आधाय बिभ्रति । स्त्रीणां श्रोणिप्रतोदिन इन्द्र रक्षांसि नाशय ॥ १३ ॥
ये पूर्वे वध्वो३ यन्ति हस्ते शृङ्गाणि बिभ्रतः ।
आपाकेष्ठाः प्रहासिन स्तम्बे ये कुर्वते ज्योतिस्तानितो नाशयामसि ॥ १४ ॥

अर्थ— (**ये गर्दभनादिनः**) जे गाढवासारखा शब्द करतात, (**सायं शालाः परि नृत्यन्ति**) सायंकाळीं घराच्या आजुबाजूस सर्वत्र नाचत फिरतात, (**कुसूलाः कुक्षिलाः**) सुईच्या अग्रासारखे, मोठ्या पोटाचे, (**ककुभाः करुमाः स्रिमाः**) वांकडे तिकडे, वाईट अवाज करणारे आणि नाना रोगजंतू आहेत, हे औषधे ! (**त्वं तान् गंधेन**) तूं त्यांना स्वतःच्या वासानें (**विषूचीनान् विनाशय**) पसरून मारून टाक. [१०]

(**ये कुकुन्धाः कुकूरभाः**) जे वाईट शब्द करणारे आणि थोडे चमकणारे आहेत, (**कृत्तीः दूर्शानि बिभ्रति**) चावणारे आणि दंश करण्याचे अवयव अथवा साधनें असणारे, (**ये घोषं कुर्वते**) जे अवाज करणारे, (**क्लीबा इव वने प्रनृत्यन्तः**) क्लीबाप्रमाणें जंगलांत नाचणारे (**तान् इतः नाशयामसि**) त्यांचा येथून नाश करतों. [११]

(**ये दिवः आपतन्तं अमुं सूर्यं न तितिक्षन्ते**) द्युलोकांतून येणाऱ्या या सूर्याला जे सहन करूं शकत नाहींत, ते (**अरायान् बस्तवासिनः**) सत्त्वहीन करणारे, कातडींत रहाणारे (**दुर्गंधीन् लोहितास्यान्**) वाईट वासाचे रक्तानें तोंड माखलेले, (**मककान् नाशयामसि**) मच्छरांचा येथून नाश करा. [१२]

(**यः आत्मानं अतिमात्रं अंसे आधाय**) जे स्वतःच्या खांद्यांच्या आधारानें वर चढून (**बिभ्रति**) धारण करतात, हे इंद्रा ! त्या (**स्त्रीणां प्रतोदिनः रक्षांसि नाशय**) स्त्रियांच्या गर्भभागाला पीडा करणाऱ्या जंतूंचा नाश कर. [१३]

(**ये पूर्वे हस्ते शृंगाणि बिभ्रतः**) जे प्रथम स्वतःच्या हातांत शिंगें भरून (**वध्वः यान्ति**) स्त्री जवळ जातात, (**ये आपाकेष्ठाः प्रहासिनः**) जे शुद्ध आणि पवित्र स्थानांत रहाणारे आहेत आणि हंसतात, (**ये स्तंबे ज्योतिः कुर्वते**) जे स्तंभांत प्रकाश करतात, (**इतः तान् नाशयामसि**) येथून त्यांचा नाश करतों. [१४]

भावार्थ— गाढवासारखा आवाज करणारीं जीं मच्छरें घराजवळ संध्याकाळीं नाचत, गात, फिरत असतात, ज्यांच्या तोंडांत सुईच्या अग्राप्रमाणें टोंकदार शस्त्र आहे, ज्याचें पोट मोठें, शरीर वेडें वांकडें आणि ज्यांच्या शब्दानें दुःख होतें, ते रोग जंतु, मच्छरें वगैरेचा उग्रवासाची औषधि चारीबाजूंस पसरवून, नाश करतों. [१०]

वाईट शब्द करणारे, सर्व एकत्र मिळून मोठा अवाज करणारे, तोंडांत टोंचण्याचीं अथवा चावण्याचीं साधनें ठेवणारे, जंगलांत नाचणारे, रोग उत्पादक मच्छरासारखे जंतू यांना येथून दूर करा. [११]

द्युलोकांतून प्रकाशणाऱ्या सूर्यप्रकाशाला जे सहन करूं शकत नाहींत, दुर्गंधी युक्त चामडींत जे रहातात, अशा रक्त पिणाऱ्या मच्छरांचा आम्हीं नाश करतों. [१२]

जे स्वतः स्वतःच्या खांद्याच्या आधारानें वर चढतात, ते रोगजंतू स्त्रियांच्या गर्भाशयाचे रोग उत्पन्न करणारे आहेत, त्यांचा नाश करा. [१३]

जे स्वतःजवळ शिंग ठेवतात, स्वयंपाकघरांत रहातात, जे चमकतात आणि स्त्रियांजवळ जाऊन रोग उत्पन्न करतात, त्या रोगजंतूंचा नाश करा. [१४]

येषां पश्चात्प्रपदानि पुरः पार्ष्णीः पुरो मुखा ।
खलजाः शकधूमजा उरुण्डा ये च मट्मटाः कुम्भमुष्का अयाशवः ।
तानस्या ब्रह्मणस्पते प्रतीबोधेन नाशय ॥ १५ ॥
पर्यस्ताक्षा अप्रचङ्कशा अस्त्रैणाः सन्तु पण्डगाः
अव भेषज पादय य इमां संविवृत्सत्यपतिः स्वपतिं स्त्रियम् ॥ १६ ॥
उद्धर्षिणं मुनिकेशं जम्भयन्तं मरीमृशम् । उपेषन्तमुदुम्बलं तुण्डेलमुत शालुडम् ॥
पदा प्र विध्य पार्ष्ण्या स्थालीं गौरिव स्पन्दना ॥ १७ ॥
यस्ते गर्भं प्रतिमृशाज्जातं वा मारयाति ते । पिङ्गस्तमुग्रधन्वा कृणोतु हृदयाविधम् ॥ १८ ॥
ये अम्नो जातान्मारयन्ति सूतिका अनुशेरते । स्त्रीभागान्पिङ्गो गन्धर्वान्वातो अभ्रमिवाजतु ॥ १९ ॥

अर्थ— (येषां प्रपदानि पश्चात्) ज्यांना मागें पाय आहेत, (पार्ष्णीः पुरः) टांचा पुढें आहेत, आणि (मुखाः पुरः) तोंडें सुद्धां पुढेंच आहेत, (खलजाः शकधूमजाः) खळयांत आणि शेणांत निर्माण होणारे, (उरुण्डा ये च मट्मटाः) जे मोठ्या तोंडाचें आणि कष्टदायक, (कुम्भमुष्काः अयाशवः) मोठी अंडीं असणारे आणि गतिमान् असतात, हे ब्रह्मणस्पते ! (अस्याः तान्) या स्त्रीच्या त्या रोगबीजांचा (प्रतिबोधेन नाशय) ज्ञानानें नाश कर. [१५]

(पर्यस्त-अक्षाः) ज्यांचे डोळे बिघडले आहेत, (अ-प्र-चंकशाः) विशेष क्षीण (पण्डगाः) निर्बुद्ध मनुष्य (अ-स्त्रैणाः सन्तु) स्त्रीसुखरहित होवोत. (इमां स्वपतिं स्त्रियं) या स्वतःच्या पतीजवळ रहाणाऱ्या स्त्रीला, जो (अ-पतिः संविवृत्सति) स्वतः कोणाचा पति न होतां प्राप्त करण्याची इच्छा करतो, हे (भेषज) औषधि ! त्याला (अव पादय) खालीं पाडून टाक. [१६]

(स्पन्दना गौः स्थालीं इव) उड्या मारणारी गाय ज्याप्रमाणें दुधाचें भांडें लवंडून देते त्याप्रकारें (पार्ष्ण्या पदा च) टांचा आणि पायांनीं (उद्धर्षिणं मुनिकेशं) ढोंग करणाऱ्या मुनीप्रमाणें केंस धारण करून कपट करणाऱ्या, (जम्भयन्तं मरीमृशं) हिंसक आणि वाईट स्पर्श करणाऱ्या (उपेषन्तं उदुम्बलं) जवळ जाणाऱ्या आणि मारणाऱ्या (तुण्डेलं उत शालुडं) भयानक मुखाच्या दुष्टांना (प्रविध्य) विशेष प्रकारें वेधून टाक. [१७]

(यः ते गर्भं प्रतिमृशात्) जो तुझ्या गर्भाचा नाश करील अथवा (ते जातं वा मारयाति) तुझ्या जन्मलेल्या बालकाला मारतो, (तं) त्याला (उग्रधन्वा पिंगः) उग्रधनुर्धारी पिवळ्या रंगाचा (हृदयाविधं कृणोतु) हृदयांत प्रहार करो. [१८]

(ये अम्नः जातान् मारयन्ति) जे अर्ध उत्पन्न झालेल्या गर्भाला मारतात, जे (सूतिकाः अनुशेरते) प्रसूतिगृहांत रहातात त्यांना (गंधर्वान् स्त्रीभागान्) घाण वास येणाऱ्या स्त्रियांच्या भागांत रहाणाऱ्या रोगजंतूंना (पिंगः) पिंवळ्या रंगाची बज औषधि (वातः अभ्रं इव) वारा वादळांना दूर करतो त्याप्रमाणें (अजतु) दूर करो. [१९]

भावार्थ— ज्यांचे पाय पाठीकडे आहेत आणि टांचा आणि तोंडें पुढें आहेत, जे गाईच्या शेणांत निर्माण होतात, त्या महान् कष्ट देणाऱ्या रोगबीजांना येथून दूर करा. [१५]

ज्यांचे डोळे अशक्त आहेत, जे विशेष क्षीण झाले आहेत, त्यांनीं स्त्रीशीं संबंध करूं नये. जो पुरुष स्वपत्नीस सोडून दुसऱ्याच्या पत्नीशीं कुकर्म करतो, त्याला औषधींनीं खालीं पाडा. [१६]

ज्याप्रमाणें गाय पाय आणि खुरांनीं दुधाचें भांडें लंवडून टाकून फोडून टाकते, त्याप्रमाणें खोटे, मुनिवेशधारी, हिंसक, ढोंगी इत्यादि सर्व प्रकारच्या दुष्ट मनुष्यांना वेधून टाका. [१७]

जे गर्भाचा नाश करतील अथवा उत्पन्न झालेल्या बालकाला खातील त्यांच्या हृदयावर प्रहार करा. [१८]

जे जन्मलेल्या बालकास मारतात, सूतिकागृहांत रहातात, जे स्त्रियांजवळ रहातात, त्या रोगकृमींचा हें पिंवळें औषध नाश करतें. [१९]

*

परिसृष्टं धारयतु यद्धितं माव पादि तत् । गर्भं त उग्रौ रक्षतां भेषजौ नीविभार्यौ ॥ २० ॥
पवीनसात्तङ्गल्वा३च्छायकादुत नग्नकात् । प्रजायै पत्ये त्वा पिङ्गः परि पातु किमीदिनः ॥ २१ ॥
द्व्यास्याच्चतुरक्षात्पञ्चपादादनङ्गुरेः । वृन्तादभि प्रसर्पतः परि पाहि वरीवृतात् ॥ २२ ॥
य आमं मांसमदन्ति पौरुषेयं च ये क्रविः । गर्भान्खादन्ति केशवास्तानितो नाशयामसि ॥ २३ ॥
ये सूर्यात्परिसर्पन्ति स्नुषेव श्वशुरादधि । बजश्च तेषां पिङ्गश्च हृदयेऽधि नि विध्यताम् ॥ २४ ॥
पिङ्ग रक्ष जायमानं मा पुमांसं स्त्रियं क्रन् । आण्डादो गर्भान्मा दभन्बाधस्वेतः किमीदिनः ॥ २५ ॥
अप्रजास्त्वं मार्तवत्समाद्रोदमघमावयम् । वृक्षादिव स्रजं कृत्वाप्रिये प्रति मुञ्च तत् ॥ २६ ॥

अर्थ— (परिसृष्टं धारयतु) उत्पन्न झालेल्या गर्भाला सर्व प्रकारें धारण करो. (यत् हितं तत् मा अव पादि) जो गर्भ ठेवला आहे तो पडून न जावो. (नीविभार्यौ उग्रौ भेषजौ) कपड्यांत धारण करण्यालायक दोन्ही उग्र औषधी आहेत त्या (ते गर्भं रक्षतां) तुझ्या गर्भाचें रक्षण करो. [२०]

(पवीनसात् तंगल्वात्) वज्राप्रमाणें नाकें असलेलें, मोठ्या गालांचें, (छायकात् उत नग्नकात्) काळे आणि नागवे, (किमीदिनः) भुकेल्या रोगजंतूंपासून (प्रजायै पत्ये) प्रजा आणि पतीच्या सुखासाठीं (पिंगः त्वा परिपातु) पिंवळें औषध तुझें रक्षण करो. [२१]

(द्व्यास्यात् चतुरक्षात्) दोन तोंडाचे, चार डोळ्यांचे, (पंचपादात् अनंगुरेः) पांच पायांचे, बोटांशिवायचे, (अभिप्रसर्पतः वरीवृतात् वृन्तात्) पुढें वाढणाऱ्या घेरलेल्या मुळांपासून (परिपाहि) रक्षण करो. [२२]

(ये आमं मांसं अदन्ति) जे कच्चे मांस खातात, (ये च पौरुषेयं क्रविः) आणि जे पुरुषाचें मांस खातात, (केशवाः गर्भान् खादन्ति) केंसयुक्त असें जे गर्भांना खातात, (तान् इतः नाशयामसि) त्यांना आम्हीं येथून दूर करतो. [२३]

(ये सूर्यात् परि सर्पन्ति) जे सूर्यापासून मागें हटतात, (श्वशुरात् स्नुषा इव अधि) ज्याप्रमाणें सासऱ्यापासून सून दूर रहाते (बजः च पिंगः च) बज आणि पिंग (तेषां हृदये अधि निविध्यतां) त्यांच्या हृदयावर वेधोत. [२४]

हे (पिंग) पिंवळ्या औषधा ! (जायमानं रक्ष) उत्पन्न होणाऱ्या बालकाचें रक्षण कर. (पुमांसं स्त्रियं मा क्रन्) पुरुष आणि स्त्रीला मारूं नकोस. (आण्डादः गर्भान् मा दभन्) अंडीं खाणारे गर्भाचा नाश न करोत, (इतः किमीदिनः बाधस्व) येथून भुकेलेल्या जंतूंना दूर कर. [२५]

(अ-प्रजास्त्वं) वंध्यत्व (मार्त-वत्सं) बालक मरणें, (आत् रोदं) रडणें-छाती बडविणें, (अघं आवयं) पापाचा भोग बळी (तत्) हें सर्व दुःख (वक्षात् स्रजं इव) वृक्षावरून फूल पडावें त्याप्रमाणें (अप्रिये प्रतिमुञ्च) अप्रिय स्थानीं सोडून द्या. [२६]

भावार्थ— गर्भाशयांत गर्भाची उत्तम धारणा होवो, गर्भ पडून न जावो. दोन्ही उग्र औषधी गर्भाचें रक्षण करोत. [२०]

प्रजेच्या सुरक्षिततेसाठीं वज्रनासिका असलेले, मोठ्या गालाचे, काळे आणि नग्न, भुकेल्या जंतूपासून पिंवळें औषध तुझें रक्षण करो. [२१]

दोन तोंडाचे, चार डोळ्यांचे, पांच पायांचे, बोटांशिवायचे जे रोगजंतू जवळ येतात त्यांच्यापासून रक्षण होवो. [२२]

जे कच्चे मांस खातात, गर्भ खातात, त्यांचा येथून नाश होवो. [२३]

जे जंतू सूर्यापासून लपून रहातात, सूर्यकिरणास तोंड देऊं शकत नाहींत त्यांचा, हें पिंवळें औषध बज नाश करो. [२४]

उत्पन्न होणाऱ्या बालकाचें रक्षण करा. स्त्रीपुरुषांस दुःख न देतां, अंडीं खाणारे, गर्भाचा नाश न करोत. दुष्टांना येथून दूर करा. [२५]

वंध्यत्व, बालकें मरणें अथवा मेलेली प्रजा होणें, रडण्याची वृत्ति, पापवृत्ति, हे दोष दूर होवोत. वृक्षावरून फूल गळून पडावें त्याप्रमाणें हे सर्व दोष मनुष्यापासून दूर होवोत. [२६]

गर्भदोष-निवारण

प्रसूतीचे दोष

प्रसूतीच्या वेळीं स्त्रियांना निरनिराळे रोग होतात, त्याचें कारण मलीनता, अस्वच्छपणा आहे म्हणून त्या स्थानाची शुद्धता-पवित्रता करून आणि कित्येक औषधांच्या उपयोगानें स्त्रियांच्या प्रसूतीच्या वेळीं होणारे कष्ट दूर केले पाहिजेत. असा महत्त्वपूर्ण विषयाचें वर्णन या सूक्तात आहे. या सूक्ताचा विषय सूक्ताच्या ९ व्या मंत्रांत असा सांगितला आहे—

यः स्त्रियं मृतवत्सां अवतोकां कृणोति
अस्याः तं नाशय कमलं अञ्जिवं (कुरु) ॥ (मं. ७)

' ज्या रोगाच्या कारणानें स्त्रियांचीं बालकें मरतात, अथवा ज्या दोषाच्या कारणानें स्त्रियांचा गर्भपात होतो, त्या स्त्रीचे ते दोष दूर केले पाहिजेत, आणि तिच्या गर्भाशयास निर्दोष केलें पाहिजे. ' हें या सूक्ताचें साध्य आहे. स्त्रियांच्या गर्भाचें पतन न व्हावें आणि बालकें दीर्घायु व्हावींत, असा उपाय करणें हा या सूक्ताचा इच्छित हेतु आहे. हा विषय सर्व स्त्रियांच्या हिताचा असल्याकारणानें फार उपयोगी आहे. सर्व कुटुंबीजन त्यापासून लाभ मिळवूं शकतील. या सूक्तांत म्हटलें आहे कीं प्रसूतिगृहांत कित्येक रोगजंतू असतात, अथवा बाहेरून तेथें शिरतात, त्यांचा नाश करण्यासाठीं ' बज पिंग ' नांवाची औषधि आहे पहा—

ये अम्नः जातान् मारयन्ति सूतिकाः अनुशेरते ।
स्त्रीभागान् पिङ्गः अजतु ॥ (मं. १९)

' जीं रोगबीजें जन्मलेल्या बालकांस मारून टाकतात, तीं सूतिकागृहांत रहातात, तीं स्त्रियांच्या गुप्तभागांत पोहोंचतात, त्यांना दूर करण्यासाठीं पिंग नामक औषधि आहे.' या पिंग औषधीचा विचार आपण नंतर करूं. येथें इतकेंच पहावयाचें कीं हीं रोगबीजें सूतिकागृहाच्या मलीनतेमुळें, अस्वच्छतेमुळें होतात, आणि त्यामुळें गर्भस्राव होतो, गर्भपात होतो, आणि बालक मृत्युमुखीं पावतें. पुष्कळ अज्ञानी लोक सूतिकागृहांत अंधार ठेवतात. तेथें सूर्यप्रकाश पोहोंचू शकत नाहीं. त्यामुळें अंधाराच्या दोषानें हीं रोगबीजें तेथें उत्पन्न होतात आणि वाढतात. हीं रोगबीजें सूर्यप्रकाशांत रहात नाहींत. त्या विषयीं खालीं दिलेला मंत्र पहा—

ये सूर्यात् परिसर्पन्ति स्नुषेव श्वशुरादधि ।
बजः तेषां हृदये अधि निविध्यताम् ॥ (मं. २४)

' ज्याप्रमाणें सासऱ्यापासून सून दूर रहाते त्याप्रमाणें ही रोगबीजें सूर्यप्रकाशापासून दूर पळून जातात. रोगजंतूंच्या छातीवर ही बज औषधि फार मोठा आघात करते. ' येथें दिलेली उपमा योग्य प्रकारें विचार करण्यास लायक आहे. सून सासऱ्याजवळ किंवा त्याच्यासमोर उभी रहात नाहीं. सासरा आला कीं चटकन् बाजूस होते. तेथून निघून जाते. त्याप्रकारें हीं रोजबीजें सूर्यप्रकाशापासून पळून जातात. त्यासमोर उभीं राहूं शकत नाहींत. तीं सूर्यप्रकाशांत जीवंतच राहूं शकत नाहींत. जेथें सूर्यप्रकाश पोहोंचतो, तेथें हीं रोगबीजें असूं शकत नाहींत. म्हणजे जेथें आपणांस निरोगिता करावयाची तेथें सूर्यप्रकाश भरपूर येऊं द्यावा. जर प्रसूतिगृहांतील रोगबीजें नष्ट करण्याची इच्छा असेल तर तेथें सूर्यप्रकाश पुष्कळ प्रकारानें यावा अशी व्यवस्था केली पाहिजे.

बज औषधि त्यांच्या हृदयावर प्रहार करते, असें येथें सांगितलें आहे. त्यावरून त्यांना हृदय आहे, हें सिद्ध होतें. म्हणजे हीं रोगबीजें हृदय असणारीं असल्यानें जंतुरूप आहेत. तीं निर्जीव नाहींत; कारण तीं अंधारांत वाढतात आणि सूर्यप्रकाशांत नष्ट होतात. म्हणून त्यांच्यापासून रक्षणाचा उपाय एक सूर्यप्रकाशच आहे ही गोष्ट निश्चित झाली. परमात्म्यानें सूर्यप्रकाश ही अशी फुकट औषधि मुबलक दिली आहे कीं जिच्यामुळें अनेक रोग बरे होतात, आणि मनुष्य निरोगी आणि दीर्घायु होतो. त्यामुळें म्हटलें आहे कीं—

अप्रजास्त्वं मार्तवत्सं रोदं अघं आवयं प्रतिमुञ्च ।
(मं. २६)

' संतति न होणें, मेलेली होणें, होऊन मरून जाणें, त्यामुळें रडारड, पापाचरणाची प्रवृत्ति वगैरे गोष्टींपासून मनुष्यानें मुक्त व्हावयास हवें. ' म्हणजे मनुष्यानें असा बंदोबस्त करावा कीं घरांत संतति असली, तर उत्पन्न झालेलीं बालकें दीर्घायु व्हावींत, मनुष्याच्या घरांत मरणामुळें रडारडीचा प्रसंग न यावा, सर्व कुटुंबीजन आनंदानें कालक्रमणा करीत रहावेत आणि कोणीहि पापाकडे प्रवृत्ति न करावी. हें सर्व साध्य करण्यासाठीं पुष्कळ सूर्यप्रकाशांत रहाणें जरुरीचें आहे. त्याचा कार्यकारण भाव असा कीं सूर्यप्रकाशानें आरोग्य प्राप्त होतें; रोगबीजें दूर होतात. निरोगी असल्यानें शरीर पुष्ट होतें. मनुष्य वीर्य, बलयुक्त होतो. स्त्रीपुरुषांचीं शरीरें वीर्यवान् आणि हृष्टपुष्ट असल्यानें अशा उभय पतिपत्नीकडून गर्भाधान उत्तम होतें, स्थिर होतें. संतति निरोगी, बलवान्

आणि सुदृढ असेल तर दीर्घजीवी होईल. अशा संततीला अकालीं मृत्यु येणार नाहीं; आणि अकालीं मृत्यु न आल्यानें घरांत रडण्याचे, शोकाचे प्रसंग होण्याचा संभव नाहीं. अशी लाभांची परंपरा आहे. प्रसूतिगृहांत आरोग्य राखल्यानें आणि तें सूर्यप्रकाशानें स्थिर केल्यानें हें सर्व होतें. म्हणून म्हटलें आहे—

यः स्वपन्तीं जाग्रतीं दिप्सति (तं) सूर्यः अनीनशत्। (मं. ८)

'जीं रोगबीजें झोंपलेल्या अथवा जागृत स्त्रीच्या शरीरांत शिरून तिला कष्ट देतात, त्या रोगबीजांचा नाश सूर्य करतो.' हीं सर्व रोगबीजें सूर्यप्रकाशानें दूर होतात. रोगजंतू सुद्धां सूर्यप्रकाशानें दूर होतात असें आजचें विज्ञानहि म्हणतें. मग जर आमचीं प्रसूतिगृहें वेदाज्ञेप्रमाणें तयार करण्यांत आलीं तर किती बरें होईल ? परंतु असा विचार फार थोडे लोक करतात. या सूर्यप्रकाशाचें महत्त्व खालील मंत्रांत विशेष सांगितलें आहे—

ये सूर्यं न तितिक्षन्ते तान् नाशयामसि । (मं. १२)

'जे सूर्याला सहन करूं शकत नाहींत त्या रोगजंतूंचा आम्हीं नाश करतों.' येथें असें सांगितलें आहे की, रोगजंतू सूर्यप्रकाश सहन करूं शकत नाहीं; म्हणजे ते अंधारांत असतात, तेथेंच वाढतात आणि रोग निर्माण करतात. जे सूर्यप्रकाशास सहन करूं शकत नाहींत, ते सूर्यप्रकाशानें नाश पावतील हें तर स्पष्टच आहे. याप्रमाणें सूतिकागृहांत आरोग्य सूर्यप्रकाशानें सहज प्राप्त करतां येण्यासारखें आहे. म्हणून म्हटलें आहे की —

यः गर्भं प्रतिमृशात् जातं वा मारयाति ।
तं पिंगः हृदयाविधं कृणोतु ॥ (मं. १८)

'जे रोगजंतु गर्भाचा नाश करतात, जन्मलेल्या बालकांचा नाश करतात, त्यांना पिंगलवर्णाचा सूर्य (अथवा पिंवळें औषध) हृदयांत वेधो, त्यांचा नाश करो.' येथें 'पिंग' शब्दाचे दोन अर्थ संभवतात. सूर्यसुद्धां पिंगलवर्णाचा असतो आणि वनस्पतिसुद्धां तशीच पिंवळ्या रंगाची आहे. जे रोगजंतू पूर्वी सांगितल्याप्रमाणें सूतिकागृहाच्या अंधारांत मलीनतेच्या कारणानें उत्पन्न होतात ते असें नुकसान करतात—

ये आमं मांसं खादन्ति, ये पौरुषेयं च क्रविः ।
कशवाः गर्भान् खादन्ति तान् इतः नाशयामसि ॥ (मं. २३)

'जे रोगजंतू शरीराचें कच्चें मांस खातात, मानवी शरीराचे मांसल भाग जेथल्या तेथेंच खातात, तेच गर्भाला खातात; म्हणून त्यांचा तेथेंच नाश केला पाहिजे.' त्यांचा नाश सूर्यप्रकाशानेंच होऊं शकतो. हे रोगकृमी जेव्हां शरीरांत प्रवेश करतात तेव्हां तेथील रक्त आणि मांस खाऊन मनुष्याला क्षीण, निर्बल, अशक्त करतात. तेथें गर्भासुद्धां सुकवून टाकतात, म्हणून सूर्यप्रकाशाला शरण जाणें अत्यंत योग्य आहे. म्हणून म्हटलें आहे—

पिंग जायमानं रक्ष पुमांसं स्त्रियं मा क्रन् ।
आण्डादः गर्भान् मा दभन् इतः किमीदिनः बाधस्व ॥ (मं. २६)

'पिंगल वर्ण सूर्या अथवा पिंवळ्या औषधा ! जन्मलेल्या बालकाचें रक्षण कर. स्त्री अथवा पुरुषास रडण्यास संधि देऊं नकोस. रोगजंतू गर्भास दाबून न टाकोत, आणि हे खादाड रोगजंतू आहेत त्यांना सूर्यप्रकाश दूर करो.' हा लाभ सूर्यप्रकाशानें होतो. या मंत्रांत या रोगजंतूंचीं नांवें **किमीदिन्** आणि **आण्डाद** अशीं सांगितलीं आहेत. किमीदिन्‌चा अर्थ (**किं इदानीं**) आतां काय खावें, आतां काय खावें असें म्हणणारे हे जंतू असतात, म्हणजे भुकेलेले असतात. त्यांची भूक केव्हांहि शमत नाहीं. कारण जर त्यांना पाहिजे तें खावयास मिळालें तर त्यांची संख्या आणखी वाढते, आणि ते आणखी खाण्याची इच्छा करतात. त्या प्रकारचेच (**आण्डाद**) अंडांत राहिलेल्या वीर्याला खाऊन टाकणारे आणि त्या मनुष्यास निर्वीर्य करणारे जंतू असतात. म्हणून त्यांच्या हल्ल्यानें मनुष्य अकालीं मरतो. पण जर तो मनुष्य सूर्यप्रकाशांत हिंडला-फिरला तर त्याच्या त्या प्रयत्नानें रोगजंतू मरून जातात आणि तो अकाल मृत्यूंतून वाचतो.

हीं रोगबीजें प्रसूतिगृहांत स्त्रीच्या शरीरावर हल्ला करतात आणि तिच्या शरीरांत रोग उत्पन्न होतो. रोग झाल्यानंतर त्याला निवारण करण्याचा उपाय शोधावयाचा त्यापेक्षां रोग होण्यापूर्वीच तो न व्हावा असा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न अधिक लाभदायक होईल. यासाठीं म्हटलें आहे—

जातायाः दुर्णामा अलिंशः वत्सपः मा गृधत् ।

'बालक जन्मतांच दुर्णाम, अलिंश, वत्सप हीं रोगबीजें स्त्रीवर हल्ला करण्याची इच्छा करतात.' प्रसूतिगृहांत हे जंतू असतात आणि बाळंतीणीवर हल्ला करतात; म्हणून अशी व्यवस्था केली पाहिजे कीं, हे कृमि प्रसूतिगृहांत निर्माण होऊं नयेत, निर्माण झाले तर त्यांनीं स्त्रीच्या शरीरावर हल्ला न करावा, आणि हल्ला केलाच तर रोग निर्माण करूं शकूं नयेत. प्रसूतिगृहांत बज नांवाची औषधि ठेवल्यानें अथवा सूर्यकिरण आंत खेळण्यास भरपूर वाव दिल्यानें ही गोष्ट सिद्धीस जाईल. म्हणून म्हटलें आहे—

बजं दुर्णामचातनं । (मं. ३)

' बजनामक औषधि या दुर्नाम नांवाच्या रोगबीजांना दूर करणारी आहे. ' ही वनस्पति प्रसूतिगृहांत ठेवल्यानें तेथें आरोग्य स्थिर होऊं शकते. सर्व जंतू रोग निर्माण करतात असें कांहीं नाहीं. हे कृमी दोन प्रकारचे जंतू आहेत. त्यांत एक चांगले आहेत आणि दुसरे वाईट आहेत. त्याविषयीं खालील मंत्र पहा—

दुर्णामा च सुनामा च उभा संवृतं इच्छतः ।
अरायान् अप हन्मः । सुनामा स्त्रैणं इच्छताम् ॥
(मं. ४)

' दोन प्रकारचे हे कृमी आहेत. एक (**सुनामा**) चांगल्या नांवाचे म्हणजे जे शरीरांत हितकारी आहेत आणि दुसरे (**दुःनामा**) दुष्ट नांवाचे, ज्यांच्यामुळें शरीरांत रोग होतात. हे दोन्ही शरीरावर आक्रमण करूं इच्छितात. यांत जे (**अ-रायान्**) कृपण, अनुदार, म्हणजे दुष्ट आहेत त्यांचा आम्हीं नाश करतों. ' म्हणजे चांगले कृमी मनुष्य शरीराला कल्याणकारक आहेत, पण जीं दुष्ट अथवा वाईट रोगबीजें आहेत, तीं घातक आहेत. म्हणून अशी व्यवस्था असावी कीं हीं दुष्ट रोगबीजें कोणास कष्ट न देवोत. हे कृमी कसे असतात त्यांचें वर्णन खालील मंत्रांत पहा—

द्व्यास्यात् चतुरक्षात् पञ्चपादात् अनंगुरेः ।
अभिसर्पतः वारिवृतात् वृन्तात्परिपाहि ॥ (मं. २२)

' या जंतूंना दोन तोंडें, चार डोळे, पांच पाय, असतात आणि ते बोटांशिवायचे असतात. हे हल्ला करतात. संघशक्तिनें एकत्रित रहातात, त्यांच्यापासून संभाळून राहिलें पाहिजे. ' हें त्या जंतूंचें वर्णन आहे. त्याबरोबरच खालील वर्णनहि पहा—

येषां प्रपदानि पश्चात् पार्ष्णीः मुखानि च पुरः ।
खलजाः शकधूमजाः उरुण्डाः मट्मटाः
कुम्भमुष्काः अयाशवः । अस्याः तान् प्रतिबोधेन
नाशय । (मं. १५)

' त्यांचे पाय मागें आणि टांचा पुढें आणि तोंडेंहि पुढेंच असतात.' या कृमींचें वर्णन करणारे शब्द या मंत्रांत '**खलजाः, शकधूमजाः, उरुण्डाः, मट्मटाः, कुम्भमुष्काः, अयाशवः** ' असे आहेत. यांतील ' **शकधूम** ' शब्दाचा अर्थ ' गाईच्या शेणाच्या धुरानें उत्पन्न ' असा होतो. दुसऱ्या शब्दांचे अर्थ आतां पावेतों विचार करूनहि स्पष्ट होऊं शकले नाहींत, वाचकांनीं त्यासाठीं शोधांत रहावें आणि प्रयत्नपूर्वक त्यांचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. या सूक्तांत असे दुसरे सुद्धां अनेक शब्द आहेत, त्यांचा अर्थ स्पष्ट होत नाहीं. हे कृमी स्त्रियांच्या शरीरांत रोग उत्पन्न करतात. त्याविषयीं म्हटलें आहे-

ये हस्ते शृंगाणि बिभ्रतः वध्वः यन्ति ।
ये स्तम्बे ज्योतिः कुर्वते ।
ये आ-पाके-स्थाः प्रहासिनः नाशयामसि ।
(मं. १४)

' जे स्वतःच्या शिंगाला हातांत धरून स्त्रियांजवळ जातात, जे चमकतात, जे स्वयंपाक घरांत रहातात, त्यांचा नाश करा. ' असे कृमी स्त्रियांच्या शरीरांत घुसतात, आणि तेथें विविध रोग निर्माण करतात, म्हणून त्यांचा नाश करणेंच योग्य आहे. या वर्णनांत ' खांबांत ज्योति करण्याचा ' अर्थ काय, त्याचें ज्ञान होत नाहीं अथवा झालेलें नाहीं, परंतु त्याचा शोध होणें जरुरीचें आहे. या सूक्तांत रोगजंतूंचे दोन भेद सांगितले आहेत. एक सूक्ष्म आणि दुसरे मोठे. येथपावेतों सूक्ष्म जंतूंचें वर्णन झालें. आतां मोठ्या मच्छरासारख्या जंतूविषयीं पहा—

मच्छरांचें गायन

गर्दभनादिनः कुसूलाः कुक्षिलाः करुमाः स्त्रिमाः ।
सायं शालाः परिनृत्यन्ति तान् गन्धेन नाशय ॥
(मं. १०)

' गाढवासारखा शब्द करणारे, ज्यांच्याजवळ खुपसण्या-सारखें हत्यार आहे, ज्यांचें पोट मोठें असतें, जे सायंकाळीं घराच्या आजुबाजूस नाचतात, त्यांचा उग्र वासानें नाश करा.' हें वर्णन बहुंशीं मच्छरें अथवा त्यांच्या सारख्याच कीड्यांचें आहे. ते शब्द करतात, सायंकाळीं त्यांचा शब्द ऐकूं येतो, त्यांची चावण्याची सुई फार तिखट असते. त्यांचा नाश करण्यास उग्र-वासाचे अथवा सुगंधी पदार्थ जाळले पाहिजेत. लोबान, उद, धूप, अगरु, वगैरे जाळल्यानें अथवा त्यांचा धूर केल्यानें या किड्यांना दूर करतां येतें. त्यांचें वर्णन खालील मंत्रांत पहा—

मच्छरांचें शस्त्र

कुकुन्धाः कुकूरभाः कृत्तीः दूर्शानि बिभ्रति ।
ये घोषं कुर्वतेः वने प्रनृत्यन्तः तान् नाशयामसि ॥
(मं. ११)

' (**कृत्तीः**) चावणारे (**दूर्शानि**) दंश करण्याचीं साधनें ज्यांच्या जवळ आहेत असे, ते शब्द करतात, आणि जंगलांत नाच करतात त्यांचा नाश करा. ' हें वर्णन सुद्धां प्रथम पहिल्या वर्णनाप्रमाणेंच मच्छरांचें आहे. मच्छरांच्या तोंडांत चावण्याचें सुईसारखें शस्त्र असतें. त्याचें नांव येथें ' **दूर्श** ' सांगितलें आहे, आणि चावण्याच्या त्यांच्या प्रवृत्तिमुळें त्यांना 'कृत्ती' म्हणजे चावणारे असें म्हटलें आहे. हे जंतू ताप आणतात,

म्हणून उग्रवासाचे पदार्थ जाळून त्यांचा नाश केला पाहिजे. या मंत्रांत आणि त्यापूर्वीच्या मंत्रांत असे कित्येक शब्द आहेत की त्यांचा अर्थ स्पष्ट होत नाहीं. त्या शब्दांच्या अर्थाचा शोध होणें जरुर आहे. आणखीहि पहा—

मच्छरांचें स्थान

अरायान् बस्तवासिनः दुर्गन्धीन् लोहितास्यान् मककान् नाशयामसि ॥ (मं. १२)

' हे कृमी बस्त म्हणजे चामडीवर रहातात, त्यांना घाण वास येतो, त्यांचीं तोंडें लाल असतात, अशा मशकांचा म्हणजे मच्छरांचा नाश केला पाहिजे. ' या मंत्रांत **' मकक '** शब्द बहुत करुन **' मशक '** म्हणजे मच्छर वाचक असला पाहिजे. **' बस्त '** शब्दाच्या सुद्धां नक्की अर्थाचा शोध व्हावयास हवा. या जंतूंना येथें अराय म्हटलें आहे. त्या शब्दाचा अर्थ ' न देणारा ' असा आहे; म्हणजे हे रोगजंतू आरोग्य देत नाहीत, रक्त वाढू देत नाहीत, जीवन देत नाहीत, आणि शरीराला शक्ति अथवा शोभा देत नाहीत. कारण त्यांच्यापासून अनेक रोग होतात आणि त्यामुळें वर सांगितलेल्या गोष्टी नाश पावतात. या कृमींचीं चिन्हें खालीं दिलेल्या शब्दांनीं स्पष्ट होतात म्हणून ते शब्द आतां पाहूं. दुसऱ्या मंत्रांत खालीं दिल्याप्रमाणें रोग-जंतूंचीं नांवें आलीं आहेत—

रोगजंतूंचीं नांवें

१. **पलाल-अनुपलालौ**- मांस ज्यांना अनुकूल आहे, मांसरसानें जे वाढतात आणि मांस खाऊन ज्यांची वृद्धि होते.

२. **शर्कुः**- हिंसक, जे नाश करतात.

३. **कोकः**- कामास वाढवून वीर्याचा नाश करणारे.

४. **मलिम्लुच्**- मलीनतेंत जन्मणारे, आणि अस्वच्छते-च्या कारणानें वाढणारे.

५. **पलीजकः**- पलित रोग निर्माण करणारे.

६. **आश्रेषः**- कोणाच्या आश्रयानें रहाणारे.

७. **प्रमीलिनः**- जे सुस्ती निर्माण करतात.

या मंत्रांतील इतर शब्द **' वव्रिवासस्, ऋक्षग्रीव '** या विषयीं जास्त शोध व्हावयास हवा, कारण त्यांचा अर्थ स्पष्ट नाहीं. पांचव्या मंत्रांत खालीं दिलेले शब्द आले आहेत—

८. **कृष्णः**- काळ्या रंगाचे किंवा ओढणारे.

९. **केशी**- केंस असलेले अथवा तंतूसारखे.

१०. **अ-सुरः**- प्राणघातक, मारून टाकणारे.

११. **तुण्डिकः**- लहान तोंडाचे.

१२. **अ-रायः**- आरोग्य न देणारे.

या पांचव्या मंत्रांत ' स्तंबज ' शब्द आहे, त्याचा अर्थ समजूं शकत नाहीं. त्याचा सुद्धां शोध व्हावयास हवा. सहाव्या मंत्रांत खालीं दिल्याप्रमाणें शब्द आले आहेत—

१३. **अनुजिघ्रः**-वासांबरोबर शरीरांत प्रवेश करणारे, श्वासो-बरोबर नाकांतून फुफुसांत जातात.

१४. **प्रमृशन्**—स्पर्श करणारे, स्पर्शामुळें होणारे, स्पर्श-जन्य रोगबीज.

१५. **क्रव्यादः**—मांस खाणारे, शरीरांतील रक्त आणि मांस खाणारे.

१६. **रेरिह्**—हिंसक, घातकी, नाश करणारे.

१७. **श्वकिष्की**—कुत्र्याप्रमाणें पीडा करणारे.

याप्रमाणेंच दुसऱ्या मंत्रांत जे शब्द आहेत त्यांचाहि य शब्दांसह विचार केल्यानें रोगजंतूंचें संपूर्ण ज्ञान होऊं शकतें

या सर्व जंतूंना **' पिंगबज '** दूर करतें. त्याविषयीं खालीं दिलेला मंत्र पहाण्यासारखा आहे—

पिंग बज

परिसृष्टं धारयतु हितं मा अवपादि ।
उग्रौ भेषजौ गर्भं रक्षताम् ॥ (मं. २०)
पवीनसात् तंगल्वात् छायकात् नग्नकात्
किमीदिनः । प्रजायै पत्ये पिंगः परिपातु ।
(मं. २१)

'गर्भाशयांत ठेवलेल्या गर्भाला उत्तमरीतीनें धारण केलें पाहिजे. गर्भाशयांतलि गर्भ पडूं नये म्हणून या दोन्ही तीव्र औषधि त्याचें रक्षण करोत. या रोगबीजापासून रक्षण होण्यासाठीं, उत्तम संतान होण्यासाठीं पिंगवनस्पतीनें गर्भाशयाचें रक्षण होवो. '

२१ व्या मंत्रांत रोगबीजवाचक शब्द फारच दुर्बोध आहेत. तसेंच या सूक्तांत सांगितलेल्या **' पिंग बज '** वनस्पतीचा सुद्धां कांहीं पत्ता लागत नाहीं. वैद्यकविषयक ग्रंथांत त्याचें नांव नाहीं, त्यामुळें त्याचा शोध करणें कठीण आहे. श्री सायनाचार्यांनीं स्वतःच्या अथर्ववेद भाष्यांत, या सूक्तावर भाष्य करतांना त्याचा अर्थ **' श्वेतसर्षप '** असा केला आहे; म्हणजे पांढरी मोहरी (सरसव). पिंग बजचा अर्थ हाच असेल हें शक्य आहे. त्याचें गुण वैद्यक ग्रंथांत असे सांगितले आहेत —

पिंग बजाचे गुण

तिक्तः तीक्ष्णोषणः वातकफघ्नः उष्णः कृमिकुष्ठघ्नः सितासित भेदेन द्विधा । (राज०)

कटूष्णो वातशूलनुत् । गुल्मकण्डूकुष्ठव्रणापहः । वातरक्तग्रहापहः । त्वग्दोषशमनो विषभूतव्रणापहः ।

सर्षपतैलगुणाः—वातकफविकारघ्नं कृमिकुष्ठघ्नं चक्षुष्यम् ।

'सरसव (पांढरी राई-मोहरी) तीक्ष्ण, उष्ण, वात आणि कफाला दूर करणारी, कृमि आणि कुष्ठरोगाला दूर करणारी, पांढरी आणि काळी (लालसर) असे त्याचे दोन भेद आहेत. ही कडू, उष्ण, वातशूलाचा नाश करणारी, गुल्म, कंडु, कुष्ठ, व्रण वगैरेंचा नाश करणारी आहे. वातरक्त दोष दूर करणारी, विषानें उत्पन्न झालेले व्रण दूर करणारी, चामडीचे रोग दूर करणारी, कृमि आणि कुष्ठाचा नाश करणारी आहे आणि डोळ्यांस हितकारक आहे.

या वर्णनांत सरसवाचे गुण कृमीनाशक कुष्ठनाशक जे दिले आहेत ते पूर्वोक्त सूक्ताच्या उपदेशाशीं मिळते आहेत. त्यामुळें संभव आहे कीं 'पिंग बज' चा तोच अर्थ असेल. त्याचा जास्त शोध होणें जरुरीचें आहे, कारण या सूक्तांतील कित्येक शब्द आणि कित्येक वाक्यें दुर्बोध आहेत व त्यांचा योग्य अर्थ लागत नाहीं. आधुनिक कोषांत त्यांचा अर्थ लावण्यास विशेष साहाय्य मिळेल अशी माहिती नाहीं. ज्यांच्याजवळ विशेष संशोधन करण्याचीं साधनें असतील त्यांनीं तसें अवश्य करावें.

पुंसवन

कांड ६, सूक्त ११

(ऋषिः - प्रजापतिः । देवता - रेतः, मन्त्रोक्तदेवता ।)

शमीमश्वत्थ आरूढस्तत्र पुंसुवनं कृतम् । तद्वै पुत्रस्य वेदनं तत्स्त्रीष्वा भरामसि ॥ १ ॥
पुंसि वै रेतो भवति तत्स्त्रियामनु षिच्यते । तद्वै पुत्रस्य वेदनं तत्प्रजापतिरब्रवीत् ॥ २ ॥
प्रजापतिरनुमतिः सिनीवाल्यचीक्लृपत् । स्त्रैषूयमन्यत्र दधत्पुमांसमु दधदिह ॥ ३ ॥

अर्थ—(अश्व-त्थः) पिंपळाचें झाड **(शमीं आरूढः)** शमीच्या झाडावर जेथें वाढलेलें असेल **(तत्र पुंसवनं कृतं)** तेथें पुंसवन केलें जातें. तोच **(पुत्रस्य वेदनं)** पुत्रप्राप्तीचा निश्चय आहे. **(तत् स्त्रीषु आभरामसि)** ते आम्हीं स्त्रियांत भरतों. [१]

(पुंसि वै रेतः भवति) पुरुषांत खात्रीनें वीर्य असतें, **(तत् स्त्रियां अनुषिच्यते)** तें स्त्रीमध्यें सिंचिलें जातें, **(तत् वै पुत्रस्य वेदनं)** तें पुत्रप्राप्तीचें एक साधन आहे. **(तत् प्रजापतिः अब्रवीत्)** असें प्रजापतीनें सांगितलें आहे. [२]

(प्रजापतिः अनुमतिः) प्रजापालन करणारा पिता अनुकूल मति धारण करो, आणि **(सिनी-वाली अचीक्लृपत्)** गर्भवती स्त्री समर्थ होवो, असें झाल्यानें **(पुमांसं उ इह दधत्)** पुत्रगर्भच धारण होतो. **(अन्यत्र स्त्रैषूयं दधत्)** दुसऱ्या परिस्थितींत स्त्रीगर्भ धारण होतो. [३]

पुंसवन

निश्चयानें पुत्राची उत्पत्ति

निश्चयेंकरून पुत्र व्हावा म्हणून या सूक्तांत एक औषधि-प्रयोग सांगितला आहे. तो असा आहे—

शमीं अश्वत्थ आरूढः तत्र पुंसवनं कृतम् ।
तद्वै पुत्रस्य वेदनं तत् स्त्रीष्वाभरामसि ॥ (मं. १)

'(१) शमीच्या झाडावर पिंपळाचें झाड उगवलेलें असतें, असा पिंपळ पुत्ररूप गर्भ धारण करण्यास योग्य होय. म्हणजे त्याच्या औषधाचें जर स्त्री सेवन करील तर ती स्त्री पुत्र उत्पन्न करणारी होते. (२) हा पिंपळ खात्रीनें पुत्र उत्पन्न करणारा आहे. (३) त्याच्या सेवनानें खात्रीनें पुत्र होतो. (४) पुत्र उत्पत्तिसाठीं त्या पिंपळाचें औषध स्त्रीला दिलें पाहिजे.

शमी वृक्षावर उगवलेल्या पिंपळाच्या पंचांगाचें (मूळ, साल,

अंतःसाल, पानें, फुलें-फळें) यांचें चूर्ण करून मधांतून सेवन करण्यास यावें अथवा दुधांतून यावें. त्याच्या सेवनानें स्त्रीगर्भाशय पुरुषगर्भ धारण करण्यास समर्थ होईल. ज्या स्त्रियांना कन्या संतति होते, अशा स्त्रियांना हें औषध दिल्यानें त्यांच्या गर्भाशयांत जरुर तसें परिवर्तन होऊन पुरुषगर्भ उत्पन्न करण्याची शक्ति गर्भाशयांत येते.

पुंसवन आणि स्त्रैषूय

पुरुष उत्पन्न होणें याचें नांव 'पुंसवन' आणि कन्या उत्पन्न होणें याचें नांव 'स्त्रैषूय'. हीं दोन्हीं नांवें या सूक्तांत सांगितलीं आहेत. ज्यांना निश्चित पुरुषसंततीच पाहिजे त्यांनीं या औषधीचा प्रयोग करून पहावा. या मंत्रांतील शब्दांचा श्लेषार्थ घेतां दुसराहि एक अर्थ होतो तो असा—

१ अश्व+स्थः— अश्वचा अर्थ वाजी अथवा घोडा, असा आहे. वाजीकरणाचा अर्थ पुरुषाला पुरुषशक्तीनें युक्त करणें. अश्व शब्दाचा अर्थ येथें घोड्यासारखा पुरुषधर्मानें युक्त आणि समर्थ मनुष्य. (**अश्व**) घोड्यासारखा जो (**स्थ, स्थः**) जो रहातो अस बलवान् पुरुष.

२ शमी— मनाच्या वृत्ति उच्छृंखल होऊं न देतां ताब्यांत ठेवणारी म्हणजे जी धर्मानुकूल गृहस्थधर्माचें पालन करते अशी स्त्री.

अशा स्त्रीपुरुषांच्या संबंधानें निश्चित पुरुष संतति होईल. अशा स्त्रीपुरुषांच्या संबंधांत वीर्याचें बळ अधिक आणि रजाची न्यूनता राखण्याचें विधान आहे, त्यामुळें अथवा त्याच कारणानें निश्चित पुत्र संतति होते. म्हणजे पुरुष बलशाली असला तर पुरुषसंतति आणि स्त्री बलशालिनी असली तर स्त्रीसंतति होईल. येथें बलाचा अर्थ पुरुषवीर्य आणि स्त्रीरज असा करणें योग्य होईल.

दुसरा मंत्र गर्भाधानाविषयीं स्पष्ट आहे. तिसऱ्या मंत्रांत पुनः श्लेषार्थानें कांहीं विशेष आशय प्रगट केला आहे. तो आतां पहा—

१. प्रजापतिः—आपल्या संततीचें उत्तम पालन करण्यास समर्थ असा गृहस्थ.

२ अनुमतिः—परस्पर अनुकूल प्रेमपूर्ण मन असणारे स्त्रीपुरुष.

३. सिनीवाली— सिनचा अर्थ चंद्राची कला असा आहे. त्याचें बल वाढविणारी स्त्री, ती सिनीवाली. ज्याप्रमाणें शुक्ल पक्षांत चंद्राचें तेज वाढतें त्याप्रमाणें जिच्या गर्भाशयांत गर्भ कलेकलेनें वाढतो.

हे शब्द विचार करण्यासारखे आहेत. संतानाचें पालन करण्याची शक्ति, त्यांचा सांभाळ, भरण-पोषण करण्याची शक्ति ज्यांच्यांत आहे अशाच स्त्रीपुरुषांनीं संतति उत्पन्न करावी. संतानोत्पत्तीच्या वेळीं स्त्रीपुरुष परस्परांस अनुकूल संमति राखणारे असतील तरच समान गुणधर्मयुक्त संतति होते. त्या दोघांत विरोध असला तर संततिसुद्धां विरुद्ध गुणधर्मयुक्त होईल. गर्भवती स्त्रीनें समजलें पाहिजे कीं माझ्यांत चंद्रासारखा स्वतःच्या कलांनीं गर्भ वाढत आहे. त्याचें रक्षण आणि वृद्धीची व्यवस्था करणें हें माझें काम आहे. अशी व्यवस्था राखल्यानें पुरुषसंतति होते. त्याविरुद्ध जाण्यानें स्त्री अथवा नपुंसक संतति होते.

चांगल्या वैद्यांनीं या सूक्ताचा विचार करावा आणि वास्तविक रीतीनें प्रयोग करून या पुंसवन आणि स्त्रैषूय शास्त्राची खात्री करून घ्यावी.

सुख-प्रसूति सूक्त

कांड १, सूक्त ११

(ऋषिः – अथर्वा । देवता – पूषादयो नाना देवताः ।)

वषट् ते पूषन्नस्मिन्त्सूतावर्यमा होता कृणोतु वेधाः ।
सिस्रतां नार्यृतप्रजाता वि पर्वाणि जिहतां सूतवा उ ॥ १ ॥

अर्थ—हे (**पूषन्**) पोषक ईश्वरा ! (**ते वषट्**) तुझ्यासाठीं आम्हीं आमचें आत्मार्पण करतों. (**अस्मिन् सूतौ**) या प्रसूतीच्या कार्यांत (**अर्यमा होता वेधाः**) आर्यमनयुक्त दाता, विधाता ईश्वर सहाय्य (**कृणोतु**) करो. (**ऋत प्रजाता**) नियमपूर्वक बालकांना जन्म देणारी स्त्री (**सिस्रतां**) दक्षतेनें राहो. तसेंच स्वतःच्या (**पर्वाणि**) अंगांना (**सूतवै उ**) सुखप्रसूतिसाठीं, (**विजिहतां**)ढिलीं करो. [१]

भावार्थ— हे सर्वांचे पोषण करणाऱ्या जगदीशा ! तुझ्यासाठीं आम्हीं आमचें आत्मसमर्पण करतों. या प्रसूतीच्या वेळीं सर्व विश्वास निर्माण करणारा तूं आम्हांस मदतगार हो. ही स्त्री काळजीपूर्वक राहो, आणि यावेळीं स्वतःचे शरीरावयव ढीले करो. [१]

चतस्रो दिवः प्रदिशश्चतस्रो भूम्या उत । देवा गर्भं समैरयन् तं व्यूर्णुवन्तु सूतवे ॥ २ ॥
सूषा व्यूर्णोतु वि योनिं हापयामसि । श्रथया सूषणे त्वमव त्वं बिष्कले सृज ॥ ३ ॥
नेवं मांसे न पीवसि नेवं मज्जस्वाहतम् ।
अवैतु पृश्नि शेवलं शुने जराय्वत्तवेऽवं जरायु पद्यताम् ॥ ४ ॥
वि ते भिनद्मि मेहनं वि योनिं वि गवीनिके ।
वि मातरं च पुत्रं च वि कुमारं जरायुणाव जरायु पद्यताम् ॥ ५ ॥
यथा वातो यथा मनो यथा पतन्ति पक्षिणः ।
एवा त्वं दशमास्य साकं जरायुणा पताव जरायु पद्यताम् ॥ ६ ॥

अर्थ—(दिवः) आकाशांत (उत) तसेंच (भूम्याः) पृथ्वीच्या (चतस्रः प्रदिशः) चारी दिशांस रहाणाऱ्या (देवाः) देवांनीं (गर्भं समैरयन्) गर्भास तयार केलें म्हणून (सूतवे) त्याच्या सुखप्रसूतिसाठीं (तं वि ऊर्णुवन्तु) त्याला प्रगट करोत, त्याला बाहेर मोकळयांत आणोत. [२]

(सूषा) उत्तम संतान उत्पन्न करणारी माता (व्यूर्णोतु) स्वतःच्या शरीरास खुलें करो. आम्ही (योनिं) योनीला (विहापयामसि) उघडतों. हे (सूषणे) प्रसूत होणाऱ्या स्त्रिये ! (त्वं) तूं सुद्धां (श्रथय) आंतून प्रेरणा कर आणि हे (बिष्कले) वीर स्त्रिये ! (त्वं) तूं (अव सृज) बालक उत्पन्न कर. [३]

(न इव मांसे) तो गर्भ मांसांत गुरफटलेला नाहीं, (न पीवसि) चरबींत नाहीं (न इव मज्जसु) मज्जा-तंतूंत सुद्धां (आहतं) गुरफटलेला नाहीं. (पृश्नि शेवलं) नरम सावरीच्या कापसासारख्या (जरायु) जेलीमध्यें (शुने अत्तवे) कुत्र्याला खाण्यासाठीं (अवैतु) खालीं येवो. (जरायु) जेली (अव पद्यताम्) खालीं पडो. [४]

(ते मेहनं) तुझ्या गर्भमार्गाला, (योनिं) योनीला आणि (गवीनिके) दोन्हीं नाड्यांना (वि वि वि भिनद्मि) विशेष प्रकारें खुल्या करतों. (मातरं पुत्रं च) माता आणि पुत्राला (वि) वेगळें करतों. तसेंच (कुमारं जरायुणा वि) मुलाला वारेपासून सुटा करतों. (जरायु) वार (अव पद्यताम्) खालीं पडून जावो. [५]

ज्याप्रमाणें वायु, मन आणि पक्षी (पतन्ति) उडतात (एव) त्या रीतीनें हे (दशमास्य) दहा महिन्याच्या गर्भा ! तूं (जरायुणा साकं) वारेसह (पत) खालीं पड तसेंच (जरायु अव पद्यताम्) वार खालीं पडून जावो. [६]

भावार्थ- आकाश आणि पृथ्वीच्या चारी दिशांना रहाणाऱ्या सर्व देवांनीं हा गर्भ बनविला आहे. यासाठीं तेच यावेळीं त्यास गर्भस्थानांतून सुखानें बाहेर आणोत. [२]

स्त्रीनें आता स्वतःचें अंग खुलें करावें. मदत करणाऱ्या सुईणीनें योनि खुली करावी. हे स्त्रिये ! तूं सुद्धां मनाच्या आंतून प्रेरणा कर आणि सुखानें बालक उत्पन्न कर. [३]

हा गर्भ मांस, चर्बी अथवा मज्जेला चिकटलेला नाहीं. तो पाण्यांत दगडावर जमा होणाऱ्या शेवळाप्रमाणें नरम आणि अति नाजूक थैलींत गुंडाळलेला असतो. ती सर्व पिशवी बाहेर येवो आणि ती नाळेसह कुत्र्यास खाण्यास देण्यांत यावी. [४]

योनि, गर्भस्थान आणि पाठीमागील नाड्या ढिल्या करण्यांत याव्यात. प्रसूति होतांच मातेपासून बालकास वेगळें करण्यांत यावें, आणि बालकापासून वार आणि नाळ वेगळी करण्यांत यावी, नाळेसह सर्व वार पूर्णपणें बाहेर निघून यावी. [५]

ज्याप्रकारें मन वेगानें विषयांत लपेटतें, तसेंच वायु अथवा पक्षी आकाशांत वेगानें उडतात, त्याप्रमाणें दहा महिन्यांत गर्भ वारेसह गर्भस्थानांतून बाहेर येवो. वार वगैरे सर्व खालीं पडून जावो, म्हणजे मातेच्या गर्भस्थानांत त्याचा कांहींहि भाग शिल्लक राहूं नये. [६]

*

सुख-प्रसूति सूक्त

प्रसूति प्रकरण

हें प्रकरण विशेषतः स्त्रियांसाठीं आणि सामान्यतः सर्वांसाठीं विशेष लाभकारी आहे. प्रसूतिसमयीं स्त्रियांना किती दुःख होतें अथवा होत असेल तें स्त्रियाच जाणोत. पण प्रयत्नानें प्रसूतीचें दुःख अथवा कष्ट कमी करणें शक्य आहे. गर्भधारणेपासून प्रसूतिपर्यंत अथवा गर्भधारणेच्या पूर्वीपासून जे नियम पाळावयास योग्य आहेत त्यांचें योग्य पालन केलें असतां प्रसूतीचे कष्ट पुष्कळ कमी होतात. याविषयीं यानंतर पुष्कळ उपदेश यावयाचा आहे. येथें या सूक्तांत जेवढा विषय दिला आहे, तेवढा पाहूं —

ईशभक्ति

परमेश्वराच्या भक्तीनें मनुष्य दुःखांतून पार पडतो. संसारी स्त्रीपुरुष जर ईश्वराचे चांगले भक्त असतील तर त्या कुटुंबांतील स्त्रियांना प्रसूतीचे कष्ट होत नाहींत. हें सांगण्यासाठीं या सूक्ताच्या प्रथम मंत्राच्या पूर्वार्धांत सर्वांच्या सुरवातीसच ईश्वराच्या मानसपूजेचें वर्णन आहे.

' वषट् ' शब्द ' **स्वाहा** ' अर्थाचा असतो. त्याचा अर्थ आत्मसमर्पण करणें. (**हे पूषन् ते वषट्**) हे ईश्वरा ! तुझ्यासाठीं आम्ही आमचें स्वतःचें अर्पण करतों. तूंच (**अर्य-मा**) श्रेष्ठ सज्जनांचा सन्मान करणारा म्हणजे कल्याण करणारा आहेस, तूंच (**वेधाः**) सर्व दुनियेची रचना करणारा, आणि हें संपूर्ण विश्व निर्माण करणारा आहेस; आणि तूंच (**होता**) सर्व सुखें देणारा आहेस. म्हणून आम्हीं तुझ्या आश्रयानें रहातों आणि तुलाच पूर्णपणें समर्पित होतों.

येथें भगवंताचे जे गुण सांगितले आहेत तें अनुक्रमानें पहाण्यासारखे आहेत. ' सर्व सूर्यादि देवतांना शक्ति देणारा, एक ईश्वरच आहे आणि त्याचें शासन सर्वतोपरि आहे, ' वगैरे भाव जे पहिल्या सूक्तांत वर्णिले आहेत तेच येथें पहा. ' सर्वांहून श्रेष्ठ प्रभु मला मदत करो आणि मीं त्याच्या कृपाछत्राखालीं सुरक्षित आहें. ' इत्यादि भक्तीची भावना ज्याच्या हृदयांत अकृत्रिम प्रेमासह राहते, तो मनुष्य विशेष शक्ति आणि आरोग्यानें युक्त होतो, आणि बहुतकरून असा मनुष्य आनंदांत रहातो.

कामविकाराचा संयम करणें हें एक प्रभुभक्तीचें दिव्य औषध आहे. कामविकाराचें नियमन झालें तर स्त्रियांचे प्रसूतीचे कष्ट ९० टक्के कमी होतील. कारण काम अति असल्यानें स्त्रिया अशक्त होतात, आणि अशक्तीच्या कारणानें प्रसूतीच्या वेळीं जास्त कष्ट होतात. त्यानंतर म्हणजे प्रसूतिनंतरसुद्धां क्षयादि रोग कष्ट देतात, म्हणून कामभोगाचें नियमन प्रभुभक्तीनें करण्याचा उपदेश प्रत्येक स्त्रीपुरुषांनीं येथें अवश्य ध्यानांत ठेवावा.

देवांचा गर्भांत विकास

सूर्यादि देवता स्वतःचा अंश गर्भांत ठेवतात. सर्व देवतांचे अंशावतार गर्भांत आल्यानंतर आत्मा त्यांत प्रवेश करतो. हा विषय वेदांत ठिकठिकाणीं आलेला आहे. [याविषयीं स्वाध्याय-मंडळातर्फे प्रकाशित झालेल्या ' ब्रह्मचर्य ' पुस्तकांत ' देवांचे अंशावतार ' या मथळ्याचा लेख अवश्य वाचावा. तेथें विविध मंत्रांनीं हा विषय स्पष्ट केला आहे.] तात्पर्य, गर्भांत अंशरूपानें अनेक देव आणि देवता रहातात, आणि त्यांचा संबंध बाहेरच्या देवतांशीं असतो. पृथ्वी आणि आकाशाच्या चौफेर रहाणाऱ्या सर्व देवता गर्भांत अंशरूपानें आल्या आहेत. जणूं काय त्यांचें संमेलन (**समैरयन्**) गर्भांत झालें आहे, आणि त्यांचा अधिष्ठाता आत्मा सुद्धा त्या गर्भांत येऊन राहिला आहे. असा दृढ विश्वास गर्भ धारण करणाऱ्या मातेनें करावयास हवा; अर्थात् जो आपला गर्भ आहे, तो स्वतःच्या कामवासनेचें फळ नाहीं पण त्यांत विशेष महत्त्वपूर्ण आत्मशक्ति आणि दैवीशक्तींचा संबंध आहे, असा भाव जर गर्भधारण करणारी स्त्री मनांत ठेवील तर तिच्या गर्भाचें रक्षण आणि पोषण उत्तम प्रकारें होईल. गर्भाधानाच्या वेळींहि देवतांचें आवाहन करण्यांत येतें. त्यावेळच्या मंत्रांकडे या रीतीनें पाहिलें तर गर्भाधान कामविकाराच्या पोषणासाठीं नसून उच्च शक्ति धारण करण्यासाठीं आहे हें समजेल. गर्भिणी स्त्रीनें गर्भाविषयीं असा उच्च भाव स्वतःच्या मनांत ठेवावा कीं ज्या देवतांचे अंश गर्भांत एकत्रित झाले आहेत, तेच त्याचें रक्षण करण्यास आणि सुखप्रसूतीला मदत करतील; म्हणजे अशा प्रकारें देवतांची मदत आणि परमात्म्याचा आधार मला आहे. त्यामुळें प्रसूतिसमयीं मला कांहींहि दुःख होणार नाहीं, प्रसूति सुखानें होईल. वाचकांनीं या दृष्टीनें या सूक्ताचा दुसरा मंत्र पहावा.

गर्भवती स्त्री

गर्भवती स्त्रीनें प्रथम सांगितल्याप्रमाणें स्वतःच्या मनांत भाव धारण करावे. आतां गर्भवती स्त्रियांनीं आणि सर्वच गृहस्थाश्रम स्वीकारलेल्या स्त्रियांनीं खालीं दिलेल्या बाबतींचा विचार करावा—

१. **नारी**— जी धर्मनीतीनें (**नृणाति**) चालते अर्थात्

धर्मनियमानुसार आचरण करते; तसेंच (नर) पुरुषासह रहाते, तिला नारी म्हणतात. म्हणजे गृहस्थाश्रमाच्या विशेष कर्तव्याचें पालन करण्याचा भाव येथें सूचित केला आहे. (मं.१)

२. ऋत-प्रजाता- (ऋत) सत्यनियमानुकूल (प्रजाता) प्रजनन कर्मानें युक्त, म्हणजे गर्भधारण, गर्भपोषण आणि प्रसूति आदि जिचीं सर्व कर्में सत्यधर्मानुसार होतात. ऋतुमति होणें, गर्भधारणेनंतर तीन वर्षांनंतर अथवा बालक पिण्याचें बंद झाल्यावर ऋतुमति होणें, इत्यादि सर्व नियमांचें पालन करणारी स्त्री सुखानें प्रसूत होते. (मं. १)

३. सुषा, सूषणा- ज्या स्त्रीला प्रसूतीचे कष्ट होत नाहींत, जी सुखानें प्रसूत होते; स्त्रियांनी योग्य नियमांच्या पालनानें हा गुण स्वतःमध्यें आणावा. (मं. १)

४. विष्कला- वीर स्त्री म्हणजे धैर्यवती स्त्री. स्त्रियांनीं स्वतःचें धैर्य वाढविलें पाहिजे. थोडेंसें दुःख झालें तर त्यामुळें घाबरून जातां कामा नये. धैर्यानें तें सहन केलें पाहिजे. (मं.३)

गर्भवती स्त्रियांनीं या शब्दांनीं मिळणारा बोध स्वतःमध्यें धारण करावा, कारण सुखप्रसूतिसाठीं त्या गुणांची आवश्यकता आहे.

गर्भ

या सूक्तांत गर्भासाठीं, 'दश-मास्य' शब्द वापरला आहे. त्याचा अर्थ दहा महिने ज्याचें जीवन व्यतीत झालें आहे, अथवा ज्याचें आयुष्य दहा महिन्याचें झालें आहे. हा शब्द गर्भाचा काळ दर्शवितो. प्रसूतीचा योग्य समय दहाव्या महिन्यांत असतो. दहाव्या महिन्यापूर्वी प्रसूति झाली तर तो गर्भ अपरिपक्व म्हटला जाईल, आणि तशा अवस्थेंत होणाऱ्या प्रसूतीनें मातेचे कष्ट वाढतात. आणि तें सर्व गृहस्थी जीवन जगणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या नियमविरुद्ध वागण्याचा परिणाम असतो. जे स्त्री-पुरुष गृहस्थाश्रमाचे नियम उत्तम रीतीनें पालन करतात त्यांच्या स्त्रियांची प्रसूति सुखानें होते.

सुख-प्रसूतिसाठीं आदेश

१. स्त्रियांनीं परमेश्वर भक्ति करावी. (मं. १)

२. स्वतःच्या गर्भांत सर्व देवता येऊन राहिल्या आहेत अशी स्वतःची भावना ठेवावी. (मं. १)

३. (सिस्रतां) गर्भवती-अवस्थेंत स्वतःचीं कार्यें, हालचाल इत्यादि व्यवहार फार काळजीपूर्वक करावे. (मं. १)

४. प्रसूतीच्या वेळीं (पर्वाणि विजिहतां) स्वतःचीं इंद्रियें-अंगें-अवयव ढिले सोडावे. (मं. १)

५. (सूषा व्यूर्णोतु) सुखप्रसूतीची इच्छा करणाऱ्या स्त्रिनें स्वतःचें शरीर ढिलें ठेवावें म्हणजे अवयव ओढून धरून कृत्रिम तेनें तंग करूं नयेत. (मं. ३)

६. (सूषणे ! त्वं अवय) सुखप्रसूति इच्छिणाऱ्या स्त्रीनें स्वतःच स्वतःच्या इच्छा शक्तीनें आंतून प्रेरणा करावी, तसेंच मनानें प्रसूतीच्या अंगांना प्रेरित करावें. ही प्रेरणा त्या प्रसूति पावणाऱ्या स्त्रीनें स्वतःच केली पाहिजे. (मं. ३)

सुईणीची मदत

१. प्रसूतिसमयीं सुईणीची मदत अवश्य असली पाहिजे. सुईणीनें प्रसूति पावणाऱ्या स्त्रीला धीर द्यावा व योग्य सूचना देत असाव्या. ' परमेश्वर तुला सहाय्य करील आणि सर्व देव-देवता तुझ्या गर्भांत येऊन राहिल्या आहेत, त्यामुळें तेच स्वतः तुला मदत करतील. ' अशा वाक्यांनीं तिला धैर्य द्यावें.

२. जरूर पडेल त्यावेळीं योनिस्थान योग्य प्रकारें खुलें करावें. (मं. ३)

३. वारेच्या पिशवीमध्यें गर्भ असतो. गर्भासह नाळ, वार, वगैरे सर्व बाहेर यावें. त्या पदार्थांचा कांहीं अंश अथवा भाग मातेच्या गर्भाशयांत राहून जाऊं नये, अशी काळजी सुईणीनें घ्यावी. जर त्यापैकीं कांहीं पदार्थ आंत राहून गेला तर त्यानें मातेला फार कष्ट होतील. (मं. ४)

४. प्रसूतीच्यावेळीं गर्भमार्ग, योनि आणि पाठीमागचे अवयव खुले करावे. त्यांना अशा रीतीनें खुले करावे कीं त्यामुळें प्रसूति सुखानें होईल. (मं. ५)

५. प्रसूति होतांच मातेजवळून पुत्राला वेगळा करावा. वरील वारेचें आवरण दूर करावें, आणि आवश्यक तें सर्व योग्य प्रकारें करावें. (मं. ५)

सूचना

हा शरीरशास्त्राचा विषय आहे. निव्वळ पांडित्य प्रगट करण्याचा नव्हे. या सूक्तांतील शब्दांचे अर्थसुद्धां शरीरशास्त्र अथवा प्रसूति प्रकरणाच्या आधारानें करावयास हवेत. म्हणून जे वैद्य, डॉक्टर आहेत कीं ज्यांनीं प्रसूतिशास्त्राचा चांगला अभ्यास केला आहे, त्या शास्त्राशीं ज्याचा चांगला परिचय आहे आणि ज्या स्त्रियांचा संबंध अनेक प्रसूतींशीं आलेला आहे, या शास्त्राशीं ज्यांचा परिचय आहे, त्यांनीं या सूक्ताचा जास्त खोलवर विचार करावा. जे शब्द या सूक्तांत ' सिस्रतां, विजिहतां, व्यूर्णोतु ' वगैरे आहेत, ते उत्तम प्रकारें समजून घ्यावे तरच तें सूक्त नीट समजेल आणि इतरांस समजावितां येईल.

प्रसूति शास्त्राच्या अभ्यासकांनीं त्याचा अभ्यास केला तरच ते निर्दोष प्रसूतीची व्याख्या करूं शकतील.

रक्तस्राव बंद करणें

कांड १, सूक्त १७

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - योषितः धमन्यश्च ।)

अमूर्या यन्ति योषितो हिरा लोहितवाससः । अभ्रातर इव जामयस्तिष्ठन्तु हतवर्चसः ॥ १ ॥
तिष्ठावरे तिष्ठ पर उत त्वं तिष्ठ मध्यमे । कनिष्ठिका च तिष्ठति तिष्ठादिद्धमनिर्मही ॥ २ ॥
शतस्य धमनीनां सहस्रस्य हिराणाम् । अस्थुरिन्मध्यमा इमाः साकमन्ता अरंसत ॥ ३ ॥
परि वः सिकतावती धनूर्बृहत्यक्रमीत् । तिष्ठतेलयता सु कम् ॥ ४ ॥

अर्थ— (**अमूः याः**) या ज्या (**लोहित वाससः**) लाल कपडे घातलेल्या (**योषितः**) स्त्रिया आहेत, म्हणजे लाल रंगाचा रक्त प्रवाह घेऊन जाणाऱ्या (**हिराः**) धमन्या आहेत त्या (**तिष्ठन्तु**) बंद होतात, म्हणजे त्यांतून वहाणारें रक्त बंद होतें. (**इव**) ज्या प्रकारें, (**अ-भ्रातरः**) भावाशिवाय (**हतवर्चसः**) निस्तेज होऊन (**जामयः**) बहिणी स्तब्ध होतात. [१]

(**अवरे तिष्ठ**) हे खालच्या नाडी ! तूं थांब. (**परे तिष्ठ**) वरच्या नाडी ! तूंहि थांब; (**उत् मध्यमे**) आणि हे मधल्या नाडी ! (**त्वं तिष्ठ**) तूं सुद्धां थांब. (**कनिष्ठिका च तिष्ठति**) लहान नाडी सुद्धां थांबते, त्याचप्रमाणें (**धमनिः इत् तिष्ठात्**) मोठी नाडीसुद्धां स्थिर होवो. [२]

(**धमनीनां शतस्य**) शेंकडो धमन्या आणि (**हिराणां सहस्रस्य**) हजारों नाड्यांमध्यें, (**इमाः मध्यमाः अस्थुः**) या मध्यम नाड्या गुंतल्या आहेत. (**साकं**) त्याबरोबरच (**अंताः**) आंतील भाग (**अरंसत**) ठीक झाले आहेत. [३]

(**बृहती धनूः**) मोठ्या धनुष्यानें (**वः परि अक्रमीत्**) तुमच्यावर हल्ला केला. (**सिकतावतीः तिष्ठत**) रेतीनें युक्त अथवा साखरेनें युक्त होऊन थांब, म्हणजे (**कं**) सुख (**सु इलयत**) प्राप्त कराल. [४]

भावार्थ— शरीरांत लाल रंगाचें रक्त सर्वत्र वाहून नेणाऱ्या धमन्या आहेत. जर घाव लागला तर त्यांतून वाहून जाणाऱ्या रक्तप्रवाहाला थांबविला पाहिजे. ज्याप्रमाणें दुर्भाग्य प्राप्त झालेली बहीण भावावांचून प्रगति करूं शकत नाहीं. खालची, वरची तसेंच मधली नाडी, मोठ्या सर्व नाड्या बंद केल्या पाहिजेत. [१-२]

शेंकडो आणि हजारों नाड्यांपैकीं जरुर त्याच बंद कराव्यात. म्हणजे त्यांचा फाटलेला भाग दुरुस्त केला पाहिजे. मोठ्या मनुष्यांच्या मोठ्या बाणानें धमन्यावर हल्ला होऊन त्या फाटतात, त्यांचा साखरेशीं संबंध जोडला असतां त्यानें लवकर आरोग्य प्राप्त होतें. [३-४]

रक्तस्राव बंद करणें

घाव आणि रक्तस्राव

शरीरांत शस्त्राचा घाव लागला तर होणारा रक्तस्राव त्या जागेच्या वरची आणि खालची नाडी बांधून टाकून बंद करतां येतो. घाव पाहून कोठल्या नाड्या बंद करावयाच्या तें ठरवावें. याप्रमाणें रक्तस्राव जर लवकर बंद करतां आला तरच रोग्याला लवकर आरोग्य प्राप्त होईल. नाहींतर रक्त जास्त वाहिल्यानें मनुष्य मरून जाईल, म्हणून या बाबतींत काळजी घेतली पाहिजे.

लढाईंत शरीरावर घाव होऊन रक्त वाहून जातें तें बंद करण्यासाठीं हा उपदेश असण्याचा संभव आहे. '**सिकतावती**' म्हणजे रेती अथवा साखरेनें युक्त धमनी केल्यानें रक्तस्राव बंद

होत असेल. साखरेची बारीक भुकटी वहात्या जखमेवर लावल्यानें रक्तस्राव बंद होतो म्हणून हें म्हणणें विचार करण्यासारखें आहे.

दुर्दैवी स्त्री

(हत-वर्चसः जामयः) ज्यांचें तेज नष्ट झालें आहे अशा, दुर्दैवी स्त्रिया, म्हणजे पति मेल्यामुळें, ज्यांची भाग्यहीन अवस्था झाली आहे, अशा स्त्रिया पिता, माता अथवा भावाच्या घरीं येऊन रहातात, म्हणजे त्यांनीं येऊन राहिलें पाहिजे. इतर कोणत्या ठिकाणीं त्यांनीं जाऊन राहूं नये. पण जर त्या स्त्रिया **(अ-भ्रातरः)** भावाविरहित असतील तर त्यांची गति कुंठीत होते, म्हणजे अशा स्त्रियांना कोणत्याहि ठिकाणीं जाण्यास स्थान रहात नाहीं. ज्याप्रमाणें पति जिवंत असतां मोठमोठ्या उत्सवादि प्रसंगांत त्या जात असत त्याप्रमाणें पति मेल्यानंतर त्या जाऊं शकत नाहींत, कारण त्यांची गति वैधव्यामुळें कुंठित होते. पूर्वी त्यांची गति सर्वत्र होती, पण आतां दुर्भाग्यामुळें त्या कोणत्याहि ठिकाणीं जाऊं शकत नाहींत.

येथें स्त्रियांविषयीं एक वैदिक दृष्टि दिसून येते. जी स्त्री पति जिवंत असतां उत्सवादि आनंद मंगल प्रसंगांत भाग घेत असे, तिनें पति मरणानंतर कोठें जाऊं नये, घरांत रहावें, उत्सवादि आनंद प्रसंगांत जाऊं नये, मंगल प्रसंगांत भाग घेऊं नये, इत्यादि विधवेच्या आचार-व्यवहार धर्माची रीत येथें दिसून येते.

विधवा स्त्रीनें भाऊ असला तर त्याच्या घरीं जावें, पण भाऊ अथवा, आई बाप जिवंत नसल्यास स्त्रियांना दुःखांत रहावें लागत असे. अशा वेळीं त्या स्त्रीला परमेश्वर भक्ति करीत स्वतःचे दिवस घालवावे लागत आणि परोपकाराचीं कार्यें करावीं लागत.

विधवांचीं वस्त्रें

' हतवर्चसः जामयः लोहितवाससः योषितः ' हे शब्द विधवा स्त्रीचीं वस्त्रें लाल असलीं पाहिजेत हें सुद्धां सुचवित आहेत. ' निस्तेज भाग्यहीन स्त्रियांना लाल वस्त्रें वापरणाऱ्या स्त्रिया, ' हे शब्द दुर्दैवी स्त्रीचे कपडे लाल असले पाहिजेत असेंच सुचवितात. दक्षिण भारतांत ही वैदिक प्रथा अद्याप चालू आहे. तेथील विधवा स्त्रिया फक्त लाल रंगाचीं वस्त्रें वापरतात. पतियुक्त म्हणजे सौभाग्यवती स्त्रिया केवळ लाल रंगाचीं वस्त्रें वापरीत नाहींत, लाल रंगाबरोबर इतर रंगाचीं वस्त्रें वापरतात. विधवा स्त्रिया फक्त पांढरीं वस्त्रें सुद्धां वापरतात. ही पांढऱ्या कपड्यांची पद्धति मात्र सर्व भारतांत रूढ आहे.

रक्तस्राव बंद करणारी औषधि

कांड ६, सूक्त ४४

(ऋषिः – विश्वामित्रः । देवता – वनस्पतिः ।)

अस्थाद् द्यौरस्थात्पृथिव्यस्थाद्विश्वमिदं जगत् । अस्थुर्वृक्षा ऊर्ध्वस्वप्नास्तिष्ठाद्रोगो अयं तव ॥१॥
शतं या भेषजानि ते सहस्रं संगतानि च । श्रेष्ठमास्रावभेषजं वसिष्ठं रोगनाशनम् ॥ २ ॥
रुद्रस्य मूत्रमस्यमृतस्य नाभिः । विषाणका नाम वा असि पितॄणां मूलादुत्थिता वातीकृतनाशनी॥३॥

अर्थ— (द्यौः अस्थात्) द्युलोक थांबला आहे, **(पृथिवी अस्थात्)** हें सर्व विश्व थांबलें आहे. **(ऊर्ध्व-स्वप्नाः वृक्षाः अस्थुः)** उभे राहून झोंप घेणारे वृक्ष सुद्धां थांबले आहेत, या प्रकारें **(अयं तव रोगः तिष्ठात्)** हा तुझा रोग थांबून जावो. [१]

(ते या शतं भेषजानि) तुझीं तीं शंभर औषधें **(सहस्रं संगतानि च)** त्यांच्या हजारों मिश्रण प्रकारांनीं ही **(श्रेष्ठं आस्रावभेषजं)** सर्वांत श्रेष्ठ रक्तस्रावाची औषधि आहे. ती **(वसिष्ठं रोगनाशनं)** सर्वांना वसविणारी आणि रोगांचा नाश करणारी आहे. [२]

(रुद्रस्य = रुत् + रस्यः = मूत्रं) शब्द करणाऱ्या वादळांचें मूत्र म्हणजे वृष्टिरूपी पाणी, **(अमृतस्य नाभिः असि)** अमृतरसाचें केंद्र आहे; तसेंच **(विषाणका नाम वा असि)** ही विषाणका औषधि आहे जी **(वातीकृत-नाशनी)** वात रोग दूर करणारी, **(पितॄणां मूलात् उत्थिता)** पितरांच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आनुवंशिक रोगांना उखडून टाकणारी आहे. [३]

रक्तस्राव आणि वातरोग

ज्याप्रमाणें पृथ्वी आणि आकाश आपआपल्या स्थानीं रहातात, ज्याप्रमाणें वृक्ष रहातात, त्याप्रमाणें मनुष्यांचे रोग दूर जाऊन राहोत, म्हणजे आम्हांपाशीं न येवोत.

वैद्यशास्त्रांत शेंकडों औषधि आणि हजारों प्रकारचीं अनुपानें सांगितलीं आहेत. त्या सर्वांत रक्तस्राव बंद करणारें आणि मनुष्यास स्वास्थ्य ज्या औषधानें प्राप्त होतें तें सर्वांत श्रेष्ठ होय.

जो अमृताचें केंद्र आहे, आणि जो वादळामध्यें वृष्टिद्वारा येतो, जो जलरूपी अमृतरस आहे तो सर्व श्रेष्ठ आहे. विषाणक नांवाची औषधि वातरोगास दूर करते, आणि माता-पितरांकडून प्राप्त होणाऱ्या अनुवंशिक रोगांस दूर करते. या सूक्तांत जलचिकित्सा आणि विषाणका औषधि सांगितली आहे. आनुवंशिक वात आणि रक्तस्रावांच्या रोगांत हा उपाय करून पहावा.

वृक्षांची निद्रा

प्रथम मंत्रांत, ' ऊर्ध्व-स्वप्नाः वृक्षाः ' असें म्हटलें आहे. वृक्ष उभ्या उभ्या झोंपतात. म्हणजे जेव्हां झोंपलेले नसतात तेव्हां जागृत असतात, म्हणजे झोंपणें आणि जागणें हा वृक्षांचा धर्म आहे. तसेंच भिणें आणि आनंदित होणें हें सुद्धां त्यांना शक्य असेल. वृक्षांत जीवन असल्याची गोष्ट वेदानें येथें सांगितली आहे.

नवजात बालक

कांड ६, सूक्त ११०

(ऋषिः – अथर्वा । देवता – अग्निः ।)

प्रत्नो हि कमीड्यो अध्वरेषु सनाच्च होता नव्यश्च सत्सि ।
स्वां चाग्ने तन्वं पिप्रायस्वास्मभ्यं च सौभगमा यजस्व ॥ १ ॥
ज्येष्ठघ्न्यां जातो विचृतोर्यमस्य मूलबर्हणात्परि पाह्येनम् ।
अत्येनं नेषद्दुरितानि विश्वा दीर्घायुत्वाय शतशारदाय ॥ २ ॥

अर्थ— तूं (**प्रत्नः हि अध्वरेषु कं ईड्यः**) पुरातन आणि यज्ञांत सुखानें स्तुति करण्यायोग्य (**सनात् च होता**) सनातन काळापासून दाता आणि (**नव्यः च सत्सि**) नवीन असल्यासारखा सर्वत्र विद्यमान आहेस. हे अग्ने ! तूं (**स्वां तन्वं अस्मभ्यं पिप्रायस्व**) स्वतःचें शरीररूपी हें ब्रह्मांड आम्हांस पूर्ण रूपानें दे आणि (**सौभगं आ यजस्व**) उत्तम ऐश्वर्य दे. [१]

(**ज्येष्ठ-घ्न्यां जातः**) ज्येष्ठांचा नाश करणारीच्या पोटीं हा जन्मला आहे, (**वि-चृतोः यमस्य मूलबर्हणात् एनं परि पाहि**) विशेष हिंसक यमाच्या मूलच्छेदापासून याचें रक्षण कर. (**विश्वा दुरितानि एनं अति नेषत्**) सर्व दुःखांतून याला पार कर आणि (**दीर्घायुत्वाय शत शारदाय**) शंभर वर्षांचें दीर्घ आयु त्याला प्राप्त होवो. [२]

भावार्थ— पुरातन ईश्वर सुख देणारा, पूजनीय आणि नव्यासारखा सर्वत्र विद्यमान आहे. हें जग त्याचें शरीर आहे. तो आम्हांस त्याच्या द्वारें सुख देतो आणि ऐश्वर्यहि देतो. [१]

ज्या स्त्रीचें पहिलें मूल मरतें त्या स्त्रीचा हा पुत्र आहे; असें समजाना कीं तो यमाच्या द्वारांतच आहे. म्हणून नालच्छेदन समयीं सुद्धां त्याचें रक्षण करा. त्याचे सर्व कष्ट दूर होवोत· आणि तो दीर्घायु होवो. [२]

व्याघ्रेऽह्न्यजनिष्ट वीरो नक्षत्रजा जायमानः सुवीरः।
स मा वधीत्पितरं वर्धमानो मा मातरं प्र मिनीज्जनित्रीम् ॥ ३ ॥

अर्थ- (व्याघ्रे अन्हि) क्रूर दिवशीं (वीरः अजनिष्ट) वीर पुत्र उत्पन्न झाला आहे. (नक्षत्रजा जायमानः सुवीरः) योग्य नक्षत्रावर उत्पन्न झालेला हा उत्तम वीर आहे. (सः वर्धमानः पितरं मा वधीत्) तो मोठा होऊन पित्याला न मारो, (जनित्रीं मातरं च मा प्रमिनीत्) जन्म देणाऱ्या मातेला सुद्धां दुःख न देवो. [३]

भावार्थ- कोण्या अनिष्ट प्रसंगीं हा मुलगा निर्माण झालेला असो, परंतु उत्पन्न झाल्यावर तो उत्तम वीर होवो, आणि तसा होऊन स्वतःच्या मातापित्यांना कोणत्याहि प्रकारचें दुःख न देवो. [३]

(हें सूक्त थोडें क्लिष्ट आहे. त्याच्या खऱ्या अर्थाचें विशेष संशोधन व्हावयास हवें. आतां पावेतों त्याच्या योग्य अर्थाचा निर्णय झालेला नाहीं.)

संततीचें सुख

कांड ७, सूक्त १११

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - वृषभः ।)

इन्द्रस्य कुक्षिरसि सोमधानं आत्मा देवानामुत मानुषाणाम् ।
इह प्रजा जनय यास्त आसु या अन्यत्रेह तास्ते रमन्ताम् ॥ १ ॥

अर्थ— तू (इंद्रस्य कुक्षिः असि) इंद्राचें पोट आहेस (सोम-धानः) सोमास धारण करणारा आहेस, तूं (देवानां मनुषाणां आत्मा) देव आणि मनुष्यांचा आत्मा आहेस. (इह प्रजाः जनय) येथें संतान उत्पन्न कर. (याः ते आसु) जी तुझी प्रजा या भूमींत निवास करते, (याः अन्यत्र) ज्या अन्यत्र आहेत त्या तुझ्या प्रजा सुखी राहोत. [१]

मनुष्य इंद्र म्हणजे इंद्रिय शक्ति देणाऱ्या आत्म्याचें भोगसंग्रह करण्याचें जणूं काय पोटच आहे. या पोटांत सोमादि वनस्पतींचा संग्रह करण्यांत यावा, म्हणजे शाकाहार करावा. मांसाहार सर्वथा निषिद्ध आहे. असा परिशुद्ध मनुष्य या जगांत उत्तम संतान उत्पन्न करो, प्रजा स्वतःच्या देशांत राहो अथवा परदेशांत राहो, कोठेंहि राहील तेथें आनंदानें राहो. सुख आणि ऐश्वर्य भोगो, सुखानें राहो.

घरचीं बालकें

कांड ७, सूक्त ८१

(ऋषिः - अथर्वा । देवता - सावित्री ।)

पूर्वापरं चरतो माययैतौ शिशू क्रीडन्तौ परि यातोऽर्णवम् ।
विश्वान्यो भुवना विचष्ट ऋतूँरन्यो विदधज्जायसे नवः ॥ १ ॥

अर्थ— (एतौ शिशू क्रीडन्तौ) हीं दोन बालकें म्हणजे सूर्य चंद्र खेळत असतां (मायया पूर्वापरं चरतः) शक्तीनें मागें पुढें होत आणि (अर्णवं परि यातः) समुद्रापर्यंत फिरत जातात. (अन्यः विश्वा भुवना विचष्टे) त्यांतील एक सर्व भुवनांना प्रकाशित करतो आणि (अन्यः ऋतून् विदधत् नवः जायसे) ऋतूंना निर्माण करतो आणि त्यांना नवीन नवीन करतो. [१]

भावार्थ— या घरांत दोन बालकें आहेत. एकाच्या मागें दुसरा असे ते स्वशक्तीनें खेळतात-खेळतखेळत समुद्रापर्यंत पोहोंचतात, त्यांच्यांतील एक सर्व जगास प्रकाशित करतो. आणि दुसरा ऋतु निर्माण करीत वारंवार नवीन होत रहातो. [१]

नवोनवो भवसि जायमानोऽह्नां केतुरुषसामेष्यग्रम् ।
भागं देवेभ्यो वि दधास्यायन्प्र चन्द्रमस्तिरसे दीर्घमायुः ॥ २ ॥
सोमस्यांशो युधां पतेऽनूनो नाम वा असि । अनूनं दर्श मा कृधि प्रजया च धनेन च ॥३॥
दर्शोऽसि दर्शतोऽसि समग्रोऽसि समन्तः ।
समग्रः समन्तो भूयासं गोभिरश्वैः प्रजया पशुभिर्गृहैर्धनेन ॥ ४ ॥
योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तस्य त्वं प्राणेना प्यायस्व ।
आ वयं प्याशिषीमहि गोभिरश्वैः प्रजया पशुभिर्गृहैर्धनेन ॥ ५ ॥
यं देवा अंशुमाप्याययन्ति यमक्षितमक्षिता भक्षयन्ति ।
तेनास्मानिन्द्रो वरुणो बृहस्पतिरा प्याययन्तु भुवनस्य गोपाः ॥ ६ ॥

अर्थ- (जायमानः नवः नवः भवसि) प्रगट होत तूं नवा नवा होत आहेस. एक (अह्नां केतुः) दिवस दाखविणारा आहे (उषसां विदधासि) तो येवून उषांसाठीं विभाग समर्पण करतो तसेंच, (चंद्रमः ! दीर्घं आयुः प्र तिरसे) हे चंद्रा ! तूं दीर्घ आयु अर्पण करतोस. [२]

हे (युधां पते, सोमस्य अंशः) युद्धाच्या स्वामी ! सोमाच्या अंशा ! (अनूनः नाम वै असि) तूं अन्यून कीर्तीचा आहेस. हे (दर्श) दर्शनीय (मा प्रजया धनेन च अनूनं कृधि) मला प्रजा आणि धनानें परिपूर्ण कर. [३]

(दर्शः असि) तूं दर्शनीय आहेस, (दर्शतः असि) दर्शनासाठीं योग्य आहेस. (सं अंतः समग्रः असि) सर्व अंतां मध्यें समग्र आहेस. (गोभिः अश्वैः प्रजया पशुभिः गृहैः धनेन) गाई घोडे, संतान, पशु, घर आणि धनानें मी (समन्तः समग्रः भूयासं) अंतापर्यंत परिपूर्ण व्हावें. [४]

(यः अस्मान् द्वेष्टि) जो आम्हां सर्वांचा द्वेष करतो, (यं वयं द्विष्मः) ज्याचा आम्ही सर्व द्वेष करतों, (तस्य प्राणेन आप्यायस्व) त्यांच्या प्राणानें तूं वाढत रहा। (गोभिः अश्वैः प्रजया पशुभिः गृहैः धनेन आप्याशिषीमहि) गाई, घोडे, संतति, पशु, घर आणि धनानें आम्हीं वाढावें. [५]

(यं अंशुं देवाः आप्याययन्ति) ज्या सोमाला देव वाढवितात, (यं अक्षितं अक्षिताः भक्षयन्ति) ज्या अविनाशीला अविनाशी खातो, (तेन) त्या सोमा कडून (अस्मान्) आम्हां सर्वांना (भुवनस्य गोपाः इन्द्रः वरुणः बृहस्पतिः) भुवनाचा रक्षक इंद्र, वरुण, बृहस्पति हे देव (आप्याययन्तु) वाढवोत. [६]

भावार्थ— त्यांच्यांतील एक दिवसाच्या कालाचा ध्वजरूप आहे. आणि तो उषःकालाच्या अंतिम समयीं प्रगट होतो. आणि सर्व देवांना त्यांचा योग्य विभाग अर्पण करतो. जें दुसरें बालक आहे तें नित्य नवें नवें, होतें आणि सर्वांना दीर्घायुष्य देतें. [२]

हे युद्धाच्या स्वामी ! सोमाच्या अंशा तूं पूर्ण आणि दर्शनीय आहेस, म्हणून मला संतान आणि धनानें परिपूर्ण कर. [३]

तूं दर्शनीय आणि अत्यंत परिपूर्ण आहेस. मींसुद्धां गाय, घोडे, आदि पशु, संतति, घर, धन, इत्यादींनीं परिपूर्ण होईन. [४]

जे दुष्ट आमचा द्वेष करतात. त्यांच्या प्राणांचें तूं हरण कर; आणि आम्हीं धनादींनीं परिपूर्ण व्हावें. [५]

ज्या सोमाला देव वाढवितात आणि भक्षण करतात, त्यानें आम्हीं पुष्ट व्हावें. त्रिभुवनाचा रक्षक देव आमची उन्नति करो. [६]

घरांतील बालकें

जगरूपी घर

हें संपूर्ण जग एक मोठें घर आहे. या घरांत आम्हीं सर्व रहातों. या घरांत दोन आदर्श बालकें आहेत. या बालकांचीं नांवें, 'सूर्य आणि चंद्र' आहेत. आपल्या घरांत बालकें कशी असलीं पाहिजेत आणि माता पित्यांनीं प्रयत्न करून आपल्या बालकांना कशाप्रकारें शिक्षण दिलें पाहिजे, बालकें कशी तयार

केलीं पाहिजेत या विषयीं उपदेश या सूक्तांत देण्यांत आला आहे. प्रत्येक घरच्या मातापित्यांनीं या दृष्टीनें या सूक्ताचा विचार केला पाहिजे.

खेळणारी बालकें (**क्रीडन्तौ शिशू**) खेळणारी बालकें असलीं पाहिजेत. रडकीं नव्हे. बालकें अशक्त, आजारी आणि दोषी असतील तर तीं रडणाराच. जीं बलवान् निरोगी आणि कोणत्याहि शारिरीक रोगांनीं पीडलेलीं नसतील, तीं विशेषेंकरून रडत नाहींत. मातापित्यांनीं गृहस्थाश्रमांत असा योग्य आणि नियमानुकूल व्यवहार ठेवावा कीं, ज्यामुळें सुदृढ, हृष्टपुष्ट, निरोगी आणि आनंदी बालकें उत्पन्न होतील.

स्वशक्तीनें चालावें

बालकांत दुसरा गुण असा असला पाहिजे कीं तीं (**मायया पूर्वापरं चरन्तः**) स्वतःच्या आंतरिक शक्तीनेंच मागें पुढें चालत रहातील. दुसऱ्यांनीं उठवावें तेव्हां उठावें, दुसऱ्यांनीं चालवावें तेव्हां चालावें, असलीं परावलंबी बालकें असूं नयेत. मातापिता बळवान् आणि नियमानुकूल वागत असतील तर त्यांना अशीं स्वशक्तीनें हालचाल करणारी संतति होते. जर मातापिता दुर्व्यसनी नसले, सदाचारी, आणि ऋतुगामी होऊन गृहस्थाश्रमाचा व्यवहार, ज्याला धार्मिक म्हणतां येईल असा करतात, त्यांच्या घरीं उत्तम संतति जन्मास येते. जीं निरोगी सुदृढ बालकें असतात, त्यांना कितीहि कष्ट पडले, तरी सुद्धां तीं स्वतः स्वतःच्या प्रयत्नानें पुढें सरकण्याचा प्रयत्न करीतच असतात.

दिग्विजय

तीं प्रगति साधून विद्वान् आणि पुरुषार्थी होऊन, (**अर्णवं परियातः**) समुद्राच्या चारी बाजूंच्या देशांत भ्रमण करतात, दिग्विजय करतात, स्वतःच्या गांवांत विहिरींतील बेडकाप्रमाणें बसून रहात नाहींत. समुद्रावर व अंतरिक्षांत संचार करतात, देशदेशांतरांत परिभ्रमण करतात, धर्म सदाचार तसेंच सुशीलता इत्यादींचा उपदेश करतात, सर्व जनतेला योग्य आदर्श दाखवितात.

जगतास प्रकाश द्यावा

याप्रकारें परम पुरुषार्थानें व्यवहार करीत राहिलें असतां त्यांतून एक (**अन्यः विश्वानि भुवनानि विचष्टे**) सर्व जगाला प्रकाश देतो, अंधःकारांत बुडलेल्या जनतेला प्रकाशांत आणतो. तो यासाठीं अनेक देशांतराला जातो, भ्रमण करतो आणि जनतेला अंधःकारातून सोडवून प्रकाशांत आणण्याचा तो प्रयत्न करतो.

दुसरा गृहस्थाश्रमी (**ऋतून् विदधत्**) ऋतुगामी होऊन, ऋतूंना अनुकूल राहून (**नवः जायसे**) नव्यासारखा होतो. वाटेल तितकें वय झालें तरी, नवीन तरुणासारखा (**नवः जायसे**) नव्यासारखाच होतो. ऋतुगामी व्हावें, ऋतूंस अनुकूल वागावें. सोमादि औषधींचा उपयोग करून वृद्ध सुद्धां तरुणांच्या सारखे लाभ मिळवूं शकतील.

याप्रमाणें प्रथम मंत्र सूर्यचंद्रावर रूपक आहे. वाचकांनीं त्याचा योग्य विचार करावा आणि स्वतःच्या बालकांच्या शिक्षणांविषयीं योग्य तो बोध प्राप्त करावा. एक सूर्यासारखा पुत्र झाला तर सर्व जगास प्रकाश देईल. अथवा एक चंद्रासारखा पुत्र झाला तर (**नवः नवः भवति**) नवजीवन प्राप्त करण्याची विद्या संपादन करून तो नव्यासारखा होईल, आणि (**दीर्घ आयुः प्रतिरते**) दीर्घायु प्राप्त करून लोकांनाही दीर्घायु करील.

कर्तव्याचा भाग

जो जगताला प्रकाश देतो तो (**देवभ्यः भागं विदधाति**) देवासाठीं भाग्य देतो, अथवा देवांसाठीं कर्तव्याचा भाग देतो. म्हणजे तो तें कार्य करतो आणि तें कार्य संभाळतो सुद्धां. याप्रकारें कार्यविभागाच्या बाबतींत आज्ञा देतो आणि निरनिराळ्या कार्यकर्त्यां जवळून निरनिराळीं कामें करवून एक महान् कार्य परिपूर्ण करतो. मनुष्यानें असाच आदर्श स्वतःसमोर ठेवला पाहिजे. पहा, या जगांत जल शांति देण्याचें कार्य करीत आहे. अग्नि तापविण्याचें कार्य करीत आहे, वायु सुकवितो, भूमि आधार देते इत्यादि देव निरनिराळीं कार्यें स्वतःच्या माथीं घेऊन स्वकार्यांत तत्पर रहातात. आणि संपूर्ण जगाचें महान् कार्य, निभवितात. असेंच समजा कीं हा मनुष्यदेह देवांनीं करण्याचीं कार्यें वांटून घेतो. याप्रकारें राष्ट्रांत मुख्य नेता इतर लहान लहान नेत्यांस त्यांचीं कार्यें सोंपून देतो. आणि तेहि तीं योग्यप्रकारें करतील, तरच सर्वांनीं स्वतःच्या वांट्यास आलेलीं कार्यें पार पाडल्याची महान् सिद्धि प्राप्त करूं शकतील.

पूर्ण व्हा

एक पूर्ण सोम असतो. तो पूर्णिमेच्या दिवशीं प्रकाशतो. दुसरे सोमाचे अंश असतात. ते अंश असून पूर्ण होण्याची शक्ति त्यांच्यांत असते. त्यामुळें ते न्यून नाहींत. म्हणून त्यांना (**अनूनः असि**) अन्यून म्हणजे परिपूर्ण म्हटलें आहे. हा सोम अंशरूप असो अथवा पूर्णरूप असो तो अन्यूनच होय. कारण कीं आज तो अंश असेल, पण थोड्या दिवसानंतर तो पूर्ण व्हावयाचा आहेच. म्हणून तो कांहीं न्यून रहावयाचा नाहीं. न्यून

असूनहि तो प्रयत्नपूर्वक पूर्ण होतो, हा पूर्ण होण्याचा त्याचा पुरुषार्थ, प्रत्येक मनुष्यास अनुकरणीय आहे. म्हणून त्याची प्रार्थना तिसऱ्या मंत्रांत करण्यांत आली आहे कीं, तूं परिपूर्ण होणारा आहेस. (**अनूनं मा कृधि**) मला अन्यून-परिपूर्ण कर, मीं परिपूर्ण होऊं इच्छितों, धन, आरोग्य, गाई, घोडे, इत्यादींनीं मीं परिपूर्ण व्हावें. असा येथें अभिप्राय आहे. हाच भाव ४ थ्या मंत्रांत सांगण्यांत आला आहे. (**समन्तः समग्रः असि**) तूं सर्वप्रकारें समग्र म्हणजे परिपूर्ण आहेस. मीं सुद्धां तुझ्या उपासनेनें, (**समग्रः समन्तः**) पूर्ण आणि संपूर्ण, समग्र, परिपूर्ण व्हावें.

दुष्टाचा नाश

जो दुष्ट आम्हां सर्वांचा द्वेष करतो, आणि त्या एकाच दुष्टाचा आम्हीं सर्व द्वेष करतों, यांत दोष होण्याचा जराहि संभव नाहीं; जर असा कोणी मनुष्य संपूर्ण समाजाचा घात करील तर त्याचें नियमन करणें आवश्यक होतें, त्या द्वेष करणाऱ्यास येथें अल्पसंख्याक कल्पिलें आहे. ' ज्या एकट्याचा आम्हीं सर्व द्वेष करतों आणि जो एकटा आम्हां सर्वांचा द्वेष करतो, ' यांत बहुसंख्याक सज्जन आणि अल्पसंख्यांक दुर्जन असल्याचा उल्लेख आहे. अशा दुर्जनांना दाबून टाकावें आणि सज्जनांचा उन्नतीचा मार्ग खुला करावा, हेंच धार्मिक मनुष्याचें कर्तव्य आहे.

दिव्य भोजन

देवांचें भोजन असतें त्यास देवभोजन अथवा दिव्यभोजन म्हणण्यांत येतें. देवांचें तें भोजन कसें असतें, त्या विषयीं या सूक्तांत ६ व्या मंत्रांत सांगितलें आहे—

देवा अंशुं आप्याययन्ति ।
अक्षिताः अक्षितं भक्षयन्ति ॥ (मं. ६)

' देवलोक सोमास वाढवितात आणि ते अमर देव त्या अक्षय सोमाचें भक्षण करतात. ' सोम ही एक प्रकारची वनस्पति आहे. ती वाढविणें आणि खाणें हेंच देवांचें अन्न होय. म्हणजे देव शाकाहारी आहेत. जीं मनुष्यें देवाच्या नैवेद्यासाठीं मांसाचा उपयोग करितात, त्यांनीं या वेदमंत्राचा विशेष विचार करावा. सोम देवांचें अन्न आहे, त्यासाठीं वेदांमध्यें अनेक मंत्र आहेत. आणि वर सांगितलें हेंच त्याचें तात्पर्य आहे.

वाचकांनीं या दृष्टीनें या सूक्ताचा विचार करावा.

मुंडन

कांड ६, सूक्त ६८

(ऋषिः - अथर्वा । देवता - मन्त्रोक्ताः ।)

आयमंगन्त्सविता क्षुरेणोष्णेन वाय उदकेनेहि ।
आदित्या रुद्रा वसव उन्दन्तु सचेतसः सोमस्य राज्ञो वपत प्रचेतसः ॥ १ ॥
अदितिः श्मश्रु वपत्वाप उन्दन्तु वर्चसा । चिकित्सतु प्रजापतिर्दीर्घायुत्वाय चक्षसे ॥ २ ॥

अर्थ— (**अयं सविता क्षुरेण आ अगन्**) हा सविता स्वतःच्या वस्त्र्या सह आला आहे. हे (**वायो**) वायु ! (**उष्णेन उदकेन आ इहि**) उष्ण पाण्यासह ये. (**आदित्याः रुद्राः वसवः सचेतसः उन्दन्तु**) आदित्य रुद्र आणि वसु एकचित्तानें या बालकास भिजवोत. हे (**प्रचेतसः**) ज्ञानी लोक हो ! तुम्ही (**सोमस्य राज्ञः वपत**) या सोम राजाचें मुंडण करा. [१]

(**अदितिः श्मश्रु वपतु**) अदिति केसांचें वपन करो. (**आपः वर्चसा उन्दन्तु**) पाणि तेजासह केसांना भिजवो. (**दीर्घायुत्वाय चक्षसे**) आणि उत्तम दृष्टिसाठीं (**प्रजापतिः चिकित्सतु**) प्रजापालक त्याची चिकित्सा करो. [२]

येनावंपत्सविता क्षुरेण सोमस्य राज्ञो वरुणस्य विद्वान् ।
तेन ब्रह्माणो वपतेदमस्य गोमानश्ववानयमस्तु प्रजावान् ॥ ३ ॥

अर्थ-(विद्वान् सविता) ज्ञानी सवित्याने (येन क्षुरेण) ज्या वस्तऱ्यानें (वरुणस्य राज्ञः सोमस्य अवपत्) श्रेष्ठ राजा सोमाचें वपन केलें, हे (ब्रह्माणः) ब्राह्मण हो ! (तेन अस्य इदं वपत) त्यानें या शिराचें मुंडन करा. (अयं गोमान् अश्ववान् प्रजावान् अस्तु) हा गाई, घोडे आणि संतति यांनीं युक्त होवो. [३]

मुलाचें क्षौर कर्म (केंस कापणें) करणें असल्यास सुरवातीस त्याचे सर्व केंस उन पाण्यानें उत्तमपैकीं भिजविले पाहिजेत. कारागीरानें वस्तरा स्वच्छ आणावा, त्यास धार चांगली लावलेली असावी. जणूं कोणा राजाचें मुंडण करावयाचें आहे अशा भावनेनें व काळजीपूर्वक सावधगिरीनें लहान मुलांच्या मस्तकाचें मुंडण करावें. कांहीं चूक त्यांत होऊं नये. ज्याचे केंस कापावयाचे त्याचें आयुष्य वाढेल आणि दृष्टि सतेज होईल, अशा रीतीनें वपन करावें. वैद्यांनीं वस्तरा आणि पाणी यांची परीक्षा करावी आणि ज्याची हजामत करावयाची त्याचीहि परीक्षा करावी, हजामत करतांना मनांत असा भाव ठेवावा कीं ज्याची हजामत करीत आहें तो दीर्घायु आरोग्यसंपन्न, स्वस्थ, गाई, घोडे पाळणारा आणि उत्तम संतानयुक्त व्हावा. या विरुद्ध भाव मनांत येऊं नये.

मेखला बंधन

कांड ६, सूक्त १३३

(ऋषिः – अगस्त्यः । देवता – मेखला ।)

य इमां देवो मेखलामाबबन्ध यः संननाह य उं नो युयोज ।
यस्य देवस्य प्रशिषा चरामः स पारमिच्छात्स स उं नो वि मुंञ्चात् ॥ १ ॥
आहुतास्यभिहुत ऋषीणामस्यायुधम् । पूर्वा व्रतस्य प्राश्नती वीरघ्नी भव मेखले ॥ २ ॥
मृत्योरहं ब्रह्मचारी यदस्मि निर्याचन्भूतात्पुरुषं यमाय ।
तमहं ब्रह्मणा तपसा श्रमेणानयैनं मेखलया सिनामि ॥ ३ ॥

अर्थ— (यः देवः इमां मेखलां आबबन्ध) ज्या आचार्य देवानें ही मेखला माझ्या शरीरावर बांधली (यः संननाह) जो आम्हांस तयार ठेवतो आणि कार्यास लावतो, (अस्य देवस्य प्रशिषा चरामः) ज्या आचार्य देवांच्या आशीर्वादांनीं आम्हीं व्यवहार करतों, (सः पारं इच्छात्) तो आम्हांस दुःखांतून पार करण्याची इच्छा करो आणि (सः उ नः विमुञ्चात्) तो आम्हांस बंधनांतून सोडवो. [१]

हे मेखले ! (आहुता अभिहुता असि) तूं सर्व प्रकारें प्रशंसित आहेस, तूं (ऋषीणां आयुधं असि) ऋषींचें आयुध आहेस. तूं (व्रतस्य पूर्वा प्राश्नति) कोणत्या एखाद्या व्रतानें पूर्वीच बांधली जातेस, तू (वीरघ्नी भव) शत्रु वीरांना मारणारी हो [२]

(यत् अहं मृत्योः ब्रह्मचारी अस्मि) ज्या कारणानें मीं मृत्यूला समर्पित झालेला ब्रह्मचारी आहें. त्या कारणानें मीं (भूतात् पुरुषं यमाय निर्याचन्) मनुष्य प्राण्यांतून एक पुरुष मृत्यूसाठीं मागतों आणि (तं अहं) त्या पुरुषाला मी (ब्रह्मणा तपसा श्रमेण) ज्ञान, तप, परिश्रम करण्याच्या शक्तिसह (एनं अनया मेखलया सिनामि) या मेखलेनें बांधतो. [३]

भावार्थ— गुरु शिष्याच्या कमरेस मेखला बांधतो आणि जणूं काय त्यास सत्कर्मासाठीं तयार करतो. अशा गुरूच्या आशीर्वादानें जे शिष्य व्यवहार करतात ते सर्व दुःखांतून पार होतात आणि अंतीं मुक्ति प्राप्त करून घेतात. [१]

मेखलेची सर्व प्रशंसा करतात, ही मेखला ऋषींचें शस्त्र आहे. प्रत्येक कार्य करण्यासाठीं कंबर कसण्याचा बोध त्यांतून मिळतो. याप्रकारें कटिबद्ध होऊन कर्म करण्यानें सर्व शत्रू दूर होतात. [२]

श्रद्धाया दुहिता तपसोऽधि जाता स्वस ऋषीणां भूतकृतां बभूव ।
सा नो मेखले मतिमा धेहि मेधामथो नो धेहि तप इन्द्रियं च ॥ ४ ॥
यां त्वा पूर्वे भूतकृत ऋषयः परिबेधिरे । सा त्वं परि ष्वजस्व मां दीर्घायुत्वाय मेखले॥५॥

अर्थ-ही मेखला (**श्रद्धायाः दुहिता**) श्रद्धेची कन्या (**तपसा अधिजाता**) तपानें उत्पन्न झालेली(**भूत कृतं ऋषीणां स्वसा बभूव**) प्राण्यांना उत्पन्न करणाऱ्या ऋषींची भगिनी झाली आहे. हे मेखले ! (**सा**) अशी तूं (**नः मतिं मेधां आ धेहि**) आम्हांस उत्तम बुद्धि आणि धारणाशक्ति दे (**अथो तपः इन्द्रियं च नः धेहि**) आणि आम्हांस तपशक्ति तसेंच उत्तम इंद्रियें दे. [४]

हे मेखले ! (**यां त्वा पूर्वे भूतकृतः ऋषयः परिबेधिरे**) ज्या तुला पूर्व काळचा इतिहास निर्माण करणारे ऋषि बांधित आले (**सा त्वं दीर्घायुत्वाय मां परिष्वजस्व**) ती तूं दीर्घायुत्वासाठीं मला आलिंगन दे. [५]

भावार्थ— मेखला बांधणें याचा अर्थ कंबर कसणें, तयार होणें असा आहे. विशेष कार्यासाठीं मेखला बांधल्यानें जणूं तो मनुष्य या कामीं मृत्यूशीं झगडण्यास तयार आहे अथवा या कामीं मृत्यु आला तरी तो पत्करण्यास तयार आहे असा अर्थ होतो. सर्व ब्रह्मचारी मृत्यूचें स्वागत करण्यास तयार असतात. एवढेंच नाहीं तर ते इतर मनुष्यांस मृत्यू स्वीकारण्यास तयार करतात. ज्ञान, तप, परिश्रम आणि कटिबद्धता या गुणांनीं ते युक्त होतात. [३]

मेखला श्रद्धेनें बांधण्यांत येते, त्यानें तप करण्याची प्रवृत्ति होते. श्रेष्ठ ऋषि मुनिपासून या कटि बद्धकारित्वाची सुरवात झाली, हें कटिबंधन सर्वांत उत्तम बुद्धि, धारणा शक्ति, इंद्रिय शक्ति, आणि तप देवो. [४]

ऋषि-मुनि या मेखलेस बांधतात, म्हणून ती मेखला मला दीर्घायुष्य देईल. [५]

मेखला बंधन

कटिबद्धता

मेखलाबंधन कटिबद्धतेचें सूचक आहे. दरेक कार्यासाठीं कंबर कसणें आवश्यक असते. त्याशिवाय काम होऊं शकत नाहीं. भाषेंतसुद्धां असा वाक्‌प्रचार रूढ झाला आहे कीं, हा मनुष्य कंबर कसून कामाला लागला आहे. म्हणजे काम करण्यासाठीं कंबर कसण्याची आवश्यकता आहे. ऋषि अथवा ब्रह्मचारी मेखला-बंधन करीत असत याचा अर्थच हा आहे कीं ते कंबर कसून कार्य करण्यासाठीं नित्य तयार रहात असत. या कारणानें ते यश प्राप्त करूं शकत असत.

सामान्य कार्यांत फारशी भीति नसते परंतु कित्येक मोठी कामें अशीं असतात की ज्यांत प्राण गमविण्याचा संभव असतो. देश-हित, राष्ट्रहित अथवा जातिहित इत्यादि महान् कार्यांत कित्येक मनुष्यांनीं स्वतःचें प्राणार्पण करावयाचें असतें. या कार्यासाठीं गुरु शिष्यास तयार करतो-

इमां मेखलां आबबन्ध, संनानह, नः युयोज । (मं. १)

' आमच्या गुरूंनीं ही मेखला मला बांधली आहे, त्यांनीं मला तयार केलें आहे व सत्कार्यास जोडलें आहे. ' हें गुरूचें कार्य आहे आणि हाच विद्या शिकण्याचा हेतू आहे. विद्या शिकून ब्रह्मचारी जनतेच्या उद्धारासाठीं सिद्ध व्हावेत आणि त्यांनीं तत्परतेनें कार्यास लागावें. पाठशाळेंत शिकविणारे गुरूहि पण असेच असले पाहिजे, की जे स्वतःच्या विद्यार्थ्यांना अशा रीतीनें तयार करतील आणि राष्ट्रीय विद्यापीठाचें शिक्षण सुद्धा असें असलें पाहिजे कीं ज्याच्या पठणानें विद्यार्थी जनहिताच्या कार्यासाठीं नेहमीं तयार रहातील, कटिबद्ध असतील. जे शिष्य याप्रमाणें स्वतःच्या गुरुजींचा आशीर्वाद मिळवून कार्य करतात ते कृतकृत्य होतात-

यस्य प्रशिषा चरामः स पारं इच्छात् स नः विमुञ्चात् । (मं. १)

' ज्या गुरूचे आशीर्वाद घेऊन आम्हीं कार्य करीत आहोंत. ते आम्हांस दुःखांतून पार करोत, बंधनांतून मुक्त करोत. ' असे गुरु आणि शिष्य जेथें असतील त्या देशाचें सौभाग्य नेहमीं उच्च राहील यांत शंका नाहीं.

ही मेखला याप्रमाणें कटिबद्धतेची सूचना देत आहे. म्हणून मनुष्यें तिची प्रशंसा करतात, प्रत्येक कार्य करण्याच्या सुरवातीस या कारणानें मेखला बांधण्यांत येते. आणि त्यामुळें शत्रूचें बळ कमी होतें.

विशेष महत्त्वपूर्ण कार्य करण्याच्यावेळीं सर्वस्व नाशाचें भय असतें. मृत्यूचें सुद्धां भय असतें. जर त्या भयाची कल्पना नसली तर योग्यवेळीं भीतीनें मनुष्य पाठीमागें सरेल. तसें न व्हावें म्हणून प्रारंभींच विद्यार्थ्यांना असें शिक्षण दिलें पाहिजे की—

अहं मृत्योः ब्रह्मचारी अस्मि। (मं. ३)

' मीं मृत्यूला समर्पित झालेला ब्रह्मचारी आहें.' ब्रह्मचाऱ्यानें समजावें की मीं मृत्यूलाच आलिंगन दिलें आहे. मृत्यूलाच स्वीकारलें आहे. जेव्हां कोणी मनुष्य आनंदानें मृत्यूचा अतिथि होतो, तेव्हां त्याची कशी अवस्था असते की त्यास भीति वाटावी? ज्यानें आनंदानें मृत्यूचा स्वीकार केला आहे त्याची भीति नाहींशी होते कारण सर्वांत मोठें भय त्यानें पचविलें आहे. याप्रकारें निडर झालेला ब्रह्मचारी सुद्धां—

भूतात् यमाय पुरुषं निर्याचन्। (मं. ३)

' जनतेजवळ मृत्यूसाठीं एक पुरुषाची याचना करतो.' म्हणजे तो ब्रह्मचारी ज्याप्रमाणें स्वतः निर्भय होऊन कार्य करतो त्याचप्रमाणें दुसऱ्यांना सुद्धां निर्भय करतो. आणि अशा निर्भय झालेला तो मनुष्य—

ब्रह्मणा तपसा श्रमेण मेखलया। (मं. ३)

' ज्ञान, तप, शीतोष्ण सहन करण्याची शक्ति, परिश्रम करण्याचें बल आणि मेखला बंधन म्हणजे कटिबद्ध रहाण्याचा गुण प्राप्त करतो आणि जो अशा गुणांनीं युक्त होतो तो सर्वांहून श्रेष्ठ होतो.

मेखला बंधनानें बुद्धि, धारणाशक्ति, शीतोष्ण सहन करण्याचें सामर्थ्य आणि सुदृढ इंद्रियांची प्राप्ति होते. तसेंच दीर्घायुष्यहि प्राप्त होतें. असें मेखलेचें महत्त्व आहे. वाचकांनीं या सूक्ताचें विशेष चिंतन करावें.

कामाला परत फिरवा

कांड ६, सूक्त १३०

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – स्मरः ।)

रथजितां राथजितेयीनामप्सरसामयं स्मरः । देवाः प्र हिणुत स्मरमसौ मामनु शोचतु ॥ १ ॥
असौ मे स्मरतादिति प्रियो मे स्मरतादिति । देवाः प्र हिणुत स्मरमसौ मामनु शोचतु ॥ २ ॥
यथा मम स्मरादसौ नामुष्याहं कदा चन । देवाः प्र हिणुत स्मरमसौ मामनु शोचतु ॥ ३ ॥
उन्मादयत मरुत उदन्तरिक्ष मादय । अग्न उन्मादया त्वमसौ मामनु शोचतु ॥ ४ ॥

अर्थ— **(रथजितां राथजितेयीनां अप्सरसां)** रथास जिंकणाऱ्या आणि रथानें जिंकल्या गेलेल्या अप्सरांचा **(अयं स्मरः)** हा काम आहे. हे देव हो ! **(स्मरं प्रहिणुत)** या कामास दूर करा. **(असौ मां अनुशोचतु)** तो माझा शोक करो. [१]

(असौ मे स्मरतात् इति) तो माझें स्मरण करो, **(प्रियः मे स्मरतात् इति)** माझा प्रिय माझें स्मरण करो. हे देव हो ! **(स्मरं प्रहिणुत)** या कामास दूर करा. **(असौ मां अनुशोचतु)** तो माझा शोक करो. [२]

(यथा असौ मम स्मरात्) ज्याप्रकारें तो माझें स्मरण करतो **(अमुष्य अहं कदाचन न)** तसें मी त्याचें स्मरण करणार नाहीं. हे देव हो ! **(स्मरं)** त्या कामाला दूर करा. तो मजविषयीं शोक करो. (३)

हे मरुत् हो ! **(उन्मादयत)** बलवान् करा. **(अन्तरिक्ष ! उन्मादयत)** हे अंतरिक्षा ! बलवान् कर. हे अग्ने ! **(त्वं उन्मादयत)** तूं बलवान् कर. **(असौ मां अनुशोचतु)** तो माझा शोक करो. [४]

कामाला परत फिरवा

या सूक्ताचा आशय स्पष्ट आहे. कोणाच्या मनांत कोणाच्या विषयीं काम उत्पन्न झाला तर त्या कामाला ज्याच्यामुळें तो उत्पन्न झाला, त्याच्या पाशीं त्याला परत पाठविला पाहिजे. आपल्या मनांत त्यास स्थान देतां कामा नये. ज्या अवस्थेंत इतर मनुष्यें—स्त्री अथवा पुरुष उन्मत्त, प्रमत्त, बेहोष होतात, धर्म विसरतात, तशी अवस्था झाली असतां सुद्धां त्या कामाचा परिणाम आपल्या मनावर होऊं देतां कामा नये. याप्रकारें आपलें मन कामविकारापासून दूर राखिलें पाहिजे.

कामाला परत फिरवा

कांड ६, सूक्त १३१

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – स्मरः ।)

नि शीर्षतो नि पत्तत आध्यो३ नि तिरामि ते । देवाः प्र हिणुत स्मरमसौ मामनु शोचतु ॥ १ ॥
अनुमतेऽन्विदं मन्यस्वाकूते समिदं नमः । देवाः प्र हिणुत स्मरमसौ मामनु शोचतु ॥ २ ॥
यद्धावसि त्रियोजनं पञ्चयोजनमाश्विनम् । ततस्त्वं पुनरायसि पुत्राणां नो असः पिता ॥ ३ ॥

अर्थ— (**ते आध्यः शीर्षतः पत्ततः**) तुझ्या पीडा मस्तक आणि पायांपासून (**नि नि नि तिरामि**) दूर काढून लावतों. हे (**देवाः**) देव हो ! (**स्मरं प्रहिणुत**) कामास दूर करा, (**असौ मां अनुशोचतु**) तो काम माझ्यासाठीं शोक करो. [१]

हे (**अनुमते**) अनुमति ! (**इदं अनुमन्यस्व**) याला तूं अनुकूल हो. हे (**आकूते**) संकल्पा ! तूं (**इदं नमः सं**) या माझ्या नमनाचा स्वीकार कर. हे देव हो ! कामास दूर करा आणि तो काम मजसाठीं शोक करो. [२]

(**यत् त्रियोजनं धावसि**) जो तीन योजनें धांवतो, अथवा (**अश्विनं पञ्च योजनं**) घोड्यावर बसून पांच योजनें जातो, (**ततः त्वं पुनः आयसि**) तेथून तूं परत येतोस, (**नः पुत्राणां पिता असः**) आमच्या पुत्रांचा तूं पिता आहेस. (३)

हें सूक्त पूर्वोक्त सूक्ताप्रमाणेंच कामविकारास दूर करण्याची सूचना देणारें आहे. कामविकार दूर केला पाहिजे. ज्याच्याविषयीं कामविकार उत्पन्न झाला असेल, तो शोक करीत राहो, अथवा तडफडत राहो, परंतु स्वतः त्या कामाच्या ताब्यांत जाऊं नये.

तिसऱ्या मंत्राचें कथन आहे कीं, वाटेल तितकें घरापासून दूर घरचीं मनुष्यें जावोत, त्यांनीं अवश्य स्वतःच्या घरीं परत आलें पाहिजे. आणि घरच्या बालकांचें रक्षण, भरण-पोषण केलें पाहिजे. म्हणजे स्वतःच्या घरांत येऊन झोंपलें पाहिजे. बाहेर इतरांच्या घरीं झोंपणें योग्य नाहीं. या मंत्राचा अर्थ प्रकरणानुकूल समजला पाहिजे. म्हणजे घरांत झोंपण्यानें कामवासनेची संभावना कमी राहील. याविषयीं एवढ्या सूचनेवरून सूक्ताचा गर्भितार्थ वाचक समजूं शकेल. जास्त स्पष्टार्थाची जरुरी नाहीं.

कामाला परत फिरवा

कांड ६, सूक्त १३२

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – स्मरः ।)

यं देवाः स्मरमसिञ्चन्नप्स्व१न्तः शोशुचानं सहाध्या । तं ते तपामि वरुणस्य धर्मणा ॥ १ ॥
यं विश्वे देवाः स्मरमसिञ्चन्नप्स्व१न्तः शोशुचानं सहाध्या । तं ते तपामि वरुणस्य धर्मणा ॥२॥
यमिन्द्राणी स्मरमसिञ्चदप्स्व१न्तः शोशुचानं सहाध्या । तं ते तपामि वरुणस्य धर्मणा ॥ ३ ॥
यमिन्द्राग्नी स्मरमसिञ्चतामप्स्व१न्तः शोशुचानं सहाध्या । तं ते तपामि वरुणस्य धर्मणा ॥ ४ ॥
यं मित्रावरुणौ स्मरमसिञ्चतामप्स्व१न्तः शोशुचानं सहाध्या । तं ते तपामि वरुणस्य धर्मणा ॥५॥

अर्थ— (**देवाः, विश्वेदेवाः, इन्द्राणि, इन्द्राग्नी, मित्रा वरुणौ**) देव, सर्व देव, इंद्राणी, इंद्र आणि अग्नि तसेंच मित्र आणि वरुण हे सर्व देव (**यं शोशुचानं स्मरं**) ज्या शोक करणाऱ्या कामाला (**आध्या सह**) रोगांसह (**अप्सु अन्तः असिञ्चन**) जलाच्या प्रतिनिधिभूत वीर्यांत सिंचन करतात, (**वरुणस्य धर्मणा**) वरुण नांवाच्या जलदेवतेच्या धर्मानें (**ते तं तपामि**) तुझ्या त्या कामाला मीं तापावितों. म्हणजे त्या तापानें तप्त होऊन तो दूर पळून जाईल आणि आम्हांस कधींहि त्रास देणार नाहीं [१–५]

सर्व देवतांमध्यें जे रेत आहे त्या रेतामध्यें 'कामा' स ठेविलें आहे. तेथें राहून तो मनुष्यास त्रास देतो आणि अनेक प्रकारचे कष्ट देतो. जो रेतांत रहातो त्या कामाच्या बरोबर (आध्या सह) अनेक आधि म्हणजे मानसिक व्यथा असतात. जेथें काम असतो तेथें मानसिक कष्ट पुष्कळ असतात. त्यांची परंपरा अशी आहे—

संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥ (भ. गी. २)

'विषयाच्या संगतीनें काम उत्पन्न होतो, कामापासून क्रोध, क्रोधापासून मोह, मोहामुळें भ्रम, भ्रमानें बुद्धिनाश, बुद्धिनाशानें सर्व नाश होतो.'

या प्रकारें कामाशीं नाश जोडलेला आहे, म्हणून त्यास दूर केला पाहिजे. जितका धर्मसंमत काम असेल तितकाच स्वीकारला पाहिजे. धर्मविरुद्ध कामाचा त्याग केला पाहिजे, म्हणूनच म्हटलें आहे कीं कामाशीं अनेक विपत्ति जोडल्या आहेत, आणि विपत्तींनीं मनुष्य (शोशुचानः) शोकाकुल होतो. हा काम सर्वांस शोकसागरांत टाकणारा आहे. शुच् धातूचे अर्थ दोन आहेत– तेजस्वी होणें आणि शोकयुक्त होणें. हीं दोन्हीं त्याचीं कामें आहेत. स्वतः तो तेजस्वी असून इतरांस शोकांत टाकून देतो, म्हणून मनःसंयमानें त्याला तापवून अथवा सुकवून टाकला पाहिजे म्हणजे तो दूर जाईल आणि कष्ट देणार नाहीं.

कंकण धारण करणें

कांड ६, सूक्त ८१

(ऋषिः – अथर्वा । देवता – आदित्याः, मन्त्रोक्ताः ।)

यन्तासि यच्छसे हस्तावप रक्षांसि सेधसि । प्रजां धनं च गृह्णानः परिहस्तो अभूदयम् ॥ १ ॥
परिहस्त वि धारय योनिं गर्भाय धातवे । मर्यादे पुत्रमा धेहि तं त्वमा गमयागमे ॥ २ ॥
यं परिहस्तमबिभरदितिः पुत्रकाम्या । त्वष्टा तमस्या आ बध्नाद्यथा पुत्रं जनादिति ॥ ३ ॥

अर्थ— (यन्ता असि) तूं नियामक आहेस, (हस्तौ यच्छसे) दोन्ही हातांचें तूं नियमन करतोस आणि त्यांच्या (रक्षांसि सेधसि) विघ्नकर्त्यांना दूर करतोस. (अयं परिहस्तः) हें कंकण (प्रजां धनं च गृह्णानः) प्रजा आणि धनाचें ग्रहण करणारें (अभूत्) आहे. [१]

हे (परिहस्त) कंकणा ! (गर्भाय धातवे) गर्भ धारणेसाठीं (योनिं विधारय) योनीला धारण कर. हे (मर्यादे) मर्यादे ! (पुत्रं आधेहि) पुत्राला धारण कर. (तं त्वं आगमे आगमय) त्याला तूं येण्याच्या वेळीं बाहेर येण्यास प्रेरणा दे. [२]

(पुत्रकाम्या अदितिः) पुत्राची इच्छा असणाऱ्या अदितीनें, (यं परिहस्तं अबिभः) जें कंकण धारण केलें होतें, (यथा पुत्रं जनात् इति) ज्याच्यामुळें पुत्राची उत्पत्ति व्हावी, यासाठीं (त्वष्टा तं अस्यै आबध्नात्) त्वष्ट्यानें त्याला एका स्त्रीसाठीं बांधलें आहे. [३]

भावार्थ— कंकण नियमित करतें. तें हातांत घातल्यानें हातांचें नियमन होतें आणि विघ्नें दूर होतात; म्हणून त्यास संतति धारण करणारें म्हटलें आहे; तसेंच तें धनाचें धारकहि आहे. [१]

तें गर्भ धारणेस योग्य अशी गर्भाशयाची अवस्था करतें. तें धारण केल्यानें गर्भधारणा होते, आणि योग्य समयीं प्रसूति सुद्धां होते. [२]

पुत्राची इच्छा करणाऱ्या अदितीनें तें प्रथम धारण केलें होतें. कारागीरांनीं तीं तयार करावींत आणि पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें स्त्रियांनीं तीं दोन्ही हातांत धारण करावींत. [३]

कंकण-धारण

स्त्रियांनीं हातांत कांकणें घालावींत, त्याचा संबंध गर्भाशय ठीक रहाणें, उत्तम संतान उत्पन्न होणें आणि सुखानें प्रसूति होणें याच्याशीं आहे. वैद्यांनीं याचा विचार शरीरशास्त्रदृष्ट्या करून निर्णय करावा. कोणत्या स्त्रीनें कशा प्रकारचीं कंकणें कोणत्या विधीनें धारण करावींत याचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करण्यासारखी ही गोष्ट आहे.

माता-पित्यांची सेवा करा

कांड ६, सूक्त १२०

(ऋषिः – कौशिकः । देवता – मंत्रोक्ताः ।)

यदुन्तरिक्षं पृथिवीमुत द्यां यन्मातरं पितरं वा जिहिंसिम ।
अयं तस्माद्गार्हपत्यो नो अग्निरुदिन्नयाति सुकृतस्य लोकम् ॥ १ ॥
भूमिर्मातादितिर्नो जनित्रं भ्रातान्तरिक्षमभिशस्त्या नः ।
द्यौर्नः पिता पित्र्याच्छं भवाति जामिमृत्वा माव पत्सि लोकात् ॥ २ ॥
यत्रा सुहार्दः सुकृतो मदन्ति विहाय रोगं तन्वः स्वायाः ।
अश्लोणा अङ्गैरह्रुताः स्वर्गे तत्र पश्येम पितरौ च पुत्रान् ॥ ३ ॥

अर्थ— (**यत् अंतरिक्षं पृथिवीं उत द्यां**) आम्हीं कधीं अंतरिक्ष, पृथ्वी आणि द्युलोकाची तसेंच (**यत् मातरं पितरं वा जिहिंसिम**) कधीं आम्हीं मातापित्यांची हिंसा केली तर, (**अयं गार्हपत्यः अग्निः**) हा आमचा गार्हपत्य अग्नि (**नः तस्मात् इत् सुकृतस्य लोकं उन्नयाति**) आम्हांस त्या पापापासून मुक्त करून पुण्य लोकांत पोहोंचवतो. [१]

(**अदितिः भूमिः माता नः जनित्रं**) अदीन मातृभूमि आमची जननी आहे. (**अन्तरिक्षं भ्राता**) अंतरिक्ष आमचा भाऊ आहे, आणि (**द्यौः नः पिता**) द्युलोक आमचा पिता आहे. तो (**अभिशस्त्याः नः शं भवाति**) विपत्तींतून आम्हांस वांचवून कल्याणदायक होवो. (**जामिं ऋत्वा पित्र्यात् लोकात्**) आप्तेष्टांस प्राप्त करून पितृलोकापासून (**मा अवपत्सि**) आम्हांस खालीं न पाडो. [२]

(**यत्र सुहार्दः सुकृतः**) येथें उत्तम हृदयाचे पुण्यकर्ते पुरुष (**स्वायाः तन्वः रोगं विहाय**) स्वतःच्या शरिरांतील रोगांना दूर करून (**मदन्ति**) आनंदित होतात, (**अंगैः अश्लोणाः अन्हुताः**) अंगांनीं अविकृत आणि अकुटिल राहून, (**तत्र स्वर्गे पितरौ च पुत्रान् पश्येम**) आम्हीं तेथें स्वर्गांत पितरांस आणि पुत्रांस पहावें. [३]

भावार्थ— या संपूर्ण जगांत आम्हीं कोठेंहि असलों, आणि आम्हीं जर तेथें मातापित्यांस दुःखविलें, तर तेजस्वी देव त्या पापांतून आम्हांस मुक्त करोत, आणि पुण्यलोकांत जाण्याला योग्य पवित्र आम्हांस करोत. [१]

आमची माता ही भूमि आहे, आणि पिता द्युलोक आहे. अंतरिक्ष आमचा भाऊ आहे. याप्रकारें जगाशीं आमचा संबंध आहे. हें संपूर्ण जग आमचें कल्याण करो आणि आमच्या विपत्तींतून आम्हांस वांचवो. कोणी असा संबंधी नसावा कीं ज्याच्यामुळें आम्हांस पितृलोकांतून खालीं पडावें लागेल. [२]

जेथें शारीरिक रोग असत नाहींत आणि जेथें उत्तम हृदयभावनेनें पुण्य कर्म करणारे लोक आनंदानें रहातात, तेथें आम्हीं पोहोंचून सुदृढ अंगांनीं रहावें, आणि मातापितरें आणि पुत्र यांना पहावें. [३]

कोणाहि मनुष्यानें मातापित्यांस दुःख देऊं नये. मातापित्यांस कष्ट देणाऱ्यास अधोगति प्राप्त होते, परंतु जे मातापित्यांस सुख देतात, ते जेथें कांहीं रोगराई नाहीं आणि संपूर्ण शरीरस्वास्थ्य लाभतें अशा श्रेष्ठ लोकांत पोहोंचतात; म्हणून प्रत्येक मनुष्यानें मातापित्यांची सेवा करून त्यांस सुख दिलें पाहिजे.

धन आणि सद्बुद्धीसाठीं प्रार्थना

कांड ७, सूक्त १७

(ऋषिः - भृगुः । देवता - धाता, सविता, मन्त्रोक्ताः ।)

धाता दधातु नो रयिमीशानो जगतस्पतिः । स नः पूर्णेन यच्छतु ॥ १ ॥
धाता दधातु दाशुषे प्राचीं जीवातुमक्षिताम् । वयं देवस्य धीमहि सुमतिं विश्वराधसः ॥ २ ॥
धाता विश्वा वार्या दधातु प्रजाकामाय दाशुषे दुरोणे ।
तस्मै देवा अमृतं सं व्ययन्तु विश्वे देवा अदितिः सजोषाः ॥ ३ ॥
धाता रातिः सवितेदं जुषन्तां प्रजापतिर्निधिपतिर्नो अग्निः ।
त्वष्टा विष्णुः प्रजया संरराणो यजमानाय द्रविणं दधातु ॥ ४ ॥

अर्थ— (धाता जगतः पतिः ईशानः) धारणकर्ता, जगताचा स्वामी ईश्वर (नः रयिं दधातु) आम्हांस धन देवो. (सः नः पूर्णेन यच्छतु) तो आम्हांस परिपूर्ण रीतीनें देवो. [१]

(धाता दाशुषे) धारणकर्ता ईश्वर दात्यासाठीं (प्राचीं अक्षितां जीवातुं दधातु) प्राप्त करण्यास योग्य अक्षय जीवनशक्ति देवो. (वयं विश्वराधसः देवस्य सुमतिं) आम्ही संपूर्ण धनाचा स्वामी जो ईश्वर त्याच्या सुमतीचें (धीमहि) ध्यान करतों. [२]

(धाता प्रजाकामाय दाशुषे) धारक ईश्वर प्रजेची इच्छा करणाऱ्या दात्यासाठीं (दुरोणे विश्वा वार्या) त्याच्या घरांत संपूर्ण वरणीय पदार्थांना (दधातु) धारण करो. (विश्वे देवाः) सर्व देव, (सजोषाः अदितिः) प्रीतियुक्त अनंत दैवी शक्ति, तसेंच (देवाः) अन्य ज्ञानी (तस्मै अमृतं सं व्ययन्तु) त्याच्यासाठीं अमृताचें दान करोत. [३]

(धाता रातिः सविता) धारक, दाता, उत्पादक, (निधिपतिः अग्निः) निधींचा पालक, प्रजारक्षक, प्रकाशरूप देव (नः इदं जुषन्तां) आम्हांस तें देवो. तसेंच (प्रजया संरराणः त्वष्टा विष्णुः) प्रजेसह आनंदांत रहाणारा सूक्ष्म पदार्थांस निर्माण करणारा व्यापक देव (यजमानाय द्रविणं दधातु) यज्ञकर्त्याला धन देवो. [४]

भावार्थ— जगतास धारण करणारा आणि त्याचें पालन करणारा ईश्वर आम्हांस पूर्णपणें विपुल धन देवो, तो आम्हांस दीर्घ जीवनाची शक्ति देवो. आम्ही त्याच्या सन्मतीचें ध्यान करतों. संतानाची इच्छा करणाऱ्या दात्याला त्याच्या-गृहस्थाच्या-घरांत रहाण्यायोग्य सर्व पदार्थ प्राप्त होवोत. सर्व देव दात्याला अमरत्व प्राप्त करून देवोत. सर्व जगाचा धारक, धनदाता, संपूर्ण विश्वाचा उत्पादक, संसाररूपी खजिन्याचा रक्षक, सर्वांचा पालक, एक प्रकाशस्वरूप देव आहे. तो आम्हांस सर्व प्रकारचें सुख देवो. सर्व सूक्ष्मांहून सूक्ष्म पदार्थांचा निर्माता व्यापक देव उपासकाला धनादि पदार्थ देवो. [१-४]

ही प्रार्थना अत्यंत सुबोध आहे म्हणून या सूक्ताच्या जास्त स्पष्टीकरणाची आवश्यकता नाहीं.

---

*

गृह-निर्मिति

कांड ३, सूक्त १२

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – शाला, वास्तोष्पतिः ।)

इहैव ध्रुवां नि मिनोमि शालां क्षेमे तिष्ठाति घृतमुक्षमाणा ।
तां त्वा शाले सर्ववीराः सुवीरा अरिष्टवीरा उप सं चरेम ॥ १ ॥
इहैव ध्रुवा प्रति तिष्ठ शालेऽश्वावती गोमती सूनृतावती ।
ऊर्जस्वती घृतवती पयस्वत्युच्छ्रयस्व महते सौभगाय ॥ २ ॥
धरुण्यसि शाले बृहच्छन्दाः पूतिधान्या ।
आ त्वा वत्सो गमेदा कुमार आ धेनवः सायमास्पन्दमानाः ॥ ३ ॥
इमां शालां सविता वायुरिन्द्रो बृहस्पतिर्नि मिनोतु प्रजानन् ।
उक्षन्तूद्ना मरुतो घृतेन भगो नो राजा नि कृषिं तनोतु ॥ ४ ॥

अर्थ– (इह एव ध्रुवां शालां निमिनोमि) या स्थानावर मजबूत घर बांधतों. हें घर (घृत उक्षमाणा क्षेमे तिष्ठाति) तुपाचें सिंचन करीत आमच्या कल्याणासाठीं उभें असो. हे (शाले) घरा ! (तां त्वा सर्ववीराः अरिष्टवीराः सुवीराः उप संचरेम) तुझ्या सर्व बाजूंस आम्हीं सर्व वीर नाश न पावतां उत्तम पराक्रमी होऊन फिरत राहूं. [१]

हे घरा ! तूं (अश्वावती गोमती सूनृतावती) घोड्यांनीं, गाईंनीं आणि मधुर भाषणांनीं युक्त होऊन (इह ध्रुवा प्रतितिष्ठ) येथेंच स्थिर राहा. तसेंच (ऊर्जस्वती, घृतवती, पयस्वती) अन्न, तूप आणि दुधानें युक्त होऊन (महते सौभगाय उच्छ्रयस्व) मोठ्या वैभवासाठीं उंच होऊन रहा. [२]

हे घरा ! (बृहत्-छन्दाः पूतिधान्या) तूं मोठ्या छताचें आणि पवित्र धान्यानें युक्त तसेंच (धरुणी असि) धान्यादीचीं भांडारें धारण करणारें आहेस. (त्वा वत्सः कुमारः आ गमेत्) तुझ्यामध्यें वासरें आणि बालकें येवून राहोत. (आस्पन्दमाना धेनवः सायं आ) नाचणाऱ्या कुदणाऱ्या गाई संध्याकाळीं येवोत. [३]

(इमां शालां) या घराला सविता, वायु, इन्द्र आणि बृहस्पति (प्रजानन् नि मिनोति) जाणून निर्माण करोत. (मरुतः उद्ना घृतेन उक्षन्तु) मरुतगण जल आणि तूप यानें सिंचन करोत. तसेंच (भगः राजा नः कृषिं नि तनोतु) भाग्यवान् राजा आमच्यासाठीं शेतीची वृद्धि करो. [४]

भावार्थ— या उत्तम स्थानावर मीं उत्तम सुदृढ घर बनवितों. त्यांत तूप आणि खाण्यापिण्याचे पुष्कळ पदार्थ राहोत आणि तें सर्व प्रकारच्या स्वास्थ्य साधनांनीं परिपूर्ण असावें. आम्हीं सर्व प्रकारच्या शौर्यवीर्यादि गुणांनीं युक्त होऊन तसेंच कोणत्याहि प्रकारचे कष्टरहित होऊन घराच्या चारी बाजूंस फिरत राहूं. [१]

ज्या घरांत घोडे, गाई, बैल इत्यादि पुष्कळ पशु आहेत, जें घर उत्तम मधुर भाषणांनीं युक्त आहे, अन्न, तूप, दूध, इत्यादि खाण्यापिण्याचे पदार्थ त्यांत भरपूर असावेत, अशा घरांत रहाणारे भाग्यशाली असोत. [२]

या घरांत धान्याचीं मोठीं कोठारें असावींत, कोठारांत शुद्ध आणि पवित्र धान्य भरलेलें असावें. अशा घरांत वासरें आणि बालकें हिंडत-फिरत असावींत, आणि सायंकाळीं गाई आनंदानें नाचत घरीं परत याव्यात. [३]

या शाला–घराच्या निर्मितींत सविता, वायु, इंद्र आणि बृहस्पति हे देव सहाय्य करोत. मरुत्गण या घरांत विपुल तूप देण्यास सहाय्य करोत, तसेंच राजा भग शेती वाढविण्यास मदत करो. [४]

मानस्य पत्नि शरणा स्योना देवी देवेभिर्निर्मितास्यग्रे ।
तृणं वसाना सुमना असस्त्वमथास्मभ्यं सहवीरं रयिं दाः ॥ ५ ॥
ऋतेन स्थूणामधि रोह वंशोग्रो विराजन्नप वृङ्क्ष्व शत्रून् ।
मा ते रिषन्नुपसत्तारो गृहाणां शाले शतं जीवेम शरदः सर्ववीराः ॥ ६ ॥
एमां कुमारस्तरुण आ वत्सो जगता सह । एमां परिस्रुतः कुम्भ आ दध्नः कलशैरगुः ॥ ७ ॥
पूर्णं नारि प्र भर कुम्भमेतं घृतस्य धारामृतेन संभृताम् ।
इमां पातॄनमृतेना समङ्ग्धीष्टापूर्तमभि रक्षात्येनाम् ॥ ८ ॥
इमा आपः प्र भराम्ययक्ष्मा यक्ष्मनाशनीः । गृहानुप प्र सीदाम्यमृतेन सहाग्निना ॥ ९ ॥

अर्थ— हे (मानस्य पत्नि) संमानाची रक्षक, (शरणा स्योना देवी) आंत आश्रय करण्यायोग्य, सुखदायक दिव्य प्रकाशमान् अशी (देवेभिः अग्रे निर्मिता असि) देवांकडून प्रथम निर्माण करण्यांत आली आहेस. (तृणं वसाना त्वं सुमनाः असः) गवतानें बनवलेली असूनहि तूं उत्तम मनानें युक्त आहेस. (अथ अस्मभ्यं सहवीरं रयिं दाः) आणि आम्हां सर्वांसाठीं वीरांनीं युक्त धन दे. [५]

हे (वंश) कळका ! तूं (ऋतेन स्थूणां अधिरोह) तुझ्या सरळपणामुळें स्वतःच्या आधारावर चढ आणि (उग्रः विराजन् शत्रून् अपवृङ्क्ष्व) उग्र, प्रकाशवान् होऊन शत्रूला परत हटव. (ते गृहाणां उपसत्तारः मा रिषन्) तुझ्या घरांच्या आश्रयानें रहाणारे विनष्ट न होवोत. हे शाले-घरा ! आम्हीं (सर्ववीराः शतं शरदः जीवेम) सर्व जण वीरांनीं युक्त होऊन शंभर वर्षें जगावें. [६]

(इमां कुमारः आ) या घरांत बालकें येवोत, (तरुणः आ) तरुण पुरुष येवोत, (जगता सह वत्सः आ) त्याच्याबरोबर वासरें सुद्धां येवोत. (इमां परिस्रुतः कुम्भः) याच्यापाशीं मधुर रसानें भरलेला घडा आणि (दध्नः कलशैः आ अगुः) दह्याच्या कलशासह येवो. [७]

हे (नारि) स्त्रिये ! (एतं पूर्णं कुम्भम्) या पूर्ण भरलेल्या घड्याला तसेंच (अमृतेन संभृतां घृतस्य धारां) अमृतानें भरलेली तुपाची धार (प्रभर) उत्तम प्रकारें भरून आण. (पातॄन् अमृतेन सं अङ्ग्धि) पिणाऱ्याला अमृतानें उत्तम प्रकारें भरून टाका. (इष्टापूर्तं एनां अभिरक्षाति) यज्ञ आणि अन्नदान या घराचें रक्षण करो. [८]

घरांत (इमाः यक्ष्मनाशनीः अयक्ष्माः आपः) हें रोगनाशक आणि स्वयं रोगरहित जल (प्र आभरामि) मीं भरून आणतों. (अमृतेन अग्निना सह) अमृत अग्निसह (गृहान् उप प्र सीदामि) घरांत जाऊन बसतों. [९]

भावार्थ— घर आंतून निवास करण्यायोग्य, सुखदायक आणि एक सन्मानाचें साधनसुद्धां आहे. पूर्वी तें देवांकडून निर्माण करण्यांत आलें होतें. गवताच्या छपराचेंहि तें होतें. अशा घरांत आमचें मन शुभसंकल्पयुक्त होवो, आणि आम्हीं वीरांनीं युक्त असें धन प्राप्त करावें. [५]

सरळ खांबावर-सरळ कळक ठेवण्यांत यावेत, आणि अशा प्रकारें शत्रूंना दूर करावें. या घरांत रहाणारा कधींहि दुःखी, कष्टी, न होवो. त्याचा कधीं नाश न होवो. यांत रहाणारे सर्व वीर होऊन शंभर वर्षेंपर्यंत जिवंत राहोत. [६]

या घरापाशीं बालकें, तरुण, सर्वच येवोत. वासरें आणि घरांतील इतर पशुपक्षी घरांच्या आसपास फिरत राहोत. या घरांत मधाच्या मधुर रसानें भरलेले घडे असोत आणि दह्यानें भरलेलेहि पुष्कळ घडे असोत. [७]

स्त्रियांनीं हे घडे भरून आणावेत आणि तुपाचेहि घडे पुष्कळ आणावेत. पिणाऱ्यांना तें दूध, दहीं, तूप वगैरे सर्व रस भरपूर पाजावेत; कारण त्यांचें दानच घराचें रक्षण करतें. [८]

रोगनाशक आणि आरोग्यवर्धक असें जल घरांत पिण्यासाठीं आणावें. घरांत शेगडी असावी आणि त्यापासून लोकांनीं थंडीच्या निवारणाचा आनंद प्राप्त करावा. [९]

गृह–निर्माण

घरांची रचना

जो गृहस्थधर्मी आहे त्यानें घर करून रहाणें आवश्यक आहे, मग तें घर गवतानें तयार केलेल्या झोंपडीसारखें (**तृणं वसाना** । मं. ५) असो वा मोठा बंगला असो घर कसेंहि असो; पण गृहस्थास तें आवश्यक आहे, त्याशिवाय गृहस्थाचें गृह–स्थ–पण सिद्ध होत नाहीं.

घर बांधण्यास योग्य स्थान

घर बांधण्यासाठीं स्थानसुद्धां योग्य असलें पाहिजे, रमणीय आणि आरोग्यकारक असलें पाहिजे. याविषयीं प्रस्तुत सूक्तांतील खालीं दिलेले निर्देश विचार करण्यासारखे आहेत—

१. **क्षेमे** (मं. १)-सुरक्षित, शांति देणारें सुखकारक, आरोग्यदायक, निर्भय असें स्थान घरासाठीं असलें पाहिजे.

२. **ध्रुवा** (मं. १-२)-स्थिर, सुदृढ, जेथें पाया सुदृढ, स्थिर करतां येईल.

अशा प्रकारच्या जमिनीवर घर करावें, आणि तें घर स्वतः-च्या शक्तिप्रमाणें सुदृढ (ध्रुवा) स्थिर आणि मजबूत बांधावें; म्हणजे वारंवार त्याच्या दुरुस्तीचा खर्च करावा लागणार नाहीं.

घर कसें बांधण्यांत यावें ?

शक्य तो घराच्या खोल्या मोठ्या असाव्यात. '**बृहत् छंदाः**' (मं. ३) म्हणजे मोठीं मोठीं छतें असलेले दिवाण-खाने असणारें घर करावें. घरांत संकुचितता अरुंदपणा नसावा, कारण लहान खोल्यांतून रहाणाऱ्यांचे विचारहि संकुचित असतात. यासाठीं स्वतःच्या आर्थिक शक्तिप्रमाणें जेवढें मोठ्या प्रमाणावर बांधतां येईल असेंच घर बांधावें. म्हणजे त्यांत पुष्कळ अतिथि इष्ट मित्र वगैरे, (**शरणा** । मं. ५) येऊन (**स्योना** । मं. ५) विश्राम प्राप्त करतील.

सन्मानाचें स्थान

घर हें गृहस्थाचा मोठा सन्मानबिंदु आहे. (**शाला मानस्य पत्नी** । मं. ५) सन्मानाचें स्थान आहे. स्वतःच्या मालकीचें घर असल्यानें तें एक प्रतिष्ठेचें स्थान होतें. इष्टमित्रांना सुख देण्याचें तें एक मोठें स्थान आहे, म्हणून वर सांगितल्याप्रमाणें घर बांधावें. घर बांधल्यावर त्यांत जरुर ती साधनसामुग्री भरली पाहिजे. त्याविषयीं खालीं दिलेले संकेत विचारणीय आहेत—

१. **अश्वावती** (मं. २)– घरांत घोडे असावेत म्हणजे गृहस्थाजवळ घोड्या आणि घोडे असावेत. तें शौर्याचें साधन आहे.

२. **गोमती** (मं. २)- घरांत गाई असाव्यात. तें पुष्टीचें साधन आहे. गाईपासून दूध मिळतें, तें पिऊन मनुष्य पुष्ट होतो. बैल शेतीला उपयोगी पडतात. **धेनवः आस्पन्दमानाः सायं आ** (मं. ३) संध्याकाळीं गाई आनंदानें नाचत येवोत.

३. **पयस्वती** (मं. २)- घरांत भरपूर दूध असावें.

४ **घृतवती** (मं. २)-घरांत भरपूर तूप असावें.

५. **घृतं उक्षमाणा** (मं. १)–तूप देणारें म्हणजे अतिथी वगैरेंना भरपूर प्रमाणांत तूप देणारें घर व्हावें. घरांतील मनुष्यांनीं अन्नदानांत कद्रुपणा करूं नये.

६. **ऊर्जस्वती** (मं. २)– घरांत पुष्कळ अन्न असावें, खाण्यापिण्याचे पदार्थ मुबलक असावेत.

७. **धरुणी** (मं. ३)- ज्यांत धान्यादींचीं मोठीं भांडारें आहेत, संग्रह करून ठेवण्याचीं स्थानें आहेत, आणि तेथें सर्व प्रकारचे पदार्थ उत्तम मिळतात.

८. **पूतिधान्या** (मं. ३)– घरांत पवित्र धान्य असावें, उत्तम स्थितींत जें खाल्यानें मनाला समाधान आणि शरीराला पुष्टि मिळेल असें. सर्व प्रकारचे पदार्थ असावेत. स्वस्त मिळतें म्हणून धान्य आणावयाचें नसून तें पवित्र, शुद्ध, निरोगी आणि पोषक आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे.

९. **परिस्रुतः कुम्भः** (मं. ७)– मधुर मधानें भरलेला घडा अथवा अनेक घडे नेहमीं घरांत असावेत.

१०. **दध्नः कलशैः** (मं. ७)– दह्यानें भरलेले हंडे घरांत असावेत.

११. **घृतस्य कुम्भम्** (मं. ८)– उत्तम तुपानें भरलेले घडे घरांत असावेत.

१२. **अयक्ष्मा यक्ष्मनाशनीः आपः** (मं. ९)– निरोगी आणि रोग दूर करण्यास योग्य अशा शुद्ध जलानें भरलेले घडे घरांत ठेवण्यांत यावेत.

वरील शब्दांनीं या सूक्तांत घराचें वर्णन करण्यांत आलें आहे. घरांत कशी व्यवस्था असावी आणि धनधान्यानें तें कसें समृद्ध ठेवावें हें वाचकांना या शब्दांच्या मननानें स्वतःलाच समजूं शकेल. तसेंच—

१. वत्सः आगमेत् (मं. ३,७)- घरांत बालकें नाचत बागडत असावीत.

२. कुमारः आगमेत् (मं. ३,७)- घरांत आणि बाहेर बालक--बालिका आनंदानें नाचत असाव्यात.

३. तरुणः आगमेत् (मं. ७)-- युवक, तरुण पुरुष आणि तरुणी घरांत आणि घराबाहेर फिरत असाव्यात.

प्रसन्नतेचें स्थान

म्हणजे घर असें असावें की ज्यांत मुलेंबाळें आनंदानें खेळत असतील, तरुण तरुणी तसेंच इतर लहान मोठीं कुटुंबांतील माणसें स्वतःच्या कार्यांत आनंदानें निमग्न असतील. सर्वांच्या मुखावर आनंद दिसावा, आणि घरांतील प्रत्येक मनुष्य प्रसन्नतेची मूर्ति असल्यासारखें दिसावें. प्रत्येकानें म्हणावें—

गृहान् उप प्रसीदामि । (मं. ९)

' मीं माझी पराकाष्ठा करून माझ्या घरास प्रसन्नतेचें रमणीय स्थान बनवीन. ' जर घरांतील प्रत्येक मनुष्य घराला प्रसन्नतेचें स्थान बनविण्याचा प्रयत्न करील तर तें अवश्य प्रसन्नतेचें एक केंद्र होईल.

वाचकांनीं या उपदेशाचें योग्य प्रकारें मनन करावें कारण प्रत्येक वाचकावर स्वतःचें घर ' प्रसन्नतेचें स्थान ' बनविण्याची एक विशेष जबाबदारी आहे. हें कार्य दुसऱ्यावर सोंपवण्यानें होऊं शकणार नाहीं. हें तर प्रत्येकानें स्वतःच करावयाचें आहे. हा उपदेश दिल्यानंतर वेद प्रत्येक वाचकास विचारतो कीं, ' तुम्हीं या उपदेशाप्रमाणें तुमचें कर्तव्य केलें आहे काय ? ' वाचकांची या प्रश्नाचें उत्तर देण्याची तयारी असावयास हवी. घरास प्रसन्नतेचें स्थान करण्यासाठीं वर लिहिलेलीं साधनें एकत्र केलीं पाहिजेत. परंतु निव्वळ तेवढ्यानेंच वेदाला अभीष्ट असलेली प्रसन्नता येत नाहीं. त्यासाठीं वेदानें दुसरा निर्देश केला आहे तो पहा—

१. सूनृतावती (मं. २)- घरांत सभ्यतापूर्वक सत्य बोलणें, प्रेमपूर्वक गोष्टी करणें, खऱ्या उन्नतीसाठीं सत्य भाषण करावें; छळ, कपट, ढोंग, लबाडी यांचें भाषण नसावें.

२. सुमनाः (मं. ५)- उत्तम मनानें उत्तम व्यवहार करणाऱ्या मनुष्यांनीं घरांत कार्य करावें.

घर मंगलमय करण्यासाठीं ज्याप्रमाणें खाण्यापिण्याचे पुष्कळ पदार्थ घरांत असले पाहिजेत, तशीच घरच्या स्त्री-पुरुषांचीं अंतःकरणें सुद्धां श्रेष्ठ विचारांनीं युक्त असलीं पाहिजेत. असें असले तरच घर प्रसन्नतेचें स्थान होऊं शकेल. घरांत धनसंपत्ति पुष्कळ असूनहि, घरांतील माणसें एकमेकांशीं मोकळेपणानें वागत नसतील, छळकपटानें वागत असतील तर तें घर प्रसन्नतेचें सुखाचें स्थान नव्हे पण दुःखाचें स्थान होईल. म्हणून वाचकास जर स्वतःचें घर प्रसन्नतेचें स्थान बनवावयाचें असेल तर त्यानें हा उपदेश स्वतःच्या अंतःकरणांत कोरून ठेवावा. थंडी-पावसाळ्यांत सर्दी फार होते. म्हणून थंडी निवारण्यास घरांत शेगडी असावी. त्यामुळें थंडीचें निवारण होईल. दुसरी गोष्ट अशी कीं ' अमृत अग्निः ' (मं. ९) अग्नि हा अमृतरूप परमेश्वर आहे म्हणून घरांत समूह उपासना झाली पाहिजे. अग्निहोत्रानें अग्निच्या उपासनेपासून, ध्यानधारणेच्या द्वारें परमात्म्याच्या उपासनेपर्यंत सर्व प्रकारची उपासना करून मनुष्यानें परम आनंद प्राप्त करावा. जर घरांत अशी उपासना होत असेल, तर घर खरोखर प्रसन्नतेचें केंद्र होऊं शकेल. अशा प्रकारचें घर—

महते सौभगाय उच्छ्रयस्व । (मं. २)

' मोठ्या शुभमंगलाच्या प्राप्तिसाठीं तें घर उठून उभें राहो. ' म्हणजे त्या घरानें याप्रकारें मोठें सौभाग्य प्राप्त करावें. ज्या घरांत वर सांगितल्याप्रमाणें अंतर्बाह्य व्यवस्था ठेवण्यांत येते तेथें मोठें शुभमंगल वास्तव्य करतें यांत कांहीं शंका नाहीं.

वीरतेनें युक्त धन

सौभाग्य प्राप्तिमध्यें ' भग ' म्हणजे धन कमविणें याचाहि समावेश होतो; पण धन कमविल्यानंतर त्याचें रक्षण करण्याची शक्ति असली पाहिजे, आणि शत्रूंस दूर करण्यास शौर्य वीर्यादि गुणहि असावयास हवेत, नाहींतर मिळविलेलें धन इतर लुटून नेतील; म्हणून या सूक्तांत सावधानतेची सूचना दिली आहे—

अस्मभ्यं सहवीरं रयिं दाः । (मं. ५)

' आम्हांला वीरश्रीयुक्त धन द्या. ' धन प्राप्त व्हावें आणि तें सांभाळण्यासाठीं आवश्यक वीरतासुद्धां प्राप्त व्हावी. आमचें घर वीरतेच्या वातावरणानें भरून जावो.

१. सर्ववीराः सुवीरा अरिष्टवीरा उपसंचरेम । (मं. १)

२. शतं जीवेम शरदः सर्ववीराः । (मं. ६)

' आम्हीं सर्वप्रकारचे वीर, उत्तम वीर, नाश न होणारे वीर, शंभर वर्षेपर्यंत जगून धर्माच्या रक्षणासाठीं तयार रहाणारे वीर होऊन स्वतःच्या घरांत संचार करूं. ' हा मंत्र स्पष्ट शब्दांत

सांगतो की घरचें वायुमंडळ ' वीरतेचें वायुमंडळ' असलें पाहिजे, त्याला भित्रेपणाचा वाराहि लागता कामा नये. घरांतील पुरुष वीर असावेत आणि स्त्रिया वीरांगना असाव्यात. अशा स्त्री-पुरुषांना जी संतति होईल ती ' कुमार वीर ' होईल यांत कसली शंका ? म्हणून वेदांत पुत्राचें नांव वीर असें येतें. वाचकांनीं या गोष्टीचा विचार करून स्वतःच्या घरांत असें वातावरण निर्माण केलें पाहिजे.

अतिथि सत्कार

अशा मंगलमय वीरतेनें युक्त घरांत रहाणारा धर्मवीर पुरुष अतिथी सत्कार करीलच. याविषयीं असें सांगण्यांत आलें आहे-

पूर्णं नारि प्र भर कुम्भमेतं घृतस्य धाराममृतेन संभृताम् ।

इमां पातॄनमृतेना समङ्ग्धीष्टापूर्तमभि रक्षात्येनाम् ॥ (मं. ८)

' गृहपत्नीनें अतिथीला वाढण्यासाठीं तुपाचा घडा आणावा, मधुर रसानें भरलेला घडा आणावा आणि पिणाऱ्यास जितका पिववेल तितका पाजावा. त्यांत कद्रुपणा करूं नये. अशा प्रकारच्या अन्नदानानेंच घराचें रक्षण होतें. '

अतिथिसत्कारांत अन्नदान आणि अन्य पदार्थांचें दान मोकळया हातानें व्हावयास हवें. त्यांत जर कंजुषपणा केला गेला तर तो योग्य नव्हे, कारण दानच घराचें रक्षण करतें. ज्या घरांत अतिथींचा सत्कार होतो तें घर वृद्धिंगत होतें, त्याचें यश वाढतें.

येथें अतिथींस अन्न वाढण्याचें कार्य स्त्रियांचें आहे असें सांगितलें आहे. येथें पडदापद्धति नाहीं. जेथें पडदा पाळला जातो तेथें अन्न वाढण्याचें काम नोकर अथवा घराचा मालक स्वतः करतो. अतिथि सत्काराची ती अवैदिक प्रथा आहे. अतिथीसाठीं भोजन, खाणेंपिणें इत्यादि गृहपत्नीनें दिलें पाहिजे अशी वेदांची स्पष्ट आज्ञा आहे. स्वतःच्या घरांत पडदा पाळणाऱ्या वाचकांनीं या गोष्टीचा विचार करावा.

देवांकडून निर्मिलेलें घर

प्रारंभीं देवांनीं घर तयार केलें त्याविषयीं खालील मंत्र पहा-

शरणा स्योना देवी (शाल) देवेभिर्निमितास्यग्रे तृणं वसाना सुमनाः ॥ (मं. ५)

' आंत आश्रय करण्यायोग्य, सुखदायक, गवताच्या छपराचें परंतु उत्तम विचारानें युक्त दिव्य घर प्रारंभीं देवांनीं निर्माण केलें. ' दिव्य वीरपुरुष द्वारा जें पहिलें घर निर्माण झालें तें असें होतें. जरी वरती गवताचें छप्पर होतें तरी आंत उत्तम विचार होत असत. आंत गेल्यानें आराम आणि सुख सुद्धां मिळत असे. याचें तात्पर्य असें कीं छप्पर कसेंहि अथवा कसलेंहि असेना, आंतून दिव्य विचाराचें दिव्य घर असलें पाहिजे, आणि क्रूर विचारांचें राक्षस भुवन नसावें. ' देवांचें घर ' धनानें नव्हे तर आंतरिक शांति आणि प्रसन्नतेनें होत असतें. वाचकानें प्रयत्नानें स्वतःचें घर असें, ' देवभवन ' करावें आणि स्वतःच्या घरांत वैदिक धर्माचा प्रकाश पसरावा.

देवांचें सहाय्य

घर अशा ठिकाणीं बांधावें कीं जेथें सूर्य, चंद्र, वायु, इंद्र इत्यादि देवांची सहाय्यशक्ति भरपूर प्रमाणांत मिळत असावी.

इमां शालां सविता वायुरिन्द्रो बृहस्पतिर्निमिनोतु प्रजानन् ।

उक्षन्तूद्ना मरुतो घृतेन भगो नो राजा नि कृषिं तनोतु ॥ (मं. ४)

' सूर्य, वायु, इन्द्र, बृहस्पति या घरास मदत करोत. मरुत नांवाचा पावसाळीं वारा पाण्याचें सहाय्य देवो, आणि राजा भग शेतीच्या कार्यांत सहाय्य करो. '

घरासाठीं सूर्यप्रकाश पुरत्या प्रमाणांत असावा. शुद्ध हवा खेळती असावी. इंद्र वृष्टीनें सहाय्य करो, वृष्टि करणारा वायु योग्य वृष्टीचें सहाय्य करो, आणि शेतीचा देव जमिनींतून शेतीच्या उत्पन्नांत सहाय्यक होवो. घर अशा स्थानीं अथवा देशांत असावें कीं जेथें सूर्यादि देवतांच्या द्वारें योग्य शक्तींची सहाय्यता उत्तम प्रकारें मिळत रहावी. भूमि फलद्रूप असावी. पाणी आरोग्यदायक आणि पाचक असावें. अशा उत्तम देशांत गृह निर्माण करावें.

गृह निर्माण

कांड ९, सूक्त ३

(ऋषिः – भृग्वङ्गिराः । । देवता – शाला ।)

उपमितां प्रतिमितामथो परिमितामुत । शालाया विश्ववाराया नद्धानि वि चृतामसि ॥ १ ॥
यत्ते नद्धं विश्ववारे पाशो ग्रन्थिश्च यः कृतः । बृहस्पतिरिवाहं बलं वाचा वि स्रंसयामि तत् ॥२॥
आ ययाम सं बबर्ह ग्रन्थींश्चकार ते दृढान् । परूंषि विद्वांच्छस्तेवेन्द्रेण चृतामसि ॥ ३ ॥
वंशानां ते नहनानां प्राणाहस्य तृणस्य च । पक्षाणां विश्ववारे ते नद्धानि वि चृतामसि ॥ ४ ॥
संदंशानां पलदानां परिष्वञ्जल्यस्य च । इदं मानस्य पत्न्या नद्धानि वि चृतामसि ॥ ५ ॥
यानि तेऽन्तः शिक्यान्याबेधू रण्याय कम् ।
प्र ते तानि चृतामसि शिवा मानस्य पत्नी न उद्धिता तन्वे भव ॥ ६ ॥

अर्थ—(विश्ववारायाः शालायाः उपमितां) सर्व भयें निवारणारे घराचे स्तंभ **(प्रतिमितां)** स्तंभांना जोडा. **(अथो उत परिमिता)** आणि उत्तम बंधनांनीं **(नद्धानि वि चृतामसि)** गाठी आम्हीं बांधतों. [१]

हे **(विश्व-वारे)** सर्व दुःखांचें निवारण करणाऱ्या घरा ! **(यत् ते नद्धं)** जें तुझें बंधन आहे **(यः पाशः ग्रन्थिः च कृतः)** जे पाश आणि ग्रंथी पूर्वी करण्यांत आल्या आहेत, **(बृहस्पतिः वाचा बलं इव)** बृहस्पति स्वतः-च्या वाणीनें ज्याप्रमाणें शत्रुसैन्याचा नाश करतो, त्याप्रमाणें **(तत् वि स्रंसयामि)** त्याला मीं उकलतों [२]

(आययाम) एकत्रित केले, **(सं बबर्ह)** जोडले आणि **(ते दृढान् ग्रंथीन् चकार)** तुझ्या गांठींना मजबूत बांधून टाकलें आहे. **(परूंषि विद्वान् शस्ता इव)** सांधे समजून कापणाऱ्याप्रमाणें **(इन्द्रेण वि चृतामसि)** इंद्रा-च्या मदतीनें मीं बांधतों. [३]

हे **(विश्ववारे)** सर्व कष्टांचें निवारण करणाऱ्या घरा ! **(ते वंशानां नहनानां)** तुझे कळक आणि त्यांचीं बंधनें यांना तसेंच **(प्राणाहस्य तृणस्य च)** सांधे आणि गवताला तसेंच **(ते पक्षाणां नद्धानि तुझ्या)** दोन्ही बाजूंच्या बंधनांना **(वि चृतामसि)** मीं दृढ बांधतों. [४]

(मानस्य पत्न्याः) माप घेणाऱ्याकडून नक्की झालेल्या घराच्या **(संदंशानां पलदानां)** करवत आणि चटयांना **(च परिष्वन् जल्यस्य)** तसेंच विलास स्थानांना **(इदं नद्धानि वि चृतामसि)** अशा प्रकारच्या बंधनांनीं मीं बांधतों. [५]

(यानि ते अंतः शिक्यानि) जीं तुझ्यांत शिकीं आहेत **(रण्याय कं आवेधुः)** ती रमणीयतेसाठीं बांधण्यास आलीं आहेत. **(ते तानि प्रचृतामसि)** तीं आम्हीं तुझ्यासह बांधतों; तूं **(मानस्य पत्नी)** प्रमाण घेणाऱ्या-कडून पालन केली गेलेली **(उद्धिता)** उभी करण्यांत आली आहेस. **(नः तन्वे शिवा भव)** आमच्या शरीराला कल्याणकारक हो. [६]

भावार्थ— सर्व प्रकारचे कष्ट दूर करण्यासाठीं घर बांधण्यांत येतें. या घराचे खांब, तुळया, वासे, ओमण, वळया तसेंच छपरावरील गवत इत्यादी आम्हीं उत्तम रीतीनें मजबूत बांधतो. [१]

ज्याप्रमाणें ज्ञानी स्वतःच्या वाणीनें शत्रूसेनेला ढीली करून टाकतो, त्याचप्रमाणें जीं बंधनें किंवा गांठी आहेत, जीं पूर्वी बांध-ण्यांत आलीं होतीं तीं मीं ढीलीं करतों. [२]

प्रथम सर्व साहित्य एकत्रित केलें, तें यथास्थित जोडलें, त्याचे सांधे मजबूत केले, सांधे जोडण्याचें ज्यांना संपूर्ण ज्ञान आहे त्यांच्या सांगण्याप्रमाणें सर्व सांधे मजबूत जखडून टाकले. [३]

घराचे वासे, बंधनें-सांधे जोड, गवत वगैरे दोन्ही बाजूनीं मजबूत बांधून टाकतों. [४]

प्रमाणसर बांधलेल्या या घराचे विभाग, चट्या, तसेंच आंतील सर्व बंधनें, उत्तम रीतीनें बांधतों. [५]

ह॒वि॒र्धान॑म॒ग्निशा॒लं पत्नी॑नां॒ सद॑नं॒ सदः॑ । सदो॑ दे॒वाना॑मसि देवि शाले ॥ ७ ॥
अक्षु॑मोप॒शं वित॑तं सहस्रा॒क्षं वि॑षू॒वति॑ । अव॑नद्धम॒भिहि॑तं॒ ब्रह्म॑णा॒ वि चृ॑तामसि ॥ ८ ॥
यस्त्वा॑ शाले प्रतिगृ॒ह्णाति॒ येन॒ चासि॑ मि॒ता त्वम् । उ॒भौ मान॑स्य पत्नि॒ तौ जी॑वतां ज॒रद॑ष्टी ॥९॥
अ॒मु॒त्रैन॒मा ग॑च्छताद् दृ॒ढा न॒द्धा परि॑ष्कृता । यस्या॑स्ते विचृ॒ताम॒स्यङ्ग॑मङ्गं॒ परुः॑परुः ॥ १० ॥
यस्त्वा॑ शाले नि॒मि॒माय॑ संज॒भार॒ वन॒स्पती॑न् । प्र॒जायै॑ च॒क्रे त्वा शाले परमे॒ष्ठी प्र॒जाप॑तिः ॥ ११ ॥
नम॒स्तस्मै॒ नमो॑ दा॒त्रे शाला॑पतये च कृण्मः । नमो॒ऽग्नये॑ प्र॒चर॑ते॒ पुरु॑षाय च ते॒ नमः॑ ॥ १२ ॥

अर्थ — हे (**शाले देवि**) गृहरूपी देवते ! (**हविर्धानं**) हविष्य अन्नाचें स्थान, (**अग्निशालं**) अग्निशाळा अथवा यज्ञशाळा, (**पत्नीनां सदनं**) स्त्रियांचें रहाण्याचें ठिकाण (**सदः**) रहाण्याचें स्थान आणि (**देवानां सदः**) देवतांचें तूं स्थान आहेस. [७]

(**विषूवति ओपशं**) आकाश रेषेवर आभूषण रूप झालेलें (**विततं सहस्राक्षं अक्षुं**) प्रसरलेलें हजारों छिद्रांचें जाळें, (**अवनद्धं अभिहितं**) ताणून बांधण्याच्या (**ब्रह्मणा वितचृतामसि**) ज्ञानानें मीं बांधतों. [८]

हे (**मानस्य पत्नि शाले**) प्रमाण घेणाऱ्याकडून पालन केलेल्या घरा ! (**यः त्वा प्रतिगृह्णाति**) जो तुला घेतो (**येन च त्वं मिता असि**) आणि ज्याच्याकडून तूं मापिलें गेलें आहेस (**उभौ तौ**) ते दोघे (**जरदष्टी जीवतां**) वृद्धावस्थे पर्यंत जगोत. [९]

(**यस्याः ते**) ज्या तुझे (**अंगं अंगं परुः परुः**) प्रत्येक अंग आणि सांधे आम्हीं मजबूत बनविले आहेत, असें तूं (**अमुत्र दृढा नद्धा परिष्कृता**) तेथें सुदृढ बांधून, सुसिद्ध होऊन, (**एनं आगच्छतात्**) याच्या-पाशीं ये. [१०]

हे घरा ! (**यः त्वा निमिमाय**) ज्यानें तुला बनविलें, आणि ज्यानें (**वनस्पतीन् संजभार**) वृक्षांना कापून तुला तयार केलें, हे घरा ! (**परमेष्ठी प्रजापतिः**) परमेष्ठी प्रजापतीनें (**त्वा प्रजायै चक्रे**) तुला प्रजेसाठीं निर्माण केलें. [११]

(**तस्मै दात्रे नमः**) त्या कापणाऱ्यास नमस्कार असो. (**शालापतये नमः कृण्मः**) घराच्या स्वामीला नमस्कार करतों. (**नमः प्रचरते अग्नये**) चालणाऱ्या अग्नीला नमस्कार, आणि (**ते पुरुषाय च नमः**) तुला पुरु-षाला नमस्कार असो. [१२]

भावार्थ— घरांत जीं शिंकीं आहेत, ज्यांच्यावर सुख देणारे पदार्थ भरून ठेवले आहेत त्या सर्वांस आम्हीं उत्तम प्रकारें बांधतो, अशा प्रकारें तयार केलेलें तें उंच घर आमच्या शरीरास सुखदायक होवो. [६]

घरांत धान्याचें स्थान, हवनाची खोली, स्त्रियांचें बसण्याचें ठिकाण, इतर मनुष्यासाठीं बसण्या उठण्याचें ठिकाण, आणि देवा-साठीं स्थान असावें. [७]

वरील भागांत हजारों छिद्रें असलेलें, अलंकाराप्रमाणें शोभणारें सुंदर जाळें आम्हीं ताणून बांधतों. [८]

अशा प्रकारचें घर योग्य मापें घेणाऱ्यास आणि त्या मापांनुसार तें बांधणाऱ्यास सुखकारक होवो. [९]

या घराचा प्रत्येक भाग आणि विभाग खंड-खोली उत्तम सुदृढ करण्यांत आली आहे. याप्रकारें मजबूत बांधलेलें हें घर त्याला (धन्याला) सर्व प्रकारें वश होवो. [१०]

प्रजेचें पालन करण्याची इच्छा असणाऱ्या, उच्चस्थानीं स्थिर रहाणाऱ्या, मोठ्या कारागीरानें ते प्रमाणसर बनविलें आहे, आणि त्यासाठीं अनेक वृक्ष कापले आहेत. [११]

वृक्ष कापणारे, घराचे रक्षण करणारे, आंत अग्नि ठेवणारे, तसेंच इतर सहाय्यक मनुष्यांना मीं नमस्कार करतों. [१२]

गोभ्यो अश्वेभ्यो नमो यच्छालायां विजायते । विजावति प्रजावति वि ते पाशांश्चृतामसि ॥ १३ ॥
अग्निमन्तश्छादयसि पुरुषान्पशुभिः सह । विजावति प्रजावति वि ते पाशांश्चृतामसि ॥ १४ ॥
अन्तरा द्यां च पृथिवीं च यद्व्यचस्तेन शालां प्रति गृह्णामि त इमाम् ।
यदन्तरिक्षं रजसो विमानं तत्कृण्वेऽहमुदरं शेवधिभ्यः । तेन शालां प्रति गृह्णामि तस्मै ॥ १५ ॥
ऊर्जस्वती पयस्वती पृथिव्यां निमिता मिता । विश्वान्नं बिभ्रती शाले मा हिंसीः प्रतिगृह्णतः ॥ १६ ॥
तृणैरावृता पलदान्वसाना रात्रीव शाला जगतो निवेशनी ।
मिता पृथिव्यां तिष्ठसि हस्तिनीव पद्वती ॥ १७ ॥
इटस्य ते वि चृताम्यपिनद्धमपोर्णुवन् । वरुणेन समुब्जितां मित्रः प्रातर्व्युब्जतु ॥ १८ ॥

अर्थ— (यत् शालायां विजायते) जे घरांत असतील त्या गाई-घोड्यांना नमस्कार असो. हे (विजावति प्रजावति) उत्पादक आणि संतान युक्त घरा ! (ते प्रशान् वि चृतामसि) तुझ्या पाशांना मीं बांधतो. [१३]

(पशुभिः सह पुरुषान्) पुरुषासह मनुष्यांना आणि (अग्निं) अग्निशाला, (अन्तः छादयासि) आंत गुप्त ठेवतोस. हे (विजावति प्रजावति) उत्पादक आणि संतानयुक्त घरा ! तुझीं बंधनें मीं मजबूत बांधतो. [१४]

(द्यां च पृथिवीं च अंतरा) आकाश आणि पृथ्वीच्या मध्यें (यत् व्यचः) जी विस्तृत पोकळी आहे, (तेन ते इमां शालां प्रति गृह्णामि) त्यांतील तुझ्या या घरास मीं स्वीकारतों. (यं अंतरिक्षं रजसः विमानं) जें अंतरिक्ष लोकांत मध्यें माप आहे, (तत् अहं शेवधिभ्यः उदरं कृण्वे) त्याला मीं खजिन्यासाठीं पोटासारखें स्थान बनवितों. (तेन तस्मै शालां प्रतिगृह्णामि) त्यासाठीं मीं या घराचा स्वीकार करतों. [१५]

हे शाले ! (ऊर्जस्वती पयस्वती) तूं अन्नयुक्त आणि रसपानयुक्त (पृथिव्यां निमिता मिता) पृथ्वीवर माप घेऊन निर्माण करण्यांत आली आहेस. (विश्वान्नं बिभ्रती) सर्व प्रकारच्या अन्नास धारण करणारी (प्रतिगृह्णतः मा हिंसीः) घेणाऱ्या नाश करूं नको. [१६]

(तृणैः आवृता) गवतानें आच्छादित (पलदान् वसाना) चटयांनीं झांकलेली (मिता शाला) माप घेतलेली शाळा (रात्री इव) रात्रीप्रमाणें (जगतः निवेशनी) जगाला आश्रय देणारी, (पद्वती हस्तिनी इव) उत्तम पायांच्या हत्तीणीप्रमाणें (पद्वती पृथिव्यां तिष्ठसि) उत्तम स्तंभांनीं युक्त होऊन तूं पृथ्वीवर उभी रहातेस. [१७]

(ते इटस्य अपिनद्धं) चटयांनीं बांधलेल्या तुला (अपऊर्णुवन्) आच्छादितकरून (वि चृतामि) मीं बांधतों. (वरुणेन समुब्जितां) वरुणाच्या पाण्यानें सरळ केलेल्या (मित्रः प्रातः व्युब्जतु) सूर्य सकाळीं सरळ करील. [१८]

भावार्थ— घरांत उत्पन्न होणाऱ्या सर्व गाई-घोड्यांना नमस्कार करतों. त्या घरास मजबूत करतों. [१३]

घरांत मनुष्य, पशु आणि अग्नि रहातात त्यामुळें या संतानयुक्त आणि उपजाऊ घराच्या बंधनांना मीं सुदृढ करतों. [१४]

पृथ्वी आणि अंतरिक्ष यांत जो अवकाश आहे त्यामध्यें हें घर निर्माण झालें आहे. त्याच्या मध्यभागीं मीं धनसंग्रह करण्याचें स्थान बनवितों. त्या खजिन्याच्या स्थानासह घर मीं घेतों. [१५]

घरांत सर्व प्रकारचीं धान्यें, रसपानाचें साधन पाणी इत्यादि सदा तयार असावें. घर प्रमाणावर तयार करण्यांत यावें. सर्व प्रकाराचीं धान्यें त्यांत भरलेली असावींत. असें घर कधीं कोणाचा नाश करूं शकत नाहीं. [१६]

या घरावर गवताचें छप्पर करण्यांत आलें आहे, चारी बाजूंस चटया बांधून घेण्यांत आल्या आहेत, सर्व स्थानें प्रमाणबद्ध ठेवण्यांत आलीं आहेत. ज्याप्रमाणें हत्तीण आपल्या चार पायावर सुखरूप उभी रहाते, तसें हें घर मजबूत खांबांवर सुरक्षित राहो. [१७]

हें स्थान सुरवातीस चटयांनीं सुरक्षित होतें, त्याला मीं सुदृढ करतों. रात्रीच्या वेळीं त्याला चंद्र आणि दिवसा सूर्य सरळतेचा मार्ग दाखवोत. [१८]

*

ब्रह्मणा शालां निमितां कविभिर्निमितां मिताम् । इन्द्राग्नी रक्षतां शालाममृतौ सोम्यं सदः ॥१९॥
कुलायेऽधि कुलायं कोशे कोशः समुब्जितः । तत्र मर्तो वि जायते यस्माद्विश्वं प्रजायते ॥ २० ॥
या द्विपक्षा चतुष्पक्षा षट्पक्षा या निमीयते ।
अष्टापक्षां दशपक्षां शालां मानस्य पत्नीमग्निर्गर्भ इवा शये ॥ २१ ॥
प्रतीचीं त्वा प्रतीचीनः शाले प्रैम्यहिंसतीम् । अग्निर्ह्य१न्तरापश्चर्तस्य प्रथमा द्वाः ॥ २२ ॥
इमा आपः प्र भराम्ययक्ष्मा यक्ष्मनाशनीः । गृहानुप प्र सीदाम्यमृतेन सहाग्निना ॥ २३ ॥
मा नः पाशं प्रति मुचो गुरुर्भारो लघुर्भव । वधूमिव त्वा शाले यत्रकामं भरामसि ॥ २४ ॥

अर्थ— (ब्रह्मणा निमितां शालां) ज्ञान्यानें निर्माण केलल्या शाळेला आणि (कविभिः मितां निमितां) कवीनीं प्रमाण बद्ध रचलेल्या शाळेला (अमृतौ इन्द्राग्नी रक्षतां) अमर इंद्र आणि अग्नि रक्षण करो. हें (सोम्यं सदः) सोमवनस्पतीचें घर आहे [१९]

(कुलाये अधिकुलायं) माळ्यावर माळा आणि (कोशे कोशः समुब्जितः) कोशावर कोश सरळ ठेवला आहे. (तत्र मर्त्यः विजायते) तेथें मर्त्य उत्पन्न होतो. (यस्मात् विश्वं प्रजायते) ज्यांतून हें सर्व विश्व उत्पन्न होतें. [२०]

(या द्विपक्षा) जी दोन पाखें) असलेली (या चतुष्पक्षा षट्पक्षा, निमीयते) आणि ज्या चार अथवा सहा पांखांनीं निर्माण केल्या जातात, (अष्टपक्षां दशपक्षां) आठ अथवा दहा पांखाच्या (मानस्य पत्नीं शालां) प्रमाणयुक्त बांधलेल्या शाळा निर्माण करण्यांत येतात. (गर्भः अग्निः इव) गूढ स्थानांत राहिलेल्या अग्निप्रमाणें मीं (आशये) त्यांचा आश्रय करतों. [२१]

हे शाले ! (प्रतीचीनः) पश्चिमेकडे तोंड करणारा मीं (प्रतीचीं अहिंसतीं त्वा प्रैमि) पश्चिमाभिमुख उभ्या असलेल्या अहिंसक शाळेजवळ मीं येतों. (अग्निः आपः च अन्तः) अग्नि आणि पाणी आंत आहेत. (ऋतस्य प्रथमा द्वाः) यज्ञाचें प्रथम द्वार आहे [२२]

(इमाः अयक्ष्माः यक्ष्मनाशनीः आपः) हें रोगरहित आणि रोगाचा नाश करणारें जल (प्रभरामि) शाळे-मध्यें-घरांत मीं भरतों. (अमृतेन अग्निः सह) जल आणि अग्निसह (गृहान् उप प्र सीदामि) घरांत मीं येतों. [२३]

हे शाळे ! (नः पाशं मा प्रतिमुचः) आमच्यावर पाश सोडूं नकोस, (गुरुः भारः लघुः भव) मोठ्या भारास हलका करणारी हो. (वधूं इव) वधूप्रमाणें (त्वा यत्रकामं भरामसि) तुझ्या इच्छेनुसार भरून देतेस. [२४]

भावार्थ— ज्ञानी आणि कवीनीं या घराची रचना प्रमाणनुसार केली आहे. त्याचें रक्षण इंद्र आणि अग्नि करील. हें घर शांतिदायक होवो. [१९]

पक्ष्याच्या घरट्यांत ज्याप्रमाणें खंड असतात अथवा कोशेट्यावर कोशेटा ठेवलेला असतो. त्याप्रमाणें पहिल्या मजल्यावर दुसरा मजला बांधला आहे. त्यांत मनुष्यांची उत्पत्ति होते. त्यांत सर्वांची उत्पत्ति होते. [२०]

हें घर दोन, चार, सहा, आठ अथवा दहा पडव्यांचें आहे. ज्याप्रमाणें गर्भ पोटांत सुरक्षित असतो. त्याप्रमाणें त्या घराच्या आश्रयानें मीं सुरक्षित रहातों. [२१]

घराच्या पश्चिमेकडे तोंड करून मनुष्यानें घरांत प्रवेश करावा. घरांत पाणी आणि अग्नि नेहमीं असावेत. हेच दोन पदार्थ गृहस्थाश्रमाच्या यज्ञाची सिद्धि करणारे आहेत. अशा प्रकारचें घर नेहमीं सुखदायक होईल. [२२]

जेथें रोग दूर करणारें पाणी असेल तेथून तें आणून घरांत भरून ठेवलें पाहिजे. घरांत पाणी आणि अग्नि नेहमीं असले पाहि-जेत. अशा घरांत मनुष्यानें वास्तव्य करावें. [२३]

अशा घरांत रहाण्यानें संसाराचा भार पुष्कळच हलका होतो. ज्याप्रमाणें कुलवधूचें संरक्षण आणि पोषण लोक करतात त्या-प्रकारें या घराचें संरक्षण केलें पाहिजे. आणि त्यांमध्यें उत्तमोत्तम पदार्थ आणून ठेवलें पाहिजेत. [२४]

प्राच्या॑ दि॒शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ २५ ॥
दक्षि॑णाया दि॒शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ २६ ॥
प्रती॑च्या दि॒शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ २७ ॥
उदी॑च्या दि॒शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ २८ ॥
ध्रु॒वाया॑ दि॒शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ २९ ॥
ऊ॒र्ध्वाया॑ दि॒शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ ३० ॥
दि॒शोदि॑शः शाला॑या॒ नमो॑ महि॒म्ने स्वाहा॑ दे॒वेभ्यः॑ स्वा॒ह्येभ्यः॑ ॥ ३१ ॥

अर्थ— (शालायाः प्राच्याः दक्षिणायाः) घराच्या पूर्वेस, दक्षिणेस, (**प्रतीच्या उदीच्याः**) पश्चिमेस, उत्तरेस (ध्रुवायाः ऊर्ध्वायाः) ध्रुव आणि ऊर्ध्व दिशेस (दिशोदिशः) दिशा आणि उपदिशांच्या (**महिम्ने नमः**) महिम्यास नमस्कार असो. (**स्वाह्येभ्यः स्वाहा**) उत्तम वर्णन करण्या योग्य देवांसाठीं (**स्वाहा = सु+आह**) उत्तम प्रशंसा करतों. [२५-३०]

भावार्थ— घराच्या चारी दिशा उपदिशांना सुंदर दश्यांचा महिमा आहे. सत्कारपूर्वक घराची प्रसन्नता वाढविली पाहिजे. उत्तम प्रशंसनीय पृथ्वी, आप, अग्नि, वायु, चंद्र, सूर्य, इत्यादि देवांची प्रसन्नता या घरावर रहावी, असा उपचार व्यवहार केला पाहिजे. [२५-३१]

गृह निर्माण

घराची प्रसन्नता आणि तें आनंदित प्रसन्न आणि उत्तम स्वास्थ्यसंपन्न ठेवण्याचा उपदेश या सूक्तांत केला आहे. घर उत्तम प्रमाणबद्ध निर्माण करण्यांत यावें. त्याचे खांब, त्यावरील तुळया, छपराच्या वळ्या, वासे, ओमण हें सर्व साहित्य सुंदर आणि सुव्यवस्थित असावें. सर्व सांधे मजबूत रीतीनें जोडण्यांत यावेत. त्यांत कच्चेपणा राहूं नये. कारण कीं घरांत रहाणाऱ्या सर्व मनुष्यांच्या स्वास्थ्याचा आधार घराच्या सुरक्षिततेवर असतो. असें सुंदर आणि सुदृढ घर त्यांत रहाणाऱ्यांचे सर्व कष्ट दूर करतें. परंतु कमकुवत, कच्च्या बांधणीचें, योग्य विचाराशिवाय बांधलेलें घर त्यांत रहाणाऱ्यांचा केव्हां नाश करील तें सांगतां येत नाहीं.

सुतार, गवंडी आणि इतर कारागीर असे कामास लावण्यांत यावेत कीं जे सांधे कापण्या-जोडण्याची कला उत्तम जाणत असतील. कळक, लांकूड, गवत, चटया वगैरे सर्व साहित्य घरांत ठेवण्याचें वापरण्याचें असेल तें सर्व उत्तम निर्दोष, आणि सुव्यवस्थित ठेवलें पाहिजे.

गृह निर्माण करण्याची विद्या जाणणाऱ्यास '**मानपति**' म्हणतात. तो घराचें माप आणि त्याबरहुकूम नकाशे तयार करतो. आणि त्याप्रमाणें भूमीवर रचना तयार करवितो. त्यामुळें जें घर प्रमाणयुक्त झालें असेल तें सुखदायक होतें. 'मानपति' (एंजिनीयर) ला 'सूत्रधार' असेंहि म्हणतात. कारण कीं तो सूत्रा (दोऱ्या) नें सर्व माप घेतों. अशा मानपति द्वारा बनवलेल्या या शालेला (घर) 'मानपत्नी' म्हणतात. त्याचा शब्दार्थ असा कीं माप घेण्यांत कुशल अशाच्या सांगण्याप्रमाणें तयार झालेली. प्रत्येक घरास ही गोष्ट लागू पडते.

घरांत शिंकीं टांगण्यांत यावींत आणि त्यावर तूप, दूध, आदि पदार्थ ठेवण्यांत यावेत. त्यावर ते पदार्थ ठेवण्यामुळें, मुंग्या, मुंगळे अथवा उंदीर ते बिघडवूं शकत नाहीं. त्यामुळें ते आरोग्यदायक राहूं शकतात.

घर (**उद्धित**) उंचस्थानावर आणि उंच बांधावें. ठेंगणें असूं नये कारण उंच घरांत शुद्ध हवा येते ती मनुष्यास निरोगी ठेवते. येथें सांगण्यांत आलें आहे कीं—

उद्धिता शाला तन्वे शं भवति । (मं. ६)

' उंच घर शरीरास सुखदायक होतें. ' ठेंगणें घर तसें होत नाहीं. घरांत उपासना करण्याचें एक स्थान असावें. संध्या हवन करण्यास योग्य खोली, एक स्वयंपाकघर, एक स्त्रियांसाठीं स्थान, एक पाहुण्यासाठीं आणि एक घरांत रहाणाऱ्यासाठीं स्थान, एक धान्याच्या कोठाराचें स्थान, अशा निरनिराळ्या खोल्या असाव्या घराच्या छताला सुंदर कापड लावण्यांत यावें त्यामुळें घराची शोभा वाढते. घरांत रहाणाऱ्यांनीं असें म्हटलें पाहिजे कीं, घर निर्माण करणारा ' मानपति ' एंजिनीयर आणि अन्य कारागीर दीर्घकाल जिवंत राहोत. घरांत रहाणाऱ्यांस सुख होईल तरच ते असें म्हणतील. म्हणून घर बांधणाऱ्यांनीं ते कुशलतापूर्वक बांधलें पाहिजे. घरांत रहाणारे सुखी व्हावेत अशी त्यांनीं भावना ठेवली पाहिजे. केवळ मजुरीसाठीं काम करणाऱ्यांकडून असें होणार नाहीं. हा तर परस्पर प्रेमाचा प्रश्न आहे. अशा गांवचे कारागीर आणि घरमालक यांच्यांत परस्पर हितबुद्धि जागृत राहील.

झाड कापणारे, लांकडें घडणारे, घरास लागणारें इतर साहित्य एकत्रित करणारे त्यांना जोडणारे आणि घरांत रहाणारे या सर्वांचें घरनिर्मितींत सहकार्य असावें. म्हण जेगांवांतहि त्यांच्यांत सहकारिता रहाते. एकाचें हित दुसऱ्यानें पहावें घराचा स्वामी धनवान् आणि प्रतिष्ठित असेल तरी त्यानें लांकडें कापणारास भेटतांच (**तस्मै दात्रे नमः**) त्या लांकडे कापणाऱ्यांस नमस्कार करावा. तो लांकडे कापणारा निर्धन असला तरी त्यानें घरमालक भेटतांच त्याला (**शालापतये नमः**) नमस्कार करावा. याप्रकारें त्यांनीं एकमेकांचा सन्मान करावा. एक दुसऱ्याचा आदर करावा, कोणीं कोणाचा अपमान करूं नये.

असा आदर दाखवावा कीं घराच्या स्वामीनें स्वतःच्या घोडा, गाय, बैल इत्यादि पशूंचा सुद्धां उत्तम सत्कार करावा. अशाप्रकारें जेथें उत्तम सत्कार होतो, अशा घरांत रहाणारा मनुष्य आनंद अनुभवतो, यांत काय संशय ?

घर असें तयार करावें कीं तें दिसावयास सुंदर, आजुबाजूस वृक्ष-वनस्पतींची शोभा असावी. आणि प्रयत्नांनीं त्या सुंदरतेंत भर घालावी. घराच्या मध्यभागांत अत्यंत सुरक्षित स्थानांत धन, जवाहिर इत्यादि मौल्यवान् वस्तु ठेवण्याचें स्थान तयार करावें. (**शेवधिभ्यः उदरं**) ज्याप्रमाणें मनुष्याचें पोट मध्यें असतें, अति सुरक्षित स्थानीं असतें, त्याप्रमाणें घराच्या मध्यभागांत खजिन्याची खोली ठेवावी. घराच्या धान्यकोठारांत सर्व प्रकारचीं (**ऊर्जः**) धान्यें (**विश्वान्नं**) अन्नसामग्रीचा संग्रह करावा. (**पयः**) पाणी, पेयपदार्थ, रसपानाचीं साधनें घरांत भरपूर असावींत. असें घर त्यांत रहाणाऱ्यांस सुखदायक होतें.

घराचे खांब हत्तिणीच्या पायासारखे मजबूत असावेत. कारण त्यांच्यावरच सर्व छपराचा भार यावयाचा असतो. दुसरा मजला बांधावयाचा असल्यास मजले एकावर एक करावेत. ज्याप्रमाणें पक्षी घरटीं बांधतानां एका पडावर दुसरें पड टाकतात आणि त्यांत एका कोशाच्या आंत दुसरा कोश असतो. खालील भाग जर मजबूत नसला तर वरील भारानें तो दबून जाईल. पक्षी प्रसुति पूर्वी उत्तम घरटीं तयार करतात, पशुसुद्धां सुरक्षित स्थान शोधतात, हें पाहून मनुष्यानें सुद्धां घरांत प्रसूतिसाठीं उत्तम स्थान तयार केलें पाहिजे.

घरांत दोन, चार, सहा, आठ, दहा खोल्या, चौक, ओसऱ्या असाव्यात. घरांत रहाणाऱ्या मनुष्यांच्या संख्येनुरूप आणि त्यांत होणाऱ्या कार्यानुरूप घर लहान अथवा मोठें असावें.

अग्निः ह्यन्तरापश्चर्तस्य प्रथमा द्वाः । (मं. २२)

' घरांत अग्नि आणि जल अवश्य असावें कारण त्यांनींच सर्व प्रकारचे यज्ञ होत असतात. अतिथि आला तर त्यास दुसरें कांहीं नाहीं तर निदान पाणी प्यावयास यावें. आणि, थंडी निवारण्यास शेगडीजवळ बसवावें. हे दोन पदार्थ गरीब-श्रीमंत या प्रत्येकाच्या घरांत अवश्य असावेत. आणि त्यांनीं सत्कार करावा. मनुस्मृतींत म्हटलें आहे कीं—

तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता ।
एतान्यपि सतां गेहे नोच्छिद्यन्ते कदाचन ॥

' बसण्यास चटई, जमीन, पाणी, आणि मधुर भाषण या चार गोष्टींचा अतिथि सत्कारासाठीं सज्जनांच्या घरांत कधींहि अभाव असत नाहीं. ' येथें पाणी आहे. वेदाच्या वरील मंत्रांत पिण्यास पाणी आणि शेकण्यास अग्नि प्रत्येक घरांत अवश्य ठेवावा असें सांगितलें आहे. अतिथिसत्काराचा हा प्रकार लक्षांत ठेवण्यासारखा आहे. घरांत ठेवण्याचें पाणी शुद्ध असलें पाहिजे. त्याविषयीं म्हटलें आहे—

अयक्ष्मा यक्ष्मनाशनीः आपः प्रभरामि ।
गृहान् उपप्रसीदामि ॥ (मं. २३)

' स्वतः रोग उत्पन्न करणारें नसून रोगाचें निवारण करणारें पाणी मीं घरांत भरून ठेवतों. याप्रकारें घराची प्रसन्नता मीं वाढवितों. ' प्रत्येक गृहस्थानें असेंच म्हणून स्वतःच्या घराची प्रसन्नता वाढविली पाहिजे. (**वधूं इव**) ज्याप्रमाणें स्त्रीचें रक्षण करण्यांत येतें त्याप्रमाणें घराचें रक्षण करण्यांत यावें. स्त्रीला प्रसन्न ठेवणें, हृष्टपुष्ट राखणें, निर्दोष राखणें, सुरक्षित ठेवणें

इत्यादि गोष्टी समजण्यासारख्या आहेत आणि या दृष्टांतानें घराच्या सुरक्षिततेची गोष्ट सुद्धां समजूं शकते. शाला (घर) सुद्धा एक कुलवधूच आहे असें समजून तिच्या सुरक्षिततेसाठीं, शोभा वाढविण्यासाठीं प्रयत्न केले पाहिजेत. असें करण्यानेंच (**गुरुः भारः लघुः**) संसाराचा मोठा भार हलका होतो.

जेथें कुलवधूप्रमाणें घराची व्यवस्था करण्यांत येते त्या घराच्या चारी बाजूंच्या दिशा आणि उपदिशा प्रसन्न होतात. आणि तें घर देवतांच्या वास्तव्याला योग्य असें स्थान होतें. तसेंच त्या घराचें महात्म्यसुद्धां वाढतें.

प्रत्येक गृहस्थानें स्वतःच्या घराचा महिमा अशा प्रकारें वाढविला पाहिजे, आणि स्वतःच्या घराला देवतांचे निवासस्थान करावें, त्यानें स्वतःच्या शिरावरचा संसाराचा भार हलका करावा.

घराची शोभा

कांड ६, सूक्त १०६

(ऋषिः – प्रमोचनः । देवता – दूर्वाशाला ।)

आय॑ने ते परा॒य॑णे॒ दूर्वा॑ रोहतु पु॒ष्पिणीः॑ । उत्सो॑ वा॒ तत्र॑ जाय॑तां ह्र॒दो वा॑ पु॒ण्डरी॑कवान् ॥ १ ॥
अ॒पामि॒दं न्यय॑नं समु॒द्रस्य॑ नि॒वेश॑नम् । मध्ये॑ ह्र॒दस्य॑ नो गृ॒हाः परा॒चीना॒ मुखा॑ कृधि ॥ २ ॥
हि॒मस्य॑ त्वा ज॒रायु॑णा शाले॒ परि॑ व्ययामसि । शी॒तह्र॑दा॒ हि नो॒ भुवो॒ऽग्निष्कृ॑णोतु भेष॒जम् ॥ ३ ॥

अर्थ— (**आयने परायणे**) तुझ्या घराच्या मागेंपुढें (**पुष्पिणीः दूर्वाः रोहन्तु**) फुलांनीं युक्त दुर्वा उगवोत (**तत्र वा उत्सः जायतां**) तसेंच तेथें एक पाण्याचा हौद असावा. (**वा पुण्डरिकवान् ह्रदः**) अथवा तेथें कमलयुक्त तलाव असावा. [१]

(**इदं अपां न्ययनं**) तें पाण्याच्या प्रवाहाचें स्थान होवो. (**समुद्रस्य निवेशनं**) समुद्राजवळ तें स्थान असावें, (**ह्रदस्य मध्ये नः गृहाः**) तलावाच्या मध्यें आपलें घर असावें, (**मुखाः पराचीना कृधि**) घराची द्वारें परस्पर विरुद्ध असावींत. [२]

हे शाले ! (**त्वा हिमस्य जरायुणा**) तुला थंडीचें आवरण (**परि व्ययामसि**) घेरून राहो. (**नः शीतह्रदा भुवः**) आमच्यासाठीं शीतल थंड पाण्याचे तलाव पुष्कळ असावेत, आणि आमच्यासाठीं (**अग्निः भेषजं कृणोतु**) अग्नि थंडी निवारण्याचा उपाय करो. [३]

भावार्थ— घराच्या मागेंपुढें दुर्वांचें उद्यान त्यांत पुष्कळ प्रकारचीं फुलझाडें असून फुलें फुलावींत. जवळच पाण्याचा हौद असावा. आणि कमळें फुललेला तलाव असावा. [१]

घराच्याजवळ पाण्याचा प्रवाह असावा, घराचें स्थान समुद्रकिनाऱ्यावर अथवा तलावाच्या मध्यें असावें. घराच्या खिडक्या दारें समोरासमोर असावींत. [२]

घराच्या चारी बाजूस पाणी असावें, थंड पाण्याची टांकी असावी, आणि एखाद्या दिवशीं कडक थंडी पडली तर घरांत शेकण्यास अग्निस्थान असावें. [३]

घराच्या आजुबाजूची शोभा कशी असावी ते या सूक्तांत उत्तम प्रकारें सांगितलें आहे. घराच्या चारी बाजूस बागबगीचा, कमळांनीं भरलेला तळाव, पाण्याचा कालवा वहात असावा, सुंदर बाग असावी, आणि चारी बाजूस रमणीय शोभायमान दृश्यें असावींत. घराचीं दारें, खिडक्या समोरासमोर असल्यानें घरांत अडथळ्या वांचून शुद्ध वायु खेळता राहील. घरांत अग्नि जळत असावा, म्हणजे शीत ऋतूंत घरचीं माणसें अग्नीपाशीं तापून स्वतःची थंडी दूर करूं शकतील.

वाचकांच्या ध्यानीं येईल कीं वेदांनीं कशी बागबगीच्यासह घराची कल्पना दिली आहे. प्रत्येकानें स्वतःचें घर शक्य तों उद्यान आणि पाण्याच्या सोईनुरूप बांधावें.

रमणीय घर

कांड ७, सूक्त ६०

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - गृहाः वास्तोष्पतिः ।)

ऊर्जं बिभ्रद्वसुवनिः सुमेधा अघोरेण चक्षुषा मित्रियेण ।
गृहानैमि सुमना वन्दमानो रमध्वं मा बिभीत मत् ॥ १ ॥
इमे गृहा मयोभुव ऊर्जस्वन्तः पयस्वन्तः । पूर्णा वामेन तिष्ठन्तस्ते नो जानन्त्वायतः ॥ २ ॥
येषामध्येति प्रवसन्येषु सौमनसो बहुः । गृहानुप ह्वयामहे ते नो जानन्त्वायतः ॥ ३ ॥
उपहूता भूरिधनाः सखायः स्वादुसंमुदः । अक्षुध्या अतृष्या स्त गृहा मास्मद्बिभीतन ॥ ४ ॥
उपहूता इह गाव उपहूता अजावयः । अथो अन्नस्य कीलाल उपहूतो गृहेषु नः ॥ ५ ॥

अर्थ— (**ऊर्जं बिभ्रत् वसुवनिः**) अन्न धारण करणारा, धनाचें दान करणारा, (**सुमेधाः**) उत्तम बुद्धिमान् (**अघोरेण मित्रियेण चक्षुषा सुमनाः**) शांत आणि मित्रत्वाची दृष्टि धारण करण्यामुळें उत्तम मनानें युक्त होऊन तसेंच (**वन्दमानः**) सर्व श्रेष्ठ पुरुषांना नमन करून मीं (**गृहान् एमि**) तुमच्या घराजवळ येतों. येथें तुम्हीं (**रमध्वं**) आनंदानें रहा. (**मत् मा विभीत**) भीऊं नका. [१]

(**इमे गृहाः**) हें माझें घर (**मयोभुवः ऊर्जस्वन्तः पयस्वन्तः**) सुखदायक, बलदायक, धान्यानें युक्त, आणि दुधानें युक्त आहे. तें (**वामेन पूर्णाः तिष्ठन्त**) सुखानें परिपूर्ण आहे. (**ते नः आयतः जानन्तु**) आणि त्या येणाऱ्यांनीं हें सर्व जाणावें. [२]

(**प्रवसन् येषां अध्येति**) आंत राहून जाणावें कीं, (**येषु बहुः सौमनसः**) ज्यांत पुष्कळ सुख आहे अशा (**गृहान् उपह्वयामहे**) घरांत आम्हीं इष्टमित्रांना बोलावितों, (**ते नः आयतः जानन्तु**) आणि त्या येणाऱ्यांनीं आम्हां सर्वांस जाणावें. [३]

(**भूरिधनाः स्वादुसंमुदः सखायः उपहूताः**) पुष्कळ धनानें युक्त, माधुर्यानें आनंदित होणारे अनेक मित्र बोलाविले आहेत. हे (**गृहाः**) घरांनों ! तुम्हीं (**अक्षुध्याः अतृष्याः स्त**) भूकेले आणि तहानेलेले राहूं नका. तसेंच (**अस्मत् मा बिभीतन**) आम्हांस भिऊं नका. [४]

(**इह गावः उपहूताः**) येथें गाईंना बोलावण्यांत आलें आहे. (**अज-अवयः उपहूताः**) शेळ्या-मेंढयांना बोलाविण्यांत आलें आहे. (**अथो अन्नस्य कीलालः**) आणि अन्नाचा सत्वभाग सुद्धां (**न गृहेषु उपहूतः**) आमच्या घरांत आणला आहे. [५]

भावार्थ— मीं स्वतः उत्तम अन्न, विपुल धन, श्रेष्ठ बुद्धि आणि मित्र दृष्टि धारण करून उत्तम विचारासह पूजनीयांचा सत्कार करून घरांत प्रवेश करतों. सर्व लोकांनीं येथें आनंदानें रहावें आणि कोणत्याहि प्रकारें माझी भीति बाळगूं नये. [१]

या घरांत आम्हांस सुख प्राप्त व्हावें, बल प्राप्त व्हावें आणि सर्वांनीं आनंदानें रहावें. [२]

या घरांत रहाण्यानें आम्हांस सुखाचा अनुभव होवो आणि येथें इष्टमित्रांना बोलावून सर्वांनीं आनंदानें रहावें. [३]

पुष्कळ श्रीमंत, आनंदी वृत्तीच्या मित्रांना घरीं बोलाविलें आहे, त्यांस खावयाचें तितकें खावोत, येथें सर्व गोष्टी भरपूर असोत, कोणी तहानेलेला, भूकेलेला न राहो. [४]

आमच्या घरांत गाई, शेळ्या-मेंढ्या, अन्नाच्या व सर्वप्रकारचें सत्वयुक्त अन्न असावें. कोणत्याहि प्रकारें न्यूनता नसावी. [५]

सूनृतावन्तः सुभगा इरावन्तो हसामुदाः । अतृष्या अक्षुध्या स्त गृहा मास्मद्बिभीतन ॥ ६ ॥
इहैव स्त मानु गात विश्वा रूपाणि पुष्यत । ऐष्यामि भद्रेणा सह भूयांसो भवता मया ॥ ७ ॥

अर्थ- हे (गृहाः) घरांनो ! तुम्हीं (सूनृता-वन्तः सुभगाः) सत्ययुक्त आणि उत्तम भाग्ययुक्त, (इरावन्तः हसामुदाः) अन्नवान् आणि जेथें हास्यविनोद होत आहे अशीं, (अतृष्याः अक्षुध्याः) जेथें भूक अथवा तहानेचें भय नाहीं अशीं (स्त) व्हा. (अस्मात् मा बिभीतन) आम्हांस भिऊं नका. [६]

(इह एव स्त) येथेंच राहून (मा अनुगात) आमच्यापासून दूर जाऊं नका, (विश्वा रूपाणि पुष्यत) विविधरूपांच्या प्राण्यांस पुष्ट करा. (भद्रेण सह आ ऐष्यामि) कल्याणासह मीं तुम्हांस प्राप्त होतों. (मया भूयांसः भवत) माझ्यासह पुष्कळ व्हा. [७]

भावार्थ— प्रत्येक घरांत सत्य, भाग्य, अन्न, आनंद, हास्य आणि खाण्यापिण्याची विपुलता असावी. [६]

घर मजबूत असावें, अस्थिर नसावें, घरांत सर्वप्रकारचें पोषण मिळत रहावें, सर्वांस कल्याण आणि सुख मिळत रहावें. तसेंच आमची वृद्धि होत रहावी. [७]

रमणीय घर कसें असावें या विषयीं या सूक्तांत सुंदर रीतिनें सांगण्यांत आलें आहे. घरांत परस्पर प्रेमभाव असावा, द्वेष नसावा, सर्वांनीं आनंदानें रहावें. कोणी कोणास भीऊं नये. धनधान्याची समृद्धि असावी, गोरस भरपूर असावा, कोणत्याहि प्रकारच्या सुखोपभोगाची उणीव नसावी, इष्टमित्र यावेत, त्यांनीं आनंद करावा, कधीं कोणीं भुकेलेले राहूं नये. अन्न, खानपान वगैरे सत्वयुक्त असावें, प्रत्येकजण हृष्टपुष्ट असावा. कोणत्याहि कारणानें कोणीं कष्टी नसावें. अशाप्रकारचें घर असावें. याचेंच नांव गृहस्थाश्रम होय.

गाय

कांड ७, सूक्त ८२

(ऋषिः - शौनकः (संपत्कामः) । देवता - अग्निः ।)

अभ्यर्चत सुष्टुतिं गव्यमाजिमस्मासु भद्रा द्रविणानि धत्त ।
इमं यज्ञं नयत देवता नो घृतस्य धारा मधुमत्पवन्ताम् ॥ १ ॥
मय्यग्रे अग्निं गृह्णामि सह क्षत्रेण वर्चसा बलेन । मयि प्रजां मय्यायुर्दधामि स्वाहा मय्यग्निम् ॥२॥

अर्थ— (सुष्टुतिं गव्यं आजिं अभ्यर्चत) उत्तम स्तुति करण्यास योग्य गायीसंबंधीं प्रगतीच्या सीमेचा आदर करा. (अस्मासु भद्रा द्रविणानि धत्त) आमच्या मध्यें कल्याणकारक धन ठेवा. (नः इमं यज्ञं देवता नयत) आमचा हा यज्ञ देवतांना पोहोंचवा. (घृतस्य धाराः मधुमत् पवन्तां) तुपाच्या मधुर धारा वाहोत. [१]

(अग्रे मयि क्षत्रेण वर्चसा बलेन सह अग्निं गृह्णामि) प्रथम मीं तुझ्यांत क्षात्रशौर्य, ज्ञानाचें तेज आणि बलासह रहाणाऱ्या अग्नीचें ग्रहण करतों. (मयि प्रजां) माझ्यांमध्यें प्रजा, (मयि आयुः) माझ्यांत दीर्घ जीवन, (मयि अग्निं) माझ्यांत अग्नि (दधामि) धारण करतों, (स्वाहा) हें उत्तम म्हटलें आहे. [२]

भावार्थ— गायींच्या उन्नतीचा विचार करा, कारण तेंच उत्तम प्रशंसा योग्य कार्य आहे. तुपाच्या मधुर धारा विपुल असाव्यात, म्हणजे घरांत तूप मुबलक असावें. कल्याण करणारें धन प्राप्त करावें, आणि या सर्वांचा विनियोग ईश्वरास संतुष्ट करण्यासाठीं यज्ञांत करावा. [१]

माझ्यांत शौर्य, ज्ञान, बल, शांति, आयु वगैरे स्थिर होवो. [२]

इहैवाग्ने अधि धारया रयिं मा त्वा नि क्रन्पूर्वचित्ता निकारिणः ।
क्षत्रेणाग्ने सुयममस्तु तुभ्यमुपसत्ता वर्धतां ते अनिष्टृतः ॥ ३ ॥
अन्वग्निरुषसामग्रमख्यदन्वहानि प्रथमो जातवेदाः ।
अनु सूर्य उषसो अनु रश्मीननु द्यावापृथिवी आ विवेश ॥ ४ ॥
प्रत्यग्निरुषसामग्रमख्यत्प्रत्यहानि प्रथमो जातवेदाः ।
प्रति सूर्यस्य पुरुधा च रश्मीन्प्रति द्यावापृथिवी आ ततान ॥ ५ ॥
घृतं ते अग्ने दिव्ये सधस्थे घृतेन त्वां मनुरद्या समिन्धे ।
घृतं ते देवीर्नप्त्य१ आ वहन्तु घृतं तुभ्यं दुह्रतां गावो अग्ने ॥ ६ ॥

अर्थ— हे अग्ने ! (**इह एव रयिं अधिधारय**) येथेंच धनाचें धारण कर. (**पूर्वचित्ताः निकारिणः त्वा मा निक्रन्**) पूर्व कालपासून इच्छा करणारे अपकारी लोक तुझ्या संबंधांत अपकार न करोत. हे अग्ने ! (**क्षत्रेण तुभ्यं सुयमं अस्तु**) क्षात्रबलानें तुझ्यासाठीं उत्तम नियम होवो. (**उपसत्ता अनिष्टृतः वर्धतां**) तुझे सेवक अहिंसक होऊन वृद्धि पावोत. [३]

(**अग्निः उषसां अग्रं अनु अख्यत्**) अग्नि-सूर्य उषःकालाच्या प्रारंभीं प्रकाश करतो. (**प्रथमः जातवेदाः अहानि अनु अख्यत्**) प्रथम जातवेद-सूर्य दिवसाला प्रकाशित करतो. तोच (**सूर्यः अनु**) सूर्य अनुकूल होऊन (**उषसः अनु**) उषःकालास अनुकूल (**रश्मीन् अनु**) किरणांस अनुकूल (**द्यावापृथिवी अनु आ विवेश**) द्युलोक आणि पृथ्वीलोकाच्यामध्यें अनुकूलतेनें व्यापतो. [४]

(**अग्निः उषसां अग्रं प्रति अख्यत्**) अग्नि-सूर्य उषांच्या पुढें प्रकाशतो. (**प्रथमः जातवेदाः अहानि प्रति अख्यत्**) प्रथम जातवेद-सूर्य दिवसाला प्रकाशित करतो. (**सूर्यस्य रश्मीन् पुरुधा प्रति**) सूर्यांच्या किरणांना विशेष प्रकारें प्रकाशित करीत आहे. तसेंच (**द्यावापृथिवी प्रति आ ततान**) द्यावापृथ्वीला त्यानें प्रकाशित केलें. [५]

हे अग्ने ! (**ते घृतं दिव्ये सधस्थे**) तुझें तूप दिव्यस्थानांत आहे. (**मनुः त्वां घृतेन अद्य सं इन्धे**) मनुष्य तुपानें आज तुला प्रज्वलित करीत आहे. (**नप्त्यः देवीः ते घृतं आवहन्तु**) न पडणाऱ्या दिव्य शक्ति तुझें तूप स्वीकारोत. हे अग्ने ! (**गावः तुभ्यं घृतं दुह्रतां**) गायी तुझ्यासाठीं तूप देवोत. [६]

भावार्थ- मला धन प्राप्त व्हावें, अपकारी लोक अपकार न करोत. क्षात्रतेजानें सर्वत्र नियमबद्ध व्यवस्था राहो. ईश्वराचा भक्त-सेवक वृद्धि प्राप्त करो. [३]

सूर्य उषेनंतर प्रगट होतो, आणि दिवसा प्रकाश देतो. तो प्रकाश द्युलोक आणि पृथ्वी यांच्यामध्यें व्यापून रहातो. [४-५]

मनुष्यानें तुपानें अग्नीचें यजन करावें, कारण तूपच उत्तम दिव्यस्थानीं रहाणारें आहे. गाई हवनासाठीं उत्तम तूप तयार करून देवोत. [६]

या सूक्तांत गोरक्षणाच्या महिम्याचें वर्णन करण्यांत आलें आहे. तसेंच गाईच्या तुपाच्या हवनाचें महात्म्यसुद्धां वर्णिलें आहे. तुपाच्या हवनानें रोग दूर होण्याचें विधान या पूर्वी (अथर्ववेद ७।६।५) मध्यें केलें आहे, म्हणून रोग दूर झाल्यावर दीर्घ आयुष्य, बल, तेजस्विता, ज्ञान, धन, इत्यादि प्राप्त होण्याचा संभव आहे. या रीतीनें सूक्ताचा अर्थ समजण्यासारखा आहे.

गाय

कांड ४, सूक्त २१

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - गावः ।)

आ गावो अग्मन्नुत भद्रमक्रन्त्सीदन्तु गोष्ठे रणयन्त्वस्मे ।
प्रजावतीः पुरुरूपा इह स्युरिन्द्राय पूर्वीरुषसो दुहानाः ॥ १ ॥
इन्द्रो यज्वने गृणते च शिक्षत उपेद्ददाति न स्वं मुषायति ।
भूयोभूयो रयिमिदस्य वर्धयन्नभिन्ने खिल्ये नि दधाति देवयुम् ॥ २ ॥
न ता नशन्ति न दभाति तस्करो नासामामित्रो व्यथिरा दधर्षति ।
देवांश्च याभिर्यजते ददाति च ज्योगित्ताभिः सचते गोपतिः सह ॥ ३ ॥
न ता अर्वा रेणुककाटोऽश्नुते न संस्कृतत्रमुप यन्ति ता अभि ।
उरुगायमभयं तस्य ता अनु गावो मर्तस्य वि चरन्ति यज्वनः ॥ ४ ॥

अर्थ— (**गावः आ अग्मन्**) गाई आल्या आहेत आणि (**उत भद्रं अक्रन्**) त्यांनीं कल्याण केलें आहे. (**गोष्ठे सीदन्तु**) त्या गोशाळेंत बसोत आणि (**अस्मे रणयन्**) आम्हांस सुख देवोत. (**इह प्रजावतीः पुरुरूपा स्युः**) येथें उत्तम वासरांसह सुंदर रूपयुक्त होवोत. (**इन्द्राय उषसः पूर्वीः दुहानाः**) आणि परमेश्वराच्या पूजेसाठीं उषःकालापूर्वी दूध देणाऱ्या होवोत. [१]

(**इन्द्रः यज्वने गृणते च शिक्षते**) ईश्वर यज्ञकर्ता आणि सदुपदेश करणाऱ्याला ज्ञान देतो. तो (**इत् उप ददाति**) निश्चयपूर्वक धन वगैरे देतो. (**स्वं न मुषायाति**) आणि स्वतःला लपवून ठेवीत नाहीं. (**अस्य रयिं भूयः भूयः इत् वर्धयत्**) त्याच्या धनाला अधिकाधिक वाढवितो आणि (**देवयुं अभिन्ने खिल्ये निदधाति**) देवत्व प्राप्त करण्याची इच्छा ठेवणाऱ्याला स्वतःहून भिन्न नाहीं अशा स्थानांत धारण करतो. [२]

(**ताः न नशन्ति**) त्या यज्ञाच्या गाई नाश पावत नाहींत. (**तस्करः न दभाति**) चोर त्यांना चोरीत नाहीं. (**आसां व्यथिः अमित्रः आ दधर्षति**) त्यांना व्यथा करणारे शत्रु त्यांच्यावर अधिकार चालवूं शकत नाहींत. (**याभिः देवान् यजते**) ज्यांच्या योगानें देवांसाठीं यज्ञ करण्यांत येतो, आणि (**ददाति च**) दान करण्यांत येतें (**गोपतिः ताभिः सह ज्योक् इत् सचते**) गोपालक त्यांच्यासह चिरकाल सुखानें रहातात. [३]

(**रेणुक-काटः अर्वा ताः न अश्नुते**) पायानें धूळ उडवणारा घोडा या गाईंची योग्यता प्राप्त करूं शकत नाहीं. (**ताः संस्कृतत्रं न अभि उपयन्ति**) त्या गाई स्वयंपाक संस्कार करणाऱ्याच्या जवळहि जात नाहींत. (**ताः गावः**) त्या गायी (**तस्य यज्वनः मर्त्यस्य**) त्या यज्ञकर्त्या मनुष्याच्या आसपास (**उरुगायं अभयं अनु विचरन्ति**) फार प्रशंसनीय निर्भयतेनें फिरतात. [४]

भावार्थ— गाई आमच्या घरांत आल्या आहेत आणि त्यांनीं आमचें कल्याण केलें आहे. या गाई गोशाळेंत राहोत आणि आमच्या आनंदांत वृद्धि करोत. या गाई येथें अनेक रंगाच्या वत्सांनीं युक्त होऊन ईश्वराच्या यज्ञासाठीं सकाळीं दूध देणाऱ्या होवोत. [१]

ईश्वर सत्कर्मकर्ता आणि सदुपदेशाच्या दात्याला उत्तम ज्ञान देतो. तसेंच धन आदि सुद्धां देतो, आणि त्याच्यासमक्ष स्वतः प्रगटहि होतो. तो ईश्वर त्या उपासकाच्या धनाची वृद्धि करतो, आणि देवत्वाची इच्छा करणाऱ्या भक्ताला स्वतःमध्यें स्थिर स्थानीं धारण करतो. [२]

या गाईंचा नाश होत नाहीं, चोर त्या चोरीत नाहीं, अथवा कोणी त्यांना दुःख देत नाहीं. तिच्या दुधानें देवांचे यज्ञ करण्यांत येतात. याप्रमाणें गाईंचा पालनकर्ता गाईंच्यासह नेहमीं आनंदांत रहातो. [३]

तेजस्वी घोडा सुद्धां गाईंची योग्यता प्राप्त करूं शकत नाहीं. या गाई स्वयंपाक घरांत जात नाहींत. स्वतःच्या धन्याच्या रक्षणाखालीं निर्भयतेनें फिरतात. [४]

*

गावो॒ भगो॒ गाव॒ इन्द्रो॑ म इच्छाद्गावः॒ सोम॑स्य प्रथ॒मस्य॑ भ॒क्षः ।
इ॒मा या गावः॒ स ज॑नास॒ इन्द्र॑ इ॒च्छामि॑ हृ॒दा मन॑सा चि॒दिन्द्र॑म् ॥ ५ ॥
यू॒यं गा॑वो मेदयथा कृ॒शं चि॑दश्री॒रं चि॑त्कृणुथा सु॒प्रती॑कम् ।
भ॒द्रं गृ॒हं कृ॑णुथ भद्रवाचो बृ॒हद्वो॒ वय॑ उच्यते स॒भासु॑ ॥ ६ ॥
प्र॒जाव॑तीः सू॒यव॑से रु॒शन्तीः॑ शु॒द्धा अ॒पः सु॑प्रपा॒णे पिब॑न्तीः ।
मा व॑ स्ते॒न ई॑शत॒ माघशं॑सः॒ परि॑ वो रु॒द्रस्य॑ हे॒तिर्वृ॑णक्तु ॥ ७ ॥

अर्थ— (गावः भगः) गाई धन आहेत, (गावः इन्द्रः) गाई प्रभु आहेत, (गावः प्रथमस्य सोमस्य भक्षः) गाई प्रथम सोमरसाचें अन्न आहेत. (मे इच्छात्) हें मीं जाणतों. (इमा या गावः) या ज्या गाई आहेत, हे (जनाः) लोक हो ! (सः इन्द्रः) तो इंद्र आहे. (हृदा मनसा चित् इन्द्रं इच्छामि) हृदयानें आणि मनानें निश्चयपूर्वक मीं इंद्राला प्राप्त करण्याची इच्छा करतों. [५]

हे (गावः) गाईंनो ! (यूयं कृशं चित् मेदयथ) तुम्हीं दुर्बलांनाहि पुष्ट करतां. (अश्रीरं चित् सुप्रतीकं कृणुथ) निस्तेज असणाऱ्याला सुंदर बनवितां. हे (भद्रवाचः) उत्तम शब्द असणाऱ्या गाईंनो ! (गृहं भद्रं कृणुथ) घरास कल्याणरूप करा, आणि (सभासु वः बृहत् वयः उच्यते) सभांमध्यें तुमचें महान् यश गाइलें जातें. [६]

(प्रजावतीः) उत्तम वासरें असलेल्या, (सु-यवसे रुशन्तीः) उत्तम गवतासाठीं भ्रमण करणाऱ्या (सु-प्रपाणे शुद्धाः अपः पिबन्तीः) उत्तम जलस्थानीं शुद्ध जल पिणाऱ्या गाई (स्तेनः अघशंसः वः मा ईशत) चोर आणि पापी तुमच्यावर अधिकार न गाजवोत. (वः रुद्रस्य हेतिः परि वृणक्तु) तुमचें रक्षण इंद्राच्या शस्त्रानें सर्व बाजूनें होवो. [७]

भावार्थ-गाईच मनुष्याचें धन, बल आणि उत्तम अन्न आहेत, म्हणून मीं हृदय आणि मनानें गाईंची उन्नति इच्छितों. [५]

अत्यंत दुबळ्या मनुष्याला सुद्धां गाई स्वतःच्या दुधानें परिपुष्ट करितात, निस्तेज पंडु रोग्याला सुंदर, तेजस्वी करतात. गाईचा अवाज कसा आल्हादकारक असतो. त्या गाई आमच्या घराला कल्याण स्थान करोत; म्हणून सभांतूनहि गाईंचें वर्णन करण्यांत येतें. [६]

गाई उत्तम वत्सयुक्त होवोत. त्यांनीं उत्तम गवत खावें, शुद्धस्थानांतील पवित्र पाणी प्यावें. कोणी पापी अथवा चोर त्यांचा स्वामी न होवो, आणि त्या सर्वदा सुरक्षित असोत. [७]

गाय

गाईविषयीं सुंदर काव्य

हें सूक्त म्हणजे गाईविषयीं एक सुंदर काव्यच आहे. इतकें सुंदर वर्णन इतरत्र फार थोड्या ठिकाणीं पहावयास सांपडतें. गाईचें महत्त्व या सूक्तांत अत्यंत सुंदर शब्दांत केलें आहे. जे लोक गाईविषयीं हें काव्य वाचतील त्यांना गाईचें महत्त्व कळेल. गाय घराची शोभा, कुटुंबाचें आरोग्य, बल.आणि पराक्रम, तसेंच कौटुंबिक धन आहे. ही गोष्ट येथें स्पष्ट शब्दांत सांगितली आहे.

गाय घराची शोभा आहे

यासाठीं खालीं दिलेले मंत्र भाग पहा-

(१) गावः भद्रं अक्रन् (मं. १)

(२) गावः भद्रं गृहं कृणुथ (मं. ६)

'गाई घराला कल्याण स्थान करतात.' म्हणजे ज्या घरांत गाई रहातात त्या घराचें कल्याण होतें. ज्या वाचकांस गाईचें महत्त्व समजलें असेल, त्यांना या गोष्टीचा अनुभव येईल.

पुष्टि देणारी गाय

गाय मनुष्याची पुष्टि वाढविणारी आहे, म्हणून प्रत्येक घरांत गाईचा निवास असला पाहिजे. याविषयीं खालील मंत्रभाग पहा—

(१) गावः अस्मे रणयन् । (मं. १)

(२) गावः यूयं कृशं चित् मेदयथ । (मं. ६)

अश्रीरं चित् सुप्रतीकं कृणुथ । (मं. ६)

' गायी आम्हांस रमणीय करोत. कृश मनुष्यास गाई परिपुष्ट करतात, निस्तेजाला सतेज करतात. ' म्हणून घरांत गाय बाळगावी. प्रत्येक मनुष्यानें गाईचें दूध प्यालें पाहिजे. तसेंच तिची उत्तम प्रकारें सेवा केली पाहिजे. प्रत्येक मनुष्याचें तें आवश्यक कर्म आहे.

गायच धन, बळ आणि अन्न आहे

मनुष्यास धन, बळ आणि अन्न गायच देते. सर्व यश गाईमुळें प्राप्त होतें, याविषयीं खालील मंत्र पहा—

(१) गावः भगः । गावः इंद्रः । गावः सोमस्य भक्षः । इमाः याः गावः स इंद्रः । (मं. ५)

' गाई धन आहेत, गाईच इंद्र (बलाची देवता) आहेत, गाईच (दूध देतात म्हणून) अन्न आहेत. ज्या गाई आहेत तोच इंद्र आहे. ' गाईंना धन म्हणण्यांत येतें. महाराष्ट्रांत गाईचें नांव **' धण '** असें आहे. तो धन शब्दाचा अपभ्रंशच आहे. वेदांत धनाची देवता भग आहे. ती गाईच्या रूपानें आमच्याजवळ आली आहे. जे लोक आपल्या घरीं गाय पाळीत अथवा संभाळीत नाहींत ते धनालाच स्वतःच्या घराबाहेर हांकून लावतात असें समजावें.

' इंद्र ' बल, पराक्रम आणि विजयाची देवता आहे. तीच गायरूपानें आमच्या घरांत येते. जे कोणी स्वतःच्या घरांत गाईचें पालन करीत नाहींत ते जणूं काय, पराक्रम, बल आणि विजय यांना पारखे होतात.

अन्नाची देवता सोम आहे. ती गाईच्या रूपानें आम्हांजवळ आली आहे. गाय स्वतः दूध देते, त्यापासून दहीं, ताक, लोणी, तूप इत्यादि अमृतरूपी पदार्थ होतात. बैलाच्या कष्टांनीं अन्न उत्पन्न होतें. याप्रकारें गाय आपल्या अन्नाची व्यवस्था करते. अशा उपयुक्त गाईस जे स्वतःच्या घरांत पाळीत नाहींत, ते अन्नास दूर करतात. जे गाईस पाळीत नाहींत त्यांना दारिद्र्य, निर्बलत्व आणि योग्य अन्नाचा अभाव यांची प्राप्ती होते. यावरून गाय पाळल्यानें काय लाभ होतात, आणि न पाळल्यानें काय हानि होते तें वाचकांच्या ध्यानीं येईल. जर बलवान्, धनवान्, यशस्वी, प्रतापी होण्याची इच्छा असेल तर गाय अवश्य पाळून दररोज तिचें दूध प्यावें.

यज्ञासाठीं गाय

परमेश्वराच्या प्रसन्नतेसाठीं यज्ञ आणि यज्ञाच्या सांगतेसाठीं गाय, आवश्यक आहे. वैदिक धर्मांत जें कांहीं विहित कर्म करण्यांत येतें तें परमात्मा आणि यज्ञ यांच्या नांवानेंच करण्यांत येतें. सर्व कर्मांचें अंतिम फळ मनुष्याची उन्नतीच आहे. पण त्यासाठीं सर्व प्रयत्न ' यज्ञ ' च्या नांवानें होतात. गाईचें दूध तर मनुष्य पितोच, परंतु घरांत गाय यज्ञाच्या सांगतेसाठीं पाळावयाची असते. स्वतःचें पोट भरण्यासाठीं नव्हे. या त्यागाचें शिक्षण वैदिक धर्मांत याप्रमाणें देण्यांत येतें. प्रथम मंत्रांत, उषेच्या पूर्वीं गाय दूध देते आणि त्या दुधानें इंद्रासाठीं यज्ञ होतो, असें जें म्हटलें आहे त्याचा हेतु असा आहे. यज्ञांतील शेष तूप, दूध इत्यादि मनुष्य पितो; परंतु ते भोगाच्या इच्छेनें नव्हे तर प्रसाद म्हणून तें दूध पिण्यांत येते. गाय परमेश्वराच्या यज्ञासाठीं आहे, त्याचा प्रसाद म्हणून दूध पिण्यांत येतें. इतक्या भक्तीनें आणि विश्वासानें जर दूध पिण्यांत आलें, तर तें खरोखर अत्यंत लाभकारक होईल.

या यज्ञानें ' देवसुद्धां मनुष्यासाठीं धन, यश, ज्ञान, इत्यादि देतात. आणि स्वतःजवळ त्याला स्थिरधामांत ठेवतात.' (मं.२)

असें दुसऱ्या मंत्राचें कथन आहे. यज्ञाच्या भावनेनें सर्व कर्में करण्यानें असा लाभ होणें स्वाभाविक आहे. तिसऱ्या मंत्राचें कथन आहे कीं, ' यज्ञासाठीं गाय आहे, म्हणून तिचा नाश होत नाहीं. रोग तिला कष्ट देत नाहींत, चोर तिला चोरीत नाहींत, शत्रु तिला त्रास देत नाहींत, अशा सुरक्षिततावस्थेंत गाय यजमानाजवळ येते. यजमान देवांच्या प्रसन्नतेसाठीं यज्ञ करतात. आणि त्यामुळें त्याच्याजवळ गाईची संख्या वाढते. ' चौथ्या मंत्रांतहि गाईचें वर्णन करण्यांत आलें आहे. घोडा गायीइतका मनुष्यास उपयुक्त नाहीं. गाई स्वयंपाक करणाऱ्याजवळ कधींहि जात नाहींत. त्या गाई स्वतःच्या मालकाच्या देखरेखेखालीं सुरक्षित रहातात आणि आनंदानें हिंडतात.

अवध्य गाय

अशा प्रकारें गाय उपयोगी असल्यानें अवध्य आहे. यांत कांहीं शंका नाहीं. चौथ्या मंत्रांत हीच गोष्ट विशेष स्पष्टतेनें सांगितली आहे. पहा—

तस्य यज्वनः मर्तस्य उरुगायं अभयं ता गावः अनु विचरन्ति । (मं. ४)

' त्या याजक मनुष्याच्या आसपास फारच निर्भयतेनें या गाई फिरतात. ' म्हणजे यज्ञकर्त्या यजमानाजवळ गाई निर्भयतेनें रहातात. तेथें कोणी त्यांना पीडा करूं शकत नाहीं. गाईसाठीं

जर एखादें निर्भय स्थान असलें तर तें यजमानाचें घरच होय. हें वर्णन वाचलें असतां स्पष्ट होईल कीं, यजमान ' गाईस कापून तिच्या मांसाचें हवन करतो ' ही मिथ्या, अगदींच खोटी कल्पना आहे. गोमेधांतहि गोमांस हवनाचा कांहीं संबंध नाहीं. त्यासाठीं याच मंत्राचा तिसरा चरण पहा—

ताः गावः संस्कृतत्रं न अभि उपयन्ति। (मं. ४)

' त्या गायी मांससंस्कार करणाऱ्याच्या जवळ जात नाहींत. ' म्हणजे गाईचें मांस कोणी रांधीत नाहीं. येथें ' **संस्कृतत्र** ' शब्द आहे. ' **संस्कृतः** ' याचा अर्थ आहे उत्तम रीतीनें कापणारा. येथें ' **कृत्** ' धातूचा अर्थ आहे कापणें. कापलेल्या मांसास रांधणाऱ्यासाठीं हा शब्द आहे. ' **संस्कृत+त्र** ' जो पशूला कापतो आणि जो पशूला शिजवितो, गाय त्याच्या वाऱ्यासहि उभी रहात नाहीं. यावरून गोमांसाचा यज्ञांत कधींच संस्कार उपयोग होत नाहीं. गोमांस हवनाचा आणि भक्षणाचा येथें संपूर्ण निषेध आहे. गाई त्यांच्या धन्याच्या संपूर्ण देखरेखीखालीं असतात. त्यामुळें यज्ञांत गोवध, गोमांस हवन अथवा गोमांस संस्कार सुद्धां असंभवनीय आहे. या मंत्रांत या सर्वांचा इतका तीव्र निषेध केला आहे कीं तो पाहिल्यावर वेदांमध्यें गोमेधांत मांसाचा संबंध आहे असें कोणी कधींहि म्हणूं शकणार नाहीं.

उत्तम गवत आणि पवित्र जलपान

यजमान यज्ञासाठीं गाईचें पालन करतो म्हणून तो त्यांच्या रक्षणाची आणि खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था करतो. व्यवस्था कशा प्रकारची करण्यांत येत होती याविषयीं शेवटचा मंत्र पहा—

(गावः) सूयवसे रुशन्तीः ।
सुप्रपाणे शुद्धा अपः पिबन्तीः ॥ (मं. ७)

' गाई उत्तम गवत खावोत आणि उत्तम जलस्थानांतून शुद्ध जल पिवोत. ' त्यानें गाईचें उत्तम पालन होतें. याप्रकारें गोपालनानें गाईचें दूध प्यावयास मिळाल्यानें सर्व वाचक हृष्ट, पुष्ट, बलिष्ठ, यशस्वी, तेजस्वी, प्रतापी आणि दीर्घायुषी होवोत.

गाईचें पालन

गाईचें उत्तम रीतीनें पालन कसें करावयाचें याचें उत्तम प्रात्यक्षिक–उपदेश या मंत्रांत आपणांस पहावयास सांपडतें. ' उत्तम स्थानांतील शुद्ध पाणी गाईंना पाजावें, अशी वेदांची आज्ञा आहे. शुद्ध पाणी असावें आणि तें शुद्ध स्थानांतील असावें. वाचकांनीं ध्यानांत ठेवावें कीं गाय जें कांहीं खाते, पिते त्याचा परिणाम ८।१० तासांत तिच्या दुधावर होतो, असा नियम आहे. पाण्याचा सुद्धां असाच नियम आहे. तें स्वतःच्या स्थानांतील दोष स्वतःबरोबर वाहून नेतें. हिमालयांतून वहात येणारें पाणी रेचक असतें. कित्येक स्थानांतील पाणी बद्ध कोष्ठ करणारें आणि कित्येक ठिकाणचें ताप उत्पन्न करणारें असतें. म्हणून गाईला उत्तम आरोग्यपूर्ण जलस्थानांतील पाणी पाजावें. म्हणजे दुधांत सुद्धां उत्तम गुण येतील आणि दूध पिणाऱ्याला लाभ होईल.

गवताची जमीन चांगली असली पाहिजे. उत्तम जवादि धान्यें पिकलीं पाहिजेत. वाईट ठिकाणांतील उत्पन्न झालेलें वाईट धान्य असूं नये. कित्येक मनुष्यें गाईस इतक्या वाईट वस्तु खाऊं घालतात कीं त्यामुळें दुधांत अनेक दोष निर्माण होतात. गाई मनुष्याचा मळ वगैरेहि खातात. हें सर्व दोष उत्पन्न करणारें आहे. उत्तम गवत आणि शुद्ध पाणी खाऊन पिऊन गायींत जें दूध उत्पन्न होतें, तेंच आरोग्यवर्धक असतें. गाय पाळणाऱ्यांनीं या सर्व गोष्टी विचारांत घ्याव्यात.

वशा गाय

कांड १२, सूक्त ४

(ऋषिः – कश्यपः । देवता – वशा)

द॒दामी॒त्ये॒व ब्रू॑या॒दनु॑ चैना॒मभु॑त्सत । व॒शां ब्र॒ह्मभ्यो॒ याच॑द्भ्य॒स्तत्प्र॒जाव॒दप॑त्यवत् ॥ १ ॥

अर्थ— (**ददामि इति एव ब्रूयात्**) देतों असें म्हणावें, (**च एनां अभुत्सत**) आणि वशा बाबतींत अनुकूल भावना ठेवावी. (**याचद्भ्यः ब्रह्मभ्यः एनां वशां**) मागणाऱ्या ब्राह्मणास ही गाय द्यावी, (**तत् प्रजावत् अपत्यवत्**) तें दान प्रजा आणि संतान देणारें आहे. [१]

भावार्थ– प्रत्येक गृहस्थानें अथवा मनुष्यानें ' मीं दान देतों ' असें म्हटलें पाहिजे. दानासाठीं आणि गाईसाठीं मनांत अनुकूल भाव धारण केला पाहिजे. ज्ञानी मनुष्यानें गाईचें दान केल्यानें दात्याचें भाग्य उत्तम होतें. [१]

प्रजया स वि क्रीणीते पशुभिश्चोप दस्यति । य आर्षेयेभ्यो याचद्भ्यो देवानां गां न दित्सति ॥ २ ॥
कूटयास्य सं शीर्यन्ते श्लोणया काटमर्दति । बण्डया दह्यन्ते गृहाः काणया दीयते स्वम् ॥ ३ ॥
विलोहितो अधिष्ठानाच्छक्नो विन्दति गोपतिम् । तथा वशायाः संविद्यं दुरदभ्ना ह्युच्यसे ॥४॥
पदोरस्या अधिष्ठानाद्विक्लिन्दुर्नाम विन्दति । अनामनात्सं शीर्यन्ते या मुखेनोपजिघ्रति ॥ ५ ॥
यो अस्याः कर्णावास्कुनोत्या स देवेषु वृश्चते । लक्ष्म कुर्व इति मन्यते कनीयः कृणुते स्वम् ॥६॥
यदस्याः कस्मै चिद्भोगाय बालान्कश्चित्प्रकृन्तति । ततः किशोरा म्रियन्ते वत्सांश्च घातुको वृकः ॥७॥
यदस्या गोपतौ सत्या लोम ध्वाङ्क्षो अजीहिडत् । ततः कुमारा म्रियन्ते यक्ष्मो विन्दत्यनामनात् ॥८॥

अर्थ-- (यः याचद्भ्यः आर्षेयेभ्यः देवानां गां न दित्सति) जो दान मागणाऱ्या ऋषीला देवांची गाय देत नाहीं, (सः प्रजया विक्रीणीते) तो स्वतःच्या संततीला विकतो. (पशुभिः च उपदस्यति) पशूंसह अपकीर्तीला प्राप्त होतो. [२]

(कूटया अस्य संशीर्यन्ते) शिंगाशिवायच्या पशूंत दुर्लाह अशीं दान न करणारीं मनुष्यें मारलीं जातील, आणि (श्लोणया काटं अर्दति) लंगड्यालुलयाकडून सुद्धां ते खाड्यांत पडतील. (बण्डया गृहाः दह्यन्ते) विकल गाईकडून त्याचें घर जाळलें जाईल आणि (काणया स्वं दीयते) एक डोळयाची काणी गायसुद्धां त्याच्या धनाचा नाश करून टाकील. [३]

(विलोहितः शक्नः अधिष्ठानात् गोपतिं विन्दति) गाईच्या कंजूष धन्याला गाईच्या शेणानें रक्तज्वर येतो, (तथा वशायाः संविद्यं) असें गाईचें नांव आहे. (हि दुरदभ्ना उच्यसे) त्या कारणानें तिचें दमन करणें कठिण आहे, असें म्हणतात. [४]

(अस्याः पदोः अधिष्ठानात्) त्या गाईच्या पाय ठेवण्याच्या जागीं (विक्लिन्दुः नाम विन्दति) विक्लिंदु नांवाचा रोग होतो. (याः मुखेन उपजिघ्रति) जांचा मुखानें वास घेतला असतां (अनामनात् संशीर्यन्ते) न जाणतां क्षीण होत जाऊन मृत्यु पावतात. [५]

(यः अस्याः कर्णौ आस्कुनोति) जे या गाईच्या कानांना दुःख देतात, (स देवेषु आवृश्चते) ते जणूं काय प्रत्यक्ष देवावर आघात करतात, जो गाईवर (लक्ष्म कुर्वे इति मन्यते) चिन्ह करतो असें समजतो तो (स्वं कनीयः कृणुते) स्वतःचें धन कमी करतो. [६]

(यत् कश्चित् कस्मैचित् भोगाय) जो कोणी भोगविषयासाठीं (अस्याः बालान् प्रकृन्तति) या गाईच्या वासरांना कापतो, त्यामुळें (ततः किशोराः म्रियते) त्याचीं बालकें मरतात. (वृकः वत्सान् च घातुकः) लांडगा बालकांचा घात करतो. [७]

(यत् अस्याः सत्याः गोपतौ) गाईसह गाईचे रक्षक बरोबर असतांना सुद्धां (ध्वाङ्क्षः लोम अजीहिडत्) कावळा गाईला जर टोंचील तर (ततः कुमाराः म्रियन्ते) त्याचीं बालकें मरतात. आणि (अनामनात् यक्ष्मः विन्दति) तो क्षयरोगांत सहजासहजीं सांपडतो. [८]

भावार्थ— विद्वानांची मागणी असतांहि जो दान करीत नाहीं त्याला कष्ट प्राप्त होतात. [२]

जेथें भीतीचा संभव असत नाहीं तेथूनहि त्यास भय प्राप्त होतें. [३]

गाईच्या शेणानें रक्तज्वर उत्पन्न होऊन तो त्या कंजुस मालकाचा नाश करतो, म्हणजे अनेक व्याधि त्याला सतावतात; म्हणून गाईबद्दल नेहमीं आदर ठेवला पाहिजे. कारण कीं गाईचा अपमान क्षमा करण्यासारखा नाहीं. [४]

गाईच्या पायांत विक्लिंदु नांवाचा रोग पसरतो. गाय ज्याचा वास घेते त्याला रोग होतो आणि तो मरतो. [५]

गाईच्या कानांवर चिन्हें करण्यानें तिला ज्या वेदना होतात त्यामुळें गाईच्या स्वामीचें धन कमी होतें. [६]

जो कोणी मनुष्य स्वतःच्या शोभेसाठीं गाईचें केस कापील त्याचीं मुलेबाळें मरून जातील. [७]

गोपालक रक्षण करीत असतांहि जर गाईला कावळा त्रास देईल तर त्या गोपालकाची मुलेंबाळें मरतील. [८]

यदस्याः पल्पूलनं शकृद्दासी समस्यति । ततोऽपरूपं जायते तस्मादव्येष्यदेनसः ॥ ९ ॥
जायमानाभि जायते देवान्त्सब्राह्मणान्वशा । तस्माद्ब्रह्मभ्यो देयैषा तदाहुः स्वस्य गोपनम् ॥१०॥
य एनां वनिमायन्ति तेषां देवकृता वशा । ब्रह्मज्येयं तदब्रुवन्य एनां निप्रियायते ॥ ११ ॥
य आर्षेयेभ्यो याचद्भ्यो देवानां गां न दित्सति । आ स देवेषु वृश्चते ब्राह्मणानां च मन्यवे ॥१२॥
यो अस्य स्याद्वशाभोगो अन्यामिच्छेत तर्हि सः । हिंस्ते अदत्ता पुरुषं याचितां च न दित्सति ॥१३॥
यथा शेवधिर्निहितो ब्राह्मणानां तथा वशा । तामेतदच्छायन्ति यस्मिन्कस्मिंश्च जायते ॥१४॥

अर्थ- (यत् अस्याः पल्पूलनं शकृत्) त्या गाईचें मूत्र आणि शेण (दासी समस्यति) दासी फेंकून देते तीं (ततः) त्यामुळें (तस्मात् एनसः अ-व्येषत्) त्या पापांतून न सुटल्यामुळें, (अपरूपं जायते) विरूप होते. [९]

(जायमाना वशा स-ब्राह्मणान् देवान् अभिजायते) उत्पन्न होतांच गाय ब्राह्मणांसह देवासाठीं होते. (तस्मात् एषा ब्रह्मभ्यः देया) म्हणून ती गाय ब्राह्मणाला दिली पाहिजे. (तत् स्वस्य गोपनं आहुः) ती आपणांकडून चांगल्या प्रकारें रक्षिली गेली असें म्हटलें जातें. [१०]

(ये एनां वनिं आयन्ति) जे ब्राह्मण ही गाय मागावयास येतात (तेषां देवकृता वशा) त्यांच्यासाठीं ती गाय देवांनीं उत्पन्न केली आहे. (यः एनां नि प्रियायते) आणि जो स्वतःच्या प्रियजनांसाठीं ती स्वतःपाशींच ठेवतो, म्हणजे दान करीत नाहीं (तत् ब्रह्मज्येयं अब्रुवन्) तें त्याचें कृत्य ब्राह्मणांवर अत्याचार करण्यासारखें होईल. [११]

(यः याचद्भ्यः आर्षेयेभ्यः) जो मागणाऱ्या ऋषिपुत्रांना (देवानां गां न दित्सति) देवांची गाय देत नाहीं, (सः ब्राह्मणानां मन्यवे) तो ब्राह्मणांच्या कोपामुळें (देवेषु आवृश्चते) देवांना आघात पोहोंचवितो. [१२]

(यः अस्य वशाभोगः स्यात्) गाईचा जो उपयोग करावयाचा आहे, (सः तर्हि अन्यां इच्छेत) तर त्यानें दुसरी गाय आणावी. (अदत्ता पुरुषं हिंस्ते) गाईचें दान न केलें तर ती पुरुषाची हिंसा करते. (याचितां न च दित्सति) जो मागितली असतांहि दान करीत नाहीं. [१३]

(यथा निहितः शेवधिः) ज्याप्रमाणें खजिना सुरक्षित असतो (तथा ब्राह्मणानां वशा) तशीच ही ब्राह्मणांची गाय आहे. (यस्मिन् कस्मिन् च जायते) ती जेथें जन्मली असेल, (एतत् अच्छ आयन्ति) त्याच्याजवळ तो ब्राह्मण गाय पोहोंचवितो. [१४]

भावार्थ- जर गाईची सेवा करणारी स्त्री गाईचें शेण-मूत कोठें वेड्यावांकड्या ठिकाणीं फेंकील तर तिचें रूप बदलून ती कुरूप होईल. [९]

उत्पन्न होणारी गाय ब्राह्मणासाठींच देवांनीं निर्माण केली आहे, म्हणून तिचें दान ब्राह्मणांस द्यावें. त्यामुळें दान करणाराचें रक्षण होतें. [१०]

ब्राह्मण मागण्यास येईल तेव्हां गाईचें दान न करणें हें तिच्यावर अत्याचार करण्यासारखें आहे. कारण देवांनीं त्यासाठींच तिला निर्माण केली आहे. [११]

म्हणून मागितली असतांहि जो ब्राह्मणास गाय देत नाहीं, तो जणूं काय देवावरच आघात करतो. त्यामुळें त्याच्यावर ब्राह्मणांचा कोप आणि देवांचा संताप होतो. [१२]

जर गाईमुळें कोणाचा लाभ होत असेल तर त्यानें तो दुसऱ्या गाईपासून करून घ्यावा; कारण जो मागूनहि गाय देत नाहीं त्याचा नाश करणारी ती होते. [१३]

सुरक्षित खजिन्याप्रमाणें ती गाय ब्राह्मणाचीच आहे. ती कोठेंहि उत्पन्न झाली असली तरी ज्याची असेल तो ती मागावयास येईल. [१४]

स्वमेतदच्छायन्ति यद्वशां ब्राह्मणा अभि । यथैनानन्यस्मिन् जिनीयादेवास्या निरोधनम् ॥१५॥
चरेदेवा त्रैहायणादविज्ञातगदा सती । वशां च विद्यान्नारद ब्राह्मणास्तर्ह्येष्याः ॥१६॥
य एनामवशामाह देवानां निहितं निधिम् । उभौ तस्मै भवाशर्वौ परिक्रम्येषुमस्यतः ॥१७॥
यो अस्या ऊधो न वेदाथो अस्या स्तनानुत । उभयेनैवास्मै दुहे दातुं चेदशकद्वशाम् ॥१८॥
दुरदभ्नैनमा शये याचितां च न दित्सति । नास्मै कामाः समृध्यन्ते यामदत्त्वा चिकीर्षति ॥१९॥
देवा वशामयाचन्मुखं कृत्वा ब्राह्मणम् । तेषां सर्वेषामददद्धेडं न्येति मानुषः ॥२०॥
हेडं पशूनां न्येति ब्राह्मणेभ्योऽददद्वशाम् । देवानां निहितं भागं मर्त्यश्चेन्निप्रियायते ॥२१॥

अर्थ— (यत् ब्राह्मणाः वशां अभि) जर ब्राह्मण गाईजवळ आले तर (एतत् स्वं अच्छ आयन्ति) ते स्वतःच्या धनाजवळच येतात. (अस्याः निरोधनं) त्या गाईला प्रतिबंध करणें जणूं काय (यथा एनान् अन्यस्मिन् जिनीयात्) हें तर दुसऱ्या अर्थी दुःख देण्यासारखें आहे. [१५]

(अविज्ञात-गदा सती आ त्रैहायणात् चरेत् एव) नांवाशिवायची गाय तीन वर्षांची होईपर्यंत मातेबरोबर हिंडत राहो. हे नारद ! (वशां विद्यात् तर्हि ब्राह्मणाः एष्याः) गाय दान देण्यासारखी झाल्यानंतर, त्यासाठीं ब्राह्मणांस शोधावयास जावें. [१६]

(यः देवानां निहितं निधिं एनां अवशां आह) देवांच्या निश्चित खजिन्याप्रमाणें या गाईला न देण्यालायक असें कोणी म्हणेल (तस्मै भवाशर्वौ उभौ परिक्रम्य इषुं अस्यतः) त्याला भव आणि शर्व दोघे घेरून बाण मारतात. [१७]

(यः अस्याः ऊधः अथो उत अस्याः स्तनान् न वेद) जो हिच्या दुग्धाशयाला आणि स्तनांना जाणत नाहीं, (चेत् दातुं अशकत्) तरी जर तो दान देईल तर (उभयेन अस्मै दुहे) ती गाय त्याला दोहींतून दूध देते. [१८]

(याचितां न दित्सति) मागितली असतांहि जो ती गाय ब्राह्मणास देत नाहीं (दुः-अदभ्ना एनं आशये) वश होण्यास मुश्कील होऊन त्याच्यासह रहाते. (अस्मै कामाः न समृध्यन्ते) त्याचे मनोरथ सफळ होत नाहींत. (यां अदत्वा चिकीर्षति) जिचें दान न करतां लाभ मिळवूं इच्छितो. [१९]

(ब्राह्मणं मुखं कृत्वा) ब्राह्मणरूपी मुख करून (देवाः वशां अयाचन्) देव गाईची याचना करतात. (अददत् मानुषः) न देणारा मनुष्य (तेषां सर्वेषां हेडं नि एति) त्या सर्वांच्या क्रोधाचा भोग होतो. [२०]

(मर्त्यः देवानां निहितं भागं निप्रियायते चेत्) मनुष्य देवांचा निश्चित केलेला भाग स्वतःजवळ ठेवील आणि (ब्राह्मणेभ्यः वशां अददत्) ब्राह्मणास गाय देणार नाहीं तर (पशूनां हेडं नि एति) पशूंचा क्रोधसुद्धां त्याच्यावर होतो. [२१]

भावार्थ— ब्राह्मण जी गाय मागतो ती त्याचीच होते; म्हणून ती त्यास दान न देणें हा अपराध होतो. [१५]

तीन वर्षेपर्यंत मालकानें गाय पाळावी आणि तो पावेतों तिला मागावयास कोणीं न आल्यास, सुयोग्य ब्राह्मणाचा तपास करून ती त्याला द्यावी. [१६]

गाय देवांचा खजिना आहे. जो तिचें दान करीत नाहीं त्याचा भव आणि शर्व नाश करतात. [१७]

जो गाईचें दान करतो त्यास भरपूर दूध आदि मिळतें. [१८]

जो मागावयास आला असूनहि ब्राह्मणास गाईचें दान देत नाहीं, त्याच्या घरांत गाय त्याच्या ताब्यांत रहात नाहीं. गाय न देणाऱ्याच्या इच्छा तृप्त होत नाहींत. [१९]

देवांचें मुख ब्राह्मण आहे. ब्राह्मणांच्या मुखानेंच देव मागतात; म्हणून दान न देणारा मनुष्य स्वतःवर देवांचा कोप ओढवून घेतो. [२०]

कोणी मनुष्य देवांच्या या भागाचें ब्राह्मणास दान न करील तर त्याच्यावर पशूंचा क्रोध होतो. [२१]

यदुन्ये शतं याचेयुर्ब्राह्मणा गोपतिं वशाम् । अथैनां देवा अब्रुवन्नेवं ह विदुषो वशा ॥२२॥
य एवं विदुषेऽदत्त्वाथान्येभ्यो ददद्वशाम् । दुर्गा तस्मा अधिष्ठाने पृथिवी सहदेवता ॥२३॥
देवा वशामयाचन्यस्मिन्नग्रे अजायत । तामेतां विद्यान्नारदः सह देवैरुदाजत ॥२४॥
अनपत्यमल्पपशुं वशा कृणोति पूरुषम् । ब्राह्मणैश्च याचितामथैनां निप्रियायते ॥२५॥
अग्नीषोमाभ्यां कामाय मित्राय वरुणाय च । तेभ्यो याचन्ति ब्राह्मणास्तेष्वा वृश्चतेऽददत् ॥२६॥
यावदस्या गोपतिर्नोपशृणुयादृचः स्वयम् । चरेदस्य तावद्गोषु नास्य श्रुत्वा गृहे वसेत् ॥२७॥

अर्थ— (**यत् गोपतिं शतं अन्ये वशां याचेयुः**) जर गाईच्या धन्याजवळ जाऊन दुसरे शंभरजण गाय मागतील तर (**अथ एनां देवाः एवं अब्रुवन्**) याविषयीं देवांनीं असें सांगितलें आहे कीं (**विदुषः वशा ह**) विद्वानाचीच गाय आहे. [२२]

(**यः एवं विदुषे अदत्त्वा**) जो याप्रकारें विद्वानाला गाय न देतां, (**अन्येभ्यः वशां ददत्**) दुसऱ्या कोणा अविद्वानाला गाय देतो, (**तस्मै अधिष्ठाने सह देवता पृथ्वी दुर्गा**) त्याला त्याच्या स्थानीं सर्व देवतांसह पृथ्वी दुःखदायक होते. [२३]

(**यस्मिन् अग्रे अजायत**) ज्यांच्याजवळ प्रथम गाय झाली (**देवाः वशां अयाचन्**) देवांनीं त्याच्याजवळ याचना केली. (**नारदः विद्यात्**) नारदानें जाणावें कीं, (**तां एतां देवैः सह उदाजत**) या गाईची देवांसह उन्नति होते. [२४]

(**ब्राह्मणैः याचितां एनां नि प्रियायते**) ब्राह्मणानें मागणी केल्यानंतरहि जो स्वतःस प्रिय आहे म्हणून स्वतः-जवळ तिला ठेवतो (**वशा पुरुषं अनपत्यं अल्पपशुं कृणोति**) त्याला ती गाय निःसंतान आणि अल्प पशूंनीं युक्त करते. [२५]

(**अग्नी-सोमाभ्यां मित्राय वरुणाय कामाय तेभ्यः**) अग्नि, सोम, मित्र, वरुण आणि काम यांच्यासाठींच (**ब्राह्मणाः याचन्ति**) ब्राह्मण गाईची याचना करतात, म्हणून (**अददत् तेषु आवृश्चते**) न देणारा त्या देवांवर आघात करतो. [२६]

(**यावत् अस्याः गोपतिः**) जों पावेतों त्या गाईचा स्वामी, (**स्वयं ऋचः न उपशृणुयात्**) स्वतः ऋचा ऐकत नाहीं, (**तावत् अस्य गोषु चरेत्**) तोपर्यंत इतर अशा गाईंत त्याची गाय चरो, परंतु (**श्रुत्वा अस्य गृहे न वसेत्**) ऋचा ऐकल्यानंतर त्या घरांत ती राहूं शकत नाहीं. [२७]

भावार्थ— गायीच्या मालकाजवळ गाईची याचना करण्यास शेंकडों लोक येतील, परंतु देवांची आज्ञा आहे कीं विद्वान् ब्राह्मणांनाच गाय द्यावी. [२२]

जो विद्वान ब्राह्मणास गाय न देतां दुसऱ्यास देतो, त्यावर आपत्ति कोसळतात. [२३]

जेथें गाय उत्पन्न होते म्हणजेच देव तिची याचना करतात आणि देवांना ती दिल्यानें सर्वांची उन्नत्ति होते. [२४]

ब्राह्मणानें मागितली तरी जो दान करीत नाहीं, त्यास संतति होत नाहीं आणि त्याच्या जवळ जनावरें सुद्धां फार थोडीं रहातात. [२५]

ब्राह्मण जी गाईची याचना करतो ती केवळ अग्नि इत्यादि देवांसाठींच याचना करतो, स्वतःसाठीं नव्हे; म्हणून ती त्यास न देणें म्हणजे देवांचा अपमान करण्यासारखें आहे. [२६]

जो पावेतों गाईच्या मालकानें मंत्रघोष ऐकला नाहीं तोपर्यंत गाय त्याच्याजवळ राहो. मंत्रघोष ऐकल्यानंतर गाय त्याच्या घरांत राहूं नये. [२७]

यो अस्या ऋचं उपश्रुत्याथ गोष्वचीचरत् । आयुश्च तस्य भूतिं च देवा वृश्चन्ति हीडिताः ॥२८॥
वशा चरन्ती बहुधा देवानां निहितो निधिः । आविष्कृणुष्व रूपाणि यदा स्थाम जिघांसति ॥२९॥
आविरात्मानं कृणुते यदा स्थाम जिघांसति । अथो ह ब्रह्मभ्यो वशा याञ्चयाय कृणुते मनः॥३०॥
मनसा सं कल्पयति तद्देवाँ अपि गच्छति । ततो ह ब्रह्माणो वशामुपप्रयन्ति याचितुम् ॥३१॥
स्वधाकारेण पितृभ्यो यज्ञेन देवताभ्यः । दानेन राजन्यो वशाया मातुर्हेडं न गच्छति ॥३२॥
वशा माता राजन्यस्य तथा संभूतमग्रशः । तस्या आहुरनर्पणं यद् ब्रह्मभ्यः प्रदीयते ॥३३॥
यथाज्यं प्रगृहीतमालुम्पेत्स्रुचो अग्नये । एवा ह ब्रह्मभ्यो वशामग्नय आ वृश्चतेऽददत् ॥३४॥

अर्थ— (**यः अस्याः गोपतिः ऋचः उपश्रुत्य**) जो या गाईचा स्वामी ऋचा ऐकल्यानंतर सुद्धां, (**अथ गोषु अचीचरत्**) गाईत स्वतःच्या गाईस चरूं देतो, (**देवाः हीडिताः तस्य आयुः च भूतिं च वृश्चन्ति**) देव क्रोधित होऊन त्याच्या आयुष्य आणि संपत्तीचा नाश करतात. [२८]

(**वशा बहुधा चरन्ती देवानां निधिः निहितः**) गाय पुष्कळ ठिकाणीं फिरत असते, तो देवांचा सुरक्षित खजिनाच आहे. (**यथा स्थाम जिघांसति**) जेव्हां ती रहाण्याच्या जागेजवळ जाऊं इच्छिते तेव्हां (**रूपाणि आविष्कृणुष्व**) अनेक रूपें प्रगट करते. [२९]

(**यदा स्थाम जिघांसति**) जेव्हां ती रहाण्याच्या स्थानाजवळ येऊं इच्छते तेव्हां (**आत्मानं आविः कृणुते**) स्वतःच स्वतःला प्रगट करते. (**अथो ह ब्रह्मभ्यः याञ्चयाय वशा मनः कृणुते**) ब्राह्मणांच्या याचनेसाठीं ती गाय स्वतःच्या मनांत इच्छा करते. [३०]

ती गाय (**मनसा संकल्पयति**) मनांत संकल्प करते (**तत् देवान् अपि गच्छति**) तो संकल्प देवांजवळ पोहोंचतो. (**ततः ह ब्रह्माणः वशां याचितुं उप प्रयन्ति**) त्यानंतरच ब्राह्मण गाईची याचना करण्यास येतात. [३१]

(**पितृभ्यः स्वधाकारेण**) पितरांसाठीं स्वधाकारानें (**देवताभ्यः यज्ञेन**) देवतांना यज्ञानें, तसेंच (**दानेन**) दानानें (**राजन्यः वशायाः मातुः हेडं न गच्छति**) क्षत्रिय गाईच्या मातेचा क्रोध प्राप्त करीत नाहीं. [३२]

(**वशा राजन्यस्य माता**) गाय क्षत्रियाची माता आहे. (**तथा अग्रशः सं भूतं**) असें प्रथम पासूनच समजलें गेलें आहे. (**यत् ब्रह्मभ्यः प्रदीयते**) जी गाय ब्राह्मणांसाठीं देण्यांत येते (**तस्याः अनर्पणं आहुः**) तें तिचें दान नाहीं कारण कीं ती गाय ब्राह्मणाचीच असते. [३३]

(**यथा अग्नये प्रगृहीतं आज्यं स्रुचः आलुंपेत्**) ज्याप्रमाणें अग्निसाठीं घेतलेलें तूप पळींतून सांडतें (**एवा वशां ब्रह्मभ्यः अददत्**) त्याचप्रमाणें गाय ब्राह्मणांस न देणारा (**अग्नये अवृश्चते**) अग्नीचा अपराधी होतो. [३४]

भावार्थ— मंत्रघोष ऐकल्यावर जर गाईचा मालक तिला स्वतःच्या घरांत ठेवील तर त्याच्यावर देवांचा कोप होईल. [२८]

गाय हा देवांचा सुरक्षित खजिना आहे. जेव्हां ती स्वतःच्या स्थानीं जाऊं इच्छिते तेव्हां ती अनेक भाव प्रगट करते. [२९]

जेव्हां ती गाय स्वस्थानाजवळ जाऊं इच्छिते तेव्हां ती स्वतःचे भाव प्रगट करते. म्हणजे ती स्वतःसाठीं ब्राह्मणांची याचना होवो असा भाव मनांत आणते. [३०]

गाय अशी इच्छा करते कीं ती देवापाशीं पोहोंचावें, देव ब्राह्मणांना प्रेरणा करतात, आणि ब्राह्मण गाय मागण्यासाठीं येतात. [३१]

स्वधाकारानें पितरांची तृप्ति, यज्ञानें देवांची संतुष्टता, आणि दानानें इतरांची तृप्ति होते म्हणून गाईचें दान करण्यानें त्याच्या मातेचा क्रोध क्षत्रियावर होत नाहीं. [३२]

गाय क्षत्रियाची माता समजली जाते, ती ब्राह्मणास देणें हें दान नव्हें, कारण ती ब्राह्मणाचीच असते. [३३]

ज्याप्रमाणें पळींतून अग्निमध्यें तूप पडतें त्याप्रमाणें गाईचें दान न करणारा पडतो. [३४]

*

पुरोडाशवत्सा सुदुघा लोकेऽस्मा उप तिष्ठति । सास्मै सर्वान्कामान्वशा प्रददुषे दुहे ॥३५॥
सर्वान्कामान्यमराज्ये वशा प्रददुषे दुहे । अथाहुर्नारकं लोकं निरुन्धानस्य याचिताम् ॥३६॥
प्रवीयमाना चरति क्रुद्धा गोपतये वशा । वेहतं मा मन्यमानो मृत्योः पाशेषु बध्यताम् ॥३७॥
यो वेहतं मन्यमानोऽमा च पचते वशाम् । अप्यस्य पुत्रान्पौत्रांश्च याचयते बृहस्पतिः ॥३८॥
महदेषाव तपति चरन्ती गोषु गौरपि । अथो ह गोपतये वशाददुषे विषं दुहे ॥३९॥
प्रियं पशूनां भवति यद् ब्रह्मभ्यः प्रदीयते । अथो वशायास्तत्प्रियं यद्देवत्रा हविः स्यात् ॥४०॥
या वशा उदकल्पयन्देवा यज्ञादुदेत्य । तासां विलिप्त्यं भीमामुदाकुरुत नारदः ॥४१॥

अर्थ— (पुरोडाशवत्सा सुदुघा लोके असै उपतिष्ठति) अन्नरूपी वत्स जिच्याजवळ आहे अशी उत्तम दूध देणारी गाय परलोकांत या दात्याजवळ येऊन उभी रहाते. (सा वशा असै प्रददुषे सर्वान् कामान् दुहे) ती गाय या दात्याच्या सर्व कामना पूर्ण करते. [३५]

(यमराज्ये वशा प्रददुषे सर्वान् कामान् दुहे) यमराज्यांत गाय दात्याच्या सर्व कामना पूर्ण करते. (अथ याचितां निरुन्धानस्य नारकं लोकं आहुः) आणि याचना करून सुद्धां न देणाऱ्यासाठीं नरकलोक आहे, असें म्हणण्यांत आलें आहे. [३६]

(प्रवीयमाना वशा गोपतये क्रुद्धा चरति) संतान उत्पन्न करणारी गाय स्वतःच्या धन्यावर क्रोधित होऊन फिरते आणि म्हणते कीं, (मा वेहतं मन्यमानः मृत्योः पाशेषु बध्यतां) मला गर्भपातिनी म्हणणारे मृत्यूच्या पाशानें बांधले जावोत. [३७]

(यः वशां वेहतं मन्यमानः) जो गाईला गर्भपात करणारी समजून (अमा च वशां पचते) घरांत गाईस-गोदुग्ध-शिजवितो, (अस्य पुत्रान् पौत्रान् अपि बृहस्पतिः याचयते) त्याच्या पुत्र आणि पौत्रांना बृहस्पति भीक मागणारे करतो. [३८]

(गोषु गौ चरन्ती अपि) गाईंत गाय चरते तथापि (एषा महत् अवतपति) ती पुष्कळ त्रास देते. (अथो अददुषे गोपतये विषं दुहे) दान न करणाऱ्या स्वामीसाठीं ती जणूं काय विष देते. [३९]

(यत् ब्रह्मभ्यः प्रदीयते) जी ब्राह्मणांस दिली जाते, ती (पशूनां प्रियं भवति) पशूंनाहि हितकारक होते. (अथो वशायाः तत् प्रियं) आणि गाईसाठीं तें प्रिय आहे (यत् देवत्रा हविः स्यात्) जो देवांसाठीं हवि व्हावा. [४०]

(यः वशाः देवाः) ज्या गाईला देवतांनीं (यज्ञात् उदेत्य उदकल्पयन्) यज्ञांत येऊन संकल्पित केली होती, (तासां भीमां विलिप्त्यं नारदः उदाकुरुत) त्यांच्या भयानक अधिक तुपाच्या गाईचा नारदानें अनुभव घेतला. [४१]

भावार्थ— दान दिलेली गाय परलोकांत दात्याच्या सर्वच कामना सफल करते. [३५]
गोदान करणाऱ्याच्या सर्व इच्छा यमराज्यांत सफल होतात, परंतु दान न करणाऱ्यास तर नरकच प्राप्त होतो. [३६]
गाईचा अपमान करणाऱ्यावर गाय कोप करते आणि तो मृत्यूच्या पाशांत बांधला जावो असा शाप देते. [३७]
जो गाईस वंध्या समजून आपल्या घरांत शिजवतो, त्याच्या पुत्र-पौत्रांना परमेश्वर भीक मागावयास लावतो. [३८]
जो गाईचें दान करीत नाहीं त्याच्यासाठीं गाय विष देते. [३९]
गाईचें दान करण्यानें पशूंचें हित होतें, गाईचें हित होतें; कारण गाईपासूनच देवतांसाठीं हवनीय पदार्थ मिळतात. [४०]
यज्ञांतून येऊन सर्व देवांनीं गाईची रचना केली. त्यांत जी अधिक तूप देणारी आहे तिची योग्यता सर्वांत अधिक आहे. [४१]

तां देवा अमीमांसन्त वशेया३मवशेति । तामब्रवीन्नारद एषा वशानां वशतमेति ॥४२॥
कति नु वशा नारद यास्त्वं वेत्थ मनुष्यजाः । तास्त्वा पृच्छामि विद्वांसं कस्या नाश्नीयादब्राह्मणः ॥४३॥
विलिप्त्या बृहस्पते या च सूतवशा वशा । तस्या नाश्नीयादब्राह्मणो य आशंसेत भूत्याम् ॥४४॥
नमस्ते अस्तु नारदानुष्ठु विदुषे वशा । कतमासां भीमतमा यामदत्त्वा पराभवेत् ॥४५॥
विलिप्ती या बृहस्पतेऽथो सूतवशा वशा । तस्या नाश्नीयादब्राह्मणो य आशंसेत भूत्याम् ॥४६॥
त्रीणि वै वशाजातानि विलिप्ती सूतवशा वशा । ताः प्र यच्छेद् ब्रह्मभ्यः सोऽनाव्रस्कः प्रजापतौ ॥४७॥

अर्थ— (**तां देवाः अमीमांसन्त**) त्याविषयीं देवांनीं विचार केला, (**वशा इयं अवशा**) ही गाय आपल्या ताब्यांत ठेवण्यायोग्य नाहीं. (**नारदः तां अब्रवीत्**) नारदानें त्यासाठीं म्हटलें (**एषा वशानां वशतमा इति**) ही गाईंत अधिक वश होण्यासारखी आहे. [४२]

हे नारदा ! (**याः त्वं मनुष्यजाः वेत्थ**) ज्यांना तूं मनुष्यांत उत्पन्न झालेल्या जाणतोस त्या (**कति नु वशा**) गाई किती चांगल्या आहेत. (**त्वा विद्वांसं पृच्छामि**) तुम्हां विद्वानांस मी विचारतों (**कस्याः अब्राह्मणः न अश्नीयात्**) कोणाचें अब्राह्मण अतिथीनें खाऊं नये ? [४३]

हे बृहस्पते ! (**यः भूत्या आशंसेत**) जो ऐश्वर्य इच्छितो, तो (**विलिप्त्याः या च सूतवशा वशा**) जी जास्त तूप देणारी, तसेंच नोकरास वश होणारी आणि सर्वांस वश रहाणारी गाय आहे. (**अब्राह्मणः तस्याः न अश्नीयात्**) अब्राह्मणानें तिचें अन्न खाऊं नये. [४४]

हे नारदा ! (**ते नमः अस्तु**) तुला नमस्कार असो. (**अनुष्ठु विदुषे वशा**) अनुकूलतेनें विद्वानास गाईचें दान केलें पाहिजे. (**आसां कतमा भीमतमा**) यांच्यांत कोणती भयानक आहे (**यां अदत्त्वा पराभवेत्**) जिचें दान न केलें असतां पराभव होतो ? [४५]

हे बृहस्पते ! (**या विलिप्ती अथो सूतवशा वशा**) जी जास्त तूप देणारी, नोकरास वश असणारी आणि सर्वांना वश राहणारी गाय आहे (**अब्राह्मणः तस्याः न अश्नीयात्**) अब्राह्मणानें तिचें अन्न खाऊं नये. (**यः भूत्यां आशंसेत**) जो ऐश्वर्य आणि समृद्धीची इच्छा करतो त्यानें. [४६]

(**त्रीणि वै वशाजातानि विलिप्ती सूतवशा वशा**) गाईच्या तीन जाति आहेत. एक अधिक तूप देणारी, दुसरी गवळ्यास वश असणारी, तिसरी सर्वांस वश असणारी. (**ताः यः ब्रह्मभ्यः प्रयच्छेत्**) त्या जो ब्राह्मणांना देतो (**सः प्रजापतौ अनाव्रस्कः**) तो प्रजापतीपाशीं निरपराधी ठरतो. [४७]

भावार्थ— देवांनीं निश्चय केला कीं ती गाय मालकाच्या ताब्यांत रहाण्यायोग्य नाहीं, कारण ती उत्कृष्ट गाय आहे, म्हणून ती दान करण्यासच योग्य आहे. [४२]

मनुष्याजवळ ज्या गाई असतात. त्यांतून कोणत्या गाईचें अन्न अब्राह्मणानें न खावें ? [४३]

तेव्हां असें ठरविलें कीं जी जास्त तूप देणारी, सर्वदा वश रहाणारी, नोकराच्या ताब्यांत रहाणारी, या तीन प्रकारच्या गाई दान करण्यासाठीं योग्य, म्हणून त्यांचें अन्न त्यांच्या अब्राह्मण मालकानें खाऊं नये. [४४]

ज्या गाईचें दान न केल्यानें अधिक हानी होण्याचा संभव आहे ती गाय कोणती ? [४५]

गाईच्या तीन जाती आहेत. एक अधिक तूप देणारी, दुसरी सर्वांना वश रहाणारी आणि तिसरी नोकरास वश रहाणारी. या तीन प्रकारच्या गाई आहेत. कीं ज्यांचें अन्न–दूध–दुभतें गाईच्या मालकानें खाऊं नये. मालकानें या गाईचें दान ब्राह्मणास द्यावें, म्हणजे तो निर्दोष होतो. [४६–४७]

एतद्वो ब्राह्मणा हविरिति मन्वीत याचितः । वशां चेदेनं याचेयुर्या भीमाददुषो गृहे ॥४८॥
देवा वशां पर्यवदन्न नोऽदादिति हीडिताः । एताभिर्ऋग्भिर्भेदं तस्माद्वै स पराभवत् ॥४९॥
उतैनां भेदो नाददाद्वशामिन्द्रेण याचितः । तस्मात्तं देवा आगसोऽवृश्चन्नहमुत्तरे ॥५०॥
ये वशाया अदानाय वदन्ति परिरापिणः । इन्द्रस्य मन्यवे जाल्मा आ वृश्चन्ते अचित्त्या ॥५१॥
ये गोपतिं पराणीयाथाहुर्मा ददा इति । रुद्रस्यास्तां ते हेतिं परि यन्त्यचित्त्या ॥५२॥
यदि हुतां यद्यहुताममा च पचते वशाम् । देवान्त्सब्राह्मणानृत्वा जिह्मो लोकान्निर्ऋच्छति ॥५३॥

अर्थ— हे ब्राह्मण हो ! (एतद् वः हविः) हा तुमचा हवि आहे. (इति याचितः मन्वीत) असें याचना करणाऱ्यास गाईच्या मालकानें सांगावें. (वशां चेत् एनं याचेयुः) गाईची जेव्हां याच्याजवळ याचना करण्यांत येते तेव्हां (या भीमा अददुषः गृहे) अदात्याच्या घरांत ठेवणें भयंकर आहे. [४८]

(नः न अदात् इति हीडिताः देवाः) आम्हांस यानें ती दिली नाहीं म्हणून क्रोधित झालेले देव (वशां) गाईला (एताभि ऋग्भिः भेदं पर्यवदन्) या मंत्रांनीं भेदाविषयीं सांगूं लागले (तस्मात् वै सः पराभवत्) त्या कारणानें त्याचा पराभव झाला. [४९]

(उत एनां वशां इंद्रेण याचितः भेदः) आणि ही गाय इंद्रानें मागितली असतांहि भेदानें (न अददात्) दिली नाहीं (तस्मात् आगसः देवाः तं अहमुत्तरे अवृश्चन्) त्या पापासाठीं देवांनीं त्यास युद्धांत कापून टाकलें. [५०]

(ये परिरापिणः वशायाः अदानाय वदन्ति) जे दुष्ट लोक गाईचें दान न करण्याची भाषा बोलतात, ते (जाल्माः अचित्या इन्द्रस्य मन्यवे आवृश्चन्ते) दुष्ट मनुष्य कमी बुद्धिमुळें इंद्राच्या क्रोधासाठीं कापले जातात. [५१]

(ये गोपतिं पराणीय) जे गायीच्या धन्यास दूर घेऊन जाऊन (अथ आहुः मा दाः इति) सांगतात कीं दान देऊं नकोस (ते अचित्या रुद्रस्य अस्तां हेतिं परि यन्ति) ते अजाणतेपणीं रुद्रानें फेंकलेल्या शस्त्राला बळी पडतात. [५२]

(यदि हुतां यदि अहुतां) जो हवन केलेल्या अथवा न केलेल्या (वशां अमा च पचते) गाईच्या दुधाला स्वतःच्या घरांत तापवतो, तो (स ब्राह्मणान् देवान् ऋत्वा) ब्राह्मणांसह देवांचा अपराधी होऊन (जिह्मः) कुटिल होऊन (लोकात् निर्ऋच्छति) या लोकांतून पतन पावतो. [५३]

भावार्थ— मागणाऱ्यास गाईच्या मालकानें म्हणावें, ' हे ब्राह्मण हो ! हें तुमचें अन्न आहे. ' मागूनहि जो ती देत नाहीं त्याच्या घरांत ती गाय भयंकर हानी करते. [४८]

गाईचें दान न करण्यानें देव क्रोधित होऊन त्याच्या घरांत भेद उत्पन्न करतात, आणि त्यामुळें त्याचा पराजय होतो. [४९]

गाईची याचना केली असतां जो देत नाहीं, त्याच्या राज्यांत भेद उत्पन्न होतो आणि त्यामुळें त्याचा पराजय होतो. [५०]

जो गाय न देण्याविषयीं दुसऱ्यास उपदेश करतो, त्याचा सुद्धां इंद्राच्या क्रोधानें नाश होतो. [५१]

जीं मनुष्यें गाईच्या मालकास दूर घेऊन जाऊन दान न करण्याचा उपदेश करतात, त्यांचा रुद्राच्या शस्त्रानें नाश होतो. [५२]

जो गाईच्या दुधास घरांत शिजवितो, त्याच्यावर देवांचा क्रोध होतो, आणि त्यामुळें त्याचें पतन होतें. [५३]

वशवर्ती गाय

कांड १०, सूक्त १०

(ऋषिः – कश्यपः । देवता – वशा ।)

नमस्ते जायमानायै जाताया उत ते नमः । बालेभ्यः शफेभ्यो रूपायाघ्न्ये ते नमः ॥१॥
यो विद्यात्सप्त प्रवतः सप्त विद्यात्परावतः । शिरो यज्ञस्य यो विद्यात्स वशां प्रति गृह्णीयात् ॥२॥
वेदाहं सप्त प्रवतः सप्त वेद परावतः । शिरो यज्ञस्याहं वेद सोमं चास्यां विचक्षणम् ॥३॥
यया द्यौर्यया पृथिवी ययापो गुपिता इमाः । वशां सहस्रधारां ब्रह्मणाच्छावदामसि ॥४॥
शतं कंसाः शतं दोग्धारः शतं गोप्तारो अधि पृष्ठे अस्याः ।
ये देवास्तस्यां प्राणन्ति ते वशां विदुरेकधा ॥५॥
यज्ञपदीराक्षीरा स्वधाप्राणा महीलुका । वशा पर्जन्यपत्नी देवाँ अप्येति ब्रह्मणा ॥ ६ ॥
अनु त्वाग्निः प्राविशदनु सोमो वशे त्वा । ऊधस्ते भद्रे पर्जन्यो विद्युतस्ते स्तना वशे ॥ ७ ॥

अर्थ— हे (**अघ्न्ये**) हनन करण्यास अयोग्य गाई ! (**ते जायमानायै नमः**) उत्पन्न होण्याच्या समयीं तुला नमस्कार असो. (**उत जातायै नमः**) उत्पन्न झालेल्या तुला नमस्कार असो. (**ते बालेभ्यः शफेभ्यः रूपाय नमः**) तुझे केस, रोम आणि रूप यांना नमस्कार असो. [१]

(**यः सप्त प्रवतः विद्यात्**) जो सात जीवन-प्रवाह जाणतो, (**यः च सप्त परावतः विद्यात्**) आणि जो सात अंतरांना-स्थानांना जाणतो, तसेंच जो (**यज्ञस्य शिरः विद्यात्**) यज्ञाचें शिर जाणतो, त्यानेंच (**वशां प्रति गृह्णीयात्**) वशा गाईचा स्वीकार करावा. [२]

(**अहं सप्त प्रवतः वेद**) मीं सात जीवन प्रवाहांना-प्राणांना जाणतों, (**सप्त परावतः वेद**) सात इंद्रिय-स्थानांना जाणतों. (**यज्ञस्य शिरः च अहं वेद**) यज्ञाचें शिर-यज्ञाचें मुख्य साध्य सुद्धां मीं जाणतों. (**अस्यां विचक्षणं सोमं च वेद**) यांत विशेष चमकणाऱ्या सोमास सुद्धां मीं जाणतों. [३]

(**यथा द्यौः पृथिवी इमा आपः च गुपिताः**) ज्यानें द्युलोक, पृथ्वी आणि सर्व जलांचें संरक्षण केलें आहे, त्या (**सहस्रधारां वशां**) हजारों अमृतधारा देणाऱ्या वशा गाईला (**ब्रह्मणा अच्छा वदामसि**) ज्ञानद्वारा उत्तम प्रकारें प्रदर्शित करतों, तिची प्रशंसा करतों. [४]

(**अस्याः अधिपृष्ठे**) तिचें रक्षण करण्यासाठीं तिच्या पाठीवर (**शतं दोग्धारः शतं कंसाः**) शंभर मनुष्यें दूध काढणारीं, शंभर उत्तम पात्रें घेऊन, बरोबर (**शतं गोप्तारः**) शंभर रक्षकसुद्धां तिच्याबरोबर हिंडतात. (**ये देवाः तस्यां प्राणन्ति**) जे देव त्या गाईमुळें जीवित आहेत (**ते एकधा वशां विदुः**) ते एकमतानें गाईचें महत्त्व उत्तम प्रकारें जाणतात. [५]

(**यज्ञपदी आक्षीरा**) यज्ञांत जिला स्थान प्राप्त झालें आहे, जी दूध देते, (**स्वधाप्राणा महीलुका**) अन्न-रूप प्राणास धारण करणारी असल्यामुळें या पृथ्वीवर जी प्रसिद्ध आहे, ती (**पर्जन्यपत्नी वशा**) वृष्टिमुळें गवत वगैरे उत्पन्न होऊन जिचें भरण-पोषण होतें, ती गाय (**ब्रह्मणा देवान् अप्येति**) ब्रह्मरूप अन्नद्वारें देवांना प्राप्त करते. [६]

हे (**वशे**) गाई ! (**त्वा अग्निः अनुप्रविशत्**) तुला अग्नि प्राप्त झाला आहे, (**सोमः अनु**) सोम सुद्धां प्राप्त झाला आहे. हे (**भद्रे**) कल्याण करणाऱ्या गाई ! (**ते ऊधः पर्जन्यः**) तुझें दुग्धस्थान पर्जन्यच आहे. हे वशा गाई ! (**ते स्तना विद्युतः**) तुझे स्तन विद्युत् आहे. (या प्रकारें अग्न्यादि देवतांची शक्ति तुझ्यांत आहे.) [७]

अपस्त्वं धुक्षे प्रथमा उर्वरा अपरा वशे । तृतीयं राष्ट्रं धुक्षेऽन्नं क्षीरं वशे त्वम् ॥ ८ ॥
यदादित्यैर्हूयमानोपातिष्ठ ऋतावरि । इन्द्रः सहस्रं पात्रान्त्सोमं त्वापाययद्वशे ॥ ९ ॥
यदनूचीन्द्रमैरात्त्व ऋषभोऽह्वयत् । तस्मात्ते वृत्रहा पयः क्षीरं क्रुद्धोऽहरद्वशे ॥ १० ॥
यत्ते क्रुद्धो धनपतिरा क्षीरमहरद्वशे । इदं तदद्य नाकस्त्रिषु पात्रेषु रक्षति ॥ ११ ॥
त्रिषु पात्रेषु तं सोममा देव्यहरद्वशा । अथर्वा यत्र दीक्षितो बर्हिष्यास्त हिरण्यये ॥ १२ ॥
सं हि सोमेनागत समु सर्वेण पद्वता । वशा समुद्रमध्यष्ठाद्गन्धर्वैः कलिभिः सह ॥ १३ ॥
सं हि वातेनागत समु सर्वैः पतत्रिभिः । वशा समुद्रे प्रानृत्यदृचः सामानि बिभ्रती ॥ १४ ॥
सं हि सूर्येणागत समु सर्वेण चक्षुषा । वशा समुद्रमत्यख्यद्भद्रा ज्योतींषि बिभ्रती ॥ १५ ॥
अभीवृता हिरण्येन यदतिष्ठ ऋतावरि । अश्वः समुद्रो भूत्वाध्यस्कन्दद्वशे त्वा । ॥ १६ ॥

अर्थ- हे (**वशे**) वशा गाई ! (**त्वं प्रथमा अपः धुक्षे**) तूं सर्व प्रथम पाणी देतेस, (**अपरा उर्वरा**) त्यानंतर फलद्रूप जमिनीला धान्य देतेस, (**तृतीयं राष्ट्रं धुक्षे**) तिसरी राष्ट्रशक्ति देतेस. (**त्वं अन्नं क्षीरं**) तूं अन्न आणि दूध-खीर देतेस. [८]

हे (**वशे**) गाई ! हे (**ऋतावरि**) दूधरूपी अन्न देणाऱ्या गाई ! (**यत् आदित्यैः हूयमाना**) जेव्हां तूं आदित्यांकडून शक्ति प्राप्त करून (**उपातिष्ठः**) जवळ येतेस तेव्हां (**इंद्रः सहस्रं पात्रान्**) इंद्र हजारों भांडीं घेऊन (**त्वा सोमं पाययत्**) तुला सोमरस पाजतो. [९]

हे (**वशे**) गाई ! (**यत् अनुचीः इन्द्रं ऐः**) जेव्हां तूं अनुकूलतेनें इन्द्रास प्राप्त होतेस, (**त्वा ऋषभः आत् अह्वयत्**) तेव्हां वृषभ तुला जवळून बोलावतो. हे वशा गाई ! (**तस्मात् क्रुद्धः वृत्रहा**) त्यामुळें क्रोधित झालेला इंद्र (**ते पयः क्षीरं अहरत्**) तुझें दूध आणि पाणी हरण करतो. [१०]

हे वशा गाई ! (**यत् क्रुद्धः धनपतिः**) जेव्हां क्रोधित झालेला धनपति (**ते क्षीरं अहरत्**) तुझें दूध घेतो, तेव्हां जणूं काय (**इदं तत् अद्य**) तो हा आज (**नाकः त्रिषु पात्रेषु रक्षति**) स्वर्गधामच सोमाच्या रूपानें तीन भांड्यांत ठेवतो. [११]

(**यत्र दीक्षितः अथर्वा**) जेथें दीक्षा घेतलेला अथर्ववेदी यज्ञकर्ता (**हिरण्यये बर्हिषि आस्ते**) सुवर्णमय आसनावर बसतो, (**तं**) त्याच्याजवळ (**त्रिषु पात्रेषु सोमं**) तीन पात्रांत ठेवलेला सोम (**वशा देवी अहरत्**) देवी वशा गाय घेऊन जाते. (दूध रूपानें पोहोंचविते.) [१२]

(**वशा सोमेन सं अगत**) गाय सोम औषधीस प्राप्त झाली, आणि (**सर्वेण पद्वता सं उ**) सर्व पाय असणाऱ्या मनुष्यांस सुद्धां प्राप्त झाली. (**वशा कलिभिः गंधर्वैः सह**) ती गाय कलह करणाऱ्या गंधर्वांसह (**समुद्रं अध्यष्ठात्**) समुद्रावर अधिष्ठान करते. (अर्थात् समुद्रावर सुद्धां गाईचा मान, मनुष्यांत आहे तसाच आहे.) [१३]

(**वशा ऋचः सामानि बिभ्रती**) गाय यज्ञांत ऋचा आणि सामाला धारण करून (**वातेन सं अगत**) वायुसह संमत होऊन (**सर्वैः पतत्रिभिः हि सं**) सर्व पाय असणाऱ्यांशीं मिळून (**समुद्रे प्रानृत्यत्**) समुद्रावर नाचूं लागली. (या प्रकारें गाईचा सन्मान सर्वत्र होतो.) [१४]

(**वशा सूर्येण सं अगत**) गाय सूर्याशीं मिळाली आहे. (**सर्वेण चक्षुषा सं उ**) सर्व डोळे असणाऱ्यांशीं मिळाली आहे. (**भद्रा वशा ज्योतींषि बिभ्रती**) कल्याण करणारी गाय अनेक तेजें धारण करून (**समुद्रं अत्यख्यत्**) समुद्रावर पाहूं लागली. (दूरपर्यंत तिची प्रतिष्ठा पोंहोचली आहे. [१५]

हे (**ऋतावरि**) अन्न देणाऱ्या गाई ! (**हिरण्येन अभीवृता यत् अतिष्ठः**) जेव्हां सुवर्णाच्या अलंकारांनीं भूषित होऊन तूं उभी असतेस, हे (**वशे**) गाई ! (**त्वा अधि समुद्रः अश्वः भूत्वा अस्कन्दत्**) समुद्र तुझ्या जवळ अश्व होऊन आला. (असें तुझें महत्त्व आहे.) [१६]

तद्भद्राः समगच्छन्त वशा देष्ट्र्यथो स्वधा । अथर्वा यत्र दीक्षितो बर्हिष्यास्त हिरण्यये ॥ १७ ॥
वशा माता राजन्यस्य वशा माता स्वधे तव । वशाया यज्ञ आयुधं ततश्चित्तमजायत ॥ १८ ॥
ऊर्ध्वो बिन्दुरुदचरद्ब्रह्मणः ककुदादधि । ततस्त्वं जज्ञिषे वशे ततो होताजायत ॥ १९ ॥
आस्नस्ते गाथा अभवन्नुष्णिहाभ्यो बलं वशे । पाजस्याज्जज्ञे यज्ञ स्तनेभ्यो रश्मयस्तव ॥ २० ॥
ईर्माभ्यामयनं जातं सक्थिभ्यां च वशे तव । आन्त्रेभ्यो जज्ञिरे अत्रा उदरादधि वीरुधः ॥ २१ ॥
यदुदरं वरुणस्यानुप्राविशथा वशे । ततस्त्वा ब्रह्मोदह्वयत्स हि नेत्रमवेत्तव ॥ २२ ॥
सर्वे गर्भादवेपन्त जायमानादसूस्वः ।
ससूव हि तामाहुर्वशेति ब्रह्मभिः क्लृप्तः स ह्यस्या बन्धुः ॥ २३ ॥
युध एकः सं सृजति यो अस्या एक इद्वशी । तरांसि यज्ञा अभवन्तरसां चक्षुरभवद्वशा ॥ २४ ॥

अर्थ— (यत्र दीक्षितः अथर्वा) ज्या यज्ञांत दीक्षित अथर्ववेदी (हिरण्यये बर्हिषि आस्ते) सुवर्णमय आसनावर बसतो, तेथें (भद्राः समगच्छन्त) भद्र पुरुष एकत्रित झाले आणि तेथें (वशा देष्ट्री अथो स्वधा) दान देणारी गाय स्वतः अन्नरूपानें उपस्थित झाली. [१७]

(राजन्यस्य माता वशा) क्षत्रियाची माता गाय आहे, हे (स्वधे) अन्ना ! (तव माता वशा) तुझी मातासुद्धां गायच आहे. (वशायाः आयुधं यज्ञे) गाईतून शस्त्र निर्माण झालें आहे. आणि (ततः चित्तं अजायत) त्यामधून चित्त निर्माण झालें. (म्हणजे गाईपासून बल आणि बुद्धि दोन्हीं उत्पन्न होतात.) [१८]

(ब्रह्मणः ककुदादधि) ब्रह्माच्या उच्च भागांतून (बिन्दुः उर्ध्वः उदचरत्) एक बिन्दु वर येऊन पडला. हे (वशे) गाई ! (ततः त्वं जज्ञिषे) त्यातून तूं उत्पन्न झालीस, आणि (ततः होता अजायत) त्याच्या मागाहून होता– हवनकर्ता उत्पन्न झाला. (अर्थात् गाईत ब्रह्मशक्ति अधिक आहे कारण ती प्रथम उत्पन्न झाली आहे.) [१९]

हे (वशे) गाई ! (ते आस्नः गाथाः अभवन्) तुझ्या मुखांतून गाथा निघाल्या, (उष्णिहाभ्यः बलं) तुझ्या गळ्याच्या भागांतून बल उत्पन्न झालें, (पाजस्यात् यज्ञः जज्ञे) तुझ्या दुग्धाशयांतून यज्ञ उत्पन्न झाला, आणि (तव) तुझ्या (स्तनेभ्यः रश्मयः) स्तनांतून किरणें झालीं. (या प्रकारें गाईतून हें सर्व उत्पन्न झालें, असें गाईचें माहात्म्य आहे. [२०]

(तव ईर्माभ्यां) तुझ्या बाहूंनीं तसेंच (सक्थिभ्यां अयनं जातं) पायांनीं गमन होतें. हे (वशे) गाई ! तुझ्या (आन्त्रेभ्यः अत्राः) आंतड्यातून अनेक पदार्थ आणि (उदरात् वीरुधः) पोटांतून वनस्पति उत्पन्न झाल्या आहेत. [२१]

हे (वशे) गाई ! (यत् वरुणस्य उदरं) जो वरुणाच्या उदरांत तूं (अनु प्रविशथाः) प्रविष्ट झाली आहेस (ततः ब्रह्मा त्वा उत् अह्वयत्) तेव्हां ब्रह्मयानें तुला आह्वान केलें होतें. (सः हि तव नेत्रं अवेत्) तो तुझ्या नेत्रांस जाणतो. म्हणजे ज्ञानी पुरुष गाईचें महत्त्व जाणतो. [२२]

(असूस्वः जायमानात्) प्रसूत होण्यास असमर्थ अशा गाईच्या (गर्भात् सर्वे अवेपन्त) गर्भवती स्थितींत सर्व कांपूं लागतात, (तां आहुः वशा ससूव इति) तिला म्हणतात कीं ही गाय प्रसवासाठीं असमर्थ आहे. (सः हि ब्रह्मभिः अस्याः बन्धुः क्लृप्तः) त्याच ब्राह्मणांनीं त्याला तिचा भाऊ मानलें आहे. [२३]

(एकः युधः संसृजति) एक योद्धा व्यवस्थेसाठीं उत्पन्न करतो. (यः अस्याः इत् वशी एकः) जो त्या गाईला एकटाच वश करणारा आहे. (यज्ञाः तरांसि अभवन्) यज्ञाला पार करणारे आहेत. आणि (तरसां चक्षुः वशा अभवत्) पार होणाऱ्यांचा डोळा गाय होते. (गाईच्या सहाय्यानें सर्व लोक दुःखांतून पार उतरतात. [२४]

वशा यज्ञं प्रत्यगृह्णाद्वशा सूर्यमधारयत् । वशायामन्तरविशदोदनो ब्रह्मणा सह ॥ २५ ॥
वशामेवामृतमाहुर्वशां मृत्युमुपासते । वशेदं सर्वमभवद्देवा मनुष्या३ असुराः पितर ऋषयः॥ २६ ॥
य एवं विद्यात्स वशां प्रति गृह्णीयात् । तथा हि यज्ञः सर्वपाद्दुहे दात्रेऽनपस्फुरन् ॥ २७ ॥
तिस्रो जिह्वा वरुणस्यान्तर्दीद्यत्यासनि । तासां या मध्ये राजति सा वशा दुष्प्रतिग्रहा ॥ २८ ॥
चतुर्धा रेतो अभवद्वशायाः । आपस्तुरीयममृतं तुरीयं यज्ञस्तुरीयं पशवस्तुरीयम् ॥ २९ ॥
वशा द्यौर्वशा पृथिवी वशा विष्णुः प्रजापतिः । वशाया दुग्धमपिबन्त्साध्या वसवश्च ये ॥ ३० ॥
वशाया दुग्धं पीत्वा साध्या वसवश्च ये । ते वै ब्रध्नस्य विष्टपि पयो अस्या उपासते ॥ ३१ ॥
सोममेनामेके दुह्रे घृतमेक उपासते । य एवं विदुषे वशां ददुस्ते गतास्त्रिदिवं दिवः ॥ ३२ ॥
ब्राह्मणेभ्यो वशां दत्त्वा सर्वाँल्लोकान्त्समश्नुते । ऋतं ह्यस्यामार्पितमपि ब्रह्माथो तपः ॥ ३३ ॥

अर्थ— (**वशा यज्ञं प्रत्यगृह्णात्**) वशा गाय यज्ञ स्वीकारते, (**वशा सूर्यं अधारयत्**) वशा गाय सूर्यास धारण करते. (**वशायां ओदनः अविशत्**) गाईंत भात-अन्न दाखल होतें आणि तें (**ब्रह्मणा सह**) ज्ञानासह दाखल झालें आहे. गाईच्या आधारानें यज्ञ, अन्न आणि ज्ञान सुरक्षित आहे. [२५]

(**देवाः वशां अमृतं आहुः**) देव गाईस अमृत म्हणतात, (**वशां मृत्युं उपासते**) गाईला मृत्यु जाणून उपासना करतात, (**वशा इदं सर्वं अभवत्**) गाय हेंच सर्व कांहीं आहे; म्हणजे (**देवाः मनुष्याः असुराः पितरः ऋषयः**) देव, मनुष्य, राक्षस, पितर आणि ऋषि वशेचेंच रूप आहेत. [२६]

(**यः एवं विद्यात्**) जो हें तत्त्वज्ञान जाणतो (**सः वशां प्रतिगृह्णीयात्**) त्यानें वशा गाईचें दान घ्यावें. तसेंच वशा गाईच्या दात्याला (**यज्ञः सर्वपात् अनपस्फुरन् दुहे**) यज्ञ सर्व प्रकारें सफळ होऊन विचलित न होतां सुयोग्य फळ देतो. [२७]

(**वरुणस्य आसानि अन्तः तिस्रः जिह्वाः**) वरुणाच्या मुखांतून तीन जिभा (**दीद्यति**) चमकतात. (**तासां मध्ये या राजति**) त्यांत मध्यें जी विशेष चमकते (**सा वशा**) ती वशा गायच, म्हणून ती (**दुष्प्रतिग्रहा**) दानांत स्वीकारण्यास कठीण आहे. [२८]

(**वशायाः रेतः चतुर्धा अभवत्**) वशा गाईचें वीर्य चार प्रकारें विभक्त झालें आहे. (**आपः तुरीयं**) पाणी चौथ्या भागाचें आहे, (**अमृतं तुरीयं**) चौथा भाग अमृत आहे, (**यज्ञः तुरीयं**) यज्ञ चौथा भाग आणि (**पशवः तुरीयं**) पशु हे चौथा भाग झाले. हे सर्व वशेचें चार प्रकारचें वीर्य होत. [२९]

(**वशा द्यौः**) वशा द्युलोक आहे, (**वशा पृथिवी**) वशाच पृथ्वी आहे (**वशा प्रजापतिः विष्णुः**) वशाच प्रजापालक विष्णु आहे. (**ये साध्याः वसवः च**) जे साध्य आणि वसु आहेत, ते (**वशायाः दुग्धं अपिबन्**) वशा गाईचें दूध पितात. [३०]

(**ये साध्याः वसवः च**) जे साध्य आणि वसु आहेत, ते (**वशायाः दुग्धं पीत्वा**) वशा गाईचें दूध पिऊन नंतर (**ते वै ब्रध्नस्य विष्टपि**) ते स्वर्गस्थानांत (**अस्याः पयः उपासते**) तिच्या दुधास प्राप्त करतात. [३१]

(**एनां सोमं एके दुह्रे**) हिच्यांतून पुष्कळांनीं सोमाचें दोहन केलें आहे. (**एके घृतं उपासते**) कित्येक तिच्यांतून तुपाची प्राप्ति करतात, (**यः एवं विदुषे वशां ददुः**) जो या प्रकारें विद्वानास गाईचें दान करतो (**ते दिवः त्रिदिवं गताः**) ते स्वर्गलोकांत जातात. [३२]

(**ब्राह्मणेभ्यः वशां दत्त्वा**) ब्राह्मणांस वशा गाय देऊन (**सर्वान् लोकान् सं अश्नुते**) सर्व लोकांस प्राप्त करतात. (**अस्य ऋतं ब्रह्म अथो तपः हि अर्पितम्**) त्यांत ऋत, ज्ञान, तप आश्रय घेतात. [३३]

वशां देवा उप जीवन्ति वशां मनुष्या उत । वशेदं सर्वमभवद्यावत्सूर्यो विपश्यति ॥ ३४ ॥

(देवाः वशां उपजीवन्ति) देवता वशा गाईवर उपजीविका करतात, (उत मनुष्याः वशां) आणि मनुष्य सुद्धां वशा गाईवर जिवंत रहातात. (वशा इदं सर्वं अभवत्) वशा गायच सर्व कांहीं झाली आहे (यावत् सूर्यः विपश्यति) जेथपावेतो सूर्याचा प्रकाश पोहोंचतो. [३४]

वशावर्ती गाय

गाय

या सूक्तांत गाईचें वर्णन आहे. गाईचें दान घेण्यास अधिकारी कोण, याविषयीं २ ऱ्या मंत्रांतील सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. जो यज्ञाचें तत्त्व जाणतो, त्यानेंच गाईचें दान घ्यावें; गाय स्वतःच्या उपभोगासाठीं नव्हे पण यज्ञासाठीं घ्यावयाची आहे. हें जो जाणतो त्यासच गाय दान द्यावी आणि त्यानेंच ती स्वीकारावी. (मं. १-३)

या सूक्तांतील गाईचें नांव वशा आहे. जी सुखानें दोहूं देते तिचें नांव वशा. दुसरी ' सूतवशा ' आहे म्हणजे जी नोकरांना वश रहाते; इतर गाई वश रहात नाहींत. वशा गाय सर्वांत उत्तम, कारण तीं शिंगें अथवा लाथ मारत नाहीं, आणि केव्हांहि दूध येतें.

संपूर्ण पृथ्वी तसेंच आप या सर्वांचें रक्षण ही गाय करते. सहस्रधारांनीं दूध देऊन ही गाय सर्वांचें रक्षण करते. (मं. ४)

गाईचा उत्सव

जी उत्तमांत उत्तम गाय असते तिचा महोत्सव करण्यांत येतो. गाईस पुढें चालवितात आणि शंभर मनुष्यें पात्रें घेऊन तिच्यापाठीं चालतात. शंभर दोहन करणारीं माणसें तिच्या मागून चालतात. आणि शंभर गोरक्षक तिचें रक्षण करण्यासाठीं गोपाळ्या रूपानें चालतात. गायीमागें याप्रमाणें ३०० मनुष्यें मोठ्या आनंदानें चालतात. (मं. ५) वाजंत्रीं वाजविण्यांत येतात आणि सर्व नगरांत हा उत्सव मोठ्या धामधूमीनें करण्यांत येतो. यद्द्वारां गाईच्या दुधानें सर्वांना उत्तम जीवन मिळतें, म्हणून चांगल्या गाईचा याप्रकारें वार्षिकोत्सव मोठ्या आनंदानें आणि उत्साहानें करण्यांत येतो.

गाईला ' यज्ञपदी ' म्हणजे यज्ञाचा आधार म्हणतात, कारण तिच्या दुधा-तुपानें यज्ञ होतात. पावसानें गवत निर्माण होऊन या गाईचें भरण-पोषण, रक्षण होतें. (मं. ६) गाय सोमवल्ली खाते. त्याचें दूध होतें. तें दूध प्याल्यानें मनुष्यास सोमाचें बळ मिळतें. दूध, दही, तूप, हे जिन्नस गाईपासून मिळतात परंतु बैल शेतीच्या कामीं येतो. त्याच्यापासून सर्व राष्ट्राचें रक्षण होतें. याप्रकारें गाय सर्वांचें पोषण करते. (मं. ७-१७)

गाय क्षत्रियांची माता आहे, अन्नाचीहि तीच माता आहे. (मं. १८) ब्रह्माच्या विशेष शक्तींतून गाईची उत्पत्ति झाली आहे. (मं. १९) गाईच्या अवयवांस विशेष बळ प्राप्त होतें, त्यानें संपूर्ण विश्वाचें धारण होतें, गाय यज्ञाचेंच रूप आहे. (मं. २०-२५).

गाय अमृत धारण करते. जे मरणाच्या मार्गावर असतात ते गाईची उपासना करून दीर्घजीवी होतात. गायच सर्व कांहीं आहे. देव, मानव, असुर, पितर आणि ऋषि, गाईच्या दुधानें पुष्ट होतात. (मं. २६) या प्रकारचें सर्व ज्ञान ज्याला असेल त्यानेंच वशेचें दान स्वीकारावें. (मं. २७)

(मं. २८) वरुणराजाची जीभ ज्याप्रमाणें तेजस्वी असते, कोणी त्याचा विरोध करूं शकत नाहीं, तसेंच वशा गाईचें दान घेणें कठिण असतें. अज्ञानी मनुष्य असें दान घेऊं शकत नाहीं. (मं. २९) विश्वात्म्याचें वीर्य चार वस्तूंत वाटलें आहे. त्यांतील एक भाग वशाच्या रूपानें प्रगट झाला आहे, बाकी तीन भाग यज्ञ, जल आणि पशूंच्या रूपानें प्रगट होतात.

साध्य, वसु आदि देव वशानें दूध पिऊनच सिद्धीस प्राप्त झाले. वशा गायच पृथ्वीवर भूमि, द्यौ आणि प्रजापतिचें कार्य करीत राहिली आहे. (मं. ३०-३१) हें सर्व ज्ञान जो जाणतो अशा ब्राह्मणाला गाईचें दान देऊन स्वर्ग प्राप्त करता येतो. (मं. ३२।३३)

वशा गाईमुळें देव स्वतःची उपजीविका करतात. गाईच्या दुधावर मनुष्यसुद्धां जगूं शकतो. सूर्य जेथपर्यंत प्रकाशतो तेथपर्यंत तें वशाचेंच रूप आहे असें समजाना. इतकें गाईचें महत्त्व आहे. वाचकांनीं या प्रकारें गाईचें महत्त्व जाणून गोपालन तसेंच गोसंवर्धन करून स्वतःला पुष्टि प्राप्त करून घ्यावी आणि दीर्घायु होऊन यशस्वी व्हावें.

ब्राह्मणची गाय

कांड १२, सूक्त ५

(ऋषिः - अथर्वाचार्यः । देवता - ब्रह्मगवी ।)

श्रमेण तपसा सृष्टा ब्रह्मणा वित्तर्ते श्रिता ॥ १ ॥
सत्येनावृता श्रिया प्रावृता यशसा परीवृता ॥ २ ॥
स्वधया परिहिता श्रद्धया पर्यूढा दीक्षया गुप्ता यज्ञे प्रतिष्ठिता लोको निधनम् ॥ ३ ॥
ब्रह्म पदवायं ब्राह्मणोऽधिपतिः ॥ ४ ॥
तामाददानस्य ब्रह्मगवीं जिनतो ब्राह्मणं क्षत्रियस्य ॥ ५ ॥
अप क्रामति सूनृता वीर्यं१ पुण्या लक्ष्मीः ॥ ६ ॥

[२]

ओजश्च तेजश्च सहश्च बलं च वाक्चेन्द्रियं च श्रीश्च धर्मश्च ॥ ७ ॥
ब्रह्म च क्षत्रं च राष्ट्रं च विशश्च त्विषिश्च यशश्च वर्चश्च द्रविणं च ॥ ८ ॥
आयुश्च रूपं च नाम च कीर्तिश्च प्राणश्चापानश्च चक्षुश्च श्रोत्रं च ॥ ९ ॥
पयश्च रसश्चान्नं चान्नाद्यं चर्तं च सत्यं चेष्टं च पूर्तं च प्रजा च पशवश्च ॥ १० ॥
तानि सर्वाण्यप क्रामन्ति ब्रह्मगवीमाददानस्य जिनतो ब्राह्मणं क्षत्रियस्य ॥ ११ ॥

अर्थ— (श्रमेण तपसा सृष्टा) श्रम आणि तपानें उत्पन्न झालेली (ब्रह्मणा वित्ता) ज्ञानानें प्राप्त झालेली आणि (ऋते श्रिता) सत्याच्या आश्रयानें राहिलेली आहे. [१] (सत्येन आवृता) सत्यानें आच्छादिलेली (श्रिया प्रावृता) श्रीनें भरपूर आणि (यशसा परीवृता) यशानें घेरलेली आहे. [२] (स्वधया परिहिता) स्वतःच्या धारणेनें सुरक्षित झालेली (श्रद्धया पर्यूढा) श्रद्धाभक्तीनें युक्त (दीक्षया गुप्ता) दीक्षा व्रतानें सुरक्षित झालेली (यज्ञे प्रतिष्ठिता) यज्ञांत प्रतिष्ठित झालेली आणि (लोके निधनं) या लोकांत आश्रयास प्राप्त झालेली आहे. [३] जो (ब्रह्म पदवायं) ज्ञानरूपी पदसमूह आहे त्याचा (अधिपतिः ब्राह्मणः) स्वामी ब्राह्मण आहे. [४] (तां ब्रह्मगवीं आददानस्य) त्या ब्राह्मणाच्या गाईस घेणाऱ्या (ब्राह्मणं जिनतः क्षत्रियस्य) ब्राह्मणाचा नाश करणाऱ्या क्षत्रियाची [५] (सुनृता वीर्यं पुण्या लक्ष्मीः अपक्रामति) सत्य, वीर्यशाली, पुण्यमयी लक्ष्मी दूर हाते. [६]

[२] ओज, तेज, (सहः) सहन करण्याची शक्ति, बल, वाणी, इंद्रियशक्ति, (श्रीः) शोभा, धर्म [७] (ब्रह्म) ज्ञान, (क्षत्रं) शौर्य, राष्ट्र, (विश) प्रजा, (त्विषिः) तेज, यश, (वर्चः) पराक्रम, (द्रविणं) धन, [८] आयुष्य, रूप, नांव, कीर्ति, प्राण, अपान, चक्षु श्रोत्र [९] दूध, रस, अन्न (अन्नाद्यं) खाद्य पदार्थ, ऋत, सत्य, (इष्टं च पूर्तं च) इष्टवस्तु, पूर्णत्व, प्रजा, पशु, [१०] (तानि सर्वाणि) हे सर्व ३४ पदार्थ (ब्रह्मगवीं आददानस्य ब्राह्मणं जिनतः क्षत्रियस्य अपक्रामन्ति) ब्राह्मणाची गाय हिरावून नेणाऱ्या आणि ब्राह्मणाचा नाश करणाऱ्या क्षत्रियापासून दूर होतात. [११]

[३]

सैषा भीमा ब्रह्मगव्य१घविषा साक्षात्कृत्या कूल्बजमावृता ॥ १२ ॥
सर्वाण्यस्यां घोराणि सर्वे च मृत्यवः ॥ १३ ॥
सर्वाण्यस्यां क्रूराणि सर्वे पुरुषवधाः ॥ १४ ॥
सा ब्रह्मज्यं देवपीयुं ब्रह्मगव्यादीयमाना मृत्योः पड्वीश आ द्यति ॥ १५ ॥
मेनिः शतवधा हि सा ब्रह्मज्यस्य क्षितिर्हि सा ॥ १६ ॥
तस्माद्वै ब्राह्मणानां गौर्दुराधर्षा विजानता ॥ १७ ॥
वज्रो धावन्ती वैश्वानर उद्वीता ॥ १८ ॥
हेतिः शफानुत्खिदन्ती महादेवो३पेक्षमाणा ॥ १९ ॥
क्षुरपविरीक्षमाणा वाश्यमानाभि स्फूर्जति ॥ २० ॥
मृत्युर्हिङ्कृण्वत्यु१ग्रो देवः पुच्छं पर्यस्यन्ती ॥ २१ ॥
सर्वज्यानिः कर्णौ वरीवर्जयन्ती राजयक्ष्मो मेहन्ती ॥ २२ ॥
मेनिर्दुह्यमाना शीर्षक्तिर्दुग्धा ॥ २३ ॥
सेदिरुपतिष्ठन्ती मिथोयोधः परामृष्टा ॥ २४ ॥
शरव्या३ मुखेऽपिनह्यमान ऋतिर्हन्यमाना ॥ २५ ॥

---

[३] (सा एषा ब्रह्मगवी भीमा) ती ही ब्राह्मणाची गाय भयानक आहे. ती (अघ-विषा, साक्षात् कृत्या) जहरी आणि साक्षात् घात करणारी, (कूल्बजं आवृता) विनाशक पदार्थांनीं व्याप्त आहे. [१२] (अस्यां सर्वाणि घोराणि) तिच्यांत सर्व प्रकारचा भयंकरपणा आहे. (सर्वे च मृत्यवः) त्यांत सर्व मृत्यु आहेत. [१३] (अस्यां सर्वाणि क्रूराणि) त्यांत सर्व प्रकारचें क्रौर्य आहे, (सर्वे पुरुषवधाः) सर्व पुरुषांचा वध आहे. [१४] (सा ब्रह्मगवी आदीयमाना) या ब्राह्मणाच्या गाईस पकडल्यावर (ब्रह्मज्यं देवपीयुं मृत्योः पड्वीशे आद्यति) ब्रह्मघाती देवशत्रूला मृत्यूच्या पाशांत टाकून देते. [१५] (सा शतवधा मेनिः) ती शंभरांचा घात करणाऱ्या शस्त्राप्रमाणें आहे (सा ब्रह्मज्यस्य क्षितिः हि) ती ब्रह्मघातक्याचा विनाशच आहे. [१६] (तस्मात् वै विजानता ब्राह्मणानां गौः दुराधर्षा) म्हणून ब्राह्मणाची गाय पळवून नेणें कठिण आहे हें ज्ञान्यांनीं समजलें पाहिजे. [१७] (धावन्ती वज्रः उद्वीता वैश्वानरः) ती जेव्हां धांवते तेव्हां वज्र बनते. जेव्हां उठते तेव्हां आगीसारखी होते. [१८] (शफान् उत्खिदन्ती हेतिः) खुरांनीं शस्त्राप्रमाणें मारते, आणि (अपेक्षमाणा महादेवः) पहातांना महादेवासारखी होते. [१९] (ईक्षमाणा क्षुरपविः) सुऱ्याप्रमाणें दृष्टि तीक्ष्ण होते, (वाश्यमाना अभिस्फूर्जति) गर्जना करण्या प्रमाणें अवाज करते. [२०] (हिंकृण्वती मृत्युः) हिंकार केला तर मृत्यु होते, आणि (पुच्छं पर्यस्यन्ती उग्रः देवः) शेंपूट वर केलें असतां उग्र देवतेप्रमाणें भयंकर होते. [२१] (कर्णौ वरीवर्जयन्ती सर्वज्यानिः) कान उभे केल्यानें सर्वांचा नाश करणारी होते, आणि (मेहन्ती राजयक्ष्मः) मूत्र सोडलें असतां क्षयरोग करते. [२२] (दुह्यमाना मेनिः) दुष्टांकडून दोहिली गेल्यास शस्त्र होते, (दुग्धा शीर्षक्तिः) दोहनानंतर मस्तक पीडारूप होते. [२३] (उपतिष्ठन्ती सेदिः) जवळ उभी राहिली तर विनाशक होते आणि (परामृष्टा मिथोयोधः) स्पर्श केला असतां द्वंद्व युद्ध करणाऱ्या शत्रुसारखी होते. [२४] (मुखे अपिनह्यमाने शरव्या) तोंड बांधलें तर बाणाप्रमाणें

अघविषा निपतन्ती तमो निपतिता ॥ २६ ॥
अनुगच्छन्ती प्राणानुप दासयति ब्रह्मगवी ब्रह्मज्यस्य ॥ २७ ॥

[३]

वैरं विकृत्यमाना पौत्राद्यं विभाज्यमाना ॥ २८ ॥
देवहेतिर्ह्रियमाणा व्यृद्धिर्हृता ॥ २९ ॥
पाप्माधिधीयमाना पारुष्यमवधीयमाना ॥ ३० ॥
विषं प्रयस्यन्ती तक्मा प्रयस्ता ॥ ३१ ॥
अघं पच्यमाना दुष्वप्न्यं पक्वा ॥ ३२ ॥
मूलबर्हणी पर्याक्रियमाणा क्षितिः पर्याकृता ॥ ३३ ॥
असंज्ञा गन्धेन शुगुद्ध्रियमाणाशीविष उद्धृता ॥ ३४ ॥
अभूतिरुपाह्रियमाणा पराभूतिरुपहृता ॥ ३५ ॥
शर्वः क्रुद्धः पिश्यमाना शिमिदा पिशिता ॥ ३६ ॥
अवर्तिरश्यमाना निर्ऋतिरशिता ॥ ३७ ॥
अशिता लोकाच्छिनत्ति ब्रह्मगवी ब्रह्मज्यमस्माच्चामुष्माच्च ॥ ३८ ॥

आणि (हन्यमाना ऋतिः) मारलें तर विनाश करणारी होते. [२५] (निपतन्ती अघविषा) बसते तेव्हां भयानक विषरूप आणि (निपतिता तमः) उभी होते तेव्हां साक्षात् मृत्युरूपी अन्धःकारासारखी होते. [२६] (ब्रह्मगवी अनुगच्छन्ती) ब्राह्मणाची गाय (ब्रह्मज्यस्य प्राणान् उपदासयति) ब्राह्मणघातक्यांच्या प्राणांचा नाश करते. [२७]

[४] (विकृत्यमाना वैरं) गाईला कापलें असतां वैर ठेवते आणि (विभज्यमाना पौत्राद्यं) कापून तुकडे केले असतां पुत्रादिकांनां खाणारी होते. [२८] (ह्रियमाणा देवहेतिः) घेऊन जात असतां देवांचें वज्र होते (हृता व्यृद्धिः) हरण केलें असतां विपत्ति होते. [२९] (अधिधीयमाना पाप्मा) काढून ठेवली तर पापासारखी होते आणि (अवधीयमाना पारुष्यं) तिरस्कार केला तर कठोर होते. [३०] (प्रयस्यन्ती विषं) कष्ट दिले असतां विषवत् होते आणि (प्रयस्ता तक्मा) त्रास दिला असतां ज्वर-तापाप्रमाणें होते. [३१] (पच्यमाना अघं) शिजवली तर पापरूप होते आणि (पक्वा दुष्वप्न्यं) शिजवली गेल्यावर दुष्ट स्वप्नासारखी दुःखदायक होते. [३२] (पर्याक्रियमाणा मूलबर्हणी) फार हिंडविलें तर मूळापासून नाश करणारी, आणि (पर्याकृता क्षितिः) अन्न म्हणून वाढली तर विनाश करणारी होते. [३३] (गन्धेन असंज्ञा) वासानें बेहोष करते, (उद्ध्रियमाणा शुक्) उठवली तर शोक उत्पन्न करते, आणि (उद्धृता आशीविषः) उठल्यानंतर सापासारखी होते. [३४] (उपाह्रियमाणा अभूतिः) जवळ केली असतां विपत्ति प्राप्त होते. (उपहृता पराभूतिः) जवळ ठेवली असतां पराजय करते. [३५] (पिश्यमाना क्रुद्धः शर्वः) वाटत असतां क्रोधित रुद्रासारखी आणि (पिशिता शिमिदा) आणि वांटली तर सुखाचा नाश करणारी होते. [३६] (अश्यमाना अवर्तिः) खाल्ली असतां संकटें प्राप्त होतात, (अशिता निर्ऋतिः) खाल्ल्यानंतर अधःपात करणारी होते. [३७] (अशिता ब्रह्मगवी) खाल्लेली ब्राह्मणाची गाय (ब्रह्मज्यं अस्मात् अमुष्मात् च लोकात् छिनत्ति) ब्राह्मणघातक्याला या लोकांतून उखडून परलोकांतून फेंकून देते. [३८]

[५]

तस्या आहननं कृत्या मेनिराशसनं वलग ऊबध्यम् ॥ ३९ ॥
अस्वगता परिह्रुता ॥ ४० ॥
अग्निः क्रव्याद्भूत्वा ब्रह्मगवी ब्रह्मज्यं प्रविश्यात्ति ॥ ४१ ॥
सर्वास्याङ्गा पर्वा मूलानि वृश्चति ॥ ४२ ॥
छिनत्त्यस्य पितृबन्धु परा भावयति मातृबन्धु ॥ ४३ ॥
विवाहां ज्ञातीन्त्सर्वानपि क्षापयति ब्रह्मगवी ब्रह्मज्यस्य क्षत्रियेणापुनर्दीयमाना ॥ ४४ ॥
अवास्तुमेनमस्वगमप्रजसं करोत्यपरापरणो भवति क्षीयते ॥ ४५ ॥
य एवं विदुषो ब्राह्मणस्य क्षत्रियो गामादत्ते ॥ ४६ ॥

[६]

क्षिप्रं वै तस्याहनने गृध्राः कुर्वत ऐलबम् ॥ ४७ ॥
क्षिप्रं वै तस्यादहनं परि नृत्यन्ति केशिनीराघ्नानाः पाणिनोरसि कुर्वाणाः पापमैलबम् ॥ ४८ ॥
क्षिप्रं वै तस्य वास्तुषु वृकाः कुर्वत ऐलबम् ॥ ४९ ॥
क्षिप्रं वै तस्य पृच्छन्ति यत्तदासी३दिदं नु ता३दिति ॥ ५० ॥
छिन्ध्या च्छिन्धि प्र च्छिन्ध्यपि क्षापय क्षापय ॥ ५१ ॥

---

[५] (तस्याः आहननं कृत्या) तिचा वध घात करणारा आहे. (आशसनं मेनिः) तिचे तुकडे करणें वज्रघाता समान आहे; आणि (ऊबध्यं वलगः) तिचें शिजविलेलें अन्न विनाशक होतें. [३९] ती (परिह्रुता अस्वगता) घेऊन जात असतांहि अपणांजवळ रहात नाहीं, म्हणजे आपला घात करते. [४०] (ब्रह्मगवी क्रव्यात् अग्निः भूत्वा ब्रह्मज्यं प्रविश्य अत्ति) ब्राह्मणाची गाय मांसभक्षक अग्नि होऊन ब्राह्मणघातक्यांत प्रवेश करते आणि त्याला खाऊन टाकते. [४१] (अस्य सर्वा अंगा पर्वा मूलानि वृश्चति) याच्या सर्व अंगांस आणि मुळांस सुद्धां कापून टाकते. [४२] (अस्य पितृबन्धु छिनत्ति) याच्या पित्याच्या बंधूंना मारून टाकते आणि (मातृबन्धु परा भावयति) आईच्या भावांचा सुद्धां नाश करते. [४३] (क्षत्रियेण अपुनर्दीयमाना ब्रह्मज्यस्य ब्रह्मगवी) क्षत्रियानें परत न दिलेली ब्राह्मणाची गाय (विवाहान् सर्वान् ज्ञातीन् अपि क्षापयति) क्षत्रियांचे सर्व विवाह आणि सर्व जातीचा नाश करते. [४४] (एनं अवास्तुं अस्वगं अप्रजसं करोति) त्याला घरदाररहित, आश्रयरहित आणि प्रजारहित करते. (अपरापरणः भवति, क्षीयते) तो सहायकाशिवायचा होतो आणि नष्ट होतो. [४५] (यः क्षत्रियः विदुषः ब्रह्मणस्य गां एवं आ दत्ते) जो क्षत्रिय याप्रमाणें ब्राह्मणाची गाय हिरावून घेतो. [४६]

[६] (तस्य आहनने गृध्राः क्षिप्रं वै ऐलबं कुर्वते) त्या दुष्टास मृत्यु येतांच गिधाडें तेथें कोलाहल करतात. [४७] (तस्य आदहनं) त्याच्या जळत्या चितेला पाहून (केशिनीः पाणिना उरसि अघ्नानाः पापं ऐलबं कुर्वाणाः परिनृत्यन्ति) केंस अस्ताव्यस्त करून छाती बडवीत आणि अभद्र शब्द बोलत स्त्रिया इकडे तिकडे नाचत सुटतात. [४८] (तस्य वास्तुषु वृकाः ऐलबं क्षिप्रं कुर्वते) त्याच्या घरांत कोल्हे ओरडूं लागतात. [४९] (क्षिप्रं वै तस्य पृच्छन्ति) लागलीच त्याच्याविषयीं विचारपूस होते, कीं (यत् तत् आसीत्) जसा तो होता, (इदं नु तत् इति) तो हाच आहे काय ? [५०] (छिन्धि अच्छिन्धि प्रच्छिन्धि) त्याला कापा, कापून टाका, त्याचे तुकडे

आददानमाङ्गिरसि ब्रह्मज्यमुप दासय ॥ ५२ ॥
वैश्वदेवी ह्यु१च्यसे कृत्या कूल्बजमावृता ॥ ५३ ॥
ओषन्ती समोषन्ती ब्रह्मणो वज्रः ॥ ५४ ॥
क्षुरपविर्मृत्युर्भूत्वा वि धाव त्वम् ॥ ५५ ॥
आ दत्से जिनतां वर्च इष्टं पूर्तं चाशिषः ॥ ५६ ॥
आदाय जीतं जीताय लोके३ऽमुष्मिन्प्र यच्छसि ॥ ५७ ॥
अघ्न्ये पदवीर्भव ब्राह्मणस्याभिशस्त्या ॥ ५८ ॥
मेनिः शरव्या भवाघादघविषा भव ॥ ५९ ॥
अघ्न्ये प्र शिरो जहि ब्रह्मज्यस्य कृतागसो देवपीयोरराधसः ॥ ६० ॥
त्वया प्रमूर्णं मृदितमग्निर्दहतु दुश्चितम् ॥ ६१ ॥

[७]

वृश्च प्र वृश्च सं वृश्च दह प्र दह सं दह ॥ ६२ ॥
ब्रह्मज्यं देव्यघ्न्य आ मूलादनुसंदह ॥ ६३ ॥
यथायाद्यमसादनात्पापलोकान्परावतः ॥ ६४ ॥
एवा त्वं देव्यघ्न्ये ब्रह्मज्यस्य कृतागसो देवपीयोरराधसः ॥ ६५ ॥
वज्रेण शतपर्वणा तीक्ष्णेन क्षुरभृष्टिना ॥ ६६ ॥

करा, (अपि क्षापय क्षापय) नाश करा, त्याचा नाश करा. [५१] हे (आंगिरसि) अंगरसाच्या शक्ते ! (आददानं ब्रह्मज्यं उपदासय) ब्राह्मणाच्या गाईस हिरावून नेणाऱ्या घातक्याचा नाश कर. [५२] तूं (वैश्वदेवी हि कृत्या) सर्व देवांची विनाशक शक्ति (कूल्बजं आवृता उच्यसे) विनाशिनी आहेस असें म्हटलें जातें. [५३] (ओषन्ती समोषन्ती ब्रह्मणः वज्रः) तापदायक कष्ट देणारी ही ब्राह्मणाची वज्ररूप शक्ति आहे. [५४] (त्वं क्षुरपविः मृत्युः भूत्वा विधाव) तूं वस्त्र्याप्रमाणें तीक्ष्ण होऊन त्याचा मृत्यु घडविण्यास धांवून जा. [५५] (जिनतां वर्चः इष्टं पूर्तं च आशिषः आदत्से) विनाश करणारें तेज, इष्टपूर्तता आणि आशीर्वादास तूं हिरावून घेतेस. [५६] (जीतं आदाय अमुष्मिन् लोके) हिंसक घातकी पुरुषाला धरून परलोकांत (जीताय प्रयच्छसि) त्याच्या घातासाठीं तूं देतेस. [५७] हे (अघ्न्ये) अवध्या गाई ! तूं (ब्राह्मणस्य अभिशस्त्याः पदवीः भव) ब्राह्मणाच्या प्रशंसेनें सर्वांची प्रतिष्ठा करणारी हो. [५८] तूं (मेनिः शरव्या भव) विनाशक शस्त्र हो, (अघात् अघविषा भव) पापापासून पापरूपी हो. हे (अघ्न्ये) अवध्य गाई ! तूं (ब्रह्मज्यस्य कृतागसः देवपीयोः अराधसः शिरः प्रजहि) ब्रह्मघातकी पापी देवनिन्दक अदानी–दान न करणाऱ्या पाप्याचें मस्तक कापून टाक. [५९-६०] (त्वया प्रमूर्णं मृदितं दुश्चितं अग्निः दहतु) तुझ्याकडून मारल्या गेलेल्या, नष्ट, भ्रष्ट झालेल्या दुष्टबुद्धि शत्रूला अग्नि जाळून टाको. [६१]

[७] (वृश्च प्रवृश्च संवृश्च) काप, अजून काप, उत्तम रीतीनें काप, (दह, प्रदह संदह) जाळ, अजून जाळ, संपूर्णपणें जाळ. [६२] हे (अघ्न्ये देवि) अहिंसनीय गाय देवी ! (ब्रह्मज्यं आमूलात् अनुसंदह) ब्रह्मघातक्याला संपूर्ण जाळून टाक. [६३] (यथा यमसदनात् परावतः पापलोकान् अयात्) ज्याप्रमाणें यमसदनांतून पापी लोकांत वाहून जावें (एवा कृतागसः देवपीयोः अराधसः ब्रह्मज्यस्य) या रीतीनें पापी देवशत्रु कृपण

प्र स्कन्धान्प्र शिरो जहि ॥ ६७ ॥
लोमान्यस्य सं छिन्धि त्वचमस्य वि वेष्टय ॥ ६८ ॥
मांसान्यस्य शातय स्नावान्यस्य सं वृह ॥ ६९ ॥
अस्थीन्यस्य पीडय मज्जानमस्य निर्जहि ॥ ७० ॥
सर्वास्याङ्गा पर्वाणि वि श्रथय ॥ ७१ ॥
अग्निरेनं क्रव्यात्पृथिव्या नुदतामुदोषतु वायुरन्तरिक्षान्महतो वरिम्णः ॥ ७२ ॥
सूर्य एनं दिवः प्र णुदतां न्योषतु ॥ ७३ ॥

ब्रह्मघातकी मनुष्याचें (**शिरः स्कन्धान्**) मस्तक आणि खांदे (**शतपर्वणा क्षुरभृष्टिना तीक्ष्णेन वज्रेण प्रजहि**) शंभर अणी असणाऱ्या वस्त्र्यासारख्या धारदार तीक्ष्ण वज्रानें कापून टाक. [६४-६७] (**अस्य लोमानि संछिन्धि**) त्याचे केस कापून टाक. (**अस्य त्वचं वि वेष्टय**) त्याची त्वचा काढ, (**अस्य मांसानि शातय**) त्याचें मांस काप, (**अस्य स्नावानि संवृह**) त्याच्या स्नायूंना चिरडून टाक. (**अस्थीनि पीडय**) त्याच्या हाडांना पीडा दे. (**अस्य मज्जानं निर्जहि**) त्याच्या मज्जांचा नाश कर. (**अस्य सर्वा पर्वाणि विश्रथय**) त्याच्या सर्व सांध्यांना वेगळें कर. [६८-७१] (**एनं क्रव्याद् अग्निः पृथिव्याः नुदतां**) त्याला मांसभक्षक अग्नि पृथ्वीवरून बाहेर काढो. आणि (**उत् ओषतु**) जाळून टाको. (**वायुः महतः वरिम्णः अन्तरिक्षात्**) वायु त्याला अंतरिक्षांतून पुष्कळ दूर नेवो. (**सूर्यः एनं दिवः प्र नुदतां**) सूर्य या द्युलोकांतून त्याला दूर करो आणि (**नि ओषतु**) जाळून टाको. [७२-७३]

ब्राह्मणाची गाय

गाईचें महत्त्व

या आणि या पूर्वीच्या सूक्तांत गाईच्या महत्त्वाचें वर्णन केलें आहे. त्या दृष्टीनें हीं दोन्हीं सूक्तें मनन करण्यासारखीं आहेत. पहिल्या मंत्रांतच सांगितलें आहे कीं (**ददामि इति एव ब्रूयात्**) मीं दान देतों असें यजमानानें म्हणावें. दान करण्यांत संकोच ठेवूं नये. न देण्याविषयीं कांहीं विचार करूं नये. नेहमीं उपकार करण्याचाच विचार मनांत ठेवावा.

ब्राह्मण याचना कां करतात ?

ब्राह्मणाचें घर एकाद्या गुरुकुलासारखें असतें. तेथें अनेक विद्यार्थी असतात. त्यांचें पोषण करणें आणि त्यांस विद्या देणें हें ब्राह्मणाचें कर्तव्य आहे. यज्ञयाग करणें हें सुद्धां त्यांचें कर्तव्य आहे. या सर्वासाठीं विद्वान् ब्राह्मणास गाईची जरुरी असते. या परोपकाराच्या आणि जगदुद्धाराच्या कार्यासाठीं ब्राह्मण गाईची मागणी करतात. आणि इतर मनुष्यें अशा सत्पात्र ब्राह्मणांस गाईचें दान करतात.

गाईचें दान अशा सत्पात्र ब्राह्मणांस स्वतःच करावें. जे तसें करीत नाहींत, मागितली तरी जे गाय देत नाहींत, त्यांच्या हातून अजाणतेपणीं मोठें पाप घडतें. ज्या राष्ट्रांत ब्राह्मणांस दान मागावें लागतें, म्हणजे त्यांना मदत करण्यांत येत नसते, त्या राष्ट्रांत मोठें पाप होतें; कारण सद्ब्राह्मणांच्या विद्याप्रचारानें राष्ट्रांत संस्कृति आणि सभ्यता स्थिर रहाते. अशाप्रकारें विचार केला तर ध्यानीं येईल कीं ब्राह्मणानें गाय मागितली असतांहि दान न करण्यांत केवढें राष्ट्रीय पाप आहे.

दानाचा अधिकारी ब्राह्मण

प्रत्येक ब्राह्मणास मागण्याचा अधिकार नाहीं, आणि गाईचें दान घेण्याचा सुद्धां अधिकार नाहीं. याविषयीं वेदानें दानाला पात्र अशा उत्तम ब्राह्मणाचें लक्षण सांगितलें आहे—

यदन्ये शतं याचेयुर्ब्राह्मणा गोपतिं वशाम् ।
अथैनां देवा अब्रुवन्नेवं ह विदुषो वशा (१२-४-२२)

' शेंकडो ब्राह्मण गाईची याचना करतात परंतु त्यांतून केवळ

विद्वान् ब्राह्मणालाच गाय दिली पाहिजे. ' वेदाचा हा आदेश नेहमींच ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. वाटेल त्या ब्राह्मणास दान घेण्याचा अधिकार असत नाहीं. जो ब्राह्मण विद्वान् असेल त्यालाच दान घेण्याचा अधिकार आहे. येथें वेदानें ब्राह्मण जातीचा पक्षपात केलेला नाहीं. केवळ विद्वान् तत्त्वज्ञानी, आचारसंपन्न ब्राह्मण, जो स्वतःच्या अध्ययन-अध्यापनांत मग्न रहातो, जो स्वतःसाठीं धन कमविण्याचा व्यवसाय करूं शकत नाहीं, जो स्वतःचें जीवन ज्ञानवृद्धीच्या कार्यांतच घालवितो, ज्याच्या सत्संगतींत राहून अनेक विद्यार्थी कृतकृत्य होतात, अशा सुयोग्य विद्वानालाच गाय दिली पाहिजे. हा आदेश सर्व दानांना लागू पडतो, आणि त्यांत विशेषतः गाईच्या दानास विशेष लागू पडतो.

यावरून वाचकांस कळून येईल कीं सद्‌ब्राह्मणांचाच गाईवर अधिकार असतो, आणि असा हा अधिकार ब्राह्मणाचा आहे ही गोष्ट (**देवाः अब्रुवन्**) देवांनीं स्वतःच सांगितली आहे. म्हणून तसें म्हणण्यांत कांहीं पक्षपात नाहीं.

मंत्र २ आणि ३ यांत अशा विद्वान् ब्राह्मणाला गाय न दिल्यानें कशी दुर्गति होते हें सांगितलें आहे. विद्वान् ब्राह्मण राष्ट्रांत नसतील तर ज्ञानवृद्धि होणार नाहीं; आणि राष्ट्रांत ज्ञान नसलें तर सर्व प्रकारची उन्नति होणें असंभवनीयच आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे.

चौथ्या मंत्रांत ' **विलोहित** ' ज्वर आणि पांचव्या मंत्रांत ' **विक्लिन्दु** ' नामक रोगाचें वर्णन आहे. (**या मुखेन उपजिघ्रति**) गाय ज्याचा तोंडानें वास घेते (अथवा चाटते) त्याला हा रोग होतो आणि तो मरतो. या लक्षणावरून तो रोग कोणता हें आजच्या वैद्यांनीं शोधून काढावें. वैद्य आणि पशु वैद्य यांनीं त्याचा शोध करावा.

शेवटच्या मंत्रांत म्हटलें आहे कीं गाईला ओळखण्यास कित्येक मनुष्यें गाईच्या कानावर अथवा शरीरावर, इतर भागावर चिन्हें करतात. ही पद्धति अगदीं वाईट आहे; कारण त्यामुळेंहि गाईला फार क्लेश होतात. गाईला असे क्लेश देणें योग्य नाहीं. गाईस कोणत्याहि प्रकारचे कष्ट न होतां ती नेहमीं आनंदांत, प्रसन्नतेंत राहील अशा प्रकारें ठेवली पाहिजे. गाय जर अशी प्रसन्न राहिली तर तिचे सर्व गुण प्रगट होतात, आणि तीच गाय उत्तम गोरस देते. गोरस मनुष्यमात्रांसाठीं हितकारक आहे.

गाईचें रक्षण

कित्येक मनुष्यें गाईचे केंस कापतात, तसें करणेंहि उचित नाहीं असें ७ व्या मंत्रांत सांगितलें आहे. आठव्या मंत्रांत गाईच्या रक्षणाविषयीं एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे. गोपालक गाईला रानांत चरावयास नेऊन मोकळी सोडतात, आणि स्वतः इतस्ततः भटकत असतात. अशा वेळीं कावळे गाईच्या पाठीवर बसून तिला त्रास देतात. तसें न व्हावें अशी सूचना ८ व्या मंत्रांत दिली आहे. गोपालकानें गाईवर चांगली देखरेख ठेवली पाहिजे. कावळे तिला त्रास देणार नाहींत याची काळजी बाळगली पाहिजे. रघुवंशांत दिलीप राजानें गाईचा सांभाळ कसा केला त्याचें वर्णन आहे. तसा सांभाळ गोपालकानें गाईचा करावा. कोणी जीवजन्तु गाईस पीडा देत नाहींत हें त्यानें लक्ष देऊन पहावें. असें रक्षण करणाऱ्यास उत्तम गुराखी म्हणतात.

शेण आणि मूत्र

नवव्या मंत्रांत गाईचें शेण आणि मूत्र वाटेल तेथें फेंकूं नये अशी वेदाची आज्ञा आहे. एकाद्या चांगल्या जागीं तें सर्व सुरक्षित, एकत्रित करावें, कारण त्याचें जमिनीस उत्तम खत होतें. त्यामुळें धान्य फळें फुलें इत्यादि उत्तम प्राप्त होतात. इकडे तिकडे निरर्थक फेंकून देण्यांत मोठें नुकसान आहे. कोणाहि गृहस्थाच्या घरीं असें न व्हावें असें सांगितलें आहे. तें कोठें तरी फेंकणें पाप (**एनसः**) आहे. त्यामुळें अधःपात होतो, म्हणून असें पाप कोणीं करूं नये.

पुढें दहा ते बारापर्यंतच्या मंत्रांत, गाय ही विद्वान् सदाचारी ब्राह्मणाचीच असते हें पुनः एकदां सांगितलें आहे. ऋषिप्रणालीप्रमाणें आचरण करणाऱ्यालाच तिचें दान देणें योग्य होय.

जे भोग्य पदार्थ गाईपासून प्राप्त होतात त्यांचा विचार दात्यानें गाईचें दान देतांना करूं नये, असें १३ व्या मंत्रांत म्हटलें आहे; कारण त्या वस्तु तर अन्य प्रकारेंहि प्राप्त होऊं शकतात. जर कोणी दाता दान करतांना असा विचार करील कीं, ' अरेरे ! मला हिच्यापासून अमुक प्रकारचें सुख प्राप्त होईल आणि अमुक प्रकारचे भोग प्राप्त होतील, हिचें दान केल्यानें मला असे कष्ट होतील, वगैरे वगैरे ' कोणी दान करणाऱ्यानें असे कंजूष विचार मनांत आणूं नयेत. असे विचार मनांत आणल्यानें दानाचें महत्त्व कमी होतें, दानानें मनास जी उच्चता प्राप्त झालेली असते ती अशा विचारांनीं नाश पावते.

' गाय ही कोणा सत्पात्राचेंच धन आहे,' ही गोष्ट पुनः १६ व्या मंत्रांत सांगितली आहे. गाय तिच्या धन्याजवळ तीन वर्षें रहावी, आणि त्यानंतर तर ती कोणा सुविद्य सत्पात्र ब्राह्मणास देण्यांत यावी. योग्य ब्राह्मण ती मागावयास न आला तर अशा ब्राह्मणाचा तपास करावा परंतु ती कधींहि अयोग्य मनुष्यास दान देऊं नये.

२१ व्या मंत्रांत पुनः दानाचें महत्त्व वर्णिलें आहे. २२ व्या मंत्रांत विद्वान् ब्राह्मणालाच गाईचें दान द्यावें ही गोष्ट पुनः सांगण्यांत आली आहे. शेंकडों अविद्वान् मागतील तरी त्यांस ती देऊं नये. केवळ विद्वानच दान मिळविण्याचा अधिकारी आहे, ही गोष्ट प्रत्येक दान करणारानें ध्यानीं वागवावी. अशाप्रकारें दानें होत रहातील तर जगाचा उद्धार होईल. कुपात्रीं दान दिल्यानें अधोगतीच होते.

२३ व्या मंत्रांत विशेष आग्रहपूर्वक सांगण्यांत आलें आहे कीं कोणी मनुष्य विद्वानास दान न देतां अविद्वानास देईल तर त्याला पुष्कळ दुःख प्राप्त होईल.

त्यानंतरच्या तीन मंत्रांत म्हटलें आहे कीं ब्राह्मण, अग्नि आदि देवतांना गाईच्या दुधातुपानें आहुति देतो आणि अशा प्रकारें देवतांना संतुष्ट करतो, म्हणून ब्राह्मणालाच दान करावें. जर दान न केलें तर यजमान गृहस्थास भारी कष्ट पडतात. ३२ व्या मंत्रापर्यंत ही गोष्ट सांगण्यांत आली आहे.

क्षत्रियाची माता

३३ व्या मंत्रांत ' गाय क्षत्रियाची माता ' आहे, (**वशा राजन्यस्य माता**) असें म्हटलें आहे; म्हणून क्षत्रियांनीं गाईला माता मानून तिचा उचित आदरसत्कार, मानसंमान करावा. कोणी मनुष्य गाईस दुःख देत असला तर तो स्वतःच्या आईस दुःख देत आहे असें समजून त्याला योग्य दंड द्यावा.

नंतर ५३ व्या मंत्रापर्यंत म्हणजे सूक्ताच्या अंतापर्यंत गाईचें दान सुयोग्य ब्राह्मणास द्यावें, दान न करण्याची प्रवृत्ती कोणी मनांत बाळगूं नये, दान दिल्यानें कल्याण आणि न दिल्यानें दुःख होतें असें येथें वर्णन आहे.

या मंत्रांत कित्येक ठिकाणीं गाईचें दान न देतां स्वतःसाठीं ती (**पचते वशा**) शिजवितो ' असें वाक्य आहे. ज्यांना वैदिक भाषेचें ज्ञान नाहीं त्यांस तर असेंच वाटेल कीं, ' हें तर गाईस शिजविणें म्हणजे तिचें मांस शिजविणें सांगितलें आहे.' जे असा अर्थ करतील त्यांस खरा अर्थ समजविण्यासाठीं त्यांची अघटित कल्पना अथवा अनुमान दूर करण्यासाठीं येथें थोडें विवेचन करण्याची आवश्यकता आहे.

वेदांमध्यें एक ' **लुप्ततद्धित** ' प्रक्रिया आहे, त्यामुळें ' गौ ' शब्द गाईपासून उत्पन्न होणाऱ्या सर्व पदार्थांचा वाचक आहे. गाईपासून उत्पन्न होणारें दूध, दहीं, तूप इत्यादि शिजविण्यांत येतें. गाईच्या दुधाची खीर करण्यांत येते. असा अर्थ आहे. अशा प्रकारें ' गौ ' अथवा ' वशा ' शब्दाचा अर्थ दूध, दही, तूप असा होतो. तसाच त्या शब्दाचा अर्थ गाईचें मांस रक्त हाडें, चामडें, केंस, शेण, मूत्र असासुद्धां होतो. आम्हांस तर येथें ' दूध, दही, ताक, तूप ' इत्यादि अर्थ घेणें उचित व योग्य वाटतें. वाचकांनीं या गोष्टीचा विचार करून योग्य अर्थ समजावा.

या सूक्तांत ७ पर्याय (विभाग) आणि ७३ मंत्र आहेत. या सर्व सूक्तांत गाईचें महात्म्य सांगण्यांत आलें आहे. ब्राह्मणाची गाय कोणी हिरावून घेऊं नये, ब्राह्मणास गाईचें दान देण्यांत यावें, जें ब्राह्मणांना म्हणजे विद्वान् ब्राह्मणांना त्रास देतात, त्यांच्या गाईंची चोरी करतात, त्यांचा सर्व नाश होतो इत्यादि वर्णन आहे.

पूर्वी सांगितलेल्या गोष्टींचेंच येथें पुनरावर्तन झालेलें असल्यानें विशेष स्पष्टीकरणाची जरुरी नाहीं. जे वाचक या मंत्रांचा अर्थ वाचतील त्यांना त्याचा आशय सहज ध्यानीं येईल. सर्व वर्णन कविकल्पनेनें पूर्ण आहे, म्हणून त्या दृष्टीनें हें सूक्त पाहिलें पाहिजे.

ब्राह्मणाची गाय

कांड ५, सूक्त १८

(ऋषिः - मयोभूः । देवता - ब्रह्मगवी ।)

नैतां ते॑ दे॒वा अ॑ददु॒स्तुभ्यं॑ नृपते॒ अत्त॑वे । मा ब्रा॑ह्म॒णस्य॑ राजन्य॒ गां जि॑घत्सो अना॒द्याम् ॥ १ ॥

अर्थ— हे राजा ! (**ते देवाः एतां तुभ्यं अत्तवे न ददुः**) त्या देवांनीं ही गाय तुला खाण्यासाठीं दिली नाहीं. हे (**राजन्य**) क्षत्रिया ! (**ब्राह्मणस्य अनाद्यां गां मा जिघत्सः**) ब्राह्मणाची गाय खाण्यास योग्य नाहीं, अशा गाईस खाऊं नकोस. [१]

भावार्थ— हे क्षत्रिया ! हे राजा ! हें सर्व तुझ्याच उपयोगासाठीं परमेश्वरानें तुला दिलेलें नाहीं. ब्राह्मणाची भूमि, गाय वगैरे जे कांहीं असेल ते जबरदस्तीनें हरण करणें तुला योग्य नाहीं. [१]

अक्षद्रुग्धो राजन्यः पाप आत्मपराजितः । स ब्राह्मणस्य गामद्यादद्य जीवानि मा श्वः ॥ २ ॥
आविष्टिताघविषा पृदाकूरिव चर्मणा । सा ब्राह्मणस्य राजन्य तृष्टैषा गौरनाद्या ॥ ३ ॥
निर्वै क्षत्रं नयति हन्ति वर्चोऽग्निरिवारब्धो वि दुनोति सर्वम् ।
यो ब्राह्मणं मन्यते अन्नमेव स विषस्य पिबति तैमातस्य ॥ ४ ॥
य एनं हन्ति मृदुं मन्यमानो देवपीयुर्धनकामो न चित्तात् ।
सं तस्येन्द्रो हृदयेऽग्निमिन्ध उभे एनं द्विष्टो नभसी चरन्तम् ॥ ५ ॥
न ब्राह्मणो हिंसितव्योऽग्निः प्रियतनोरिव । सोमो ह्यस्य दायाद इन्द्रो अस्याभिशस्तिपाः ॥ ६ ॥

अर्थ— (**अक्ष-द्रुग्धः पापः**) जुगारी, पापी (**आत्म-पराजितः राजन्यः**) स्वतःच्या कारणानें पराजित झालेला क्षत्रिय, (**सः ब्राह्मणस्य गां अद्यात्**) तो जर ब्राह्मणाची गाय खाईल तर तो (**अद्य जीवानि, मा श्वः**) आज जीवंत आहे, उद्यां नाहीं. [२]

हे (**राजन्य**) क्षत्रिया ! (**एषा ब्राह्मणस्य गौः अनाद्या**) ही ब्राह्मणाची गाय खाण्यास योग्य नाहीं कारण कीं (**सा चर्मणा आविष्टिता**) ती चामड्यानें झांकलेली (**तृष्टा पृदाकुः इव अघविषा**) तहानेलेल्या सर्पिणी प्रमाणें भयंकर विषानें भरलेली असते. [३]

(**यः ब्राह्मणं अन्नं एव मन्यते**) जो क्षत्रिय ब्राह्मणाला स्वतःचें अन्न समजतो, (**स तैमातस्य विषस्य पिबति**) तो सापाचें विषच पितो. तो अपमानित ब्राह्मण (**क्षत्रं वै निः नयति**) क्षत्रियाला निःशेष करतो, (**वर्चः हन्ति**) तेजाचा नाश करतो, (**आरब्धः अग्निः इव**) पेटलेल्या अग्निप्रमाणें (**सर्वं विदुनोति**) सर्वांचा नाश करतो. [४]

(**यः देवपीयुः धनकामः**) जो देवशत्रु, धनलोभी (**एनं मृदुं मन्यमानः न चित्तात् हन्ति**) या ब्राह्मणास कोमल समजून विचार केल्यावांचून यास मारतो, (**इन्द्रः तस्य हृदये अग्निं सं इन्धे**) इंद्र त्याच्या अंतःकरणांत आग पेटवून देतो. (**उभे नभसी चरन्तं एनं द्विष्टः**) उभय भूलोक आणि द्युलोकांत राहणारे त्याचा द्वेष करतात. [५]

(**प्रियतनोः अग्निः इव**) प्रियतनुरूप अग्निप्रमाणें (**ब्राह्मणः न हिंसितव्यः**) ब्राह्मणाची हिंसा करूं नये. (**सोमः हि अस्य दायादः**) सोम याचा संबंधीं आहे, आणि (**इन्द्रः अस्य अभिशस्ति-पाः**) इंद्र याला शापापासून वांचविणारा आहे. [६]

भावार्थ— जो जुगारांत हरला, जो पापी, दुराचारी आणि आत्मघातकी क्षत्रिय असेल, जो ब्राह्मणाची जमीन आणि गाय इत्यादींचें हरण करून त्याचा उपभोग करील तर तो आज जिवंत असला तरी, उद्यांला तो जिवंत रहाणार नाहीं हें निश्चित आहे. [२]

हे क्षत्रिया ! ब्राह्मणाची भूमि अथवा गाय तुझ्या उपभोगासाठीं नाहीं. जणूं काय चामड्यानें झांकलेली विषानें भरलेली क्रोधी सर्पिणी सारखी ती तुमचा नाश करण्यासाठींच निर्माण झाली आहे. [३]

जो क्षत्रिय विद्वान् ब्राह्मणास स्वतःच्या उपभोगाला योग्य असें समजतो तो जणूं काय सापाचें विष पीत आहे. अशाप्रकारें अपमानित झालेला ब्राह्मण क्षत्रियाचा नाश करतो. त्याचें तेज नष्ट करतो, आणि पेटलेल्या अग्निप्रमाणें सर्व राष्ट्रास तो हलवून सोडतो. [३]

जो क्षत्रिय धनलोभानें देवांचा अन्नभाग स्वतःच खातो, ब्राह्मणांस निर्बल मानून त्यांस त्रास देतो, त्याच्या हृदयांत आग पेटवून इन्द्र त्याचा नाश करतो. सर्व पृथ्वी आणि द्युलोक त्याची निंदा करतात. [५]

ब्राह्मण अग्निप्रमाणेंच आहे, त्याला त्रास देणें योग्य नाहीं; कारण सोम त्याचा संबंधीं आणि इंद्र त्याचा रक्षक आहे. [६]

शतापाष्ठां नि गिरति तां न शक्नोति निःखिदन् ।
अन्नं यो ब्रह्मणां मल्वः स्वाद्व१द्मीति मन्यते ॥ ७ ॥
जिह्वा ज्या भवति कुल्मलं वाङ्नाडीका दन्तास्तपसाभिदिग्धाः ।
तेभिर्ब्रह्मा विध्यति देवपीयून्हृद्बलैर्धनुर्भिर्देवजूतैः ॥ ८ ॥
तीक्ष्णेषवो ब्राह्मणा हेतिमन्तो यामस्यन्ति शरव्यां३ न सा मृषा ।
अनुहाय तपसा मन्युना चोत दूरादव भिन्दन्त्येनम् ॥ ९ ॥
ये सहस्रमराजन्नासन्दशशता उत । ते ब्राह्मणस्य गां जग्ध्वा वैतहव्याः पराभवन् ॥ १० ॥
गौरेव तान्हन्यमाना वैतहव्याँ अवातिरत् । ये केसरप्राबन्धायाश्चरमाजामपेचिरन् ॥ ११ ॥

अर्थ—(**यः मल्वः ब्रह्मणां अन्नं**) जो मलीन पुरुष ब्राह्मणांचें अन्न (**स्वादु अद्मि इति मन्यते**) मोठ्या रुचीनें खातों असें समजतो तो (**शत-अपाष्ठां निगिरति**) शेंकडों प्रकारच्या दुर्गतीला प्राप्त होतो आणि (**निःखिदन् तां न शक्नोति**) तिला प्राप्त करून सहन करूं शकत नाहीं. [७]

ब्राह्मणाची (**जिह्वा ज्या भवति**) जीभ धनुष्याची दोरी होते, (**वाक् कुल्मलं**) वाणी धनुष्याचा दंड होते, (**तपसा अभिदिग्धाः दन्ताः नाडीकाः**) तपानें तीक्ष्ण झालेले दांत बाणरूप होतात. (**ब्रह्मा**) ब्राह्मण (**तेभिः देवजूतैः हृद्बलैः धनुर्भिः**) त्या देव प्रेरित आत्मबळाच्या धनुष्यानें (**देव-पीयून् विध्यति**) देवशत्रूंवर आघात करतो. [८]

(**तीक्ष्ण-इषवः हेतिमन्तः ब्राह्मणाः**) तीक्ष्ण बाणांनीं, अस्त्रांनीं युक्त ब्राह्मण (**यां शरव्यां अस्यन्ति**) जे बाण फेंकतात, (**न सा मृषा**) ते निष्फल होत नाहींत. (**तपसा च उत मन्युना अनुहाय**) तप आणि क्रोधासह पाठलाग करीत (**एनं दूरात् अवभिन्दन्ति**) त्याला दुरूनच वेधून टाकतात. [९]

(**ये वैत-हव्याः सहस्रं अराजन्**) जे देवांचें हव्य-अन्न खाणारे हजारों राजे होऊन गेले (**ये उत दशशताः आसन्**) आणि जे दहाशें होते, (**ते ब्राह्मणस्य गां जग्ध्वा**) ते ब्राह्मणांची गाय खाऊन (**पराभवन्**) पराजय पावले. [१०]

(**हन्यमाना गौः इव**) जिला दुःख देण्यांत आलें आहे त्या गाईनेंच (**तान् वैतहव्यान् अवातिरत्**) त्या देवतांचें अन्न खाणाऱ्यांचा नाश केला आहे. (**ये केसरप्रबन्धायाः चरम-अजां अपेचिरन्**) जे केसाच्या दोरीनें बांधलेल्या शेवटच्या अजास शिजवितात, खाऊन टाकतात. [११]

भावार्थ— जो पापी क्षत्रिय ब्राह्मणाचें धन स्वतःच्या उपभोगासाठीं आहे असें समजतो, आणि असेंहि समजतो कीं मी त्याचा उत्तम उपभोग घेतों, त्याच्यावर शेंकडों आपत्ति येतात आणि त्याचें सामर्थ्यही नष्ट होतें. [७]

अशावेळीं ब्राह्मणाची जीभ ही दोरी, वाणी धनुष्य आणि त्याच्या तपानें युक्त असे दांत बाण होतात. या धनुष्यानें तो ब्राह्मण देवतांचें अन्न खाणाऱ्यांचा नाश करतो. [८]

ते ब्राह्मण फार तीक्ष्ण शस्त्रास्त्रांनीं युक्त असतात. त्यामुळें त्यांनीं तीं अस्त्रें कोणावर टाकलीं तर तीं व्यर्थ जात नाहींत. स्वतः-च्या तप आणि क्रोधानें त्याचा पाठलाग करून दुरूनहि त्याचा नाश करतात. [९]

देवतेसाठीं बाजूस ठेवलेल्या अन्नाचा स्वतःसाठीं उपयोग करणारे शेंकडो राजे ब्राह्मणाची भूमि अथवा गाय हरण करून तिचा स्वतः उपभोग घेतल्यानें पराभूत झाले आहेत. [१०]

ती दुःखी झालेली ब्राह्मणाची गायच त्या देवतांचें अन्न खाणाऱ्या क्षत्रियांचा नाश होण्यास कारण होते. [११]

एकशतं ता जनता या भूमिर्व्यधूनुत । प्रजां हिंसित्वा ब्राह्मणीमसंभव्यं पराभवन् ॥ १२ ॥
देवपीयुश्चरति मर्त्येषु गरगीर्णो भवत्यस्थिभूयान् ।
यो ब्राह्मणं देवबन्धुं हिनस्ति न स पितृयाणमप्येति लोकम् ॥ १३ ॥
अग्निर्वै नः पदवायः सोमो दायाद उच्यते । हन्ताभिशस्तेन्द्रस्तथा तद्वेधसो विदुः ॥ १४ ॥
इषुरिव दिग्धा नृपते पृदाकूरिव गोपते । सा ब्राह्मणस्येषुर्घोरा तया विध्यति पीयतः ॥ १५ ॥

अर्थ— (**ताः जनताः एक-शतं**) ते जनतेतील एकशें एक लोक होते, (**याः भूमिः व्यधूनुत**) ज्यांनीं पृथ्वी हालविली आहे. (**ब्राह्मणीं प्रजां हिंसित्वा**) ब्राह्मणप्रजेस कष्ट दिल्यानें (**असंभव्यं पराभवन्**) आपोआपच पराभव पावले आहेत. [१२]

(**देव-पीयुः गर-गीर्णः मर्त्येषु चरति**) देवशत्रु विष प्यालेल्या मनुष्याप्रमाणें मनुष्यांमध्यें भटकतो, आणि (**अस्थि-भूयान् भवति**) तो फक्त हाडें असलेला होतो. (**यः देव-बन्धुं ब्राह्मणं हिनस्ति**) जो देवांच्या बंधुरूप अशा ब्राह्मणाला कष्ट देतो, (**सः पितृयाणं अपि लोकं न एति**) तो पितृयान लोकास सुद्धां जात नाहीं. [१३]

(**अग्निः वै नः पदवायः**) अग्निच आमचा मार्गदर्शक आहे. (**सोमः दायादः उच्यते**) सोम संबंधी आहे असें म्हणतात. (**इन्द्रः अभिशस्ता हन्ता**) इन्द्र हा शाप देणाऱ्यांचा नाश करणारा आहे, (**तथा वेधसः तत् विदुः**) याप्रकारें ज्ञानी हें जाणतो. [१४]

हे राजा ! हे गाईंच्या स्वामी ! (**दिग्धा इषुः इव**) विष पाजलेल्या बाणाप्रमाणें (**पृदाकुः इव**) सापाप्रमाणें (**सा ब्राह्मणस्य घोरा इषुः**) हा ब्राह्मणाचा भयंकर बाण आहे, (**तया पीयतः विध्यति** , त्यानें हिंसक वेधला जातो. [१५]

भावार्थ— शेंकडो क्षत्रिय पृथ्वीवर महान् पराक्रम करणारे असतात, परंतु ते जर ब्राह्मणांस दुःख देण्यास सुरवात करतील तर त्यांचा सहज पराजय होतो. [१२]

देवांचे शत्रु बनून पृथ्वीवर फिरणारीं दुष्ट मनुष्यें, विष पिऊन अतिकृश मनुष्याप्रमाणें निर्बल होऊन जातात. आणि जो देवांचे बंधु अशा ब्राह्मणाची हिंसा करतो, त्याला पितृलोकहि प्राप्त होत नाहीं. [१३]

सर्व ज्ञानी जाणतात कीं अग्नि आमचा मार्गदर्शक, सोम आमचा संबंधी आणि इंद्र आमचा रक्षक आहे. [१४]

हे राजा ! तूं ध्यानांत ठेव कीं विषयुक्त बाणांप्रमाणें आणि सापाप्रमाणें ब्राह्मणाचा भयंकर बाण हिंसकाचा अवश्य नाश करतो. [१५]

शतौदना गाय

कांड १०, सूक्त ९

(ऋषिः – अथर्वा । देवता – शतौदना ।)

अघायतामपि नह्या मुखानि सपत्नेषु वज्रमर्पयैतम् ।
इन्द्रेण दत्ता प्रथमा शतौदना भ्रातृव्यघ्नी यजमानस्य गातुः ॥ १ ॥

अर्थ— (**अघायतां मुखानि अपि नह्य**) पापी लोकांचीं तोंडें बंद कर. (**सपत्नेषु एतं वज्रं अर्पय**) शत्रूंवर हे वज्र फेंक. (**इन्द्रेण दत्ता प्रथमा शतौदना**) इंद्रानें दिलेली पहिली शेंकडो भोजनें देणारी (**भ्रातृव्यघ्नी यजमानस्य गातुः**) शत्रूचा नाश करणारी, यजमानास मार्ग दाखविणारी गायच आहे. [१]

वेदिष्टे चर्म भवतु बर्हिर्लोमानि यानि ते । एषा त्वा रशनाग्रभीद् ग्रावा त्वैषोऽधि नृत्यतु ॥ २ ॥
बालास्ते प्रोक्षणीः सन्तु जिह्वा सं मार्ष्ट्वघ्न्ये । शुद्धा त्वं यज्ञिया भूत्वा दिवं प्रेहि शतौदने ॥ ३ ॥
यः शतौदनां पचति कामप्रेण स कल्पते । प्रीता ह्यस्यर्त्विजः सर्वे यन्ति यथायथम् ॥ ४ ॥
स स्वर्गमा रोहति यत्रादस्त्रिदिवं दिवः । अपूपनाभिं कृत्वा यो ददाति शतौदनाम् ॥ ५ ॥
स तांल्लोकान्त्समाप्नोति ये दिव्या ये च पार्थिवाः ।
हिरण्यज्योतिषं कृत्वा यो ददाति शतौदनाम् ॥ ६ ॥
ये ते देवि शमितारः पक्तारो ये च ते जनाः ।
ते त्वा सर्वे गोप्स्यन्ति मैभ्यो भैषीः शतौदने ॥ ७ ॥
वसवस्त्वा दक्षिणत उत्तरान्मरुतस्त्वा । आदित्याः पश्चाद्गोप्स्यन्ति साग्निष्टोममति द्रव ॥ ८ ॥
देवाः पितरो मनुष्या गन्धर्वाप्सरसश्च ये । ते त्वा सर्वे गोप्स्यन्ति सातिरात्रमति द्रव ॥ ९ ॥

अर्थ— (ते चर्म वेदिः भवतु) तुझें चामडें वेदी होवो. (ते यानि लोमानि बर्हिः) जे तुझे रोम-शरीरावरील केंस आहेत ते दर्भ होवोत, (एषा रशना त्वा अग्रभीत्) जी दोरी तुला बांधण्यांत आली आहे, हे सोमवल्लि ! (एषः ग्रावा त्वा अधिनृत्यतु) हा दगड तुजवर आनंदानें नाचो, तुझा रस काढण्यास दगड वनस्पतीवर नाचो. [२]

हे (अघ्न्ये) अहिंसनीय गाई ! (ते बालाः प्रोक्षणीः सन्तु) तुझे केस प्रोक्षणी होवोत, (जिह्वा सं मार्ष्टु) तुझी जीभ स्वच्छता करो, (त्वं यज्ञिया शुद्धा भूत्वा) तूं पूज्य आणि शुद्ध होऊन, हे शतौदना गाई ! (त्वं दिवं प्रेहि) तूं द्युलोकांत जा. [३]

(यः शतौदनां पचति) जो शतौदनेला शिजवितो तो (सः कामप्रेण कल्पते) तो संकल्प पूर्ण करतो. (अस्य सर्वे प्रीताः ऋत्विजः) त्याचे सर्व संतुष्ट झालेले ऋत्विज (यथायथं यन्ति) यथायोग्य मार्गानें परत जातात. [४]

(सः स्वर्गं आरोहति) तो स्वर्गास जातो, (यत्र अदः त्रिदिवं दिवः) जेथें तें स्वर्गधाम आहे, (यः शतौदनां अपूपनाभिं कृत्वा ददाति) जो शतौदनेला अनारश्याच्यासह दान देतो. [५]

(ये दिव्याः ये च पार्थिवाः) जे दिव्य आणि जे पार्थिव भोग आहेत, (तान् लोकान् सः समाप्नोति) त्या सर्व लोकांस तो प्राप्त करतो, (यः शतौदनां हिरण्यजोतिषं कृत्वा ददाति) जो शतौदनेला सोन्यानें शृंगारून दान देतो. [६]

(ये शमितारः ये च पक्तारः जनाः) जे शमिता आणि शिजविणारे लोक आहेत (ते सर्वे त्वा गोप्स्यन्ति) ते सर्व तुझें रक्षण करतील. हे (शतौदने) सर्व मनुष्यांस भोजन देणाऱ्या गाई, (एभ्यः मा भैषीः) त्यांच्यापासून तूं भय धरूं नकोस. [७]

(दक्षिणतः त्वा वसवः) दक्षिणेकडून तुला वसुदेव (उत्तरात् त्वा मरुतः) उत्तरेकडून तुला मरुतदेव (आदित्याः पश्चात् गोप्स्यन्ति) आदित्य तुझें पाठीकडून रक्षण करतील. (सा त्वं अग्निष्टोमं अतिद्रव) अशी तूं अग्निष्टोम यज्ञाच्या पार जा. [८]

(ये) जे देव, पितर, मनुष्य, गंधर्व आणि अप्सरा गण आहेत (ते सर्वे त्वा गोप्स्यन्ति) ते सर्व तुझें रक्षण करतील. (सा अतिरात्रं अतिद्रव) अशी तूं अतिरात्र यज्ञाच्या पार जा. [९]

अन्तरिक्षं दिवं भूमिमादित्यान्मरुतो दिशः ।
लोकान्त्स सर्वानाप्नोति यो ददाति शतौदनाम् ॥ १० ॥
घृतं प्रोक्षन्ती सुभगा देवी देवान्गमिष्यति । पक्तारमघ्न्ये मा हिंसीर्दिवं प्रेहि शतौदने ॥ ११ ॥
ये देवा दिविषदो अन्तरिक्षसदश्च ये ये चेमे भूम्यामधि ।
तेभ्यस्त्वं धुक्ष्व सर्वदा क्षीरं सर्पिरथो मधु ॥ १२ ॥
यत्ते शिरो यत्ते मुखं यौ कर्णौ ये च ते हनू । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ १३ ॥
यौ त ओष्ठौ ये नासिके ये शृङ्गे ये च तेऽक्षिणी ।
आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ १४ ॥
यत्ते क्लोमा यद्धृदयं पुरीतत्सहकण्ठिका । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ १५ ॥
यत्ते यकृद्ये मतस्ने यदान्त्रं याश्च ते गुदाः । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ १६ ॥
यस्ते प्लाशिर्यो वनिष्ठुर्यौ कुक्षी यच्च चर्म ते । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ १७ ॥
यत् ते मज्जा यदस्थि यन्मांसं यच्च लोहितम् । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥१८॥
यौ ते बाहू ये दोषणी यावंसौ या च ते ककुत् । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥१९॥
यास्ते ग्रीवा ये स्कन्धा याः पृष्टीर्याश्च पर्शवः । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥२०॥
यौ त ऊरू अष्ठीवन्तौ ये श्रोणी या च ते भसत् । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥२१॥
यत्ते पुच्छं ये ते बाला यदूधो ये च ते स्तनाः । आमिक्षां दुहृतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥२२॥

अर्थ— (यः शतौदनां ददाति) जो शतौदनेला देतो (सः सर्वान् लोकान् आप्नोति) तो सर्व लोकांस प्राप्त करतो, जे लोक अंतरिक्ष, द्यु, भूमि, आदित्य, मरुत् आणि दिशांच्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. [१०]

(घृतं प्रोक्षंति सुभगा देवी) तुपाचें सिंचन करणाऱ्या भाग्यवान् देवी (देवान् गमिष्यति) देवतांना प्राप्त होशील. हे शतौदने (अघ्न्ये) अहिंसनीय गाई ! (पक्तारं मा हिंसी) शिजविणाऱ्याची हिंसा करूं नकोस. (दिवं प्रेहि) स्वर्गास प्राप्त हो. [११]

(ये दिवि-सदः देवाः) जे द्युलोकांत रहाणारे देव आहेत, (ये च अंतरिक्ष-सदः) जे अंतरिक्षांत रहातात, (ये च इमे भूम्यां अधि) जे भूमीवर रहातात, (तेभ्यः त्वं सर्वदा) त्यांच्यासाठीं तूं नेहमीं (क्षीरं सर्पिः अथो मधु धुक्ष्व) दूध, तूप आणि मध दे. [१२]

(यत् ते शिरः) जें तुझें मस्तक आहे, (यत् ते मुखं) जें तुझें मुख आहे, (यौ च कर्णौ) जे तुझे कान आहेत, (ये च ते हनू) जी तुझी हनुवटी आहे, (दात्रे आमिक्षां क्षीरं सर्पिः अथो मधु दुहृतां) दात्याला दही, दूध, तूप आणि मध देवोत. [१३]

(यौ ते ओष्ठौ) जे तुझे ओंठ आहेत, (शृंगे अक्षिणी) जीं तुझीं शिंगें आहेत आणि डोळे आहेत, (ते क्लोमा हृदयं पुरीतत् सह कंठिका) जीं फुप्फुसें, हृदय, मलाशय आणि गळ्याचा भाग आहेत, (ते यकृत् मतस्ने आन्त्रं गुदाः) जें तुझें यकृत, दोन बाजू मांड्या, आंतडी आणि गुदा आहे, (ते प्लाशीः वनिष्ठुः कुक्षी चर्म) जे तुझी प्लीहा, गुदाभाग, कूस आणि कातडी आहे (ते मज्जा अस्थि मांसं लोहितं) जे तुझे मज्जातंतु, हाडें, मांस, रक्त आहे, (ते बाहू दोषणी, असौ ककुत्) जे तुझे बाहू, बाजु, खांदे आणि वाशिंड आहे, (ते ग्रीवा स्कन्धाः पृष्टीः पर्शवः)

यास्ते जङ्घा याः कुष्ठिका ऋच्छरा ये च ते शफाः ।
आमिक्षां दुह्रतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ २३ ॥
यत्ते चर्म शतौदने यानि लोमान्यघ्न्ये । आमिक्षां दुह्रतां दात्रे क्षीरं सर्पिरथो मधु ॥ २४ ॥
क्रोडौ ते स्तां पुरोडाशावाज्येनाभिघारितौ । तौ पक्षौ देवि कृत्वा सा पक्तारं दिवं वह ॥ २५ ॥
उलूखले मुसले यश्च चर्मणि यो वा शूर्पे तण्डुलः कणः ।
यं वा वातो मातरिश्वा पवमानो ममाथाग्निष्टद्धोता सुहुतं कृणोतु ॥ २६ ॥
अपो देवीर्मधुमतीर्घृतश्चुतो ब्रह्मणां हस्तेषु प्रपृथक्सादयामि ।
यत्काम इदमभिषिञ्चामि वोऽहं तन्मे सर्वं सं पद्यतां वयं स्याम पतयो रयीणाम् ॥ २७ ॥

जी तुझी गर्दन, खांदे, पाठ आणि फांसळ्या आहेत, (ते ऊरू अष्ठीवन्तौ श्रोणी भसत्) ज्या तुझ्या जांघा, गुडघे, कुले आणि गुह्यांग आहे, (ते पुच्छं बालाः ऊधः स्तनाः) जें तुझें शेंपूट, केस, कांस आणि आंचळें आहेत, (ते जंघा कुष्ठिकाः ऋच्छराः शफाः) जे तुझ्या जांघा, टांचा, खूर आहेत, (ते चर्म लोमानि) जें तुझें चामडें आणि शरीरावरील केंस आहेत, हे (शतौदने) गाई ! (दात्रे क्षीरं आमिक्षां०) दात्याला दूध, दही, तूप आणि मध देत राहोत. (१४-२४)

हे शतौदने गाई ! (ते क्रोडौ) तुझा पार्श्व भाग (आज्येन अभिघारितौ पुरोडाशौ स्तां) तुपानें सिंचन केलेला पुरोडाश होवो. हे देवि ! (तौ पक्षौ कृत्वा) त्याचे पंख करून (सा त्वं पक्तारं दिवं वह) ती तूं शिजविणाऱ्याला स्वर्गात घेऊन जा. [२५]

(उलूखले मुसले) उखळ आणि मुसळ (चर्मणि शूर्पे च वा यः तण्डुलः कणः) चामड्यावर आणि सुपावर जे तांदुळाचे दाणे रहातात, (यं वा वातो मातरिश्वा पवमानः ममाथ) ज्यानें पवित्र करणाऱ्या वायूला मंथन केलें आहे, (तत् होता अग्निः सुहुतं कृणोतु) त्याला होता अग्नि उत्तम आहुतिरूप करो. [२६]

(मधुमतीः घृतश्च्युतः देवीः आपः) मधयुक्त तूप देणाऱ्या दिव्य जलधारा, (ब्रह्मणां हस्तेषु च पृथक् सादयामि) ब्राह्मणांच्या हातांत वेगवेगळ्या देतो. (यत् कामः इदं वः अहं अभिषिञ्चामि) ज्याची इच्छा करून हा मीं तुम्हांस अभिषेक करीत आहें, (तत् मे सर्वं संपद्यतां) तें सर्व मला प्राप्त होवो. (वयं रयीणां पतयः स्याम) आम्हीं सर्व धनाचे स्वामी व्हावें. [२७]

शतौदना गाय

गाय

या सूक्तांत गाईचें वर्णन आहे. यांत गाईचें नांव 'शतौदना' आहे. शेंकडो मनुष्यांना अन्न देणारी गाय 'शतौदना' म्हटली जाते. अशी कल्पना करूं कीं गाय दररोज १० शेर दूध देते. या हिशेबानें दररोज पांच मनुष्यांचें पोट भरतें. एक महिन्यांत दीडशें व सहासात महिन्यांत एक हजार मनुष्यांचें पालन पोषण करते. या हिशेबानें ती आपल्या सर्व आयुष्यांत दहा हजारापेक्षां जास्त मनुष्यांचें भरणपोषण करते. गाईचें दूध आजारी, अशक्त माणसासाठीं अमृतोपम आहे, आणि बालकासाठीं तें मातेचें स्थान घेतें. गाईचें दूध बल, मेधा आणि बुद्धीची वाढ करतें. शतौदना गाईचें असें महत्त्व आहे.

गाय स्वर्गीय वस्तु आहे. ती कामधेनु आहे. जी गाय जेव्हां पाहिजे तेव्हां दूध देते तिचें नांव 'कामदुघा' आहे. तीच कामधेनु होय. विद्वान् ब्राह्मणास गाय दान दिल्यानें मोठा लाभ

होतो. तें दान अन्न आणि सुवर्णासह (**अपूप, हिरण्य**) असलें पाहिजे. (मं. ७-८) यज्ञाचा शमिता, अन्नास शिजविणारा, देवांचे वसु, मनुष्य, गंधर्व आणि अप्सरागण हे गाईचे रक्षक आहेत; कारण गाईच्या दुधानें अग्निष्टोम आणि अतिरात्र हे यज्ञ होतात. (मं. ९)

जो शतौदना गाईचें दान विद्वानांस करतो त्याला अंतरिक्ष, भूमि, दिशा, मरुत तसेंच अन्य लोकांत उत्तम स्थान प्राप्त होतें. (मं. १०) सर्वांस पवित्र करणारी ही गाय देवांना यज्ञद्वारां प्राप्त होते. त्रैलोक्यात ज्या देवता आहेत त्या सर्व गाईच्या दुधानें तृप्त होतात. त्यापासून दूध तूप मिळते. (मं. ११-१२) त्यानंतर मं. १३-१४ पर्यंत सांगण्यांत आलें आहे कीं असें गाईचें स्वरूप आहे. गाय, गाईचें दान करणाऱ्याचें कल्याण करते आणि दूध, दही, इत्यादि सर्व वस्तु त्याला मिळत रहातात. दात्याला स्वर्ग प्राप्त होतो.

नंतर १७ व्या मंत्रापर्यंत ब्राह्मणास निरनिराळ्या प्रकारें गाईचें दान करण्याचें वर्णन आहे.

गाईचें विश्वरूप

कांड ९, सूक्त ७

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – गौः ।)

प्रजापतिश्च परमेष्ठी च शृङ्गे इन्द्रः शिरो अग्निर्ललाटं यमः कृकाटम् ॥ १ ॥
सोमो राजा मस्तिष्को द्यौरुत्तरहनुः पृथिव्यधरहनुः ॥ २ ॥
विद्युज्जिह्वा मरुतो दन्ता रेवतीर्ग्रीवाः कृत्तिका स्कन्धा घर्मो वहः ॥ ३ ॥
विश्वं वायुः स्वर्गो लोकः कृष्णद्रं विधरणी निवेष्यः ॥ ४ ॥
श्येनः क्रोडोऽन्तरिक्षं पाजस्यं१ बृहस्पतिः ककुद्बृहतीः कीकसाः ॥ ५ ॥
देवानां पत्नीः पृष्टय उपसदः पर्शवः ॥ ६ ॥
मित्रश्च वरुणश्चांसौ त्वष्टा चार्यमा च दोषणी महादेवो बाहू ॥ ७ ॥

अर्थ— (**प्रजापतिः च परमेष्ठी च शृंगे**) प्रजापति आणि परमेष्ठी या गाईचीं दोन शिंगें आहेत, (**इंद्रः शिरः**) इंद्र मस्तक आहे, (**अग्निः ललाटं**) अग्नि कपाळ आहे, (**यमः कृकाटं**) यम गळ्याखालील चामडें आहे. (**सोमः राजा मस्तिष्कः**) राजा सोम मेंदु आहे, (**द्यौः उत्तरहनुः**) द्युलोक वरचा जबडा आणि (**पृथिवी अधरहनुः**) पृथ्वी खालचा जबडा आहे. [१-२]

(**विद्युत् जिह्वा**) वीज जीभ आहे, (**मरुतः दन्ताः**) मरुत दांत आहेत, (**रेवतीः ग्रीवा कृत्तिका स्कन्धाः**) रेवती गळा आणि कृत्तिका खांदे आहेत, (**घर्मः वहः**) उष्णता देणारा सूर्य वाशिंडाजवळील भाग आहे, (**वायुः विश्वं स्वर्गः लोकः कृष्णद्रं**) वायु सर्व अवयव आणि स्वर्ग लोक कृष्णद्र आहे आणि (**विधरणी निवेष्यः**) धारक शक्ति पृष्ठवंश रज्जूचें टोंक आहे. [३-४]

(**श्येन क्रोडः**) श्येन तिची मांडी आहे, (**अंतरिक्षं पाजस्यं**) अंतरिक्ष पोट आहे, (**बृहस्पतिः ककुद्**) बृहस्पति वाशिंड आहे, (**बृहतीः कीकसाः**) बृहती कोणीचा भाग आहे, (**देवानां पत्नीः पृष्ठयः**) देवांच्या पत्नी पाठीचा भाग आहेत, (**उपसदः पर्शवः**) उपसद फांसळ्या आहेत. [५-६]

इन्द्राणी भसद्वायुः पुच्छं पवमानो बालाः ॥ ८ ॥
ब्रह्म च क्षत्रं च श्रोणी बलमूरू ॥ ९ ॥
धाता च सविता चाष्ठीवन्तौ जङ्घा गन्धर्वा अप्सरसः कुष्ठिका अदितिः शफाः ॥ १० ॥
चेतो हृदयं यकृन्मेधा व्रतं पुरीतत् ॥ ११ ॥
क्षुत्कुक्षिरिरा वनिष्ठुः पर्वताः प्लाशयः ॥ १२ ॥
क्रोधो वृक्कौ मन्युराण्डौ प्रजा शेपः ॥ १३ ॥
नदी सूत्री वर्षस्य पतय स्तना स्तनयित्नुरूधः ॥ १४ ॥
विश्वव्यचाश्चर्मौषधयो लोमानि नक्षत्राणि रूपम् ॥ १५ ॥
देवजना गुदा मनुष्या आन्त्राण्यत्रा उदरम् ॥ १६ ॥
रक्षांसि लोहितमितरजना ऊबध्यम् ॥ १७ ॥
अभ्रं पीवो मज्जा निधनम् ॥ १८ ॥
अग्निरासीन उत्थितोऽश्विना ॥ १९ ॥
इन्द्रः प्राङ् तिष्ठन्दक्षिणा तिष्ठन्यमः ॥ २० ॥
प्रत्यङ् तिष्ठन्धातोदङ् तिष्ठन्त्सविता ॥ २१ ॥

अर्थ—(मित्रः च वरुणः च अंसौ) मित्र आणि वरुण खांदे आहेत, (त्वष्टा च अर्यमा च दोषणी) त्वष्टा आणि अर्यमा बाहु भाग आहेत, आणि (महादेवः बाहू) महादेव बाहु आहेत. (इन्द्राणी भसत्) इन्द्राणी गुह्य भाग आहे, (वायुः पुच्छं) वायु शेंपुट आहे. आणि (पवमानः बालाः) पवमानवायु केंस आहे. [७-८]

(ब्रह्म च क्षत्रं च श्रोणी) ब्राह्मण आणि क्षत्रिय पार्श्व भाग आहेत, (बलं ऊरू) बळ जांघा आहेत, (धाता च सविता च अष्ठीवन्तौ) धाता आणि सविता गुडघे आहेत, (गन्धर्वाः जङ्घाः) गंधर्व जांघा आहेत, (अप्सरसः कुष्ठिकाः) अप्सरा खुरांचा भाग आहेत, (अदितिः शफाः) अदिति खूर आहेत, (चेतः हृदयं) चेतना तिचें हृदय आहे, (मेधा यकृत्) मेधा बुद्धि यकृत् आहे (व्रतं पुरीतत्) व्रत तिचीं आंतडीं आहेत. [९-११]

(क्षुत् कुक्षिः) क्षुधा कूस आहे, (इरा वनिष्ठुः) अन्न मोठें आंतडें आहे, (पर्वताः प्लाशयः) पर्वत लहान आंतडें आहे, (क्रोधः वृक्कौ) क्रोध तिची गुदा आहे, (मन्युः आण्डौ) उत्साह अंडकोष आहे, (प्रजाः शेपः) प्रजा जननेंद्रिय आहे. [१२-१३]

(नदी सूत्री) नदी सूत्रनाडी आहे, (वर्षस्य पतयः स्तनाः) वर्षा ऋतुचा स्वामी मेघ तिचे स्तन आहे, (स्तनयित्नु ऊधः) गर्जना करणारा मेघ तिची दुधानें परिपूर्ण कांस आहे, (विश्वव्यचाः चर्म) सर्वत्र पसरलेलें आकाश तिची चामडी आहे, (ओषधयः लोमानि) औषधी लोम आहेत, (नक्षत्राणि रूपं) नक्षत्रें रूप आहे. [१४-१५]

(देवजनाः गुदा) देवजन गुदा आहेत, (मनुष्याः आन्त्राणि) मनुष्य आंतडी आहेत, (अत्रा उदरम्) भक्षक प्राणी पोट आहे, (रक्षांसि लोहितं) राक्षस रक्त आहे, (इतरजना ऊबध्यं) इतर लोक अपचित अन्न आहेत, (अभ्रं पीवः) मेघ मेद आहे, (निधनं मज्जा) निधन मज्जा आहे, (अग्निः आसीनः) अग्नि आसन आहे आणि (अश्विनौ उत्थितः) अश्वि देव उभें असणें आहेत. [१६-१९]

(इन्द्रः प्राङ् तिष्ठन्) इंद्र पूर्व दिशेस रहाणें आहे, (यमः दक्षिणा तिष्ठन्) यम दक्षिण दिशेचें अवस्थान आहे, (प्रत्यङ् तिष्ठन् धाता) पश्चिम दिशेस रहाणें धाता आहे, आणि (सविता उदङ् तिष्ठन्) सविता उत्तर दिशेस रहाणें आहे. [२०-२१]

*

तृणानि प्राप्तः सोमो राजा ॥ २२ ॥
मित्र ईक्षमाण आवृत्त आनन्दः ॥ २३ ॥
युज्यमानो वैश्वदेवो युक्तः प्रजापतिर्विमुक्तः सर्वम् ॥ २४ ॥
एतद्वै विश्वरूपं सर्वरूपं गोरूपम् ॥ २५ ॥
उपैनं विश्वरूपाः सर्वरूपाः पशवस्तिष्ठन्ति य एवं वेद ॥ २६ ॥

अर्थ— (सोमः राजा तृणानि प्राप्तः) जेव्हां तो गवतापाशीं जातो तेव्हां सोम राजा होतो, (ईक्षमाणः मित्रः) अवलोकन करणारा सूर्य आणि (आवृतः आनन्दः) परावृत्त होतांच आनंद आहे (युज्यमानः वैश्वदेवः) जेव्हां जोडण्यांत येतो तेव्हां सर्व देवांच्या संबंधांत येतो, (युक्तः प्रजापतिः) जोडल्यानंतर प्रजापति आणि (विमुक्तः सर्वं) मोकळा सोडल्यावर सर्व कांहीं होतो. [२२-२४]

(एतत् वै गोरूपं) असें खरोखर गाईचें रूप आहे. हेंच (विश्वरूपं सर्वरूपं) गाईचें विश्वरूप आणि सर्व रूप आहे. (यः एवं वेद) जो ही गोष्ट जाणतो, (एनं) त्याच्याजवळ (विश्वरूपाः सर्वरूपाः पशवः उपतिष्ठन्ति) विश्वरूपी आणि सर्वरूपी सर्व पशु रहातात. [२५-२६]

गाईचें महात्म्य

या सूक्तांत गाईचें महात्म्य वर्णन केलें आहे. येथें गौ शब्दाचा अर्थ गाय आणि बैल असा केला पाहिजे हें स्पष्ट आहे गाईच्या शरीरांत सर्व देवांचा निवास आहे आणि गाय सर्व देवांचें रूप होते, असा गाईचा अधिकार या सूक्तांत वर्णन करण्यांत आला आहे. वैदिक धर्मांत गाईचें इतकें महत्त्व आहे. गाईचें दूध, दही, लोणी, तूप, ताक इत्यादि सेवन केल्यानें देवतांचें सत्त्व सेवन केल्याचें श्रेय प्राप्त होतें. त्याचप्रमाणें गोमूत्र आणि गोमयसेवन केल्यानें शरीर शुद्ध होतें. या प्रकारें गाईचें महत्त्व समजून वैदिकधर्मी लोकांनीं गाईची सेवा करावी.

बैल

कांड ९, सूक्त ४

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – ऋषभः ।)

साहस्रस्त्वेष ऋषभः पयस्वान्विश्वा रूपाणि वक्षणासु बिभ्रत् ।
भद्रं दात्रे यजमानाय शिक्षन्बार्हस्पत्य उस्रियस्तन्तुमातान् ॥ १ ॥

अर्थ— (साहस्रः त्वेषः) हजारों शक्तींनीं युक्त तेजस्वी, (पयस्वान् ऋषभः) दूधानें युक्त बैल (वक्षणासु विश्वा रूपाणि बिभ्रत्) नदीच्या कांठांवर अनेक रूपें धारण करून (बार्हस्पत्यः उस्रियः) बृहस्पति संबंधीचा हा बैल (दात्रे यजमानस्य भद्रं शिक्षन्) दान देणाऱ्या यजमानासाठीं भलेपणाचें शिक्षण देऊन (तन्तुं आतान्) यज्ञाचें सूत्र पसरवितो. [१]

भावार्थ— बैल हजारो शक्तींनीं युक्त आहे, बैल दुधयुक्त आहे. नदीच्या किनाऱ्यावर त्याचीं नाना रूपें पहावयास सांपडतात. त्याचें दान करण्यानें कल्याण होतें आणि यज्ञाचा प्रचार होतो. [१]

अपां यो अग्रे प्रतिमा बभूव प्रभूः सर्वस्मै पृथिवीव देवी ।
पिता वत्सानां पतिरघ्न्यानां साहस्रे पोषे अपि नः कृणोतु ॥ २ ॥
पुमानन्तर्वान्त्स्थविरः पयस्वान्वसोः कबन्धमृषभो बिभर्ति ।
तमिन्द्राय पथिभिर्देवयानैर्हुतमग्निर्वहतु जातवेदाः ॥ ३ ॥
पिता वत्सानां पतिरघ्न्यानामथो पिता महतां गर्गराणाम् ।
वत्सो जरायु प्रतिधुक्पीयूष आमिक्षा घृतं तद्वस्य रेतः ॥ ४ ॥
देवानां भाग उपनाह एषोऽपां रस ओषधीनां घृतस्य ।
सोमस्य भक्षमवृणीत शक्रो बृहन्नद्रिरभवद्यच्छरीरम् ॥ ५ ॥
सोमेन पूर्णं कलशं बिभर्षि त्वष्टा रूपाणां जनिता पशूनाम् ।
शिवास्ते सन्तु प्रजन्व इह या इमा न्यस्मभ्यं स्वधिते यच्छ या अमूः ॥ ६ ॥

अर्थ- (यः अग्रे) जो प्रथम (अपां प्रतिमा बभूव) पाण्याला मेघाची उपमा होते (देवी पृथ्वी इव) पृथ्वी देवीप्रमाणें (सर्वस्मै प्रभूः) सर्वांवर प्रभाव पाडणारा (वत्सानां पिता) वासरांचा स्वामी (अघ्न्यानां पतिः) गाईचा पति (नः) आम्हांस (साहस्रे पोषे अपि कृणोतु) हजारों प्रकारें पुष्टि देवो, पुष्टींत ठेवो. [२]

(पुमान् अन्तर्वान्) पुरुष स्वतःमध्यें शक्ति धारण करणारा, (स्थविरः पयस्वान्) पुष्कळ दूध देणारा, (ऋषभः वसोः कबन्धं बिभर्ति) बैल धनाचें शरीर धारण करतो. (तं देवयानैः पथिभिः हुतं) त्या देवयान मार्गानें समर्पिताला (जातवेदाः अग्निः इन्द्राय वहतु) जातवेद अग्नि इन्द्रासाठीं घेऊन जावो. [३]

(वत्सानां पिता) वासरांचा पिता (अघ्न्यानां पतिः) गाईचा पति (अथो) आणि (महतां गर्गराणां पिता) मोठ्या प्रवाहाचा पालक (वत्सः जरायु) वत्स गर्भांतून येऊन (प्रतिधुक् पीयूषः) दररोज अमृताचें दोहन करून (आमिक्षा घृतं) दही आणि तूप देतो, (तत् उ अस्य रेतः) तें निःसंदेह त्याचें वीर्य आहे. [४]

(एषः देवानां उपनाहः भागः) तो देवांचा जवळ असलेला भाग आहे, (अपां ओषधीनां घृतस्य रसः) पाणी, औषधि आणि तुपाचा हा रस आहे, (सोमस्य भक्षं शक्रः अवृणीत) हाच सोमाचा रस इंद्रानें प्राप्त केला, याचें (यत् शरीरं बृहत् अद्रिः अभवत्) जें शरीर होतें तेंच मोठा ढग बनलें. [५]

(सोमेन पूर्णं कलशं बिभर्षि) सोमरसानें परिपूर्ण भरलेला कलश तूं धारण करतोस, आणि तूं (रूपाणां त्वष्टा) रूपें तयार करणारा, आणि (पशूनां जनिता) पशूंचा उत्पादक आहेस, (याः इमाः ते प्रजन्वः) जीं हीं तुझीं संतानें आहेत, तीं (शिवाः सन्तु) आम्हांस शुभदायक होवोत. हे (स्वधिते) शस्त्रा ! (याः अमूः अस्मभ्यं नि यच्छ) जें येथें आहे तें आम्हांसाठीं दे. [६]

भावार्थ— त्याला पाणी देणाऱ्या मेघाची उपमा देण्यांत येते. पृथ्वीदेवीवर तो अधिक प्रभावशाली आहे. तो वासरांचा पिता आणि गाईचा पति आहे. त्याच्या योगें आमची हजारों प्रकारची पुष्टि होते. [२]

तो पुरुष आहे, त्याच्यांत शक्ति आहे. तो सामर्थ्य आणि दुध यांनीं युक्त आहे. तो धनास धारण करतो. त्या समर्पित झालेल्याला जातवेद अग्नि इन्द्रासाठीं देवयान मार्गानें घेऊन जातो. [३]

वासरांचा पिता, गाईचा पति, मोठ्या जलधारांचा स्वामी, जन्मतांच अमृत दोहन करून देतो. दही आणि तूप देतो, जणूं काय तें त्याचें बल आहे. [४]

तें दूध देवांचा भाग आहे, तो वनस्पतीचा रस आहे, तो सोमरसासह पिण्यांत येतो. त्याच्या शरीराला मेघाचीच उपमा आहे. [५]

तो सोमरसानें भरलेला कलश धारण करतो. तो गाय इत्यादींचा उत्पन्न कर्ता, विविधरूपें निर्माण करणारा, अशा त्याचें संतान आमचें कल्याण करो. शस्त्र त्याचें रक्षण करून त्यास आम्हांस देवो. [६]

आज्यं बिभर्ति घृतमस्य रेतः साहस्रः पोषस्तमु यज्ञमाहुः ।
इन्द्रस्य रूपमृषभो वसानः सो अस्मान्देवाः शिव एतु दत्तः ॥ ७ ॥
इन्द्रस्यौजो वरुणस्य बाहू अश्विनोरंसौ मरुतामियं ककुत् ।
बृहस्पतिं संभृतमेतमाहुर्ये धीरासः कवयो ये मनीषिणः ॥ ८ ॥
दैवीर्विशः पयस्वाना तनोषि त्वामिन्द्रं त्वां सरस्वन्तमाहुः ।
सहस्रं स एकमुखा ददाति यो ब्राह्मण ऋषभमाजुहोति ॥ ९ ॥
बृहस्पतिः सविता ते वयो दधौ त्वष्टुर्वायोः पर्यात्मा त आभृतः ।
अन्तरिक्षे मनसा त्वा जुहोमि बर्हिष्टे द्यावापृथिवी उभे स्ताम् ॥ १० ॥
य इन्द्र इव देवेषु गोष्वेति विवावदत् । तस्य ऋषभस्याङ्गानि ब्रह्मा सं स्तौतु भद्रया ॥ ११ ॥

अर्थ— (**अस्य घृत आज्यं**) याचें तूप आणि आज्य (**रेतः बिभर्ति**) वीर्यास धारण करतात. (**साहस्रः पोषः**) जो हजारोंचा पोषक आहे, (**तं उ यज्ञं आहुः**) त्याला यज्ञ म्हणतात. (**वृषभः इन्द्रस्य रूपं वसानः**) बैल इंद्राचें रूप धारण करून, हे (**देवाः**) देवहो ! (**सः दत्तः अस्मान् शिवः आ एतु**) तो दानांत दिलेला शुभ होवून आम्हांपाशीं येवो. [७]

(**ये धीरासः**) जे धैर्यानें युक्त आणि (**ये मनीषिणः कवयः**) जे मननशील कवि आहेत, ते (**एतं संभृतं बृहस्पतिं आहुः**) या संभारयुक्तास बृहस्पति म्हणतात. तसेंच ही (**इन्द्रस्य ओजः**) इंद्राची शक्ति, (**वरुणस्य बाहू**) वरुणाचे बाहु, (**अश्विनोः अंसौ**) अश्विनी कुमारांचे खांदे, (**मरुतां इयं ककुद्**) मरुतांचें हें वशिंड असें म्हणण्यांत येतें. [८]

तूं (**पयस्वान् दैवीः विशः आ तनोषि**) दुधानें युक्त दिव्यगुणी प्रजेला उत्पन्न करतोस. (**त्वां इन्द्रं**) तुला इंद्र आणि (**त्वां सरस्वन्तं आहुः**) सारयुक्त म्हणतात. (**यः ब्राह्मणः**) जो ब्राह्मण (**ऋषभं आ जुहोति**) बैलाचें दान करतो, (**सः एकमुखाः सहस्रं ददाति**) तो एकाच स्थानीं मुख करून हजारोंचें दान करतो. [९]

(**बृहस्पतिः सविता**) बृहस्पति आणि सविता (**ते वयः दधौ**) तुझ्या आयुष्यास धारण करतात. (**ते आत्मा**) तुझा आत्मा (**त्वष्टुः वायोः परि आभृतः**) त्वष्टा आणि वायुनें परिपूर्ण आहे. (**मनसा त्वा अन्तरिक्षे जुहोमि**) मनानें तुला अंतरिक्षांत अर्पण करतों. (**उभे द्यावापृथिवी ते बर्हिः स्ताम्**) दोन्ही द्युलोक आणि भूलोक तुझें आसन होवोत. [१०]

(**देवेषु इन्द्रः इव**) देवांत ज्याप्रमाणें इंद्र तसा (**यः गोषु विवावदत् एति**) गाईंत अवाज करीत फिरतो, (**तस्य ऋषभस्य अंगानि**) त्या बैलाच्या अंगांना (**भद्रया ब्रह्मा संस्तौतु**) शुभ वाणीनें ब्रह्मा प्रशंसा करतो. [११]

भावार्थ— तो तूप आणि वीर्य धारण करतो, हजारों प्रकारची पुष्टि देतो, म्हणून त्यास यज्ञ म्हणण्यांत येतें. तो इंद्राचें रूप धारण करून आम्हांस शुभ होवो. [७]

जे धैर्ययुक्त कवि आणि ज्ञानी आहेत त्यांस माहित आहे कीं तो देवतांच्या शक्तींनीं युक्त आहे. त्याच्यांत बृहस्पति, इंद्र, वरुण, अश्विनौ, मरुत् या सर्वांची शक्ति आहे. [८]

हा दूध देणारा बैल उत्तम प्रजा उत्पन्न करतो, त्याला सारवान् इंद्र म्हणतात जो बैलाचें समर्पण करतो, त्याला हजारों दानांचें श्रेय मिळतें. [९]

बृहस्पतीनें आणि सवित्यानें त्याच्या आयुष्याला धारण केलें आहे. त्वष्टा आणि वायूचें सत्त्व त्याच्यांत आहे, त्याचें मनःपूर्वक अंतरिक्षांत समर्पण केल्यानें भूमीवर आकाशाखालीं तो रहातो. [१०]

जसा देवांत इन्द्र तसा गाईंत हा बैल आहे. ज्ञानीच त्याच्या अवयवाचें महत्त्व सांगू शकतात. [११]

पार्श्वे आस्तामनुमत्या भगस्यास्तामनूवृजौ । अष्ठीवन्तावब्रवीन्मित्रो ममैतौ केवलाविति ॥ १२ ॥
भसदासीदादित्यानां श्रोणी आस्तां बृहस्पतेः । पुच्छं वातस्य देवस्य तेन धूनोत्योषधीः ॥ १३ ॥
गुदा आसन्त्सिनीवाल्याः सूर्यायास्त्वचमब्रुवन् । उत्थातुरब्रुवन्पद ऋषभं यदकल्पयन् ॥ १४ ॥
क्रोड आसीज्जामिशंसस्य सोमस्य कलशो धृतः । देवाः संगत्य यत्सर्व ऋषभं व्यकल्पयन् ॥१५॥
ते कुष्ठिकाः सरमायै कूर्मेभ्यो अदधुः शफान् । ऊवध्यमस्य कीटेभ्यः श्ववर्तेभ्यो अधारयन्॥१६॥
शृङ्गाभ्यां रक्ष ऋषत्यवर्तिं हन्ति चक्षुषा । शृणोति भद्रं कर्णाभ्यां गवां यः पतिरघ्न्यः ॥ १७ ॥
शतयाजं स यजते नैनं दुन्वन्त्यग्नयः। जिन्वन्ति विश्वे तं देवा यो ब्राह्मण ऋषभमाजुहोति ॥१८॥

अर्थ— (पार्श्वे अनुमत्याः आस्तां) दोन्ही बाजू अनुमतीच्या आहेत, (अनूवृजौ भगस्य आस्तां) फासळयांचे दोन्ही भाग भगाचे आहेत, (मित्रः अब्रवीत्) मित्र म्हणाला (अष्ठीवन्तौ केवलौ एतौ मम इति) दोन गुडघे फक्त माझे आहेत. [१२]

(भसद् आदित्यानां आसीत्) पृष्ठवंश रज्जूचा शेवटचा भाग आदित्याचा आहे, (श्रोणी बृहस्पतेः आस्तां) कुल्ले बृहस्पतीचे आहेत, (पुच्छं वातस्य देवस्य) शेपूट वायुदेवाचें आहे, (तेन ओषधीः धुनोति) त्यानें औषधींस हलवितो. [१३]

(गुदाः सिनीवाल्याः आसन्) गुदा भाग सिनीवालीचा आहे, (त्वचं सूर्यायाः अब्रुवन्) त्वचा सूर्यप्रभेची आहे असें म्हणतात, (पदः उत्थातुः अब्रुवन्) पाय उत्थात्याचे आहेत असें म्हणतात, (यत् ऋषभं अकल्पयन्) या प्रकारें बैलाची कल्पना विद्वानांनीं केली आहे. [१४]

(क्रोडः जामिशंसस्य आसीत्) मांडी जामीशंसाची होती, (कलशः सोमस्य धृतः) कलश सोमानें धारण केला आहे, अशा रीतीनें (सर्वे देवाः संगत्य) सर्व देवांनीं मिळून (यत् ऋषभं व्यकल्पयत्) बैलाची कल्पना केली आहे. [१५]

(कुष्ठिकाः सरमायै ते अदधुः) कुष्ठिकांना तो सरमेसाठीं धारण करतो आणि (शफान् कूर्मेभ्यः) खूर कासवासाठीं धारण करतो. (अस्य ऊवध्यं) त्याचें अपक्व अन्न (श्ववर्तिभ्यः कीटेभ्यः अधारयन्) कुत्र्यांसह रहाणाऱ्या कीड्यांच्यासाठीं ठेवण्यांत आलें आहे. [१६]

(यः अघ्न्यः गवां पतिः) जो वध करण्यास अयोग्य अशा गाईचा पति म्हणजे बैल आहे, तो (कर्णाभ्यां भद्रं शृणोति) कानानें कल्याणप्रद गोष्टी ऐकतो. (शृंगाभ्यां रक्षः ऋषति) शिंगांनीं राक्षसांना दूर करतो, आणि (चक्षुषा अवर्तिं हन्ति) दृष्टीनें अकालाचा नाश करतो. [१७]

(यः ब्राह्मणः ऋषभं आजुहोति) जो ब्राह्मणांस बैल समर्पण करतो, (तं विश्वेदेवाः जिन्वन्ति) त्याला सर्व देव तृप्त करतात. (सः शतयाजं यजते) तो शेंकडों याजकांद्वारां यज्ञ करतो आणि (एनं अग्नयः न दुन्वन्ति) याला अग्नि कष्ट देत नाहीं. [१८]

भावार्थ— त्याच्या अवयवांत अनुमति, भग, मित्र, आदित्य, बृहस्पति, वायु इत्यादि देवांचें अधिष्ठान आहे. [१३]

सिनीवालि, सूर्यप्रभा, उत्थाता, जामिशंस, सोम या देवतासाठीं क्रमानें गुदा, त्वचा, पाय, मांड्या, कलश हे अवयव मानण्यांत आले आहेत. अशा प्रकारें सर्व देवांनीं या बैलाच्या बाबतींत कल्पना केली आहे. [१४-१५]

सरमा, कासव, श्ववर्ति, कृमी, इत्यादिसाठीं, कुशी, खूर, आणि कच्चा राहिलेला अन्नभाग ठेवला आहे. [१२-१६]

बैल गाईचा पति आहे. तो कानानें उत्तम शब्द ऐकतो, शिंगांनीं शत्रूस हटवितो आणि डोळ्यांनीं अकालास दूर करतो. [१७]

जे ब्राह्मणास बैलाचें दान करतात त्यांना सर्व देव तृप्त करतात. तो शेंकडों प्रकारच्या याजकांकरवीं यज्ञ करतो आणि अग्नीच्या भयापासून दूर रहातो. [१८]

ब्राह्मणेभ्य॑ ऋष॒भं द॒त्वा वरी॑यः कृणुते॒ मनः॑ । पुष्टिं॒ सो अ॒घ्न्यानां॒ स्वे गो॒ष्ठेऽव॑ पश्यते ॥ १९ ॥
गाव॑ः सन्तु प्र॒जाः स॒न्त्वथो॑ अस्तु तनू॒बलम् । तत्सर्व॒मनु॑ मन्यन्तां दे॒वा ऋ॑षभदा॒यिने॑ ॥ २० ॥
अ॒यं पि॑पा॒न इन्द्र॒ इद्र॒यिं द॑धातु चे॒तनी॑म् ।
अ॒यं धे॒नुं सु॒दुघां॒ नित्य॑वत्सां॒ वशं॑ दुहां॒ वि॑प॒श्चितं॒ प॒रो दि॒वः ॥ २१ ॥
पि॒शङ्ग॑रूपो नभ॒सो व॑यो॒धा ऐ॒न्द्रः शुष्मो॑ वि॒श्वरू॑पो न॒ आग॑न् ।
आयु॑र॒स्मभ्यं॒ दध॑त्प्र॒जां च॑ रा॒यश्च॒ पोषै॑र॒भि नः॑ सचताम् ॥ २२ ॥
उपे॒होप॑पर्च॒नास्मिन्गो॒ष्ठ उप॑ पृञ्च नः । उप॑ ऋष॒भस्य॒ यद्रेत॒ उपे॑न्द्र॒ तव॑ वी॒र्य॑म् ॥ २३ ॥

अर्थ— (ब्राह्मणेभ्यः ऋषभं दत्वा) ब्राह्मणांना बैल देऊन जो स्वतःचें (मनः वरीयः कृणुते) मनाला श्रेष्ठ करतो (सः स्वे गोष्ठे) तो स्वतःच्या गोशाळेंत (अघ्न्यानां पुष्टिं अवपश्यते) गाईंची पुष्टि पहातो. [१९]

(गावः सन्तु) गाई होवोत, (प्रजाः सन्तु) प्रजा होवो, (अथो तनूबलं अस्तु) आणि शारीरिक बळ असावें. (तत् सर्वं) तें सर्व (ऋषभदायिने) बैल देणाऱ्याला (देवा अनुमन्यन्तां) देव स्वतःच्या अनुमतीसह देवोत. [२०]

(अयं पिपानः इन्द्रः इत्) तो पुष्ट इन्द्र (चेतनीं रयिं दधातु) चेतना देणाऱ्या धनास धारण करो, तसेंच (अयं) हा इंद्र (सुदुघां) उत्तम दोहन करण्यास योग्य (नित्यवत्सां) वासरांसह उपस्थित (वशं दुहां) वश राहून दोहण्यायोग्य (विपश्चितं धेनुं) ज्ञानयुक्त गाईला (परः दिवः) श्रेष्ठ द्युलोकाच्या पैलथडी धारण करो. [२१]

(पिशंगरूपः) लाल रंगाचा, (नभसः) आकाशांतून (ऐन्द्रः शुष्मः) इंद्र संबंधीं बल धारण करणारा (विश्वरूपः वयोधाः नः आगन्) सर्व रूपांनीं युक्त अन्नास धारण करणारा आमच्याजवळ येऊन पोहोंचला आहे तो (आयुः प्रजां च रायः च) आयु, प्रजा आणि धन (अस्मभ्यं दधत्) आमच्यासाठीं धारण करून (पोषैः नः अभिसचन्तां) पुष्टीसह आम्हांस प्राप्त होवो. [२२]

(इह अस्मिन् गोष्ठे) येथें या गोशाळेंत, (उप उप पर्चन) जवळ राहो आणि (नः उपपृञ्च) आम्हांस प्राप्त होवो. (ऋषभस्य यत् रेतः) वृषभाचें जें वीर्य, हे इंद्रा ! (तव वीर्यं उप) तें तुझें वीर्य आम्हांजवळ येवो. [२३]

भावार्थ— जो ब्राह्मणांना बैलाचें दान देऊन स्वतःच्या मनास श्रेष्ठ करतो, तो स्वतःच्या गोशाळेंत अनेक गाईंना पुष्ट झालेल्या पहाण्यांस भाग्यशाली होतो. [१९]

बैलाचें दान करणाऱ्यास देवांच्या अनुमतीनें गाई मिळतात, प्रजा होते आणि शरीरसामर्थ्यसुद्धां प्राप्त होते. [२०]

तो प्रभु चैतन्ययुक्त गायरूपी धन आम्हांस देवो. उत्तम दूध देणाऱ्या, नेहमीं वासरांना आपणांबरोबर वागविणाऱ्या, कांहींहि कष्टावांचून दूध देणाऱ्या, आणि मालकास ओळखणाऱ्या गाई तो द्युलोकांतून घेऊन येवो. [२१]

लाल रंगाचा, बलवान्, अनेक रंगांनीं युक्त, अन्न देणारा असा बैल आकाशांतून आला आहे. तो आम्हांस आयुष्य, प्रजा आणि धन देऊन पुष्ट करो. [२२]

तो बैल या गोशाळेंत राहो, आमच्याजवळ राहो. या बैलांत जें बल आहे ती इंद्राची शक्ति आहे ती आम्हांस प्राप्त होवो. [२३]

एतं वो युवानं प्रति दध्मो अत्र तेन क्रीडन्तीश्चरत वशाँ अनु ।
मा नो हासिष्ट जनुषा सुभागा रायश्च पोषैरभि नः सचध्वम् ॥ २४ ॥

अर्थ — (एतं युवानं वः प्रतिदध्मः) हा जवान-बैल-आम्हीं तुझ्यासाठीं समर्पण करीत आहोंत, (अत्र तेन क्रीडन्तीः चरतः) येथें त्याच्यासह खेळत हिंडा फिरा, आणि (वशान् अनु) गाईच्या मागोमाग इच्छित स्थानीं जा. हे (सुभागाः) भाग्यवान् गाईनों ! (जनुषा मा हासिष्ट) जन्मापासूनच आमचा त्याग करूं नका, (च पोषैः रायः) पुष्टीसह रक्षणाचें धन (नः अभिसचध्वं) आम्हांस द्या. [२४]

भावार्थ— या गाईजवळ आम्ही एक बैल ठेवतों. त्याच्यासह या गाई रमोत, नाचो कुदोत, हिंडो-फिरोत. वाटेल तेथें भटकोत, आमचा त्याग न करोत, आमच्याजवळ राहोत. स्वतः पुष्ट होवोत आणि आम्हांसहि पुष्ट करोत. [२४]

बैल

बैलाचा महिमा

या सूक्तांत बैलाचें महात्म्य वर्णन करण्यांत आलें आहे, उत्तमोत्तम बैलाचें घरांत पालन केलें तर काय लाभ होतात त्याचें वर्णन येत आहे. पहा—

साहस्रस्त्वेष ऋषभः पयस्वान (मं. १)

हजारों तेजांनीं आणि बलांनीं युक्त हा बैल आहे तो (**पयस्वान्**) दूध देणारा आहे. " कित्येकांना आश्चर्य वाटेल कीं बैल दूध कसा देत असेल ! पहिल्या आणि तिसऱ्या मंत्रांत या बैलाला (**पयस्वान्**) दूध देणारा म्हटलें आहे. म्हणजे या वर्णनांत कांहीं हेतू आहे. जसा बैल असेल त्या प्रमाणांत त्याच्या संततींत—गाईंत कमी जास्त प्रमाणांत दूध असतें. म्हणजे गाईंची दूध देण्याची शक्ति बैलावर अवलंबून आहे. कित्येक जातीचे बैल कमी दूध देणारी संतति निर्माण करतात. म्हणून पुष्कळ दूध देणाऱ्या गाईंची जर इच्छा असेल तर अधिक दूध देणाऱ्या गाईंसोबत अशा जातीचा बैल ठेवला पाहिजे कीं जो अधिक दूध देणाऱ्या जातीचा असेल. अशा गाई आणि असे बैल एके ठिकाणीं ठेवले पाहिजेत. म्हणजे कमी दूध देणाऱ्या जातीचें बैल अधिक दूध देणाऱ्या गाईंसह कधींहि ठेवूं नयेत. कारण त्यामुळें उत्पन्न होणारें दूध कमीच असणार. म्हणून २४ व्या मंत्रांत म्हटलें आहे—

एतं वो युवानं प्रतिदध्मः तेन अत्र क्रीडन्तीश्चरत वशां अनु । (मं. २४)

' या तरुण बैलास गाईंसह ठेवण्यांत यावें. त्याच्यासह त्या गाई खेळोत, रमोत, आणि मनास येईल तेथें फिरोत. ' म्हणजे अमुक जातीची गाय आणि अमुक जातीचा बैल यांचा आपण संबंध घडविला पाहिजे. अशा संबंधानें विशेष प्रकारची संतति निर्माण होईल. अशा रीतीनेंच गाईमध्येंसुद्धां हव्या त्या जातीच्या गाईचा संबंध हव्या त्या जातीच्या बैलाशीं होणें इष्ट नाहीं. विशिष्ट जातीच्या गाईशीं विशिष्ट जातीच्या बैलाचाच संबंध अभीष्ट आहे. गाईच्या जातींत कधींहि संकर होऊं देऊं नये. जर निराळ्या जातीशीं संबंध करावयाचाच असला तर तो उच्च जातीच्या नराशीं करावा. हलक्या जातीच्या नराशीं करूं नये जर दूध वाढवावयाची इच्छा असली तर अधिक दूध देणाऱ्या जातीच्या बैलाशीं संबंध ठेवावा. जर वाहकशक्तीनें युक्त बैल उत्पन्न करण्याची इच्छा असेल तर उत्तम वाहकशक्तियुक्त बैलाशीं संबंध घडवावा. गाईच्या उपजातीचें रक्षण होणें जरुरीचें आहे आणि विशेष जातीची संतति निर्माण करण्याचे प्रयत्न व्हावेत. जातिसंकर झाल्यानें गुणांची न्यूनता होते, आणि जात शुद्ध राहिल्यानें गुणांचें संवर्धन होतें. या सूक्तांत या प्रकारें गाईच्या जातीचें रक्षण करून अथवा अनुलोम संबंधानें उच्च नराशीं संबंध ठेवून गाईचें संवर्धन करण्याचा उपदेश आहे आणि हा उपदेश देण्यासाठीं बैलाच्या रेतांत दूध वाढविण्याचा गुण आहे ही गोष्ट सांगण्यांत आली आहे. त्याचा वाचकांनीं विचार करावा. असो. हा बैल—

वक्षणासु विश्वा रूपाणि बिभ्रत् । (मं. १)

' नदीच्या कांठावर स्वतःचीं अनेकविध रूपें धारण करतो. ' म्हणजे तो नदी किनाऱ्यावर राहून गवत वगैरे खाऊन पुष्ट होऊन फिरतो आणि निरनिराळ्या गाईंत विविध प्रकारें स्वतः

च्या रूपाचें आधान करतो. जर तो खाऊन पिऊन पुष्ट न झाला तर तो उत्तम संतान उत्पन्न करण्यास असमर्थ होईल म्हणून बैलास खूप पुष्ट केला पाहिजे.

उस्रियः तन्तुं आतान् (मं. १)

‘ स्वतःच्या प्रजातंतूंस पसरवितो ’ म्हणजे गाईंत गर्भाधान करून उत्तम संतति निर्माण करतो. या प्रकारें उत्तम गाई आणि बैल निर्माण होऊं शकतात. असे उत्तम जातीचे बैल,

दात्रे भद्रं शिक्षन् । (मं. १)

‘ दात्याचें कल्याण करतात. ’ जो मनुष्य अशा उत्तम बैलाचें आचार्याला दान करतो त्याचें कल्याण होतें. म्हणजे आचार्य, ब्राह्मण इत्यादींच्या जवळ पुष्कळ शिष्य असतात, त्यांच्या आश्रमांत अधिक दूध देणाऱ्या गाई असतात, म्हणून त्यांच्या आश्रमांतील ब्रह्मचारी दूध पिवून पुष्ट होतात. म्हणून असे उत्तम बैल व अशा उत्तम गाई अशा आचार्यांना दान करणें कल्याणप्रद आहे. या सूक्तांत अशा दानाची प्रेरणा खाली दिल्याप्रमाणें आहे —

सहस्रं स एकमुखा ददाति यो ब्राह्मण ऋषभमाजुहोति । (मं. ९)
जिन्वन्ति विश्वे तं देवा यो ब्राह्मण ऋषभमाजुहोति ॥ (मं. १८)
ब्राह्मणेभ्य ऋषभं दत्वा वरीयः कृणुते मनः (मं. १९)
तत्सर्वमनुमन्यन्तां देवा ऋषभदायिने ॥ (मं. २०)

‘ जो(**ब्राह्मणे**) ब्राह्मणांस बैल समर्पण करतो तो एक प्रकारें हजारों दानें करतो. त्याला सर्व देव संतुष्ट होतात. (**ब्राह्मणे**) ब्राह्मणाच्या घरांत बैल समर्पण करतो, तो ब्राह्मणास बैलाचें दान देऊन स्वतःचें मन श्रेष्ठ करतो. जो बैलाचें दान करतो, त्यास सर्व देव अनुकूल होतात.

विद्वान्, ज्ञानी, सदाचारी अशा आचार्याला उत्तम बैलाचें दान करण्याची प्रेरणा याप्रकारें या सूक्तांत देण्यांत आली आहे. त्याचें तात्पर्य या आधीं सांगितलेंच आहे तसेंच समजावें. हा विषय महाभारतांत स्पष्ट करण्यांत आला आहे—

दत्वा धेनुं सुव्रतां कांस्यदोहां कल्याणवत्सामपलायिनीं च ।
यावन्ति रोमाणि भवन्ति तस्यास्तावद्वर्षाण्यश्नुते स्वर्गलोकम् ॥ ३३ ॥
तथाऽनड्वाहं ब्राह्मणेभ्यः प्रदाय दान्तं धुर्यं बलवन्तं युवानम् ।
कुलानुजीव्यं वीर्यवन्तं बृहन्तं भुङ्क्ते लोकान्सम्मितान्धेनुदस्य ॥ ३४ ॥
गोषु क्षान्तं गोशरण्यं कृतज्ञं वृत्तिग्लानं तादृशं पात्रमाहुः ।
वृद्धे ग्लाने संभ्रमे वा महार्हे कृष्यर्थे वा होम्यहेतोः प्रसूत्याम् ॥ ३५ ॥
गुर्वर्थे वा बालपुष्ट्याभिषङ्गां गां वै दातुं देशकालोऽविशिष्टः । (म. भा. अनुशा. अ. ७१)

‘ दान करण्यासाठीं गाय उत्तम स्वभावाची, मोठ्या कांस्याच्या भांड्यांत जीचें दोहन होतें अशी, जीचीं उत्तम वासरें आहेत. जी पळून जात नाहीं, अशी असावी. तसेंच दान करावयाचा बैल सुद्धां पुष्कळ भार वाहून नेणारा, पुष्कळ सामर्थ्यशाली, तरुण, वीर्यवान्, मोठ्या शरीराचा असावा. अशा बैलाचें दान केल्यानें स्वर्गलाभ होतो. गाईचा भक्त, गोपालक असेल गाईंविषयीं कृतज्ञ असेल, वृत्तिहीन असेल अशा विद्वानाला गाय दान करावी. शिष्यानें गुरूला उत्तम दान द्यावें. ’ या प्रकारें महाभारतांत गोदान आणि वृषभदानाचें वर्णन केलें आहे. प्रत्येक ब्राह्मण गाईचें दान घेण्यास अधिकारी असत नाहीं. याविषयीं महाभारतांत आणि अथर्ववेदाच्या सूक्तांत पुष्कळ नियम आहेत. त्यांचा वाचकांनीं अवश्य विचार करावा.

असद्वृत्ताय पापाय लुब्धायानृतवादिने ।
हव्यकव्यव्यपेताय न देया गौः कथंचन ॥ १५ ॥
भिक्षवे बहुपुत्राय श्रोत्रियायाहिताग्नये ।
दत्वा दशगवां दाता लोकानाप्नोत्यनुत्तमान् ॥७६॥
(म. भा. अनुशा. अ. ६९)

‘ दुराचारी, पापी, असत्यभाषणी, हव्यकव्य न करणाऱ्याला गाईचें दान कधीं देऊं नाहीं. भीक्षेवर जीवन निर्वाह करणारा, पुष्कळ पुत्रांनीं युक्त, वेदज्ञानी अशा अग्निहोत्र्याला गोदान करण्यानें स्वर्ग प्राप्त होतो. ’ असें महाभारतांत सांगण्यांत आलें आहे. तें पहातां ध्यानीं येतें की विद्वान् सदाचारी आचार्यालाच गाईचें दान देणें उत्तम समजलें जातें. केवळ ब्राह्मण कुळांत उत्पन्न झाल्यानें गाय घेण्याचा अधिकार होऊं शकत नाहीं. तसेंच अथर्ववेदांत इतरत्र म्हटलें आहे तें पहा—

यो ददाति शतौदनाम् (अ. १०।९।५,६,१०)
ब्राह्मणेभ्यो वशां दत्वा सर्वांल्लोकान्समश्नुते ॥ (अ. १०।१०।३३)
आपो देवीर्मधुमतीर्घृतश्चुतो ब्रह्मणां हस्तेषु प्र पृथक्सादयामि ॥ (अ. १०।९।२७)

' शतौदना गाईचें दान तो करतो. ब्राह्मणांना गोदान केल्यानें सर्व श्रेष्ठ लोकांची प्राप्ति होते. ब्राह्मणांच्या हातावर दानाचें उदक वेगवेगळें सोडतो, म्हणजे दान करतो. ' या मंत्रांवरून स्पष्ट बोध होतो की ब्राह्मणांना गाईचें दान दिलें पाहिजे. कोणत्या ब्राह्मणास कशा प्रकारचें दान द्यावयाचें याचा विचार केला पाहिजे. खालीं दिलेल्या मंत्रांत त्याचें उत्तर आहे–

शिरो यज्ञस्य यो विद्यात्स वशां प्रतिगृह्णीयात्
य एवं विद्यात्स वशां प्रतिगृह्णीयात् ॥
य एवं विदुषे वशां ददुस्ते गतास्त्रिदिवं दिवः ॥
सा वशा दुष्प्रतिग्रहा ॥ (अ. १०।१०।२;२७;३२;२८)

' जो यज्ञाच्या शिरास म्हणजे मुख्य भागास चांगल्याप्रकारें जाणतो त्यानें गाईचें दान घ्यावें, जो या ज्ञानानें युक्त आहे त्यानें दान घ्यावें. जो याप्रकारें गाईचें दान करतो, त्याला स्वर्ग प्राप्त होतो. इतरांनीं म्हणजे ज्यांना हें ज्ञान नाहीं, त्यांनीं गाईचें दान घेऊं नये. '

या मंत्रांत विशेष ज्ञानी, आत्मनिष्ठ ब्राह्मणाला गाईचें दान करावें हें योग्य होय असें स्पष्ट सांगितलें आहे. म्हणून ब्राह्मणास गोदान करण्यांत कांहीं पक्षपात नाहीं. जो ब्राह्मण राष्ट्रांतील नवयुवकांस ज्ञान देतो, आणि जो धर्माची मूर्ति आहे, गाईचें दान करण्यास तो सुपात्र समजावा. ब्राह्मण जातींत जन्मला असून जो पापी आहे अशा मनुष्यास कदापि गाईचें दान करूं नये. गाई बैलाच्या दानाविषयीं हा समान उपदेश आहे.

अपां यो अग्रे प्रतिमा बभूव प्रभूः सर्वस्मै पृथिवीव देवी । (मं. २)

' बैलास उपमा केवळ मेघाची आहे, तो सर्वांचा प्रभु आणि पृथ्वीदेवीच्या समान सर्वांचा उपकारक आहे. ' ज्याप्रमाणें जलदान करण्यानें मेघ सर्वांना जीवन देतो, आणि अन्न देण्याच्या कारणें पुष्टीचा हेतु होतो, त्याप्रमाणें बैलसुद्धां अन्न उत्पन्न करतो, शेतीस साधन भूत आहे आणि गाईच्या द्वारें अमृतरूपी जीवनरस देतो. मेघ आणि बैल समान प्रकारें उपकारक आहेत. म्हणून वेदांत बैलास मेघाची उपमा दिली आहे. हा बैल आम्हांस–

साहस्रे पोषे अपि नः कृणोतु । (मं. २)

' हजारों प्रकारच्या पुष्टींत राखो. ' म्हणजे आमचा उत्तम प्रकारें सहाय्यक होवो. त्यानंतरच्या मं. ३ आणि ४ मध्यें बैलाच्या उत्तम गुणांचें वर्णन आहे, तें अगदीं स्पष्ट आहे. पांचव्या मंत्रांत (**सोमस्य भक्षः**) सोमाचें अन्न तयार करण्याचें वर्णन आहे. सोमरसांत दूध मिसळलें असतां उत्तम पेय होतें, असें वेदांत इतरत्र सांगितलें आहे. त्या सोमाच्या अन्नाचा येथें उल्लेख आहे. (**ओषधीनां रसः**) औषधींच्या रसासह गाईचें दूध पिण्याचीही वैदिक रीत येथें विचारार्ह आहे. बैलामुळें गाईंत दूध उत्पन्न होतें म्हणजे या पेयाचें कारण बैल आहे, असें येथें सांगण्यांत आलें आहे तें योग्य आहे. हा बैल—

सोमेन पूर्णं कलशं बिभर्ति । (मं. ६)

' सोमरसानें भरलेला कलश धारण करतो. ' हा अमृत रसाचा कलश म्हणजे गाईची कांस अथवा आंचळें होत. त्यांत विपुल दूध रहातें. गाईचें दूधसुद्धां सोमरसानें युक्त असतें. ती सोमशक्ति सोमादि शुद्ध वनस्पतींच्या भक्षणानें गाईंत उत्पन्न होते, ही गोष्ट स्पष्ट आहे. याप्रकारें सोमरसाचा आधार बैल–

इंद्रस्य रूपं वसानः । (मं. ७)

' इंद्राच्या रूपास धारण करणारा आहे. ' हा बैल इंद्राची शक्ति स्वतःमध्यें धारण करतो, म्हणून त्याला—

आज्यं बिभर्ति घृतमस्य रेतः साहस्रः पोषस्तमु यज्ञमाहुः । (मं. ७)

' तूप धारण करणारा, वीर्याचें स्थान, हजारों प्रकारची पुष्टी देणारा असें म्हटलें जातें. ' विचार करण्यानें ही गोष्ट वाचकांच्या ध्यानीं सहज येईल. जर बैल हा गाईंत जास्त दूध उत्पन्न करण्याचा हेतु आहे तर तो तूप आणि वीर्य धारण करणारा, व वाढविणारा निश्चितच आहे, कारण कीं दूध वाढविणारा तोच वीर्य वाढविणारा असतो. गाईचें दूध वैद्यक ग्रंथांत (**सद्यः शुक्रकरं स्वादु**) त्वरीत वीर्य वाढविणारें म्हटलें आहे. हजारों इतर उपायांनीं जें शरीराचें पोषण होतें तें या एकट्या गाईच्या दुधानें होतें. असें सामर्थ्य गाईच्या दुधाचें आहे. गाईचें आणि बैलाचें इतकें महत्त्व असल्यानें त्याचें काव्यमय वर्णन या सूक्तांत पुढें करण्यांत आलें आहे. त्याच्या प्रत्येक अवयवांत ईश्वराचा अंश आहे हें मं. ८ ते १६ मध्यें सांगितलें आहे. प्रत्येक अवयवांत कोणत्या देवाचा अंश आहे हें पाहिल्यानें गाईचें आणि बैलाचें शरीर देवतामय आहे ही गोष्ट स्पष्ट होते. जणुं काय गाईचें दूध देवतांचें सत्त्वच आहे. येथें वाचकांनीं असा विचार करावा कीं वेदानें गाईच्या दुधाचें जें एवढें महात्म्य वर्णन केलें आहे ते एवढ्यासाठीं कीं वैदिक धर्मी लोकांनीं गाईचें दूध प्यावें व गाईचें तूप इत्यादींचें सेवन करावें, म्हशीच्या दुधाचा उपयोग कधींहि करूं नये.

१७ व्या मंत्रांत, हा बैल शिंगानीं राक्षसांचा नाश करतो आणि नजरेनें अकालाचा नाश करतो असें म्हटलें आहे. जरी हें वर्णन अलंकारिक असलें तरी तें सत्य आहे. बैलाचे मानवजाती-

*

वर इतके अनंत उपकार आहेत की, त्याचें यथार्थ वर्णन असंभवनीय आहे. राक्षसांचा नाश करणाऱ्या बैलाचें वर्णन शतपथ ब्राह्मणांत अशा प्रकारें आहे.

मनोर्ह वा ऋषभ आस । तस्मिन्नसुरघ्नी सपत्नघ्नी वाक्प्रविष्टास ।
तस्य ह श्वसथाद्रिवथादसुररक्षसानि मृद्यमानानि यन्ति । त हासुराः समूदिरे पापं बत नोऽयमृषभः सचते कथं न्विमं दभ्नुयामेति० ॥(श. ब्रा १)

'मनूचा एक बैल होता. त्याच्यांत असुरांचा आणि शत्रूंचा नाश करणारी वाणी प्रविष्ट झाली होती. त्यामुळें त्याच्या श्वासानें असुर आणि राक्षस मर्दित होऊन नष्ट होत असत. ते असुर एकत्र येऊन विचार करूं लागले, हा फार पापी आहे. त्याच्या कशा प्रकारें नाश करावा' वगैरे; हें वर्णन अलंकारिक आहे. पण त्याचा इतकाच अर्थ करावयाचा कीं, बैलांत असुरनाशक शक्ति आहे.

१८ व्या मंत्रांत ब्राह्मणास बैलाचें दान करण्याचें महत्त्व पुनः सांगण्यांत आलें आहे. त्याचें एक दान शेंकडों दानासमान आहे, हें कथन पण खास मनन करण्यासारखें आहे. त्यानंतरच्या तीन मंत्रांत बैलाच्या दानाचें महत्त्व वर्णिलें आहे. या विषयीं पूर्वी पुष्कळ लिहिलें आहे, याचप्रमाणें शेवटच्या तीन मंत्रांत बैलाच्या इंद्रशक्तीचें वर्णन आहे. असे बैल गाईबरोबर ठेवण्याचा उपदेश शेवटच्या मंत्रांत दिला आहे. या सर्वांत गाय आणि बैल यांचें महत्त्व वर्णन करण्यांत आलें आहे. वाचकांनीं या सर्व उपदेशाचें महत्त्व समजून बैलाचें स्वतःच्या घरांत स्वागत करावें आणि विशेष लाभ करून घ्यावा.

गोशाळा

कांड ३, सूक्त १४

(ऋषिः - ब्रह्मा । देवता - नानादेवताः गोष्ठदेवता ।)

सं वो॑ गो॒ष्ठेन॑ सु॒षदा॒ सं र॒य्या सं सुभू॑त्या । अह॑र्जातस्य॒ यन्नाम॒ तेना॑ व॒: सं सृ॑जामसि ॥ १ ॥
सं व॒: सृजत्वर्य॒मा सं पू॒षा सं बृह॒स्पति॑: । समिन्द्रो॒ यो ध॑नंज॒यो मयि॑ पुष्यत॒ यद्व॑सु ॥ २ ॥

अर्थ— हे गाईनो ! (वः सुषदा गोष्ठेन सं) तुम्हांला बसण्यासाठीं चांगली गोशाळा तयार करतों. (रय्या सं) चांगल्या पाण्याची तेथें व्यवस्था करतों. (सु-भूत्या सं) रहाण्यासाठीं उत्तम अथवा प्रजननासाठीं सुद्धां योग्य व्यवस्था करतों. (यत् अहर्जातस्य नाम) जी दिवसभरांत श्रेष्ठ वस्तु मिळते (तेन वः संसृजामसि) ती तुमच्यासाठीं राखून ठेवतों. [१]

(अर्यमा वः संसृजतु) अर्यमा तुम्हांस प्राप्त करो, (पूषा सं बृहस्पतिः सं) पूषा आणि बृहस्पतिसुद्धां तुम्हांला मिळवोत. (यः धनंजयः इन्द्रः सं सृजतु) जो धन प्राप्त करणारा इंद्र आहे तो तुम्हांस धन देवो. (यत् वसु) जें धन तुम्हांपाशीं आहे तें (मयि पुष्यत) माझ्या ठायीं तुम्हीं पुष्ट करा. [२]

भावार्थ— गाईसाठीं उत्तम प्रशस्त आणि स्वच्छ गोठा तयार करावा. गाईंना उत्तम स्वच्छ पाणी पाजावें, तसेंच गाईंना उत्तम संतति होईल याविषयीं दक्षता राखावी. दिवसभरांत गाईच्या लायक जे जे पदार्थ मिळतील ते संभाळून ठेऊन गाईला अर्पण करण्यांत यावेत, इतकें गाईवर प्रेम करावें. [१]

अर्यमा, पूषा, बृहस्पति तसेंच धन प्राप्त करणारा इंद्र इत्यादि सर्व देव गाईला पुष्ट करतात. तसेंच पुष्ट गाईकडून जो पोषक रस मिळतो तो दुध पाजून पुष्टिसाठीं मला मिळो. [२]

संजग्माना अबिभ्युषीरस्मिन्गोष्ठे करीषिणीः । बिभ्रतीः सोम्यं मध्वनमीवा उपेतन ॥ ३ ॥
इहैव गाव एतनेहो शकेव पुष्यत । इहैवोत प्र जायध्वं मयि संज्ञानमस्तु वः ॥ ४ ॥
शिवो वो गोष्ठो भवतु शारिशाकेव पुष्यत । इहैवोत प्र जायध्वं मया वः सं सृजामसि ॥ ५ ॥
मया गावो गोपतिना सचध्वमयं वो गोष्ठ इह पोषयिष्णुः ।
रायस्पोषेण बहुला भवन्तीर्जीवा जीवन्तीरुप वः सदेम ॥ ६ ॥

अर्थ— (अस्मिन् गोष्ठे संजग्मानाः अ-बिभ्युषीः) या गोशाळेंत मिळूनमिसळून राहून आणि निर्भय होऊन (करीषिणीः) शेणाचें उत्तम खत निर्माण करणाऱ्या तसेंच (सोम्यं मधु बिभ्रतीः) शांत मधुररस-दुधाला धारण करून (अन्-अमीवाः उपेतन) निरोगी अवस्थेंत आमच्या जवळ या. [३]

हे (गावः) गाईंनो ! (इह एव एतन) येथेंच या आणि (इहो शाका इव पुष्यत) येथें भाजीप्रमाणें पुष्ट व्हा. (उत इह एव प्रजायध्वं) आणि येथेंच वासरांस जन्म देत तुमची वृद्धि होऊं द्या. (वः संज्ञानं मयि अस्तु) तुमचें प्रेम माझ्याशीं जोडा. [४]

(वः गोष्ठः शिवः भवतु) तुमचा गोठा तुम्हांस कल्याणकारी होवो. (शारि-शाका इव पुष्यत) साळीच्या ताटाप्रमाणें पुष्ट व्हा, (इह एव प्रजायध्वं) येथें प्रजा उत्पन्न करीत वृद्धि पावा, (मया वः संसृजामसि) माझ्याबरोबर तुम्हांस फिरण्यास घेऊन जातो. [५]

हे (गावः) गाईंनो ! (मया गोपतिना सचध्वं) मज-गोपालकाशीं मिळून मिसळून रहा. (वः पोषयिष्णुः अयं गोष्ठः इह) तुम्हांस पुष्ट करणारी ही गोशाला जी येथेंच आहे. (रायः पोषेण बहुलाः भवन्तीः) शोभेच्या वृद्धीनें महत्त्व पावणाऱ्या (जीवन्तीः वः जीवाः उपसदेम) जीवंत रहाणाऱ्या तुला आम्हीं सर्व प्राप्त करतों. [६]

भावार्थ— उत्तम खत होणारें शेण उत्पन्न करणाऱ्या, दुधासारखा मधुर रस देणाऱ्या, निरोगी आणि निर्भय स्थानीं स्वेच्छेनें हिंडण्या-फिरणाऱ्या गाई या उत्तम गोशाळेंत येऊन वास्तव्य करोत. [३]

गाई या गोशाळेंत येवोत, येथें धष्टपुष्ट होवोत, येथें पुष्कळ संतति निर्माण करोत आणि गाईंच्या मालकासह आनंदानें-प्रेमानें राहोत. [४]

गोठा गाईंना कल्याणकारक होवो. येथें गाई पुष्ट होवोत, आणि संतान उत्पन्न करून वाढोत. गाईंच्या मालकानें स्वतः गाईंच्या व्यवस्थेविषयीं काळजी घ्यावी. [५]

गाईंनीं स्वतःच्या धन्याशीं मिळून मिसळून रहावें. ही गोशाळा अत्यंत उत्तम आहे. यांत राहून गाई पुष्ट होवोत. त्यांची शोभा आणि पुष्टि वाढून येथें पुष्कळ गाई मोठ्या होवोत, आणि अशा उत्तम गाई मिळवून आम्हीं त्या पाळूं. [६]

गो-संवर्धन

हें सूक्त अगदीं सोपें आहे, म्हणून त्याचें विशेष विवरण करण्याची जरूरी नाहीं. यांत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांचा सारांश असा, गाईसाठीं उत्तम गोठा तयार करावा. गवत-धान्य, पाणी यांची उत्तम व्यवस्था असावी, धन्यावर गाईंनीं व गाईवर धन्यानें प्रेम करावें. गाई निर्भय रहाव्यात. त्यांना भयभीत करण्यांत येऊं नये. कारण भयभीत गाईंच्या दुधाचा परिणाम वाईट होतो. गाय व्याली असतां तिची संतति उत्तम व्हावी, तसेंच गाईनें पुष्कळ दुध द्यावें याविषयीं विशेष काळजी घ्यावी. तसेंच गाईंची पुष्टि आणि आरोग्य यांची चांगली काळजी घेतली जावी. म्हणजे गाईंना जर पुष्ट करण्यांत आलें तर त्यांची संतति सुद्धां निरोगी उत्पन्न होईल. गोपालनाची उत्तम व्यवस्था असावी. गोठ्यांत वा आसपास कोणताहि रोग उत्पन्न होऊं नये. गाईच्या शेणाचा उपयोग खत म्हणून करावा.

हें सूक्त वाचलें असतां अशा प्रकारचा बोध प्राप्त होतो. सूक्त अत्यंत सोपें असल्यानें वाचकांनीं त्याचें मनन करावें व योग्य बोध प्राप्त करावा.

गाईंचें पालन

कांड ७, सूक्त ७५

(ऋषिः – उपरिबभ्रवः । देवता – अघ्न्याः ।)

प्रजावंतीः सूयवंसे रुशन्तींः शुद्धा अपः सुप्रपाणे पिबन्तीः ।
मा वं स्तेन ईशत माघशंसः परि वो रुद्रस्य हेतिर्वृणक्तु ॥ १ ॥
पदुज्ञा स्थ रमतयः संहिता विश्वनाम्नीः । उप मा देवीर्देवेभिरेत ।
इमं गोष्ठमिदं सदो घृतेनास्मान्त्समुक्षत ॥ २ ॥

अर्थ—(प्रजावतीः) उत्तम वासरांची माता **(सूयवसे रुशन्तीः)** उत्तम गवतासाठीं फिरून हिंडून **(सु-प्र-पाणे शुद्धाः अपः पिबन्तीः)** उत्तम जल स्थानावर शुद्ध पाणी पीणाऱ्या गाई व्हा. हे गाईंहो ! **(स्तेनः वः मा ईशत)** चोर तुम्हांवर अधिकार न चालवो. **(मा अघशंसः)** पापीसुद्धां तुम्हांवर हुकुम न गाजवो. **(रुद्रस्य हेतिः वः परिवृणक्तु)** रुद्राचीं शस्त्रें तुमचें रक्षण करोत. [१]

हे **(रमतयः)** आनंद देणाऱ्या गाईंनों ! **(पदज्ञाः स्थ)** तुमच्या रहाण्याचें ठिकाण ओळखणाऱ्या व्हा. **(संहिताः विश्वनाम्नीः देवीः)** एकत्रित झालेल्या अनेक नांवांच्या गाई, **(देवेभिः मा उप एत)** दिव्य वासरांसह आमच्या जवळ येवोत, **(इमं गो-स्थं, इदं सदं)** हा गोठा आणि हें घर तसेंच **(अस्मान्)** आम्हां सर्वांस **(घृतेन सं उक्षत)** तुपानें युक्त करा. [२]

भावार्थ— गाई उत्तम गवत खाणाऱ्या आणि शुद्ध पाणी पिणाऱ्या होवोत. त्यांना पुष्कळ वासरें होवोत. कोणी चोर अथवा पापी त्यांना घेऊन न जावोत. महा वीरांची शस्त्रें त्यांचें रक्षण करोत. [१]

गाई आम्हांस आनंद देवोत. त्यांनीं स्वतःचा गोठा ओळखावा, मिळून खेळीमेळीनें रहावें, अनेक नांवांच्या दिव्य गाई त्यांच्या वासरांसह आमच्याजवळ येवोत आणि आम्हांस भरपूर तूप देवोत. [२]

या सूक्तांत सुद्धां गोपालनाचा उपदेश केला आहेत तो ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. वाचकांनीं या सूक्ताशीं ७।७३ व्या सूक्ताची तुलना अवश्य करून पहावी.

गाईस सामर्थ्य संपन्न करणें

कांड ७, सूक्त १०४

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – आत्मा)

कः पृश्निं धेनुं वरुणेन दुत्तामथर्वणे सुदुघां नित्यवत्साम् ।
बृहस्पतिना सख्यं जुषाणो यथावशं तन्वः कल्पयाति ॥ १ ॥

अर्थ—(वरुणेन अथर्वणे दत्तां) वरुणानें अथर्व्याला म्हणजे निश्चल योग्याला दिलेली **(सुदुघां नित्यवत्सां पृश्निं धेनुं)** सहज दोहण्या योग्य वासरांसह रहाणाऱ्या विविधरंगी गाईला **(बृहस्पतिना सख्यं जुषाणः)** ज्ञान्यासह मित्रता करून **(यथावशं तन्वः ' कः = प्रजापतिः कल्पयाति)** इच्छेनुसार शारीराच्या बाबतींत प्रजेचें पालन करणाराच समर्थ करतो. [१]

(हें सूक्त अद्याप तितकेंसें स्पष्ट झालेलें नाहीं. वाचकांनीं त्याचा विचार करवा. गाईची शारीरिक शक्ति वाढविण्याचा विषय त्यांत आहे. गाईंचें दूध देण्याची शक्ति तसेंच दुसऱ्या शक्ति वाढविण्याचा उपदेश यांत आहे. प्रजेच्या पालकानें ज्ञान्याशीं चर्चा करून व त्याची सल्ला मसलत घेऊन गाईंना आरोग्य संपन्न कराव्यात, यांत असा आशय असावा असें वाटतें. परंतु संपूर्ण मंत्र नीट ध्यानीं येत नाहीं.)

गाईवर चिन्ह

कांड ६, सूक्त १४१

(ऋषिः – विश्वामित्रः । देवता – अश्विनौ ।)

वायुरेनाः समाकरत्त्वष्टा पोषाय ध्रियताम् । इन्द्र आभ्यो अधि ब्रवद्रुद्रो भूम्ने चिकित्सतु ॥ १ ॥
लोहितेन स्वधितिना मिथुनं कर्णयोः कृधि । अकर्तामश्विना लक्ष्म तदस्तु प्रजया बहु ॥ २ ॥
यथा चक्रुर्देवासुरा यथा मनुष्या उत । एवा सहस्रपोषाय कृणुतं लक्ष्माश्विना ॥ ३ ॥

अर्थ--(वायुः एना सं आकरत्) वायु या गाईंना एकत्रित करो, (त्वष्टा पोषाय ध्रियतां) त्वष्टा त्यांना पुष्ट करो. (इन्द्रः आभ्यः अधिब्रवत्) इंद्र त्यांना हांक मारो. (रुद्रः भूम्ने चिकित्सतु) रुद्र वृद्धिसाठीं चिकित्सा करो. [१]

(लोहितेन स्वधितिना) लोखंडाच्या सळईनें (कर्णयोः मिथुनं कृधि) कानांवर जोडीचें चिन्ह करा. (अश्विनौ लक्ष्म अकर्ता) अश्विनौ देव चिन्ह करोत, (तत् प्रजया बहु अस्तु) तें संततिसह पुष्कळ कल्याणकारक होवो. [२]

(यथा देवासुराः चक्रुः) ज्याप्रमाणें देवांनीं आणि असुरांनीं चिन्हें केलीं (उत यथा मनुष्याः) आणि ज्याप्रमाणें मनुष्यें करतात, हे अश्विनौ ! (एवा सहस्रपोषाय लक्ष्म कृणुतं) या प्रकारच्या हजारों पुष्टीसाठीं चिन्हें करा. [३]

गाईंना एकत्र कराव्यात, त्यांना पुरेसें पाणी, गवत इत्यादि देऊन पुष्ट करण्यात यावें, आणि रोगरहित राखावें. लोखंडाच्या सळईनें गाईच्या कानांवर चिन्ह करणें योग्य होय. त्यामुळें त्यांना ओळखणें सोपें होतें. अशीं चिन्हें सर्व देशांत करण्यांत येतात, त्यानें पुष्कळ लाभ होतो. वेदामध्यें इतरत्र सुद्धां गाईच्या कानांवर चिन्ह करण्याचा उल्लेख आहे. (अथर्व १२।४।६ पहा.)

गाईची सुधारणा

कांड ६, सूक्त ७०

(ऋषि :– काङ्कायनः । देवता – अघ्न्या ।)

यथा मांसं यथा सुरा यथाक्षा अधिदेवने । यथा पुंसो वृषण्यत स्त्रियां निहन्यते मनः ॥
एवा ते अघ्न्ये मनोऽधि वत्से नि हन्यताम् ॥ १ ॥
यथा हस्ती हस्तिन्याः पदेन पदमुद्युजे । यथा पुंसो वृषण्यत स्त्रियां निहन्यते मनः ॥
एवा ते अघ्न्ये मनोऽधि वत्से नि हन्यताम् ॥ २ ॥

अर्थ—(यथा मांसं) ज्याप्रमाणें मांसांत (यथा सुरा) ज्याप्रकारें दारूंत (यथा अधिदेवने अक्षा) ज्याप्रमाणें जुगाराच्या फाशांत (यथा वृषण्यतः पुंसः) ज्याप्रमाणें बलवान् पुरुषाचें (मनः स्त्रियां निहन्यते) मन स्त्रीमध्यें रमतें, हे (अघ्न्ये) गाई ! (एवा ते मनः वत्से अधिनिहन्यतां) त्याप्रमाणें तुझें मन वासरांत लागो. [१]

(यथा हस्ती पदेन) ज्याप्रमाणें हत्ती स्वतःच्या पायानें (हस्तिन्याः पदं उद्युजे) हत्तीणीच्या पायाशीं लगट करतो, आणि असें बलवान् पुरुषाचें मन स्त्रीमध्यें रत होतें त्याप्रकारें गाईचें मन वासरांवर स्थिर झालें पाहिजे. [२]

यथा प्रधिर्यथोपधिर्यथा नभ्यं प्रधावधि । यथा पुंसो वृषण्यत स्त्रियां निहन्यते मनः ।
एवा ते अघ्न्ये मनोऽधि वत्से नि हन्यताम् ॥ ३ ॥

अर्थ—(यथा प्रधिः) ज्याप्रमाणें लोखंडी धाव चाकावर रहातें, (यथा उपधिः) जसें चक्र त्याच्या आऱ्यावर रहातें, (यथा नभ्यं प्रधौ अधि) जसा चाकाचा मध्य (केंद्र) आऱ्यांच्यामध्यें रहातो, जसें बलवान् पुरुषाचें मन स्त्रीच्या ठिकाणीं रममाण होतें, तद्वत् गाईचें मन वासरावर स्थिर व्हावें [३]

ज्याप्रकारें जुगार, मद्यमांस, स्त्री, व्यसन इत्यादिमध्यें साधारण मनुष्याचें मन रममाण होतें, गुंतून रहातें त्याप्रमाणें चांगल्या मनुष्याचें मन श्रेष्ठ कर्मांत रमलें पाहिजे. गाईचें मन तिच्या वासरांत रमलें पाहिजे. गो शब्दाचा अर्थ इंद्रिय मानला तर प्रत्येक इंद्रियाचा वत्स त्याचें कर्म आहे. तें इंद्रिय शुभ कर्मांत रमो.

या सूक्ताचा अर्थ नीट ध्यानांत येत नाहीं म्हणून त्याचें जास्त संशोधन व्हावयास हवें.

गो-रस

कांड २, सूक्त २६

(ऋषिः - सविता । देवता - पशवः ।)

एह यन्तु पशवो ये परेयुर्वायुर्येषां सहचारं जुजोष ।
त्वष्टा येषां रूपधेयानि वेदास्मिन्तान्गोष्ठे सविता नि यच्छतु ॥ १ ॥
इमं गोष्ठं पशवः सं स्रवन्तु बृहस्पतिरा नयतु प्रजानन् ।
सिनीवाली नयत्वाग्रमेषामाजग्मुषो अनुमते नि यच्छ ॥ २ ॥
सं सं स्रवन्तु पशवः समश्वाः समु पूरुषाः । सं धान्यस्य या स्फातिः संस्राव्येण हविषा जुहोमि ॥ ३ ॥

अर्थ—(पशवः इह आयन्तु) जनावरें येथें येवोत, (ये परा-ईयुः) जीं दूर गेलीं आहेत, (येषां सहचारं वायुः जुजोष) ज्यांचें साहचर्य वायु करतो. (येषां रूपधेयानि त्वष्टा वेद) ज्यांचे रूप त्वष्टा जाणतो. (अस्मिन् गोष्ठे तान् सविता नियच्छतु) या गोठ्यांत सविता त्यांना बांधून ठेवो. [१] (पशवः इमं गोष्ठं संस्रवन्तु) जनावरें या गोठ्यांत एकमिश्र होवोत, (बृहस्पतिः प्रजानन् आनयतु) प्रजापति त्यांना ओळखून घेऊन येवो. (सिनीवाली एषां अग्रं आनयतु) सिनीवाली त्यांच्या अग्रभागांस घेऊन येवो. हे (अनुमते) अनुमते ! (आजग्मुषः नियच्छ) येणाऱ्यांचें नियमन कर. [२] (पशवः अश्वाः उ पूरुषाः सं सं स्रवन्तु) पशु, घोडे आणि मनुष्यें खेळीमेळीनें वागोत. (या धान्यस्य स्फातिः सं) जी धान्याची वृद्धि आहे ती सुद्धां अधिक वाढो. मीं (सं स्राव्येण

भावार्थ- जी जनावरें शुद्ध वायुमध्यें चरण्या-फिरण्यास गेलीं आहेत तीं सर्व एकत्र होऊन गोशालेंत परत येवोत. त्यांचीं चिह्नें त्वष्टा जाणतो. सविता त्यांना गोठ्यांत बांधून ठेवो. [१] सर्व पशु एकत्रित होऊन गोठ्यांत येवोत. त्यांना ओळखणारा बृहस्पति त्यांना घेऊन येवो. सिनीवालीनें पूर्व भागीं रहावें आणि अनुमतीनें बाकी येणाऱ्या ढोरांचें नियमन करावें. [२] घोडे वगैरे सर्व पशु आणि मनुष्यें सुद्धां खेळीमेळीनें राहोत, धान्य सुद्धां वाढत राहो. सर्वांस प्राप्त होणाऱ्या हवीनें मीं यज्ञ

सं सिञ्चामि गवां क्षीरं समाज्येन बलं रसम् ।
संसिक्ता अस्माकं वीरा ध्रुवा गावो मयि गोपतौ ॥ ४ ॥
आ हरामि गवां क्षीरमाहार्षं धान्यं१ रसम् । आहृता अस्माकं वीरा आ पत्नीरिदमस्तकम् ॥५॥

हविषा जुहोमि) प्राप्त केलेल्या हवीनें हवन करतों. [३] (गवां क्षीरं सं सिञ्चामि) गाईचें दुध मीं सिंचन करतों, (बलं रसं आज्येन सं) बलवर्धक रस तूपांत मिसळतो. (अस्माकं वीराः संसिक्ताः) आमचे वीर शिंपीले गेले. (मयि गोपतौ गावः ध्रुवाः) मी गोपालक माझ्या ठिकाणीं गाई स्थिर होवोत. [४] (गवां क्षीरं आ हरामि) गाईचें दूध मीं आणतों, (धान्यं रसं आहार्षं) धान्य आणि रस आणतों. (अस्माकं वीराः आहृताः) आमचें वीर आले आहेत. आणि (पत्नीः इदं अस्तकं आ) आणि पत्नी या घरांत आणल्या आहेत. [५]

करतो. [३] मीं गाईचें दूध घेतों, आणि या बलवर्धक रसांत तूप मिसळून तें सेवन करतों. आमच्या वीरांस आणि बालकांस ते पेय देण्यांत येतें. त्या कार्यासाठीं आमच्या घरांत गाई हंमेशा असोत. [४] मीं गाईचें दूध आणतों, वनस्पतीचा रस तसेंच धान्यहि आणतों. आमच्या वीरांना आणि बालकांना एकत्र करतों. घरांत पत्नींना आणण्यांत येतें आणि सर्व या पौष्टिकरसाचें सेवन करतात. [५]

गो-रस

पशुपालन

घरांत पुष्कळ पशु म्हणजे गाई, घोडे, बैल इत्यादि पाळले पाहिजेत. तें एकप्रकारचें धन आहे. हल्लीं फक्त रुपयानांच धन मानण्यांत येतें, परंतु उपयोगाच्या दृष्टीनें पहातां गाय वगैरे पशु हेंच खरें धन आहे. त्यांची चांगली व्यवस्था करण्याविषयीं उपदेश या सूक्ताच्या पहिल्या दोन मंत्रांत दिला आहे. हल्लीं घरांतून विशेषतः गाईसारखे पशु पाळण्यांत येत नाहींं. क्वचित् खेडेगांवातून कोणाच्या घरांतून एक दोन गाई असतील. पण बहुंशी शहरांत कोणीं गाई संभाळत नाहींत. शहरी लोक दूध अथवा तूप विकत घेतात. इतका रिवाज बदलून गेल्यामुळें या सूक्तातील उपदेश निरर्थक वाटेल. परंतु वाचकांनीं स्वतःस वैदिक कालांत घेऊन जाऊन कल्पना करावी कीं ऋषिकालीं ऋषीमुनीं जवळ हजारों गाई असत आणि त्या प्रमाणांत इतरहि अनेक पशु असत; अशा घरांसाठीं हा उपदेश उपयुक्त होता.

भ्रमण आणि परत येणें

गाय वगैरे पशूनां शुद्ध हवेंत फिरण्यास सोडणें आवश्यक आहे. त्यांस जर शुद्ध हवा आणि सूर्यप्रकाश न मिळेल तर त्यांचें आरोग्य चांगलें रहाणार नाहीं. तसेंच त्यांचे दूध गुणकारी होणार नाहीं. म्हणून—

येषां सहचारं वायुः जुजोष । (मं. १)

'ज्यांचे साहचर्य वायु करतो' हें प्रथम मंत्राचें वाक्य गाईंनीं आरोग्यासाठीं शुद्ध हवेंत फिरणें जरुरीचें आहे ही गोष्ट सांगतें. तसेंच—

ये पशवः परा ईयुः ते इह आयन्तु (मं. १)

'जे पशु बाहेर फिरावयास गेले असतील ते एकत्रित होऊन परत येवोत.' या मंत्रभागांत सुद्धां हीच गोष्ट सांगितली आहे. सर्व गुरें स्वस्थानांतून बरोबरच बाहेर जावींत आणि बरोबरच परत यावींत. मागेंपुढें कुठें एखादें राहिलें तर त्यास शोधावें लागेल. ती यातायात वांचवण्यासाठीं सर्व जनावरें क्रमानें एकत्रित जावींत आणि परत सर्व एकदमच यावींत. असें या मंत्रांत सांगितलें आहे. हा आदेश अत्यंत उपयुक्त आहे.

जेथें हजारों पशु असतील तेथें एका गुराख्यानें काम भागणार नाहीं; त्यासाठीं अनेक कुशल गुराखी असावेत. त्यांचें वर्णन सविता इत्यादि नांवांनीं या सूक्तांत केलें आहे—

१. त्वष्टा येषां रूपधेयानि वेद (मं. १)
२. सविता अस्मिन् गोष्ठे तान् नियच्छतु। (मं १)
३. बृहस्पतिः प्रजानन् आनयतु । (मं. २)
४. सिनीवाली एषां अग्रं आनयतु । (मं. २)
५. अनुमते ! आजग्मुषः नियच्छ । (मं. २)

या मंत्रांत देवतांची नांवें प्रत्येक कार्यासाठीं आलीं आहेत. या शब्दांचे देवतावाचक अर्थ प्रसिद्ध आहेत. तरी त्यांचें मूळ धात्वर्थ येथें पहा—

१. **त्वष्टा**– सूक्ष्म करणारा, कुशल कारागीर (**त्वक्ष् तनूकरणे**)

२. **सविता**– प्रेरक (**सु-प्रेरणे**) चालविणारा.

३. **बृहस्पतिः**– ज्ञानवान्, (**बृहस्**) मोठ्यांचा (**पतिः**) स्वामी, पुरोहित, निरीक्षक.

४. **सिनीवाली**– (**सिनी**) अन्नाच्या (**वाली**) बलानें युक्त, अन्न युक्त स्त्री.

५. **अनु-मतिः**– अनुकूल मति राखणारी स्त्री.

या पांच देवतावाचक शब्दांचे हे मूळ शब्दार्थ आहेत आणि त्या अर्थासह हे शब्द येथें प्रयुक्त केले आहेत. ते मूळ अर्थ घेऊन या मंत्रभागांचा अर्थ असा होईल—

१ कुशल कारागीर गाय इत्यादि पशूंच्या आकारांस जाणतो. २ प्रेरक त्यांना गोशाळेंत क्रमपूर्वक नियमनांत ठेवो. ३ जनावरांना ओळखणारे त्यांना घेऊन येवोत. ४ अन्न घेऊन जाणारी स्त्री पशूंच्या पुढें चालो आणि ५ अनुकूल कार्य करणारी येणाऱ्या पशूंबरोबर चालत येवो.

येथें पशुपालनाचा आदेश मिळतो. त्याविषयींचा विचार याप्रमाणें आहे.

(१) पशूंच्या पालनासाठीं एक असा अधिकारी असावा कीं जो पशूंचीं सर्व लक्षणें जाणत असेल. (२) दुसरा कार्यकर्ता असा असावा कीं सर्व जनावरें आपआपल्या स्थानीं आलीं कीं नाहीं हें त्यानें पहावें, आणि त्यांच्या वैरणपाण्याची योग्य व्यवस्था झाली आहे कीं नाहीं. (३) तिसरा निरीक्षक पशूंचें आरोग्य उत्तम जाणणारा असावा, त्यानें पशूंच्या येण्याजाण्यावर देखरेख करावी. (४) जेव्हां गुरेंढोरें गोठ्यांत येतील तेव्हां त्यांना खावयास घालणाऱ्या स्त्रीनें त्या सर्वांच्या पुढें चालावें, तिच्याजवळ पशूंस खावयास घालावयाचें अन्न असावें, (५) तसेंच तिच्या मागून पशूंची अनुकूल कार्यें करणारी जी स्त्री असेल तिनें जावें. याप्रकारें पशूंची योग्य व्यवस्था व्हावी. पुरुषापेक्षां स्त्रिया प्रेमपूर्वक उत्तम व्यवस्था करतात. म्हणून शेवटच्या दोन कार्यासाठीं स्त्रियांस नेमण्याची सूचना वेदानें केली आहे.

जेथें शेंकडों आणि हजारों गाई पाळण्यांत येत असतील अशा ठिकाणीं अशी व्यवस्था होणें अत्यंत आवश्यक आहे; हल्लीं जेथें गाईंच्या अभाव झाल्यासारखें झालें आहे. तेथें अशा मोठ्याप्रमाणावर व्यवस्थेची जरुरी नाहीं, हें स्पष्ट आहे. ही आधुनिक प्रगति आहे जी आपणांस पुष्टिपासून दूर राखते. त्याचा वाचकांनीं अवश्य विचार करावा. ज्या घरांत किमानपक्षीं पांच दहा गाई आहेत त्या घरचीं मनुष्यें तूप-दूध खाऊन-पिऊन कशीं हृष्टपुष्ट होतात आणि ज्या घरांत गाय असत नाहीं त्या घरचीं मनुष्यें कशीं दुबळी असतात, याचा विचार केला तर गोपालनाचा आरोग्याशीं किती घनिष्ट संबंध आहे ती गोष्ट ध्यानीं आल्या वांचून रहात नाही. येथ पावेतों पहिल्या दोन मंत्रांचा विचार झाला. तिसऱ्या मंत्रांत सर्वांनीं एकोप्यानें रहाण्यानें लाभ होतो ही गोष्ट सांगितली आहे. पशु काय किंवा मनुष्यें काय परस्पर मिळून मिसळून खेळीमेळीनें राहून त्यांनीं वृद्धि साधावी, अधिक धान्य प्राप्त करावें, अधिक शेती करून धान्य प्राप्त करावें. याप्रकारें धान्य, वनस्पती आणि गोरस विपुल प्रमाणांत प्राप्त करून त्याच्या योगानें स्वतःची पुष्टि करून उन्नति साधावी. (मं. ३)

दूध आणि पोषक रस

दूध, दहीं, लोणी, तूप, ताक इत्यादि सर्व प्रकारचे गोरस तसेंच इतर पोषक रस विपुल प्रमाणांत प्राप्त केले पाहिजेत. आणि त्यांचें सेवनहि पुरत्या प्रमाणांत केलें पाहिजे. त्याविषयीं मं. ४ आणि ५ यांत स्पष्ट शब्दांत उपदेश दिला आहे. त्या मंत्रांत '**वीराः**' असा शब्द आहे. त्या शब्दाचा प्रसिद्ध अर्थ शूरवीर असा आहे. परंतु वेदांत त्याचा अर्थ, ' पुत्र, बालकें, संतति ' असा सुद्धां होतो. येथें या मंत्रात '**पत्नी**' या शब्दाच्या साहचर्यानें असा अर्थच विशेष लागू पडतो.

मीं गाईचें दूध आणतो, वनस्पतींचा बलवर्धक रस आणि धान्य आणतों, तूप आणतों, घरांत धर्मपत्नी आहे आणि बालकें पण एकत्रित झालीं आहेत अथवा इष्टमित्र वीरपुरुष सुद्धां जमा झाले आहेत. त्या सर्वांच्या इच्छेनुसार हें सर्व खाण्यापिण्यासाठीं देण्यांत येतें. (मं. ४-५)

या दोन मंत्रांचा असा आशय आहे. '**संसिक्ता अस्माकं वीराः**' आमचे वीर वा आमच्या मुलांबाळांवर हा रस शिंपडण्यांत यावा, ज्याप्रमाणें पावसांत गेलें असतां भिजतों त्याप्रमाणें मुलेलेंकरें यांच्यावर दूध, तूप इत्यादि रसांची वृष्टि करण्यांत यावी. '**सं-सिच्**' धातूचा अर्थ उत्तमप्रकारें सिंचन करणें, भिजविणें, असा आहे. गोरस घरांत असला पाहिजे.

तरच हृष्टपुष्टता होऊं शकते. हल्लीं अनेक प्रकारचे रोग अस्तित्वांत आले आहेत त्याचें कारणच हें आहे कीं, मनुष्यास गोरस फार कमी प्रमाणांत मिळतो. त्यामुळें मनुष्याची जीवनशक्ति कमी झाली आहे. वाचकांनीं या गोष्टीचा विचार करावा आणि स्वतः-ची जीवनशक्ति वाढविण्यासाठीं जें कांहीं करण्यासारखें असेल तें करावें. इतर सर्व आरोग्य, सामर्थ्य वगैरे जीवनशक्ति वाढल्यानेंच मिळेल. गोरक्षण, गोवर्धन आणि गोसंशोधन करण्याची किती आवश्यकता आहे आणि राष्ट्रीय तसेंच जातीय जीवनाच्या दृष्टीनें सुद्धां त्याची किती आवश्यकता आहे त्याचा वाचकांनीं विचार करावा.

वैदिक आदेश व्यवहारांत उतरविण्याचा विचार जे लोक करीत आहेत, त्यांनीं या सूक्ताचें उत्तमप्रकारें मनन केलें पाहिजे कारण कीं हा उपदेश असा आहे कीं, तो व्यवहारांत आणतांच त्यापासून प्रत्यक्ष लाभ होण्याचा अनुभव येईल.

गाय आणि यज्ञ

कांड ७, सूक्त ७३

(ऋषिः - अथर्वा । देवता - अश्विनौ ।)

समिद्धो अग्निर्वृषणा रथी दिवस्तप्तो घर्मो दुह्यते वामिषे मधु ।
वयं हि वां पुरुदमासो अश्विना हवामहे सधमादेषु कारवः ॥ १ ॥
समिद्धो अग्निरश्विना तप्तो वां घर्म आ गतम् ।
दुह्यन्ते नूनं वृषणेह धेनवो दस्रा मदन्ति वेधसः ॥ २ ॥
स्वाहाकृतः शुचिर्देवेषु यज्ञो यो अश्विनोश्चमसो देवपानः ।
तमु विश्वे अमृतासो जुषाणा गन्धर्वस्य प्रत्यास्ना रिहन्ति ॥ ३ ॥

अर्थ— हे (वृषणौ अश्विनौ) दोघे बलवान अश्विनौ हो ! (दिवः रथी अग्निः समिद्धः) प्रकाशाचा रथासारखा अग्नि प्रदीप्त झाला आहे. तो (घर्मः तप्तः) तापलेली उष्णताच आहे. तो (वां इषे मधु दुह्यते) तुम्हां दोघांसाठीं मधुर रसाचें दोहन करतो. (वयं पुरु- दमासः कारवः सध- मादेषु वां हवामहे) आम्ही सर्व पुष्कळ घरांनीं युक्त आणि कार्य करणारे पुरुष एकत्र मिळून आनंद करण्याच्या वेळीं तुम्हां दोघांस बोलवितों. [१]

हे (वृषणौ अश्विनौ) बलवान् (दोघे) अश्विनीकुमार हो ! (अग्निः समिद्धः) अग्नि प्रदीप्त झाला आहे. (वां घर्मः तप्तः) आपणांसाठींच हें दूध तापत आहे. म्हणून (आगतं) या. (नूनं इह धेनवः दुह्यन्ते) येथें खरोखर गाई दोहण्यांत येतात. हे (दस्रौ) दर्शनीय देवहो ! (वेधसः मदन्ति) ज्ञानी लोक आनंद करतात. [२]

(यः अश्विनोः देवपानः चमसः यज्ञः) जो अश्विनौ देवांचा, ज्यानें देव रसपान करतात असा चमस रूपी यज्ञ आहे तो (देवेषु स्वाहाकृतः शुचिः) देवामध्यें स्वाहा केल्यानें पवित्र आहे. (विश्वे अमृतासः तं उ जुषाणाः) सर्व देव त्याचें सेवन करतात आणि (तं उ गंधर्वस्य आस्ना प्रत्यारिहन्ति) त्याची गंधर्वाच्या मुखानें पूजा हि करतात. [३]

भावार्थ— हवनाचा अग्नि प्रगट झाला आहे. गाईचें दोहन होत आहे, आणि आम्ही सर्व ऋत्विज देवतांना बोलावीत आहोंत. [१]

हे देव हो ! अग्नि प्रदीप्त झाला आहे, दूध तापत आहे. जिच्यामुळें ज्ञानी आनंदित होतात ती ही गाय दोहीली जात आहे म्हणून तुम्ही येथें या. [२]

ज्यांत देवता रसपान करतात, पवित्र यज्ञाचें सेवन करतात आणि सत्कार करतात असा यज्ञ आहे. [३]

यदुस्रियास्वाहुतं घृतं पयोऽयं स वामश्विना भाग आ गतम् ।
माध्वी धर्तारा विदथस्य सत्पती तप्तं घर्मं पिबतं रोचने दिवः । ॥ ४ ॥
तप्तो वां घर्मो नक्षतु स्वहोता प्र वामध्वर्युश्चरतु पयस्वान् ।
मधोर्दुग्धस्याश्विना तनाया वीतं पातं पयस उस्रियायाः ॥ ५ ॥
उप द्रव पयसा गोधुगोषमा घर्मे सिञ्च पय उस्रियायाः ।
वि नाकमख्यत्सविता वरेण्योऽनुप्रयाणमुषसो वि राजति ॥ ६ ॥
उप ह्वये सुदुघां धेनुमेतां सुहस्तो गोधुगुत दोहदेनाम् ।
श्रेष्ठं सवं सविता साविषन्नोऽभीद्धो घर्मस्तदु षु प्र वोचत् ॥ ७ ॥
हिङ्कृण्वती वसुपत्नी वसूनां वत्समिच्छन्ती मनसा न्यागन् ।
दुहामश्विभ्यां पयो अघ्न्येयं सा वर्धतां महते सौभगाय ॥ ८ ॥

अर्थ— हे (अश्विनौ) अश्विनी कुमार हो (यत् उस्रियासु आहुतं घृतं पयः) जे गाईंत ठेवलेलें घृतमिश्रित दूध आहे, (अयं सः वां भागः) हा तो तुमचा भाग आहे, तुम्ही दोघे (आगतं) या, हे (माध्वी) मधुरता युक्त (विदथस्य धर्तारौ) यज्ञाचे धारक, (सत्पती) उत्तम पालक हो ! (दिवः रोचन तप्तं घर्मं पिबतं) द्युलोकाच्या प्रकाशांत तापलेलें दूध रूपी तेज प्या. [४]

हे (अश्विनौ) अश्विनौ ! (ततः घर्मः वां नक्षतु) तापविलेलें तेजरूपी हें दूध तुम्हां दोघांस प्राप्त होवो. (स्वहोता पयस्वान् अध्वर्युः वां प्रचरतु) हवन करण्याचें दूध घेऊन अध्वर्यु तुम्हां दोघांची सेवा करो. (तनायाः उस्रियायाः मधोः दुग्धस्य पयसः) हृष्टपुष्ट गाईच्या दोहन केलेल्या या मधूर दुधाला (वीतं पातं) प्राप्त करा आणि प्या. [५]

हे (गोधुक्) गाईस दोहणाऱ्या ! (पयसा ओषं उपद्रव) दूध घेवून येथें त्वरित ये. (उस्रियायाः पयः घर्मे आसिञ्च) गाईचें दूध कढईंत ओत आणि तापव. (वरेण्यः सविता नाकं वि अख्यत्) श्रेष्ठ सविता सुखपूर्ण स्वर्गधामास प्रकाशित करतो आणि तो (उषसः अनुप्रयाणं विराजति) उषःकाल संपल्या नंतर विराजतो-शोभतो. [६]

(सुहस्तः एतां सुदुघां धेनुं उपह्वये) उत्तम हाताचा मी त्या सुखानें दोहण्यास योग्य अशा गाईला बोलावितो. (उत गोधुक् एनां दोहत्) आणि गाईचें दोहन करणारा तिला दोहो. (सविता श्रेष्ठं सवं नः साविषत्) सविता श्रेष्ठ अन्न आम्हांस देवो. (अभीद्धः घर्मः तत् उ सु प्रवोचत्) प्रदीप्त तेजस्वी दूध तेंच दाखविलें. [७]

(हिंकृण्वती वसूनां वसुपत्नी) हीं हीं करणारी ऐश्वर्याचें पालन करणारी, (मनसा वत्सं इच्छन्ती नि आगन्) मनांत वासराची इच्छा करून जवळ आली आहे. (इयं अघ्न्या अश्विभ्यां पयः दुहां) ही गाय दोघा अश्विनौसाठीं दूध देवो आणि (सा महते सौभगाय वर्धतां) येथें मोठ्या सौभाग्यासाठीं मोठी होवो. [८]

भावार्थ— गाईचें दूध देवांचा भाग आहे, म्हणून या यज्ञांत या आणि उकळलेला मधूर गो-रस प्या. [४]

हे देव हो ! हा तापवलेला रस तुम्हांस प्राप्त होवो. गाईच्या या मधुर गोरसाचें पान करा. [५]

हे गाईचें दोहन करणाऱ्यांनों ! दूध घेऊन यज्ञांत या. गाईचें दूध तापवा. हवन करा, श्रेष्ठ सवित्यानें हा सुखमय स्वर्ग तुम्हांसाठीं खुला ठेविला आहे. [६]

मीं दूध दोहण्यांत कुशळ आहें, आणि गाईस दोहण्यासाठीं बोलावितों. दोहन करणारा तिचें दोहन करो, सवित्यानें हा श्रेष्ठ रस दिला आहे. [७]

हीं हीं करीत, मनानें वासराची इच्छा करणारी गाय येथें आली आहे. ही अहिंसेला योग्य गाय देवासाठीं दूध देवो, आणि महान् सौभाग्याची वृद्धि करो. [८]

जुष्टो दमूना अतिथिर्दुरोण इमं नो यज्ञमुप याहि विद्वान् ।
विश्वा अग्ने अभियुजो विहत्य शत्रूयतामा भरा भोजनानि ॥ ९ ॥
अग्ने शर्धं महते सौभगाय तव द्युम्नान्युत्तमानि सन्तु ।
सं जास्पत्यं सुयममा कृणुष्व शत्रूयतामभि तिष्ठा महांसि ॥ १० ॥
सुयवसाद्भगवती हि भूया अधा वयं भगवन्तः स्याम ।
अद्धि तृणमघ्न्ये विश्वदानीं पिब शुद्धमुदकमाचरन्ती ॥ ११ ॥

अर्थ— (**दमूना अतिथिः दुरोणे जुष्टः**) संयम करणारा अतिथि घरांत संसेवित होऊन हा (**विद्वान्**) ज्ञानी (**नः इमं यज्ञं उपयाहि**) आमच्या यज्ञांत येवो. हे अग्ने ! (**विश्वा अभियुजः विहत्य**) सर्व शत्रूंचा संहार करून (**शत्रूयतां भोजनानि आभर**) शत्रुत्व करणाऱ्यांचें अन्न आम्हांजवळ आणून दे. [९]

हे (**शर्ध अग्ने**) बलवान् अग्ने ! (**तव उत्तमानि द्युम्नानि महते सौभगाय सन्तु**) तुझीं उत्तम तेजें वाढोत आणि महान् सौभाग्य वाढविणारीं होतोत. (**जास्पत्यं सुयमं सं आकृणुष्व**) स्त्रीपुरुषांचा संबंध उत्तम संयमपूर्वक होवो. (**शत्रूयतां महांसि अभितिष्ठा**) शत्रुत्व करणाऱ्यांच्या सामर्थ्यास तोंड दे. [१०]

हे (**अघ्न्ये**) मारण्यास अयोग्य गाई ! (**सु-यवस-अद् भगवती हि भूयाः**) उत्तम गवत खाणारी भाग्यशाली हो ! (**अधा वयं भगवन्तः स्याम**) आणि आम्हीं भाग्यवान् होऊं. (**विश्वदानीं तृणं अद्धि**) नेहमीं तृण भक्षण कर आणि (**आचरन्ती शुद्धं उदकं पिब**) हिंडून शुद्ध पाणी पी. [११]

भावार्थ— हे इंद्रियसंयमी, अतिथि, विद्वान् आमच्या यज्ञांत येवोत, आमच्या सर्व शत्रूंचा नाश करून शत्रूचे भोग आमच्याजवळ घेऊन येवोत. [९]

हे देवा ! जें तुझे उत्तम तेज आहे तें आमचें भाग्य वाढवो. स्त्रीपुरुष संबंधांत उत्तम नियम राहो. अनियमानें व्यवहार न होवो. शत्रुत्व करणाऱ्यांचा पराभव करा. [१०]

हे गाई ! तूं उत्तम गवत खा आणि भाग्यवान् हो. तुझ्यामुळें आम्हीं भाग्यशाली होऊं. गाय गवत खाते आणि इतस्ततः फिरून शुद्ध पाणी पिते. [११]

गाय आणि यज्ञ

गो-रक्षण

गाईचें कशाप्रकारें रक्षण करावें याविषयीं सूचना या सूक्तांत दिल्या आहेत त्या ध्यानीं राखण्यासारख्या आहेत. पहा—

१. **सुयवस्-अद्**- उत्तम गवत खाणारी, म्हणजे वाईट गवत अथवा कडब्याला तोंड सुद्धां न लावणारी गाय असावी. गाईच्या दुधांत तिनें खाल्लेल्या पदार्थांचें सत्त्व उतरतें, म्हणून जर गाय उत्तम गवत खाईल तर तिचें दूध निरोगी आणि पुष्टिकारक होईल. म्हणून हा उपदेश ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. साधारण अनाडी लोक गाईस सकाळींच चरावयास नेतात आणि त्यावेळीं रानावनांत अथवा परड्यांत गाय मनुष्याचें शौच व विष्ठा सुद्धां खाते. वाचकांनींच विचार करावा कीं असे पदार्थ खाल्ले असतां दूध कसें येईल. विष्ठेमध्यें वाईट तत्त्वें, जंतु असतात त्या सर्वांचा परिणाम या दुधावर होईल आणि असें दूध रोगोत्पादक होईल. म्हणून वेदाचा हा संदेश गोपालन करणाऱ्या लोकांनीं अवश्य ध्यानांत ठेवावा. (मं. ११)

२. **शुद्धं उदकं पिबन्ती**- शुद्ध पाणी पिणारी गाय

व्हावी. अशुद्ध, मलीन, घाणेरडें दुर्गन्ध युक्त जल गाईला पाजूं नये. त्याचें कारण वर दिलें आहे. त्याचा विचार करावा. (मं. ११)

३. आचरन्ती– हिंडणाऱ्या गाई असाव्यात. त्यांनीं चरण्यासाठीं इकडे तिकडे भटकावें. गाईस सारखी घरांत बांधून ठेवूं नये. तिनें सूर्यप्रकाशांत फिरलें पाहिजे. सूर्य प्रकाशांत फिरणाऱ्या गाईचें दूध पीण्यास लायक होतें. (मं. ११)

४. विश्वदानीं तृणं अद्धि– गाईनें नेहमीं गवत खावें. इतर भलते सलते पदार्थ खाऊं नयेत. सातूच्या शेतांत फिरून सातू खावे. यायोगें गाईचें दूध उत्तम होतें. (मं. ११)

५. भगवती भूयाः– बलवान् प्रेममयी, शुभ गुणयुक्त गाय व्हावी. गाईवर प्रेम केल्यानें ती घरच्या मनुष्यांवर प्रेम करते. याप्रकारें प्रेम करणाऱ्या गाईचें दूध प्याल्यानें पीणाऱ्याचें कल्याण होतें. (मं. ११)

हे शब्द गाईचें पालन कसें करावें त्याची सूचना देतात. वाचकांनीं विचार करावा आणि स्वतःच्या गाईचें योग्य प्रकारें पालन करावें.

६. सुदुघा– जी कांहीं त्रास न देतां दोहन करूं देते. दुहतांना जी त्रास देत नाहीं.

७. सुहस्तः गोधुक् एनां दोहतु– उत्तम हाताच्या मनुष्यानें गाय दोहावी. म्हणजे प्रथम स्वतःचे हात साफ करावे आणि नंतरच गाईचें दूध काढावें. या सूचनेचें फार महत्त्व आहे. गुराख्याचे हात दूध काढतांना जर अस्वच्छ असतील तो सर्व मळ दुधांत उतरून सरळ पोटांत जाईल. म्हणून प्रथम हात स्वच्छ करून मग गाय दोहावी. (मं. ७)

८. अघ्न्या– गाय अवध्य आहे. म्हणून तिला मारूं नये. स्वतःच्या मातेवर जसें आपण प्रेम करतों तशा प्रेमानें तिचें पालन करावें. (मं. ८)

९. सा महते सौभगाय वर्धतां– अशी पाळलेली गाय मोठी सौभाग्य युक्त होवो. प्रत्येक घरांत अशी गोमाता असावी अशी आमची सुद्धां इच्छा आहे. (मं. ८)

१०. वत्सं इच्छन्ती– गाय वासरानें युक्त व्हावी. तिचीं वासरें मरूं नयेत. मरत्या वासरांच्या गाईचें दूध पिण्यानें त्या घरांतहि तसेंच घडेल. कारण गाईच्या दुधाच्या दोषानेंच तिचें वासरूं मरतें. तोच दोष पिणाऱ्याच्या वीर्यांत उतरेल. म्हणून गाय वासरांनीं युक्त, वासरांची इच्छा करणारी आपल्या घरांत असावी. (मं. ८)

११. गोधुक् पयसा उपद्रव, उस्रियायाः पयः घर्मे सिञ्च– गाईला दोहन करून दूध लवकरच आणावें, आणि अग्नीवर ठेवावें. त्याचा हेतू असा कीं कच्चें दूध फार वेळ ठेऊं नये. वाटल्यास धारोष्ण दूध प्यावें. काढतांच प्यावें. पण घरांत ठेवावयाचें असलें तर तापवूनच ठेवावें. कारण कीं अनेक प्रकारचे जंतू हवेंतून येऊन दुधांत एकत्रित होतात. म्हणून फार वेळपर्यंत दूध कच्चें ठेवूं नये, लागलींच अग्नीवर तापवून ठेवावें.

१२. मधु दुह्यते– गाईचें दोहन करून जें दूध मिळतें तें अमृत अतएव मधुच आहे. कारण कीं तें अत्यंत मधुर असतें. (मं. १)

१३. तप्तं पिबतं– ऊन केलेलें दूध प्यावें, कारण वर दिलें आहेच. (मं. ४)

या प्रकारें देवांना दूध समर्पण केलें पाहिजे. विशेषतः अश्विनौ देवांचा भाग गाईचें दूध आणि तूपच आहे. ही गोष्ट चवथ्या मंत्रांत सांगितली आहे. अश्विनौ स्वतः देव, देवांचे वैद्य आहेत, म्हणजे त्यांना कोणतें दूध चांगलें अथवा कोणतें नाहीं हें उत्तम प्रकारें माहित आहे. अश्विनौ गाई व्यतिरिक्त इतर दूध पीत नाहींत आणि इतर तूप खात नाहींत. आपण सर्वांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, म्हणून मनुष्यानें गाईचें दूध तूप, खावें-प्यावें. यावरून म्हशीचें दूध पिऊं नये ही गोष्ट सिद्ध होते. तसेंच बाजारांतील दूधहि घेऊं नये. कारण तें योग्यप्रकारें स्वच्छ ठेवण्यांत येत नाहीं. म्हणून घरोघर गाई पाळाव्यात आणि त्यांचें दूध यज्ञांत समर्पण करावें आणि हुतशेष खावें-प्यावें.

पंचौदन अज

कांड ९, सूक्त ५

(ऋषिः - भृगुः । देवता - पञ्चौदनोऽजः ।)

आ न॑यैतमा र॑भस्व सुकृतां॑ लोकमपि॑ गच्छतु प्रजानन् ।
तीर्त्वा तमां॑सि बहुधा महान्त्यजो नाक॒मा क्र॑मतां तृतीय॑म् ॥ १ ॥
इन्द्रा॑य भागं परि॑ त्वा नयाम्यस्मिन्य॒ज्ञे यज॑मानाय सूरिम् ।
ये नो॑ द्विषन्त्यनु तान्र॑भस्वाना॑गसो यज॑मानस्य वीराः ॥ २ ॥
प्र पदोऽव॑ नेनिग्धि दुश्च॑रितं यच्च॒चार॑ शुद्धैः श॒फैरा क्र॑मतां प्रजानन् ।
तीर्त्वा तमां॑सि बहुधा विपश्य॑न्नजो नाक॒मा क्र॑मतां तृतीय॑म् ॥ ३ ॥

अर्थ— (एतं आनय) त्याला येथें आण आणि अशा **(आर भस्व)** कर्मास प्रारंभ करा कीं ज्यामुळें तो **(प्रजानन्)** मार्ग जाणून **(सुकृतां लोकं अपि गच्छतु)** सत्कर्म करणाऱ्यांच्या स्थानास जावो. मार्गांत **(महान्ति तमांसि बहुधा तीर्त्वा)** गाढ अंधःकार अनेक प्रकारें पार करून तो **(अजः तृतीयं नाकं आक्रमतां)** अजन्मा तिसऱ्या धामास प्राप्त होवो. [१]

(अस्मिन् यज्ञे) या यज्ञांत स्थित **(इन्द्राय यजमानाय भागं सूरिं त्वा)** इंद्र आणि यजमानासाठीं भागरूप झालेल्या तुला ज्ञान्याला **(परि नयामि)** सर्वत्र घेऊन जातो. **(ये नः द्विषन्ति)** जे आमचा द्वेष करतात, **(तान् अनुरभस्व)** त्यांचा नाश करण्यास प्रारंभ कर. आणि **(यजमानस्य वीराः अनागसः)** यजमानाचे वीर अथवा पुत्र पापरहित होवोत, [२]

(यत् दुः चरितं चचार) त्यानें जें दुष्कृत्य केलें असेल, **(पदः प्र अव नेनिग्धि)** त्याच्या पायांना धुवून टाका. त्यानंतर, **(शुद्धैः शफैः प्रजानन् आक्रमतां)** शुद्ध पायांनीं पाहून मार्ग आक्रमावा. **(विपश्यन् तमांसि बहुधा तीर्त्वा)** पाहून, सर्व प्रकारच्या अंधःकारास पार करून **(अजः)** तो अजन्मा **(तृतीयं नाकं आक्रमतां)** तृतीय स्वर्गधाम प्राप्त करो. [३]

भावार्थ— त्याला येथें आणा, शुभ कर्मांचा प्रारंभ करा, तुमच्या उन्नतीचा मार्ग जाणून घ्या आणि सत्कर्म करणारे ज्या स्थानीं जातात तें स्थान प्राप्त करा. मार्गांत अंधःकार नडेल, तो पार केला पाहिजे. म्हणजे या प्रकारें तो अजन्मा आत्मा परम उच्च अवस्थेस प्राप्त होतो. [१]

या यज्ञांत तुम्हांस सर्व बाजूस घेऊन जातो. तूं ज्ञानी होऊन प्रभूसाठीं आत्मसमर्पण कर. आणि यज्ञकर्त्यांसह अग्रभागीं हो. जे द्वेष करतात त्यांस दूर कर, याप्रकारें यज्ञकर्त्यांचें कार्य निष्पाप होवो, आणि तो कार्य करो. [२]

पूर्वी जर कांहीं दुराचार झाला असेल तर तो धुवून टाक. आणि शुद्ध पाऊल टाकून मार्ग आक्रमण कर. सर्व अंधकार ओलांडून, जन्ममरणास दूर करून परम उच्च अवस्थेस प्राप्त हो. [३]

अनु च्छ्य श्यामेन त्वचमेतां विशस्तर्यथापर्व१ सिना माभि मंस्थाः ।
माभि द्रुहः परुशः कल्पयैनं तृतीये नाके अधि वि श्रयैनम् ॥ ४ ॥
ऋचा कुम्भीमध्यग्नौ श्रयाम्या सिञ्चोदकमव धेह्येनम् ।
पर्याधत्ताग्निना शमितारः शृतो गच्छतु सुकृतां यत्र लोकः ॥ ५ ॥
उत्क्रामातः परि चेदतप्तस्तप्ताच्चरोरधि नाकं तृतीयम् ।
अग्नेरग्निरधि सं बभूविथ ज्योतिष्मन्तमभि लोकं जयैतम् ॥ ६ ॥
अजो अग्निरजमु ज्योतिराहुरजं जीवता ब्रह्मणे देयमाहुः ।
अजस्तमांस्यप हन्ति दूरमस्मिंल्लोके श्रद्दधानेन दत्तः ॥ ७ ॥

अर्थ— हे (विशस्तः) विशेष शासक ! तूं (एतां त्वचं यथा परु) ही चामडी आणि सांध्याच्या अनुसार (श्यामेन असिना अनुच्छ्य) काळ्या शस्त्रानें कापून टाक, (मा अभि मंस्थाः) अभिमान करूं नकोस, (मा अभि-द्रुहः) कोणाचा द्रोह करूं नकोस, (परुशः एनं कल्पय) सांध्यानुसार त्याला समर्थ कर आणि (तृतीये नाके एनं अधिविश्रय) तिसऱ्या स्वर्गधामांत त्याला स्थापित कर. [४]

(ऋचा कुंभीं अग्नौ अधिश्रयामि) मंत्रानें हें पात्र मीं अग्नीवर ठेवतों, त्यात तूं (उदकं आसिञ्च) पाणी टाक आणि (एनं अवधेहि) त्याला येथें स्थापित कर. हे (शमितारः) शांत करणारे हो ! तुम्हीं (अग्निना पर्याधत्त) अग्निद्वारा चारी बाजूंनीं त्याला धारण करा, तो (शृतः गच्छतु) परिपक्व होऊन तेथें जावो (यत्र सुकृतां लोकः) जेथें सत्कृत्य करणारांचें स्थान असतें. [५]

(अतः तप्तात् चरोः) या तापलेल्या भांड्यांतून (अतप्तः) संतप्त न होतां तूं (परि उत् क्राम) वर चढ आणि (एनं अवश्रेहि) याची तेथें स्थापना कर. (अग्नेः अधि) अग्निवर (अग्निः सं बभूविथ) अग्नि प्रकट होतो म्हणून (एतं ज्योतिष्मन्तं लोकं अभिजय) त्या तेजस्वी लोकाचा जय कर. [६]

(अजः अग्निः) अजन्मा अग्नि आहे, (अजं उ ज्योतिः आहुः) न जन्मणारा तोच आहे असें म्हटलें जातें. (जीवता अजं ब्रह्मणे देयं आहुः) जीवंत मनुष्यानें स्वतःचा अजन्मा आत्मा परब्रह्मासाठीं समर्पण करण्यास योग्य आहे असें म्हणतात. (अस्मिन् लोके श्रद्दधानेन दत्तः) या लोकांत श्रद्धा असणाऱ्यांनीं समर्पित केलेला (अजः तमांसि दूरं अप हन्ति) अजन्मा आत्मा अंधकारास दूर करतो. [७]

भावार्थ— योग्य शासक अथवा छेदक सांध्या अनुसार तीक्ष्ण शस्त्रानें शस्त्र प्रयोग करो आणि रोग आदि दोषांस दूर करो. अभिमान करूं नये, तसेंच कोणाचा द्रोह सुद्धां करूं नये. प्रत्येक अवयवांत सामर्थ्य उत्पन्न करावें आणि परम उच्च स्थान प्राप्त करावें. [४]

शिजविण्याचें भांडें अग्नीवर ठेवावें. त्यांत पाणी ओतावें. सर्व बाजूंनीं उत्तम रीतीनें आंच लावावी आणि शिजलें म्हणजे सुकृत करणारे जेथें बसले असतील तेथें त्यांस तें नेऊन द्यावें. [५]

तापलेल्या भांड्याला अशा प्रकारें बाहेर काढा कीं जणूं तें तापलेंच नाहीं. आणि तें परम उच्च स्थानास प्राप्त व्हावें. अग्नि ब्रह्माग्नि अथवा आत्म्यावर परमात्मा विराजमान आहे. तेजोमय लोक स्वतःच्या शुभ कर्मांनीं प्राप्त करावा. [६]

अजन्मा आत्मा सुद्धां अग्नि म्हटला जातो. अजन्मा परमात्मासुद्धां तेजोमय आहे असें ज्ञानी म्हणतात. जिवंत देह धारण करणाऱ्यांमध्यें जो अजन्मा जीवात्मा तो हा परमात्मा. तो आत्मा परमात्मा अथवा परब्रह्मासाठीं समर्पित होण्यायोग्य आहे, असें ज्ञानी म्हणतात. या लोकीं जर श्रद्धेनें त्याचें समर्पण करण्यांत आलें तर तो अजन्मा आत्मा सर्व अंधकारास दूर करूं शकतो. [७]

पञ्चौदनः पञ्चधा वि क्रमतामाक्रंस्यमानस्त्रीणि ज्योतींषि ।
ईजानानां सुकृतां प्रेहि मध्यं तृतीये नाके अधि वि श्रयस्व ॥ ८ ॥
अजा रोह सुकृतां यत्र लोकः शरभो चत्तोऽति दुर्गाण्येषः ।
पञ्चौदनो ब्रह्मणे दीयमानः स दातारं तृप्त्या तर्पयाति ॥ ९ ॥
अजस्त्रिनाके त्रिदिवे त्रिपृष्ठे नाकस्य पृष्ठे ददिवांसं दधाति
पञ्चौदनो ब्रह्मणे दीयमानो विश्वरूपा धेनुः कामदुघास्येका ॥ १० ॥
एतद्वो ज्योतिः पितरस्तृतीयं पञ्चौदनं ब्रह्मणेऽजं ददाति ।
अजस्तमांस्यप हन्ति दूरमस्मिंल्लोके श्रद्दधानेन दत्तः ॥ ११ ॥

अर्थ— (त्रीणि ज्योतींषि आक्रंस्यमानः) तीनी तेजांवर आक्रमण करणारा (पञ्चौदनः) पांच भोजनें करणारा अजन्मा (पञ्चधा विक्रमतां) पांच प्रकारचा पराक्रम करो. (ईजाननां सुकृतां मध्यं प्रेहि) यज्ञकर्त्या सत्कर्म करणाऱ्यांमध्यें प्राप्त होवो. तो (तृतीये नाके अधिविश्रयस्व) स्वर्गात जावो. [८]

(अज ! आरोह) हे अजन्म्या ! वरचढ. (यत्र सुकृतां लोकः) जेथें शुभ कर्म करणाऱ्यांचें स्थान आहे (चत्तः शरभः न) लपलेल्या वाघाप्रमाणें (दुर्गाणि अति एषः) संकटें पार तरून जा. (पंचौदनः ब्रह्मणे दीयमानः) पांच भोजनें करणारा आत्मा परब्रह्मासाठीं समर्पित होऊन, (सः) तो (दातारं तृप्त्या तर्पयाति) दात्याला तृप्तीनें संतुष्ट करतो. [९]

(अजः) अजन्मा आत्मा (ददिवांसं) आत्मसमर्पण करणाऱ्याला (त्रिनाके त्रिदिवे त्रिपृष्ठे) तीन सुखें देणारा, तीन प्रकाशांनीं युक्त, तीन पृष्ठांच्या आधारानें युक्त, (नाकस्य पृष्ठे) स्वर्ग धामाच्या स्थानावर (दधाति) धारण करतो, (पञ्चौदनः ब्रह्मणे दीयमानः) पांच भोजनाचा जो परब्रह्मास समर्पित होतो असा तूं स्वतः (एका विश्वरूपा धेनुः असि) एक विश्वरूप कामधेनू सारखा होतोस. [१०]

हे (पितरः) पितर हो ! (वः एतत् तृतीयं ज्योतिः) तुमच्यासाठीं हें तिसरें तेज आहे. जो (पञ्चौदनं अजं ब्रह्मणे ददातिः) पांच भोजनें करणाऱ्या अजन्मा आत्म्याचें परब्रह्मासाठीं समर्पण करतो. (श्रद्दधानेन दत्तः अजः) श्रद्धावंतानें समर्पण केलेला अजन्मा आत्मा (अस्मिन् लोके तमांसि दूरं अपहन्ति) या लोकीं सर्व अंधकारास दूर करतो. [११]

भावार्थ— तीन तेजांस प्राप्त करणारा हा आत्मा पांच भोग प्राप्त करणारा आहे, तो पांच क्षेत्रांत पराक्रम करो. यज्ञ करणाऱ्या, शुभ कर्में करणाऱ्यांमध्यें प्रमुख स्थान प्राप्त करो आणि परम उच्च अवस्थेंत विराजमान होवो. [८]

हे जन्म रहित जीवात्म्या ! उच्च मार्गानें चाल. आणि सत्कर्म करणारीं मनुष्यें जेथें पोंहोचतात तेथें, वाघ लपून राहीला तर जसा सुरक्षित असतो तसा, तूं सुरक्षित राहून सर्व कष्टांतून मुक्त हो. पांच भोजनांचा भोग करणारा जीवात्मा परमात्म्यासाठीं समर्पित होऊन समर्पण करणाऱ्याला संतुष्ट करतो. [९]

अजन्मा आत्मा आत्मसमर्पण करणाऱ्याला सर्व प्रकारच्या उच्च, सुखपूर्ण, स्थानासाठीं योग्य होतो. भोजनांचा भोक्ता जीवात्मा परमात्म्याला समर्पित झाल्यावर एखाद्या कामधेनु सारखा होतो. [१०]

जो पांच अन्नांचा भोक्ता जीवात्मा परमात्म्याला समर्पित करावयाचा आहे, तो जणूं काय सर्व पितरांस तृतीय ज्योति देण्याप्रमाणें आहे. तें समर्पण जर श्रद्धेनें झालें तर तें सर्व अज्ञानरूपी अंधारास दूर करतें. [११]

ईजानानां सुकृतां लोकमीप्सन्पञ्चौदनं ब्रह्मणेऽजं ददाति ।
स व्याप्तिमभि लोकं जयैतं शिवोऽस्मभ्यं प्रतिगृहीतो अस्तु ॥ १२ ॥
अजो ह्यग्नेरजनिष्ट शोकाद्विप्रो विप्रस्य सहसो विपश्चित् ।
इष्टं पूर्तमभिपूर्तं वषट्कृतं तद्देवा ऋतुशः कल्पयन्तु ॥ १३ ॥
अमोतं वासो दद्याद्धिरण्यमपि दक्षिणाम् ।
तथा लोकान्त्समाप्नोति ये दिव्या ये च पार्थिवाः ॥ १४ ॥
एतास्त्वाजोप यन्तु धाराः सोम्या देवीर्घृतपृष्ठा मधुश्चुतः ।
स्तभान पृथिवीमुत द्यां नाकस्य पृष्ठेऽधि सप्तरश्मौ ॥ १५ ॥
अजोऽस्यज स्वर्गोऽसि त्वया लोकमङ्गिरसः प्राजानन् । तं लोकं पुण्यं प्र ज्ञेषम् ॥ १६ ॥

अर्थ— (**ईजानानां सुकृता लोकं ईप्सन्**) यज्ञकर्ता शुभकर्म करणाऱ्यांच्या लोकांची प्राप्ती व्हावी अशी इच्छा करणारा जो (**पञ्चौदनं अजं ब्रह्मणे ददाति**) पांच भोजन करणाऱ्या आत्म्याला परब्रह्मासाठीं समर्पित करतो (**सः व्याप्तिं एतं लोकं जय**) असा तूं व्याप्तियुक्त अशा या लोकास जिंकून घे. तो (**प्रतिगृहीतः अस्मभ्यं शिवः अस्तु**) स्वीकृत झालेला आम्हांस कल्याणकारक होवो. [१२]

(**अजः अग्नेः शोकात् हि अजनिष्ट**) अजन्मा आत्मा अग्निरूप तेजस्वी परमात्म्याच्या तेजानें प्रगट झाला आहे. (**विप्रस्य सहसः**) विशेष ज्ञानी परमात्म्याच्या शक्तीनें (**विपश्चित् विप्रः**) तो ज्ञानी चेतन प्रगट झाला आहे. (**इष्टं पूर्तं**) इष्ट आणि पूर्त (**अभिपूर्तं वषट्कृतं तत्**) संपूर्ण यज्ञद्वारा समर्पित त्याला (**देवाः ऋतुशः तत् कल्पयन्तु**) देव ऋतूंना अनुकूल समर्थ करोत. [१३]

(**अमोतं हिरण्यं यं वासः**) बरोबर बसून विणलेले सोनेरी वस्त्र आणि (**दक्षिणां अपि दद्यात्**) दक्षणा सुद्धां द्यावी. (**तथा लोकान् समाप्नोति**) त्यामुळें ते ते लोक प्राप्त करतो (**ये दिव्याः ये च पार्थिवाः**) जे द्युलोकांत आणि पृथ्वीवर आहेत. [१४]

हे (**अज**) अजन्म्या आत्म्या ! (**एताः सोम्याः देवीः**) जें सोमासंबंधीं दिव्य (**घृतपृष्ठाः मधुश्चुतः**) तूप आणि मधानें युक्त (**धाराः त्वा उपयन्तु**) रसधारा तुजजवळ पोहोंचोत आणि तूं (**सप्तरश्मौ अधि**) सात किरणाच्या सूर्यावर (**नाकस्य पृष्ठे द्यां**) स्वर्गाच्या पृष्ठभाग द्युलोकावर (**उत पृथिवीं स्तभान**) आणि पृथ्वीला स्थिर कर. [१५]

हे (**अज**) अजन्म्या ! तूं (**अजः असि**) जन्म रहित आहेस. तूं (**स्वर्गः असि**) सुखमय आहेस. (**त्वया अंगिरसः लोकं प्रजानन्**) तूं तेजस्वी लोकास जाणणारा आहेस. (**तं पुण्यं लोकं प्रज्ञेषं**) त्या पुण्यकारक लोकास मीं जाणूं इच्छितो. [१६]

भावार्थ— यज्ञ करणारा पुरुष ज्या लोकाला प्राप्त करतो, तेथें पंच भोजनी जीवात्मा परमात्म्यासाठीं समर्पण करणारा जातो. म्हणून तूं त्या व्यापक लोकास प्राप्त हो. त्या लोकीं प्राप्त झाल्यावर सर्वांस कल्याणकारी हो. [१२]

परमात्म्याच्या तेजानें अजन्मा जीवात्मा प्रगट होतो. महान् ज्ञानी परमात्म्याच्या महात्म्यानें हा चेतन जीवात्मा प्रगट होतो. त्याची सर्व प्रकारच्या ऋतूंना अनुकूळ सर्व कर्में सर्व देव मिळून पूर्ण करतात. [१३]

स्वतः बसून विणलेलें वस्त्र सुवर्ण दक्षिणेसहित दान केलें पाहिजे. त्या दानानें भौतिक आणि अभौतिक लोकांची प्राप्ति होते. [१४]

त्या सोमरसाच्या धारा तूप आणि मधानें युक्त होऊन प्राप्त होवोत. त्याचें सेवन करून तूं या भूमीला सूर्याहूनसुद्धां उच्च स्वर्गधामांत स्थापित कर. [१५]

तूं जन्मरहित आणि सुखपूर्ण आहेस. तूं सर्व तेजस्वी लोकांस जाणतोस, त्या पुण्यमय लोकांस मीं सुद्धां जाणूं इच्छितों. [१६]

येना सहस्रं वहसि येनाग्ने सर्ववेदसम् । तेनेमं यज्ञं नो वह स्वर्देवेषु गन्तवे ॥ १७ ॥
अजः पक्वः स्वर्गे लोके दधाति पञ्चौदनो निर्ऋतिं बाधमानः ।
तेन लोकान्त्सूर्यवतो जयेम ॥ १८ ॥
यं ब्राह्मणे निदधे यं च विक्षु या विप्रुष ओदनानामजस्य ।
सर्वं तदग्ने सुकृतस्य लोके जानीतान्नः संगमने पथीनाम् ॥ १९ ॥
अजो वा इदमग्रे व्यक्रमत तस्योर इयमभवद् द्यौः पृष्ठम् ।
अन्तरिक्षं मध्यं दिशः पार्श्वे समुद्रौ कुक्षी ॥ २० ॥
सत्यं चर्तं च चक्षुषी विश्वं सत्यं श्रद्धा प्राणो विराट् शिरः ।
एष वा अपरिमितो यज्ञो यदजः पञ्चौदनः ॥ २१ ॥

अर्थ— हे अग्नि ! (**येन सहस्रं वहासि**) ज्यामुळें तूं हजारोंना घेऊन जातोस आणि (**येन सर्ववेदसं**) ज्याच्यामुळें तूं सर्व ज्ञान पोंहोचवितोस (**तेन**) त्यामुळें (**नः इमं यज्ञं**) आमच्या या यज्ञाला (**देवेषुः स्वः गन्तवे**) देवामध्यें विद्यमान असलेलें तेज प्राप्त करण्यासाठीं (**वह**) घेऊन जा. [१७]

(**पञ्चौदनः पक्वः अजः**) पांच भोजनें करणारा परिपक्व झालेला अजन्मा आत्मा (**निर्ऋतिं बाधमानः**) दुरवस्थेचा नाश करून (**स्वर्गे लोके**) स्वर्गलोकांत (**दधाति**) धारण करतो, (**तेन**) त्यानें (**सूर्यवतः लोकान् जयेम**) सूर्यानें युक्त लोक आम्हीं प्राप्त करूं. [१८]

(**यं ब्राह्मणे निदधे**) ज्यांला ब्राह्मणांत ठेवतो, (**यं च विक्षु**) ज्याला प्रजाजनांत ठेवतो, आणि (**अजस्य ओदनानां याः विप्रुषः**) जी अजन्मा आत्म्याच्या भोगाची पूर्तता आहे, हे अग्ने ! (**नः सर्वं तत्**) आमचें तें सर्व (**सुकृतस्य लोके**) पुण्य लोकांत (**पथीनां संगमने**) मार्गांच्या संगमांत आहे असें आम्हीं (**जानीतात्**) जाणतों. [१९]

(**अजः वै अग्रे इदं व्यक्रमत**) आजन्मा आत्माच पूर्वकालीं या संसारांत पराक्रम करीत राहीला आहे, (**तस्य उरः इयं अभवत्**) त्याची छाती ही भूमि झाली आणि (**द्यौः पृष्ठं**) द्युलोक पाठ झाली. (**अंतरिक्षं मध्यं**) अंतरिक्ष मध्य भाग आणि (**दिशः पार्श्वे**) दिशा दोन्ही बाजूचा भाग तसेंच (**समुद्रौ कुक्षी**) समुद्र कांखा बनला. [२०]

(**सत्यं च ऋतं च चक्षुषी**) सत्य आणि ऋत हे त्याचे डोळे, (**विश्वं सत्यं**) सर्व विश्व सत्य, (**श्रद्धा प्राणः**) श्रद्धा प्राण आणि (**विराट् शिरः**) विराट डोकें झालें, (**यत् पञ्चौदनः अजः**) जो पंच भोजनी अजन्मा आत्मा आहे तो (**एष वै अपरिमितः यज्ञः**) खरोखर सत्य आणि अपरिमित यज्ञ आहे. [२१]

भावार्थ— हे तेजस्वी देवा ! ज्या शक्तीनें हजारों लोकांना तूं उच्च अवस्थेंत घेऊन जातोस सर्व ज्ञान पोंहोंचवितोस, त्या अद्वितीय शक्तीनें माझ्या या यज्ञाला तूं सर्व देवांपाशीं पोंहोचव. ज्यामुळें मला दिव्य तेजाची प्राप्ति व्हावी. [१७]

पंच भोजनें करणारा अजन्मा आत्मा परिपक्व होऊन अवनति दूर करतो, आणि स्वर्गलोक प्राप्त करतो. आम्हीं सर्व त्या परिपक्व आत्म्याच्या द्वारानें प्रकाशयुक्त लोक प्राप्त करूं. [१८]

जो ज्ञान्यांच्यासाठीं येथें समर्पण करतो, जो प्रजेसाठीं अर्पण करतो, जो अजन्मा आत्म्याच्या भोगांची पूर्ति आहे, ते सर्व पुण्यलोकांत पोंहोंचविणाऱ्या मार्गाचे सहायक आहेत असें समजा. [१९]

या जगांत जो पराक्रम आहे, तो अजन्म्या आत्म्याचा आहे, त्या आत्म्याची छाती भूमि आहे. पाठ द्युलोक आहे. अन्तरिक्ष मध्य भाग आहे, दिशा बगला आणि समुद्र कांखा आहे. [२०]

त्याचे डोळे सत्य आणि ऋत आहेत, त्याचें अस्तित्व सर्व विश्व आहे, त्याचे प्राण श्रद्धा आणि शिर संपूर्ण चमकणारे लोक आहेत, तो पंच भोजनी अजन्मा आत्मा अनंत यज्ञरूप आहे. [२१]

*

अपरिमितमेव यज्ञमाप्नोत्यपरिमितं लोकमव रुन्धे ।
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ २२ ॥
नास्यास्थीनि भिन्द्यान्न मज्ज्ञो निर्धयेत् । सर्वमेनं समादायेदमिदं प्र वेशयेत् ॥ २३ ॥
इदमिदमेवास्य रूपं भवति तेनैनं सं गमयति ।
इषं मह ऊर्जमस्मै दुहे योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ २४ ॥
पञ्च रुक्मा पञ्च नवानि वस्त्रा पञ्चास्मै धेनवः कामदुघा भवन्ति ।
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ २५ ॥
पञ्च रुक्मा ज्योतिरस्मै भवन्ति वर्म वासांसि तन्वे भवन्ति ।
स्वर्गं लोकमश्नुते योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ २६ ॥

अर्थ— (यः पञ्चौदनं) जो पंच भोजनी (दक्षिणा ज्योतिषं अजं ददाति) दक्षणेच्या तेजानें प्रकाशित अजन्मा आत्म्याचें समर्पण करतो, तो (अपरिमितं यज्ञं आप्नोति) अपरिमित यज्ञ प्राप्त करतो. तसेंच (अपरिमितं लोकं अवरुंधे) अपरिमित लोकांस स्वतःच्या ताब्यांत ठेवतो. [२२]

(अस्य अस्थीनि न भिंद्यात्) त्याचीं हाडें न तोडो, (मज्ज्ञः न निः धयेत्) मज्जा न पीवो, (एनं सर्वं समादाय) त्या सर्वांना घेऊन (इदं इदं प्रवेशयेत्) त्याचा त्यांत प्रवेश करतो. [२३]

(इदं इदं एव अस्य रूपं भवति) तेंच त्याचें रूप होतें. (तेन एनं संगमयति) त्याच्याशीं त्याला मिळवितो. (अस्मै इषं महः ऊर्जं दुहे) त्याला अन्न, तेज, आणि बळ प्राप्त होतें. (यः दक्षिणाज्योतिषं पञ्चौदनं अजं ददाति) जो दक्षणेच्या तेजानें युक्त पंच भोजनी अजन्मा आत्मा समर्पित करतो. [२४]

(यः दक्षिणा०) जो कोणीं दक्षिणेच्या तेजासह पंच भोजनीं अजन्मा आत्म्याचें समर्पण करतो तो (अस्मै) याच्यासाठीं (पञ्च रुक्मा) पांच सोन्याच्या मोहरा (पंच नवानि वस्त्रा) पांच नवी वस्त्रें आणि (पञ्च कामदुधः धेनवः) पांच इच्छित समयीं दुध देणाऱ्या गाई (भवन्ति) असतात. [२५]

(यः दक्षिणा०) जो दक्षणेच्या तेजासह पञ्चौदनीं अजन्मा आत्म्याचें समर्पण करतो, (अस्मै) त्याच्यासाठीं (पञ्च रुक्मा) पांच सुवर्ण मुद्रा (ज्योतिः भवन्ति) प्रकाशमान होतात. (तन्वे) शरीरासाठीं (वर्म वासांसि भवन्ति) वस्त्रें कवचरूप होतात. आणि तो (स्वर्गं लोकं अश्नुते) स्वर्ग लोक प्राप्त करतो. [२६]

भावार्थ— हा पंच भोजनी अजन्मा आत्मा जो समर्पण करतो, त्यामुळें त्याला अनंत यज्ञ करण्याचें फळ प्राप्त होतें, आणि तो अनंत लोकास प्राप्त करतो. [२२]

या यज्ञासाठीं कोणाचीं हाडें फोडण्याची जरुरी नाहीं. आणि मज्जारस काढण्याची सुद्धां जरुर नाहीं; त्या सर्वांस घेऊन त्या विशालामध्यें प्रवेश केला पाहिजे. [२३]

तेंच या यज्ञाचें रूप आहे. त्या विशालाशीं याचा संबंध जोडतो. त्यामुळें त्याला अन्न, बल आणि तेज मिळतें, जो पंच भोजनी अजन्मा आत्म्याचें समर्पण करतो. [२४]

तें समर्पण करणाऱ्याला पांच सुवर्ण मुद्रा, पांच नवी वस्त्रें आणि पांच कामधेनु प्राप्त होतात. [२५]

तें समर्पण करणारास पांच सुवर्ण मुद्रा आणि पांच प्रकाश प्राप्त होऊन शरीरासाठीं कवचासारखें वस्त्र प्राप्त होतें आणि स्वर्ग मिळतो. [२६]

या पूर्वं पतिं वित्त्वाथान्यं विन्दतेऽपरम् । पञ्चौदनं च तावजं ददातो न वि योषतः ॥ २७ ॥
समानलोको भवति पुनर्भुवापरः पतिः । योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ २८ ॥
अनुपूर्ववत्सां धेनुमनड्वाहमुपबर्हणम् । वासो हिरण्यं दत्त्वा ते यन्ति दिवमुत्तमाम् ॥ २९ ॥
आत्मानं पितरं पुत्रं पौत्रं पितामहम् । जायां जनित्रीं मातरं ये प्रियास्तानुप ह्वये ॥ ३० ॥
यो वै नैदाघं नामर्तुं वेद । एष वै नैदाघो नामर्तुर्यदजः पञ्चौदनः ।
निरेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं दहति भवत्यात्मना । योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥३१॥
यो वै कुर्वन्तं नामर्तुं वेद । कुर्वतींकुर्वतीमेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियमा दत्ते ।
एष वै कुर्वन्नामर्तुर्यदजः पञ्चौदनः । निरेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं दहति भवत्यात्मना
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ ३२ ॥

अर्थ — (**या पूर्वं पतिं वित्त्वा**) जी प्रथम पतीस प्राप्त करून (**अथ अपरं विन्दते**) नंतर दुसऱ्या कोणास प्राप्त करते (**तौ पञ्चौदनं अजं ददतः**) ते दोघे पंच भोजनी अजन्म्या आत्म्याचें समर्पण करून (**न वियोषतः**) वियुक्त होत नाहींत. [२७]

(**यः पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं अजं ददाति**) जो पंच भोजनी दक्षिणेच्या तेजानें युक्त अजन्मा आत्म्याचें समर्पण करतो तो (**अपरः पतिः**) दुसरा पति (**पुनर्भुवा समानलोकः भवति**) पुनर्विवाहित स्त्रीसह समान स्थानाचा होतो. [२८]

(**अनुपूर्ववत्सां धेनुं**) दरवर्षी वासरूं देणाऱ्या गाईला आणि (**अनड्वाहं**) बैलाला तसेंच (**उपबर्हणं वासः हिरण्यं**) उपवस्त्र, वस्त्र आणि सोनें (**दत्त्वा**) देऊन (**ते उत्तमां दिवं यन्ति**) ते उत्तम स्वर्ग लोकास जातात. [२९]

(**आत्मानं पितरं पुत्रं**) स्वतः स्वतःला पित्याला, पुत्राला (**पौत्रं पितामहं**) नातू आणि आजोबा यांना (**जायां जनित्रीं मातरं**) स्त्री आणि जननी मातेला आणि (**ये प्रियाः तान्**) जे इष्ट आहेत त्यांना मीं (**उपह्वये**) जवळ बोलावितों. [३०]

(**एष वै नैदाघः नाम ऋतुः**) तो निश्चित निदाघ म्हणजे ग्रीष्म ऋतु आहे, (**यः पञ्चौदनः अजः**) जो पंच भोजनी अजन्मा आहे (**यः वै नैदाघं नाम ऋतुं वेद**) जो या ग्रीष्म ऋतुला जाणतो, आणि (**यः दक्षिणा-ज्योतिषं पञ्चौदनं अजं ददाति**) जो दक्षिणेच्या तेजानें युक्त पांच भोजनी अजन्म्याचें समर्पण करतो तो (**अप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं निः दहति**) अप्रिय शत्रूच्या वैभवाला जाळून टाकतो, आणि जो, (**आत्मना भवति**) स्वतःच्या आत्मशक्तीनें प्रभावित होतो. [३१]

(**एष वै कुर्वन् नाम ऋतुः यत् अजः**) हा निःसंदेह कर्ता नामक ऋतु आहे जो अजन्मा पंच भोजनी आहे. (**यः वै कुर्वन्तं नाम ऋतुं वेद०**) कर्ता नामक या ऋतूला जाणतो, आणि दक्षिणेच्या तेजानें युक्त पंच भोजनी अजन्म्याचें समर्पण करतो, तो (**अप्रियस्य भ्रातृव्यस्य**) अप्रिय शत्रूच्या (**कुर्वतीं कुर्वतीं एव श्रियं आदत्ते**) प्रयत्नवान् ऐश्वर्याचें हरण करतो. [३२]

भावार्थ— जी प्रथम प्राप्त करून नंतर पुनर्विवाहानें दुसरा पति प्राप्त करते ती या पंच भोजनी अजन्म्याच्या समर्पण करण्यानें वियुक्त होत नाहीं. [२७]

जो पंच भोजनी अजन्मा आत्म्याचें समर्पण करतो तो द्वितीय पति पुनर्विवाहित पति सारखाच होतो. [२८]

दरवर्षी वत्स देणारी गाय, उत्तम बैल, पांघरण्याचें वस्त्र आणि सोनें यांचे दान केल्यानें उत्तम स्वर्ग प्राप्त होतो. [२९]

स्वतःचा आत्मा पिता, पितामह, पुत्र, पौत्र, धर्मपत्नी, जन्म देणारी माता, आणि जे आमचे प्रियजन आहेत, ते या सर्वांना मीं बोलावतो आणि ही गोष्ट सांगतों. [३०]

यो वै संयन्तं नामर्तुं वेद । संयतींसंयतीमेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियमा दत्ते ॥
एष वै संयन्नामर्तुर्यदजः पञ्चौदनः । निरेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं दहति भवत्यात्मना
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ ३३ ॥

यो वै पिन्वन्तं नामर्तुं वेद । पिन्वतींपिन्वतीमेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियमा दत्ते ॥
एष वै पिन्वन्नामर्तुर्यदजः पञ्चौदनः । निरेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं दहति भवत्यात्मना ।
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ ३४ ॥

यो वा उद्यन्तं नामर्तुं वेद । उद्यतीमुद्यतीमेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियमा दत्ते ।
एष वा उद्यन्नामर्तुर्यदजः पञ्चौदनः । निरेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं दहति भवत्यात्मना ।
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ ३५ ॥

यो वा अभिभुवं नामर्तुं वेद । अभिभवन्तीमभिभवन्तीमेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियमा दत्ते ।
एष वा अभिभूर्नामर्तुर्यदजः पञ्चौदनः । निरेवाप्रियस्य भ्रातृव्यस्य श्रियं दहति भवत्यात्मना ।
योऽजं पञ्चौदनं दक्षिणाज्योतिषं ददाति ॥ ३६ ॥

अर्थ— (एष वै संयत् नाम ऋतः यत् अजः) हा संयम नांवाचा ऋतु आहे जो पंच भोजनी अजन्मा आहे (यः वै संयन्तं नाम ऋतुं वेद०) जो निश्चयें करून संयम नांवाच्या ऋतूस जाणतो आणि जो दक्षिणेच्या तेजासह पंच भोजनी अजन्म्याचें समर्पण करतो. तो, (अप्रियस्य भ्रातृव्यस्य) अप्रिय शत्रूच्या (संयतीं संयतीं एव श्रियं आदत्ते) संयमानें प्राप्त केलेल्या लक्ष्मीचें हरण करतो. [३३]

(एष वै पिन्वन् नाम ऋतुः यत् अजः) हा पोषण नामक ऋतु आहे जो पंच भोजनी अजन्मा आहे. (यः वै पिन्वन्तं नाम ऋतुं वेद०) जो निश्चयें करून पोषक नांवाच्या ऋतूला जाणतो, आणि दक्षणेनें युक्त पंच भोजनी अजाचें समर्पण करतो, तो (अप्रियस्य भ्रातृव्यस्य पिन्वतीं पिन्वतीं नाम श्रियं आदत्ते) अप्रिय शत्रूच्या पोषक संपत्तीस हिरावून घेतो. [३४]

(एष वै उद्यन् नाम ऋतुः यत् अज०) हा निःसंशय उदय नांवाचा ऋतु आहे जो पंच भोजनी आहे. (यः वै उद्यन्तं नाम ऋतुं वेद०) जो निश्चयानें उदयरूपी ऋतूला जाणतो आणि (यः दक्षिणा०) दक्षणेच्या तेजानें युक्त पंच भोजनी अजाचें समर्पण करतो, तो (अप्रियस्य भ्रातृव्यस्य) अप्रिय शत्रूची (उद्यतीं उद्यतीं एव श्रियं आदत्ते) उदयास प्राप्त होणारी श्री हिरावून घेतो. [३५]

(एष वै अभिभूः नाम ऋतुः) हा निःसंदेह विजय नांवाचा ऋतु आहे (यत् अजः पञ्चौदनः) जो पंच भोजनी अज आहे. (यः वै अभिभुवं नाम ऋतुं वेद०) जो विजय नामक या ऋतूला जाणतो, आणि (यः दक्षिणा०) दक्षणेच्या तेजासह या पंच भोजनी अजन्म्याचें समर्पण करतो, तो (अप्रियस्य भ्रातृव्यस्य) अप्रिय शत्रूच्या (अभिभवन्तीं अभिभवन्तीं एव श्रियं आदत्ते) पराजय करणाऱ्या शोभेला हिरून घेतो आणि (अप्रियस्य०) अप्रिय शत्रूच्या लक्ष्मीला जाळून टाकतो, आणि (आत्मना भवति) स्वतःच्या शक्तीनें रहातो. [३६]

भावार्थ— उष्णता, कर्म, संयम, पुष्टि, उद्यम आणि विजय हे सहा ऋतु आहेत. हे सहा ऋतु हे पंचभोजनी अजन्म्याचीं रूपें आहेत. हें जाणून जो त्याचें समर्पण करतो, तो शत्रूंचा पराजय करून आणि स्वतःच्या आत्म्याची शक्ती वाढवून म्हणजे आत्मबळानें युक्त होतो. [३१-३६]

अजं च पचत पञ्च चौदनान् ।
सर्वा दिशः संमनसः सध्रीचीः सान्तर्देशाः प्रति गृह्णन्तु त एतम् ॥ ३७ ॥
तास्ते रक्षन्तु तव तुभ्यमेतं ताभ्य आज्यं हविरिदं जुहोमि ॥ ३८ ॥

अर्थ— (**अजं पञ्च ओदनान् च पचत**) त्या अजन्म्याला आणि पंचभोजनांना परिपक्व करा. (**ते एतं**) तुझ्या या अजन्म्याचा (**सर्वाः दिशः**) सर्व दिशा (**सान्तर्देशाः**) आंतरिक प्रदेशासह (**सध्रीचीः संमनसः**) सहमत आणि एक विचारानें युक्त होऊन (**प्रतिगृह्णन्तु**) स्वीकार करोत. [३७]

(**ताः ते तुभ्यं तव एतं रक्षन्तु**) ते तुझ्या या आत्म्याचें रक्षण करो. (**ताभ्यः इदं आज्यं हविः जुहोमि**) त्यांच्यासाठीं मीं हें तूप आणि हवन सामग्रीचें हवन करतों. [३८]

भावार्थ— त्या अजन्म्याला आणि त्याच्या पांचहि भागाला परिपक्व करा. सर्व दिशा आणि उपदिशा त्यांचा स्वीकार करोत. म्हणजे तो सर्व दिशांचा होवो. [३८]

तो सर्व आत्म्यांचें रक्षण करो, आणि आत्मरक्षणानें त्याची उन्नति होवो. या उद्देशानें मीं ही तुपाची आहुति देतो. हें एक समर्पणाचें उदाहरण आहे. [३८]

पंचौदन अज

या सूक्तांत 'पंचौदन अजा'ला स्वर्गधाम कोणत्या प्रकारें प्राप्त होतें त्याचें वर्णन आहे. सर्व प्रथम हा पंचौदन अज कोण आहे त्याचा परिचय करून घेतला पाहिजे. 'पंचौदन अज' (**पंच+ओदन+अज**) पांच प्रकारच्या भोजनांनीं युक्त अज आहे. म्हणजे पांच प्रकारच्या अन्नाचा भोग करणारा अज आहे.

'**अज**' शब्दाचे अर्थ– अजन्मा, नेहमीं रहाणारा, सर्व शक्तिमान् परमात्मा, जीव, आत्मा, हुशार बकरा, धान्य असे होतात. त्यांतील येथें कोणता प्राह्य ही विचारणीय गोष्ट आहे. 'अज' शब्दानें येथें परमात्म्याचा बोध करणें योग्य नाहीं, कारण की तो स्वभावतःच अति उच्च लोकांत विराजमान आहे. तर त्यास उच्च लोकांत जाण्याची आवश्यकताच काय राहिली ? येथें या सूक्तांत अजाचें वर्णन आहे. त्याविषयीं खाली दिलेले मंत्रभाग पहा—

सुकृतां लोकं गच्छतु प्रजानन् । (मं. १)
तीर्त्वा तमांसि अजस्तृतीयं नाकं आक्रमताम् । (मं. १,३)
तृतीये नाके अधि विश्रयैतम् ॥ (मं. ४)
श्रृतौ गच्छतु सुकृतां यत्र लोकः ॥ (मं. ५)
तृतीये नाके अधि विश्रयस्व ॥ (मं. ८)

'हा मार्ग जाणून पुण्य कर्में करणाऱ्यांचा लोक प्राप्त करावा. अंधकार दूर करून तिसऱ्या स्वर्गधामास प्राप्त होवो. परिपक्व होऊन पुण्यवानांच्या लोकांत जावो. तिसऱ्या स्वर्गधामाचा आश्रय कर.

हे मंत्रभाग ज्याला पूर्वी स्वर्गधाम प्राप्त झालेलें नाहीं, जो उत्तम लोकांत पोहोंचला नाहीं, जो अधम लोकांत आहे, अशा आत्म्याचे सूचक आहेत. म्हणजे येथें अज शब्द परमात्म्याचा वाचक नाहीं. परंतु ज्याला अद्याप पावेतों उत्तम लोक प्राप्त झाला नाहीं. अशा आत्म्याचा वाचक आहे. 'अज' शब्दाचा दुसरा अर्थ धान्य आणि बकरा असा आहे. त्यांत धान्याचें स्वर्गधामांत जाणें असंभवनीय आणि बकरा स्वर्गधामांत जाऊं शकतो कीं नाहीं त्याविषयीं शंकाच आहे. कारण कीं स्वर्ग तर (**सुकृतां लोकं**) सत्कर्म करणाऱ्यांचा लोक आहे. जे स्वतः सत्कर्म करूं शकतात, ते स्वतः केलेल्या सत्कर्मबलानें स्वर्गधामाला जाऊं शकतात, म्हणजे धान्य आणि बकरा स्वतः सत्कर्म करण्यास

शक्तिमान् नसल्यानें सुकृत लोक प्राप्त करण्यास असमर्थ आहेत.

येथें कोणी असें म्हणेल कीं बकरा यज्ञांत समर्पण केला जातो आणि या समर्पणाच्या कारणानें तो स्वर्गाचा अधिकारी होऊं शकतो. येथें विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं, जो स्वतः स्वेच्छेनें दुसऱ्याच्या कल्याणासाठीं समर्पित होतो, जो परोपकारासाठीं आत्मासमर्पण करूं शकतो, तो स्वर्गधामाचा अधिकारी होण्यास लायक ठरतो. जे लोक बकऱ्यास पकडतात आणि त्याच्या मांसाचें हवन करतात ते बकऱ्याच्या इच्छेचा विचारच करीत नाहींत. जर अशा प्रकारें जबरदस्तीनें स्वर्गप्राप्ति होणार असली तर गाई आणि बकऱ्या वाघाच्या जीवननिर्वाहासाठीं समर्पित होतात, त्या सर्व स्वर्गांत जावयास हव्यात; इतकेंच काय पण अज नावाचें धान्य यज्ञाग्नींत आहुतिद्वारा समर्पित होतें म्हणून तें सरळ स्वर्गास जावयास हवें, समिधा आणि तूपहि तेथें जाऊन पोहोंचेल. ही तर निव्वळ अव्यवस्था झाली. वाघानें गाईस मारून खाल्लें यांत गाईचें समर्पण नाहीं. क्रूर राजा प्रजेस लुटून तिचें वित्त हरण करून नेतो; त्यांतहि त्या प्रजेला, सर्वस्वदान अथवा सर्वमेध केल्याचें पुण्य मिळूं शकत नाहीं. आत्मसमर्पण स्वेच्छेनें केलें असलें तरच फळ मिळतें. पूर्वोक्त ' अजा ' च्या ' धान्य, बकरा ' या अर्थानें आत्मसमर्पणाची गोष्टहि जाणत नाहीं त्यामुळें ते आत्मसमर्पण करूं शकत नाहींत, आणि म्हणूनच स्वर्गांत सुद्धां जाऊं शकत नाहींत. परमात्मा उत्तम लोकांत नेहमींच उपस्थित असल्यानें त्याला कर्म विशेषानें अथवा आत्मसमर्पणद्वारा तो लोक प्राप्त होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. तेव्हां बाकी राहिला, 'जीवात्मा.' हाच अर्थ येथें अपेक्षित आहे. तो सुकृत करून स्वर्गधाम प्राप्त करतो, आणि या कार्यासाठीं संपूर्ण धर्मशास्त्र रचिलें आहे.

या सूक्तांतील ' अजा ' चा प्रसिद्ध अर्थ ' बकरा ' घेऊन कित्येकांनीं बकरा कापावा, शिजवावा आणि त्याचा भाग सर्वांस वांटावा आणि स्वर्गांत पाठवावा असा अर्थ केला आहे. तो वर दिलेल्या कारणांनीं युक्तियुक्त नाहीं. असो याप्रकारें, येथें या सूक्तांत अज शब्दाचा अर्थ जीव, आत्मा अथवा जीवात्मा असा आहे.

आतां पाहूं या कीं त्याला पंचौदन कां म्हटलें आहे. तो पांच प्रकारचें अन्न खातो. म्हणून त्यास पंचौदन, पंचभोजनी अज म्हटलें आहे. त्याची पांच भोजनें कोणतीं ? शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय त्याचीं पांच भोजनें होत. तीं परस्पर वेगळीं आहेत आणि तीं त्याचे उपभोगाचे विषय आहेत. या विषयीं असें म्हटलें आहे–

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्योऽभिचाकशीति ॥ (ऋ. १।१६४।२०; अथर्व ९।९।१४।२०)

' एकच (शरीररूपी) वृक्षावर दोन पक्षी (दोन जीवात्मा आणि परमात्मा) बसले आहेत. त्यांतील एक (जीवात्मा) त्या वृक्षाचें मधुर फळ खातो, आणि दुसरा न खातां नुसता प्रकाशतो. '

या वृक्षाला शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशीं पांच भोगरूपीं फळें लागतात, त्यांचा भोग हा अजन्मा आत्मा करतो. त्याच्या पांच ज्ञानेंद्रियामार्फत तीं पांच फळें त्याच्यापर्यंत पोहोंचतात. मनुष्य ज्ञानी अथवा अज्ञानी असो, बद्ध अथवा मुक्त असो, जों पावेतों हा आत्मा शरीरांत राहील तों पावेतों हे पांच प्रकारचे भोग मिळत रहातील. बद्ध स्थितींत रहाणारा आत्मा या शक्तीनें विषय सेवन करील आणि जीवनमुक्त स्थितींत राहिलेला आत्मा या शक्तीचा त्याग करून उदासीनतेनें पहातो. दोघांना कानांनीं शब्द, त्वचेनें स्पर्श, नेत्रांनीं रूप, आणि नाकानें वास प्राप्त होईल. ही पांच भोजनें त्याच्याजवळ येतील. कोणी त्याचा उपयोग करो अथवा न करो, ती गोष्ट निराळी; ' पंचौदन अज ' चा हा अर्थ आहे आणि तो प्रत्येक जीवात्म्याविषयीं अनुभवास येतो. त्या अजाच्या स्वरूपाची निश्चिति स्वतः या सूक्तानेंच केली आहे, ती पहा–

अजो अग्निः अजमु ज्योतिः आहुः)
अजः तमांसि अपहन्ति ॥ (मं. ७)
अग्नेः अग्निः सं बभूविथ ॥ (मं. ६)
अजः हि अग्नेः शोकात् विप्रः अजनिष्ट ।
(मं. १३)

एष वा अपरिमितो यज्ञो यदजः पञ्चौदनः ।
(मं. २१)

' अग्नीचें नांव अजन्मा आहे, ज्योतिचें नांव अजन्मा आहे, तो अज अंधःकाराला दूर करतो. अग्नींतून अग्नि उत्पन्न झाला. अग्नीच्या तेजानें अजन्मा उत्पन्न झाला. ज्ञानाच्या महात्म्यानें ज्ञानी विद्वान् जन्मला. हा पंचौदन अज अपरिमित यज्ञ आहे. '

वरील सर्व मंत्रभागांनीं येथें अज शब्दाचा आत्मा हा भाव आहे, हें स्पष्ट सांगितलें आहे. कारण कीं आत्मा, ज्योति, अग्नि, ज्ञानी, यज्ञ इत्यादि शब्द जीवात्म्याविषयीं वैदिक वाङ्मयांत येतात, तेच प्रतिशब्द अज शब्दाचा अर्थ सांगण्यास वेदानें येथें वापरले

आहेत, आणि अज शब्दाच्या अर्थाविषयीं संदेह राहूं दिला नाहीं. असें असूनहि येथील अज शब्दाचा अर्थ ' बकरा ' असा मानणारे आहेत, त्यांच्या विचारशक्तिविषयीं काय म्हणावें, तें आम्हांस कळत नाहीं.

येथें वर दिलेल्या वचनांत असें सांगण्यांत आलें आहे कीं या सूक्तांत ज्या अजाचें वर्णन आहे तो अग्निच्या समान तेजस्वी, ज्योति समान प्रकाशमान, दिव्यासारखा अंधःकारास दूर करणारा आहे; परमात्मारूपी महान् अग्नींतून त्याची उत्पत्ति झाली आहे. ज्याप्रकारें अग्नि प्रज्वलित झाल्यानें त्याच्या ठिणग्या सर्वत्र उडतात, त्याप्रकारें परमात्म्याच्या दीप्तिंतून ज्या ठिणग्या चारी बाजूस उडाल्या आहेत तेच अनंत जीवात्मे होत. परमात्मा चैतन्यरूप आहे. त्यांतून हा चैतन्यरूप जीवात्मा प्रगट झाला आहे. अशा प्रकारचें वर्णन या मंत्रभागांत आहे. तें पाहिलें असतां स्पष्ट होतें कीं येथें अज शब्दाचा अर्थ जीवात्मा असाच केला पाहिजे.

येथें अज शब्दाचा अर्थ बकरा असा केल्यानें काय होतें ? आणि या मंत्रांची संगति तरी लागते का ? बकरा अग्नि किंवा ज्योति आहे का ? बकरा कधीं अंधःकार दूर करूं शकतो का ? अग्नि प्रकाशांतून बकरा निर्माण होणें शक्य आहे काय ? म्हणजे अज शब्दाचा अर्थ बकरा असा केल्यानें पूर्वोक्त मंत्राचा कांहीं सरळ अर्थ होत नाहीं. अर्थात् अज शब्दाचा येथें ' जीवात्मा ' असाच अर्थ केला पाहिजे ही गोष्ट सिद्ध होते. आतां– अजन्म्याची उच्चगति होण्याविषयीं या सूक्तांत काय म्हटलें आहे तें पाहूं—

अजो वा इदमग्रे व्यक्रमत् ॥ (मं. २०)
अजः पक्वः स्वर्गे लोके दधाति, निर्ऋतिं बाधमानः । (मं. १८)
अजं च पचत पञ्च चौदनान् । (मं. ३७)

' हा (**अजः**) अजन्मा आत्मा जगताच्या प्रारंभापासून पराक्रम करून राहिला आहे. तो अजन्मा आत्मा परिपक्व झाल्यावर अवनतीला दूर करून स्वर्गांत जातो. अजन्म्याला आणि पंच भोजनांना परिपक्व करा. ' या जगांत जे कांहीं पराक्रम झाले आहेत ते अजन्म्यामुळेंच, आणि या जगांत जें कांहीं चालूं आहे ती सर्व शक्तिसुद्धां आत्म्याचीच आहे. शरीरांत जीवात्मा आणि विश्वांत परमात्मा कार्य करीत आहेत. जीवात्मा सुरवातीस अपरिपक्व अवस्थेंत असतो, तो शुभ संस्कारानीं परिपक्व होतो; आणि त्याची जेवढ्या प्रमाणांत परिपक्वता होते तेवढ्या प्रमाणांत तो स्वतःच्या शक्तीनें अंधःकारास दूर करतो. यावरून जीवात्म्याच्या दोन अवस्था आहेत हें सिद्ध होतें. कित्येक परिपक्व दशेस पोहोंचलेले असतात; कित्येक अपरिपक्व असतात, ते परिपक्व होण्याच्या रस्त्याला लागलेले असतात, त्यांना मुक्त आणि बद्ध अवस्था म्हणतात.

येथें '**अजः पक्वः**' हे शब्द पाहिले असतां शिजविलेला बकरा असा कित्येक अर्थ करतात. परंतु शिजविलेल्या बकऱ्याला स्वर्गांत जाण्याचा अनुभव येत नाहीं, परंतु तो सरळ मांस भक्षकाच्या पोटांत जातो. परंतु येथील परिपक्व अज सरळ स्वर्गधामास जात आहे, त्या अर्थी येथील अज निराळाच आहे. दुसरी गोष्ट अशी कीं पक्व शब्द कोणत्या अर्थानें योजला आहे ! मनुष्याचे विचार परिपक्व झाले आहेत, त्याचें ज्ञान परिपक्व-पक्कें झालें आहे, फळ परिपक्व झालें आहे. या प्रकारें त्याचे भाव पुष्कळ व्यापक आहेत. तो परिपक्व कसा होतो त्या विषयीं खालीं दिलेले मंत्रभाग पहा—

नैदाघं ... कुर्वन्तं ... संयन्तं ... पिवन्तं ... उद्यन्तं-अभिभुवं नाम ऋतुं वेद ... श्रियं आदत्ते आत्मना भवति ॥ (मं. ३१-३६)

' उष्णता, कर्तृत्व, संयम, पोषण, उद्यम आणि शत्रुजय हे आत्म्याचे ऋतु आहेत. जो या ऋतूंना कामास प्रवृत्त करावयाचें जाणतो, त्यांच्याकडून स्वतःचीं कामें करून घेतो, त्याला श्री प्राप्त होते आणि तो आत्म्याच्या शक्तीनें युक्त होतो.' हे सहा मंत्र आत्म्याची उन्नति करणाऱ्या शक्तींचे सूचक आहेत. सर्वांत प्रथम मनुष्याच्या शरीरांत उष्णता असली पाहिजे. प्रत्येक कार्य करण्यास त्यामुळें स्फूर्ति प्राप्त होते. त्यानंतर कर्म केलें पाहिजे, कारण शुभ कर्मानींच सुकृत लोक प्राप्त होतो. शुभकर्में करण्यासाठीं संयमाची जरूरी आहे. पुष्कळ कर्में करण्यास पुष्टिचीहि जरूरी आहे. सतत उद्योग केला पाहिजे आणि तसें करतांना मध्यें विघ्नें आलीं तर तीं दूर करण्यास शक्ति सुद्धां असली पाहिजे. हे सहा गुण असले आणि त्यांच्या द्वारें योग्य दिशेनें प्रयत्न झाले तर मनुष्याची उन्नति होते.

वस्तुतः तो अजन्मा आत्मा सुखस्वरूप आणि स्वर्गाचा अधिकारी आहे. तो कांहीं अनधिकारी नाहीं. तो अग्नीचीच ठिणगी आहे; त्यामुळें प्रकाशित होण्याचा अधिकारी आहे. तो परमात्म्याचा अमृतपुत्र आहे म्हणून म्हटलें आहे–

अजोऽसि, अज स्वर्गोऽसि । (मं. १६)

'तूं जन्मरहित आहेस, तूं स्वतःच स्वर्ग आहेस; तूं स्वतःच स्वतःला पतित होण्यायोग्य मानूं नकोस, अंतीं जन्म-मरण

धारण करणारा समजूं नकोस, वस्तुतः तूं जन्म न धारण करणारा आहेस, आणि तूंच स्वर्ग आहेस. मग हें दुःख तुझ्यावर कोठून येऊन पडतें, याचा विचार कर. तुझ्या पूर्व कर्मांचा विचार कर आणि नंतर स्वतःच्या उन्नतिसाठीं उद्यम करून स्वतःची उन्नति करून घे. त्याच्या उन्नतीच्या साधनाचा मार्ग हा आहे–

एतं आ नय, आरभस्व, प्रजानन्, सुकृतां लोकं गच्छतु ॥ (मं. १)

'याला उत्तम मार्गानें चालव, शुभकर्मांचा प्रारंभ कर, उन्नतीच्या मार्गास जाणून, पुण्य लोकास प्राप्त कर.' या उपदेशांत चार भाग आहेत, आणि ते सर्वच महत्त्वपूर्ण आहेत. सर्वांत प्रथम भाग धर्ममार्गानें जाण्याचा आहे. तो कोणा उत्तम गुरूच्या मार्गदर्शनानें, त्याच्या पूर्ण ताब्यांत राहूनच साध्य होणारा आहे. म्हणून पहिलें वाक्य (**एतं नय**) हें गुरुला उद्देशून सांगण्यांत आलें आहे कीं, हे गुरो ! तूं या शिष्याला मदत देऊन योग्य मार्गानें घेऊन जा. दुसरें वाक्य असें आहे कीं, (**आरभस्व**) शुभकर्मांस प्रारंभ कर. जो पाठ गुरुनें दिला असेल तदनुसार कर्म करण्यास आरंभ कर. येथें कर्माचा आरंभ होतो. कर्म करण्यानें मनुष्याचें अनुभवाचें ज्ञान वाढतें आणि तो (**प्रजानन्**) ज्ञानी होऊन पुढें सरतो; आणि शेवटीं (**सुकृतां लोकं**) पुण्य कर्म करणाऱ्या लोकास प्राप्त करतो. सामान्य रीतीनें मनुष्याच्या उन्नतीचा सरळ मार्ग हाच आहे. या मार्गानें जाणाऱ्यास स्वतः अजन्मा होण्याचा तसेंच स्वतः स्वर्गरूप होण्याचा अनुभव अंतीं प्राप्त होतो. त्या प्रकारें या मार्गाचें अनुसरून—

अजः महान्ति तमांसि बहुधा तीर्त्वा । (मं. १)
अजः विपश्यन् तमांसि बहुधा तीर्त्वा । (मं. ३)
अजः तमांसि दूरं अपहन्ति । (मं. ७, ११)

'हा अजन्मा आत्मा मार्गांत गाढ अंधःकारास (**विपश्यन्**) विशेष रूपानें पाहून आणि या सर्व अंधःकाराला (**बहुधा**) अनेक मार्गांनीं (**तीर्त्वा**) पार करून, उल्लंघून, तरून, पैलथडी जातो. या प्रकारें तो स्वतःचा मार्ग काढीत पुढें प्रगति करतो. पुढें जातां जातां—

अजः तृतीयं नाकं आक्रमताम् ॥ (मं. १, ३)
सुकृतां लोकं गच्छतु ॥ (मं. १)
एनं तृतीये नाके अधि विश्रय । (मं. ४)
शृतः गच्छतु सुकृतां यत्र लोकः । (मं. ५)
अतः परि . . . तृतीयं नाकं उत्क्राम । (मं. ६)
सुकृतां मध्यं प्रेहि; तृतीये नाके अधि विश्रयस्व । (मं. ८)

'शुभकर्म करणाऱ्या लोकांत जा आणि तीं पुण्यशील श्रेष्ठ मनुष्यें जेथें जातात त्या तृतीय धामांत जाऊन विराजमान हो.' अशा प्रकारें त्याची उन्नति होते. तिसरें स्वर्गधाम प्राप्त करण्याची योग्यता प्राप्त करण्यापूर्वी मनुष्य पहिल्या आणि दुसऱ्या स्वर्गाची योग्यता प्राप्त करतो, आणि अंतीं त्याला तिसरें स्वर्गधाम मिळण्याचा योग मिळतो. हे तीन स्वर्ग कोठें आहेत त्याचाहि येथें विचार करणें आवश्यक आहे.

हा मृत्यु लोक हें एक स्थूल जगत् आहे हें सर्व जाणतात, कारण त्यांत नेहमीं कमी अधिक होत असतें. यांत इतर सूक्ष्म लोकहि गुप्त रीतीनें राहिलेले आहेत. या जगताची प्रत्येक प्रतिकृति या सूक्ष्म सृष्टींत रहाते. जागृत अवस्थेंत कार्य करणारें मन गुप्त अवस्थेंत अनेक इतर विविध दृश्यें– त्याहूनहि अत्यंत तेजस्वी दृश्यें पहातें. हीच सूक्ष्म सृष्टि होय. तिला कामसृष्टि सुद्धां म्हणतात. स्थूल जगाचीच ती प्रतिकृति असल्यानें जीं सुखदुःखें स्थूल सृष्टींत आहेत, तींच या सूक्ष्म सृष्टींतहि आहेत. तथापि स्थूल सृष्टीचीं बंधनें आणि प्रतिबंध त्यांत नसल्यानें तिचें महत्त्व स्थूलापेक्षां जास्त आहे. हे दोन्ही अनुभव जेव्हां समाप्त होतात आणि कारण अवस्थेंत पोहोंचून मनुष्य जेव्हां स्वतंत्रतेनें विराजमान होतो तेव्हां त्याला स्वर्गधाम प्राप्त होतें. असें म्हणण्यांत येतें. त्यांत तीन पायऱ्या आहेत असें समजलें जातें. प्रथम, मध्यम आणि उत्तम–या तीन अवस्था या स्वर्गांत आहेत. जसें ज्याचें सुकृत असेल तशी अवस्था त्याला येथें प्राप्त होते. सुकृतानुरूप प्राप्त होणारी ही अवस्था असल्यानें त्यांत प्रत्येकचा अनुभव सुखात्मक असला तरी निरनिराळा असतो. सुषुप्ति समाधि आणि मुक्ति यांत ब्रह्मरूपता असते. परंतु ती सुषुप्तीच्या खालच्या आणि मुक्तीच्या उच्चस्थानाची असते, असें येथें समजणें उचित होय.

तिसऱ्या स्वर्गधामांत पोहोंचण्याचा आशय हा असा आहे, म्हणून वाचकानें ती अत्यंत उच्च स्थिति प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. तेंच उत्तम स्थान परमधाम, स्वर्गधाम अथवा इतर कोणत्याहि नांवानें धर्म ग्रंथांतून वर्णिलें आहे तेंहेंच. सदाचारानें त्याची प्राप्ति होते. आत्मा परिपक्व झाला म्हणजे तें स्वर्गधाम प्राप्त तो करूं शकतो. त्याविषयीं खालील मंत्र भाग पहा—

तस्मात् चरोः अतप्तः (सन्) उत्क्राम । (मं. ६)

' तापलेल्या पात्रांत राहून सुद्धां जो तप्त होत नाहीं तो

उत्क्रांत होण्याचा अधिकारी आहे.' हाच विचार जरा निराळ्या शब्दांत याप्रमाणें लिहितां येईल– दुःखी घरांत मीं रहातों पण दुःखापासून अलिप्त रहाणारा, रोगयुक्त स्थानांत मीं रहातों परंतु निरोगी रहाणारा, परतंत्र लोकांत वावरत असूनहि, मीं परतंत्र रहात नाहीं, तोच संतप्त प्रदेशांत शांतीनें राहूं शकतो. याचेंच नांव तपस्या आहे.

एका भांड्यांत खिचडी शिजत असली आणि त्यांतील सर्व तांदूळ आणि मुगाचे दाणे उकळूं लागले तर त्यांत (ज्याला चाड म्हणतात) असा एकादाच दाणा शिजल्याशिवायचा रहातो आणि तो पोटांत गेला तरी पचत नाहीं. तसेंच या विश्वरूपी भांड्यांत या संपूर्ण विश्वाची खिचडी शिजत आहे. या तापत्या आणि उकळत्या भांड्यांत जो तापणार नाहीं, विरघळणार नाहीं, शिजणार नाहीं, त्याला काढून बाहेर फेंकून देण्यांत येतें. ही त्याची उत्क्रांति आहे. पुढें (अथर्ववेद कांड ११।३ मध्यें) म्हटलें आहे कीं ब्रह्मौदन शिजत आहे. या संपूर्ण सृष्टीच्या विशाल पात्रांत ही सर्व खिचडी शिजत आहे, असें उत्तम मनोरंजक अलंकारिक वर्णन येईल. येथें सर्व शिजत आहे, असें म्हटलें आहे. त्या तापलेल्या पात्रांत सर्वांनाच दुःख आणि कष्ट होत आहेत, तेथें जो शांत राहील त्याला धन्यता प्राप्त होईल. कमलपत्र ज्याप्रमाणें पाण्यांत असून भिजत नाहीं त्याप्रमाणें परिपक्वता प्राप्त झालेला मनुष्य या दुःखी जगांत राहत असूनहि जगांतील दुःखाकष्टांपासून दूर रहातो. अशी उदासीनता, वैराग्य, अलिप्तता, असंगवृत्ति अथवा अनासक्ति उन्नतीचें श्रेष्ठ साधन आहे.

आतां असें पहा कीं जे लोक बकऱ्याचें मांस शिजविण्याचा अर्थ या मंत्रांतून काढतात ते मांसाच्या न शिजलेल्या भागाला उन्नतीचा पंथ कसा दाखविणार आहेत! तसेंच तापलेल्या पात्रांत कोणता बकऱ्याचा भाग शांत स्थितींत रहाणार आहे! वस्तुतः हें वर्णनच अन्य स्थितीचें आहे. परंतु शब्दाचा भाव न समजल्या-कारणानें कित्येकांनीं त्याचा विपरीत अर्थ केला आहे.

श्रीमद् भगवद् गीतेंत जो असंगभाव आणि अनासक्तीचा उपदेश आहे तोच येथें या मंत्रांत तापलेल्या भांड्यांत न तापतां राहणें या शब्दांचा आहे. वाचकांनीं नीट पाहिलें तर त्यांची खात्री होईल. त्यानंतर आत्मशुद्धीचाहि एक उपाय दाखविला आहे–

यद् दुष्कृतं चकार, पदः प्र अवनेनिग्धि, प्रजानन् शुद्धैः शफैः आक्रमताम् (मं. ३)

*

' जो दुराचार झाला आहे, आणि ज्यामुळें पाय मलीन झाले आहेत, ते तुझे पाय धुवून टाक आणि अशा प्रकारें चालण्यानें पाय वाईट होतात हें जाणून घे; म्हणून शुद्ध पावलांनीं पुढें हो.' दुराचारानें पाय मलीन होतात, ते धुतले पाहिजेत. स्वतःचे पाय स्वच्छ करून स्वच्छ भूमीवर पाय ठेवल्यानें दुष्ट आचार घडण्याचा संभव रहात नाहीं. येथें उपलक्षणेनें (**दृष्टिपूतं न्यसेत् पादं**) या स्मृतिवचनाचाच आशय सांगितला आहे. असा आत्मशुद्धीचा मार्ग दाखविला आहे. अथर्ववेदांत त्याचें वर्णन यापूर्वी निराळ्या प्रकारानें केलें आहे—

द्रुपदादिव मुमुचानः स्विन्नः स्नात्वा मलादिव ।
पूतं पवित्रेणेवाज्यं विश्वे शुम्भन्तु मैनसः ॥
(अथर्व. ६।११५।३)

' ज्याप्रमाणें बंधनस्तंभापासून पशु मुक्त होतो, ज्याप्रमाणें मनुष्य स्नानानें अंगावरील मळापासून मुक्त होतो, अथवा ज्याप्रमाणें तापविल्यानें तूप शुद्ध होतें, त्याप्रमाणें मला पापापासून मुक्त करा.' या मंत्रांतील उपदेशानुसार प्रस्तुत सूक्तांतील मंत्रांत (**शुद्धैः शफैः आक्रमतां**) स्वतःचे पाय स्वच्छ करून पुढें होण्यास सांगितलें आहे. स्वतःचें आचरण शुद्ध ठेवण्याचा उपदेश या आज्ञेत आहे. वेदांत 'चरित्र' शब्दाचा 'पाय' आणि 'चालचलण' असे दोन्ही अर्थ होऊं शकतात. या रीतीनें आचरण शुद्धीनें आत्मशुद्धि करण्याचा उपदेश येथें करण्यांत आला आहे. या प्रकारें आत्मशुद्धि झाल्यानंतर त्याचें परब्रह्मास समर्पण झालें पाहिजे. हेंच त्याचें आत्मसमर्पण आहे. पहा, या विषयीं हे मंत्र विचार करण्यासारखे आहेत—

जीवता अजं ब्रह्मणे देयं आहुः ॥ (मं. ७)
श्रद्धधानेन दत्तः अजः तमांसि अपहन्ति । (मं. ७)

' जीवित मनुष्यानें स्वतःच्या (**अ-जं**) आत्म्याचें समर्पण (**ब्रह्मणे**) परब्रह्मासाठीं करावें आत्मा परमात्म्यासाठीं समर्पित व्हावा. याप्रमाणें श्रद्धायुक्त समर्पित झालेला अजन्मा आत्मा सर्व प्रकारचा अज्ञानांधकार दूर करतो.' समर्पित होण्यानें त्याची शक्ति वाढते, तेज वाढतें. आतां त्याच्या पराक्रमाचें क्षेत्र पहा—

पञ्चौदनः पञ्चधा विक्रमताम् । (मं. ८)

' वर-आमंत्रिलेला पंचभोजनी अजन्मा आत्मा पांच प्रकारच्या क्षेत्रांत पराक्रम करो.' कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियें, मन, चित्त

आणि बुद्धि हीं त्याचीं पांच कार्यक्षेत्रें आहेत. या क्षेत्रांत हा जीवात्मा कार्य करतो. या क्षेत्रांत त्यानें पुष्कळ पराक्रम करावा, कारण विक्रम केल्यानेंच त्याची उन्नति व्हावयाची आहे. असा पराक्रम केल्यानें त्याला (**त्रीणि ज्योतींषि आक्रंस्यमानः।** मं. ८) तीन तेजांची प्राप्ति होते. त्यांत एक तेज स्थूलाचें आहे, दुसरें मनाचें आहे आणि तिसरें तेज आत्मिक आहे. या तीनहि तेजांत उन्नति होते, म्हणजे त्याचीं तीं तेजें वाढतात. परंतु तेजें परमात्म्यास समर्पण झाल्यावरच वाढतात. त्यावांचून उन्नति असंभव आहे. तें दाखविण्यासाठीं—

त्वा इन्द्राय भागं परिनयामि । (मं. २)
पञ्चौदनः ब्रह्मणे दीयमानः । (मं. ७।१०)
पञ्चौदनं अजं ब्रह्मणे ददाति । (मं. ११।१२)
यं ब्रह्मणे निदधे । (मं. १९)

इतक्या मंत्रांत ब्रह्मासाठीं अजन्मा आत्म्याचें समर्पण करण्याचा वारंवार उपदेश करण्यांत आला आहे. जी गोष्ट विशेष महत्त्वाची असते ती याप्रमाणें पुनः पुनः सांगण्याची पद्धत वेदांत आहे. म्हणजे वेदांमध्यें जो उपदेश वारंवार केलेला असतो तो महत्त्वाचा असतो, असें समजलें पाहिजे.

आतां चौथ्या आणि पांचव्या मंत्रांत शमित्याच्या कर्माचा उल्लेख आहे. त्यांत चामडी कापून आणि जोड्याप्रमाणें व्यवस्था करून पात्रांत भरण्याचा उल्लेख आहे. ही क्रिया केल्यानें तो सुकृति लोकांत जातो, असें म्हटलें आहे. जर या मंत्रांत पशूला कापण्याचाच उद्देश असेल तर पुढें असें कां म्हटलें आहे—

नास्यास्थीनि भिन्द्यान्न मज्ज्ञो निर्धयेत् ।
सर्वमेनं समादायेदमिदं प्रवेशयेत् ॥ (मं. २३)

'याचीं हाडें न मोडावींत, त्याची चरबी पीळूं नये, या सर्वांसह त्याचा यांत प्रवेश करावा.' त्याचे अवयव न कापण्याचा हा स्पष्ट इशारा आहे. रक्त पिळूं नये तसेंच त्याला कापूं सुद्धां नये. त्याचीं हाडें वेगळीं काढूं नयेत, त्याच्या सर्व भागांसह त्यांत म्हणजे ब्रह्मांत अथवा परमात्म्यांत त्याचें समर्पण करा. याचा आशय त्याचे सर्व भाग त्यांत प्रविष्ट करण्याचा आहे. स्वतःच स्वतःला परमेश्वराच्या चरणीं सोंपवून देणें-अर्पण करणें हीच भक्तिभावाची परिसीमा आहे.

जर असें असेल तर शमित्याच्या चामडीला कापणें आणि सांध्याच्या अनुसार त्याच्या अवयवांना समर्थ करणें हें काय आहे, अशी शंका येथें उपस्थित होते. या शंकेचें निरसन अशा प्रकारें होऊं शकतें कीं पूर्वीच्या मंत्रांत जें कांहीं कापण्या-कुटण्याचें लिहिलें आहे तें इतक्या मर्यादेपर्यंतचें आहे कीं हाडें मोडू नयेत, चरबी बाहेर पाझरूं नये, आणि अवयव निराळे सुटे होऊं नयेत. परंतु सर्व अवयव सामर्थ्यसंपन्न व्हावेत. (**मा अभिद्रुहः परुशः एनं कल्पय** मं. ५) त्याचा द्रोह करूं नये आणि प्रत्येक सांध्यांत त्याला समर्थ बनवावें. वध करणें जर चौथ्या-पांचव्या मंत्रांतें आलें असतें तर त्याचा द्रोह न करण्याची आज्ञा त्याच मंत्रांत कशी आली असती! आणि प्रत्येक अवयव समर्थ बनविणें वध केल्यानंतर कसें संभवतें! वध न केला तर कदाचित् अवयव समर्थ बनावितां येतील; परंतु वध केल्यानंतर ते समर्थ कसे करतां येतील! म्हणजे तसा वध अभीष्ट नाहीं, हें नक्कीच.

आम्हांस असें वाटतें कीं चामडीला जरा खरचटून सांध्यापाशीं नाड्यांना शस्त्रद्वारें जरा उत्तेजित करण्याचा विधि या मंत्रांत लिहिला आहे. ज्याप्रमाणें एक प्रकारचा संधिवात सुईच्या अग्रानें कोण्या वनस्पतीचा रस सांध्यांत घालण्यानें बरा होतो, व ती सुई तांब्याची, चांदीची अथवा सोन्याची असते आणि अशा प्रकारची कांहीं शस्त्रेंहि आहेत— त्याप्रमाणें कातडीचा थोडा भाग दूर करून त्यांत विशिष्ट औषधि प्रयोग केल्यानें शरीरावयव सुदृढ होत असतात. हा विधि आतांपावेतों अज्ञात आहे. परंतु त्याचें स्वरूप अशा प्रकारचें कांहींसें आहे यांत शंका नाहीं. असो. या विषयीं संशोधन होणें जरूर आहे.

जर कोणी मनुष्य या मंत्रांत (**अज**) बकऱ्याच्या वधाचा उल्लेख आहे असा आग्रह धरील तर त्यानें मंत्र २० आणि २१ पहावेत. त्यांत अजाचें विश्वरूप वर्णन आहे. समुद्र ज्याची कांख आहे, उर पृथ्वी, द्युलोक पाठ आहे इत्यादि वर्णन कधीं बकऱ्याचें असणें शक्यच नाहीं. आणि जर असलें तर तो **अज** अजन्मा परमात्माच असला पाहिजे. तें परमात्म्याचा पुत्र जीवात्म्याचेंच वर्णन असूं शकेल, कारण परमपित्याचे गुणधर्म अंशरूपानें पुत्रांत येतात, आणि पुत्राचा विकास झाल्यानंतर पुत्राचे गुणधर्म पित्यासारखे होण्याचा संभव आहे. म्हणजे जेव्हां जीवात्मा उन्नत होऊन परमात्मारूप होतो, त्याचवेळीं हें वर्णन त्याला लागूं शकतें असा विचार केला असतां या सूक्तांतील 'अज' शब्दाचा अर्थ आत्मा आहे याविषयीं कांहींच शंका रहात नाहीं. आणि जीवात्म्याचें संपूर्णपणें समर्पण परमात्म्यामध्यें करण्यासाठींच जेव्हां जीवात्म्यांत परमात्मभाव पाहतात, तेव्हां त्या जीवात्म्याचा पृष्ठभाग द्युलोक आणि अंतरिक्ष मध्यभाग, तसेंच पृथ्वी तळचा भाग होऊं शकतो, असें मं. २१ आणि २० मध्यें सांगितलें आहे. आणि त्यासाठीं नंतर—

एष वा अपरिमितो यज्ञो यदजः पञ्चौदनः ।
(मं. २१)

‘ हा अपरिमित यज्ञ आहे ज्याचें नांव अज अथवा अजन्मा आत्मा आहे. ’ जीवात्मा परमात्म्यांत येवूनच अपरिमित होऊं शकतो. बकऱ्यांत अशी अपरिमितता कल्पणें शक्यच नाहीं. जीवात्म्याची शक्ति आणि उन्नति अपरिमित आहे. यासाठीं—

अपरिमितं यज्ञं आप्नोति । अपरिमितं लोकं अवरुन्द्धे ।
(मं. २२)

‘ आत्म्याचें समर्पण केल्यानें अपरिमित लोक प्राप्त होतो.’ अपरिमित दानानेंच अपरिमित फळ प्राप्त होतें. इतर सर्व दानें परिमित आहेत. आत्म्याचें दानच अपरिमित आहे, म्हणून अन्य पदार्थांच्या दानानें परिमित लोक प्राप्त होतो आणि या आत्म्याच्या समर्पणानें अपरिमित लोकाची प्राप्ति होते.

आत्मसमर्पणाबरोबर वस्त्र आणि सुवर्ण दानहि व्हावयास हवें. त्याचें विधान मंत्र २५, २६ आणि २९ मध्यें आहे. कारण नेहमीं दान दक्षिणेसहच करावयाचें असतें. दक्षिणेविरहित दान फलहीन होतें. मं. २७ आणि २८ मध्यें पुनर्विवाहित पति–पत्नी पंचौदन अजाचें दान करतील तर वियुक्त होत नाहींत असें सांगितलें आहे. वाचकांनीं पहावें कीं या मंत्रांत ‘ ब्रह्मणे ’ पद नाहीं. म्हणजे येथील आत्मसमर्पण ब्रह्मासाठीं नाहीं तर पतीचा पंचभोजनी आत्मा पत्नीला समर्पित व्हावा आणि पत्नीचा आत्मा पतीला समर्पित व्हावा. पुनर्विवाहित पति अथवा पत्नी असली तर त्यांनीं पूर्वीच्या पत्नी अथवा पतीचें चिंतन करूं नये तिनें अथवा त्यानें या नव संबंधित पति अथवा पत्नीला सर्वस्व मानावें. पूर्वीच्या स्मरणानें कुटुंबांत क्लेश निर्माण होतो, आणि संसारसुख दूर होतें. म्हणून म्हटलें आहे कीं पतीनें पत्नीसाठीं व पत्नीनें पतिसाठीं आत्मार्पण करावें. येथें कोणी असें विचारील कीं प्रथम पतिपत्नीना असें का सांगितलें नाहीं ? त्याचें कारण इतकेंच कीं प्रथम पत्नीच्या नजरे समोर दुसरा पति अथवा पत्नी नव्हतीच. त्यामुळें ते परस्पर प्रेम करतील हें क्रमप्राप्तच आहे. परंतु पुनर्विवाहित स्त्रीपुरुषांस पूर्व संबंधाचें स्मरण होणें संभवनीय आहे, म्हणून त्या दोषाचें निवारण करण्यासाठीं येथें सूचना देण्यांत आली आहे आणि ती योग्य आहे.

२९ व्या मंत्रांत म्हटलें कीं गाय, वस्त्र आणि सुवर्णदान करण्यानें स्वर्गप्राप्ति होते, सत्पात्रीं दान करण्यानें उत्तम फळ मिळतें. त्याच्या दानाचें महत्त्व दुसऱ्या मंत्रांतूनहि वर्णिलें आहे. तिसऱ्या मंत्रांत स्वतःच्या सर्व नातेवाईक–आप्तेष्टांना वारंवार बलपूर्वक सांगितलें आहे कीं पूर्वोक्त उपदेशाचें उत्तम स्मरण ठेवा आणि स्वतःची उन्नति करून घ्या.

अशाप्रकारें या सूक्तांत आत्मोन्नतीचा विषय सांगण्यांत आला आहे. खरोखरीच त्यांतील कांहीं भाग अर्थास कठिण आणि संदिग्ध आहे. तथापि वर दिलेल्या विचारसरणीनें मनन केलें असतां त्याचा आशय ध्यानीं येईल. अशारीतीनें विचार करण्यामुळें वाचकांस यांतील कित्येक सन्देह स्थानांचें रहस्य समजेल अशी आशा आहे.

प्रजेची पुष्टि

कांड ७, सूक्त १९

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – प्रजापतिः ।)

प्रजापतिर्जनयति प्रजा इमा धाता दधातु सुमनस्यमानः ।
संजानानाः संमनसः सयोनयो मयि पुष्टं पुष्टपतिर्दधातु ॥ १ ॥

अर्थ — (प्रजापतिः इमाः प्रजाः जनयति) प्रजापति परमेश्वर या सर्व प्रजेला उत्पन्न करतो आणि (सुमनस्यमानः धाता दधातु) तोच उत्तम मनानें युक्त, धारक देव तिला धारण करतो. त्यामुळें प्रजा (संजानानाः) ज्ञान प्राप्त करून एकमतानें कार्य करणारी, (संमनसः) एका विचारानें युक्त आणि (सयोनयः) एकाच कारणानें एकत्रबद्ध होऊन, त्या प्रजेत रहाणाऱ्या (मयि) माझ्या ठायीं (पुष्टिपतिः पुष्टं दधातु) पुष्टि देणारा ईश्वर पुष्टि देवो. [१]

प्रजेची पुष्टि कशी होईल म्हणजे प्रजेची शक्ति कशी वाढेल, याचा उपाय या सूक्तांत सांगितला आहे. त्याचे नियम असे–

१ सर्व प्रजेनें एकच ईश्वर मानावा आणि त्या देवास सर्वांचा उत्पादक समजावें.

२ त्या ईश्वराच्या शक्तीनें सर्वांची धारणा होते, असें समजावें आणि त्यालाच कर्ता, धर्ता आणि हर्ता मानावें.

३ (**संजानानाः**) सर्व प्रजाजन उत्तम ज्ञानानें युक्त होवोत आणि एक मतानें स्वतःचें कार्य करोत.

४ (**संमनसः**) उत्तम शुभ संस्कारयुक्त मन करून एक विचारानें उन्नतीचें कार्य करीत रहावें.

५ (**सयोनयः**) एकाच गोष्टीचें ध्यान करून सर्वांना त्याच कार्यासाठीं संघटित करावें, स्वतःचे संघ बनवावे आणि संघाचे नियम कोणी उल्लंघन करूं नयेत.

या प्रकारची संघटना करणाऱ्या लोकांना प्रजापोषक ईश्वर सर्व प्रकारची पुष्टि देतो. वाचकांनीं या सूक्ताचा उपदेश ध्यानीं घेऊन त्याप्रमाणें आचरण करून उन्नत व्हावें.

शेतांतून अन्न

कांड ७, सूक्त १८

(ऋषिः – अथर्वा । देवता – पृथिवी, पर्जन्यः ।)

प्र नभस्व पृथिवी भिन्द्धी३दं दिव्यं नभः । उद्नो दिव्यस्य नो धातरीशानो वि ष्या दृतिम् ॥१॥

न घ्रंस्तताप न हिमो जघान प्र नभतां पृथिवी जीरदानुः ।

आपश्चिदस्मै घृतमित्क्षरन्ति यत्र सोमः सदमित्तत्र भद्रम् ॥ २ ॥

अर्थ— हे पृथ्वी ! तूं (**प्र नभस्व**) उत्तम प्रकारें चूर्ण-बारीक-हो. हे (**धातः**) धारक देवा ! तूं (**ईशानः**) आमचा ईश्वर आहेस म्हणून (**इदं दिव्यं नभः भिन्धि**) या दिव्य मेघाला छिन्न भिन्न कर आणि (**दिव्यस्य उन्दः दृतिं विष्य**) दिव्य जलानें भरलेलें भांडें उघडून टाक. [१]

(**घ्रन् न तताप**) उष्णता देणारा सूर्य तापवीत नाहीं. (**हिमः न जघान**) हिमसुद्धां पीडा करीत नाहीं, (**जीरदानुः पृथिवी प्र नभतां**) अन्न देणारी जमीन चूर्ण करण्यांत येवो. (**आपः चित् अस्मै**) पाणी याच्यासाठीं (**घृतं इत् क्षरन्ति**) तुपाप्रमाणें वहात आहे. (**यत्र सोमः**) जेथें सोमादि वनस्पति होतात (**तत्र सदं इत् भद्रं**) तेथें सर्वदा कल्याण होतें. [२]

जमीन उत्तम प्रकारें नांगरून तयार करावी, त्यानंतर ईश्वराची प्रार्थना करावी कीं, तो उत्तमप्रकारें पाऊस पाडून आमची शेती उत्तम होण्यास साहाय्य करो. उष्णता फार पडूं नये अथवा थंडी पुष्कळ पडूं नये. जमीन चांगल्याप्रकारें तयार करण्यांत यावी, कमी जास्ती करूं नये. याप्रकारें शेती केल्यानें पुष्कळ उत्तम वनस्पति तयार होतील आणि सर्व प्राणीमात्रांचें कल्याण होईल.

अन्नाची वृद्धि

कांड ६, सूक्त १४२

(ऋषिः – विश्वामित्रः । देवता – वायुः ।)

उच्छ्रयस्व बहुर्भव स्वेन महसा यव । मृणीहि विश्वा पात्राणि मा त्वा दिव्याशनिर्वधीत् ॥ १ ॥

अर्थ— हे यवा ! (**स्वेन महसा उच्छ्रयस्व**) स्वतःच्या महात्म्यानें उंच वाढ, (**बहुः भव**) पुष्कळ हो; (**विश्वा पात्राणि मृणीहि**) सर्व पात्रें भरून टाक (**दिव्य अशनिः त्वा मा वधीत्**) आकाशांतील वीज तुझा नाश न करो. [१]

आशृण्वन्तं यवं देवं यत्र त्वाच्छावदामसि । तदुच्छ्रयस्व द्यौरिव समुद्र इवैध्यक्षितः ॥ २ ॥
अक्षितास्त उपसदोऽक्षिताः सन्तु राशयः । पृणन्तो अक्षिताः सन्त्वत्तारः सन्त्वक्षिताः ॥ ३ ॥

अर्थ— (आशृण्वन्तं देवं त्वा यवं) आमची गोष्ट ऐकणाऱ्या देवरूपी तुला यवाला (यत्र अच्छावदामसि) जेथें आम्हीं उत्तम प्रशंसनीय गोष्ट सांगतों, तेथें, (द्यौः इव तत् उच्छ्रयस्व) आकाशासारखा उंच हो आणि (समुद्रः इव अक्षितः एधि) समुद्रासारखा अक्षय हो. [२]

(ते उपसदः अक्षिताः) तुजपाशीं बसणारे अक्षय होवोत. (ते राशयः अक्षिताः सन्तु) तुझे ढीग अक्षय होवोत, (पृणन्तः अक्षिताः सन्तु) तृप्त करणारे अक्षय होवोत आणि (अत्तारः अक्षिताः सन्तु) खाणारेहि अक्षय होवोत. [३]

अन्नादि खाद्य पदार्थ पुष्कळ उत्पन्न व्हावेत. घरांतील धान्य साठवण्याचीं कोठारें भरून जावोत, आणि लोक तें अन्न खाऊन तृप्त होवोत. आणि खाणारे तसेंच खाऊं घालणारेहि श्रेष्ठ होवोत. दरवर्षी पुष्कळ धान्य पिकावें आणि लोक सुखी व्हावेत.

अन्न

कांड ६, सूक्त ७१

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – अग्निः, वैश्वानरः, देवाः ।)

यदन्नमद्मि बहुधा विरूपं हिरण्यमश्वमुत गामजामविम् ।
यदेव किं च प्रतिजग्रहाहमग्निष्टद्धोता सुहुतं कृणोतु ॥ १ ॥
यन्मा हुतमहुतमाजगाम दत्तं पितृभिरनुमतं मनुष्यैः ।
यस्मान्मे मन उदिव रारजीत्यग्निष्टद्धोता सुहुतं कृणोतु ॥ २ ॥

अर्थ— (बहुधा विरूपं यद् अन्नं अद्मि) बहुधा विविध प्रकारचें जें अन्न मीं खातों, तसेंच (हिरण्यं अश्वं गां अजां उत अविं) सोनें, घोडा, गाय, बकरी, मेंढी, (यत् एव किं च अहं प्रतिजग्रहाह) जें कांहीं मीं ग्रहण केलें आहे, (होता अग्निः तत् सुहुतं कृणोतु) होता अग्नि त्याचें उत्तम हवन करो. [१]

(यत् हुतं अहुतं) जें अर्पण केलेलें वा न दिलेलें, (पितृभिः दत्तं) पितरांनीं दिलेलें, (मनुष्यैः अनुमतं) मनुष्यांनीं अनुमोदन दिलेलें (मा आजगाम) मजपाशीं आलें आहे, (यस्मात् मे मनः उत् रारजीति इव) ज्यामुळें माझें मन उत्तम रीतीनें प्रसन्न होतें (होता अग्नि तत् सुहुतं कृणोतु) होता अग्नि त्याचा उत्तम रीतीनें स्वीकार करो. [२]

भावार्थ— मीं जें अनेक प्रकारचें अन्न खातों आणि सोनें, चांदी, घोडा, गाय, बकरी इत्यादि पदार्थांचा स्वीकार करतों, तें सर्व उत्तम प्रकारें यज्ञांत समर्पित होवो. [१]

यज्ञांत समर्पित अथवा असमर्पित, पितृपितामहांपासून प्राप्त, मनुष्यांपासून मिळालेलें जें कांहीं माझ्याजवळ आलें आहे, ज्यावर माझें मन आसक्त झालें आहे, तें सर्व उत्तम रीतीनें यज्ञांत समर्पित होवो. [२]

यद॒न्नमद्म्यनृ॑तेन देवा दा॒स्यन्नदा॑स्यन्नु॒त सं॑गृ॒णामि॑ ।
वै॒श्वा॒न॒रस्य॑ मह॒तो म॑हि॒म्ना शि॒वं मह्यं॒ मधु॑मदस्त्वन्न॑म् ॥ ३ ॥

अर्थ— हे (**देवाः**) देवहो ! (**यत् अन्नं अनृतेन अद्मि**) जें अन्न मीं असत्य व्यवहारानें खातों, (**दास्यन् अदास्यन् उत संगृणामि**) दान करणारा अथवा न करणारा जो मीं संग्रह करतों तें (**अन्नं**) अन्न (**महतः वैश्वानरस्य महिम्ना**) मोठ्या वैश्वानराच्या- परमात्म्याच्या महात्म्यानें (**मह्यं शिवं मधुमत् अस्तु**) माझ्यासाठीं कल्याणकारक आणि गोड होवो. [३]

भावार्थ— जें अन्न अथवा भोग मी घेतों, ते सत्यानें अथवा असत्य मार्गानें मिळालेले असोत, ते सर्व मीं यज्ञांत दान करतों. तें सर्व यज्ञासाठीं दिलेलें असो अथवा नसो, परमात्म्याच्या कृपेनें तें सर्व मला मधुरता देणारें होवो. [३]

अन्न

अनेक प्रकारचें अन्न

मनुष्य जें अन्न खातो तें ' **वि-रूप** ' म्हणजे विविध रंगारूपाचें असतें, डाळ, तांदूळ, भाकर, खीर, इत्यादींचें रंग आणि रूप निरनिराळें आहे. या अन्नाशिवाय दुसरें उपभोग पदार्थ सोनें, चांदी, जवाहीर, घोडा, गाय, इत्यादि अनेक आहेत. सोनें, चांदी, जवाहीर इत्यादि शरीर शृंगारण्यास उपयोगी आहेत, घोडा दूर जाण्यासाठीं उपयुक्त आहे, बैल शेतीस उपयुक्त होतो. आणि गाय, बकरी दूत देतात. अशा प्रकारें अनेकानेक पदार्थ उपयोगी आहेत. ते सर्व यज्ञांत समर्पित होवोत, म्हणजे माझ्या एकट्याच्या स्वार्थी उपयोगासाठीं न वापरतां सर्व जनतेच्या कार्यासाठीं समर्पित होवोत.

धनाचे चार भाग

मनुष्यापाशीं जें धन आहे त्याचे चार भाग होतात, त्यांचें विवरण पहा—

१ **पितृभिः दत्तं**— मातापित्यांपासून मिळालेलें, जन्माच्या संस्कारामुळें जें प्राप्त होतें.

२ **मनुष्यैः अनुमतं**— मनुष्यांकडून अनुमोदित म्हणजे स्वतःच्या वंशांतील दुसऱ्या मनुष्याच्या संमतीनें मिळालेलें धन,

३ **हुतं आजगाम**- कोणापासून दान मिळालेलें धन.

४ **अहुतं आजगाम**- कोणी दान दिलें नसतां अन्य कांहीं मार्गानें मिळालेलें.

धन मिळण्याचे हे चार प्रकार आहेत. त्यांतील कोणत्याहि मार्गानें मिळालेलें धन असलें, आणि त्यावर स्वतःचें मन आसक्त असलें तरी तें धन यज्ञासाठीं दिलें पाहिजे.

जें अन्न खाण्यांत येतें, दान करण्यांत येतें आणि संग्रह करण्यांत येते, तें सर्व ईश्वरार्पण होऊन आमचें उत्तम कल्याण करणारें होवो.

असा या सूक्ताचा आशय आहे, वाचकांनीं त्यांचें मनन करून लाभ घ्यावा.

अन्नभाग

कांड ६, सूक्त ११६

(ऋषिः - जाटिकायनः । देवता - विवस्वान् ।)

यद्या॒मं च॒क्रुर्नि॒खन॑न्तो॒ अग्रे॒ कार्षी॑वणा अन्न॒विदो॒ न वि॒द्यया॑ ।
वै॒व॒स्व॒ते राज॑नि॒ तज्जु॑हो॒म्यथ॑ य॒ज्ञियं॒ मधु॑मदस्तु॒ नोऽन्न॑म् ॥ १ ॥

अर्थ- (**अग्रे कार्षीवणाः निखनन्तः**) प्रथम शेती करणारीं मनुष्यें भूमि खोदून (**विद्यया अन्नविदः न**) ज्ञानानें अन्न प्राप्त करणाऱ्या प्रमाणें, (**यत् यामं चक्रुः**) जे नियम करीत रहातात, (**तत् वैवस्वते राजनि जुहोमि**) त्याला वैवस्वत म्हणजे वसाहत करविणाऱ्या राजाला समर्पित करतों. (**अथ नः यज्ञियं अन्नं मधुमत् अस्तु**) आणि आमचें यजनीय अन्न मधुर होवो. [१]

भावार्थ— सुरवातीस शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनीं जे नियम दर्शविले त्यांसच राजानें संमति दिली, त्यांच्या पालनात सर्वांस अन्न गोड लागूं लागलें आणि यज्ञासाठीं समर्पित होऊं लागलें. [१]

वैवस्वतः कृणवद्भागधेयं मधुभागो मधुना सं सृजाति ।
मातुर्यदेनं इषितं न आगन्यद्वा पितापराद्धो जिहीडे ॥ २ ॥
यदीदं मातुर्यदि वा पितुर्नः परि भ्रातुः पुत्राच्चेतस एन आगन्
यावन्तो अस्मान्पितरः सचन्ते तेषां सर्वेषां शिवो अस्तु मन्युः ॥ ३ ॥

अर्थ— (**वैवस्वतः भागधेयं कृणवत्**) सर्वांस वसविणारा राजा सर्वांच्या वाट्यास येईल तसें अन्न देवो. (**मधुभागः मधुना सं सृजाति**) अन्नाचा मधुर भाग जास्त मधुरतेनें तो युक्त करतो. (**मातुः इषितं यत् एनः नः आगन्**) मातेकडून प्रेरित झालेलें जें पाप आमच्याजवळ आलें आहे, (**यत् वा अपराद्धः पिता जिहीडे**) अथवा जें आमच्या अपराधानें पित्याच्या क्रोधामुळें झालें आहे. [२]

(**यदि मातुः यदि वा पितुः**) माता अथवा पित्याकडून (**भ्रातुः पुत्रात्**) भावाकडून अथवा पुत्राकडून (**इदं एनः नः चेतसः परि आगन्**) हें पाप आमच्या चित्तापाशीं आलें आहे, (**यावन्तः पितरः अस्मान् सचन्ते**) जितके पितर आम्हांशीं संबंधित आहेत, (**तेषां सर्वेषां मन्युः शिवः अस्तु**) त्या सर्वांचा क्रोध आम्हांसाठीं कल्याणकारक होवो. [३]

भावार्थ—राजानें भूमींतून उत्पन्न झालेल्या अन्नाचे योग्य भाग करावे. त्यांस अधिक मधुर समजून लोक सेवन करीत. त्याचप्रमाणें मातापित्यांपासून सुद्धां आमच्याजवळ अन्नभाग येतो, त्याचेंसुद्धां आम्हीं याचप्रमाणें सेवन करूं. [२]

माता, पिता, बंधु, पुत्र यांच्याकडून जो भाग आमच्याजवळ येतो, कदाचित् त्यासाठीं त्यांना राग आला असेल, तर तो आम्हांस कल्याणप्रद होवो. [३]

प्रजेची संमति

शेती करणाऱ्या सर्व लोकांनीं स्वतःसाठीं नियम तयार करावे, सर्व प्रजेनें एकमतानें तयार केलेले नियम राजानें मान्य करावे आणि तदनुसार राज्य चालवावें. असें करण्यानें राजा आणि प्रजा दोघांचें कल्याण होईल, आणि सर्वांसच अन्नाचा स्वाद मिळेल. राजानें अन्नाचे योग्य भाग पाडून सर्वांपासून घ्यावे आणि प्रजेनेंसुद्धां योग्य प्रकारें वांटून द्यावें. ज्याच्या भागास जें येईल तेवढ्यानें त्यानें संतुष्ट रहावें आणि आनंदानें त्याचा उपयोग करावा. कोणी दुसऱ्याचा भाग अन्यायानें हिरावून घेऊं नये. मातापित्यांकडून जो वारसा मिळतो त्यांत त्यांचा क्रोधहि येतो. परंतु तो संततीचें कधीं अहित करीत नाहीं; कारण मातापित्यांच्या प्रेमामुळें संततीचें कल्याणच होतें.

धान्याचें संरक्षण

कांड ६, सूक्त ५०

(ऋषिः – अथर्वा (अभयकामः) । देवता – अश्विनौ ।)

हतं तर्दं समङ्कमाखुमश्विना छिन्तं शिरो अपि पृष्टीः शृणीतम् ।
यवान्नेददानपि नह्यतं मुखमथाभयं कृणुतं धान्याय ॥ १ ॥

अर्थ— हे (**अश्विनौ**) अश्विनी देव हो ! (**तर्दं समंकं आखुं हतं**) नाश करणाऱ्या आणि जमिनींत बिळें करून रहाणाऱ्या उंदरांना मारा. त्यांचें (**शिरः छिन्तं**) शिर तोडा (**पृष्टीः अपि शृणीतं**) त्यांची पाठ मोडून टाका, ते उंदीर (**यवान् न इत् अदान्**) कधीं जव न खावोत, (**मुखं अपि नह्यतं**) त्यांचें मुख बंद करा, (**अथ धान्याय अभयं कृणुतं**) आणि धान्याची सुरक्षितता करा. [१]

तर्द् है पतङ्ग है जभ्य हा उपक्वस । ब्रह्मेवासंस्थितं हविरनदन्त इमान्यवानहिंसन्तो अपोदित ॥ २ ॥
तर्दापते वघापते तृष्टजम्भा आ शृणोत मे ।
य आरण्या व्यद्वरा ये के च स्थ व्यद्वरास्तान्त्सर्वाञ्जम्भयामसि ॥ ३ ॥

अर्थ-(है तर्द) हे हिंसका ! (है पतंग) हे टोळा ! (हा जभ्य, उपक्वस) हे वध्य आणि दुष्टा! (ब्रह्मा इव असंस्थितं हविः) ब्रह्मा ज्याप्रमाणें असंस्कृत हविचा त्याग करतो, त्याप्रमाणें (इमान् यवान् अनदन्तः अहिंसन्तः) या जवास न खातां अथवा त्याचा नाश न करतां, (अपोदित) तुम्हीं दूर जा म्हणजे त्यांना सोडून द्या. [२]

हे (तर्दापते) महाहिंसका ! हे (वघापते) टोळ हो ! हे (तृष्टजम्भाः) तीक्ष्ण दांतांच्या ! (मे आ शृणोत) माझें म्हणणें ऐका. (ये आरण्याः व्यद्वराः) जे जंगली आणि विशेष खादाड आहेत आणि (ये के च व्यद्वराः स्थ) जे कोणी भक्षक आहेत, (तान् सर्वान् जम्भयामसि) त्या सर्वांचा मीं नाश करतों. [३]

धान्यांचे नाशक जीव

उंदीर, पतंग, टोळ, इत्यादि जंतू असे आहेत कीं ते धान्याचा नाश करतात. रोपांना मारून टाकतात, आणि टोळ तर असे आहेत कीं कोट्यावधि संख्येनें एकत्रित येतात. धान्य आणि झाडांवर हल्ला करून त्यांचा नाश करतात. त्यांच्यापासून धान्याचें रक्षण केलें पाहिजे, म्हणून उंदरांना आणि टोळांना मारलें पाहिजे असें पहिल्या मंत्रांत सांगितलें आहे.

या सूक्तांत त्यांच्या नाश करण्याची रीत सांगितली नाहीं, परंतु धान्याचें रक्षण केलें पाहिजें इतकेंच सांगितलें आहे. कदाचित् कोठें त्यांचा नाश करण्याचा उपाय उपलब्ध झाला तर शेतकऱ्यांचा मोठा लाभ होईल. उंदीरसुद्धां हजारोंच्या संख्येनें पिकलेल्या शेतांचा नाश करतात, आणि टोळ कोट्यावधींच्या संख्येनें येतात. जर कोणी संशोधक त्यांच्या नाशाचा उपाय शोधील तर त्याचे जगावर मोठे उपकार होतील.

खानपान

कांड ७, सूक्त ७२

(ऋषिः - अथर्वा । देवता - इन्द्रः ।)

उत्तिष्ठताव पश्यतेन्द्रस्य भागमृत्वियम् । यदि श्रातं जुहोतन यद्यश्रातं ममत्तन ॥ १ ॥
श्रातं हविरो ष्विन्द्र प्र याहि जगाम सूरो अध्वनो वि मध्यम् ।
परि त्वासते निधिभिः सखायः कुलपा न व्राजपतिं चरन्तम् ॥ २ ॥

अर्थ- (उत् तिष्ठत) उठा आणि (इन्द्रस्य ऋत्वियं भागं अवपश्यत) प्रभूचा ऋतूका अनुकूल असा भाग पहा. (यदि श्रातं) जर परिपक्क झाला असला तर (जुहोतन) त्याचा स्वीकार करा, आणि (यदि अश्रातं ममत्तन) जर पिकला नसला तर तो पिकेपर्यंत आनंद करा. [१]

हे (इन्द्र) प्रभो ! (श्रातं हविः ओ सुप्रयाहि) हवि सिद्ध झाला आहे, त्याला तूं उत्तम प्रकारें प्राप्त हो. (सूरः अध्वनः मध्यं वि जगाम) सूर्य स्वतःच्या मार्गाच्या मध्यभागीं गेला आहे. (सखायः निधिभिः त्वा परि आसते) समान विचाराचे लोक स्वतःच्या संग्रहासाठीं तुझ्या चारी बाजूंस बसतात, (कुलपाः व्राजपतिं चरन्तं न) ज्याप्रमाणें कुलपालक पुत्र संघपति पित्याजवळ येतात. [२]

भावार्थ— उठा आणि ईश्वरानें दिलेल्या ऋतुप्रमाणें अनुकूल अन्नभाग पहा. जर पिकला असला तर कापणी करा, पिकला नसला तर तो पिकेपर्यंत आनंद करा. [१]

हे प्रभो ! अन्नभाग परिपक्क झाला आहे, सिद्ध झाला आहे. येथें या. सूर्य मध्यान्हीं आला आहे. सर्व मित्र आपआपल्या संग्रहासाठीं एकत्रित झाले आहेत. ज्याप्रमाणें पुत्र पित्यापाशीं एकत्रित होतात, त्याप्रमाणें आम्हीं तुझ्याजवळ एकत्रित झालों आहोंत. [२]

श्रातं मन्य ऊधनि श्रातमग्नौ सुशृतं मन्ये तदृतं नवीयः ।
माध्यन्दिनस्य सवनस्य दध्नः पिबेन्द्र वज्रिन्पुरुकृज्जुषाणः ॥ ३ ॥

अर्थ-(ऊधनि श्रातं मन्ये) गाईच्या स्तनांत दूध परिपक्व झालें आहे असें मीं मानतों. त्यानंतर (अग्नौ श्रातं) अग्निवर परिपक्व होतें, तेव्हां (तत् ऋतं नवीयः सुशृतं मन्ये) तें दूध उत्तम प्रकारें परिपक्व झालें आहे असें मीं मानतों. हे (पुरुकृत् वज्रिन् इन्द्र) पुष्कळ कार्यें करणाऱ्या वज्रधारी प्रभो ! (जुषाणः) याचें सेवन करून (माध्यंदिनस्य सवनस्य दध्नः पिब) दिवसाच्या मध्यसमयीं सवनाचें दहीं प्राशन कर. [३]

भावार्थ— मला वाटतें कीं गाईच्या स्तनांत दूध परिपक्व होतें. त्यानंतर अग्निवर परिपक्व होतें. नवें धान्य याप्रमाणें तयार होतें. हे प्रभो ! दिवसाच्या मध्यभागीं त्याचें सेवन करा आणि दहीं प्या. [३]

खानपान

जेवण्याची वेळ

सूर्य मध्यान्हीं येतो तेव्हां भोजन केलें पाहिजे, ही गोष्ट या सूक्तानें प्रतीत होते, पहा—

सूरः अध्वनः मध्यं विजगाम । श्रातं हविः सुप्रयाहि ॥ (मं. २)

' सूर्य मार्गाच्या मध्यभागीं पोंहोचला आहे, म्हणून शिजवलेलें अन्न सेवन करा. ' हें वाक्य भोजनाची वेळ सूर्य मध्यान्ही आल्यावर अथवा त्यापेक्षां थोडी उशीराची असावी ही गोष्ट स्पष्ट करीत आहे. हवि नांवाचें अन्न आहे. तें अन्न शिजविलेलें आहे. अन्न एकतर गाईच्या (ऊधनि श्रातं) स्तनांत परिपक्व झालेलें आहे, आणि त्यानंतर अग्निवर परिपक्व होतें. त्यानंतर देवतांना समर्पण करून भोजन करतात. दूध तापवल्यावर त्याचें दहीं करतात. तें दहीं (माध्यंदिनस्य दध्नः पिब) दुपारच्या जेवणाबरोबर पिण्यास फार योग्य असतें, रात्रीच्या वेळीं अथवा सकाळीं पिणें उचित नाहीं. कारण कीं दहीं शीतवीर्य-थंड असल्यानें तें दुपारींच पिणें चांगलें.

त्याप्रमाणें गाईच्या स्तनांत दूध परिपक्व होतें त्याप्रमाणें गो म्हणजे भूमीमध्यें धान्य इत्यादींची उत्पत्ति होते. तें सुद्धां परिपक्व होईल तेव्हांच त्याची कापणी करावयाची असते. त्यानंतर अग्निवर शिजवून अथवा भाजून त्याचें सेवन केलें पाहिजे. हें अन्न दूध असो अथवा धान्य इत्यादि असो तें (ऋतं नवीयः) नवेंच घेतलें पाहिजे. दूधहि ताजेंच घ्यावें. धान्य जें फार जुनें असेल तें वापरूं नये. शिळें खावूं नये. भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं—

यातयामं गतरसं पूतिपर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥
(भ. गी. अ. १७।१०)

' जें अन्न शिजविल्यानंतर तीन तास होऊन गेले, जें नीरस आहे, दुर्गंधयुक्त आहे, आणि अपवित्र आहे तें तामस लोकांना प्रिय असतें. ' म्हणजे अन्न शिजवल्यानंतर तीन तास झाल्यावर त्या अन्नाचें सेवन करूं नये. तीन तासपर्यंत तें ताजें समजलें जातें. तेवढ्या वेळांतच जेऊन घेतलें पाहिजे.

परमेश्वर (ऋत्वियं भागं) ऋतूंनां योग्य असेंच अन्न देतो. ज्या ऋतूंत जें अन्न सेवन करण्यास योग्य असतें तें अन्न, फूल, फळ, रस, इत्यादि देतो, जर एखादें फळ कच्चें असलें तर तें पिकेपर्यंत वाट पाहिली पाहिजे.

कुटुंबांतील सर्व मनुष्यांनीं तसेंच (सखायः) इष्टमित्रांनीं स्वतःच्या ताटांत (निधिभिः) अन्न वाढून घ्यावें, आणि सर्वांनीं बरोबर एका पंक्तींत बसावें. सर्वांनीं स्वतःच्या अन्नांतून थोडा भाग देवतांना समर्पण करावा. सर्व इष्टमित्रांनीं असें मानावें कीं ईश्वर त्यांच्यामध्यें आहे अथवा स्वतः त्यांच्या सर्व बाजूस आहे, आणि जें अन्न मिळेल तें आनंदानें सेवन करावें.

औषधिरसाचें पान

कांड ६, सूक्त १६

(ऋषिः – शौनकः । देवता – चन्द्रमाः, मंत्रोक्तदेवताः ।)

आबयो अनाबयो रसस्त उग्र आबयो । आ ते करम्भमद्मसि ॥ १ ॥
विहल्हो नाम ते पिता मदावती नाम ते माता । स हिन त्वमसि यस्त्वमात्मानमावयः ॥ २ ॥
तौविलिकेऽवेलयावायमैलब ऐलयीत् । बभ्रुश्च बभ्रुकर्णश्चापेहि निराल ॥ ३ ॥
अलसालासि पूर्वा सिलाञ्जालास्युत्तरा । नीलागलसाला ॥ ४ ॥

अर्थ — हे (आबयो, आबयो अनाबयो) पसरणाऱ्या आणि न पसरणाऱ्या वनस्पति ! (ते रसः उग्रः) तुझा रस उग्र आहे. (ते करंभं आ अद्मसि) तुझ्या रसाचें आम्हीं पेय बनवितों. [१]

(ते पिता विहल्हः) तुझा पिता विहल्ह आणि (ते माता मदावती नाम) तुझी माता मदावती नांवाची आहे. (सः हिन त्वं असि) त्यांच्यापासूनच तूं होतेस. (यः त्वं आत्मानं आवयः) जी तूं स्वतःच्या आत्म्याचें रक्षण करतेस. [२]

(तौविलिके अव ईलय) प्रगतीच्या कार्यांत आम्हांस प्रेरित कर. (अयं ऐलबः अप ऐलयीत्) या भूमीविषयीं कार्य करणारा प्रेरणा करतो. हे (आल) समर्थ ! (बभ्रुः च बभ्रुकर्णः च) करड्या रंगाचा आणि करड्या कानाचा (निः अप इहि) आम्हांपासून दूर राहो. [३]

(पूर्वा अलसाला) प्रथम तूं आळसाला अडथळा करणारी आहेस, (उत्तरा सिलांजाला) नंतर तूं अणूपर्यंत पोहोंचणारी आहेस. तसेंच (नीलागलसाला) घराघरांतून उपयोगी आहेस. [४]

रसपान

या सूक्तांत **' करंभ '** शब्द आहे. दही आणि सातूच्या रसाच्या मिश्रणानें तयार होणाऱ्या पेयाचें तें नांव आहे. बद्धकोष्ठ विकार दूर करणारें आणि फार पुष्टिकारक तें होतें. त्यांत आणखी कित्येक वनस्पतींचे रस मिसळल्यानें त्याचे गुण वाढतात.

' विहल्ह ' (पिता) वृक्षावर **' मदावती '** नामक (माता) वनस्पतीचें कलम करून जी औषधी तयार होते ती (**आत्मानं आवयः**) आत्म्याचें म्हणजे स्वतचें रक्षण करणारी होते. हें दुसऱ्या मंत्राचें कथन आहे. ह्या मातापितास्थानीय औषधि हल्लीं अप्राप्य आहेत.

याचप्रमाणें या सूक्तांत आलेल्या इतर वनस्पती कोणत्या त्यांची माहिती नाहीं. आबयु, अनाबयु, विहल्ह (पिता), मदावती (माता), तौविलिका, ऐलब, बभ्रु, बभ्रुकर्ण, आल, अलसाला, (पूर्वा) सिलांजाला, (उत्तरा) नीलगलसाला इत्यादि वनस्पतींचीं नांवें या सूक्तांत आलीं आहेत, पण त्यांचा पत्ता लागत नाहीं. त्यामुळें त्यांच्याविषयीं कांहीं विशेष लिहितां येत नाहीं.

ऋणरहित होणें

कांड ६, सूक्त ११७

(ऋषिः – कौशिकः । देवता – अग्निः ।)

अपमित्यमप्रतीत्तं यदस्मि यमस्य येन बलिना चरामि ।
इदं तदग्ने अनृणो भवामि त्वं पाशान्विचृतं वेत्थ सर्वान् ॥ १ ॥
इहैव सन्तः प्रति दद्म एनज्जीवा जीवेभ्यो नि हराम एनत् ।
अपमित्य धान्यं१ यज्जघसाहमिदं तदग्ने अनृणो भवामि ॥ २ ॥
अनृणा अस्मिन्ननृणाः परस्मिन्तृतीये लोके अनृणाः स्याम ।
ये देवयानाः पितृयाणाश्च लोकाः सर्वान्पथो अनृणा आ क्षियेम ॥ ३ ॥

अर्थ— (यत् अपमित्यं अप्रतीत्तं अस्मि) जें परत करणें योग्य असतांहि परत न केल्यामुळें मीं ऋणी राहिलों आहें, आणि (यमस्य येन बलिना चरामि) नियन्त्याच्या ताब्यांत या ऋणाच्या योगानें पोंहोंचलों आहें, हे अग्ने ! (इदं तत् अनृणः भवामि) आतां तें ऋण फेडून मीं ऋणरहित होईन. (त्वं सर्वान् विचृतं पाशान् वेत्थ) तूं सर्व ऋणांच्या मोकळया झालेल्या पाशांस जाणतोस. [१]

(इह इव सन्तः एनत् प्रति दद्म) येथेंच राहून त्या ऋणाला फेडून टाकतों. (जीवः जीवेभ्यः एनत् निहरामः) या जन्मांत अन्य जीवांच्या या ऋणांस आम्हीं फेडून टाकतों. (यत् धान्यं अपमित्य अहं जघस) जें धान्य उधारीनें घेऊन खाल्लें आहे, हे अग्ने ! (इदं तत् अनृणः भवामि) हें तें आहे आणि या रीतीनें मीं ऋणरहित होतों. [२]

(अस्मिन् लोके अनृणाः) या लोकांत आम्हीं ऋणरहित होऊं; (परस्मिन् अनृणाः) परलोकांत ऋणरहित व्हावें, आणि (तृतीये लोके अनृणाः स्याम) तिसऱ्या लोकांतहि आम्हीं ऋणरहित व्हावें. (ये देवयानाः पितृयाणाः च लोकाः) जे देवयान आणि पितृयानांतील लोक आहेत, (सर्वान् पथः अनृणाः आक्षियेम) त्या सर्व मार्गांत आम्हीं ऋणरहित होऊन रहावें. [३]

भावार्थ— जें कर्ज घेतलें असेल तें आतां वेळेवर परत दिलें पाहिजे, जर परत न केलें तर ऋण घेणारा दोषी होतो. त्या दोषांतून मुक्त होण्यासाठीं यत्न केला पाहिजे. सर्वांनीं स्वतःचे पाश तोडून प्रथम ऋणमुक्त व्हावें. (१)

या जगांत जिवंत आहोंत तो पावेतों स्वतःच्या ऋणांतून मुक्त झालें पाहिजे, म्हणजे स्वतः केलेलें कर्ज फेडलें पाहिजे. स्वतः-च्या मुलांबाळांना फेडण्यास कर्ज शिल्लक ठेवूं नये. धान्याचें अथवा पैशाचें कर्ज असो तें त्वरित परत करावें. [२]

या लोकांतील ऋण फेडलें पाहिजे, परलोकाच्या ऋणांतून मुक्त झालें पाहिजे, आणि इतर ऋणांतूनहि मुक्त व्हावयास हवें. देवयान आणि पितृयाण या सर्व स्थानांत ऋणरहित व्हावयास पाहिजे. [३]

मनुष्यानें सर्व प्रकारच्या ऋणांतून मुक्त झालें पाहिजे. ऋणी राहून मरणें योग्य नाहीं. हें सूक्त सुबोध व सोपें असल्यानें विशेष स्पष्टीकरणाची आवश्यकता नाहीं.

ऋणरहित व्हावें

कांड ६, सूक्त ११८

(ऋषिः – कौशिकः । देवता – अग्निः ।)

यद्धस्ताभ्यां चकृम किल्बिषाण्यक्षाणां गत्नुमुपलिप्समानाः ।
उग्रंपश्ये उग्रजितौ तदद्याप्सरसावनु दत्तामृणं नः ॥ १ ॥
उग्रंपश्ये राष्ट्रभृत्किल्बिषाणि यदक्षवृत्तमनु दत्तं न एतत् ।
ऋणान्नो नर्णमेर्त्समानो यमस्य लोके अधिरज्जुरायत् ॥ २ ॥
यस्मा ऋणं यस्य जायामुपैमि यं याचमानो अभ्यैमि देवाः
ते वाचं वादिषुर्मोत्तरां मद्देवपत्नी अप्सरसावधीतम् ॥ ३ ॥

अर्थ— (अक्षाणां गत्नुं उप लिप्समानाः) जुगारखान्यांत जाण्याची इच्छा करणारे आम्ही (यत् हस्ताभ्यां किल्बिषाणि चकृम) जी हातांनीं पापें करतों, (तत् नः ऋणं अद्य) तें आमचें ऋण आज (उग्रंपश्ये उग्रजितौ अप्सरसौ अनुदत्तां) उग्रतेनें पहाणारी आणि उग्रतेनें जिंकणारी अशा दोन्ही अप्सरा आमच्याकडून देववून टाकोत. [१]

हे (उग्रंपश्ये राष्ट्रभृत्) उग्रतेनें पहाणाऱ्या आणि राष्ट्राचें भरणपोषण करणाऱ्या ! (यत् अक्षवृत्तं) जें जुगाराचें पाप आहे आणि जीं (किल्बिषाणि) अन्य पापें आहेत, (नः एतत् अनु दत्तं) आमच्याकडून तें सर्व देऊन टाकण्यांत आलें आहे. (ऋणात् ऋणं न एर्त्समानः) घेणेकऱ्यानें ऋण परत न केल्यानें, कर्ज देणारा (अधिरज्जुः यमस्य लोके नः आयत्) दोर घेऊन यमलोकांत आमच्याजवळ येईल. [२]

हे (देवाः) देव हो ! (यस्मै ऋणं) ज्याला ऋण परत देण्याचें आहे, (यस्य जायां उपैमि) ज्याच्या स्त्री-पाशीं मदत मागण्यास मीं जातों, (यं याचमानः अभ्येमि) ज्याच्याजवळ याचना करीत मीं जाऊन पोहोंचतों, (ते मत् उत्तरां वाचं मा वादिषुः) ते माझ्याशीं अधिक कठोर भाषण न करोत. हे (देवपत्नी अप्सरसौ) देवपत्नी अप्सरांनों ! (अधीतं) ध्यानांत ठेवा अशी माझी प्रार्थना आहे. [३]

भावार्थ— जुगारखान्यांत जाऊन जें पाप केलें आहे आणि इतरत्रहि जें पाप आमच्या हातून होतें, अशाप्रकारें आम्हीं जें ऋण करतों तें सर्व फेडिलें पाहिजे. [१]

जुगाराचें पाप, इतर पापें, आणि ऋणें जर दूर करण्यांत न आलीं तर आम्हांस बंधनांत रहावें लागेल. [२]

ज्याचें ऋण घेतलें आहे अथवा ज्याच्याजवळ कांहीं याचना केली आहे, तो आम्हांस वाईट कठोर शब्द न बोलो, अशी व्यवस्था करावयास हवी. [३]

हें सूक्त कांहीं अंशी संदिग्ध आहे, त्यामुळें त्याचें विशेष स्पष्टीकरण करणें अशक्य आहे, कारण कीं कित्येक शब्दांचा संबंध स्पष्टरीतीनें समजत नाहीं.

ऋणरहित व्हावें

कांड ६, सूक्त ११९

(ऋषिः — कौशिकः । देवता — वैश्वानरोऽग्निः ।)

यददीव्यन्नृणमहं कृणोम्यदास्यन्नग्न उत संगृणामि ।
वैश्वानरो नो अधिपा वसिष्ठ उदिन्नयाति सुकृतस्य लोकम् ॥ १ ॥
वैश्वानराय प्रति वेदयामि यद्यृणं संगरो देवतासु ।
स एतान्पाशान्विचृतं वेद सर्वानथ पक्वेन सह सं भवेम ॥ २ ॥
वैश्वानरः पविता मा पुनातु यत्संगरमभिधावाम्याशाम् ।
अनाजानन्मनसा याचमानो यत्तत्रैनो अप तत्सुवामि ॥ ३ ॥

अर्थ— (यत् अहं अदीव्यन्) जर मीं जुगार न खेळतांना (ऋणं) ऋण काढलें, (उत अदास्यन् संगृणामि) आणि त्याची फेड न करतां नुसती फेड करण्याची प्रतिज्ञा करीत राहिलों, तर हे अग्ने ! (वैश्वानरः वसिष्ठः अधिपाः) विश्वाचा नेता सर्वांस वसविणारा अधिपति (नः सुकृतस्य लोकं उत् उन्नयाति) आम्हांस पुण्यलोकांत जाण्यास लायक करो. [१]

(वैश्वानराय यत् ऋणं प्रतिवेदयामि) विश्वाच्या नेत्याला मला जें कर्ज आहे तें सांगेन, तसेंच (देवतासु यः संगरः) देवतांमध्यें जी प्रतिज्ञा झाली आहे ती सुद्धां मीं सांगेन. (सः एतान् सर्वान् पाशान् विचृतं वेद) तो सर्व बंधनें मुक्त करण्याची रीत जाणतो. (अथ पक्वेन सह संभवेम) आतां मीं परिपक्वाशीं मिळून जातो. [२]

(पविता वैश्वानरः मा पुनातु) पवित्र करणारा विश्वाचा नेता मला पवित्र करो. (यत् संगरं आशां अभि धावामि) जी प्रतिज्ञा करून मीं या आशेच्यापाठीं धांवत आहे, (अनाजानन् मनसा याचमानः) जाणत नसतां मनानें याचना करतों आणि (तत्र यत् एनः) तेथें जें पाप होतें (तत् अप सुवामि) तें मीं दूर करतों. [३]

भावार्थ— जुगार न खेळतां पण इतर कारणांनीं जें ऋण मीं करतों आणि तें परत न करतां, परत करण्याची प्रतिज्ञा करीत रहातों, ईश्वर मला या दोषापासून वांचवो आणि त्यांतून वर काढून पुण्यलोकांत पोहोंचवो. (१)

जें ऋण मीं केलें आहे आणि त्यासंबंधीं मीं ज्या प्रतिज्ञा केल्या आहेत त्या सर्व मीं निवेदन करतों. याप्रमाणें पापांतून ईश्वर मला वांचवो, कारण तोच या बंधनांतून मुक्त करून आम्हांस वर काढण्याचा उपाय जाणतो. आम्ही पूर्ण ज्ञानासह राहूं, जेणेंकरून आम्हांस कांहीं दोष लागूं नये. [२]

ईश्वर सर्वांस पवित्र करणारा आहे. तो मला पवित्र करो. ज्या आशेच्या मागें लागून मीं वारंवार प्रतिज्ञा करतों, आणि पापास न जाणतां सुद्धां वारंवार याचना करीत राहिलों आहे; तीं सर्व पापें दूर होवोत. [३]

या सूक्ताचा भाव स्पष्ट आहे. ऋणमोचनाचीं हीं सर्व सूक्तें विशेषतः एकच उपदेश करीत आहेत कीं, कोणाहि मनुष्यानें ऋण करूं नये, आणि कदाचित् करावें लागलें तर तें योग्यसमयीं परत करावें. खोटे वायदे करूं नयेत, वगैरे बोध या सूक्तांतून सारांशरूपानें प्राप्त होतो.

निष्पाप होण्याची प्रार्थना

कांड ७, सूक्त ३४

(ऋषिः - अथर्वा । देवता - जातवेदाः ।)

अग्ने जातान्प्र णुदा मे सपत्नान्प्रत्यजाताञ्जातवेदो नुदस्व ।
अधस्पदं कृणुष्व ये पृतन्यवोऽनागसस्ते वयमदितये स्याम ॥ १ ॥

अर्थ— हे अग्नि ! (**मे जातान् सपत्नान् प्रणुद**) माझ्या निर्माण झालेल्या शत्रूंना दूर कर. हे (**जातवेदः**) ज्ञानाच्या उत्पादक देवा ! (**अजातान् प्रतिनुदस्व**) जाहीरपणें शत्रुत्व न करतां आंतून शत्रुत्व करणाऱ्या शत्रूंना एकदम दूर कर. (**ये पृतन्यवः अधस्पदं कृणुष्व**) जे कष्करासह आम्हांवर चालून येतात त्यांना जाणत्या जागींच नष्ट करून टाक. (**वयं अनागसः**) आम्हीं सर्व निष्पाप होऊं आणि (**अदितये स्याम**) अदीनतेसाठीं योग्य होऊं. [१]

भावार्थ-ज्ञानी, ज्ञानदाता, प्रकाशमय देव आमच्या शत्रूंना दूर करो. शत्रु उघडपणें शत्रुत्व करीत असला अथवा गुप्तरीतीनें घात करणारा असला, तरी ते सर्व शत्रू दूर होवोत. जे सैन्यासह आमच्यावर हल्ला करतात त्यांचें सुद्धां स्वतःच्या स्थानीं पतन व्हावें. आम्हीं निष्पाप व्हावें आणि अदीनता, भव्यता तसेंच स्वतंत्रता आम्हांपाशीं राहो. [१]

कल्याण

कांड ७, सूक्त २८

(ऋषिः - मेधातिथिः । देवता - वेदः ।)

वेदः स्वस्तिर्द्रुघणः स्वस्तिः परशुर्वेदिः परशुर्नः स्वस्ति ।
हविष्कृतो यज्ञिया यज्ञकामास्ते देवासो यज्ञमिमं जुषन्ताम् ॥ १ ॥

अर्थ— (**वेदः स्वस्ति**) ज्ञान कल्याण करणारें आहे. (**द्रु-घणः स्वस्ति**) लांकडें कापणारी कुऱ्हाड कल्याण करणारी आहे. (**परशुः**) कुऱ्हाड कल्याण करणारी आहे, (**वेदिः**) यज्ञवेदी कल्याण करणारी आहे, (**नः परशुः स्वस्ति**) आमचें शस्त्र कल्याण करणारें आहे. (**हविष्कृतः यज्ञियाः यज्ञकामाः**) हवि अन्नानें युक्त पूजनीय आणि यज्ञ करण्याची इच्छा करणारे (**ते देवासः**) ते याजक (**इमं यज्ञं जुषन्तां**) या यज्ञाचें प्रेमानें सेवन करोत. [१]

ज्ञान, सुताराचीं हत्यारें, लांकडें कापण्याची कुऱ्हाड, गवत कापण्याचा विळा, समिधा कापण्याची सुरी, वेदि, हवि, हवि तयार करणारी मनुष्यें, यज्ञ करणारे, यज्ञाची इच्छा करणारे, हे सर्व कल्याणकारक आहे. म्हणून त्यांच्या ठिकाणीं योग्य श्रद्धा ठेवावी.

विपत्तीस दूर सारणें

कांड ७, सूक्त २३

(ऋषिः – यमः । देवता – दुःस्वप्ननाशनं ।)

दौष्वप्न्यं दौर्जीवित्यं रक्षो अभ्वमराय्यः । दुर्णाम्नीः सर्वा दुर्वाचस्ता अस्मन्नाशयामसि ॥ १ ॥

अर्थ— (**दौष्वप्न्यं**) वाईट स्वप्नें पडणें, (**दौर्जीवित्यं**) दुःखमय जीवन होणें, (**रक्षः**) हिंसकांचा उपद्रव, (**अ-भ्वं**) अभाव अथवा दारिद्र्य, (**अराय्यः**) विपत्तीचे कष्ट, (**दुर्णाम्नीः**) वाईट नांवांचा उच्चार करणें, (**सर्वाः दुर्वाचः**) सर्व प्रकारचें दुष्ट भाषण (**ताः अस्मत् नाशयामसि**) यांना आम्हीं त्यांच्या स्थानांपासून दूर करतों. [१]

भावार्थ— वाईट स्वप्नें, कष्टमय जीवन, हिंसकांचा उपद्रव, विपत्ति, दारिद्र्य, दुष्ट भाषण, शिव्या देणें इत्यादि जे जे वाईट गुण आमच्यांत आहेत, त्यांना आम्हीं दूर करतों. [१]

विपत्ति अनेक प्रकारच्या आहेत, त्यांतील काहीं विपत्तींची येथें मोजदाद केली आहे. वाईट स्वप्नें येणें इत्यादि विपत्ति, तसेंच दुःखमय जीवनाचा अनुभव येणें अशा विपत्ति, आरोग्य चांगलें न रहाण्यानें येतात. आरोग्य चांगलें संभाळण्यासाठीं व्यायाम, योगासनांचें अनुष्ठान, यमनियमांचें पालन, प्राणायाम, योग्य आहारविहार, इत्यादि उपाय आहेत. ते योग्य रीतीनें करण्यानें या आपत्ति दूर होतात. हिंसकांचा उपद्रव दूर करण्यासाठीं स्वतःमध्यें शूर वीरत्व उत्पन्न करावें, आणि या कार्यांत त्यास लावलें पाहिजे. यामुळें त्या राक्षसांच्या आक्रमणापासून आपला बचाव होतो. (**अभ्वं**) अभूति, अभाव आणि (**अराय्यः**) निर्धनता या दोन आपत्ति उद्योगाची वृद्धि आणि बेकारी दूर केल्यानें नाहींशा होतात. मनुष्य कोणत्याहि कारणानें आळसू राहूं नये. त्यानें काहींना काहीं उत्पादक कामधंदा करावा, आणि स्वतःची धनसंपत्ति सुयोग्य उपायानें वाढवावी. या रीतीनें उद्योगवृद्धि केल्यानें आर्थिक आपत्ति दूर होतात. शिव्या देणें, वाईट शब्द बोलणें, अश्लील बोलणें, इत्यादि ज्या आपत्ति आहेत, त्यासाठीं वाणीची शुद्धता केली पाहिजे. निश्चयपूर्वक अपशब्दांचा उच्चार न करण्यानें, अमुक समयानंतर ते अपशब्द बोलणें आपोआप बंद होतें. याप्रकारचा आत्मशुद्धि करण्याचा मार्ग या सूक्तांत दाखविला आहे. वाचकांनीं त्याचा योग्य बोध घेऊन प्रयत्नपूर्वक स्वतःचा उद्धार करून घ्यावा.

भाग्य-प्राप्ति

कांड ६, सूक्त १२९

(ऋषिः – अथर्वाङ्गिराः । देवता – भगः ।)

भगेन मा शांशपेन साकमिन्द्रेण मेदिना । कृणोमि भगिनं माप द्रान्त्वरातयः ॥ १ ॥
येन वृक्षाँ अभ्यभवो भगेन वर्चसा सह । तेन मा भगिनं कृणवप द्रान्त्वरातयः ॥ २ ॥

अर्थ— (**शांशपेन भगेन मेदिना इन्द्रेण**) शंशपवृक्षाच्या शोभेप्रमाणें आनंद देणाऱ्या इंद्रापासून (**मा भगिनं कृणोमि**) मीं स्वतःला भाग्यशाली करतों. (**अरातयः अप द्रान्तु**) शत्रु दूर होवोत. [१]

(**येन वृक्षान् अभ्यभवः**) ज्यामुळें वृक्षांचा पराजय करतो, त्या (**भगेन वर्चसा सह**) भाग्य आणि तेज यांसह (**मा भगिनं कृणु**) मला भाग्यवान् कर; आणि (**अरातयः अप द्रान्तु**) शत्रु दूर पळून जावोत. [२]

भावार्थ— ज्याप्रमाणें शंशपवृक्ष सुशोभित दिसतो, तशा प्रकारें ईश्वराच्या कृपेनें भाग्ययुक्त होऊन माझ्या सुंदरतेंत वृद्धि होवो. त्या बरोबर माझे शत्रूहि दूर होवोत. [१]

ज्याप्रकारें तो वृक्ष तुलनेनें इतर वृक्षांपेक्षां सुंदर दिसतो, त्याप्रमाणें भाग्य आणि तेज प्राप्त होऊन माझी शोभा वाढो. माझे शत्रु दूर होवोत. [२]

यो अन्धो यः पुनःसरो भगो वृक्षेष्वाहितः । तेन मा भगिनं कृण्वप द्रान्त्वरातयः ॥ ३ ॥

अर्थ— (यः अन्धः) जो अन्नमय आणि (यः पुनःसरः) जो वारंवार गतियुक्त (भगः वृक्षेषु आहितः) भाग्याचा अंश वृक्षांत ठेवला आहे, (तेन मा भगिनं कृणु) त्यानें मला भाग्यवान् कर. (अरातयः अप द्रान्तु) शत्रु दूर पळून जावोत. [३]

भावार्थ— वृक्षांत ज्याप्रमाणें अन्नाचा भाग आणि इतर भाग असतात, त्याप्रमाणें माझ्यांत बळ आणि पुष्टि येवो, आणि माझे शत्रु दूर होवोत. [३]

स्वतःमध्यें पुष्टि, बळ, भाग्य, ऐश्वर्य आणि सौंदर्य वाढो, आणि जे घातक शत्रु आहेत, ते दूर होवोत असा या सूक्ताचा सरळ भाव आहे.

आत्मरक्षण

कांड ७, सूक्त ३१

(ऋषिः – भृग्वङ्गिराः । देवता – इंद्रः ।)

इन्द्रोतिभिर्बहुलाभिर्नो अद्य यावच्छ्रेष्ठाभिर्मघवञ्छूर जिन्व ।
यो नो द्वेष्ट्यधरः सस्पदीष्ट यमु द्विष्मस्तमु प्राणो जहातु ॥ १ ॥

अर्थ— हे इंद्रा ! (यावत् श्रेष्ठाभिः बहुलाभिः ऊतिभिः) अति श्रेष्ठ विविध प्रकारच्या रक्षणांनीं (अद्य नः जिन्वः) आज आम्हांस जिवंत ठेव. हे (मघवन् शूर) धनवान् शूरवीरा ! (यः नः द्वेष्टि) जो आमचा द्वेष करीत आहे, (सः अधरः पदीष्ट) तो खालीं पडो. (यं उ द्विष्मः) आम्हीं ज्याचा द्वेष करतों, (तं उ प्राणः जहातु) त्याचे प्राण त्यास सोडून जावोत. [१]

भावार्थ— हे धनवान् आणि शूर प्रभो ! तुमचें जें अति श्रेष्ठ अनेक प्रकारचें रक्षण आहे, तें सर्व आम्हांस प्राप्त होवो. त्यानें आमचें रक्षण होवो, आणि आमचें जीवन त्यांच्या सहाय्यानें सुखकर होवो. जे दुष्ट आमची निष्कारण निंदा करतात, ते अवनतीस जावोत आणि ज्या दुष्टांचा आम्ही सर्व द्वेष करतों, त्यांचें जीवनच समाप्त होवो. [१]

आम्ही परमेश्वराची भक्ति करतों आणि त्याचें रक्षण प्राप्त करून सुरक्षित आणि स्वस्थ होऊन आनंदाचा उपभोग घेतों. परंतु जे दुष्ट मनुष्य आम्हां सर्वांचा द्वेष करतात, आणि म्हणून ज्या दुष्टांचा आम्हीं द्वेष करतों, त्यांचा नाश होवो. दुष्टता आणि द्वेषाचा समूळ नाश होवो.

दुष्ट स्वप्न

कांड ६, सूक्त ४५

(ऋषि : – अंगिराः प्रचेता यमश्च । देवता – दुःष्वप्ननाशनम्)

परोऽपेहि मनस्पाप किमशस्तानि शंससि ।
परेहि न त्वा कामये वृक्षां वनानि सं चर गृहेषु गोषु मे मनः ॥ १ ॥

अर्थ— हे (मनः पाप) मनाच्या पापा ! (परः अप इहि) दूर जा. (किं अशस्तानि शंससि) तूं वाईट गोष्टी कां करतोस ? (परा इहि) दूर जा. (त्वा न कामये) तुला मीं इच्छित नाहीं. (वृक्षान् वनानि संचर) वृक्ष आणि वनामध्यें संचार कर, (मे मनः गृहेषु गोषु) माझें मन माझ्या घरांत आणि गांवांत आहे. [१]

अवशसा निःशसा यत्पराशसोपारिम जाग्रतो यत्स्वपन्तः ।
अग्निर्विश्वान्यप दुष्कृतान्यजुष्टान्यारे अस्मद्दधातु ॥ २ ॥
यदिन्द्र ब्रह्मणस्पतेऽपि मृषा चरामसि । प्रचेता न आङ्गिरसो दुरितात्पात्वंहसः ॥ ३ ॥

अर्थ— (**यत् अवशसा निःशसा पराशसा**) जें जवळच्या पापाच्या हिंसेनें, निर्दयतेच्या हिंसेनें आणि दूरच्या हिंसेनें अथवा (**यत् जाग्रतः स्वपन्तः उपारिम**) जागृत असतां आणि झोपेंत असतां आम्हीं केलें आहे. (**अग्निः विश्वानि अजुष्टानि दुष्कृतानि**) प्रकाशाचा देव सर्व अकरणीय दुष्कर्मांना (**अस्मत् आरे अप दधातु**) आम्हांपासून सर्वांस दूर ठेवो. [२]

हे (**ब्रह्मणस्पते इंद्र**) ज्ञानी प्रभो ! (**यत् अपि मृषा चरामसि**) जें कांहीं पाप असत्याचरणानें आम्हीं करतों, (**अंगिरसः प्रचेताः**) त्या सर्वांपासून अंगरसाप्रमाणें व्यापक ज्ञानी देव (**नः दुरितात् अंहसः पातु**) आम्हांस दुराचाराच्या पापापासून वांचवो. [३]

दुष्ट स्वप्न

पापी विचार

मनांतून पापी विचार दूर करण्याचा उपदेश या सूक्तांत करण्यांत आला आहे. गृहस्थाचें मन—

गृहेषु गोषु मनः (मं. १)

' घरांत आणि स्वतःच्या गाय इत्यादींत राहिलें पाहिजे ' इतर गोष्टींत आणि कुविचारांत मन गुंतल्यानें दुष्ट स्वप्नें पडतात, आणि त्यामुळें दुःख होतें; म्हणून मनुष्यानें स्वतःस शुभ संस्कारयुक्त करावें आणि स्वतःच्या कुटुंबाच्या हिताविषयीं दक्ष असावें. जर कुविचार मनांत आले तर त्यांना सांगितलें पाहिजे कीं—

मनस्पाप ! परा अपेहि, किं अशस्तानि शंससि ? परेहि, न त्वा कामये (मं. १)

' हे पापी विचारा ! दूर जा. मला तूं वाईट गोष्टी सांगतोस, जा, मीं तुझी इच्छा करीत नाहीं. ' याप्रमाणें पापी विचाराला सांगून, त्याला दूर केला पाहिजे. पापी विचार वारंवार मनांत प्रवेशूं लागले तर त्यांना आंत शिरूं देतां कामा नये. स्वतः कोणता विचार करावा आणि कोणता करूं नये याविषयीं निश्चय करावा आणि हें शरीर स्वतःचें कार्यक्षेत्र आहे, हें जाणून या क्षेत्रांत शुभ विचारांची परंपरा स्थिर केली पाहिजे. सर्वांनीं विचार केला पाहिजे कीं—

यत् जाग्रतः स्वपन्तः उपारिम । (मं. २)

' जें जागेपणीं अथवा झोपेंत अजाणतां आम्हीं करतों ' तेंच स्वप्नांत परिणत होतें; म्हणून जर जागृतावस्थेंत आपला सर्व व्यवहार उत्तम असेल तर स्वप्नें सुद्धां निःसंदेह उत्तमच पडतील. कोणतींहि वाईट स्वप्नें पडणार नाहींत, आणि मनावर कधींहि अशुभ संस्कार होणार नाहींत. याप्रमाणें—

मृषा चरामसि (मं. ३)

' असत्य व्यवहार करूं ' तर त्याचे परिणामहि वाईटच होणार. सर्व कुसंस्कार असत्यामुळें उत्पन्न होतात. जर मनुष्य असत्य सोडून सत्याचाच आश्रय करील तर तो निःसंशय अधः-पातापासून बचावून जाईल.

वाचकांनीं या सूक्ताचा याप्रमाणें विचार करून त्यांतून बोध घ्यावा. आतां एतद्विषयक दुसरें सूक्त पहा—

*

दुष्ट स्वप्न

कांड ६, सूक्त ४६

(ऋषिः - अंगिराः प्रचेता यमश्च । देवता - दुष्वप्ननाशनम् ।)

यो न जीवोऽसि न मृतो देवानाममृतगर्भोऽसि स्वप्न ।
वरुणानी ते माता यमः पितारुरुर्नामासि ॥ १ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं देवजामीनां पुत्रोऽसि यमस्य करणः ।
अन्तकोऽसि मृत्युरसि । तं त्वा स्वप्न तथा सं विद्म स नः स्वप्न दुष्वप्न्यात्पाहि ॥ २ ॥
यथा कलां यथा शफं यथर्णं संनयन्ति । एवा दुष्वप्न्यं सर्वं द्विषते सं नयामसि ॥ ३ ॥

अर्थ— हे स्वप्ना ! (यः) जें तूं (न जीवः असि न मृतः) जिवंत अथवा मृत नाहींस, असें तूं (देवानां अमृतगर्भः असि) देवांचा अमृतगर्भ आहेस, म्हणजे देवांमध्यें नेहमीं रहाणारें आहेस, (ते) तुझी (वरुणानी माता) वरुणानी माता आणि (यमः पिता) यम पिता आहे. (अररुः नाम असि) तूं अररु नांवाचें आहेस. [१]

हे स्वप्ना ! (ते जनित्रं विद्मः) तुझी उत्पत्ति आम्हीं जाणतों. तूं (देवजामीनां पुत्रोऽसि) देवांच्या पत्नींचा पुत्र आहेस, आणि (यमस्य करणः) यमाच्या कार्याचें साधक आहेस. तूं (अंतकः असि) अंत करणारें आहेस, (मृत्युः असि) तूं मारणारें आहेस. हे स्वप्ना ! (तं त्वा) अशा तुला वर सांगितल्याप्रमाणें (सं विद्मः) आम्हीं जाणतों. (सः) असें तूं स्वप्ना ! (नः दुष्वप्न्यात्) वाईट स्वप्नांतून आमचें (पाहि) रक्षण कर. [२]

(यथा कलां तथा शफं) ज्याप्रमाणें कला अथवा सोळावा भाग आणि ज्याप्रमाणें शफ म्हणजे आठवा भाग (यथा ऋणं सं नयन्ति) ऋणानुसार देतात (एवा सर्वं दुष्वप्न्यं) या प्रकारें सर्व दुष्ट स्वप्नें (द्विषते सं नयामसि) शत्रूला पोहोंचवितों. [३]

दुष्ट स्वप्न

देवानां- येथें ' देवानां ' या पदाचा अर्थ इंद्रियें असा आहे. स्वप्न इंद्रियांत अमृतरूपानें राहिलें आहे, कारण तें जागृता. वस्थेंत इंद्रियांच्या अनुभवानें उत्पन्न झालेल्या वासनांतून होतें. वासना आपणांमध्यें स्थायी आहेत म्हणून वासनांमधून उत्पन्न होणारें स्वप्न अमृत आहे, म्हणून येथें त्यास अमृतगर्भ म्हणण्यांत आलें आहे.

अररुः- पीडा करणारा, हिंसक. ' **ऋ गतिहिंसनयोः** ' पासून झालेला आहे. तै० ब्रा० ३।२।९।४ प्रमाणें अररु नांवाचा असुर.

वरुणानी- वरुण म्हणजे अंधःकार त्या देवाची पत्नी. अशाप्रकारें या सूक्तांत यमाला स्वप्नाचा पिता म्हटलें आहे. म्हणजे स्वप्न यमाचा पुत्र आहे. त्यामुळें कित्येकवेळां स्वप्नांत मृत्यूहि होऊन जातो.

दुष्ट स्वप्नाचा मृत्यूशीं संबंध आहे. म्हणून पूर्वसूक्तांत म्हटलें आहे कीं, दुष्ट स्वप्नांपासून वांचण्यासाठीं विचारांची शुद्धता केली पाहिजे. वाचकांनीं त्या गोष्टीचा संबंध येथें अवश्य पहावा.

या सूक्तांत स्वप्नाला देवपत्नीचा पुत्र म्हटलें आहे. या पूर्वीच्या सूक्ताच्या स्पष्टीकरणांत स्वप्नाची उत्पत्ति दाखवितांना सांगितलें आहे कीं, देव म्हणजे इंद्रियविषयक वासनांतून स्वप्नाची उत्पत्ति होते. या कथनाला पुष्टि या सूक्तांत ' **देवजामीनां पुत्रः असिः** ' या वचनानें मिळते. देव म्हणजे येथें इंद्रियें, त्यांच्या पत्न्या म्हणजे इंद्रियविषयक वासना आहेत

त्यांचा पुत्र स्वप्न आहे. येथें एक विशेष गोष्ट सांगितली आहे ती ही कीं स्वप्नाला यमाचें करण –साधन म्हटलें आहे. पाणिनी मुनीनें करणाचें लक्षण अष्टाध्यायींत सांगितलें आहे -- **' साधकतमं '** (अष्टा० १।४।४२) म्हणजे जें कर्म साधनेंत जवळांत जवळ आहे तें करण होय. कार्यसाधक सर्व साधनांत जें साधन अधिक आवश्यक आहे त्यास करण म्हणतात. या लक्षणे-नुसार यमाचें करण स्वप्न आहे. याचा अभिप्राय असा कीं यमाच्या मारण्याच्या साधनांत स्वप्न अधिक आवश्यक साधन आहे. वाचक स्वप्नाच्या या विशेषणानें त्याच्या भयंकरपणाचें सहज अनुमान करूं शकतील.

याच सूक्तांतील भाव खालीं दिलेल्या मंत्रांत जरा निराळ्या शब्दांत सांगितला आहे—

देवानां पत्नीनां गर्भ यमस्य कर यो भद्रः स्वप्न।
स मम यः पापस्तद् द्विषते प्र हिण्मः।
मा तृष्टानामसि कृष्णशकुनेर्मुखम् ॥

(अथर्व. १९।५७।३)

हे **(देवानां पत्नीनां गर्भ)** देवांच्या पत्न्यांच्या गर्भ रूपा, असलेला तसेंच **(यमस्य कर)** यमाच्या हात– स्वप्ना ! **(यो भद्रः)** जो तुझा कल्याणकारक अंश आहे, **(सः)** तो अंश **(मम)** माझा होवो. **(यः पापः)** आणि तुझा जो अनिष्ट कारक पापी अंश आहे, **(तत्)** त्या अंशाला **(द्विषते)** द्वेष करणाऱ्यांच्याकडे **(प्रहिण्मः)** आम्हीं पाठवितों. **(तृष्टानां)** तृषित– लोभी– क्रूरांच्यामध्यें तूं **(कृष्ण-शकुनेः)** काळ्या पक्ष्याच्या–कावळ्याच्या **(मुखं)** तोंडा-प्रमाणें तूं **(मा असि)** आम्हांसाठीं बाधक होऊं नकोस; म्हणजे ज्याप्रमाणें लोभ्यांना अथवा क्रूरांना कावळ्याचें तोंड अनिष्टकारक होतें त्याप्रमाणें तूं आम्हांस अनिष्टकर होऊं नकोस.

विद्म ते स्वप्न जनित्रं ग्राह्याः पुत्रोऽसि यमस्य करणः। (अथर्व. १६।५।१)

हे स्वप्ना ! **(ते जनित्रं विद्म)** तुझी उत्पत्ति आम्हीं जाणतों. तूं **(ग्राह्याः पुत्रः असि)** ग्राहीचा पुत्र आहेस आणि **(यमस्य करणः)** यमाच्या कार्याचा साधक आहेस.

या सूक्तांत स्वप्नाला ग्राहीचा पुत्र म्हटलें आहे. गांठ इत्यादि शरीराला जखडणाऱ्या रोगांना ग्राही असें म्हणतात. त्या रोगा-मुळें शरीरांत पीडा होते. त्यामुळें झोंप येत नाहीं आणि कदाचित् आली तर त्या स्वप्नासारखी अवस्था होऊन जाते, म्हणून स्वप्नाला ग्राहीचा पुत्र म्हटलें आहे. यमाच्या करणाची व्याख्या वर दिली आहे.

अन्तकोऽसि मृत्युरसि ॥

(अथर्व. १६।५।२; १६।५।९)

' हे स्वप्ना ! तूं **(अन्तकः असि)** प्राणांत करणारा आहेस; तूं **(मृत्युः असि)** मारणारा आहेस. '

झोंप नीट न लागल्यामुळें रोज स्वप्नें पडून आरोग्य बिघडून अंतीं मृत्यु येतो, म्हणून स्वप्नाला येथें अन्तक आणि मृत्यूच्या नांवानें वर्णिलें आहे.

विद्म ते स्वप्न जनित्रं निर्ऋत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः।
अन्तकोऽसि मृत्युरसि।
तं त्वा स्वप्न तथा सं विद्म स नः स्वप्न दुष्वप्न्यात् पाहि। (अथर्व. १६।५।४)

मंत्रांचा अर्थ वर दिला आहे. तेथेंहि असाच मंत्र आला आहे. या मंत्रांत स्वप्नाला निर्ऋतीचा पुत्र म्हटलें आहे. निर्ऋतीपासून स्वप्नाची उत्पत्ति होते. याचा अभिप्राय असा कीं कष्ट, दुःख इत्यादींनीं मनुष्याला झोंप येत नाहीं या अवस्थेंत गाढ निद्रेचा अभाव असतो, आणि कष्टादींच्या दशेंत मनुष्यास गाढ निद्रा येत नाहीं, या विचारानें स्वप्नाला निर्ऋतीचा पुत्र म्हटलें आहे.

विद्म ते स्वप्न जनित्रमभूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः। अन्तकोऽसि०

(अथर्व. १६।५।४ वत्; अथर्व १६।५।५)

अर्थ पूर्ववत्. या मंत्रांत स्वप्नाला अभूति म्हणजे ऐश्वर्याचा अभाव, दारिद्र्याचा पुत्र म्हटलें आहे. दारिद्र्यामुळेंहि निद्रा येत नाहीं म्हणजे गरिबीच्या कारणानेंहि स्वप्ना (खरें म्हणजे झोंप न येणें) ची उत्पत्ति होते. बाकी अर्थ आणि टीका पूर्ववत् समजावी.

विद्म ते स्वप्न जनित्रं निर्भूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः। अन्तकोऽसि० (अ. १६।५।६)

अर्थ पूर्ववत्. या मंत्रांत स्वप्नाला निर्भूतीचा पुत्र म्हटलें आहे. निर्भूतीचा अर्थ आहे ऐश्वर्यसंपत्ति निघून जाणें. संपत्ति-युक्त असणाराची असलेली संपत्ति नाश पावली असतां त्याला झोंप येत नाहीं, तो सुखानें झोंपूं शकत नाहीं. या प्रकारें संपत्तीच्या विनाशाचा पुत्रहि स्वप्न आहे.

विद्म ते स्वप्न जनित्रं पराभूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः। अन्तकोऽसि० ॥ (अ. १६।५।७)

अर्थ वर दिल्याप्रमाणेंच. या मंत्रांत स्वप्नाला पराभूतीचा पुत्र म्हटलें आहे. पराभूतीचा अर्थ आहे पराजय म्हणजे हरणें, तिरस्कार पावणें. पराभवानें अथवा तिरस्कारानें मनुष्याला एवढें मानसिक दुःख होतें कीं त्याला निद्रा येणें अवघड होतें, आणि अशारीतीनें पराभूतीपासून स्वप्नाची उत्पत्ति होते.

विद्म ते स्वप्न जनित्रं देवजामीनां पुत्रोऽसि यमस्य करणः। (अथर्व. १६।५।८)

हे स्वप्ना! तुझी उत्पत्ति आम्हीं जाणतों. तूं देवांच्या पत्न्यांचा पुत्र आहेस आणि यमाच्या कर्मांचा साधक आहेस. या मंत्राचा भाव वर दिलेला आहे. देवपत्न्यांचा पुत्र स्वप्न कसें तें वर विशद केलें आहे.

या प्रकारें अथर्ववेदाच्या या १६ व्या कांडातील ५ वें सूक्त संपूर्णपणें यम आणि स्वप्न विषयक आहे; हें वर दिलेंच आहे. त्यावरून यमाचा आणि स्वप्नाचा संबंध स्पष्ट होतो.

स्वप्न स्वतःचा पिता जो यम त्याच्या कार्याचें जवळचें साधक आहे. या शिवाय स्वप्न म्हणजे निद्रेचा अभाव कोणकोणत्या कारणांनीं होतो आणि त्याचे कसे दुष्परिणाम होतात इत्यादि गोष्टींचा उल्लेख या सूक्तांत स्पष्टपणें पहावयास मिळतो.

हें सूक्त बहुंशीं दुर्बोध आहे, तथापि अथर्ववेदाच्या इतर सूक्तांसह त्याचा विचार केल्यानें त्याची दुर्बोधता थोडी कमी होते. तथापि हा संशोधनाचा विषय आहे. जे वाचक स्वप्नविषयीं जास्त विचार करणारे असतील आणि मनाच्या शक्तीचें मनन करणारे असतील त्यांनीं या सूक्तांतील विषयाविषयीं अधिक संशोधन करावें.

दुष्ट स्वप्न न पडण्यासाठीं उपाय

कांड ७, सूक्त १००

(ऋषिः – यमः। देवता– दुःस्वप्ननाशनम्।)

पर्यावर्ते दुष्वप्न्यात्पापात्स्वप्न्यादभूत्याः। ब्रह्माहमन्तरं कृण्वे परा स्वप्नमुखाः शुचः ॥ १ ॥

अर्थ— मीं (पापात् दुष्वप्न्यात् पर्यावर्ते) पापापासून, दुष्ट स्वप्नापासून मागें सरतों. **(अभूत्याः स्वप्न्यात्)** अवनतिकारक स्वप्नापासून मागें सरतों. **(अहं अन्तरं ब्रह्म कृण्वे)** मीं ज्ञानास मध्यें ठेवतों. **(स्वप्नमुखाः शुचः परा)** मीं दुःस्वप्न इत्यादि शोकजनक गोष्टींस दूर करतों. [१]

पापापासून दुष्ट स्वप्न, शारीरिक अवनति तसेंच शोकमय स्वभाव होतो. पाप हें शारीरिक, इन्द्रियविषयक, मानसिक, वाचिक आणि बुद्धीच्या मालिन्यानें होतें; अथवा पापामुळें या बाबतींत मलिनतेचा संचय होतो. म्हणून वर सांगितल्याप्रमाणें त्या स्थानांतील मळ दूर केले पाहिजेत. म्हणजे पाप कर्म झाल्यामुळें वाईट स्वप्नें येणार नाहींत. शरीर वगैरेंची शुद्धि करण्याचे उपाय या पूर्वी सांगितले आहेत. स्वतःच्या आणि पापाच्या मध्यें ब्रह्म म्हणजे ज्ञान किंवा परमेश्वराचें भजन ठेवलें पाहिजे. त्यानें पाप निःसंशय नाहींसें होईल. मनाला शांति मिळून केव्हांहि दुष्ट स्वप्न येणार नाहीं.

दुष्ट स्वप्न न पडण्यासाठीं उपाय

कांड ७, सूक्त १०१

(ऋषिः – यमः। देवता – स्वप्ननाशनम्।)

यत्स्वप्ने अन्नमश्नामि न प्रातरधिगम्यते। सर्वं तदस्तु मे शिवं नहि तद्दृश्यते दिवा ॥ १ ॥

अर्थ—(यत् स्वप्ने अन्नं अश्नामि) मीं स्वप्नांत जें अन्न खातों तें **(प्रातः न अधिगम्यते)** सकाळीं प्राप्त होत नाहीं, **(तत् सर्वं मे शिवं अस्तु)** तें सर्व मला शुभकारक होवो. **(तत् दिवा नहि दृश्यते)** तें दिवसा दिसत नाहीं. [१]

स्वप्नांत भोजनादि भोगांचीं जीं दृश्यें दिसतात तीं सकाळीं उठल्यानंतर अथवा दिवसा दिसत नाहींत. म्हणजे तीं असत्य असतात. तीं केवळ मनाच्या विकृतीच्या कारणानेंच दिसतात. म्हणून अशीं स्वप्नें न पडावींत यासाठीं उत्तम ज्ञानपूर्वक यत्न केला पाहिजे. त्याचें वर्णन पूर्वीच्या सूक्तांत केलें आहे.

अंजन

कांड ७, सूक्त ३०

(ऋषिः – भृग्वंगिराः । देवता – द्यावापृथिवी, मित्रः, ब्रह्मणस्पतिः, सविता च ।)

स्वाक्तं मे द्यावापृथिवी स्वाक्तं मित्रो अकरयम् । स्वाक्तं मे ब्रह्मणस्पतिः स्वाक्तं सविता करत् ॥१॥

अर्थ— (द्यावापृथिवी मे सु- आक्त) द्युलोक आणि पृथ्वीलोक माझ्या डोळ्यांत उत्तम अंजन करोत. (अयं मित्रः स्वाक्तं अकः) हा मित्र मला अंजन करतो. (ब्रह्मणस्पतिः मे स्वाक्तं) ज्ञानपति देवानें मला उत्तम अंजन केलें आहे. (सविता स्वाक्तं करत्) सवित्यानें सुद्धां माझ्या नेत्रांत उत्तम अंजन घातलें आहे. [१]

डोळ्यांत अंजन घालून त्यांचें आरोग्य वाढवण्याची सूचना या मंत्रांतून मिळते. द्युलोकापासून पृथ्वीपर्यंत जे जे डोळ्यांना दिसणारे सूर्यादि दृश्य पदार्थ आहेत, त्यांचें जें तेजस्वी रूप आहे, तशी माझी दृष्टि-नेत्र व्हावे, अशी इच्छा या सूक्तांत स्पष्टपणें दर्शविण्यांत आली आहे. हें सूक्त ज्ञानांजनाचें सूचक सुद्धां मानतां येईल. ज्यानें दृष्टि शुद्ध होतें तें अंजन असतें मग तें साधारण असो नाहींतर ज्ञानांजन असो.

मधुविद्या आणि गोमहिमा

कांड ९, सूक्त १

(ऋषिः – अथर्वा । देवता – मधु, अश्विनौ ।)

दिवस्पृथिव्या अन्तरिक्षात्समुद्रादग्नेर्वातान्मधुकशा हि जज्ञे ।
तां चायित्वामृतं वसानां हृद्भिः प्रजाः प्रति नन्दन्ति सर्वाः ॥ १ ॥
महत्पयो विश्वरूपमस्याः समुद्रस्य त्वोत रेत आहुः ।
यत ऐति मधुकशा रराणा तत्प्राणस्तदमृतं निविष्टम् ॥ २ ॥

अर्थ— (दिवः अन्तरिक्षात् पृथिव्याः) द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वी, (समुद्रात् अग्नेः वातात्) समुद्राचें पाणी, अग्नि आणि वायूनें (मधुकशा जज्ञे) मधुकशा उत्पन्न होते. (अमृतं वसानां तां चायित्वा) अमृताला धारण करणाऱ्या या मधुकशेचें सुपूजन करून (सर्वाः प्रजाः हृद्भिः प्रतिनन्दन्ति) सर्व मनुष्यें अंतःकरणापासून आनंदित होतात. [१]

(अस्याः पयः) हिचें दूध (महत् विश्वरूपं) मोठें विश्वरूपच आहे. (उत त्वा समुद्रस्य रेतः आहुः) आणि तुला समुद्राचें वीर्य म्हणण्यांत येतें. (यतः मधुकशा रराणा एति) जेथून ही मधुकशा शब्द करीत जाते, (तत् प्राणः) ते प्राण आहेत, (तत् निविष्टं अमृतं) तें सर्वत्र प्रविष्ट झालेलें अमृत आहे. [२]

भावार्थ— पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश आणि प्रकाश यापासून मधुर दूध देणारी गाय उत्पन्न झाली आहे. हें अमृतरूपी दूध देणाऱ्या गोमातेची पूजा केल्यानें सर्व प्रजा अंतःकरणापासून आनंदित होते. [१]

तें गोमातेचें दूध जणूं काय संपूर्ण विश्वाची महान् शक्ति अथवा संपूर्ण जलतत्वाचें सार आहे. जी ही हंबरणारी गाय आहे ती सर्वांचा प्राण आहे आणि तिचें दूध अमृत आहे. [२]

पश्यन्त्यस्याश्चरितं पृथिव्यां पृथङ्नरो बहुधा मीमांसमानाः ।
अग्नेर्वातान्मधुकशा हि जज्ञे मरुतामुग्रा नप्तिः ॥ ३ ॥
मातादित्यानां दुहिता वसूनां प्राणः प्रजानाममृतस्य नाभिः ।
हिरण्यवर्णा मधुकशा घृताची महान्भर्गश्चरति मर्त्येषु ॥ ४ ॥
मधोः कशामजनयन्त देवास्तस्या गर्भो अभवद्विश्वरूपः ।
तं जातं तरुणं पिपर्ति माता स जातो विश्वा भुवना वि चष्टे ॥ ५ ॥
कस्तं प्र वेद क उ तं चिकेत यो अस्या हृदः कलशः सोमधानो अक्षितः ।
ब्रह्मा सुमेधाः सो अस्मिन्मदेत ॥ ६ ॥
स तौ प्र वेद स उ तौ चिकेत यावस्याः स्तनौ सहस्रधारावक्षितौ । ऊर्जं दुहाते अनपस्फुरन्तौ ॥ ७ ॥

अर्थ— (बहुधा पृथक् मीमांसमानाः नरः) पुष्कळ प्रकारचीं निरानिराळया प्रकारें विचार करणारीं मनुष्यें (पृथिव्याः) या पृथ्वीवर (अस्याः चरितं पश्यन्ति) हिचें चरित्र अवलोकन करतात. (मधुकशा अग्नेः वातात् जज्ञे) ही मधुकशा अग्नि आणि वायु यांपासून उत्पन्न झाली आहे. ती (मरुतां उग्रा नप्तिः) मरुतांची उग्र पुत्री आहे. [३]

(आदित्यानां माता) आदित्यांची माता (वसूनां दुहिता) वसूंची कन्या (प्रजानां प्राणः) प्रजांचा प्राण आणि (अमृतस्य नाभिः) ही अमृताचें केंद्र आहे. (हिरण्यवर्णा मधुकशा घृताची) सोन्याच्या रंगासारखी ही मधुकशा तुपाचें सिंचन करणारी आहे. ती (मर्त्येषु महान् भर्गः चरति) मर्त्यांमध्यें तें महान् तेज संचार करतें. [४]

(देवाः मधोः कशां अजनयन्त) या मधुकशेला देवांनीं तयार केली आहे. (तस्याः विश्वरूपः गर्भः अभवत्) तिचें हें विश्वरूप गर्भ झाला आहे. (तं तरुणं जातं माता पिपर्ति) ही जन्मलेल्या तरुण बालकांना मातेप्रमाणें पाळते. (सः जातः विश्वा भुवना विचष्टे) तो होतांच सर्व भुवनांचें निरीक्षण करतो. [५]

(कः तं प्रवेद) कोण त्याला जाणतो ? (कः उ तं चिकेत) कोण त्याचा विचार करतो ? (अस्याः हृदः) हिच्या हृदयाजवळ (यः सोमधानः कलशः अक्षितः) जो सोमरसानें भरपूर पूर्ण कलश विद्यमान आहे (अस्मिन्) यांत (सः सुमेधाः ब्रह्मा) तो उत्तम मेधायुक्त ब्रह्मा (मदेत) आनंद करील. [६]

(सः तौ प्रवेद) जो त्या दोघांस जाणतो (सः उ तौ चिकेत) तो त्यांच्याविषयीं विचार करतो. (यौ अस्याः सहस्रधारौ अक्षितौ स्तनौ) जे त्याचे सहस्रधारायुक्त अक्षय स्तन आहेत, ते (अनपस्फुरन्तौ ऊर्जं दुहाते) अविचलित होऊन बलवान् रसाचें दोहन करतात. [७]

भावार्थ— विचार करणारीं मनुष्यें या पृथ्वीवर त्या गाईचें चरित्र पहातात. ही मधुर रस देणारी गाय अग्नि आणि वायु पासून उत्पन्न झाली आहे, म्हणून तिला मरुतांची-वायूची प्रभावशाली कन्या म्हणतात. [३]

ही गाय आदित्यांची माता, वसूंची पुत्री, प्रजेचा प्राण आणि अमृताचें केंद्र आहे. ती उत्तम रंगाची, तूप देणारी, आणि मधुर रस निर्माण करणारी गाय, सर्व मर्त्यांमध्यें एक महान् तेजाची मूर्तीच आहे. [४]

देवांनीं या गाईला निर्माण केली आहे. तिचे गर्भ सर्वप्रकारच्या रंगारूपाचे होतात. वत्स झाल्यावर ती त्याचें मोठ्या प्रेमानें पालन करते. तें मोठें होऊन मग सर्व स्थानांना पहातें. [५]

या गाईंत सोमरसाचा परिपूर्ण कलश अक्षयरूपानें राहिला आहे. त्या कलशाला कोण जाणतो आणि त्याच्याविषयीं चांगला विचार कोण करतो ? त्याच्या दूधरूपी रसानें स्वतःच्या मेधेची वृद्धि करणारा ब्रह्मा आनंदित होतो. [६]

जे या गाईचे दोन स्तन हजारों धारांनीं नेहमीं अन्नरस देतात, त्यांना कोण जाणतो आणि त्याच्या विषयीं कोण विचार करतो ? [७]

हिङ्करिक्रती बृहती वयोधा उच्चैर्घोषाभ्येति या व्रतम् ।
त्रीन्घर्मानभि वावशाना मिमाति मायुं पयते पयोभिः ॥ ८ ॥
यामापीनामुपसीदन्त्यापः शाक्वरा वृषभा ये स्वराजः ।
ते वर्षन्ति ते वर्षयन्ति तद्विदे काममूर्जमापः ॥ ९ ॥
स्तनयित्नुस्ते वाक्प्रजापते वृषा शुष्मं क्षिपसि भूम्यामधि ।
अग्नेर्वातान्मधुकशा हि जज्ञे मरुतामुग्रा नप्तिः ॥ १० ॥
यथा सोमः प्रातःसवने अश्विनोर्भवति प्रियः । एवा मे अश्विना वर्च आत्मनि ध्रियताम् ॥ ११ ॥
यथा सोमो द्वितीये सवन इन्द्राग्न्योर्भवति प्रियः । एवा म इन्द्राग्नी वर्च आत्मनि ध्रियताम् ॥१२॥
यथा सोमस्तृतीये सवन ऋभूणां भवति प्रियः । एवा म ऋभवो वर्च आत्मनि ध्रियताम् ॥ १३ ॥

अर्थ—(**या हिंकरिक्रती**) जी हिंकार करणारी आहे (**वयो-धा उच्चै-र्घोषा**) अन्न देणारी, उच्च स्वरानें हंबरणारी (**व्रतं अभ्येति**) व्रतस्थानास प्राप्त होते. (**त्रीन् धर्मान् अभि वावशाना**) तीन यज्ञांना स्वतःच्या ताब्यांत ठेवणारी (**मायुं मिमाति**) सूर्याचें माप काढते आणि (**पयोभिः पयते**) दुधाच्या धारांनीं दूध देते. [८]

(**ये वृषभाः**) जे वर्षाऋतूच्या वृष्टीनें भरलेले बैल (**स्वराजः शाक्वराः आपः**) तेजस्वी शक्तिशाली वृष्टीचें जल (**यां आपीनां उपसीदन्ति**) जे पिणाऱ्याच्या जवळ पोहोंचतें, (**तद्विदे कामं ऊर्जं**) ते तत्त्वज्ञान्याला यथेच्छ बल देणाऱ्या अन्नाची (**ते वर्षन्ति**) वृष्टि करतात. (**ते वर्षयन्ति**) ते वृष्टि करवितात. [९]

हे (**प्रजापत**) प्रजापालका ! (**ते वाक् स्तनयित्नुः**) गर्जना करणारा मेघ तुझी वाणी आहे. तूं (**वृषा**) बलवान् होऊन (**भूम्यां अधि शुष्मं क्षिपसि**) भूमीवर बलास फेंकतोस, (**अग्नेः वातात् मधुकशा हि जज्ञे**) अग्नि आणि वायूपासून मधुकशा उत्पन्न झाली आहे, ती (**मरुतां उग्रा नप्तिः**) मरुतांची उग्र पुत्री आहे. [१०]

(**यथा सोमः प्रातः सवने**) ज्याप्रमाणें सोमरस प्रातःसवन यज्ञांत, (**अश्विनोः प्रियः भवति**) अश्विनौ देवांना प्रिय होतो. हे अश्विनीकुमार हो ! (**एवा मे आत्मनि**) त्याचप्रकारें माझ्या आत्म्यांत (**वर्चः ध्रियतां**) तेज धारण करा. [११]

(**यथा सोमः द्वितीये सवने**) ज्याप्रमाणें सोमरस द्वितीय म्हणजे माध्यंदिन सवनांत (**इन्द्राग्न्योः प्रियः भवति**) अग्नि आणि इंद्र यांना प्रिय होतो, हे इन्द्रा ! हे अग्ने ! त्याचप्रकारें माझ्या आत्म्यांत तेज धारण करा. [१२]

ज्याप्रमाणें सोमरस (**तृतीये सवने**) तृतीय म्हणजे सायंसवनांत, (**ऋभूणां प्रियः भवति**) ऋभूंना प्रिय होतो, हे ऋभुदेव हो ! याप्रमाणें माझ्या आत्म्यांत तेज धारण करा. [१३]

भावार्थ—ही हिंकार करणारी, अन्न देणारी, उच्च स्वरानें हंबरणारी यज्ञभूमींत विचरते आहे, तीन यज्ञांचें पालन करून यज्ञद्वारां काळाचें मापन करते आणि यज्ञासाठीं स्वतःचें दूध देते. [८]

जो बैल स्वतःचें तेज आणि बल यांनीं पुष्ट गाईच्यापाशीं असतो, तो तत्त्वज्ञान्यांना यथेच्छ बल देणाऱ्या अन्नाची वृष्टि करतो आणि करवितो. [९]

हे प्रजापालक देवा ! मेघगर्जना तुझी वाणी आहे. तिच्या द्वारें तूं स्वतःचें बल पृथ्वीवर फेंकतोस. तेच गाय आणि बैलाचें रूप घेऊन, अग्नि आणि वायूच्या सत्त्वांशानें उत्पन्न झालें आहे. [१०]

ज्याप्रकारें सोम प्रातःसवनांत अश्विनीकुमारांना प्रिय होतो, त्याप्रमाणें माझ्यांत तेज प्रिय होऊन वाढो. [११]

ज्याप्रमाणें सोम माध्यंदिन सवनांत इंद्र आणि अग्नीला प्रिय होतो; त्याप्रमाणें तेज माझ्यांत प्रिय होऊन वाढो. [१२]

ज्याप्रमाणें सोम सायंसवनांत ऋभूंना प्रिय होतो, त्याप्रमाणें तेज माझ्यांत प्रिय होऊन वाढो. [१३]

मधुं जनिषीय मधुं वंशिषीय । पर्यस्वानग्न आगमं तं मा सं सृज वर्चसा ॥१४॥
सं मांग्ने वर्चसा सृज सं प्रजया समायुंषा । विद्युर्मे अस्य देवा इन्द्रो विद्यात्सह ऋषिंभिः ॥१५॥
यथा मधुं मधुकृतः संभरंन्ति मधावधिं । एवा मे अश्विना वर्च आत्मनिं ध्रियताम् ॥१६॥
यथा मक्षा इदं मधुं न्यञ्जन्ति मधावधिं । एवा मे अश्विना वर्चस्तेजो बलमोजश्च ध्रियताम् ॥१७॥
यद्गिरिषु पर्वतेषु गोष्वश्वेषु यन्मधुं । सुरायां सिच्यमानायां यत्तत्र मधु तन्मयिं ॥१८॥
अश्विना सारघेण मा मधुनाङ्क्तं शुभस्पती । यथा वर्चस्वतीं वाचमावदानि जनाँ अनुं ॥१९॥

अर्थ—(**मधु जनिषीय**) मधुरता उत्पन्न करीन (**मधु वंशिषीय**) मधुरता प्राप्त करूं. हे अग्ने ! (**पयस्वान् आगमं**) दूध घेऊन आलों आहें. (**तं मा वर्चसा संसृज**) त्या मला तेजानें युक्त कर. [१४]

हे अग्ने ! (**मा वर्चसा**) मला तेजानें (**प्रजया आयुषा**) प्रजा आणि दीर्घायुत्व (**सं सं सं सृज**) यांनीं संयुक्त कर. (**अस्य मे देवाः विद्युः**) असा मला सर्व देव जाणोत. (**ऋषिभिः सह इन्द्रः विद्यात्**) ऋषींसह वर्तमान इंद्र सुद्धां मला जाणो. [१५]

(**यथा मधुकृतः**) ज्याप्रमाणें मधमाशा (**मधौ अधि**) स्वतःच्या मधांत (**मधु संभरन्ति**) मधाचा संचय करतात, हे अश्विनी कुमार हो ! त्या प्रकारें माझें (**वर्चः तेजः बलं ओजः च**) ज्ञान, तेज, बल आणि वीर्य (**ध्रियतां**) संचित होवो, वाढो. [१६]

(**यथा मक्षाः**) ज्याप्रमाणें मधमाशा (**इदं मधु**) या मधाला (**मधो अधि न्यञ्जन्ति**) स्वतःच्या एकत्रित केलेल्या मधांत संग्रहीत करतात, त्याप्रकारें हे अश्विनीकुमार हो ! माझें (**वर्चः तेजः बलं ओजः च**) ज्ञान, तेज, बल आणि वीर्य (**ध्रियताम्**) संचित होवो, वाढो. [१७]

(**यथा गिरिषु पर्वतेषु**) ज्याप्रमाणें डोंगरावर, पर्वतावर आणि (**गोषु अश्वेषु यत् मधु**) गाई आणि घोडे यांमध्यें जी मधुरता आहे (**सिच्यमानायां सुरायां**) सिंचन होणाऱ्या जलवृष्टीमध्यें (**तत्र तत् मधु**) त्यांत जो मध आहे, (**तत् मयि**) तो माझ्या ठायीं असो. [१८]

हे (**शुभस्पती अश्विनौ**) शुभांचे पालक अश्विनौ देवहो ! (**सारघेण मधुना या सं अंक्तं**) मधमाशांच्या मधानें मला युक्त करा. (**यथा**) ज्यामुळें (**वर्चस्वतीं वाचं**) तेजस्वी भाषण (**जनान् अनु आवदानि**) लोकांशीं मीं बोलेन. [१९]

भावार्थ— मधुरता उत्पन्न करतों, मधुरता संपादन करतों. हे देवा ! मीं दूध समर्पण करण्यासाठीं आलों आहे म्हणून मला त्या तेजानें युक्त कर. [१४]

हे देवा ! मला तेज, प्रजा आणि दीर्घायुष्यानें युक्त कर. माझ्या या अभिलाषेला देव जाणोत आणि ऋषि सुद्धां समजून घेवोत. [१५]

ज्याप्रमाणें मधमाशा स्वतःच्या मधाच्या पोळ्यांत निरनिराळ्या ठिकाणांहून गोळा करून आणून मध भरतात, त्याप्रमाणें माझ्या ठायीं ज्ञान, तेज, बल आणि वीर्य भरीत रहा. [१६–१७]

ज्याप्रमाणें डोंगरांत आणि पर्वतांत, गाई–घोड्यांत आणि वृष्टीच्या जलांत मधुरता आहे तशी मधुरता माझ्यामध्यें येवो. [१८]

हे देवा ! मला या मधमाशांच्या मधानें संयुक्त कर. म्हणजे त्या मधुरिमेचा संदेश मीं सर्व लोकांपर्यंत पोहोंचवीन. [१९]

स्तनयित्नुस्ते वाक्प्रजापते वृषा शुष्मं क्षिपसि भूम्यां दिवि ।
तां पशव उप जीवन्ति सर्वे तेनो सेषमूर्जं पिपर्ति ॥२०॥
पृथिवी दण्डोऽन्तरिक्षं गर्भो द्यौः कशा विद्युत्प्रकशो हिरण्ययो बिन्दुः ॥२१॥
यो वै कशायाः सप्त मधूनि वेद मधुमान्भवति ।
ब्राह्मणश्च राजा च धेनुश्चानड्वांश्च व्रीहिश्च यवश्च मधु सप्तमम् ॥२२॥
मधुमान्भवति मधुमदस्याहार्यं भवति । मधुमतो लोकाञ्जयति य एवं वेद ॥२३॥
यद्वीध्रे स्तनयति प्रजापतिरेव तत्प्रजाभ्यः प्रादुर्भवति ।
तस्मात्प्राचीनोपवीतस्तिष्ठे प्रजापतेऽनु मा बुध्यस्वेति ।
अन्वेनं प्रजा अनु प्रजापतिर्बुध्यते य एवं वेद ॥२४॥

अर्थ— हे (**प्रजापते**) प्रजापालका ! तूं (**वृषा**) बलवान् आहेस, आणि (**ते वाक् स्तनयित्नुः**) तुझी वाणी मेघगर्जना आहे. तूं (**भूम्यां दिवि**) पृथ्वीवर आणि द्युलोकांत (**शुष्मं क्षिपसि**) बलाची वृष्टि करतोस. (**तां सर्वे पशव उपजीवन्ति**) त्यावर सर्व जीवांची उपजीविका होते, आणि (**तेन उ सा इषं ऊर्जं पिपर्ति**) म्हणून त्यानें ती अन्न आणि बलवर्धक रसाची पूर्णता करते. [२०]

(**पृथिवी दण्डः**) पृथ्वी दण्ड आहे, (**अन्तरिक्षं गर्भः**) अन्तरिक्ष मध्यभाग आहे, (**द्यौः कशा**) द्युलोक तंतु आहे, (**विद्युत् प्रकशः**) विद्युत् धागे आहेत आणि (**हिरण्ययः बिन्दुः**) सुवर्णमय बिंदु आहे. [२१]

(**यः वै कशायाः सप्त मधूनि वेद**) जो या कशेच्या तंतूंच्या सात मधांना जाणतो, तो (**मधुमान् भवति**) मधानें युक्त होतो, (**ब्राह्मणः च राजा च**) ब्राह्मण आणि राजा (**धेनुः च अनड्वान् च**) गाय आणि बैल (**व्रीहिः च यवः च**) तांदुळ आणि जव, तसेंच (**मधु सप्तकं**) सातवा मध आहे. [२२]

(**य एवं वेद**) जो हें जाणतो तो (**मधुमान् भवति**) मधानें युक्त होतो, (**अस्य आहार्यं मधुमत् भवति**) त्याचा सर्व खाद्यसंग्रह मधानें युक्त होतो; आणि (**मधुमतः लोकान् जयति**) मधुर लोक प्राप्त करतो. [२३]

(**यत् वीध्रे स्तनयति**) जो आकाशांत गर्जना होते, (**प्रजापतिः एव तत्**) तो प्रजापतीच (**प्रजाभ्यः प्रादुर्भवति**) जणूं काय प्रजेसाठींच प्रगट होत आहे. (**तस्मात् प्राचीनोपवीतः तिष्ठे**) म्हणून उजवीकडील वस्त्र घेऊन उभा होतो. हे (**प्रजापते**) प्रजापालक ईश्वरा ! (**मा अनु बुध्यस्व**) माझें स्मरण ठेव. (**य एवं वेद**) जो हें जाणतो (**एनं प्रजाः अनु**) त्याला प्रजा अनुकूल होतात तसेंच त्याला (**प्रजापतिः अनुबुध्यते**) प्रजापति उत्तम प्रकारें स्मरणांत ठेवतो. [२४]

भावार्थ— हे प्रजापालक देवा ! तूं बलवान् आहेस, आणि मेघगर्जना तुझी वाणी आहे. तूंच द्युलोकापासून भूलोकापावेतों बलाची वृद्धि करतोस. सर्व जीव ज्यामुळें जिवंत रहातात, तें अन्न आणि बळ आम्हां सर्वांस प्राप्त होवो. [२०]

भूमि हा दण्ड, अंतरिक्ष मध्यभाग, द्युलोक मोठे केंस, वीज लहान केंस आणि त्यावर भूषणांच्यासारखे सोन्याचे ठिपके आहेत. ही गाय विश्वरूप आहे. [२१]

जे गाईच्या या सात मधुर रूपास जाणतात ते मधुर होतात. ब्राह्मण, क्षत्रिय, गाय, बैल, तांदुळ, जव आणि सातवा मध आहे. गाईचीं हीं सात मधुर रूपें आहेत. [२२]

जो ही गोष्ट जाणतो तो मधुर होतो, मधयुक्त होतो आणि मधुर स्थान प्राप्त करून घेतो. [२३]

आकाशांत जी गर्जना होते, जणूं काय तो परमेश्वरच प्रगट होऊन सर्व प्रजेस उपदेश देत आहे. त्यावेळीं लोकांनीं अशी प्रार्थना करावी कीं, ' हे देवा ! हे प्रजापालका ! माझें स्मरण ठेव, विसरूं नकोस. ' जो याप्रकारें प्रार्थना करण्याचें जाणतो, लोक त्याला अनुकूल होतात, आणि प्रजापालक परमेश्वर सुद्धां त्याचें स्मरणपूर्वक कल्याण करतो. [२४]

मधुविद्या आणि गोमहिमा

सप्त मधु

या सूक्तांत विशेषतः गाईचें महात्म्य वर्णिलें आहे. या सूक्ताचें उत्तमरीतीनें पठण केलें असतां वाचकांस स्वतःस गाईचें महात्म्य कळू शकेल. वेदाच्या दृष्टीनें गाईचें महात्म्य किती आहे ही गोष्ट या सूक्ताच्या प्रत्येक मंत्रांत उत्तमरीतीनें समजावून सांगितली आहे.

गाय ही संपूर्ण जगाचें सत्त्व आहे. ती पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाशाचें सार आहे. त्या गाईंत अमृतरस आहे. त्याचें पान केल्यानें सर्व लोक आनंदित आणि हृष्टपुष्ट होतात. असेंच समजाना कीं तिचें दूध म्हणजे संपूर्ण जगांतील उत्कृष्ट पदार्थांचें वीर्यच आहे; तेंच सर्वांचा प्राण आणि अद्भुत अमृत आहे. विशेष मनन करणारा मनुष्यच गाईचें हें महत्त्व जाणतो आणि अनुभवूं शकतो. गाय ही देवांची माता आहे आणि तीच सर्व प्रजेचा प्राण आहे. कारण कीं तिच्यांत अमृताचा मधुर रस भरला आहे. जे तिचें दूध पितात ते जणूं स्वतःमध्यें अमृतरसच भरतात; आणि त्यामुळें ते दीर्घायुषी होतात. सर्व अमृतरसांच्या स्रोतांचें केंद्र या गाईंत आहे.

अमृताचा कलश

ही गाय सर्व देवांनीं स्वतःच्या दिव्यशक्तींनीं उत्पन्न केली आहे. त्यांनीं तिच्या दुग्धाशयांत अमृताचा कुंभ ठेवला आहे. जो कोणी स्वतःची मेधाशक्ति वाढवूं इच्छित असेल त्यानें हें दूधरूपी अमृत अवश्य प्यावें. या गाईच्या आंचळांतून जो दूधरूपी रस निघतो तो अद्भुत बळ देणारा रस आहे.

ती अन्नरस देते, यज्ञ करविते, व्रतधारण करविते आणि स्वतःच्या दुधानें सर्वांना पुष्टि देते. बैलहि आपणां सर्वांना सर्व प्रकारचें सुख देतो. ज्याप्रमाणें सोमरस देवांना प्रिय असतो त्याचप्रमाणें गाईचें दूध मनुष्याला प्रिय असतें; त्यानें मनुष्याचें तेज वाढतें. ज्याप्रमाणें मधमाशा थोडा थोडा मध जमवून एकत्रित करतात आणि स्वतःच्या पोळ्यांमध्यें त्याचा संग्रह करतात, त्याप्रकारें मनुष्यानें मधमाशांचें अनुकरण करून स्वतःमध्यें ज्ञान, तेज, बल, वीर्य, पराक्रम वगैरे वाढवावेत. क्रमानें प्रयत्न केले असतां मनुष्य या गोष्टी स्वतःमध्यें वाढवूं शकतो.

डोंगर, पर्वत, आणि संपूर्ण जगतामध्यें सर्वत्र मध भरलेला आहे. ती मधुरता माझ्यामध्यें येवो. या गाईच्यारूपानें परमेश्वराची अद्भुत शक्तीच पृथ्वीवर मनुष्याच्या उन्नतीसाठीं आली आहे. ही गोष्ट अवश्य स्मरणांत ठेवावी.

या मधुरतेचीं सात रूपें या पृथ्वीवर आहेत. एक मधुरता ब्राह्मणांमध्यें ज्ञानरूपानें आहे. दुसरी क्षत्रियांत पराक्रमरूपानें आहे. त्याचप्रमाणें गाय, बैल, तांदुळ आणि जव आणि सातवी मधामध्यें असलेली मधुरता. म्हणून जो मनुष्य ही गोष्ट जाणतो तो या सात पदार्थांपासून स्वतःची उन्नति साधतो.

हा सर्व उपदेश स्वतः प्रजापतीनें केला आहे, म्हणून तो वाचकांनीं स्मरणांत ठेवावा आणि सप्त अमृतांच्या योगें स्वतःचें बळ वाढवावें.

या सूक्ताचा आशय स्पष्ट आहे म्हणून विशेष विवेचनाची जरुरी नाहीं.

अतिथि सत्कार

कांड ९, सूक्त ६

(ऋषिः – ब्रह्मा । देवता – अतिथिः, विद्या ।)

यो विद्याद्ब्रह्म॑ प्र॒त्यक्षं॒ परूं॑षि॒ यस्य॑ संभा॒रा ऋचो॒ यस्या॑नू॒क्य॑म् ॥ १ ॥

सामा॑नि॒ यस्य॒ लोमा॑नि॒ यजु॒र्हृद॑यमु॒च्यते॑ परि॒स्तर॑ण॒मिद्ध॒विः ॥ २ ॥

अर्थ— (यः प्रत्यक्षं ब्रह्म विद्यात्) जो प्रत्यक्ष ब्रह्म जाणतो, (यस्य परूंषि संभाराः) ज्याचे अवयव यज्ञसामग्री आहेत, (यस्य अनूक्यं ऋचः) ज्याचा मेरुदंड ऋचा आहेत. (यस्य लोमानि सामानि) साम ज्याचे केस आहेत, आणि ज्याचें (हृदयं यजुः उच्यते) हृदय यजुर्वेद आहे, असें म्हणण्यांत येतें, तसेंच त्याचें (परिस्तरणं इत् हविः) पांघरण्याचें वस्त्र हवि आहे. [१–२]

यद्वा अतिथिपतिरतिथीन्प्रतिपश्यति देवयजनं प्रेक्षते ॥ ३ ॥
यदभिवदति दीक्षामुपैति यदुदकं याचत्यपः प्र णयति ॥ ४ ॥
या एव यज्ञ आपः प्रणीयन्ते ता एव ताः ॥ ५ ॥
यत्तर्पणमाहरन्ति य एवाग्नीषोमीयः पशुर्बध्यते स एव सः ॥ ६ ॥
यदावसथान्कल्पयन्ति सदोहविर्धानान्येव तत्कल्पयन्ति ॥ ७ ॥
यदुपस्तृणन्ति बर्हिरेव तत् ॥ ८ ॥
यदुपरिशयनमाहरन्ति स्वर्गमेव तेन लोकमव रुन्द्धे ॥ ९ ॥
यत्कशिपूपबर्हणमाहरन्ति परिधय एव ते ॥ १० ॥
यदाञ्जनाभ्यञ्जनमाहरन्त्याज्यमेव तत् ॥ ११ ॥
यत्पुरा परिवेषात्खादमाहरन्ति पुरोडाशावेव तौ ॥ १२ ॥
यदशनकृतं ह्वयन्ति हविष्कृतमेव तद् ध्वयन्ति ॥ १३ ॥
ये व्रीहयो यवा निरूप्यन्तेंऽशव एव ते ॥ १४ ॥
यान्युलूखलमुसलानि ग्रावाण एव ते ॥ १५ ॥

अर्थ—(यत् वै अतिथिपतिः) जो तो गृहस्थ (अतिथीन् प्रतिपश्यति) अतिथींकडे पहातो, तो जणूं काय (देवयजनं प्रेक्षते) देवयज्ञ पहातो. (यत् अभिवदति दीक्षां उपैति) जो अतिथीशीं भाषण करतो तें यज्ञदीक्षा घेण्यासारखें आहे. (यत् उदकं याचति) अतिथि जेव्हां पाणी मागतो तें आणि (अपः प्र णयति) पाणी त्यास देण्यांत येतें तें जणूं काय (याः एव यज्ञे आपः प्रणीयन्ते) यज्ञांत पाणी घेऊन जाण्यासारखें आहे. (ताः एव ताः) तें तेंच जल होय. [३–५]

(यत् तर्पणं आहरन्ति) अतिथीच्या तृप्तीसाठीं जो पदार्थ आणतो, (यः एव अग्नीषोमीयः पशुः बध्यते स एव सः) तो जणूं काय अग्नि आणि सोमासाठीं पशु बांधण्यांत येतो तेंच आहे. (यत् आवसथान् कल्पयन्ति) जी अतिथीसाठीं जागेची व्यवस्था करण्यांत येते तें (सदो हविर्धानानि एव तत् कल्पयन्ति) यज्ञांत सद आणि हविर्धानाची रचना करण्यासारखें आहे. (यत् उपस्तृणन्ति) जें पाथरण्यांत येतें (बर्हिः एव तत्) तें जणूं काय यज्ञांतील कुश नांवाचें गवतच समजाना. (यत् उपरिशयनं आहरन्ति) जे त्यावर पथारी करतात (तेन स्वर्गं लोकं अवरुन्द्धे) त्यानें जणूं काय ते स्वर्गलोकाजवळच जातात. [६–९]

(यत् कशिपु उपबर्हणं आहरन्ति) अतिथींसाठीं ज्या चादर आणि उशा आणण्यांत येतात, (ते परिधयः एव) त्या जणूं काय परिधि आहेत. (यत् आञ्जनं- अभ्यंञ्जनं आहरन्ति) जें डोळयांत घालण्यास अंजन आणि अंगास लावण्यास तेल आणण्यांत येतें (तत् आज्यं एव) तें तूपच आहे. [१०–११]

(यत् परिवेशात् पुरा) जें भोजन वाढण्यापूर्वीं अतिथींसाठीं (खादं आहरन्ति) खाण्यासाठीं कांहीं आणतात, तो जणूं (तौ पुरोडाशौ एव) पुरोडाश आहे. (यत् अशनकृतं ह्वयन्ति) जें भोजन तयार करणाऱ्यास बोलावण्यांत येतें तें जणूं काय (हविष्कृतं एव तत् ह्वयन्ति) हवि तयार करणाऱ्याला बोलावणेंच होय. [१२–१३]

(ये व्रीहयो यवा निरूप्यन्ते) जें तांदुळ आणि यव दिसतात (ते अंशवः एव) ते सोमवेलीचे भागच होत, (यानि उलूखलमुसलानि) जें उखळ-मुसळ अतिथींसाठीं धान्य कांडण्यासाठीं आणण्यांत येतें तें जणूं काय (ते ग्रावाणः एव) सोमरस काढण्याचे दगडच समजाना. [१४–१५]

शूर्पं पवित्रं तुषा ऋजीषाभिषवणीरापः ॥ १६ ॥
स्रुग्दर्विर्नेक्षणमायवनं द्रोणकलशाः कुम्भ्यो वायव्यानि पात्राणीयमेव कृष्णाजिनम् ॥ १७ ॥

[२]

यजमानब्राह्मणं वा एतदतिथिपतिः कुरुते यदाहार्याणि प्रेक्षत इदं भूया३ इदा३मिति ॥ १८ ॥
यदाह भूय उद्धरेति प्राणमेव तेन वर्षीयांसं कुरुते ॥ १९ ॥
उप हरति हवींष्या सादयति ॥ २० ॥
तेषामासन्नानामतिथिरात्मञ्जुहोति ॥ २१ ॥
स्रुचा हस्तेन प्राणे यूपे स्रुक्कारेण वषट्कारेण ॥ २२ ॥
एते वै प्रियाश्चाप्रियाश्चर्त्विजः स्वर्गं लोकं गमयन्ति यदतिथयः ॥ २३ ॥
स य एवं विद्वान्न द्विषन्नश्नीयान्न द्विषतोऽन्नमश्नीयान्न मीमांसितस्य न मीमांसमानस्य ॥ २४ ॥

अर्थ— (**शूर्पं पवित्रं**) अतिथीचें धान्य पाखडण्यासाठीं जें सूप वापरलें जातें तें यज्ञांत वापरण्यांत येणाऱ्या पवित्राप्रमाणें आहे. (**तुषा ऋजीषा**) धान्यावरचा जो कोंडा निघतो तो सोमरस काढल्यानंतर अवशिष्ट राहिलेल्या सोमतंतूप्रमाणें आहे. (**अभिषवणीः आपः**) अतिथीच्या भोजनासाठीं वापरण्यांत येणारें पाणी यज्ञजलासमान आहे. (**दर्वी स्रुक्**) पळी ही यज्ञाहुति देण्याच्या स्रुक्‌सारखी आहे. (**आयवनं ईक्षणं**) शिजतांना अन्नाचें हलणें हें यज्ञांतील ईक्षणकर्मासारखें आहे. (**कुम्भ्यः द्रोणकलशाः**) अन्न शिजविण्याचीं पात्रें यज्ञकलशाप्रमाणें आहेत. (**पात्राणि वायव्यानि**) अतिथीसाठीं दुसरीं आणलेलीं पात्रें तीं यज्ञांतील वायव्य पात्रांसारखींच आणि (**इयं एव कृष्णाजिनं**) तेंच कृष्णाजिन होय. [१६-१७]

[२] (**इदं भूयाः इदं इति**) हें जास्त आहे अथवा हें पुरेसें आहे असें जे (**आहार्याणि प्रेक्षते**) अतिथींना देण्याच्या पदार्थांचें निरीक्षण करण्यांत येते, तें (**अतिथिपतिः**) अतिथीचें पालन करणारा यजमान (**एतत्**) यानें जसूं काय (**यजमानब्राह्मणं वै कुरुते**) यजमानाच्या ब्राह्मणासारखें कार्य करतो. [१८]

(**यत् आह**) जें म्हणण्यांत येतें कीं, (**भूयः उद्धर इति**) जास्त वाढून अतिथीला द्या, तर (**तेन**) त्यामुळें तो (**प्राणं वर्षीयांसं एव कुरुते**) स्वतःच्या प्राणास चिरस्थायी करतो. जो त्याच्याजवळ अन्न इत्यादि (**उपहरति**) घेऊन जातो तो जणूं काय (**हवींषि आसादयाति**) हवीचे पदार्थ घेऊन येतो. [१९-२०]

(**तेषां आसन्नानां**) त्या आणलेल्या पदार्थांतील कित्येक पदार्थांचें (**अतिथिः आत्मन् जुहोति**) अतिथि स्वतःमध्यें हवन करतो, तें भोजन स्वीकारतो. (**हस्तेन स्रुचा**) हस्तरूपी पळीनें (**प्राणे यूपे**) प्राणरूपी यूपांत (**स्रुक्कारेण वषट्कारेण**) जेवण करतांना ' स्रुक् स्रुक् ' अशा शब्दरूपी वषट्कारानें तो स्वतःमध्यें एक आहुति टाकतो. (**यत् अतिथयः**) जे हे अतिथि आहेत ते (**प्रियाः अप्रियाः च**) प्रिय अथवा अप्रिय असोत, ते (**ऋत्विजः**) आतिथ्ययज्ञाच्या ऋत्विज यजमानाला (**स्वर्गं लोकं गमयन्ति**) स्वर्गलोकांत पोहोंचवतात. [२१-२३]

(**यः एवं विद्वान्**) या तत्त्वाला जाणून (**सः द्विषन् न अश्नीयात्**) तो कोणाचा द्वेष न करतां भोजन करतो. (**द्विषतः अन्नं न अश्नीयात्**) द्वेष करणाऱ्याच्या घरीं जेवूं नये. (**न मीमांसितस्य**) संशयित आचरणाच्या मनुष्याच्या घरीं जेवूं नये. (**न मीमांसमानस्य**) संशय नसणाऱ्याच्याच घरीं अतिथीनें अन्न ग्रहण करावें. [२४]

भावार्थ— अतिथि घरांत आल्यानंतर त्याला जे जे पदार्थ देण्यांत येतात ते ते जणूं यज्ञांत वापरण्याच्या पदार्थां समानच आहेत; म्हणजे अतिथींचा सत्कार करणें हें एक प्रकारें यज्ञ करण्याप्रमाणेंच आहे. [१-१७]

सर्वो॑ वा ए॒ष ज॒ग्धपा॑प्मा॒ यस्या॒न्नम॒श्नन्ति॑ ॥ २५ ॥
सर्वो॑ वा ए॒षोऽज॑ग्धपाप्मा॒ यस्या॒न्नं नाश्नन्ति॑ ॥ २६ ॥
स॒र्व॒दा वा ए॒ष यु॒क्तग्रा॑वा॒र्द्रप॑वित्रो॒ वित॑ताध्वर॒ आहृ॑तयज्ञक्रतु॒र्य उ॑प॒हर॑ति ॥ २७ ॥
प्रा॒जा॒प॒त्यो वा ए॒तस्य॑ य॒ज्ञो वित॑तो॒ य उ॑प॒हर॑ति ॥ २८ ॥
प्र॒जाप॑ते॒र्वा ए॒ष वि॒क्रमा॑ननु॒विक्र॑मते॒ य उ॑प॒हर॑ति ॥ २९ ॥
योऽति॑थीनां॒ स आ॑हव॒नीयो॒ यो वेश्म॑नि॒ स गार्ह॑पत्यो॒ यस्मि॑न्पच॑न्ति॒ स द॑क्षिणा॒ग्निः ॥ ३० ॥

[३]

इ॒ष्टं च॒ वा ए॒ष पू॒र्तं च॑ गृ॒हाणा॑मश्ना॒ति यः पूर्वोऽति॑थेर॒श्नाति॑ ॥ ३१ ॥
पय॑श्च॒ वा ए॒ष रसं॑ च गृ॒हाणा॑मश्ना॒ति यः पूर्वोऽति॑थेर॒श्नाति॑ ॥ ३२ ॥
ऊ॒र्जां॑ च॒ वा ए॒ष स्फा॒तिं च॑ गृ॒हाणा॑मश्ना॒ति यः पूर्वोऽति॑थेर॒श्नाति॑ ॥ ३३ ॥
प्र॒जां च॒ वा ए॒ष प॒शूंश्च॑ गृ॒हाणा॑मश्ना॒ति यः पूर्वोऽति॑थेर॒श्नाति॑ ॥ ३४ ॥
की॒र्तिं च॒ वा ए॒ष यश॑श्च गृ॒हाणा॑नश्ना॒ति यः पूर्वोऽति॑थेर॒श्नाति॑ ॥ ३५ ॥
श्रियं॑ च॒ वा ए॒ष सं॒विदं॑ च गृ॒हाणा॑मश्ना॒ति यः पूर्वोऽति॑थेर॒श्नाति॑ ॥ ३६ ॥

अर्थ— (यस्य अन्नं अश्नन्ति) ज्यांचें अन्न अतिथि खातो (सर्वः वै एष जग्धपाप्मा) त्याचीं सर्व पापें जळून जातात. तसेंच (यस्य अन्नं न अश्नन्ति) ज्याचें अन्न अतिथि स्वीकारीत नाहीं (सर्वः वै एष अजग्धपाप्मा) त्याचीं सर्व पापें जशींच्यातशींच रहातात. [२५-२६]

(यः उपहरति) जो गृहस्थ अतिथि सेवेसाठीं आवश्यक सामग्री त्याच्याजवळ घेऊन जातो तो जणूं (सर्वदा वै एषः युक्तग्रावा) सर्वकाळ सोमरस वाटण्याच्या दगडांनीं रस काढीत रहातो, तो नेहमीं (आर्द्रपवित्रः) रस गाळीत रहातो, त्याचा वांटण्याचा दगड नेहमीं ओला असतो, तो (वितत- अध्वरः) नेहमीं यज्ञ करतो, तो नेहमीं (आहृतयज्ञक्रतुः) यज्ञ पूर्ण करणाऱ्याप्रमाणें रहातो. [२७]

(यः उपहरति) जो अतिथीला समर्पण करतो तें जणूं काय (एतस्य प्राजापत्यः वै यज्ञः विततः) त्याच्या प्राजापत्य यज्ञाचा विस्तार झाला आहे. (यः उपहरति) जो दान देतो, तो जणूं काय (प्रजापतेः विक्रमान् अनु- विक्रमते) प्रजापतीच्या विक्रमाचें अनुकरण करतो. [२८-२९]

(यः अतिथीनां) अतिथींच्या शरीरांत जो पाचक अग्नि आहे, (सः आहवनीयः) तो हा आहवनीय अग्नि आहे. (यः वेश्मनि सः गार्हपत्यः) घरांत जो अग्नि असतो तो गार्हपत्य अग्नि आहे (यस्मिन् पचन्ति स दाक्षिणाग्निः) ज्यावर अन्न शिजविण्यांत येतें तो दक्षिणाग्नि आहे. [३०]

[३] (यः अतिथेः पूर्वं अश्नाति) जो अतिथि पूर्वी भोजन करतो, (एषः) तो (गृहाणां इष्टं च वै पूर्तं च अश्नाति) स्वगृहीं इष्ट आणि पूर्तच खातो. जो अतिथिपूर्वी भोजन करतो तो जणूं काय घरच्या (पयः च रसं च) दूध आणि रसाला, (ऊर्जां च स्फातिं च) अन्न आणि समृद्धीला (प्रजां च पशून् च) प्रजा आणि पशूला (कीर्तिं च यशः च) कीर्ति आणि यशाला, (श्रियं च संविदं च) श्री आणि संज्ञेला (अश्नाति) खातो. [३१-३६]

भावार्थ— अतिथीचा योग्य आदरसत्कार करणें हें जणूं काय महान् यज्ञ करण्याप्रमाणें आहे. [१८-३०]

एष वा अतिथिर्यच्छ्रोत्रियस्तस्मात्पूर्वो नाश्नीयात् ॥ ३७ ॥
अशितावत्यतिथावश्नीयाद्यज्ञस्य सात्मत्वाय यज्ञस्याविच्छेदाय तद् व्रतम् ॥ ३८ ॥
एतद्वा उ स्वादीयो यदधिगवं क्षीरं वा मांसं वा तदेव नाश्नीयात् ॥ ३९ ॥

[४]

स य एवं विद्वान्क्षीरमुपसिच्योपहरति। यावदग्निष्टोमेनेष्ट्वा सुसमृद्धेनावरुन्धे तावदेनेनाव रुन्धे ॥४०॥
स य एवं विद्वान्त्सर्पिरुपसिच्योपहरति। यावदतिरात्रेणेष्ट्वा सुसमृद्धेनावरुन्धे तावदेनेनाव रुन्धे ॥४१॥
स य एवं विद्वान्मधूपसिच्योपहरति। यावत्सत्त्रसद्येनेष्ट्वा सुसमृद्धेनावरुन्धे तावदेनेनाव रुन्धे ॥४२॥
स य एवं विद्वान्मांसमुपसिच्योपहरति। यावद् द्वादशाहेनेष्ट्वा सुसमृद्धेनावरुन्धे तावदेनेनाव रुन्धे॥४३॥
स य एवं विद्वानुदकमुपसिच्योपहरति ।
प्रजानां प्रजननाय गच्छति प्रतिष्ठां प्रियः प्रजानां भवति य एवं विद्वानुदकमुपसिच्योपहरति ॥४४॥

अर्थ— (एष वै अतिथिः यत् श्रोत्रियः) तो अतिथि निश्चयानें श्रोत्रिय आहे, (तस्मात् पूर्वः न अश्नीयात्) म्हणून त्याच्या पूर्वी भोजन करूं नये. [३७]

(अतिथौ अशितावति अश्नीयात्) अतिथीला जेवावयास घातल्यावरच गृहस्थानें भोजन करावें (यज्ञस्य सात्मत्वाय) यज्ञाच्या सांगतेसाठीं (यज्ञस्य अविच्छेदाय) यज्ञाचा भंग न व्हावा एवढ्यासाठीं (तत् व्रतं) गृहस्थानें या व्रताचें पालन केलें पाहिजे. [३८]

(एतत् वै उ स्वादीयः) तें जें स्वादयुक्त आहे (यत् अधिगवं क्षीरं वा मांसं वा) जें गाईचें दूध अथवा अन्य मांसादि पदार्थ आहेत, (एतत् एव न अश्नीयात्) त्यांतील कोणताहि पदार्थ अतिथीपूर्वी खाऊं नये. [३९]

[४] (यः एवं विद्वान्) जो ही गोष्ट जाणून अतिथीसाठीं (क्षीरं उपसिच्य उपहरति) चांगल्या भांड्यांत ठेऊन दूध घेऊन जातो, त्याला (यावत् सुसमृद्धेन अग्निष्टोमेन इष्ट्वा अवरुन्धे) उत्तम समृद्ध अग्निष्टोम यज्ञाचें यजन करण्यानें जितकें फळ मिळतें (तावत् एतेन अवरुन्धे) तितकें त्यामुळें मिळतें. [४०]

(यः एवं विद्वान्) जो ही गोष्ट जाणून अतिथीसाठीं (सर्पिः उपसिच्य उपहरति) भांड्यांत तूप घेऊन जातो, त्याला (सुसमृद्धेन अतिरात्रेण) समृद्ध अतिरात्र नांवाचा यज्ञ केल्यानें जें फळ मिळतें तेवढें फळ मिळतें. [४१]

जो ही गोष्ट जाणून अतिथीसाठीं (मधु उपसिच्य उपहरति) भांड्यांत मध घालून नेतो त्याला (सुसमृद्धेन सत्रसद्येन इष्ट्वा) उत्तम समृद्ध सत्रसद्य नांवाचा यज्ञ केला असतां जितकें फळ मिळावें तितकें मिळतें. [४२]

जो ही गोष्ट जाणून (मांसं उपसिच्य) पात्रांत मांस ठेऊन अतिथीसाठीं घेऊन जातो त्याला (द्वादशाहेन इष्ट्वा) द्वादशाह यज्ञ केला असतां जेवढें फळ मिळावें तेवढें फळ मिळतें. [४३]

जो ही गोष्ट जाणून (उदकं उपसिच्य) पाणी उत्तम पात्रांत ठेऊन अतिथीसाठीं घेऊन जातो त्याला (प्रजानां प्रजननाय प्रतिष्ठां गच्छति) प्रजेच्या प्रजननासाठीं म्हणजे उत्पत्तीसाठीं स्थिरता प्राप्त होते आणि तो (प्रजानां प्रियः भवति) प्रजेला प्रिय होतो. [४४]

भावार्थ— अतिथीला प्रथम भोजन वाढावें आणि नंतर जें उरलें अन्न तें घरच्या मनुष्यांनीं खावें. कोणत्याहि घरच्या मनुष्यानें अतिथीपूर्वी जेऊं नये. तसें केल्यानें गृहस्थयज्ञाची पूर्णता होते. प्रत्येक गृहस्थानें या व्रताचें पालन करावें. [३१–३९]

जो गृहस्थ उत्तम श्रद्धेनें दूध वगैरे पदार्थ उत्तम स्वच्छ पात्रांत ठेऊन अतिथीस समर्पण करण्यास त्याच्याजवळ घेऊन जातो, त्याला महान् यज्ञ यथासांग केल्याचें फळ प्राप्त होतें. [४०–४४]

[५]

तस्मा उषा हिङ्कृणोति सविता प्र स्तौति ।
बृहस्पतिरूर्जयोद्गायति त्वष्टा पुष्ट्या प्रति हरति विश्वे देवा निधनम् ।
निधनं भूत्याः प्रजायाः पशूनां भवति य एवं वेद ॥ ४५ ॥
तस्मा उद्यन्त्सूर्यो हिङ्कृणोति संगवः प्र स्तौति ।
मध्यन्दिन उद्गायत्यपराह्णः प्रति हरत्यस्तंयन्निधनम् ।
निधनं भूत्याः प्रजायाः पशूनां भवति य एवं वेद ॥ ४६ ॥
तस्मा अभ्रो भवन्हिङ्कृणोति स्तनयन्प्र स्तौति ।
विद्योतमानः प्रति हरति वर्षन्नुद्गायत्युद्गृह्णन् निधनम् ।
निधनं भूत्याः प्रजायाः पशूनां भवति य एवं वेद ।
अतिथीन्प्रति पश्यति हिङ्कृणोत्यभि वदति प्र स्तौत्युदकं याचत्युद्गायति ॥ ४७ ॥
उप हरति प्रति हरत्युच्छिष्टं निधनम् । निधनं भूत्याः प्रजायाः पशूनां भवति य एवं वेद ॥ ४८ ॥

अर्थ— [५] (**यः एवं वेद**) जो हें अतिथि-सत्काराचें व्रत जाणतो (**तस्मै**) त्या मनुष्यासाठीं (**उषा हिंकृणोति**) उषा आनंदाचा संदेश देते, (**सविता प्र स्तौति**) सूर्य विशेष प्रशंसा करतो, (**बृहस्पतिः ऊर्जया उद्गायति**) बृहस्पति जोरानें त्याच्या गुणांचें गायन करतो, (**त्वष्टा पुष्ट्या प्रतिहरति**) त्वष्टा त्याला पुष्टि देतो, (**विश्वे देवाः निधनं**) इतर सर्व देव आश्रय देतात. अशाप्रकारें तो (**भूत्याः प्रजायाः पशूनां निधनं भवति**) संपत्ति, प्रजा आणि पशूंचें आश्रयस्थान होतो. [४५]

जो या अतिथिच्या सत्काराचें व्रत जाणतो, (**तस्मै उद्यन् सूर्यः हिंकृणोति**) त्याच्यासाठीं उगवता सूर्य आनंदाचा संदेश देतो, (**संगवः प्र स्तौति**) प्रभातसमय प्रशंसा करतो, (**मध्यंदिनः उद्गायति**) मध्यदिन त्याचें गुणगान करतो, (**अपराह्णः प्रतिहरति**) अपराह्णसमय पुष्टि देतो, (**अस्तं यत् निधनं**) अस्तास जाणारा सूर्य त्याला आसरा देतो. याप्रकारें तो संपत्ति, प्रजा आणि पशूंचें आश्रयस्थान होतो. (४६)

जो या अतिथि-सत्कार व्रताला जाणतो, (**तस्मै अभ्रः भवन् हिंकृणोति**) त्याच्यासाठीं उत्पन्न होणारा मेघ आनंदाचा संदेश देतो, (**स्तनयन् प्रस्तौति**) गर्जना करणारा मेघ प्रशंसा करतो, (**विद्योतमानः प्रतिहरति**) प्रकाशणारा पुष्टि देतो, (**वर्षन् उद्गायति**) वृष्टि करणारा मेघ त्याचें गुणगान करतो, (**उद्गृह्णन् निधनं**) वर उठविणारा आश्रय देतो. याप्रकारें तो संपत्ति, प्रजा आणि पशूंचें आश्रयस्थान होतो. [४७]

जो या अतिथिसत्काराच्या व्रताला जाणतो, तो जेव्हां (**अतिथीन् पश्यति**) अतिथींचें दर्शन करतो तेव्हां जणूं काय तो (**हिंकृणोति**) आनंदानें शब्दोच्चार करतो, जेव्हां तो अतिथींस (**अभिवदति**) नमस्कार करतो, तेव्हां तें कृत्य त्याचा (**प्रस्तौति**) प्रस्ताव करण्यासमान आहे. जेव्हां तो (**उदकं याचति**) पाणी मागतो तेव्हां जणूं तो (**उद्गायति**) यज्ञांतील उद्गात्याचें काम करतो, (**उपहरति प्रतिहरति**) जेव्हां तो पदार्थ अतिथिपाशीं आणतो तेव्हां तो यज्ञाच्या प्रतिहर्त्याचें काम करतो. (**उच्छिष्टं निधनं**) जें अन्न अतिथींनीं भोजन केल्यानंतर शिल्लक रहातें त्याला या यज्ञाचा अंतिम प्रसाद समजा. याप्रकारें अतिथिसत्कार करणारा संपत्ति, संतति आणि पशूंचें आश्रयस्थान बनतो. [४८]

भावार्थ— हिंकार, प्रस्ताव, उद्गान, प्रतिहार आणि निधन हीं सामाचीं पांच अंगें आहेत. अतिथिसत्कार करणाऱ्यास तीं पांचीं सिद्ध होतात, म्हणजे अतिथिसत्कार एक श्रेष्ठ यज्ञाचा पूर्ण साम आहे. अतिथिसत्कार गृहस्थाचें परम पवित्र आणि श्रेष्ठ कर्म आहे. [४५-४८]

[६]

यत्क्षत्तारं ह्वयत्या श्रावयत्येव तत् ॥ ४९ ॥
यत्प्रतिशृणोति प्रत्याश्रावयत्येव तत् ॥ ५० ॥
यत्परिवेष्टारः पात्रहस्ताः पूर्वे चापरे च प्रपद्यन्ते चमसाध्वर्यव एव ते ॥ ५१ ॥
तेषां न कश्चनाहोता ॥ ५२ ॥
यद्वा अतिथिपतिरतिथीन्परिविष्य गृहानुपोदैत्यवभृथमेव तदुपावैति ॥ ५३ ॥
यत्सभागयति दक्षिणाः सभागयति यदनुतिष्ठत उदवस्यत्येव तत् ॥ ५४ ॥
स उपहूतः पृथिव्यां भक्षयत्युपहूतस्तस्मिन्यत्पृथिव्यां विश्वरूपम् ॥ ५५ ॥
स उपहूतोऽन्तरिक्षे भक्षयत्युपहूतस्तस्मिन्यदन्तरिक्षे विश्वरूपम् ॥ ५६ ॥
स उपहूतो दिवि भक्षयत्युपहूतस्तस्मिन्यद्दिवि विश्वरूपम् ॥ ५७ ॥
स उपहूतो देवेषु भक्षयत्युपहूतस्तस्मिन्यद्देवेषु विश्वरूपम् ॥ ५८ ॥
स उपहूतो लोकेषु भक्षयत्युपहूतस्तस्मिन्यल्लोकेषु विश्वरूपम् ॥ ५९ ॥
स उपहूत उपहूतः ॥ ६० ॥
आप्नोतीमं लोकमाप्नोत्यमुम् ॥ ६१ ॥
ज्योतिष्मतो लोकाञ्जयति य एवं वेद ॥ ६२ ॥

अर्थ—[६] (यत् क्षत्तारं ह्वयति) जो द्वारपाळास बोलावतो तो जणूं (तत् आश्रावयति एव) अभिश्रवण करतो. (यत् प्रतिशृणोति) जेव्हां तो ऐकतो (तत् प्रत्याश्रावयति एव) तें प्रत्याश्रवणच होय. जेव्हां अतिथीसाठीं (पूर्वे च अपरे च परिवेष्टारः पात्रहस्ताः प्रपद्यन्ते) प्रथम आणि नंतर वाढणारे सेवक पात्र हातांत घेऊन त्याच्या-जवळ जातात, (ते चमसाध्वर्यव एव) ते जणूं काय यज्ञाचे चमसाध्वर्यु आहेत. (तेषां न कश्चन अहोता) त्यां-च्यांत कोणीहि अयाजक होत नाहीं. (४९-५२)

(यत् वै अतिथिपतिः अतिथीन् परिविष्य) जो तो गृहस्थ अतिथींना भोजन देऊन (गृहान् उप उदैति) स्वतःच्या घरीं जातो, (तत् अवभृथं एव उप अवैति) तो अवभृथस्नानासाठींच जातो असें समजाना. (यत् सभागयति) जो भेट देतो, ती जणूं (दक्षिणाः सभागयति) दक्षिणा प्रदान करतो. (यत् अनुतिष्ठते) जें त्याच्यासाठीं अनुष्ठान करतो तें (तत् उदवसति एव) जणूं त्यानें यथासांग यज्ञ करणेंच होय. [५३-५४]

(सः पृथिव्यां उपहूतः) जो या पृथ्वीवरील कोण्या देशांत आदरानें बोलाविलेला अतिथि (यत् पृथिव्यां विश्वरूपं) या पृथ्वीवर जें कांहीं अनेक रंगारूपाचें अन्न आहे (तस्मिन् उपहूतः भक्षयति) त्या ठिकाणीं निमंत्रित होऊन तें खातो. तो आदरानें बोलावलेला अतिथि (अन्तरिक्षे) अन्तरिक्षांत, (दिवि) द्युलोकांत, (देवेषु) देवतांमध्यें आणि (लोकेषु) सर्व लोकांमध्यें (विश्वरूपं) अनेक रंगारूपाचें अन्न असतें तेथें बसून (भक्षयति) भक्षण करतो. [५५-५९]

(सः उपहूतः) तो आदरानें बोलावलेला अतिथि पुष्कळ लाभ देतो. अतिथीला आदरानें बोलावणारा गृहस्थ (इमं लोकं आप्नोति) या लोकास प्राप्त करतो, आणि (अमुं आप्नोति) त्या लोकास सुद्धां प्राप्त करतो. (यः एवं वेद) जो या अतिथिसत्काराचें व्रत जाणतो तो (ज्योतिष्मतः लोकान् जयति) तेजस्वी लोक प्राप्त करतो. (६०-६२)

अतिथीचा आदर

अतिथीचा आदरसत्कार प्रेमानें करण्याचा उपदेश देण्यासाठीं हें ६२ मंत्रांचें सूक्त ६ पर्यायांत दिलें आहे. मंत्रार्थ सरळ आणि स्पष्ट असल्यानें यावर विशेष विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. अतिथिसत्कार करण्यानें विविध प्रकारचे यज्ञ यथासांग केल्याचें फळ प्राप्त होतें; म्हणजे जे उत्तम श्रद्धेनें अतिथीचा सत्कार करतील त्यांना इतर कोणताहि यज्ञयाग करण्याचें कारण नाहीं. गृहस्थधर्माचें प्रधान अंग अतिथिसत्कार आहे. वाचकांनीं या सूक्ताचा पाठ करावा आणि त्याचा हेतु जाणून योग्य अतिथिसत्कार करावा व श्रेष्ठ फळ मिळवावें.

या सूक्तांत ४३ व्या मंत्रांत ' मांस ' शब्द आला आहे, त्याचे इतर अनेक अर्थ असतील, परंतु आमच्या मतें येथें फळार्थ पशुमांस असा घ्यावयास हवा. तसा अर्थ करण्यांत कांहीं हरकत नाहीं कारण मांसभक्षण करणाराकडे अतिथि आला तर त्यानें अतिथी· पूर्वी मांसहुद्धां खाऊं नये इत्यादि भाव येथें आहे. वेदांत निर्मांसभोजी मनुष्याचें वर्णन आहे तद्वत् मांसभोजी मनुष्याचें सुद्धां वर्णन आहे.

ब्राह्मणास कष्ट

कांड ५, सूक्त १९

(ऋषिः – मयोभूः । देवता – ब्रह्मगवी ।)

अतिमात्रमवर्धन्त नोदिव दिवमस्पृशन् । भृगुं हिंसित्वा सृञ्जया वैतहव्याः पराभवन् ॥ १ ॥
ये बृहत्सामानमाङ्गिरसमार्पयन्ब्राह्मणं जनाः । पेत्वस्तेषामुभयादमविस्तोकान्यावयत् ॥ २ ॥
ये ब्राह्मणं प्रत्यष्ठीवन्ये वास्मिञ्छुल्कमीषिरे । अस्नस्ते मध्ये कुल्यायाः केशान्खादन्त आसते ॥ ३ ॥
ब्रह्मगवी पच्यमाना यावत्साभि विजङ्गहे । तेजो राष्ट्रस्य निर्हन्ति न वीरो जायते वृषा ॥ ४ ॥

अर्थ— (**सृञ्जयाः**) हल्ला करून जय मिळविणारे वीर (**अतिमात्रं अवर्धन्त**) फार वृद्धि पावले, (**नः दिवं इव उत्स्पृशन्**) इतकें कीं जणूं द्युलोकाला त्यांनीं स्पर्श केला. परंतु ते (**वैत-हव्याः**) देवांचें अन्न स्वतः खाऊं लागले तेव्हां (**भृगुं हिंसित्वा**) भृगु ऋषींची हिंसा करून (**पराभवन्**) पराजय पावले. [१] (**ये जनाः बृहत्सामानं**) जीं मनुष्यें महान् सामगायक (**आंगिरसं ब्राह्मणं आर्पयन्**) आंगिरस ब्राह्मणाला त्रासवित होतीं, (**तेषां तोकानि**) त्यांची संतति (**पेत्वः अविः**) हिंसक (**उभयादं आवयत्**) दोन्ही दातांमध्यें चूर्ण करीत राहिली. [२] (**ये ब्राह्मणं प्रत्यष्ठीवन्**) जे ब्राह्मणांचा अपमान करतात (**ये वा अस्मिन् शुल्कं ईषिरे**) अथवा जे त्यांच्या जवळचें धन हिरावून घेऊं इच्छितात, (**ते अस्नः कुल्यायाः मध्ये**) ते रक्ताच्या नदीमध्यें (**केशान् खादन्त आसते**) केस खात बसतात. [३] (**सा पच्यमाना ब्रह्मगवी**) ती हरण केलेली ब्राह्मणाची गाय (**यावत् अभि विजंगहे**) ज्या कारणानें तडफडत रहाते, त्यामुळें त्या (**राष्ट्रस्य तेजः निर्हन्ति**) राष्ट्राचें तेज मारलें जाते. आणि तेथें (**वृषा वीरः न जायते**) बलवान्

भावार्थ— विजयी संजय क्षत्रिय फार वरचढ झाले होते परंतु जेव्हां ते ब्राह्मणास त्रासवूं लागले आणि देवांना अर्पण केलेलें हव्य स्वतः खाऊं लागले तेव्हां राज्यभ्रष्ट झाले. [१] ज्यांनीं सामगायक अंगिरसाला त्रासविलें होते, त्यांच्या वंशजांना हिंसक पशूंनीं दांतासुळ्यांनीं फाडून खाल्लें. [२] जो ब्राह्मणांचा अपमान करतो, त्यांचें धन हिरावून घेतो, तो रक्ताच्या नदींत केंस खात पडतो. [३] जो ब्राह्मणाच्या गाईचें हरण करतो त्या क्षत्रियाच्या राष्ट्राचें तेज नष्ट होतें आणि त्या राष्ट्रांत बलवान् वीर उत्पन्न

*

क्रूरमस्या आशसनं तृष्टं पिशितमस्यते । क्षीरं यदस्याः पीयते तद्वै पितृषु किल्बिषम् ॥ ५ ॥
उग्रो राजा मन्यमानो ब्राह्मणं यो जिघत्सति । परा तत्सिच्यते राष्ट्रं ब्राह्मणो यत्र जीयते ॥ ६ ॥
अष्टापदी चतुरक्षि चतुःश्रोत्रा चतुर्हनुः । द्व्यास्या द्विजिह्वा भूत्वा सा राष्ट्रमव धूनुते ब्रह्मज्यस्य ॥७॥
तद्वै राष्ट्रमा स्रवति नावं भिन्नामिवोदकम् । ब्रह्माणं यत्र हिंसन्ति तद्राष्ट्रं हन्ति दुच्छुना ॥ ८ ॥
तं वृक्षा अप सेधन्ति छायां नो मोपगा इति । यो ब्राह्मणस्य सद्धनमभि नारद मन्यते ॥ ९ ॥
विषमेतद्देवकृतं राजा वरुणोऽब्रवीत् । न ब्राह्मणस्य गां जग्ध्वा राष्ट्रे जागार कश्चन ॥ १० ॥
नवैव ता नवतयो या भूमिर्व्यधूनुत । प्रजां हिंसित्वा ब्राह्मणीमसंभव्यं पराभवन् ॥ ११ ॥
यां मृतायानुबध्नन्ति कूद्यं पदयोपनीम् । तद्वै ब्रह्मज्य ते देवा उपस्तरणमब्रुवन् ॥ १२ ॥

वीर सुद्धां उत्पन्न होत नाहीं. [४] (अस्याः आशसनं क्रूरं) तिला कष्ट देणें फार क्रूरतेचें कार्य आहे. (पिशितं तृष्टं अस्यते) मांस तर तहान वाढविणारें असल्यानें फेंकून देण्यास योग्य होय. (यत् अस्याः क्षीरं पीयते) जो अशा ब्राह्मणाच्या गाईचें दूध पिऊन टाकतो (तत् वै पितृषु किल्बिषं) त्यास निःसंशय पितरांमध्यें पाप म्हणण्यांत येतें. [५] (यः राजा उग्रः मन्यमानः) जो राजा स्वतःला उग्र मानतो, (ब्राह्मणं जिघत्सति) ब्राह्मणांना त्रास-वितो, (तत् राष्ट्रं परासिच्यते) त्या राष्ट्राचें पतन होतें, (यत्र ब्राह्मणः जीयते) जेथें ब्राह्मणास कष्ट पोहोंचतात. [६] (अष्टापदी चतुरक्षि) आठ पायांची चार डोळयांची (चतुः श्रोत्रा चतुर्हनुः) चार कानांची आणि चार हनुवटीची (द्व्यास्या द्विजिह्वा भूत्वा) दोन तोंडाची आणि दोन जिभांची होऊन (ब्रह्मज्यस्य राष्ट्रं सा अवधूनुते) ब्राह्मणास पीडा देणाऱ्या राजाच्या राष्ट्राला कांपवून सोडते. [७] (यत्र ब्राह्मणं हिंसन्ति) जेथें ब्राह्मणास कष्ट दिले जातात (तत् राष्ट्रं दुच्छुना हन्ति) तें राष्ट्र विपत्तीनें मरतें, आणि (तत् वै राष्ट्रं) त्या राष्ट्राला (आस्रवति) तोडून टाकण्यांत येतें. (उदकं भिन्नां नावं इव) ज्याप्रमाणें फुटक्या होडीची वाताहत पाणी करते [८] (नः छायां मा उपगाः इति) स्वतःच्या छायेंत तो न यावा अशा इच्छेनें (तं वृक्षाः अपसेधन्ति) त्याला वृक्ष दूर काढून लावतात. हे नारदा ! (यः ब्राह्मणस्य धनं सत् अभिमन्यते) जो ब्राह्मणाचें धन जुलुम जबरदस्तीनें स्वतःचेंच मानतो. [९] (राजा वरुणः अब्रवीत्) वरुण राजानें सांगितलें आहे कीं (एतत् देवकृतं विषं) हें देवांनीं तयार केलेलें विष आहे, (ब्राह्मणस्य गां जग्ध्वा) जबरदस्तीनें ब्राह्मणाची गाय हिरावून घेण्यामुळें (कश्चन राष्ट्रे न जागार) राष्ट्रांत कोणीहि जिवंत राहूं शकत नाहीं. [१०] (याः नवः नवतयः) जी नित्य नव्या प्रकारची प्रजा आहे (ताः भूमिः एव नि अधूनुत) त्यांना भूमीनेंहि नकार दिला आहे. त्या (कल्याणीं ब्राह्मणीं प्रजां हिंसित्वा) कल्याण करणाऱ्या ब्राह्मण प्रजेला कष्ट देऊन (असंभव्य पराभवन्) असंभाव्य रीतीनें हार खातात. [११] (यां पदयोपनीं कूद्यं) ज्या पदचिन्हें पुसून टाकणाऱ्या कांटेरी केरसुणीला (मृताय अनुबध्नन्ति) मेलेल्यासह बांधतात.

होत नाहीं. [४] गाईस कष्ट देणें हें फार क्रूरतेचें कार्य आहे; दुसऱ्याच्या गाईचें दूध पिणें हें विषासारखें आहे. [५] स्वतःचें राष्ट्र बलवान् समजून जो राजा ब्राह्मणांस त्रासवितो, त्याच्या राष्ट्राचें पतन होतें. [६] ब्राह्मणाची गाय दुःखी झाली तर द्विगुणित मारक शिंगांनीं युक्त होऊन राष्ट्राचा नाश करते. [७] जेथें ब्राह्मणांस कष्ट दिलें जातात त्या राष्ट्रावर आपत्ति येते, फुटलेल्या नावे-प्रमाणें तें मध्येंच बुडून जातें. [८] जो ब्राह्मणानें धन हिरावून घेतो त्याला वृक्षसुद्धां स्वतःच्या छायेंत उभा राहूं देत नाहींत. [९] राजा वरुणानें सांगितलें आहे कीं, ' ब्राह्मणाची गाय बळकाविणें हें विष पिण्यासारखें नुकसानकारक आहे. तिचा स्वीकार करून कोणी जिवंत राहूं शकत नाहीं. [१०] ज्यांनीं सर्व भूमीवर विजय मिळविला आहे असे नित्य नूतन वीर ब्राह्मणांस कष्ट देऊं लागताच पराजित झाले. [११] ब्राह्मणास दुःख देणाऱ्यास स्मशानभूमि साफ करणाऱ्या केरसुणीवर झोंपण्याचा प्रसंग येतो. [१२]

अश्रूणि कृपमाणस्य यानि जीतस्य वावृतुः । तं वै ब्रह्मज्य ते देवा अपां भागमधारयन् ॥ १३ ॥
येन मृतं स्नपयन्ति श्मश्रूणि येनोन्दते । तं वै ब्रह्मज्य ते देवा अपां भागमधारयन् ॥ १४ ॥
न वर्षं मैत्रावरुणं ब्रह्मज्यमभि वर्षति । नास्मै समितिः कल्पते न मित्रं नयते वशम् ॥ १५ ॥

हे (ब्रह्म-ज्य) ब्राह्मणास सताविणाऱ्या ! (देवाः तत् ते उपस्तरणं अब्रुवन्) देवांनीं सगितलें आहे कीं; तो तुझा बिछाना आहे. [१२] हे (ब्रह्म-ज्य) ब्राह्मणास त्रासविणाऱ्या ! (यानि अश्रूणि) जीं आंसवें (कृपमाणस्य तत् ते जीतस्य वावृतुः) निर्बल आणि जिंकलेल्या मनुष्यांना वहावून नेतात, (देवाः तं वै ते अपां भागं अधारयन्) देवांनीं त्याला सुद्धां तुझ्या जलाचा भाग बनविलें आहे. [१३] हे (ब्रह्मज्य) ब्राह्मणास त्रासविणाऱ्या ! (येन मृतं स्नपयन्ति) ज्यानें प्रेतास स्नान घालण्यांत येतें, (येन श्मश्रूणि उन्दते) ज्यानें दाढी मिशांचे केंस भिजविण्यांत येतात, (तं वै देवाः ते अपां भागं अधारयन्) त्यालाच देवांनीं तुझा जलभाग कल्पिला आहे. [१४] (मैत्रावरुणं वर्षं) मित्रावरुणांपासून प्राप्त व्हावयाची वृष्टि (ब्रह्मज्यं न अभिवर्षति) ब्राह्मणास कष्ट देणाऱ्यावर होत नाहीं, आणि (अस्मै समितिः न कल्पते) त्याला सभा संमति देत नाहीं. (न मित्रं वशं नयते) आणि मित्रहि त्याला वश रहात नाहींत. [१५]

निर्बल झाल्यामुळें पराजित झालेल्या मनुष्यांच्या नेत्रांत जे अश्रु येतात, तें अश्रुजल ब्राह्मणांस कष्ट देणाऱ्यास पिण्यास देण्यांत येतें. [१३] ज्या जलानें मेलेल्या शरीरास स्नान घालतात अथवा जें जल हजामत करतांना दाढीमिशा भिजविण्यास वापरतात तें जल जो ब्राह्मणांस दुःख देतो त्याला प्राप्त होतें. [१४] ब्राह्मणास कष्ट देणाऱ्या राष्ट्रावर चांगली वृष्टि होत नाहीं; राष्ट्रसभा अशा राजास अनुकूल रहात नाहीं आणि अशा क्षत्रियाशीं कोणी मित्रत्व ठेवीत नाहीं. [१५]

ब्राह्मणास कष्ट

ज्ञान्यास कष्ट

ज्ञानी मनुष्यास दिलेले कष्ट सुद्धां राज्याचा नाश करतात. ज्या राज्यशासनांत ज्ञानी सज्जनांना कष्ट भोगावे लागतात, तें राज्यशासन नष्ट होतें. ज्या राज्यशासनांत ज्ञान्यांच्या वाणीवर प्रतिबंध ठेवला जातो, त्यांस उत्तम उपदेश करतांना अडथळा करण्यांत येतो, जेथें सुविद्य ज्ञानी पुरुषाची संपत्ति सुरक्षित नसते, जेथें अन्य प्रकारें ज्ञान्यांना कष्ट पोहोंचतात, त्या राष्ट्राची अधोगति झाल्यावांचून रहात नाहीं.

असा आशय या सूक्ताचा आहे. राष्ट्रांत ज्ञानाची आणि ज्ञान्याची पूजा होत राहिली पाहिजे, कारण ज्ञानोपदेशानेंच राष्ट्राचें खरें कल्याण होतें. म्हणून प्रत्येक राष्ट्रांतील मनुष्यांनीं ज्ञान्यांचा सत्कार करून स्वतःची उन्नति साधावी.

अंत्येष्टीच्या कित्येक गोष्टी

या सूक्तांत अंत्येष्टीच्या कित्येक गोष्टींचे उल्लेख आहेत; पहा-

१. (मृतं स्नपयन्ति)- मृत शरीरास स्नान घालतात.

२. (मृताय पदयोपनीं कूद्यं अनुबध्नन्ति)- मृताच्या पायाचीं चिन्हें पुसून टाकण्यास केरसुणी अथवा आणखी कांहीं वस्तु बांधण्यांत येते. (यांतील ' कूद्य ' शब्दाचा अर्थ नीट लागत नाहीं. हा विषय संशोध्य आहे.)

हजामत

३. (श्मश्रूणि उन्दते)- हजामत करण्याच्यावेळीं केंस भिजविण्यांत येतात.

या सूक्तांतील कित्येक कथनात्मक भाव नीट समजत नाहीं, त्यामुळें हें सूक्त क्लिष्ट वाटतें. अशा मंत्रांचा वाचकांनीं विशेष विचार करावा.

पशूंस खच्ची करणें

कांड ६, सूक्त १३८

(ऋषिः - अथर्वा । देवता - वनस्पतिः ।)

त्वं वीरुधां श्रेष्ठतमाभिश्रुतास्योषधे । इमं मे अद्य पूरुषं क्लीबमोपशिनं कृधि ॥ १ ॥

क्लीबं कृध्योपशिनमथो कुरीरिणं कृधि । अथास्येन्द्रो ग्रावभ्यामुभे भिनात्त्वाण्ड्यौ ॥ २ ॥

क्लीब क्लीबं त्वाकरं वध्रे वध्रिं त्वाकरमरसारसं त्वाकरम् ।

कुरीरमस्य शीर्षणि कुम्बं चाधिनिदध्मसि ॥ ३ ॥

ये ते नाड्यौ देवकृते ययोस्तिष्ठति वृष्ण्यम् । ते ते भिनद्मि शम्ययामुष्या अधि मुष्कयोः ॥ ४ ॥

यथा नडं कशिपुने स्त्रियो भिन्दन्त्यश्मना । एवा भिनद्मि ते शेपोऽमुष्या अधि मुष्कयोः ॥ ५ ॥

अर्थ— हे औषधि ! (त्वं विरुधां श्रेष्ठतमा अभिश्रुता) तूं सर्व औषधींत अधिक श्रेष्ठ आणि प्रसिद्ध आहेस. (अद्य इमं मे पूरुषं) आज माझ्या पुरुष पशूला (क्लीबं ओपशिनं कृधि) नपुंसक स्त्रीप्रमाणें कर. [१]

(क्लीबं ओपशिनं कृधि) नपुंसक आणि स्त्रीसारखा कर. (अथो कुरीरिणं कृधि) आणि मस्तकावर केंस ठेवणाऱ्यासारखा कर. (अथ इन्द्रः ग्रावभ्यां) आणि इंद्र दोन दगडांनीं (अस्य उभे आण्ड्यौ भिनत्तु) त्याचे दोन्ही अंडकोष छिन्नभिन्न करो. [२]

हे क्लीबा ! (त्वा क्लीबं अकरं) तुला नपुंसक करण्यांत आलें आहे. हे (वध्रे) निर्बल ! (त्वा वध्रिं अकरं) तुला निर्बल करण्यांत आलें आहे. हे (अरस) रसहीना ! (त्वा अरसं अकरं) तुला रसहीन करण्यांत आलें आहे. (अस्य शीर्षणि कुरीरं) त्याच्या डोक्यावर केंस आणि त्यांत (कुम्बं च अधि नि दध्मसि) आभूषणें ठेवण्यांत आलीं आहेत. [३]

(ये ते देवकृते नाड्यौ) ज्या तुझ्या देवांकडून तयार केलेल्या नाड्या आहेत, (ययोः वृष्ण्यं तिष्ठति) ज्यांत वीर्य रहातें, (ते ते अधिमुष्कयोः अधि) त्या तुझ्या दोन्ही अंडकोषावर (अमुष्या शम्यया भिनद्मि) या दांडक्यानें तोडून टाकतो. [४]

(यथा स्त्रियः कशिपुने नडं अश्मना भिन्दन्ति) ज्याप्रमाणें स्त्रिया चटई करण्यासाठीं नारळाचा काथ्या दगडानें कुटतात (एवा अमुष्य ते शेपः) त्याप्रमाणें तुझें इंद्रिय (ते मुष्कयोः अधि भिनद्मि) तुझ्या अंडकोषावर कुटतों. [५]

बैल, घोडा इत्यादि नर जनावरांना पुरुषत्वहीन करण्यासाठीं वीर्य नाड्या तोडाव्या, अंडकोष ठेंचून टाकावेत वगैरे क्रिया येथें सांगितल्या आहेत. यांत कांहीं वनस्पतींचा उपयोगही सांगितला आहे परंतु त्या वनस्पति कोणत्या त्या आज ज्ञात नाहींत. वीर्य नाड्या कापणें, अंडकोष ठेचून टाकणें या क्रिया आजहि प्रसिद्ध आहेत.

६ व्या कांडाचें समालोचन

निरीक्षण

६ व्या कांडांत एकूण १४२ सूक्तें आहेत, त्यांतील जास्तींत जास्त म्हणजे ४३ सूक्तें गृहस्थाश्रमविषयक आहेत, म्हणून त्या सर्वांचा समग्र विचार येथें केला आहे. त्यांची विषयवार रचना अशी--

आत्मोन्नति

आत्मोन्नतिविषयीं खालीं दिलेल्या सूक्तांचा एकत्रित विचार करणें योग्य आहे- पापांपासून सुरक्षित रहाण्याचा विषय (१३३ सू.) ज्ञानानें पापांस दूर करणें, पापांपासून अलिप्त रहाणें (सू. ११५) या दोन सूक्तांत आला आहे. त्याचा एकत्रित विचार करावा. पापांपासून दूर राहून पवित्रता संभाळावी. त्यासाठीं तद्विषय सूक्तें- ६२ स्वतःची पवित्रता, २६ पापी विचारांचा त्याग करा, ४३ क्रोधाचें शमन, १९ आत्मशुद्धीसाठीं प्रार्थना, ५१ अंतर्बाह्य शुद्धता, १८ ईर्ष्या निवारण हीं आहेत.

चिकित्सा

सूक्त ४४ मध्यें रक्तस्रावावर औषधि, सूक्त ५९ मध्यें अरुंधती औषधींचे उल्लेख आले आहेत. तसेंच सूक्त १,१३६,१३७ मध्यें केशवर्धनाचा महत्त्वाचा विषय आला आहे. सौंदर्यवर्धनाच्या दृष्टीनें हा विषय फार महत्त्वाचा आहे. १४० व्या सूक्तांत दातांची पीडा वर्णिली आहे. चिकित्सेच्या योगें रोगनिवृत्ति करून मृत्यूस सुद्धां दूर करतां येतें, हें सूक्त ४५-४६ यांत सांगितलें आहे.

कुटुंबाचें सुख

गृहस्थाश्रम हा इतर आश्रमांचा आधार आहे. या आश्रमाची सुरुवात ब्रह्मचर्यसमाप्तीनंतर होते. वरासाठीं कन्या आणि '**कन्येसाठीं वर**' शोधण्याचा विषय सूक्त ८२ मध्यें दिला आहे. हा '**गृहस्थाश्रम अत्यंत पवित्र**' आहे ही गोष्ट १२२ मध्यें दाखविली आहे. **विवाह** विषय ६० व्या सूक्तांत आहे. दंपती म्हणजे विवाहित स्त्रीपुरुषांनीं-पतिपत्नींनीं सुमेळानें रहावें-संसार करावा, 'परस्पर प्रेमानें रहावें' हें सूक्त ८-९ मध्यें भारपूर्वक सांगितलें आहे.

लग्न होतांच तरुण पुरुषानें नूतन पत्नीप्राप्तीमुळें स्वतःच्या मातापित्यांस विसरूं नये म्हणूनच सू. १२० मध्यें 'मातापित्यांची सेवा करा' हा विषय आला आहे. ऋण करून सण करण्याच्या संवईनें गृहस्थाश्रम-संसार दुःखमय होतो त्यासाठीं ऋणरहित होण्याचा उपदेश सू. ११७ ते ११९ या तीन सूक्तांत अत्यंत युक्तिपूर्वक दिला आहे. त्यानंतर क्रमप्राप्त विषय **वाजीकरण** (सू ७२), **गर्भधारणा-पुंसवन** (सू. १७), **स्त्रीपुरुष-वृद्धि** (सू. ७८) नूतन जन्मलेलें बालक (सू. ११०) असे आले आहेत. या क्रमानें वाचकांनीं या सूक्तांचा अभ्यास करावा म्हणजे त्यापासून अधिक लाभ होईल. इतकें वर्णिल्यावरहि कामविषयक संयम पाळण्याचा उपदेश सू. १३२ त विशेष सावधगिरीच्या सूचनांसह दिला आहे. गृहस्थाश्रमांत राहून सुद्धां कामविषयक संयम आवश्यक आहे. गृहस्थाचें घर कसें असावें याचें वर्णन सूक्त १०६ मध्यें वाचकांनीं अवश्य पहावें. हें सूक्त कोणाहि गृहस्थास मार्गदर्शक होईल. स्वतःच्या परिस्थितीप्रमाणें स्वतःच्या घराची शोभा जितकी वाढवतां येईल तितकी वाढविली पाहिजे, असा उपदेश वेद या सूक्तद्वारा देत आहे.

गृहस्थानें 'गाईची सुधारणा, गाईस ओळखण्यासाठीं चिन्हें करणें' (सू. ७०) याविषयीं उपदेश आहे.


परस्पर मित्रता

परस्पर मित्रतेचा उपदेश सू. ३६,३८,८९ आणि १०२ या सूक्तांत नूतन पतिपत्नींना केला आहे. सामान्यतः सर्व लोकांनीं एकविचारें रहावें असा उपदेश ७३-७४ या सूक्तांत आहे.

अन्नाची विपुलता

सूक्त ७१, ११६ आणि १४२ यांमध्यें अन्नाच्या विपुलतेनें सर्व लोकांचें कल्याण होतें असें वर्णिलें आहे.

याप्रकारें प्रस्तुत पुस्तकांत आलेल्या कांड ६ मधील सूक्तांचे विषय आहेत. तथापि कित्येक सूक्तें संदिग्ध, क्लिष्ट आणि न समजण्यासारखीं आहेत. त्यामुळें बरींच सूक्तें पुनः पुनः विचार करण्यासारखीं आहेत. वाचक विशेष प्रयत्न करतील तर प्रयत्नांनीं तीं त्यांस सुबोध होऊन लाभदायी होतील.



अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद [भाग तिसरा]

' गृ ह स्था श्र म '

सुभाषितें

दंपतीचीं- वरवधूंचीं कर्तव्यें (कां. ६ सू. १२२)

१. दम्पती ! अनु आरभेथां, अनुसंरभेथां, तस्य गुप्तये श्रयेथाम् (३)- हे स्त्रीपुरुष हो ! अनुकूलतेनें शुभकार्याची सुरवात करा. अनुकूलतेनें बचत करा, आणि बचतीच्या रक्षणासाठीं परस्परांचा आश्रय करा.

कन्या दान

१. इमाः यज्ञियाः शुद्धाः पूता योषितः ब्रह्मणां हस्तेषु प्रपृथक् सादयामि (५)- या पूज्य पवित्र स्त्रियांना ज्ञान्यांच्या हातांत निरनिराळ्या सोंपवून देतों.

(कां १ सू. १४)

१. वृक्षात् अधिस्रजं इव अस्याः भगं वर्चः आदिषि (१)- वृक्षावरून माळा करण्यासाठीं फुलें काढावींत त्याप्रमाणें कन्येजवळून भाग्य आणि तेज मीं मिळवितों.

२. पितृषु ज्योक् आस्तां (१)- मातापित्यांच्या घरीं दीर्घकाल ती राहो. **आ शीर्ष्णः समोप्यात्** (३)- मस्तक शृंगारण्याच्या समयापर्यंत.

(कां. २ सू. ३६)

१. अस्यै पत्या सौभगं अस्तु (१)- तिला पतीसह सौभाग्य प्राप्त होवो.

२. वरेषु जुष्टा समनेषु वल्गु (१)- ती वडिल मनुष्यांत प्रिय आणि उत्तम मन असणाऱ्यांमध्यें मनोरम होवो.

३. इयं नारी पतिं विदेष्ट (३)- ही स्त्री पति प्राप्त करो.

४. सोमः राजा सुभगां कृणोति (३)- सोमराजा तिला भाग्यशाली करो.

५. पुत्रान् सुवाना महिषी भवाति (३)- पुत्रांना जन्म देऊन ती घरची राणी होवो.

६. सुभगा पतिं गत्वा विराजतु (३)- सौभाग्यवती होऊन पतीजवळ जाऊन विराजो.

७. पत्या अविराधयन्ती भगस्य जुष्टा इयं नारी संप्रिया अस्तु (४)- पतीशीं विरोध न करतां ती भाग्यशाली स्त्री पतीला प्रिय होवो.

८. भगस्य नावं आरोह तया उपप्रतारय, यः वरः प्रतिकाम्यः (५)- ऐश्वर्यरूप होडीवर चढ आणि तुझ्यायोग्य अशा वराजवळ जा.

(कां. ६ सू. ६०)

१. धाता अस्यै अग्रुवै प्रतिकाम्यं पतिं दधातु (३)- सर्वांस आधार देणारा देव या कन्येसाठीं इच्छा करणारा पति देवो.

(कां. १४ सू. १)

१. सविता मनसा शंसन्तीं सूर्यां पत्ये अददात् (९)- सवित्यानें मनापासून आवडणारी स्वतःची कन्या पतीला दिली.

२. इतः बन्धनात् प्रमुञ्चामि न अमुतः (१७) **इतः प्रमुञ्चामि न अमुतः सुबद्धां करम्** (१८)- पित्याच्या घरून तुला मुक्त करतों पण पतीच्या कुलाशीं असा मजबूत बांधतों कीं तेथून कधींच सुटूं नये.

३. ऋतस्य योनौ सुकृतस्य लोके स्योनम् (१९)- सत्याच्या स्थानांत आणि पुण्यवानांच्या लोकांत जें सुख प्राप्त होऊं शकतें तें तिला पतिगृहीं प्राप्त होवो.

४. गृहान् गच्छ, गृहपत्नी यथासो वशिनी त्वम्

(२०)- पतिगृहीं ही नववधू जाऊन तेथें सर्वांस वश करणारी होऊन राहो.

५. अथ जिर्विः विदथं आवदासि (२१)- या प्रमाणें अनेक वर्षेपर्यंत जिवंत राहून गृहस्थाश्रम चालवल्या-नंतर तुझे अनुभव उपदेशरूपानें दुसऱ्यांस दे.

६. इह ते प्रजायै प्रियं समृध्यतां (२१)- या घरांत तुझ्या संततीसाठीं प्रियतेची समृद्धि होवो.

७. अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि (२१)- या घरांत गृहस्थधर्माचें पालन करण्यासाठीं जागृत रहा

८. एना पत्या तन्वं संस्पृशस्व (२१)- या पती-च्या शरीराला स्वतःच्या शरीराचा स्पर्श कर.

९. इह एव स्तं, मा वि यौष्टं (२२)- येथेंच रहा, कधींहि एकमेकांपासून दूर होऊं नका.

१०. पुत्रैः नप्तृभिः क्रीडन्तौ, मोदमानौ स्वस्तकौ विश्वं आयुः व्यश्नुतं (२२)- पुत्र आणि नातवंडें. नाचत-खेळत आनंदित होऊन घरदार युक्त होऊन पूर्ण जीवन येथें एकत्र घालवोत.

११. शामुल्यं परा देहि (२५)- उत्तम वस्त्रांचें दान कर.

१२. ब्रह्मभ्यः वसु विभज (२५)- ब्राह्मणांस धनाचें दान कर.

१३. युवं ऋत- उद्येषु ऋतं वदन्तौ (३१)- तुम्हीं उभयतां (पतिपत्नी) सत्य व्यवहाराचें आचरण ठेवा आणि सत्य बोला.

१४. समृद्धं भगं संभरतं (३१)- समृद्धियुक्त भाग्य तुम्हांस प्राप्त होवो.

१५. संभलः एतां चारु वाचं वदतु (३१)- पति पत्नीशीं सुंदर आणि मधुर भाषण करो.

१६. पन्थानः अनृक्षराः ऋजवः सन्तु (३४)- मार्ग कांट्याविरहित सरळ असोत.

१७. धाता भगेन वर्चसा सं सृजातु (३४)- परमेश्वर तिला भाग्य आणि तेजानें संयुक्त करो.

१८. वर्चसा इमां अवतं (३५)- तेजानें या स्त्रीचें संरक्षण करो.

१९. भद्रः रोचनः तं उदचामि (३८)- जें कल्याण मय आणि तेजस्वी आहे तें मीं माझ्याजवळ आणतों.

२०. अवीरघ्नीः आपः उदजन्तु (३९)- पुत्रांचा नाश न करणारें जल तिला मिळत राहो.

२१. हिरण्यं शं आपः शं सन्तु (४०)- सुवर्ण त्याला कल्याण करणारें होवो, आणि जल सुद्धां सुखदायक होवो.

२२. सौमनसं प्रजां सौभाग्यं रयिं आशासाना पत्युः अनुव्रता भूत्वा अमृताय कं सं नह्यस्व (४२)- उत्तम मन, संतति, सौभाग्य आणि धनाची इच्छा करणारी तूं पतीला अनुकूल आचरण करणारी होऊन अमृतत्व प्राप्तीसाठीं सुखपूर्वक सिद्ध हो.

२३. त्वं पत्युः अस्तं परेत्य सम्राज्ञी एधि (४३)- तूं पतीच्या घरीं जाऊन तेथें सम्राज्ञी होऊन रहा.

२४. श्वशुरेषु देवृषु ननान्दुः उत श्वश्र्वाः सम्राज्ञी एधि (४४)- सासरा, दीर, नणंद, सासु या सर्वांची सम्राज्ञी होऊन रहा.

२५. याः देवीः अकृन्तन् याः च अवयन् याः च तत्निरे याः च अन्तान् अभितः अददन्त ताः त्वा जर-से सं व्ययन्तु, आयुष्मती इदं वासः परिधत्स्व (मं. ४५)- ज्या देवींनीं स्वतः सूत कांतलें आहे, ज्यांनीं विणलें आहे, ज्यांनीं ताणे ताणले आहेत, ज्यांनीं कांठ सारखे केलें आहेत, त्या तुला वृद्धावस्थेपर्यंत वस्त्रें मिळावींत म्हणून विणत राहोत. तूं दीर्घ जीवन घालवीत हीं वस्त्रें धारण कर.

२६. सविता ते आयुः दीर्घं कृणोतु (४७)- सविता तुझें जीवन दीर्घ करो.

२७. ते हस्तं गृह्णामि, मा व्यथिष्ठाः मया सह प्रजया धनेन च । (मं. ४८)- तुझा हस्त मीं ग्रहण करतों. दुःख करूं नकोस. माझ्यासह प्रजा आणि धनानें युक्त होऊन रहा.

२८. सोमः राजा सुप्रजसं कृणोतु (४९)- सोम-राजा उत्तम संतानयुक्त करो.

२९. जातवेदाः अग्निः पत्ये सुभगां पत्नीं जरदष्टिं कृणोतु (४९)- जातवेद अग्नि पतीसाठीं या स्त्रीला वृद्धा-वस्थेपर्यंत जिवंत ठेवो.

३०. ते हस्तं सौभगत्वाय गृह्णामि । (मं. ५०)- तुझा हात सौभाग्यासाठीं स्वीकारतों.

३१. मया पत्या जरदष्टिः असः (५०)- मला पति म्हणून स्वीकारून माझ्यासह तूं वृद्धावस्थेपर्यंत जिवंत रहा.

३२. त्वा मह्यं गार्हपत्याय अदुः (५०)- तुला मला गृहस्थाश्रम चालविण्यासाठीं दिली आहे.

३३. त्वं धर्मणा पत्नी असि (५१)- तूं धर्मानें माझी पत्नी झाली आहेस.

३४. अहं तव गृहपतिः (५१)- मी तुझ्या घराचा स्वामी आहे.

३५. इयं मम पोष्या अस्तु (५२)- ही माझ्याकडून पोषण करण्यास योग्य आहे.

३६. बृहस्पतिः त्वा मह्यं अदात् (५२)- बृहस्पतीनें तुला मला दिली आहे.

३७. हे प्रजावति! मया पत्या शरदः शतं संजीव (५२)- हे प्रजेनें युक्त स्त्रिये! मज पतीसह शंभर वर्षे उत्तमप्रकारें जिवंत रहा.

३८. इमां नारीं प्रजया वर्धयन्तु (मं. ५४)- या स्त्रीला प्रजेनें संवर्धित करा.

३९. इमां नारीं पत्ये संशोभयामसि (५५)- या स्त्रीला पतीसाठीं उत्तमप्रकारें शृंगारण्यांत यावें.

४०. अस्याः रूपं मयि (५७)- तिचें रूप फक्त माझ्यासाठींच आहे.

४१. न स्तेयं अद्मि (५७)- मीं चोरीचें अन्न खात नाहीं.

४२. स्वयं पाशान् श्रथ्नानः मनसा उद् अमुच्ये (मं. ५७) मीं स्वतः बंधनें तोडून मनानें मुक्त होतों.

४३. अत्र उरुं लोकं सुगं पन्थां कृणोमि (५८)- येथें विस्तृत कार्यक्षेत्र आणि सुगम-जाण्यास योग्य मार्ग तयार करतों.

४४. उद्यच्छध्वं रक्षः अप हनाथ (५९)- शस्त्रें वर उचलून राक्षसांना मारा.

४५. इमां नारीं सुकृते दधात (५९)- या स्त्रीचा पुण्यकर्मासाठीं स्वीकार करावा.

४६. सा नः सुमंगली अस्तु (६०)- ती आमचें कल्याण करणारी होवो.

४७. सुकिंशुकं विश्वरूपं हिरण्यवर्णं सुवृतं सुचक्रं वहतुं आरोह (६१)- उत्तम सुंदर फुलांनीं शृंगारलेल्या, सोन्याप्रमाणें चमकणाऱ्या, उत्तम वेष्टनांनीं सजविलेल्या बैठकी ज्यांत आहेत, आणि उत्तम चक्रांनीं युक्त जो आहे, अशा रथांत बस.

४८. अभ्रातृघ्नीं अपतिघ्नीं अपशुघ्नीं पुत्रिणीं अस्मभ्यं वह (६२)- भावांचा नाश न करणारी, पतीला कष्ट न देणारी, जनावरांना कष्ट न देणारी, पुत्रांस जन्म देणारी स्त्री आम्हांस प्राप्त होवो.

४९. देव्याः शालायाः द्वारं वधूपथं स्योनं कृणमः (६३)- गृहरूपी देवतांच्या द्वारीं वधूचा मार्ग सुखमय करतों.

५०. पतिलोके शिवा स्योना विराज (६४)- आपल्या पतीच्या घरीं कल्याणकारक व सुख देणारी होऊन रहा.

(कां. १४।२)

१. सः नः पतिभ्यः प्रजयासह जायां दाः (१)- असा तूं आम्हां सर्व पतींस प्रजेसह पत्नी मिळेल असें कर.

२. आयुषा वर्चसा पत्नीं अग्निः अदात् (२)- जीवन आणि तेजासह पत्नी अग्नीनें दिली आहे.

३. अस्याः पतिः दीर्घायुः शरदः शतं जीवाति (२)- हिचा पति दीर्घायु होऊन शंभर वर्षें जिवंत राहो.

४. सा मन्दसाना शिवेन मनसा सर्ववीरं वचस्यं रयिं धेहि (६)- आनंदानें रहाणारी ती स्त्री शुभ विचारयुक्त मनानें सर्व वीरपुत्रांसह रहाते. ती प्रशंसनीय असें धन आम्हांस देवो.

५. पथिष्ठां स्थाणुं दुर्मतिं हतं (६)- मार्गांत रहाणाऱ्या आणि प्रतिबंध करणाऱ्या दुष्टांना मार.

६. प्रजावतीं त्वा पत्ये रक्षसः रक्षन्तु (७)- संतान उत्पन्न करणाऱ्या तुला (स्त्रिला) पतीसाठीं राक्षसांपासून सुरक्षित ठेवो.

७. इमं सुगं स्वस्तिवाहनं पंथां आरुक्षाम (८)- या सुगम कल्याण करणाऱ्या रस्त्यावर आम्हीं आरोहण करून चालूं.

८. यस्मिन् वीरः न रिष्याति अन्येषां वसु विन्दते (८)- ज्यांत पुत्र मरत नाहींत आणि इतरापेक्षां धन जास्त मिळतें.

९. सुगेन दुर्गं अतीतां (११)- सहजरीतीनें संकटें तरून जा.

१०. अरातयः अपद्रान्तु (११)-शत्रु दूर पळून जावो.

११. सविता पतिभ्यः स्योनं कृणोतु (१२)- ईश्वर पतीसाठीं सुखदायक करो.

१२. भगस्य सुमतौ असत् (१५)- भाग्य देवाच्या सन्मतींत राहो.

१३ अशुनं मा आरतां (१६)- अशुभाप्रत प्राप्त न व्हावें.

१४. गृहेभ्यः अघोरचक्षुः अपतिघ्नी स्योना, शग्मा सुशेवा, सुयमा वीरसूः देवृकामा सुमनस्यमाना त्वया एधिषीमहि (१७)- ही स्त्री पतीच्या घरीं येऊन आनंदानें राहो. क्रोध न करो, पतीला हितकारक होऊन राहो, धर्मनियमांचें पालन करो. सर्वांस सुख देवो, स्वतःच्या संततीस वीरश्रीचें शिक्षण देवो. दिरांस संतुष्ट राखो, अंतःकरणांत शुभ

भाव ठेवो. अशा स्त्रीमुळें आमचें घर सुसंपन्न होवो.

१५. **अदेवृघ्नी, अपतिघ्नी पशुभ्यः शिवा सुयमा सुवर्चाः प्रजावती वीरसूः देवृकामा स्योना इमं गार्हपत्यं अग्निं सपर्य** (१८)- दिराचा नाश न करणारी, पतीचा घात न करणारी, जनावरांचें यथायोग्य पालन करणारी, उत्तम नियमांनीं चालणारी, तेजस्वी, वीरपुत्र संतानयुक्त, दीर-पतीच्या घरीं राहो. असें इच्छिणारी अशी सुखदायिनी तूं गार्ह-पत्य अग्नीची पूजा कर.

१६. **अस्यै नार्यै उपस्तरे पतत् शर्म वर्म** (२१)- या स्त्रीला सुख आणि संरक्षण हंतरण्या-पांघरण्यास होवो.

१७. **भगस्य सुमतौ असत्** (२१)- परमेश्वराच्या सन्मतींत राहो.

१८. **एषः देवः सर्वाः रक्षांसि हन्ति** (२४)- हा देव सर्व राक्षसांचा नाश करतो.

१९. **सुमंगली संपत्नी इमं अग्निं उपसीद** (२५)- उत्तम मंगल कामना करणारी आणि उत्तम पतीसह ही स्त्री अग्नीची उपासना करो.

२०. **सुमंगली गृहाणां प्रतरणी, पत्ये सुशेवा श्वशुराय शंभूः श्वश्वै स्योना इमान् गृहान् प्रविश** (२६)- उत्तम मंगल आभूषणें धारण करणारी, घरांतील दुःखें दूर करणारी, पतीची चांगल्याप्रकारें सेवा करणारी, सासऱ्यास सुख देणारी, सासूस आनंद देणारी अशी स्त्री या घरांत प्रवेश करो.

२१. **श्वशुरेभ्यः स्योना, पत्ये गृहेभ्यः स्योना अस्यै सर्वस्यै विशे स्योना, एषां पुष्टाय भव** (२७)- सासरा, पति आणि कुटुंबांतील सर्वांना हितकारिणी या सर्व प्रजासमूहाला सुखदायिनी, सुख देणारी होऊन त्या सर्वांची पुष्टि कर.

२२. **इयं सुमंगली वधूः दौर्भाग्यैः विपरेतन** (२८)- या मंगलयुक्त वधूच्या दुष्ट भाग्यास दूर करून तुम्हीं परत जावें.

२३. **सूर्या सावित्री बृहते सौभगाय आरोहत्** (३०)- सूर्यासावित्री महान् सौभाग्यासाठीं उन्नत झाली आहे.

२४. **ज्योतिः अग्राः उषसः बुध्यमाना** (३१)- जिच्यानंतर सूर्याची ज्योति यावयाची आहे ती उषा येण्यापूर्वी जागृत व्हावें.

२५. **वयं राया सुमनसः स्याम** (३६)- आम्हीं धनासह उत्तम मनानें युक्त व्हावें.

२६. **सविता वां दीर्घं आयुः कृणोतु** (३९)- सविता तुमचें दोघांचें जीवन दीर्घ करो,

२७. **नः द्विपदे चतुष्पदे शं भव** (४०)- आमचे कुटुंबीजन, नोकरवर्ग आणि जनावरें यांसाठीं कल्याणकारक हो.

२८. **यत् पत्नीभिः उतं वासः तत् नः स्योनं उप-स्पृशात्** (५१)- जें वस्त्र आमच्या स्त्रीनें विणलें आहे तें आम्हांस सुखस्पर्शी होवो.

२९. **मे पतिः दीर्घायुः अस्तु शरदः शतं जीवाति** (६३)- माझा पति दीर्घायु होवो आणि शंभर वर्षे जगो.

३०. **शीर्षण्यं मलं अप अप लिखात्** (६८)- डोक्यांतील मळ दूर करा.

३१. **अरिष्टासु बृहते वाजसातये सचेवहि** (७२)- प्राण आहेत तो पावेतों आपण दोघे महान् बलप्राप्तीसाठीं बरो-बर राहूं.

(कां. २।३०)

१. **मां कामिनी असः यथा मत् अप-गाः न असः** (१)- पत्नी पतीची इच्छा करणारी असावी. त्याच्यापासून तिनें दूर जाऊं नये.

२. **यत् अंतरं तत् बाह्यं, यत् बाह्यं तत् अंतरं** (४)- जें आंत तेंच बाहेर, जें बाहेर तेंच आंत अशी सरळ वागणूक असावी.

३. **विश्वरूपाणां कन्यानां मनः गृभाय** (४)- विविधरूपीं कन्यांचीं मनें या प्रकारें आकर्षित करावीत.

(कां. ६।८)

१. **यथा वृक्षं लिबुजा समन्तं परिषस्वजे एवा परिष्वजस्व मां यथा मां कामिनी असः यथा मत्-अपगा असः** (१)- ज्याप्रमाणें वेल वृक्षाला वेटाळून रहाते, हे स्त्रिये ! त्याप्रमाणें तूं माझ्या आश्रयानें रहा, माझी इच्छा करणारी हो आणि माझ्यापासून दूर जाणारी होऊं नकोस.

२. **यथा इमे द्यावापृथिवी सूर्यः सद्यः पर्येति** (३)- ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश द्युलोक आणि पृथ्वी यांच्यामध्यें पसरतो.

(कां. ७।३६)

१. **हृदि मां अंतः कृणुष्व मनः सह असति** (१)- पतिपत्नींचीं अंतःकरणें एक दुसऱ्याशीं अशीं मिळालीं पाहिजेत की जणूं काय एकच मन दोन्हींत कार्य करीत आहे.

(कां. ६।८९)

१. **ते सध्र्यङ् मनः मां एव अन्वेतु** (२)- तुझें मन मलाच अनुकूल होऊन राहो.

(कां. १०।३)

१. देवाः वरणेन असुराणां अभ्याचारं अवारयन्त (२)- देवांनीं वरणमणीच्या सहाय्यानें राक्षसांची पीड दूर केली.

२. एवा मे वरणोमणिः तेजसा समुक्षतु यशसा सा समनक्तु (२५)- याप्रकारें तो वरणमणि कीर्ति आणि तेज मला देवो. तेजानें युक्त आणि कीर्तीनें युक्त करो.

(कां. ७।३७)

१. यथा केवलः मम असः अन्यासां न च न कीर्तयाः (१)- तूं केवळ माझाच पति होऊन रहा. दुसऱ्या स्त्रीचें नांवहि घेऊं नको.

२. मम मनुजातेन वाससा त्वा अभि दधामि (१)- माझ्या विचारांसह विणलेल्या वस्त्रानें मीं तुला बांधून ठेवतें.

(कां. १।१८)

१. या भद्रा तानि नः प्रजायै (१)- जीं चांगलीं लक्षणें आहेत तीं सर्व आमच्या संततीस प्राप्त होवोत.

२. सर्वं तद्वाचाप हन्मो वयं (३)- तीं सर्व कुलक्षणें आम्हीं वाणीनें दूर करतों.

३. देवस्त्वा सविता सूदयतु (३)- सविता देव तुम्हांस सुलक्षणी करो.

(कां. ६।१३९)

१. समानं हृदयं कृधि (३)- आमचीं मनें एकसारखीं असोत-होवोत.

(कां. ७।१६)

१. विश्वे देवाः एनं अनु मदन्तु (१)- सर्व देवता त्यांना अनुमोदन देवोत.

(कां. ६।१३६)

१. देवी देव्यामधि जाता पृथिव्यामस्योषधे। तां त्वा नितत्नि केशेभ्यो दृंहणाय खनामसि (१)- हे औषधि! तूं दिव्य गुणांनीं युक्त पृथ्वीवर उगवतेस, हे जमिनीं-खालीं पसरणाऱ्या औषधे! केंसास बळवान् करण्यास आणि सुदृढ करण्यासाठीं मीं तुला खोदून काढतों.

(कां. ६।१३७)

१. केशाः नडाः इव वर्धन्तां शीर्ष्णः ते असिताः परि। (२-३)- तुझ्या मस्तकावर केंस ज्याप्रमाणें गवत वाढतें तसे उगवोत, ते कधीं पांढरे न होवोत, काळेच राहोत.

(कां. ६।७९)

१. प्रथमं शर्म यच्छ (१)- प्रथम सुख दे.

(कां. ६।७८)

१. राष्ट्रेण अभिवर्धतां सहस्रवर्चसा रय्या पयसा अभिवर्धतां (२)- सहस्र तेजयुक्त धन आणि दूध तूप वगैरे पुष्टियुक्त पदार्थांनीं आमचें राष्ट्र वाढो.

(कां. ७।३५)

१. इदं राष्ट्रं सौभगाय पिपृहि (१)- या राष्ट्राला सुख, समृद्धि आणि ऐश्वर्य यांनीं भरून टाक.

२. प्रजा मा अभिभूत् (३)- संतति माता-पितरांचा कधीं तिरस्कार न करो.

(कां. ४।३८)

१. सूर्यस्य रश्मीन् अनु याः सञ्चरन्ति। मरीचिर्वा या अनुसञ्चरन्ति (५)- सूर्य किरणांमध्यें -प्रकाश आणि ताप- अनुकूलतेनें ती हिंडो फिरो.

२. कर्कीं वत्सां इह रक्ष वाजिन् (६)- कर्तृत्वशक्ति युक्त अशा पुत्रीचें तूं या जगांत रक्षण कर.

(कां. ५।१७)

१. ब्राह्मणस्य अपनीता जाया भीमा (६)- ब्राह्मणाच्या पत्नीस पळवून नेणें हें महाभयंकर पापकर्म आहे.

(कां. ९।२)

१. सपत्नहनं ऋषभं कामं हविषा शिक्षामि (१)- शत्रूचा नाश करणाऱ्या कामाला मीं यज्ञद्वारां शिक्षित करतों.

२. दुरितं अप्रजस्तां अस्वगतां अवर्तिं मुञ्च (३)- पाप, संतान न होणें, निर्धनता आणि विपत्ति यांस दूर कर.

३. सा धेनुः दुहिता उच्यते या कवयो वाचं आहुः (५)- गाय कन्येसमान आहे, तिचें कवि वर्णन करतात.

४. सर्वे देवाः मम इयं हवं आयन्तु (७)- सर्व देव माझ्या हवनांत येवोत.

५. उग्रः वाजी कामः मम अध्यक्षः मह्यं असपत्नं कृणोतु (७)- प्रतापी बळवान् काम माझा अध्यक्ष आहे. तो मला शत्रूंपासून मुक्त करो.

६. मह्यं असपत्नं एव कृण्वन्तः (८)- मला शत्रु-रहित करा.

७. अवधीत्कामो मम ये सपत्नाः। उरुं लोकमकरन् मह्यमेधतुम्। मह्यं नमन्तां प्रदिशश्चतस्रो

मह्यं षडुर्वीर्घृतमा वहन्तु (११)- संकल्प शत्रूंचा नाश करतो, संकल्प वृद्धि करण्यासाठीं कार्यक्षेत्र आहे. संकल्पामुळें चारी दिशा मनुष्यासमोर नम्र होतात. संकल्पानें सर्व भूप्रदेशांतील तूप वगैरे उपभोगाचे पदार्थ मिळतात.

८. यत्ते काम शर्म त्रिवरूथमुद्भु ब्रह्म वर्म विततं अनतिव्याध्यं कृतम् (१६)- या कामाचें विलक्षण कवच जें तीनहि केंद्रांत रक्षण करतें, त्यामुळें शत्रूचे प्रहार लागत नाहींत. त्यालाच ज्ञानकवच म्हणतात.

९. कामो जज्ञे प्रथमो नैनं देवा आपुः पितरो न मर्त्याः ततस्त्वमसि ज्यायान् विश्वहा महान् (१९)- सर्वांपूर्वी काम उत्पन्न झाला, म्हणून त्याला देव, पितर अथवा मनुष्यें प्राप्त करूं शकलीं नाहींत; म्हणून काम सर्वांपेक्षां श्रेष्ठ आणि समर्थ आहे.

१०. यास्ते शिवास्तन्वः काम भद्रा याभिः सत्यं भवति यद्वृणीषे । ताभिष्ट्वमस्माँ अभि संविश स्वान्यत्र पापीरप वेशया धियः (२५)-कामांत शुभ आणि कल्याणकारक भाग आहे, ज्यामुळें सर्व सत्याची सिद्धि होते; तो शुभ भाग मला प्राप्त होवो आणि पापाचा भाग आहे तो दूर होवो.

(कां. ३।२१)

१. यो देवो विश्वाद् यं उ काम आहुः (४)- जो अग्निदेव सर्व जगास जाळणारा आहे आणि ज्याला ' काम ' नांवानें ओळखण्यांत येते.

२. शान्तो अग्निः क्रव्याच्छान्तः पुरुषरेषणः अथो यो विश्वदाव्यस्तं क्रव्यादमशीशमम् (९)- हा मांसभक्षक कामरूप अग्नि शांत झाला, हा मनुष्याचा नाश करणारा कामरूप अग्नि शांत झाला. हा सर्वांना जाळणारा अग्नि आहे त्याला मीं शांत केला.

(कां. ३।२५)

१. मृदुः निमन्युः केवली प्रियवादिनी अनुव्रता अक्रतुं चित्तं उपायसि क्रतौ असः । (४।६)- धर्मपत्नी शांत, क्रोध न करणारी, केवळ पतीचीच, मधुर बोलणारी, पतीला मदत करणारी, कांहीं त्याच्याविरुद्ध कर्म न करणारी, पतीमध्येंच जिचें मन ओतप्रोत झालें आहे अशी असावी.

(कां. ३।२३)

१. आ वीरो जायतां पुत्रस्ते दशमास्यः (२)- तुझा पुत्र दहाव्या महिन्यांत जन्मो आणि वीर होवो.

२. विन्दस्व पुत्रं नारि यः तुभ्यं शं असत् शं उ तस्मै त्वं भव (५)- हे स्त्रिये ! याप्रकारें तूं पुत्रास प्राप्त कर. तो पुत्र तुला सुखदायक होवो आणि तूं सुद्धां त्या पुत्राला सुख दे.

(कां. ८।६)

१. सूर्यः तान् (रोगबीजानि) अनीनशत् (८)- जीं रोगबीजें आहेत त्यांचा सूर्य नाश करतो.

२. ये सूर्यं न तितिक्षन्ते (तान्) नाशयामसि (१२)- जे सूर्यप्रकाश सहन करूं शकत नाहींत त्यांचा मी नाश करतों.

३. तं पिंगः हृदयाविधं कृणोतु (१८)- त्यांचा पिंगलवर्ण सूर्य हृदयांत वेध करो.

४. पिंगः जायमानं रक्ष (२५)- हे पिंगलवर्णा सूर्या ! जन्मणाऱ्या बालकाचें रक्षण कर.

(कां. ६।११)

१. शमीं अश्वत्थ आरूढः तत्र पुंसवनं कृतम् । तद् वै पुत्रस्य वेदनं ॥ (१)- शमीवृक्षावर जेथें पिंपळ उगवतो तेथेंच पुत्रप्राप्तीचें औषध असतें. पुत्रप्राप्तीचें हें उत्तम साधन आहे.

२. स्त्रैषूयमन्यत्र दधत् पुमांसं उ दधत् इह (३)- स्त्री (कन्या) उत्पन्न होण्याचें कार्य दुसऱ्या घरीं होवो, येथें या घरांत पुत्रजन्मच होवो.

(कां. ६।११०)

१. (अग्ने) विश्वा दुरितानि एनं अति नेषत् (२) हे अग्ने ! तूं सर्व दुःखांतून त्याचें (माझें) रक्षण कर.

२. नक्षत्र-जा जायमानः सुवीरः स वर्धमानः पितरं मा वधीत् जनित्रीं मातरं च मा प्रमिनीत् (३)- योग्य नक्षत्रावर जन्मलेला हा बालक उत्तम वीर होवो आणि मातेला पित्याला दुःख न देवो, न मारो.

(कां. ७।८१)

१. एतौ शिशू क्रीडन्तौ मायया पूर्वापरं चरतः अर्णवं परियातः अन्यः विश्वभुवनानि विचष्टे अन्यः ऋतून् विदधत् नवः जायसे (१)- हीं दोन बालकें (सूर्य आणि चंद्र) खेळतां खेळतां स्वतःच्या शक्तीनें समुद्रापर्यंत पोहोंचतात. त्यांतील एक सर्व भुवनांना प्रकाशित करतो, आणि दुसरा ऋतूंना निर्माण करीत रोज नवा होतो.

२. जायमानः नवः नवः भवसि (२)- प्रगट होत

असतां तूं प्रत्येकवेळीं नवा वाटतोस.

३. अन्हां केतुः उषसां अग्रं एषि (२)- सूर्य, दिवस येत आहे अशी सूचना देणाऱ्या उषेनंतर प्रगट होतो.

४. चंद्रमः दीर्घ आयुः प्रतिरसे (२)- चंद्रमा दीर्घायु करतो.

५. मा प्रजया धनेन च अनूनं कृधि (३)- मला प्रजा आणि धनानें परिपूर्ण कर.

६. योऽस्मान् द्वेष्टि यं च वयं द्विष्मः तस्य प्राणेन आप्यायस्व (५)- जे दुष्ट आमचा द्वेष करतात आणि ज्यांचा आम्ही द्वेष करतों त्यांच्या प्राणानें तूं वाढ.

७. देवाः अंशुं आप्याययन्ति अक्षितः अक्षितं भक्षयन्ति (६)- देव सोमास वाढवतात आणि सोमाचें भक्षण करून अमर होतात.

(कां. ६।१३३)

१. यस्य प्रशिषा चरामः स पारं इच्छात् सः नः विमुञ्चात् (१)- ज्या गुरूच्या आशीर्वादानें आम्हीं कार्य करीत आहोंत ते आम्हांस दुःखांतून आणि बंधनांतून मुक्त करोत.

२. वीरघ्नी भव मेखले (२)- हे मेखले ! तूं शत्रूंना मारणारी हो.

३. अहं मृत्योः ब्रह्मचारी अस्मि। (३)- मीं स्वतःला मृत्यूला समर्पण केलें आहे असा मीं ब्रह्मचारी आहें.

४. भूतान् यमाय पुरुषं निर्याचन् (३)- जनतेंतून मृत्यूसाठीं एक पुरुषाची याचना करतों.

५. मेखलया ब्रह्मणा तपसा श्रमेण (३)- कंबरेला करगोटा बांधल्यानें ज्ञान, तप, म्हणजे शीतोष्ण सहन करण्याची शक्ति, परिश्रम करण्यासाठीं बळ मिळतें आणि दीर्घायुरवहि प्राप्त होतें.

६. यां त्वा पूर्वे भूतकृतः ऋषयः परि बेधिरे। सा त्वं परिष्वजस्व मां दीर्घायुत्वाय मेखले (५)- हे मेखले ! तुला भूतकाळीं पराक्रम करणाऱ्या ऋषींनीं बांधली होती, म्हणून तूं मला दीर्घायु करण्यासाठीं माझ्या शरीराला चिकटून रहा.

(कां. ६।१२०)

१. अयं गार्हपत्यः अग्निः तस्मात् इत् सुकृतस्य लोकं उन्नयाति (१)- हा आमचा गार्हपत्य-घरांत संभाळलेला अग्नि आम्हांस या पापांतून मुक्त करून पुण्यलोकांत पोहोंचवितो.

(कां. ७।१७)

१. ईशानः जगतः पतिः नः रयिं दधातु (१)- जगताचा स्वामी ईश्वर आम्हांस धन देवो.

२ तस्मै अमृतं सं व्ययन्तु (३)- त्याच्यासाठीं अमृताचें प्रदान करो.

(कां. ३।१२)

१. महते सौभगाय उच्छ्रयस्व (२)- महान् शुभ-मंगलाच्या प्राप्तीसाठीं हें घर उभें होवो.

२. धेनवः आस्पंदमानाः सायं आ (३)- संध्याकाळीं गाई नाचत येवोत.

३. इमां शालां सविता वायुरिन्द्रो बृहस्पतिर्निमिनोतु प्रजानन्। उक्षन्तूद्रा मरुतो घृतेन भगो नो राजा नि कृषिं तनोतु (४)- सूर्य, वायु, इंद्र, बृहस्पति या घराला मदत करोत. मरुत् नांवाचा पावसाळी वारा पाण्याची मदत करो आणि भगराजा शेतीच्या कामीं सहाय करो.

४. अस्मभ्यं सहवीरं रयिं दाः (५)- आम्हांस वीरतायुक्त धन द्या.

५. शरणा स्योना देवी (शाला) देवेभिर्निमिता असि अग्रे तृणं वसाना सुमनाः ॥ (५)- आंत आश्रय करण्यायोग्य सुखदायक गवताच्या छपराचें परंतु उत्तम विचारांनीं युक्त दिव्य घर प्रारंभीं देवांनीं तयार केलें.

६. (शाला) मानस्य पत्नी (५)- गृहस्थासाठीं शाला (स्वतःचें घर) हें सन्मानाचें ठिकाण आहे.

७. शतं जीवेम शरदः सर्ववीराः (६)- सर्व प्रकारचे वीर धर्माचें. रक्षण करण्यासाठीं तयार रहाणारे वीर होऊन शंभर वर्षें वांचोत.

८. पूर्णं नारि प्र भर कुम्भमेतं घृतस्य धाराममृतेन संभृताम्। इमां पातॄनमृतेना समङ्ग्धीष्टापूर्तमभि रक्षात्येनाम् ॥ (८)- गृहपत्नी अतिथीला वाढण्यासाठीं तुपाचा घडा आणो, भरपूर मधुररसानें भरलेला घडा आणो आणि पिणाऱ्यांना जितका प्यावयाचा असेल तितका पाजो. अशा प्रकारच्या अन्नदानानें घराचें रक्षण होतें.

९. अयक्ष्मा यक्ष्मनाशनीः आपः (९)- निरोगी आणि रोग दूर करणारे पाण्यानें भरलेले घडे घरांत ठेवण्यांत यावेत.

१०. गृहान् उप प्र सीदामि (९)- मीं माझी पराकाष्ठा करून घराचें प्रसन्न आणि रमणीय स्थान करीन.

(कां. ९।३)

१. शाले देवि ! त्वं देवानां सदः असि (७)- हे गृहरूपी देवते ! तूं देवतांचें स्थान आहेस.

२. मानस्य पत्नी उद्धिता (शाला) नः तन्वे शिवा भव । (६)- प्रमाणानें बांधलेलें उंच घर आमच्या शरीरास सुखदायक होवो.

३. यः त्वा प्रतिगृह्णाति येन त्वं मिता असि तौ जरदष्टी जीवतां (९)- घरांत रहाणारे आणि तें घर मापसर बांधणारे दोघेहि वृद्धावस्थेपर्यंत जिवंत राहोत.

४. परमेष्ठी प्रजापतिः त्वा प्रजायै चक्रे (११)- परमेष्ठी प्रजापतीनें तुला प्रजेसाठीं निर्माण केली आहे.

५. अग्निः ह्यन्तरापश्चर्तस्य प्रथमा द्वाः (२२)- घरांत अग्नि आणि जल अवश्य असावें, कारण कीं त्यांनीं सर्व प्रकारचे यज्ञ होतात.

६. अयक्ष्मा यक्ष्मनाशनीः आपः प्रभरामि । गृहान् उपप्रसीदामि ॥ (२३)- मी घरांत असें जल भरतों कीं जें स्वतः रोग उत्पन्न करणारें असणार नाहीं आणि जें रोगाचें निवारण करणारें असेल. याप्रकारें मीं घराची प्रसन्नता वाढवितों.

(कां. ६।१०६)

१. आयने परायणे पुष्पिणीः दूर्वाः रोहन्तु (१)- घराच्या मागेंपुढें आंगणांत फुलांचे ताटे फुलोत आणि दुर्वा वाढाव्यात.

२. तत्र वा उत्सः जायतां वा पुण्डरीकवान् ह्रदः (१)- तेथें पाण्याची एक टांकी अथवा कमळें फुललेला लहानसा तलाव असावा.

३. मुखाः पराचीना कृधि (२)- घराचीं दारें परस्पर विरुद्ध दिशेस असावींत.

(कां ७।६०)

१. अघोरेण मित्रियेण चक्षुषा सुमनाः वन्दमानः गृहान् एमि (१)- शांत आणि मित्राची दृष्टि धारण करून उत्तम मनानें युक्त होऊन श्रेष्ठ पुरुषांस नमन करून मीं घरांत प्रवेश करतों.

२. मयोभुवः ऊर्जस्वन्तः पयस्वन्तः वामेन पूर्णाः तिष्ठन्तः ते नः आयतः जानन्तु (२)- सुखदायक, बलदायक धान्य आणि दुधानें युक्त सुखानें हें घर परिपूर्ण आहे, असें येणाऱ्यांस वाटावें.

(कां ७।८२)

१. अस्मासु भद्रा द्रविणानि धत्त (१)-आमच्या ठिकाणीं कल्याणकारक धनास धारण करा.

२. नः इमं यज्ञं देवता नयत (१)- आमचा हा यज्ञ देवतांना पोहोंचवा.

३. अग्ने मयि क्षत्रेण वर्चसा सह अग्निं गृह्णामि (२)-प्रथम मीं माझ्यांत क्षात्र शौर्य, ज्ञानाचें तेज आणि बलासह रहाणाऱ्या अग्नीला ग्रहण करतों.

४. उपसत्ताः अनिघ्नतः वर्धतां (३)- तुझे सेवक अहिंसक होऊन वृद्धि पावोत.

(कां. ४।२१)

१. गावः भद्रं अक्रन् (१)- गावः भद्रं गृहं कृणुथ (६)- गाई घराला कल्याणाचें स्थान करोत.

२. गावः अस्मे रणयन् (१)- गाई आम्हांस रमणीय करोत.

३. तस्य यज्वनः मर्तस्य उरुगायं अभयं ता गावः अनुविचरन्ति (४)- याजक मनुष्याच्या फारच निर्भयतेंत गाई हिंडतात.

४. ता गावः संस्कृतत्रं न अभि उपयन्ति (४)- त्या गाई मांससंस्कार करणाऱ्याच्या जवळ कधींच जात नाहींत.

५. इमाः याः गावः स इन्द्रः (५)- ज्या गाई आहेत तोच इन्द्र आहे.

६. गावः यूयं कृशं चित् मेदयथ अश्रीरं चित् सुप्रतीकं कृणुथ (६)- निर्बलांना या गाई पुष्ट करतात, निस्तेजयाला तेजस्वी करतात.

७. गावः सूयवसे रुशन्तीः सुप्रपाणे शुद्धाः अपः पिबन्तीः (७)- गाई उत्तम गवत खावोत आणि उत्तम जलस्थानांत शुद्ध पाणी पिवोत. त्यामुळें गाईचें उत्तम पालन होतें.

(कां. १२।४)

१. ददामि इति ब्रूयात् (१)- मीं दान देतों असें यजमानानें म्हणावें.

२. तत् प्रजावत् अपत्यवत् (१)- तें दान प्रजा आणि संतान देणारें आहे.

३. जायमाना वशा स-ब्राह्मणान् देवान् अभिजायते (१०)- उत्पन्न होण्याबरोबरच गाय ब्राह्मणासह देवांसाठीं होते.

४. अथैनां देवाः अब्रुवन्नेवं ह विदुषो वशा (२२)-

गाईचें दान केवळ विद्वान् ब्राह्मणालाच द्यावें असें देवांनीं म्हटलें आहे.

५. **वशा राजन्यस्य माता** (३३)- गाय क्षत्रियांची माता आहे.

(कां. ५।१८)

१. **ते देवाः एतां तुभ्यं अत्तवे न अददुः** (१)- देवांनीं ही गाय तुला खाण्यास दिली नाहीं.

२. **ब्राह्मणस्य अनाद्यां गां मा जिघत्सः** (१)- ब्राह्मणाची गाय खाणें योग्य नाहीं.

(कां. १०।९)

१. **दात्रे आमिक्षां क्षीरं सर्पिः अथो मधु दुहृतां** (१३)- दात्याला येथें दही, दुध, तूप आणि मध देवो.

२. **होता अग्निः सुहुतं कृणोतु** (२६)- होता अग्नि उत्तम आहुतिरूप करो.

३. **वयं रयीणां पतयः स्याम** (२७)- आम्हीं सर्व धनाचे स्वामी व्हावें.

(कां. ९।४)

१. **साहस्रस्त्वेष ऋषभः पयस्वान्** (१)- हजारों शक्तींनीं युक्त असा हा बैल दूध देणारा आहे.

२. **वक्षणासु विश्वा रूपाणि बिभ्रत्** (१)- नदीच्या कांठीं हा बैल स्वतःचीं विविध रूपें धारण करतो.

३. **उस्रियः तंतुं आतान्** (१)- स्वतःच्या प्रजातंतूस पसरवितो.

४. **दात्रे भद्रं शिक्षन्** (१)- दात्याचें कल्याण करतो.

५. **अपां यो अग्रे प्रतिमा बभूव प्रभूः सर्वस्मै पृथिवीव देवी** (२)- बैलास उपमा केवळ मेघाची. तो सर्वांचा प्रभू आहे आणि पृथ्वीदेवीप्रमाणें सर्वांचा उपकारक आहे.

६. **साहस्रे पोषे अपि नः कृणोतु** (२)- हजारो प्रकारच्या पुष्टि तो आम्हांस देवो.

७. **सोमेन पूर्णं कलशं बिभर्षि** (६)- सोमरसानें भरलेला कलश धारण करतो.

८. **इन्द्रस्य रूपं वसानः** (७)- इंद्राच्या रूपास धारण करणारा आहे.

९. **आज्यं बिभर्ति घृतमस्य रेतः साहस्रः पोषस्तमु यज्ञमाहुः** (७)- तूप धारण करणारा, वीर्याचें स्थान आणि हजारों प्रकारची पुष्टि देणारा म्हटला जातो.

१०. **सहस्रं स एकमुखा ददाति यो ब्राह्मण ऋषभमाजुहोति** (९)- जो ब्राह्मणास बैल समर्पण करतो, तो अनेक रूपानें हजारों दानें करतो.

११. **जिन्वन्ति विश्वे तं देवाः यो ब्राह्मण ऋषभमाजुहोति** (१८)- जो ब्राह्मणास बैल समर्पण करतो त्याला सर्व देव संतुष्ट होतात.

१२. **ब्राह्मणेभ्य ऋषभं दत्त्वा वरीयः कृणुते मनः** (१९)- ब्राह्मणास बैल समर्पण करणाऱ्याचें मन श्रेष्ठ होतें.

१३. **तत्सर्वमनु मन्यन्तां देवा ऋषभदायिने** (२०)- जो बैलांचें दान करतो त्याला सर्व अनुकूल होतात.

(कां. ३।१४)

१. **यत् अर्हजातस्य नाम तेन वः संसृजामसि** (१)- दिवसभरांत जी श्रेष्ठ वस्तु प्राप्त होते ती तुमच्यासाठीं राखून ठेवतों.

(कां. ७।७५)

१. **स्तेनः यः मा ईशत मा अघशंसः** (१)- चोर तुमच्यावर ताबा न चालवो, कोणी पापीहि तुमच्यावर शासन न चालवो.

(कां. ७।१०४)

१. **यथावशं तन्वः कः=प्रजापतिः कल्पयाति** (१)- इच्छेनुसार शरीराचें बाबतींत प्रजेचें पालन करणारा समर्थ करो.

(कां. ६।१४१)

१. **त्वष्टा पोषाय ध्रियतां** (१)- त्वष्टा पुष्टि करो.

२. **रुद्रः भूम्ने चिकित्सतु** (१)- रुद्र वृद्धीसाठीं चिकित्सा करो.

३. **एवा सहस्रपोषाय लक्ष्म कृणुतं** (३)- या प्रकारें हजारों पुष्टीसाठीं चिन्ह करा.

(कां. ६।७०)

१. **यथा वृषण्यतः पुंसः मनः स्त्रियां निहन्यते** (१)- ज्याप्रमाणें बलवान् पुरुषाचें मन स्त्रीमध्यें रत असतें.

(कां. २।२६)

१. **येषां सहचारं वायुः जुजोष** (१)- वायु ज्यांच्या सहवासांत रहातो.

२. **ये पशवः परा ईयुः ते इह आयन्तु** (१)- जे पशु बाहेर फिरावयास गेले असतील ते एकत्र होऊन परत येवोत.

३. **त्वष्टा येषां रूपधेयानि वेद** (१)- कुशल कारागीर पशूंचे आकार जाणतो.

४. **सविता अस्मिन् गोष्ठे तान् नियच्छतु** (१)- प्रेरक त्यांना गोशाळेंत क्रमानें नियमांत ठेवो.

५. **बृहस्पतिः प्रजानन् आनयतु** (२)- सर्व जनावरांस ओळखणारा त्यांना गोठ्यांत एकत्र करो.

६. **सिनीवाली एषां अग्रं आनयतु** (२)- त्या जनावरांस दाणापाणी देणारी स्त्री त्यांच्यापुढें चालो.

७. **अनुमते आजग्मुषः नियच्छ** (२)- अनुकूल कार्य करणारी स्त्री त्याच्याबरोबर चालो.

८. **पशवः अश्वाः उ पूरुषाः सं सं सं स्रवन्तु** (३)- पशु, घोडे, मनुष्यें सर्व मिळून मिसळून राहोत.

९. **संसिक्ता अस्माकं वीराः** (४)- आमच्या मुलांलेकरांस त्यांच्या दुधातुपानें आम्हीं पोसतों.

(कां. ७।७३)

१. **तप्तं घर्मं पिबतं** (४)-गाईचें दूध ऊन करून प्यावें.

२. **तनायाः उस्रियायाः मधोः दुग्धस्य पयसः वीतं पातं** (५)- हृष्टपुष्ट गाईचें मधुर दूध प्राप्त करा आणि प्या.

३. **सुहस्तः गोधुक् एनां दोहत्** (७)- ज्याचे हात चांगले असतील अशा गवळयानें गाईचें दूध काढावें.

४. **गोधुक् पयसा उपद्रव, उस्रियायाः पयः घर्मे सिंच** (६)- गाईचें दूध काढून गवळयानें लवकर आणावें आणि तें अग्नीवर तापवावें.

५. **सा महते सौभगाय वर्धतां** (८)- पाळलेली गाय धन्याचें सौभाग्य वाढवो.

६. **विश्वदानीं तृणं अद्धि** (११)- गाय नेहमीं गवतच खाते.

(कां. ९।५)

१. **सुकृतां लोकं गच्छतु प्रजानन्** (१)- हा मार्ग जाणून पुण्य कर्म करणाऱ्या लोकास प्राप्त कर.

२. **तीर्त्वा तमांसि अजस्तृतीयं नाकं आक्रमताम्** (१,३)- अजन्मा अंधःकारास दूर करून तिसऱ्या स्वर्गधामास प्राप्त होवो.

३. **एतं आनय, आरभस्व, प्रजानन् सुकृतां लोकं गच्छतु** (१)- त्याला उत्तम मार्गानें चालव, शुभ कार्याचा आरंभ कर, उन्नतीचा मार्ग जाणून पुण्यलोक प्राप्त कर.

४. **त्वा इन्द्राय भागं परिनयामि** (२)- मीं तुला इन्द्राचा भाग समजून अर्पण करतों.

५. **अजः विपश्यन् तमांसि बहुधा तीर्त्वा** (३)- अजन्मा त्या अंधःकाराला अनेक प्रकारें पार करून जातो.

६. **यत् दुश्चरितं चचार, पदः प्र अवनेनिग्धि प्रजानन् शुद्धैः शफैः आक्रताम्** (३)- जो दुराचार झाला आहे आणि ज्यानें पाय मलिन झाले आहेत, ते पाय धुवून शुद्ध पवित्र पावलांनीं पुढें जा.

७. **तृतीये नाके अधि विश्रयैनाम्** (४)- परिपक्व होऊन पुण्यवान् लोकांत जा.

८. **श्रृतो गच्छतु सुकृतां यत्र लोकः** (५)- परिपक्व होऊन सत्कर्म करणाऱ्यांच्या स्थानांत जा.

९. **तृतीये नाके अधि विश्रयस्व** (८)- तिसऱ्या स्वर्गधामाचा आश्रय कर.

१०. **अग्नेः अग्निः सं बभूविथ** (६)- अग्नीतून अग्नि उत्पन्न झाला आहे.

११. **अजो अग्निः उ ज्योतिः आहुः अजः तमांसि अपहन्ति** (७) अग्नीचें नांव अज आहे. ज्योतीचें नांव अज आहे. हा अज अंधारास दूर करतो.

१२. **अजः तमांसि अपहन्ति** (७,११)- अजन्मा अंधाराला दूर करतो.

१३. **जीवता अजं ब्रह्मणे देयं आहुः** (७)-जीवित मनुष्य स्वतःच्या आत्म्याचें आत्मसमर्पण परमात्म्यासाठीं करणें योग्य समजतो.

१४. **श्रद्दधानेन दत्तः अजः तमांसि अपहन्ति** (७)- श्रद्धापूर्वक समर्पित झालेला आत्मा सर्वप्रकारच्या अंधारास दूर करतो.

१५. **पञ्चौदनः पञ्चधा विक्रमताम्** (८)- अजन्मा आत्मा पांच प्रकारच्या क्षेत्रांत पराक्रम करो.

१६. **त्रीणि ज्योतींषि आक्रंस्यमानः** (८)- तीन तेजांना प्राप्त करतो.

१७. **पञ्चौदनः ब्रह्मणे दीयमानः** (९,१०)- अजन्मा ब्राह्मण ज्ञान्यास समर्पण करणें योग्य आहे.

१८. **पञ्चौदनं अजं ब्रह्मणे ददाति** (११,१२)- अजन्मा ब्रह्मास समर्पित करतो.

१९. **अजः हि अग्नेः शोकात् विप्रः अजनिष्ट** (१३)- अग्नीच्या तेजांतून अज उत्पन्न झाला. ज्ञान्याच्या महात्म्यानें ज्ञानी विद्वान् जन्मतो.

२०. **अजोऽसि अज स्वर्गोऽसि** (१६)- तूं अजन्म-

रहित आहेस, तूं स्वतःच स्वर्ग आहेस.

११. अजः पक्वः स्वर्गे लोके दधाति, निर्ऋतिं बाधमानः (१८)– हा अजन्मा आत्मा परिपक्व होऊन अवनतीस दूर करून स्वर्गात जातो.

१२. यं ब्राह्मणे निदधे (१९)– जो ब्रह्मास समर्पण करण्यासाठीं निश्चित केला आहे.

१३. अजो वा इदमग्रे व्यक्रमत (२०)– हा अजन्मा जगताच्या आरंभापासून पराक्रम करित आहे.

१४. एष वा अपरिमितो यज्ञः यदजः पञ्चौदनः (२१)– पंचौदन अज अपरिमित यज्ञ आहे.

१५. अपरिमितं यज्ञं आप्नोति । अपरिमितं लोकं अवरुन्धे (२२)– आत्म्याचें समर्पण केल्यानें अपरिमित लोक प्राप्त होतो.

१६. नैदाघं, कुर्वन्तं, संयतं, पिबन्तं, उद्यन्तं, अभिभुवं नाम ऋतुं वेद-श्रियं आदत्ते आत्मना भवति (३१–३६)– उष्णता, कर्तृत्व, संयम, पोषण, उद्यम आणि शत्रुंजय हे आत्म्याचे ऋतु आहेत. जो या ऋतूंपासून कार्य करून घेण्याचे जाणतो तो श्री प्राप्त करतो आणि आत्म्याच्या शक्तीनें युक्त होतो.

(कां. ७।१९)

१. प्रजापतिः इमा प्रजाः जनयति (१)– प्रजापालक परमेश्वर सर्व प्रजेला उत्पन्न करतो.

(कां. ७।१८)

१. दिव्यस्य उद्नः दृतिं विष्य (१)– दिव्य जलानें भरलेलें भांडें उघडून ठेव.

२. जीरदानुः पृथिवी प्रनभतां (२)– अन्न देणारी जमीन चूर्ण करण्यांत यावी.

(७।७२)

१. सूरः अध्वनः मध्यं विजगाम । श्रातं हविः सुप्रयाहि (२)– सूर्य मध्यान्हीला आला आहे, आतां शिजविलेलें अन्न जेऊन घ्या.

२. माध्यंदिनस्य दध्नः पिब (३)– दुपारच्या जेवणाबरोबर दहीं खावें.

(कां. ६।११७)

१. अनृणा अस्मिन् अनृणाः परस्मिन् तृतीये लोके अनृणाः स्याम । ये देवयानाः पितृयाणाश्च लोकाः सर्वान्पथो अनृणा आक्षियेम (३)- या आणि परलोकांत आम्हीं अनृणी व्हावें, तृतीय धामांतहि आम्ही ऋणरहित असावें. जे देवयान आणि पितृयान मार्ग आहेत त्यांत आम्हीं ऋणरहित होऊन रहावें.

(कां. ७।२३)

१. दौष्वप्न्यं दौर्जीवित्यं रक्षो अभ्वं अराय्यः दुर्णाम्नीः सर्वा दुर्वाचः ता अस्मन्नाशयामसि । (१)– दुष्ट स्वप्न पडणें, दुःखमय जीवित आहे असें वाटणें, हिंसकाकडून कष्ट, पीडा, विकासाला प्रतिबंध होणें, निर्धनता, वाईट शब्द बोलण्याचा स्वभाव, सर्व प्रकारें दुष्ट भाषणें करण्याची संवय, या सर्व विपत्ति आमच्यापासून दूर जावोत.

(कां. ६।१२९)

१. अरातयः अपद्रान्तु (१, २, ३) शत्रु पळून जावोत.

(कां. ७।३१)

१. यो नो द्वेष्टि अधरः सस्पदीष्ट यं उ द्विष्मः तं उ प्राणो जहातु (१)– जो एकटा आम्हां सर्वांचा द्वेष करतो तो खालीं पडो, तसेंच ज्या एकट्याचा आम्हीं सर्व द्वेष करतों त्याला त्याचे प्राण सोडून निघून जावोत.

(कां. ६।४५)

१. गृहेषु गोषु मनः (१)– (गृहस्थाचें) मन घरांत गाई वगैरे जनावरांत राहिलें पाहिजे.

२. मनस्पाप, परा अपेहि, किं अशस्तानि शंससि परेहि न त्वा कामये (१)– हे पापी विचारा ! दूर जा. मला तूं वाईट गोष्टी सांगत आहेस, नीच, मीं तुझ्या इच्छेप्रमाणें वागत नाहीं.

३. यत् जाग्रतः स्वपन्तः उपारिम (२)– जें जागृत अवस्थेंत आणि झोंपेंतहि आम्हीं करतों.

४. मृषा चरामसि (३)– जर असत्य व्यवहार करूं तर त्याचा परिणाम वाईट होईल.

(कां. ७।१००)

१. अहं अंतरं ब्रह्म कृण्वे (१)– मीं ज्ञानाला माझ्या हृदयांत ठेवतो.

(कां. ७।१०१)

१. **तत् सर्वं मे शिवं अस्तु** (१)– ते सर्व माझ्या-साठीं शुभ होवो.

(कां. ९।१)

१. **सर्वाः प्रजाः हृद्भिः प्रतिनन्दन्ति** (१)– सर्व लोक हृदयानें आनंदित होतात.

२. **मर्त्येषु महान् भर्गः चरति** (४)– मर्त्यांत महान् तेजच संचार करतें.

३. **यौ अस्याः सहस्रधारौ अक्षितौ स्तनौ अनप स्फुरन्तौ ऊर्जं दुहाते** (७)– जे तिचे सहस्रधारायुक्त अक्षय स्तन आहेत, ते अविचलित होऊन बलवान् रसाचें दोहन करतात.

४. **एवा मे वर्चः तेजः वलं ओजः च धियतां** (१७)– माझें तेज, ज्ञान, वल आणि वीर्य संचित होवो, वाढत राहो.

(कां. ५।१९)

१. **यत्र ब्राह्मणं हिंसन्ति तत् राष्ट्रं दुच्छुना हंति** (८)– जेथें ब्राह्मणास दुःख दिलें जातें तें राष्ट्र विपत्तींत मरतें.

२. **ब्राह्मणस्य गां जग्ध्वा कश्चन राष्ट्रे न जागार** (१०)– ब्राह्मणाची गाय हिरावून घेणारा कोणीहि राष्ट्रांत जिवंत राहूं शकत नाहीं.

३. **मृताय पदयोपनीं कूद्यं अनुबध्नन्ति** (१२)– स्मृतिचिन्हें पुसून टाकणारी कांटेरी केरसुणी मेलेल्याबरोबर बांधतात.

४. **मृतं स्नपयन्ति** (१४)– मृत शरीराला स्नान घाल-ण्यांत येतें.

५. **श्मश्रुणि उन्दते** (१४)– हजामतीच्या वेळीं केंस भिजविण्यांत येतात.

६. **वर्षं ब्रह्मज्यं न अभिवर्षति** (१५)– ब्राह्मणाला कष्ट देणाऱ्यावर वृष्टि होत नाहीं.

७. **न मित्रं वशं नयते** (१५)– मित्रहि त्याला वश होऊन रहात नाहींत.

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद [भाग तिसरा]

‘ गृ ह स्था श्र म ’

कांड-सूक्त-विषय-मंत्रसंख्या-ऋषि-देवतांची

अनुक्रमणिका